. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
ग्रं. क्र. ७५८९

# समाज चिंतन

के. बेडेक

REFBK-0017293

७११३८
३०।१।७०
निबं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७११३८ वि: निबंध
क्रमांक १५४२ नोंद दि: ३०।१।७०

# समाज चिंतन

दि. के. बेडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ......10736...... दि:
क्रमांक ......9...... नों: दि: ......
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ............
शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0017293
REFBK-0017293

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© दि. के. बेडेकर

पहिली आवृत्ती ऑगस्ट १९६९

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय, (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ, पुणे ३०

किंमत रु. १०

प्रकाशक
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, ताडदेव रोड, मुंबई ३४ WB

## अनुक्रमणिका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ८११३८ वि: १ निबंध
क्रमांक ९६४९९ नोंद दि: २१/११/८०

---

### भाग पहिला

१ मार्क्सचा समाजपरिवर्तनाचा दृष्टिकोण १
( समाज प्रबोधन पत्रिका, अंक १९–२०, डिसेंबर १९६७–मार्च १९६८ )

२ तत्त्वदर्शनांचा सोपानमार्ग १७
(दिशा, संकलन ३, २ एप्रिल १९६५ नागपूर)

३ साम्ययोग आणि मार्क्सची भूमिका २२
( साम्ययोग, १९६८ )

४ कम्युनिस्ट जाहीरनामा ३०
( साहित्य, फेब्रु. १९४८ )

५ सोव्हिएट सांस्कृतिक पुनर्घटनेची भूमिका ३९
( चित्रमयजगत, जानें. १९४८ )

६ कम्युनिझमलाच यशाची हमी ४८
( वाङमयशोभा, ऑगस्ट १९४९ )

७ भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे भवितव्य ५७
( साधना, १५ ऑगस्ट १९५० )

८ सोव्हेएतमधील अनेकविध लोक ६३
( चित्रशाळा प्रकाशन, पुणे, मे १९४७ )

९ रशियाचे परराष्ट्रीय धोरण
साम्राज्यवादी स्वरूपाचे आहे काय ? १०५
( किर्लोस्कर, जून १९४६ )

१० जग की वेडयांचे इस्पितळ? ११३
( मनोहर, जानेवारी १९३८ )

११ गॉर्कीच्या 'आई 'चे माझ्यावरील संस्कार १२१
( सोव्हिएत देश, एप्रिल १९६८ )

१२ लेनिनग्राद–रीगा–मास्को १२५
( धरती, दिवाळी अंक १९६८ )

१३ महाराष्ट्रातील समाजवादी विचार १३६
( सरदार–गौरवग्रंथ, ओरिएन्ट लाँगमन्स, मे १९६९
( परिशिष्ठ )

१४ विषमता राहणारच ! पण... १६०
( किर्लोस्कर, ऑगस्ट १९४८ )

१५ कार्ल मार्क्स १७१
( आकाशवाणी ४ मे १८६९ )

### भाग दुसरा

१६ परिवर्तन : भ्रम व सत्य १७९
( मराठवाडा दिवाळी अंक १९५७ )

१७ बळीराजाचे व्यथित मानस १८७
( नवभारत, नोव्हेंबर १९६३ )

१८ परंपरा हवी, नवी दृष्टीही हवी १९९
( मांडवी, दिवाळी अंक १९६४ )

१९ आपली परंपरा : भारतीय की वैदिक ? २०६
( शिरीष, दिवाळी अंक १९५५ )

२० डांगे यांचे 'प्राचीन भारत' २२१
( नवभारत, मार्च १९५१ )

२१ बुवाबाजीचा भस्मासुर २३३
( किर्लोस्कर, एप्रिल १९६५ )

२२ 'मऱ्हाटी' संस्कृति २४५
( नवभारत, जून १९५३ )

# प्रस्तावना

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ........................ दि: ..........
क्रमांक ........................ नोंद दि: ..........

प्रस्तुत लेखसंग्रहातील पहिले दोन लेख समाजपरिवर्तनाच्या एकंदर विचारासंबंधी, माझी भूमिका दर्शविणारे आहेत. मानवी मूल्यांना, विशेषत. व्यक्तिस्वातंत्र्याला, जपणारी समाजवादी व्यवस्था आदर्श म्हणून मला यावीशी वाटते. ती प्रत्यक्षात येणे अवघड आहे, तरी व्यवहार्य आहे. आजच्या तरुणांना चालू स्थितीबद्दल जो संताप आहे तो मला चुकीचा वाटत नाही. केवळ गरिबांनाच नव्हे तर माणुसकीने जगू इच्छिणाऱ्या सर्वच माणसांना असह्य अशी आजची प्राप्त, प्रतिष्ठित व्यवस्था आहे. पण नुसता संताप व्यक्त करून न थांबता तरुणांनी ही घडी बदलण्याचा, त्यासाठी पडेल ती, किंमत देण्याचा, निर्धार करणेही आवश्यक आहे.

प्रतिष्ठित व्यवस्था बदलण्यासाठी क्रियाशीलता, त्याग, सहिष्णुता यांची गरज आहेच. शिवाय समाजाविषयी चिंतन करण्याचीही गरज आहे. व्यक्ती, कुटुंब, जात, प्रदेश, देश आणि मानवसमाज यांपैकी कोणत्या घटकाला महत्त्व द्यावयाचे ? या घटकांमध्ये संघर्ष येतात, ते कसे सोडवावयाचे, आणि या संघर्षांमधूनच आदर्श व्यवस्थेकडे प्रगती कशी करावयाची ? हे सारे प्रश्न समाजविषयक चिंतन करूनच उमगू शकतील. या चिंतनात मार्क्सवादाची, व्यक्तिस्वातंत्र्यवादाची, धर्मचर्चेची, साहित्यचर्चेची व प्रत्यक्ष घडामोडींतून येणाऱ्या दैनंदिन अनुभवांची मदत होईल. परंतु कोणत्याही वादाची झांपड लावून श्रद्धाळू विचार करणे धोक्याचे ठरेल. (प्रस्तुत संग्रहातील माझे काही जुने लेख जसेच्या तसे पुनर्मुद्रित केले आहेत. त्यांमध्येही काही ठिकाणी असे श्रद्धाळू विवेचन वाचकांना आढळेल. )

समाजविषयक चिंतनाबाबतीत समाजवादी दृष्टी ठेऊन केलेले लेखन संग्रहाच्या पहिल्या भागात पृ. १७६ पर्यंत आहे. पुढील भाग दुसरा

यामध्ये आपल्या सामाजिक जीवनात येणाऱ्या काही समस्यांचा विचार मी केला आहे. परंपरा आणि नवे विचार यामध्ये संघर्ष होणे अटळ असते, आणि तो संघर्ष समंजस व निर्भय असेल तर त्यांतून समाजाचे हित साधेल. नाहीतर समाजाला भयभीत, भाबडा आणि दुबळा करणारा कलह माजेल. समाजचिंतनामुळे समंजस संघर्षाची शक्यता निर्माण होईल. या दृष्टीने दुसऱ्या भागातील लेख वाचकांना उपयोगी वाटतील अशी मी आशा करतो.

या संग्रहातील सोव्हिएतमधील अनेकविध लोक हा लेख १९४७ साली लिहिलेला आहे. त्या वेळची कोष्टके आज उपलब्ध असलेल्या माहितीनुसार बदलणे आवश्यक होते. ते काम श्रीमती सुलभा ब्रह्मे यांनी करून दिले, याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

छपाईमध्ये कलात्मक रचनेसाठी श्री. देवीदास बागूल यांनी मित्रत्वाने सूचना केल्या. श्री. सालकर यांनी मुखपृष्ठ करून दिले. आणि श्री. माटे यांनी आपलेपणाने पुस्तकाचे मुद्रण करून दिले. या सर्वांचे मी आभार मानतो.

१२५९।२ जंगली महाराज रस्ता, दि. के. बेडेकर
पुणे-४
दि. १४ ऑगस्ट १९६९.

# भाग पहिला

समाज चिंतन । १ ।

# मार्क्सचा समाजपरिवर्तनाचा दृष्टिकोण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 96293
संदर्भ शाखा (स्थूल ग्रंथ)

मनुष्याला निसर्गाचे रूप थोडेफार आज कळले आहे; तसेच आपल्या मनाचे स्वरूपही थोडे कळले आहे. अनेक शतके प्रयत्न करीत करीत आजचे ज्ञान माणसाने कमाविले आहे. या प्रयत्नात ज्यांचे कर्तृत्व मोठे आहे अशी माणसे प्राचीन व मध्ययुगीन काळांत सर्व देशांत होऊन गेली. आधुनिक काळात देकार्त व न्यूटन, नंतर स्पिनोझा, हेगेल, डार्विन, फ्राईड, कार्ल मार्क्स व आइनस्टाईन अशी विचारवंतांची नावे घेता येतील. या सर्वांनी मिळून माणसाला निसर्गाबद्दल व मानवी जीवनाबद्दल एक दृष्टी दिली आहे. ही दृष्टी स्वीकारणारा माणूस कोणा एका विचारवंताचा शिष्य नसून या सर्वांचा अनुयायी असतो. माझी स्वतःची ही भूमिका आहे.

मानवाला स्वतःच्या शरीराबद्दल, मनाबद्दल व श्रेयाबद्दल वास्तव कल्पना देणारे अलीकडचे विचारवंत म्हणून मार्क्स, डार्विन, फ्राईड या तिघांची नावे घेता येतील. या तिघांच्याही प्रमेयांचा व शिकवणींचा विलक्षण विपर्यास झालेला आढळतो. ' बळी तो कान पिळी ' हा निसर्गाचा नियम ओळखून माणसाने वागावे असे डार्विनने सांगितले नाही. हिंसा व भोगवाद यांची शिकवण मार्क्सने दिलेली नाही. कामवासनेला स्वैर सोडावे असे फ्राईडने सांगितले नाही. पण नेमके हेच अपसिद्धान्त त्यांच्यावर लादले जातात. असे होणे विपरीत असले तरी विस्मयकारक नाही. डार्विन, मार्क्स व फ्राईड यांनी सांगितले एक व लोकांना दिसले वेगळेच असा प्रकार घडला. ते साहजिकच होते. सवयीच्या चष्म्यातून पाहण्याचा अधूपणा मानवी मनातच आहे; सर्जनक्षम मानवी मनाला ती मर्यादा आहेच.

मार्क्सच्या प्रमेयाबाबत व दृष्टिकोणाबाबत असे घडले आहे की, मार्क्सच्या विरोधकांइतकेच त्याच्या समर्थकांनाही सवयीच्या अधूपणाने नाडले

आहे. माव-त्से-तुंगचा ‘ मार्क्सवाद ’, रशियन नेत्यांचा ‘ मार्क्सवाद ’ आणि देशोदेशींच्या मार्क्सवाद्यांचा ‘ मार्क्सवाद ’ ही मार्क्सच्या शिकवणीची सापेक्ष प्रतिबिंबे आहेत. मार्क्सच्या विरोधकांना दिसलेली मार्क्सवादाची हिंसात्मक वा भोगवादी रूपेही तशीच आहेत.

या गोंधळातून बाहेर पडण्याची आशा करणेही अवघड आहे. पण, त्यासाठी प्रयत्न करावयास हवा. रशियन, चिनी किंवा अन्य कोणत्याही घटनांकडे बोट दाखवून ‘ हा पाहा प्रत्यक्ष अवतरलेला मार्क्सवाद ’ असे म्हणण्याचा मोह टाळला तरच हा प्रयत्न करता येईल. हिरोशिमाच्या संहाराकडे बोट दाखवून, अणुशक्तीचे तत्त्व सांगणाऱ्या आइन्स्टाइनचे मन आपण समजावून घेत नाही. लैंगिक स्वैराचाराकडे पाहून फ्राईडचे सिद्धान्त कळण्याची आशा आपण करीत नाही. तोच न्याय मार्क्सच्या प्रमेयांच्या बाबतीत मानावयास हवा.

मार्क्सच्या दृष्टीने समाजपरिवर्तन आवश्यक आहे. पण समाजपरिवर्तन हे त्याच्या दृष्टीने एक केवळ साधन आहे. त्याचे साध्य कोणते ? तर मनुष्यमात्राचे परिवर्तन. या परिवर्तनाचे स्वरूप व त्यासाठी मार्क्सने सांगितलेला मार्ग यांचे विवेचन प्रस्तुत लेखात करावयाचे आहे.

मनुष्यमात्राच्या केवळ बाह्य आचारांत किंवा वेशभूषेत फरक झाल्याने काही साधणार नाही, तसेच केवळ संस्था, चालीरीती आणि संकेत यांत बदल करून खरे परिवर्तन होणार नाही, असे कोणीही म्हणेल. मार्क्सचेही तेच म्हणणे आहे. फरक व्हावयाचा तो मुळातच झाला पाहिजे, म्हणजे माणसांच्या मनात, दृष्टीत व भावनांतच झाला पाहिजे. पण माणसाच्या मनात बदल व्हावयाची गरज आहे का ? व असेल तर ती कशी उत्पन्न झाली हा खरा प्रश्न आहे. हा प्रश्नच प्रथम समजावून घेतला पाहिजे. नंतर त्याच्या उत्तराचा विचार केला पाहिजे.

हा प्रश्न युरोपच्या तत्त्वज्ञांनी शोधला, म्हणजे या प्रश्नाच्या दिशेने मानवी मनाचा त्यांनी शोध घेतला. मार्क्सच्या आधी हेगेलने या प्रश्नाची आपल्या पद्धतीने मांडणी केली व मानवी मनाच्या ‘ परात्मभावा ’चे प्रमेय मांडले. मार्क्सने ते प्रमेय स्वीकारून या प्रश्नाची आपल्या पद्धतीने नवी मांडणी केली. हेगेलची मांडणी ‘ चिद्वादी ’ तर मार्क्सची ‘ जडवादी ’ असा भेद आहे, पण तरी ‘ परात्मभावा ’चे तत्त्व दोघांनी मानले आहे ते समान अर्थानेच.

‘ परात्मभाव ’ हा शब्द इंग्रजीतल्या ‘ एलीनेशन ’ (alienation) या शब्दासाठी मी योजीत आहे. माणसाचे मन आपलेपणाला विसरून गेले आहे व दुसऱ्या, बाह्य आणि परक्या गोष्टींना इतके शरण गेले आहे

की हे परत्वच मनाला पुरते ग्रासीत आहे. मनाची ही आगंतुक वृत्ती म्हणजेच परत्वाला सर्वस्व मानण्याचा ‘ परात्मभाव ’. देहाची सुखदु:खे म्हणजेच सारे काही असे मानणारा माणूस ‘ देहात्मबुद्धी ’ने ग्रासलेला असतो असे भारतीय अध्यात्माच्या परिभाषेत म्हटले जाते. या मिथ्या कल्पनेतून मुक्त होऊन माणसाने आत्म्याचे स्वरूप ओळखणे हे आध्यात्मिक श्रेय मानले जाते. ‘ परात्मभावा ’ची कल्पना मुळात वेगळी आहे. इथे ‘ आत्म्या ’च्या स्वरूपाचा प्रश्न नसून मनुष्यत्वाचा म्हणजे मनुष्याच्या स्वरूपाचा प्रश्न आहे. मनुष्यत्वाला विसरून जेव्हा मिथ्या अशा परात्मतेला माणूस शरण जातो तेव्हा अनर्थ होतो, माणूस आपल्या जीवनालाच पारखा होतो. ‘ परात्मता ’ ही भ्रांती आहे, पण ती मानवी मनाला ग्रासते खरी. ह्या भ्रांतीचा निरास ज्ञानाने होऊ शकतो. मार्क्सच्या मते त्याचे तत्त्वज्ञान या निरासासाठी आहे.

‘ परात्मते ’चा अर्थ विशद होण्यासाठी दोन साधी उदाहरणे घेऊ.एखाद्या अरण्यात अंजन, बाभळ, पिंपळ, औदुंबर असे वृक्ष वाढत असतात. निसर्गामध्ये सारे वृक्ष सारखेच. पण मनुष्य त्या अरण्यात आला की आपल्या मनातील कल्पना घेऊन येतो. माणसाने आपल्या मनात पावित्र्याची कल्पना निर्माण केली असल्याने त्याला सगळे वृक्ष सारखे नसतात. तो असे मानतो की औदुंबर व पिंपळ हे वृक्ष पवित्र आहेत. मग तो या वृक्षांना वेगळे मानतो व आजूबाजूचे दगड घेऊन त्या वृक्षांना पार बांधतो. तेथेच एक दगड ठेऊन त्याला देव मानतो. पिंपळाला प्रदक्षिणा घालून किंवा देवापुढे दंडवत घालून आपण पावित्र्य किंवा पुण्य मिळवू अशी श्रद्धा तो बाळगतो व त्याप्रमाणे कृती करतो.

माणसाने आपल्या अंत:करणातील पावित्र्याची भावना बाहेर मूर्त केली व तिला तो ‘ पर ’ मानू लागला. माणसाने आपली बुद्धी गहाण टाकू नये, असा उपदेश केला जातो; कारण असे आहे की माणसाच्या मनाची ही एक प्रवृत्ती आहे, की तो आपले स्वत्व, मन, बुद्धी व कल्पना गहाण टाकतो. हे नकळत घडते, कारण स्वाभाविक आहे. ‘ मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो:’ या वचनात हेच सांगितले आहे. जे मानुष आहे त्याला अ-मानुष, बाह्य मानण्यामुळे माणूस ‘ परत्त्वाच्या आधीन होतो ’, ‘ परात्मता ’ हीच त्याच्या मनाला व्यापून व ग्रासून टाकते.

दुसरे एक व्यवहारातलेच उदाहरण घेऊ. कुटुंबामध्ये आई-बाप, भावंडे, नातवंडे यांच्यातील व्यवहार कौटुंबिक जिव्हाळ्याने चालतात. श्रमविभाग व विषमता असते, पण स्पर्धा व लोभ नसतो; असला तरी तो प्रेमाच्या सावलीत व मर्यादेत असतो. पैशाचा रोखठोक व्यवहार बाहेर असतो,

त्याचा कौटुंबिक नात्यांत शिरकाव नसतो. पण कुटुंबाची लक्ष्मणरेषा ओलांडून बाहेर पाऊल टाकले की माणूस पैशाच्या पिशाच्चाने झपाटला जातो. प्राचीन काळापासून संपत्तीची हाव माणसाला बाधलेली दिसते. पूर्वीच्या काळी सोने, हिरे, माणके, पशु, स्त्रिया, गुलाम यांच्यासाठी हाव होती व राज्याची हाव म्हणजे संपत्तीची हावच होती. कुरुक्षेत्र रक्ताने न्हाली ती राज्यलोभानेच. आज गुलामांची खरेदी-विक्री होत नाही, सिंहासनासाठी लढाया होत नाहीत. हा फरक खरा; पण तो वरवरचा आहे. संपत्ती पूर्वी वस्तुरूपात साठविली जात होती, आता ती कागदी चलनाच्या निराकार, निर्गुण रूपात, बँकांच्या गूढ व्यवहारांत साठविली जाते. लढाया होतातच, फक्त त्या शांततेसाठी लढल्या जातात ! क्षत्रियाला प्राप्य 'स्वर्गा'साठी नव्हे !

'संपत्ती' निर्माण करतो माणूस, पण ती बाहेर उभी ठाकलेली अमानुष शक्ती बनून माणसाला ग्रासून टाकते. या किमयेचा अर्थ माणूस संपत्तीच्या परात्मतेला शरण जातो. श्रीमंत माणूसही या परात्मतेने गुलाम झालेला असतो. संपत्तीच्या लोभाने त्याचे मन भारलेले असते. कधी एखाद्या श्रीमंताला या लोभाची शिसारी आली तर तो साऱ्या संपत्तीचे दान देऊन टाकतो व मुक्त होऊन कशाच्या तरी भजनी लागतो. पण त्यामुळे संपत्तीच्या अमानुष शक्तीची मानवजातीवरील मगरमिठी ढिली होत नाही. पूर्वापार ज्ञात संस्कृतींच्या भव्य-निर्घृण इतिहासात, राजवंशांच्या व राष्ट्रांच्या उदयास्तांत, हेच संपत्तीचे भूत सुदैवी, कर्तृत्ववान व पराक्रमी व्यक्तींच्या मानगुटीला बसलेले आढळते. आणि दुर्दैवी, गरीब सामान्यांच्या नशिबी संपत्तीच्या अभावी भोगावी लागणारी गुलामगिरी व भाकरीची चिंता हे 'जडवादी' अध्यात्म आलेले दिसते; हे मुके अध्यात्म व मोठ्यांचे बोलके अध्यात्म शेवटी एकच असते.

कौटुंबिक जीवनात माणुस हा मानुष वृत्तीने, अंतःकरणाने, नांदू शकतो. पण आपल्याच मनातून 'संपत्ती' चे दैवत, ही ग्रासणारी 'परात्मता', तो निर्माण करतो. देवदानवांना निर्माण करून त्यांना शरण जाणारा माणूस त्याच किमयेने संपत्तीच्या स्व-निर्मित, अमानुष, बाह्य शक्तीला शरण जातो. एकदा शरण गेल्यावर त्याच्या सर्व सर्जनशीलतेचे सामर्थ्य या शक्तीलाच लाभत जाते. ती माणसाच्याच कर्तृत्वावर पोसत जाऊन माणसाला जास्त क्षुद्र बनवीत जाते. आज संपन्न देशांतही माणसे भयभीत आहेत, जीवनाला तुच्छ मानण्याची त्यांची वृत्ती बळावत आहे; या ना त्या धर्माची सावली ती शोधीत आहेत. याचे प्रतिबिंब व वेदना आजच्या युरोपीय साहित्यात फार उत्कटतेने आढळतात, तत्त्वचिंतनातही

तीच व्यथा बोलकी होते. ‘ मीपण ’ हरवलेली व्यक्ती आक्रंदताना दिसते. पण खोलवर पाहिले तर व्यक्तीव्यक्तींनी बनलेली मानवजातच आज ‘ मीपण ’, स्वत्व, मानुषता हरवून बसलेली आहे व भांबावलेली आहे. आजच नव्हे तर गेली दोन शतके ही अवस्था आहे व मार्क्सला तिची जाणीव आहे. या जाणिवेतून त्याने आपले समाजपरिवर्तनाचे प्रमेय, ‘ परात्मते ’च्या निरासाचे तत्त्व, मांडले आहे.

परात्मतेचा निरास म्हणजेच मानुषतेचा लाभ. हा व्हावयाचा तो माणसाला, म्हणजे जे आपले आहे तेच आपल्याला परत लाभणे आहे. ‘ नरेच केला हीन किती नर ’ या आर्त वेदनेत हाच अर्थ आहे. नराला वानर व्हायचे नसून नरत्वाचे भान परत मिळवावयाचे आहे; तसेच त्याला नारायण व्हावयाचे नसून परात्मतेचे पटल दूर करावयाचे आहे. सॉक्रेटिसपासून व उपनिषदांतील ऋषींपासून सर्वांनी हा उपदेश केला आहे की, ‘ स्वतःला ओळखा ’, ‘ आत्मा वा रे मन्तव्यः ’ इत्यादी. पण या ‘ स्व ’वर, ‘ आत्म्या ’वर, परात्मतेचे पटल होते. हजारो वर्षांच्या ज्ञानसाधनेने हे पटल विरत विरत आज पारदर्शक झाले आहे व माणसाला आपले विश्वातले प्रत्यक्ष स्थान, प्राणिमात्रांशी सहोदरत्वाचे नाते, मनातील गुणदोष थोडेफार कळले आहेत. आपले मानुष सामर्थ्य व मर्यादा उमगल्या आहेत. ‘ परात्मते ’च्या पोटी उपजणारे भय, विरक्ती, अहंकार, विराटतेची स्वप्ने व क्षुद्रतेची आणि शरणागतीची भावना हे सारे आता निरस्त होणे शक्य झाले आहे. दुसरीकडे, मानवी संस्थात्मक जीवन, उत्पादनाच्या साधनांची प्रगलभता, विज्ञानाची प्रगती व ज्ञानाचा सार्वत्रिक प्रसार, इत्यादी गोष्टी उपलब्ध झाल्यामुळे व्यक्तिमात्राला अन्न, वस्त्र, निवारा, काम आणि विश्रांती व आरोग्य मिळून एका सहकारी शांततामय मानवजीवनाच्या किमान गरजांचा पाया सुदृढ करणे शक्य झाले आहे.

मार्क्सच्या काळी ही सारी मानसिक व भौतिक अवस्था आजच्याइतकी परिपक्व नव्हती. तरी आजच्या अवस्थेचे अंधुक दर्शन घडू शकेल एवढे बदल मार्क्सच्या आधी सुमारे शंभर वर्षे तरी घडत आले होते. वर्गकलहाचे रूप मार्क्सच्या आधीच स्पष्ट झाले होते. कम्युनिझमचे ख्रिश्चनधर्मप्रणीत स्वप्न आणि मनोराज्ये व स्वप्ने पाहणारे तत्त्वज्ञ मार्क्सच्या बरेच आधी झाले होते. मार्क्सने सांगितले ते पूर्वसूरींच्या कल्पनांचे दृढीकरण व सुसूत्रीकरण होते व म्हणूनच ते युरोपीय मानवाच्या मनोभूमीत रूजू शकले. मानवाने परात्मतेचा भ्रम स्वीकारून केलेला संस्कृति-प्रपंच व भौतिक जीवनाचा पसारा जेव्हा समग्र मानवजातीला ग्रासून भयभीत करू

लागला, तेव्हा या परात्मतेचा भीषण अर्थ माणसाला कळू लागला. मगच मानुषतेच्या मूळ स्रोताकडे, एका आदिम निरागस अवस्थेकडे परत वळण्याचे स्वप्न विचारवंतांना दिसू लागले. साहित्यात, कलेत व सर्वच क्षेत्रांत 'रोमॅन्टिक' पंथ प्रभावी होऊ लागला. 'निसर्ग', 'बाल्य', 'अंत:प्रेरणेची निरागसता' यांना पावित्र्य आले. मार्क्सच्या अंत:करणात हा 'रोमॅन्टिसिझम' नांदत आहे खरा, पण त्याच्या बुद्धीने विज्ञानाचे संस्कारही घेतले. त्यामुळे, मानुषतेचा परत लाभ म्हणजे नुसते मानवजातीच्या बाल्याकडे, निरागसतेकडे, निसर्गाकडे वळणे आहे, असे तो मानीत नाही. समाजाचे व व्यक्तीचे परिवर्तन म्हणजे केवळ 'माहेरी' जाणे, पुन्हा प्रारंभबिंदूकडे पोहोचणे नाही. तो असे मानतो की परात्मतेच्या पोटी झालेल्या अनर्थालाही अर्थ आहे. प्रगल्भतेसाठी बालकाला धडे शिकावे लागतात, कुमारावस्थेतील स्वप्ने, दु:खे, मनोभंग व काळोख यांतून जावे लागते. मगच स्वत:चे व्यक्तित्व व स्व-तंत्रता लाभते. तेच सायास म्हणजे आजवरचा मानवाचा इतिहास, असे मार्क्स मानतो.

समाजपरिवर्तनाबाबत मार्क्सचा दृष्टिकोण असा आहे. माणसाला मानुषतेचा एका उच्चतर स्तरावर परतलाभ, त्यासाठी परात्मतेच्या भ्रमाचा निरास, हेच मार्क्सचे साध्य आहे. माणसाने स्वत:च निर्माण केलेले 'दुरिताचे तिमिर' त्याने नष्ट करावे, स्वत:ला ओळखावे व मनुष्यत्वाने नटलेले मानवजीवन स्वत: निर्माण करावे, ही त्याची शिकवण आहे. कम्युनिस्ट जाहीरनाम्याच्या शेवटी त्याने म्हटले आहे की, "कामकऱ्यांनो! गमावण्यासारखे काही तुमच्याजवळ नाही, फक्त बेड्याच आहेत. आणि मिळविण्यासारखी आहेत ती म्हणजे नवी जगेच." जाहीरनाम्याच्या मर्यादा या उद्‌गारांना आहेत. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे समग्र रूप लक्षात घेतले तर त्यांचा अर्थ व आशय विस्तारावा लागेल. कामकऱ्यांच्याच नव्हे तर मानवमात्राच्या जवळचे सारे गमाविल्यासारखे, हरपल्यासारखे आहे. सर्वांच्याच मनांवर परात्मतेच्या, भयाच्या, लोभाच्या व वैराच्या शृंखला आहेत. भांडवलदार व मजूर, पंडित व अडाणी, सारेच बद्ध आहेत. संसदीय लोकशाहीचे संकेत मानणारा समाज व न मानणारा समाज एकमेकांशी भयाने बांधलेले आहेत व हे भय लोकशाहीला सर्वत्र विकलांग करीत आहे. हे भय व या शृंखला सगळ्यांनाच तोडावयाच्या आहेत व एकदमच त्या तुटू शकणार आहेत. आणि जर त्या तुटल्या तरच आजवरचा काळोख संपून मानवजातीपुढे नवी क्षितिजे प्रकाशणार आहेत.

पण मानवापुढे आज तर भयाचा काळोख आहे. आशावादाचा आधार मग कोठे आहे? तर तो मानुषतेतच आहे. मनुष्य कसा आहे? तर तो इतर

प्राण्यांच्या सारखा आपल्या देहाच्या व मनाच्या मर्यादांनी वेढलेला आहे. पण त्याचे मन सर्जनशील आहे. इतरांबद्दल प्रेम वाटण्याचे सामर्थ्य त्या मनाला आहे. परिस्थितीचे आकलन करून तिला ईप्सित रूप देण्याचे मनोधैर्य व कौशल्य मानवी मनात व कर्तृत्वात आहे. म्हणूनच पाषाणयुगातील मानव आजवरचा इतिहास घडवू शकला. हा इतिहास हाच मानुषतेच्या सामर्थ्याचा एकमेव पुरावा आहे व तेच भविष्यासाठी आश्वासन आहे. यात गूढ असे काही नाही. मानुषतेला कोणत्याही ' परात्म ' शक्तीच्या आशीर्वादाची येथे भुलावण नाही. मार्क्सचा मानवतावाद मानुषतेच्या या प्रत्यक्ष आधारावर उभा आहे. त्याची शिकवण ' परात्मते 'तून मुक्ती लाभण्यासाठी, मानुषतेच्या परतलाभासाठी आहे.

समाजाचे परिवर्तन कशासाठी, कोणत्या साध्यासाठी करावयाचे याबद्दल येथवर विवेचन झाले. मार्क्सचा दृष्टिकोण परात्मतेचा निरास करणे व मानुषता परत आणणे हा आहे. नुसती सत्ता संपादन करून कोणताही एक वर्ग किंवा व्यक्तिसमूह मानवी मनाचे आमूलाग्र परिवर्तन घडवू शकणार नाही; किंबहुना परिवर्तनाचे हे साध्य समोर न ठेवता झालेली क्रांती राज्यक्रांती ठरते, समाजक्रांती ठरू शकत नाही. म्हणून राजकीय सत्तेसाठी गुप्त कारस्थान करून किंवा सशस्त्र साहस करून आपले ध्येय साध्य होईल, असे मार्क्सने कधी मानलेले नाही. उलटपक्षी, गुप्त सशस्त्र कटांची पद्धती अवलंबून समाजक्रांती करू पाहणाऱ्यांना त्याने भ्रमिष्ट, माथेफिरू अशी विशेषणे बहाल केली आहेत. मार्क्सच्या आधीचा काळ फ्रेंच समाजक्रांतीनंतरच्या सशस्त्र बंडखोरीच्या व रक्तपाताच्या कल्पनांनी भारलेला काळ होता. त्याच्या समकालीनांपैकी अनेकजण सशस्त्र कट रचण्यात गर्क होते. पण, मार्क्सने असे मानले की समाजपरिवर्तन ही साऱ्या समाजाने घडविण्याची प्रक्रिया आहे. हे परिवर्तन सर्व माणसांनी करावयाचे आहे. त्यासाठी धैर्याची, नेतृत्वाची, त्यागाची, चारित्र्याची व संघटनेची गरज आहे. तसेच ज्या मनुष्यत्वाच्या साध्यासाठी क्रांती करावयाची त्या मनुष्यत्वाला साक्ष ठेवून व जोपासून ही क्रांती करावयाची आहे.

माणसांनी आपले पूर्वसंचित परात्मतेचे संस्कार टाकून मानुषतेसाठी जर नवे जीवन घडवावयाचे आहे, तर त्यासाठी अ-मानुष मार्ग उपयोगी नाहीत, ते दोन अर्थांनी : (१) माणसांतील परस्पर-प्रेम, समूहभावना यांना डावलून, अमानुष क्रौर्याने व साहसाने, क्रांतीचा मार्ग चोखाळता येणार नाही, आणि (२) अन्यायाच्या प्रतिकारासाठी, स्वातंत्र्यासाठी व श्रेयासाठी हत्यार उचलणे अटळ झाल्यास ते उचलण्याची इच्छा मनुष्य-

मात्रात स्वाभाविक आहे. निर्भयता हा गुण व भ्याडपणा हा दोष माणसे मानतात. पूर्ण व शुद्ध अहिंसा ही संतांच्यापुरती गौरवास्पद आहे, आदर्श म्हणून मनुष्यमात्राला आदरणीय आहे. परंतु समाजक्रांतीत ती माणसांनी पाळावयाची मर्यादा म्हणून सांगता येत नाही.

एका टोकाला साहसी हिंसाचारी मार्ग व दुसऱ्या टोकाला संतांचा अहिंसेचा मार्ग, असे दोन मार्ग, मार्क्सच्या काळी व आजही उपदेशिले जाताना दिसतात. थोडया व्यक्तींपुरतेच परिवर्तनाचे कार्य सीमित ठेवावयाचे असेल तर दोन्ही मार्ग अंमलात आणणे शक्य असते. आपल्या इतिहासात चाणक्याने व चंद्रगुप्ताने नंदांचा नाश पहिल्या मार्गाने केला. अहिल्याबाईने राघोबादादांना दुसऱ्या मार्गाने पराजित केले. पण समाजपरिवर्तनाची प्रक्रिया अशी नाही—निदान मार्क्सने ती तशी मानलेली नाही.

मार्क्सने अहिंसेला व हिंसेलाही सर्जनशील मानलेले नाही. सारे आजवरचे बदल शस्त्रबळाने झालेले आहेत, हे सत्य मार्क्सने सांगितले; पण त्याने म्हटले आहे की हिंसेने व बळाने नवे निर्माण होत नाही. नवे समाजाच्या मायकुशीत आधी वाढते व नंतर ते जन्माला येताना हिंसेला फक्त दाईच्या रूपाने यावे लागते. हादेखील फक्त आजवरचा इतिहास आहे, अटळ त्रिकालाबाधित नियम नाही. मार्क्सच्या सर्व भूमिकेला हिंसाचार म्हणून झोडपणाऱ्या विरोधकांनी असे भासविले आहे की दाईलाच ( म्हणजेच हिंसाचाराला ) गर्भधारणा होते व सर्जन तीच करते, असे मार्क्सला अभिप्रेत आहे. ते खरे नाही. उलटपक्षी, मार्क्सने असे मानलेले आढळते की ब्रिटन, अमेरिका इत्यादी पार्लमेंटरी लोकशाहीच्या देशांत शांततेने, कायदे करून, समाजक्रांती होणे शक्य आहे.

मार्क्सला फक्त हिंसाचारच मान्य आहे हा विरोधकांचा विपर्यास समजू शकतो. पण, दुर्दैव असे आहे की, मार्क्सचे अनेक अनुयायी या विरोधकांच्याच मताचे आहेत ! त्यांनाही मार्क्सचे मनुष्यत्वाचे साध्य उमगलेले नसते. सत्तासंपादनाच्या पलीकडे त्यांच्या समाजक्रांतीच्या ध्येयाची दृष्टी पोचलेली नसते. म्हणून मार्क्सच्या शिकवणीचा असा दुहेरी व पुरता विपर्यास आजवर होत आला आहे. या बाबतीत म्हणूनच एवढा प्रपंच करावा लागला. पण ' अहिंसा की हिंसा ' या वादंगापलीकडे आज जावयास हवे; तरच समाजक्रांतीच्या मार्क्सप्रणीत मार्गाचे स्वरूप नीट दिसू लागेल.

समाजक्रांतीचा मार्ग ठरविताना मार्क्सचे काय साध्य होते ते आपण पाहिले; सर्व मानवजातीला परात्मतेच्या शापातून मुक्त होण्याचा मार्ग त्याला सांगावयाचा होता. नंदांचे सिंहासन बळकावण्याचा मार्ग

त्याला अग्राह्य वाटला, तसेच संतांचा निरपवाद अहिंसेचा मार्गही त्याज्य वाटला. तिसरा मार्ग त्याने सांगितला. मानवी इतिहासाचे प्रत्यक्ष अवलोकन करून त्याने तो निर्धारित केला. त्याचे मुख्य प्रमेय असे की समाजक्रांतीच्या मागे सामाजिक आचारविचारांत मूलभूत बदल करण्याची भावना, ध्येयदृष्टी व धैर्य आवश्यक आहे. केवळ अन्यायाविरुद्ध संताप व दारिद्र्यामुळे येणारी विध्वंसक चीड समाजपरिवर्तनाला उपयोगी पडत नाही. उलट ती क्रांतीला अडथळा आणू शकते. आता सामाजिक परिवर्तनाचे ध्येय साकार करण्याचे धैर्य कोणात असेल ? ते धैर्य कोणत्याही माणसात असू शकेल व अशा धैर्यशाली व्यक्तींच्या समूहाने समाजक्रांती घडवुन आणावी, असे मानता येईल. पण, समूहाने करावयाची ही क्रांती यशस्वी होईल का ? समजा, काही काळपर्यंत ती यशस्वी होऊन टिकली तरी तिला स्थैर्य लाभेल का ? सिंहासनावरील दुष्ट राजाला ठार करून कोणी धर्मात्मा सिंहासनावर बसला तर प्रजेला आनंद होतो; पण राजसत्तेची प्रथा कायमच राहते. अशी राज्यक्रांती म्हणजे समाजक्रांती नव्हे. हे सर्व ओळखून समाजक्रांतीचा विचार करताना, मार्क्सला आढळले की आजच्या समाजात शहरी कामगार वर्ग हा असा आहे की त्याची नुसती पिळणूक होत नाही, तर तो समाजाच्या परिवर्तनाचे प्रमेय आकलन करू शकेल असा एक सामाजिक वर्ग आहे.

शहरी कामगार वर्गाविषयी मार्क्सची वरील भूमिका समजावून घेणेच फार अवघड आहे. याचे मुख्य कारण असे की, ' कामगार वर्ग ' आज आहे त्या अवस्थेत परिवर्तनाचा अग्रदूत होऊ शकेल ही कल्पना आपण मार्क्सवर लादतो. आपण म्हणजे सुशिक्षित वर्ग. आपल्यामध्ये रंजल्या-गांजल्या माणसांबद्दल कणव असते. अंगमेहनत करणारी माणसे आपल्या सभोवती आपण पाहतो. त्यांच्या हलाखीकडे पाहून आपल्याला असेही वाटते की यांची स्थिती सुधारावी, यांनी साक्षर व्हावे, यांना स्वच्छतेचे महत्त्व कळावे, संस्कृती व परंपरा यांचाही स्पर्श यांना व्हावा. पण यापेक्षा पलीकडे आपण पाहू शकत नाही. मार्क्सही आपल्या म्हणजे सुशिक्षित वर्गातलाच होता. त्याचे मोठेपण व द्रष्टेपण यात आहे की, त्याची करुणा पलीकडचे पाहू शकत होती. याचेही कारण असे की तो आजच्या सर्व समाजाची, मानवजातीची, ' परात्मता ' ओळखू शकला व तिच्यातून मुक्त होण्याचे स्वप्न पाहू शकला.

संपत्ती व सत्ता यांच्या अ-मानुष स्पर्धेत आज सगळी माणसे डोळ्यांना झापडे लावून पशूंसारखी धावत आहेत. वंश, वर्ण, समूह, राष्ट्रे यांच्यापुरतेही पाहिले तर हीच स्पर्धा चालू आहे. या स्पर्धेत कामगार वर्ग सामील आहेच.

सुशिक्षित माणसेही सामील आहेत. जी यात सामील होत नाहीत ती मार्क्स-सारखे संकटांचे व हलाखीचे जीवन स्वीकारतात. क्रांतीचे किंवा कलेचे, ज्ञानाचे किंवा सदाचाराचे 'वेड' असणारी ही माणसे अपवादासारखी असतात, वाळीत पडलेली असतात. हा वनवास त्यांनी खुषीने व ध्येयाच्या मस्तीत पत्करलेला असतो. पण इतरांना ही फकिरी परवडत नाही. ते स्पर्धेत मग्न असतात. मग्न असतात म्हणजेच आजच्या अ-मानुषतेचे व परात्मतेचे भान त्यांना आलेले नसते, येण्याचा मार्गही कुंठित असतो.

या दुरवस्थेतच आज एक मोठे खिंडार पडले आहे, तटबंदीला भगदाड दिसत आहे, असे मार्क्सचे म्हणणे आहे. भांडवलदार असो की सुशिक्षित असो त्याला आजच्या स्पर्धेमध्ये धावण्याची ईर्षा असू शकते. भांडवल जवळ आहे किंवा काही तंत्रज्ञान कमावलेले आहे, तशीच कर्तबगारी व जिद्द आहे, असे वाटले तर माणूस या स्पर्धेत उडी घेईल. पण ज्यांच्याजवळ भांडवल नाही, हत्यारे-उपकरणे नाहीत व भांडवली कर्ज मिळवण्याइतपत तंत्रज्ञान नाही तो कामगार या स्पर्धेत भागच घेऊ शकत नाही. स्पर्धेच्या जगातले सारे दुर्गुण , हेवेदावे व हिंसक वृत्ती तो पत्करतो. पण स्पर्धा पत्करीत नाही. त्याला या स्पर्धेत टिकून राहण्याची जिद्द असू शकत नाही. मग तो 'जास्त दाम व कमी काम' करण्याच्या आंधळ्या पराजित अवस्थेत जगू लागतो, मजुरीसाठी संप करतो, आपली अगतिक अवस्था विसरण्यासाठी फीचर, मटका यांच्या जुगारात, सिनेमागृहात किंवा दारूच्या गुत्त्यात रमून जातो; फार तर भजनी मंडळे, सत्यनारायण, गणेशोत्सव, हौशी नाट्यसंघ वगैरे 'सांस्कृतिक' करमणुकीत मग्न होतो; सुशिक्षित वर्गाच्या करमणुकीत व छंदांत रस घेऊ पाहतो.

या पराजित, स्वतःला हरवून बसलेल्या कामगारवर्गाला मिळविण्या-सारखे काही उरलेले नसते. सर्वस्वच हरवलेले असते. असते ते सर्व उसने व अ-मानुष असते; पण तेही त्याला उमगलेले नसते. मार्क्सने या कामगार वर्गाची पूजा बांधलेली नाही. या वर्गाने प्रथम स्वतःला बदलले पाहिजे, तरच तो वर्ग समाजपरिवर्तनाचा अग्रदूत होईल; पण सर्वस्व हरपले असल्यामुळे हा वर्ग नव्याचे स्वागत करू शकेल, परिवर्तनात गमाविण्या-सारखे उरलेले नसल्याने परिवर्तनासाठी प्राणपणाने लढू शकेल, असे मार्क्सचे म्हणणे आहे. स्पर्धेच्या मोहजालातून मन जिवंत ठेवून स्वतःला सोडवून घेणारी सुशिक्षित माणसे ह्या परिवर्तनाचे ध्येय जर कामगार वर्गाला देतील, तर एक प्राथमिक परिवर्तन घडेल. आजचा आंधळा कामगार डोळे उघडून उद्याच्या समाजाचे स्वप्न पाहू शकेल, आपल्या बलिदानाने ते साकार करण्याचे पाऊल तो उचलू शकेल.

हिंसक किंवा अहिंसक व्यक्तिसमूहांच्या हातून आजचे विराट समाजपरिवर्तन घडू शकणार नाही, ते परिवर्तन साऱ्या मानवजातीला आपल्या परिघात सामावणारे आहे, याची जाणीव मार्क्सला झाली होती. त्याच्याही आधी अशा सर्वंकष, मानवजातीला आपंगणाऱ्या, आमूलाग्र परिवर्तनाची स्वप्ने ध्येयवाद्यांनी पाहिली होती; पण मार्क्सचे सुदैव असे होते की त्याचा काळ हा जगातल्या मानवांना एकमेकांची ओळख पटण्याचा काळ होता. साम्राज्यवादाच्या व महायुद्धांच्या भीषणतेत, तसेच प्रवाससाधनांच्या व यंत्रसाधनांच्या प्रगल्भतेत, राष्ट्रांना एकत्र आणण्याची शक्ती आता आलेली होती. विज्ञानाने मिळविलेल्या शक्तीने विश्वकुटुंबाचे उज्ज्वल चित्र व विश्वसंहाराचे भयानक चित्र अशी दोन चित्रे आज आपण पाहात आहोत. तोच काळ बीजरूपाने मार्क्सच्या समोर होता.

परात्मतेतून मानवाची मुक्ती होण्याचे भविष्य बीजरूपाने त्याला पाहता आले, आणि मार्ग सांगण्याचा प्रयत्न करता आला. द्रष्टेपणा व काही गणित मांडून भविष्य सांगण्याचे कौशल्य या गोष्टी मुळातच वेगळ्या आहेत. मार्क्स हा द्रष्टा होता, भविष्यवादी नव्हता. म्हणून त्याने सांगितलेले 'परात्मतेच्या' निरासाचे ध्येय व सामाजिक परिवर्तनासाठी प्रत्यक्ष समाजाकडे पाहून प्रयत्नशील होण्याचा मार्ग, या दोनच गोष्टींचा विचार करून त्याचे आधुनिक इतिहासातील स्थान ठरविले पाहिजे.

मार्क्सने सांगितलेले साध्य व मार्ग यासंबंधीचे वरील विवेचन लक्षात घेऊन रशिया, चीन व इतर काही देश येथील समाजपरिवर्तनांचा विचार आता थोडक्यात करावयाचा आहे. शहरी कामगारवर्ग अल्पसंख्य आहे. जुनी एक दृढ सत्ता आहे, परंपरागत ग्रामीण जीवन व धर्मप्रधान संस्कृती नांदत आहेत, समाजपरिवर्तन होण्याला देशातील व देशाबाहेरील आंतरराष्ट्रीय भांडवलदारी सत्ताधाऱ्यांचा हिंस्र विरोध आहे, अशा साऱ्या परिस्थितीत रशियन व चिनी क्रांत्या झालेल्या आहेत. या क्रांत्यांच्या पार्श्वभूमीवर अनुक्रमे पहिले व दुसरे अशी दोन भीषण महायुद्धे आहेत. रशियन क्रांतीला पन्नास वर्षे व चीनच्या क्रांतीला सुमारे सतरा वर्षे पुरी होत आहेत. या क्रांत्यांनंतर दोन्ही देशांतून सत्ताधाऱ्यांच्या मध्ये आपसात हिंस्र चढाओढ झालेली दिसत आहे व दोन्ही ठिकाणच्या साधारण माणसालाही वैयक्तिक स्वातंत्र्य लाभलेले दिसत नाही.

रशिया व चीन या देशातील क्रांत्यांप्रमाणेच पूर्व युरोप, क्यूबा वगैरे ठिकाणी घडलेले दिसते. यामुळ समकालीन माणसाला कम्युनिस्ट समाजक्रांतीचे चित्र हिंसेचे व दहशतीचे वाटते यात नवल नाही. त्यातून रशियन व चिनी कम्युनिस्टांमधील संघर्ष आणि चीनचे भारतावरील आक्रमण

यामुळे हे चित्र जास्तच भडक वाटणे साहजिक आहे. त्यातच भर पडणारी गोष्ट म्हणजे भारतीय राजकारणात येथील कम्युनिस्ट पक्षाचे व्यवहार. नक्षलबारीमधील घडामोडी हा जणू काही साऱ्या कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा परिपाक, असे सुशिक्षितांना वाटणे साहजिकच आहे.

येथे मार्क्सचे ध्येय व मार्ग यांचाच खरा प्रश्न आहे व त्याचे विवेचन मागे केलेले आहे. ते जमेस घेऊन असे म्हणता येते की कम्युनिस्ट क्रांती झालेले देश, म्हणजे तेथील नेते व जनता, अजून पारंपरिक स्पर्धाविश्वातील गुणदोषांतून मुक्त झालेले नाहीत. सत्तेच्या स्पर्धेत केनेडींचा अमानुष खून झाला, याचे कारण माणसांच्या अंगी सत्तेच्या बाबतीत अजून अमानुषता आहे. तो दुर्गुण जसा इतर देशांतून आहे तसाच कम्युनिस्टांच्या देशांतून आहे व देशोदेशीच्या कम्युनिस्ट संघटनांतून आहे. त्या दुर्गुणाचे जास्त निर्घृण व भयावह स्वरूप तेथे आढळते, कारण क्रांतीच्या दडपणाने व प्रक्रियेने तेथील स्पर्धा ही जास्त निकराची आहे.

स्पर्धा व हिंसा यांचे वातावरण आज शतकानुशतके माणसांच्या कर्तृत्वाला ग्रासीत आहे, याची दखल येथे घ्यावयास हवी. यात स्पर्धेचे व हिंसेचे समर्थन करण्याचा, कम्युनिस्ट देशांतील घटनांची भयावहता सौम्य करून दाखवण्याचा प्रश्न नाही. जागतिक पार्श्वभूमीकडे डोळेझाक करून, जागतिक हिंसाप्रधान संस्कृतीचे भान सोडून, कम्युनिस्ट हिंसेला वेगळे काढून पाहणे चूक आहे, एवढेच येथे सूचित करावयाचे आहे. मार्क्सच्या दृष्टीने माणसाने 'परात्मता' अंगिकारली तेव्हाच हिंसा पत्करली. माणसाला इतर माणसांशी सहकार्य करावे असे साहजिक वाटते, प्रेम वाटते. पण हा आपला स्वभावच माणूस विसरला. संपत्ती व सत्ता यांच्यामागे लागला. या परात्मतेचे निराकरण लवकर होणारे नाही व तसे सोविएत पद्धतीत झालेले नाही. 'आम्ही नव्याच घडणीची माणसे आहेत' अशी आत्मगौरवाची भाषा स्तालिनने वापरली होती. सत्य मात्र असे होते की त्याच्या स्वतःच्या घडणीतच जुने दोष प्रकर्षाने होते.

पण, याचा अर्थ काय ? समाजपरिवर्तन हा भ्रमच आहे का ? तुम्ही समाजाची घडी हवी तशी बदला, तुम्हांला एक सत्ताधारी, लुबाडणारा व हिंस्त्र वर्ग दिसू लागेल व त्याच्या टाचेखाली चिरडले गेलेले, मेलेल्या मनाचे लोक दिसतील. ही जणू अटळ शापवाणीच मानवी जीवनाला चिरंतन लाभलेली आहे. संपत्तीची मालकी सार्वजनिक केली तरी सत्तेची केंद्रे हाती ठेवणारा नवा शासकवर्ग येतो. यात काहीतरी अटळ आहे व परिवर्तनाची ही शोकांतिका अटळ आहे ! हे सारे विचार आपल्या सहजच मनात येतात. ध्येयनिष्ठा समाजवादी, व मार्क्सवादीही, ह्या

विचाराने ग्रस्त होतात.

येथे मार्क्सच्या ध्येयाचे मर्म पुन्हा एकदा तपासणे जरूर आहे. भांडवलदारीमध्ये उघडानागडा झालेला संपत्तीचा लोभ व मानवी जीवनाचा महायुद्धात बळी घेऊ पाहणारी हिंसा आजही आपण पाहात आहोत. पण भांडवलदारी नव्हती तेव्हा हा लोभ व ही हिंसा नव्हती का ? या प्रेरणाच इतिहासाला चालना देत नव्हत्या का ? मग या प्रेरणाच मानवाच्या स्वभावाचा आधार आहेत असे का मानू नये ? मग ' परात्मते 'चा प्रश्नच कुठे येतो ? उलट, असे मानावेसे वाटू लागते की या प्रेरणाच मूलभूत असल्याने समकालीन जग व मानवी संस्कृती हीच माणुसकीचे आदर्श चित्र आहे. पण मार्क्स तसे मानीत नाही. संपत्ती व सत्ता, स्पर्धा व हिंसा, यांना तो खऱ्या प्रेरणा न मानता उपऱ्या व अ-मानुष मानतो. अर्थात, या प्रेरणांचा प्रभाव कमी करीत करीत अखेर त्यांचा निरास करता येईल व मगच माणसाला स्वत्व, खरी मानुष संस्कृती, लाभेल हा मार्क्सचा आशावादच नव्हे तर मानवी इतिहासाच्या परिशीलनानंतर त्याने काढलेला सिद्धांत आहे.

तो सिद्धांत बरोबर मानून गेल्या पन्नास वर्षांतील समाजपरिवर्तनाबद्दल काय म्हणता येते ते पाहणे इष्ट होईल. सत्तेसाठी होणारी स्पर्धा या परिवर्तित समाजात आहे हे खरे. पण संपत्तीच्या स्पर्धेला या ठिकाणी दुबळी करण्यात आली आहे. अजून तेथे विषमता आहे, पण वैयक्तिक चढाओढीला फारच मर्यादा आहेत. माझ्या कर्तबगारीने मी इतरांपेक्षा जास्त पैसे मिळवू शकेन. पण माझ्या संपत्तीच्या जोरावर मी इतरांना कामाला लावून नफा मिळवू शकत नाही. तो नफा बँकेत साठवून माझ्या भांडवलाचा पसारा देशभर किंवा त्रिखंड पसरू शकत नाही. भांडवलाच्या जोरावर इतरांना कामावर ठेवण्याचे व श्रीमंत होण्याचे व्यक्तिस्वातंत्र्य या देशांतून नाही. भारतात किंवा इतर भांडवलदारी देशांतूनही हे व्यक्तिस्वातंत्र्य तत्त्वत: प्रत्येक व्यक्तीला आहे, पण प्रत्यक्षात मूठभर व्यक्तींनाच आहे. या मूठभर व्यक्तींचे हे स्वातंत्र्य वारसाहक्काने त्यांच्या वारसाकडे जाते व बाकीचा समाज हा फक्त काम करण्याचे स्वातंत्र्य लाभलेला असतो. यापेक्षा वेगळी स्थिती रशियात व तत्सम देशांतून आहे.

या परिवर्तनामुळे माणसाच्या परात्मतेला, स्वत्वहानीला मोठाच आळा बसला आहे, कारण संपत्तीच्या मागे धावण्याचे खोटे ध्येयच त्या समाजापुढे राहिलेले नाही. मूठभर भांडवलदारांच्या आणि शेअरबाजारात उलाढाली करणारांच्या संपत्तीकडे पाहून आज भणंग व्यक्तीलाही काम न करता आकडे खेळून श्रीमंत होण्याचा ध्यास लागू शकतो. पण, एकदा ऐदी श्रीमंतीचा

आदर्शच नाहीसा झाला म्हणजे ऐदीपणा हा सद्‌गुणाऐवजी दुर्गुण ठरतो. नेमके हेच समाजवादी परिवर्तनाने घडले आहे. अमेरिकेसारख्या भांडवलदारी देशांतूनही प्रयत्नाला व श्रमाला मान आहे, पण तरी झटपट मार्गाने श्रीमंत होण्याचे खूळही आहे. समाजवादी परिवर्तनाने हे खूळ समाज-मानसातूनच उखडले जाते. यात काही जादू नाही. हे खूळ माणसाला जेव्हा तशी संधी असेल तेव्हाच ग्रासू शकते. ती संधीच समाजवादी देशांतून व्यक्तीला आता लाभू शकत नाही. या देशांतून ऐदी, जुगारी व 'काळाबाजार' करणारे लोक नाहीत असे नाही. पण त्यांची संख्या थोडी आहे आणि त्यांना यश मिळून वर प्रतिष्ठाही मिळण्याची संधी तेथे उरलेली नाही. तेथे प्रतिष्ठा फक्त श्रमाला आहे.

या एका मूलभूत परिवर्तनामुळेच तेथील सामान्य माणूस या नव्या समाजवादी व्यवस्थेला आपली मानीत आहे. दुसऱ्या महायुद्धात हिटलरची अशी भाबडी कल्पना होती की रशियन जनतेला आपल्या समाजवादी देशाचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य व तीव्र इच्छा नसेल. पण देशाभिमान व आपल्या समाजव्यवस्थेचा अभिमान अशा दुहेरी धैर्याने ती जनता लढली व हिटलरला परतवू शकली. कम्युनिस्ट देशांत जनता गुलाम आहे असे म्हणणाऱ्यांना प्रथम आश्चर्य वाटले. कारण गुलाम जनतेला अशा वेळी आपल्या स्वातंत्र्याची जाणीव होते व ती आक्रमणाविरूद्ध न लढता आपल्या मुक्ततेचा मार्ग शोधू लागते. सन १९४२ मध्ये भारतीय जनतेने हाच प्रयत्न केला. झारच्या जुलुमाने गांजलेल्या जनतेने सन १९१७ मध्ये हाच प्रयत्न केला व त्यातूनच रशियन समाजक्रांती यशस्वी झाली. पण समाजवादी व्यवस्थेला तेथील समाजाने अंगिकारलेले आहे, असा अनुभव आज आलेला आहे.

या परिवर्तनामुळे मानवी समाजाला मूलभूत अशा जीवनाकडे व प्रेरणांकडे जाण्याचा मार्ग पुष्कळच खुला झाला आहे व ही गोष्टच मार्क्सच्या साध्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. एकाच ठिकाणी व एखाद्या जादूने घडलेल्या परिवर्तनाने समग्र मानवी परिवर्तन शक्य होईल, असे मार्क्सला कधी वाटले नाही. अशा वाटण्याला त्याने 'युटोपियन' म्हणजे मनोराज्यात्मक समाजवाद म्हटले आहे. एखाद्या देशात समाजवादी क्रांती होणे म्हणजे खऱ्या परिवर्तनाचा फक्त प्रारंभ होय; तेथून एक प्रक्रिया सुरू होईल व ती अनेक दशके चालले असेच त्याचे म्हणणे होते.

आज समाजवादी परिवर्तन झालेल्या देशांतून भांडवलदारी नफा व संपत्तीची स्पर्धा नाही. याचा परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावर कसा होत गेला, त्यात जागतिक महायुद्धाचा धोका टळण्याची व शांततेची

शक्यता कशी निर्माण झाली व आज भारतासारख्या राष्ट्राला या शांततेच्या दिशेने पावले टाकणे कसे शक्य झाले, हा विषय महत्त्वाचा आहे. पण तो प्रस्तुत विवेचनात न घेता, आपण मार्क्सच्या साध्याच्या दृष्टीने काही महत्त्वाचे घडले आहे काय ते पाहू. समाजवादी देशांतील जीवनाकडे पाहताना एका गोष्टीची जाणीव होते की तेथे विज्ञाननिष्ठा ही जीवनाची प्रवळ प्रेरणा झाली आहे. विज्ञान ही मानवाची मूलभूत प्रेरणा आहे; जगाचे व स्वतःचे ज्ञान मिळविण्यासाठी माणूस सतत प्रयत्नशील आहे. या ज्ञानाची साधना समाजवादी देशांतून इतर देशांइतकी, किंबहुना जास्तच निष्ठेने, चाललेली दिसते. नुसती संपत्तीची स्पर्धा नष्ट झाली असे नाही, तर आता विज्ञाननिष्ठेने तेथील सामान्य माणसेही भारलेली दिसतात. ही गोष्ट भविष्याकडे होणाऱ्या वाटचालीची सूचक आहे.

आणखी एक गोष्ट, समाजवादी देशांतील सामान्य माणसाच्या मानवबंधुत्वाच्या जाणीवेची. हे खरे की गोऱ्या लोकांची वरचढपणाची भावना व उन्माद आज सगळ्या जगातच कमी झाला आहे. नॉर्डीक वंशाचे खूळ घेऊन नाझी पक्ष उभारणारा हिटलर नाहीसा झाला तेव्हाच वंशभेदाच्या खुळाचा आधार गेला. पण तरी वंशभेदाचे खूळ अजून इतर देशांतून आहेच. भारतातील जातिभेदाचे खूळ जसे खोलवर पाळेमुळे गेलेले आहे, तसेच या वंशभेदाच्या खुळाचे आहे. हे खूळ सोविएत रशियात नाही. तेथे सर्व वंशांच्या लोकांचे परस्परव्यवहार अगदी सहजतेने व समानतेने चाललेले आढळतात, असे सर्व निरीक्षकांना आढळले आहे. झारच्या काळी यहुदी लोकांना भयंकर क्रूरतेने वागविले जाई व त्या द्वेषाचे काही अवशिष्ट प्रकार स्तालिनच्या काळात तेथे घडले असे दिसते. पण हे अपवाद सोडल्यास तेथे वंश, वर्ण, इत्यादींचा भेदभाव उरलेला नाही.

सारी मानवजात परस्परप्रेमाने नांदू लागेल, संपत्ती व सत्ता यांच्या अ-मानुष पाशातून स्वतःला मुक्त करून नवा इतिहास घडवू लागेल, हे मार्क्सचे साध्य आज प्रत्यक्षात अवतरलेले नाही व ते इतक्या थोड्या अवधीत अवतरणारही नाही. माणसांनीच ते साध्य करावयाचे आहे. यात मानवजातीला यश येईल किंवा अपयशही येईल. पण आज समाजवादी परिवर्तन झालेल्या देशांतून संपत्तीची स्पर्धा व वंशभेदासारख्या द्वेषभावना नाहीशा झालेल्या दिसतात; सत्तेची स्पर्धा मात्र निर्घृणतेने चाललेली दिसते. मार्क्सच्या साध्याचाही नेत्यांना विसर पडलेला आहे, अशी वागणूक कधीकधी झालेली दिसते. म्हणून समाजवादी परिवर्तनाकडे पाहताना आपण प्रत्यक्ष घडलेले परिवर्तन खरे आहे का, मूलभूत आहे का, मार्क्सच्या साध्याकडे नेणारे आहे का, ते पाहिले पाहिजे. त्याचबरोबर सत्तेच्या 

स्पर्धेत व राजकारणात रशियन, चिनी व इतर नेत्यांचे जे चुकत असेल ते स्पष्टपणे ओळखून त्याविषयी परखडपणे बोलले पाहिजे. आज तसे होत नाही. समाजवादी देशांकडे पाहताना फक्त नेत्यांकडे पाहिले जाते व त्यांच्या कृत्यांचा धिक्कार किंवा उलट गौरव केला जातो. खरे घडलेले परिवर्तन दूरच राहते व मार्क्सच्या साध्याचा विचार तर अतिदूर राहतो !

आपण सर्वजण मानवजातीच्या मूळ श्रेयाचा व भवितव्याचा विचार खरोखर करतो का ? आपण स्वतः, आपला समूह, प्रदेश, राष्ट्र यांचाच आपण विचार करतो. ते योग्यही आहे. पण, मानवजातीचा विचारही आवश्यक व योग्य आहे. त्यातच व्यक्तीलाही आपले स्वरूप उमगणे शक्य आहे. मार्क्सच्या साध्यामध्ये ह्या उमगण्यालाच सारे महत्त्व आहे.

समाज चिंतन । २ ।

# तत्त्वदर्शनांचा सोपानमार्ग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र०
अनुक्रम 10773 दि:

माणसाने विवेकशील असावे, माणुसकीने व नीतीने वागावे आणि आपले व इतरांचे जीवन सुखी आणि कलात्मक आनंदाने संपन्न करण्याचा प्रयत्न करावा ही ईर्षा मानवी मनात सदैव नांदत आलेली आहे. ‘ जो जे वांछील तो ते लाहो ’ असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आणि ‘ बहुजन सुख ’ साधले पाहिजे असे बुद्धाने म्हटले. ‘ ईश्वराचे राज्य ’ ख्रिस्ताने मानले, आणि ते पृथ्वीवर, म्हणजे प्रत्यक्षात मानवी जीवनात अवतरेल असा विश्वास त्याने प्रकट केला. इहलोकातच ‘ स्वर्गसमक्षता ’ पाहणे हा केशवसुतांना ध्यास होता. मरण, रोगव्याधि इत्यादि दुःखे माणसाला ग्रासीत आहेत आणि माणसाने आपल्याच लोभाने व क्रौर्याने आपल्यावर अनेक दुःखे लादून घेतली आहेत. या दुःखांनी विव्हल झालेला माणूस हताश न होता सुखी व संपन्न जीवनाचे स्वप्न पाहात आहे, व ते साकार करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. यातच त्याची माणुसकी व थोरवी आहे.

संपन्न जीवनाचे स्वप्न पाहणे ही मानवी मनाची एक प्रवृत्ती आहे. ह्या स्वप्नाळू प्रवृत्तीतून अनेक लहानमोठ्या, भल्याबुऱ्या स्वप्नांची मानवाने निर्मिती केली. अनेक देशींचे व संस्कृतींचे स्वप्न-व्यूह तयार झाले. तत्त्वदर्शन व धर्म नांदले. कलाकृती निर्माण झाल्या. समाजधारणेच्या विविध रीती व संस्था अस्तित्वात आल्या. विज्ञानाची वाढ होत गेली. ही जमेची बाजू. तशीच दुसरी बाजू आहे. एकीकडे जीवनाचे आदर्श स्वप्न पाहणारा मानव, दुसरीकडे, गुलामगिरी, वेश्याव्यवसाय, क्रूर कत्तली व अमर्याद धनलोभ यांची परंपरा संस्कृतीतून निर्माण करीत आलेला दिसतो. आणि यातही एक विपरीत गोष्ट दिसते ती अशी की अत्यंत क्रूर व ओंगळ कृत्याना उदात्त तत्त्वांचा साज चढविण्याचे ढोंग मानवाने आचरलेले दिसते.

मानवी स्वभावातच उदात्ताच्या विडंबनाची दुसरी प्रवृत्ती खोलवर रूजलेली आहे; हातातील ज्योतीला कोलीत समजून वागू लागणे मानवी स्वभावातच जणू अंगभूत आहे.

मानवी स्वभावातल्या या प्रवृत्तीमुळे प्रत्यक्ष घडत आलेला मानवी इतिहास असा दुहेरीपणाचा, उदात्त स्वप्ने, व त्यांची घोर विडंबने यांचा चित्रपट आहे. बुद्ध, ख्रिस्त, महंमद, रुसो, मार्क्स आणि गांधी यांची नावे घेतली की उदात्त स्वप्नांची सृष्टी डोळ्यासमोर उभी राहते. पण या महात्म्यांनी उपदेशिलेल्या जीवन-दर्शनांच्या आधारे निर्माण झालेल्या संप्रदायांतून त्या दर्शनांचे विडंबनही नजरेस पडते. प्रत्येक दर्शनाचे हे विडंबन पाहून वाटते की प्रत्येक दर्शनाचा इतिहास म्हणजे एका भव्य आदर्शाचा उदय आणि त्याचे विडंबन व अस्त असा हा क्रम आहे. दर्शनांचे सलग कापड घेऊन मनुष्याने आपल्या मोजमापाचे कपडे त्यातून शिवून घेतलेले दिसतात.

पण, आणखी असेही दिसते की, दर्शनांच्या व आदर्शांच्या या उदयास्तातून मानवजातीला काही गोष्टींचे ज्ञान जास्त स्पष्ट झालेले दिसते. गुलामगिरीचे उदाहरण घेतले तर सॉक्रेटिससारख्या महात्म्यालाही ती संस्था वाईट आहे हे कळले नाही. बुद्धाला व महंमदालाही दासांची पराधीनता नष्ट करण्याचा उपदेश करावासा वाटला नाही. प्रत्येक मनुष्य हा मनुष्य म्हणून स्वतंत्र असलाच पाहिजे याची फक्त अंधुक जाणीव त्यांना होती. ही स्वतंत्रता गुलामानांही दिली पाहिजे हे मात्र त्यांना स्पष्ट उमगले नाही. स्वतंत्रता ही फक्त अध्यात्मापुरतीच त्यांना कळली. रूसोला व नंतरच्या महान विचारवंतांना स्वतंत्र मानवाचे जे स्वप्न दिसले, ते साऱ्या जगातील मानवांना व्यापणारे स्वप्न होते. तेव्हा, अनेक शतकांच्या अनुभवाने व चिंतनाने गुलामगिरीचा अन्याय मानवी प्रज्ञेला आता स्पष्ट कळू शकला. आज अन्याय उमगतो कारण तो आता मानवी प्रज्ञेला स्पष्ट झालेला आहे. अशा मंदगतीनेच, विज्ञानाच्या व इतर क्षेत्रांच्याही बाबतीत प्रज्ञेची प्रगती झालेली आपल्याला आढळते. प्रगति म्हणजे हीच वाटचाल. पण, ह्या प्रगतीच्या क्रमांत अनेक दर्शनांचे उदय, विडंबने व अस्त झालेले दिसतात, हे सत्य विसरता येणार नाही.

वर जो इतिहास सांगितला त्याला मानवी संस्कृतीचा इतिहास म्हणता येईल. ही एक घाटातील चढणीची वाट आहे किंवा एक सोपान मार्ग आहे. नुसती चढण नाही तर वळणे आहेत; आणि एकाच वाहनातून हा प्रवास झालेला नाही. एका आदर्शाने, एका समाजाने किंवा संस्कृतीने चढणीवर प्रयत्नांची शिकस्त करावी व मग कोठल्या तरी वळणावर थकून जावे व रस्ता

सोडून खाली घरंगळत जावे असा प्रकार झालेला दिसतो. पण एक एक वाहन घरंगळले तरी मानवाचा मार्ग चढणीवरच आक्रमलेला दिसतो. पूर्वी लांबलांबच्या मजला मारणारे घोडेस्वार एक घोडा थकला की तो सोडून दुसऱ्यावर मांड ठोकीत व पुढे जात. तसा काहीसा हा प्रकार मानता येईल.

आदर्शांच्या बाबतीत असे का व्हावे ? एकेक दर्शन विडंबित होऊन घरंगळत खाली जाते याचे कारण काय ? का असे काही घडतच नाही ? यावर, म्हणजे शेवटच्या प्रश्नावर, एक ठराविक उत्तर आढळते ते मुख्यतः या लेखात मी चर्चेसाठी घेणार आहे. या ना त्या दर्शनाचे भाविक अनुयायी असे मानतात की दर्शनाचा उदयास्त होत आला हे खरे, पण हे इतर सर्व दर्शनांबाबत खरे आहे ; तसे 'माझ्या दर्शना' बद्दल मात्र म्हणता येणार नाही ! ग्रीक व रोमन संस्कृती गुलामगिरीच्या शापाने नष्ट झाल्या, युरोपची संस्कृती 'जडवादाच्या' शापाने नष्ट होत आहे; भारतीय संस्कृती मात्र कधीच अस्तंगत होणार नाही, असे भारतीय संस्कृतीचे अभिमानी म्हणतात. तीच ग्वाही महंमदी संस्कृतीचे अभिमानी देत असतात. व्यक्तिस्वातंत्र्यवादी, मानवतावादी व मार्क्सवादी लोकही आपआपल्या दर्शनाबद्दल अशाच अभिमानाने बोलताना आढळतात. मानवी इतिहासाचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचा आपआपल्या परीने विमर्श करणे, किंवा अन्वयार्थ लावणे आणि या विमर्शाच्या आधारे आपल्या दर्शनाचे अमरत्व प्रस्थापित करणे यासाठी या अभिमानी अनुयायांची धडपड चालू असते.

कोणत्याही एका दर्शनाला अमरत्वाचा किंवा पूर्णत्वाचा मान दिला जाणे हे माझ्या मते तत्त्वतःच चूक आहे. याचे सर्वसामान्य कारण असे की कोणतेही दर्शन घेतले तरी ते एकाद्या विशिष्ट मानवी परिस्थितीचे आव्हान स्वीकारून केलेले विश्लेषण असते, व त्या विश्लेषणाच्या आधारे केलेली दोषांची चिकित्सा त्या दर्शनांत केलेली असते. काही प्रत्यक्ष व्यवहारही त्यात सांगितलेला असतो. ते दर्शन प्रभावी ठरून मोठ्या जनसमूहाला मार्गदर्शक ठरते ते या विश्लेषणातील व चिकित्सेतील वास्तवतेमुळेच. एकाद्या प्रभावी दर्शनाचा हा गुणच असतो की त्याच्यामुळे वास्तवात बदल होतो; किंबहुना वांछित बदल घडवून आणणे हेच त्या दर्शनाचे उद्दिष्ट असते.

हा बदल घडताना अनेक घटकांची त्यात उलथापालथ व क्रिया-प्रतिक्रिया होतात. दर्शनांच्या उदयाच्या वेळच्या वास्तवाचे विश्लेषण व चिकित्सा मग या नव्या परिस्थितीत लागू पडत नाही. अशा वेळी त्या दर्शनाचे मूळचे सर्वग्राही रूप राहात नाही. ती एक केवळ पद्धती आहे, तिच्यात पोथीबंदपणा नाही, असे मग त्या दर्शनाबद्दल समर्थनपर म्हटले जाते. ते अगदी खोटे नसते.

पण, त्या पद्धतीचा अर्थ केवळ वैज्ञानिक व समंजस विवेकी ज्ञानोपासनेची व्यापक पद्धती असा होऊ शकतो. या व्यापक अर्थाला त्या पद्धतीचे किंवा दर्शनाचे कडवे अनुयायी मात्र विरोध करतात. कारण त्यांना केवळ त्या दर्शनाचे प्रेम असते. ते दर्शन सर्वसामान्य व्यापक ज्ञानपद्धतीत विलीन झाले तर आपले काही तरी हरपेल अशी त्यांना भीती वाटते. पण, त्या दर्शनाने आपला प्रभाव व्यापक रीतीने मानवजातीवर पाडल्यामळेच व्यापक ज्ञानपद्धतीत ते विलीन होणे अटळ असते.

मार्क्सवादाचे उदाहरण येथे घेता येईल. सन १८४८ पासून १९२० पर्यंतच्या काळात हे दर्शन उदयाला आले,प्रत्यक्ष मानवी जीवनाला अद्ययावत् करण्यात यशस्वी झाले व क्रांतिकारक ठरले; म्हणजेच समकालीन वास्तवाला ते एक नवी दिशा व आकार देऊ शकले. पुढील काळात त्या दर्शनाचा प्रभाव चीन, भारत इत्यादी देशांत व युरोप अमेरिकेतही विस्तारत गेला, परंतु मानवी जीवनाचा पटच आता बदललेला होता. दुसरीकडे, मार्क्सवादाचा आदर्श आता मानवी व्यवहाराच्या, भल्याबुऱ्याच्या पातळीवर साकार झाला होता. या पातळीवरच त्याला आता व्यवहार करणे प्राप्त होते. एखादी व्यक्ती आपल्या आयुष्यातला एखादा क्षण उत्कट प्रतिभेने जगते व एखादे असामान्य कृत्य करून जाते. पण तो क्षण ओसरतो. मग त्या व्यक्तीला इतर सामान्यांसारखेच जगावे लागते व जर तो नम्र असेल तर त्याला ते जगणे शक्य होते. मानवी इतिहासात फ्रेंच आणि रशियन समाजक्रांती हे असे उत्कट क्षण आहेत. मानवी जीवनाने या क्षणी वरवरचे स्तर गाठले, पण, ते क्षणही ओसरणारे होते. पुन्हा मानवी मनातील व जीवनातील मंगलाची व अमंगलाची जी भेसळ आहे तीच प्रभावी ठरते, असा अनुभव अटळपणे येत गेलेला दिसतो.

मार्क्सवादाने व रशियन क्रांतीने जगाला जे उत्कट दिले ते मानवाच्या एकंदर विचारसंपदेत व जीवनात विलीन झाले; त्या संपदेला व जीवनाला संपन्न करून त्यात ते समाविष्ट तेझाले. या नंतरच्या आजपर्यंतच्या काळात असे दिसते की मार्क्सवादाच्या परिघातच ‘शुद्ध’ कोण व ‘भ्रष्टाकारी’ कोण असा वाद पेटला आहे. मार्क्सवाद हा पोथीवाद नसून देखील पोथीवादी दर्शनांना भोवलेला शापच त्याला आता भोवत नाहे. मानवी स्वभावातील ही अटळ प्रवृत्ती आहे. दर्शनाचे मूळ स्वरूप कसेही असले तरी मानवी मनाचा भलाबुरा आकार त्याला घ्यावा लागतो, कारण दर्शनाची कूस व मूस म्हणजे मानवी मनच आहे. या मनाचे कोतेपण व अपुरेपण कोणत्याही दर्शनाला लाभते. तसेच, या मनाची उत्कटता व सामर्थ्यही या दर्शनाला लाभते. पण ते काही काळच लाभू शकते. या दर्शनाच्या

प्रभावाने मानवी मनाची व प्रत्यक्ष जीवनाची जी संपन्नता वाढते तीही मनाच्या या मर्यादा ओलांडणारी नसते.

दर्शनांच्या उदयास्ताबद्दलचे हे विचार मार्क्सवादी किंवा इतर कोणत्याही दर्शनाला लागू पडणारे आहेत, अशी माझी समजूत आहे. कोणत्याही दर्शनाचे द्वेषाच्या किंवा अभिनिवेशी प्रेमाच्या आहारी न जाता गुणदोष व प्रभाव समजून घेण्यास ही भूमिका उपयुक्त ठरेल अशी या लेखात माझी अपेक्षा आहे. या मर्यादित अपेक्षेनेच हे विवेचन मी सादर केले आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 07736 वि: निबंध

# साम्ययोग आणि मार्क्सची भूमिका

विनोबांनी एका मूलभूत परिवर्तनाचे ध्येय मानवजातीपुढे ठेवले आहे. या परिवर्तनात केवळ व्यक्तीच्या हृदयाचा पालट होण्याचे साध्य नाही; समाजव्यवस्थेतही बदल अपेक्षित आहे. हे परिवर्तन झाले म्हणजे सारे जग म्हणजे मानवी जीवनच, बदलेल अशी अपेक्षा आहे. 'जय जगत्' ह्या घोषणेत हा भावार्थआहे. या परिवर्तनाच्या ध्येयाला 'साम्ययोग' म्हटले जाते.

मार्क्सच्या भूमिकेत साऱ्या मानवजातीचे परिवर्तनच अपेक्षित आहे. व्यक्तीचे व समाजाचे व्यवहार आजच्याप्रमाणेच न होता वेगळ्या तऱ्हेने व्हावेत, सहकार्यावर ते आधारित असावेत, माणसाने माणसाचे शोषण करण्याची समाजपद्धती बदलावी, अशी मार्क्सची शिकवण आहे.

विनोबा व मार्क्स यांच्या भूमिका वर सूचित केल्याप्रमाणे पुष्कळच महत्त्वाच्या बाबतीत समान आहेत.भूदान, संपत्तिदान इत्यादी दानांमुळे शेवटी समाजात खासगी मालकीची पद्धती व शोषण नाहीसे होईल, असे विनोबा सांगतात. मार्क्सला तेच उद्दिष्ट साधावयाचे आहे, पण दाना ऐवजी क्रांतीचा मार्ग त्याने सांगितला आहे. ही क्रांति शांततेने, पार्लमेंटात कायदे पास करून होणे अशक्य आहे असे मार्क्सने मानलेले नाही. ब्रिटनमध्ये ही शक्यता त्याला दिसली होती. पण शांततेने बदल होणे इष्ट असूनही, तो मार्ग जास्त श्रेयस्कर मानूनही, तो मार्ग उपलब्ध राहीलच, असे मार्क्स सांगत नाही. जर परिवर्तनाला सशस्त्र क्रांतीशिवाय मार्गच उरला नाही तर शस्त्रबळाच वापर करणे न्याय्य ठरेल असे मार्क्सचे म्हणणे आहे.

या प्रश्नावर विनोबा आणि मार्क्स यांच्या भूमिकांत फरक आहे. तो फरकच विनाबांना फार महत्त्वाचा वाटला असावा, कारण त्यांनी एकदा म्हटले आहे की कम्युनिझममधून हिंसा वगळली तर साम्ययोगच उरेल.

गांधीजींच्या दृष्टीनेही अहिंसा हेच मूलभूत तत्त्व आहे व अहिंसात्मक परिवर्तनाचा सिद्धान्त व व्यवहार गांधीजींनीं सांगितलेला आहे.

परिवर्तनाचे ध्येय समान असून केवळ हिंसा व अहिंसा यांतील भेदामुळे विनोबा व मार्क्स यांच्या भूमिकेत अंतर पडते, ही गोष्ट ढोबळ मानाने मान्य होण्यासारखी आहे. पण, हे मान्य करण्यामध्ये एक दोष आहे. मार्क्सची भूमिका निरपवाद हिंसेची आहे, हिंसेलाच नवसर्जनाचे सामर्थ्य आहे असे मार्क्सने मानले आहे, असा भ्रम यात बाळगला जातो. खरे असे आहे की शांततेने परिवर्तन होणे जास्त श्रेयस्कर आहे असे मार्क्सने स्पष्टपणे मानले आहे व हिंसा लादली गेली तर तिचा धैर्याने स्वीकार केला पाहिजे असेच त्याने मानले आहे. दुसरीकडे, निरपवाद अहिंसेची भूमिका गांधीजींनाही मान्य नव्हती, याचा विसर पडणे युक्त नव्हे. दुर्बल व भेकड अहिंसेपेक्षा हिंसा पत्करणे हे गांधीजींना मान्य होते व 'क्विट इंडिया' च्या घोषणेच्या संदर्भात हा विचार त्यांनी मांडला होता.

हिंसा व अहिंसा यांतील भेदाला महत्त्व आहे, पण हिंसेला ( किंवा अहिंसेला ) सर्जनाचे सामर्थ्य आहे का ? हा खरा प्रश्न आहे. मार्क्सने म्हटले आहे की हिंसेने इतिहासात सुईणीचे काम केले आहे. या विधानात स्पष्ट असा अर्थ आहे की हिंसा ही आई नसून फक्त दाई आहे. सर्जन हे हिंसेने होत नाही, असेच मार्क्सचे स्पष्ट मत आहे. मग, अहिंसेला सर्जनाचे सामर्थ्य आहे का ? असेल तर ते मार्क्सला कळलेले नाही का ?

परिवर्तनाच्या संदर्भात सर्जनाच्या स्रोताचा प्रश्न मूलभूत आहे. तेथेच विनोबा व मार्क्स यांच्या भूमिकात कोठे तरी मोठे अंतर आहे; अहिंसा व हिंसा यांतील भेदात ते अंतर नाही, असे मला वाटते. या दृष्टीने पुढील विवेचन प्रस्तुत आहे.

माणसाच्या प्रतिमेबाबतच साम्ययोग व मार्क्सवाद यामध्ये अंतर आहे व तेच मूलभूत आहे. माणूस कसा आहे ? या प्रश्नाची दोन वेगवेगळी उत्तरे विनोबा व मार्क्स यांनी दिली आहेत. विनोबांचे म्हणणे असे आहे की 'देह, मन व बुद्धी' यांच्या पलिकडे असणारा आत्मा माणसाला आहे. विश्वामध्ये ओतप्रोत व त्याला आधारभूत असलेल्या चित्तत्त्वाशी हा आत्मा एकरूप आहे. मार्क्सच्या मते, मनुष्याचे मूळस्वरूप केवळ देहात्मकतेत नाही, तर त्याच्या विशिष्ट मनःसामर्थ्यात आहे, मानवी मनात आहे.

आत्मतत्त्वाची ओळख माणसाला झाली पाहिजे असे विनोबा मानतात, तर मानवी मनाच्या स्वरूपाची ओळख माणसाला झाली पाहिजे असे मार्क्स मानतो.

वरील फरक महत्त्वाचा आहे. आजचा माणूस हा स्वत्वाला मुकलेला

व भ्रमात गुरफटलेला आहे, संपत्ती व सत्ता यांच्या लोभाने माणुसकीला पारखा झालेला आहे, हे विनोबांना व मार्क्सलाही मनोमन पटलेले आहे. या भ्रमातून बाहेर निघाले पाहिजे व मूळ स्वरूपाकडे गेले पाहिजे हे देखील दोघांना मान्य आहे. फरक आहे तो मूळ स्वरूपाच्या कल्पनेबाबत आहे. दोघेही जडवादी नाहीत; पण मूळ स्वरूपाच्या कल्पना दोघांच्या भिन्न आहेत.

ह्या कल्पनांचे तुलनात्मक आकलन करता येण्यासाठी एका पारिभाषिक संज्ञेचा आपण विचार करू. हेगेलने व नंतर मार्क्सने 'परात्मता' (Self-alienation) ही संज्ञा वापरली आहे, व ती फार महत्त्वाची आहे. माणूस आपलेपण किंवा स्वत्व विसरून परत्वाच्या आहारी जातो, जे बाहेरचे व परके आहे तेच सर्वस्व आहे असे मानू लागतो; 'परात्मता' स्वीकारून स्वत्वापासून भ्रष्ट होतो. स्वभाव आणि परात्मभाव यांची ओळख माणसाला झाली पाहिजे, हे मार्क्सच्या भूमिकेतील मुख्य प्रमेय आहे.

माणसाच्या देहाचे वैशिष्टच सहज ओळखता येते. इतर पशूंच्या देहापेक्षा तो वेगळा व जास्त कौशल्यक्षम आहे. पण माणसाचे मन कसे आहे, हे प्रत्यक्ष मनोव्यापारांवरून ओळखावे लागते व ती गोष्ट अवघड आहे. मानवी मनामध्ये विवेक आहे पण अविवेकही आहे; इतरांबद्दल प्रेम आहे पण स्पर्धेची व द्वेषाची भावनाही आहे. उलटसुलट भावनांच्या आविष्कारामुळे माणसाची मूलभूत मनोरचना कोणती ते कळेनासे होते. सहजप्रवृत्ती ( instincts ) कोणत्या हेही ओळखणे अवघड जाते, कारण मानवी मनामध्ये अगदी दृढ अशा सहजप्रवृत्ती दिसत नाहीत.

मार्क्सने या बाबतीत म्हटले आहे की संपत्तीचा लोभ, स्वामित्वाची भावना, इत्यादी मनोव्यापार मूलभूत नाहीत, तर विशिष्ट सामाजिक व्यवस्थेत लाभलेल्या या मानसिक सवयी आहेत. संपत्ती किंवा सत्ता या गोष्टींना बाह्य अस्तित्व आहे. त्यांना माणसाने सर्वस्व मानले, त्यातच आपले स्वत्व व श्रेय पाहिले, पण तो 'परात्मते' चा भ्रम आहे. आपणच एका दगडाला दैवत मानावे व मग त्याच्या पुढे दंडवत घालून त्याला प्रसन्न करू पाहावे, तसा हा भ्रम आहे.

मानवी समाजाच्या इतिहासात आणि विविध अशा मानवी व्यवहारांत असे दिसते की मानवाची ज्ञानसाधना व परस्पर सहकार्य सतत चालू राहिलेले आहे. मानवी प्रज्ञेमध्ये सर्जनाचे, बाह्य उपलब्ध सामग्रीला वांछित नवा आकार देण्याचे सामर्थ्य आहे. या सर्जनशीलतेमुळे मानवाने आपल्याभोवती एक नवे भौतिक विश्व रचले आहे. कलात्मक सर्जनाचे कलाविश्व

निर्माण केले आहे आणि विचाराचेही विश्व घडविले आहे. ही सर्व रचना माणसांनी सहकार्याच्या, एकत्र प्रेमाने नांदण्याच्या ईर्षेने, सामाजिकतेत नांदणाऱ्या व्यक्तित्वाने घडविली आहे. मानवी भाषा ही या सर्जनशील व्यवहाराची, व्यक्तीव्यक्तीतील अभिसरणाची, धात्री आहे.

मार्क्सने या मानवी सर्जनशीलतेला व सामाजिकतेला मानवी स्वभाव मानले आहे. मानवी प्रत्यक्षाचा आधार घेऊन स्थिर झालेले त्याचे हे प्रमेय आहे. या मानवी स्वभावाचा माणसाला मग विसर कसा पडला ? हा कूट प्रश्न आहे. त्याचे उत्तर मार्क्स देतो ते असे की मानवी मनामध्येच स्वत:ला पारखे होण्याची ही प्रवृत्ती आहे. मनाच्या गाभ्यातून माणूस स्वत: काही कल्पना मूर्त करतो व त्या मूर्तीला मग परकी, बाह्य वस्तू मानू लागतो; मूर्तिपूजा करू लागतो; मनाचे सर्जनसामर्थ्यच त्याला बाधू लागते. 'मन एव मनुष्याणाम् कारणम् बंधमोक्षयो : या वचनात हेच अभिप्रेत आहे; मनच मनाला चेटूक करते.

संपत्तीचेच उदाहरण घेतले तर ही मूर्तिपूजा, ही परात्मता, स्पष्ट दिसते. दोन व्यक्तींमध्ये, किंवा समूहांमध्ये, उपभोग्य वस्तूंची साधी देवाण घेवाण होत होती. त्यांत पैशाची गरज प्रथम नव्हती. पण माणसाच्या मनाने ह्या देवघेवीतच एक साधन म्हणून कवडी ( किंवा इतर काही वस्तू ) हे विनिमयाचे चिन्ह वापरले. कवडीला मोल आले ते खऱ्या मोलाच्या वस्तूंमूळे. पण, काही शतकांनंतर कवडी, नाणी, नोटा यांनाच मोल आले. संपत्तीचा राक्षस माणसाच्या मानगुटीला बसला. संपत्ती म्हणजे लक्ष्मी नावाची देवता असे मानून लक्ष्मीपूजन सुरू झाले. खऱ्या उपयुक्त वस्तूंना हेटाळून ही मूर्तिपूजा सुरू झाली. पावित्र्यही मूर्तीला आपोआप आले. ही सारी किमया माणसानेच केली, व हीच 'परात्मते'ची किमया मानवी जीवनाच्या सर्व अंगांना बाधली आहे.

मार्क्सचे म्हणणे आहे की ज्ञान, भक्ती, कर्म, मांगल्य, प्रेम, पावित्र्य या साऱ्या गोष्टी मानवी मनाच्या अंतर्मुखतेतच वसत आहेत; त्यांना बाह्य दैवते मानणे किंवा बाह्यातून त्यांचा उद्भव मानून त्यांची आराधना करणे माणसाने सोडले पाहिजे. आजवर ही आराधना माणसाने केली व अनेक संस्कृतींचा प्रपंच थाटला. या दीर्घ भ्रमाच्या काळातच माणसाने विश्वाचे व आपल्या मनाचे ज्ञान संपादन केले. डार्विन, फ्राइड, न्यूटन व आइनस्टाइन प्रभृतींनी माणसाला प्रगल्भ केले. आता हा भ्रम टाकण्याइतका तो समर्थ झाला आहे. भ्रमातच राहील तर तो स्वत:चा नाश करून घेईल, असे विज्ञान-तंत्र मानवाने उपलब्ध करून घेतले आहे. हे विज्ञानतंत्र शाप ठरेल किंवा वरदान ठरेल; ते मानवानेच ठरवायचे आहे. त्यासाठी विज्ञानाला

अध्यात्माची जोड नको आहे. उलट मानवाने स्वत्व ओळखण्याची व ते स्वीकारण्याची गरज आहे. अंतर्मुख होऊन, युगानुयुगे बाधत आलेली 'परात्मता' व मूर्तिपूजा टाकून देण्याची गरज आहे.

विनोबांनी विज्ञान व आत्मज्ञान यांचा समन्वय घालण्याचा मार्ग सांगितला आहे. परंतु हे आत्मज्ञान परात्मतेचे अध्यात्म आहे. ईश्वर, परब्रह्म ह्या आध्यात्मिक कल्पना माणसाला परक्या नाहीत, कारण मानवी आत्मा हा ईशतत्त्वापासून किंवा ब्रह्मापासून वेगळा नाही; आत्मतत्त्व एकच एक, व सर्वत्र ओतप्रोत आहे, ही भूमिका घेतली तर परकेपणा ( परात्मता ) शिल्लक राहात नाही, असे म्हणता येईल. या युक्तिवादाने म्हणा किंवा श्रद्धेने म्हणा परात्मतेचा आक्षेप खोडून काढता येतो, असे म्हणता येईल. पण, अशाने समाधान होत नाही व मूळ प्रश्नावर असलेला मतभेद नाहीसा होत नाही. 'मानवी मन' हीच स्वत्वाची गंगोत्री व मर्यादा मानावयाची व मग स्वत्वाची प्राप्ती करून घ्यावयाची, ही मार्क्सची भूमिका जडवादी नाही, पण ती मानव-केंद्रित भूमिका आहे. उलट, विनोबांची आध्यात्मिक भूमिका मानव-केंद्रित नाही. ईश, ब्रह्म, अशा एखाद्या अ-मानुष चिद्-केंद्रावर ती आधारित आहे.

शेवटी, विनोबा व मार्क्स यांच्या समान भासणाऱ्या, अनेक निष्कर्षा-पुरत्या समानच असणाऱ्या, पण मूलत: श्रद्धेच्या दृष्टीने, भिन्न असणाऱ्या भूमिकांच्या बाबतीत व्यवहारातही कसा फरक पडतो, ते पाहणे इष्ट होईल. भूमिहीन कुटुंबांची भूदानात मिळालेल्या जमिनीवर स्थापना करण्याचे कार्य सर्वोदयी कार्यकर्त्यांनी हाती घेतले. संपत्तीचे दान व इतरही दाने त्यांनी मागितली. ह्या आंदोलनाला विनोबांचे प्रभावी मार्गदर्शन मिळाले व प्रारंभी यशही मिळाले. पण हे आंदोलन व्यवहाराच्या पातळीवर शबल झाले, हे खेदाने मान्य करावे लागेल. 'आध्यात्मिकता' हे या आंदोलनाचे जसे कवच तशीच मर्यादा ठरली. आपल्या भागवतधर्मीय संतांनी केलेले समतेचे आंदोलन असेच अध्यात्माच्या कवचाने व मर्यादेने सीमित राहिले.

उलट, मार्क्सच्या भूमिकेचा विपर्यास व तिला प्रखर विरोध होत राहून-देखील त्या भूमिकेचा मानवी समाजकारणात विस्तार होत राहिला. इतकेच नव्हे तर समाजशास्त्र, ज्ञानमीमांसा, धर्ममीमांसा इत्यादी ज्ञानक्षेत्रांत मार्क्सने दिलेल्या दृष्टीचा प्रभाव पडत गेला. याचे साधे कारण असे आहे की मार्क्सने 'मानवी मना'कडे, मानवी प्रत्यक्षाकडे, पाहण्यास सांगितले; भौतिक जीवनात व वैचारिक जीवनात माणसाने 'परात्मता' सोडण्यास

 सांगितले; माणसाच्या मनाला बाधणाऱ्या व समाजाला हतबल व हिंस्त्र

बनविणाऱ्या चेटुकांपासून सावध होण्याचा इषारा दिला. डार्विन, फ्राइड, व आइनस्टाइन यांच्या प्रमेयामुळे मानवाला खरी नम्रता लाभली, ही गोष्ट मार्क्सच्या भूमिकेला उपकारक ठरली. 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळी कोण आहे' हा ईश्वरभक्ताचा आत्मविश्वास कधीकाळी उपयुक्त ठरला. तसेच, माणसाचा आत्मा व विश्वाचा आधार असलेले परब्रह्म एकच आहे ही अद्वैताची भूमिका मानवाला समाधान देणारी ठरली. पण या आध्यात्मिक भूमिका माणसाला स्वतःच्या देहाचे व मनाचे दुबळेपण जाणवून घेण्यास उपयुक्त ठरत नाहीत; आणि हे दुबळेपण जाणवूनच माणसाला खरी नम्रता लाभू शकते. ही नम्रता माणसाने खऱ्या अर्थाने अंतर्मुख होऊनच लाभते. त्यासाठी साऱ्या परात्मतेचा निरास व्हावयास हवा. मार्क्सच्या भूमिकेत या निरासाची ज्ञानात्मक व क्रियात्मक शिकवण आहे. यातच त्या भूमिकेचे रहस्य व सामर्थ्य आहे.

'साम्ययोग'च्या संपादकांची वरील लेखासंबंधी टिप्पणी.

श्री. बेडेकर म्हणतात त्याप्रमाणे कार्ल मार्क्स खरोखर 'मनाला' ( Mind ) इतके महत्त्व देत असला तर विनोबांच्या आत्मवादात व त्याच्यात व्यवहारदृष्टचा फारसा फरक पडण्याचे, कारण नाही. पण मूलतः तो जडवादी आहे. त्यामुळे परिस्थिती बदलण्यावर त्याचा मुख्य भर आहे. विनोबांचा भर माणूस बदलण्यावर असला तरी समाज व परिस्थिती ह्यांच्या परिवर्तनाला त्यांनी अंगभूत तत्वे मानली आहेत. त्यामुळे त्यांचे तत्वज्ञान एकांगी नाही. कार्ल मार्क्स हेगेलचा शिष्य असला तरी त्याने त्याचा चैतन्यवाद घेतला नसून, सिद्धांत, प्रतिसिद्धांत व समन्वय सिद्धांत म्हणजे thesis, anti-thesis, synthesis हा dialeetics, किंवा ज्याला विनोबांनी 'वितर्क' म्हणजे विशेष प्रकारचा तर्क अशी संज्ञा दिली आहे तो, त्याने हेगेलपासून घेतलेला आहे. जडातून चैतन्य निर्माण होते म्हणजे आधी जड मग चैतन्य असा तो क्रम मानतो. परस्परांचा परस्परावर परिणाम होतो असे तो मानत असला तरी जड हे मुख्य आहे. त्यामुळे त्याच्या म्हणजे परिस्थितीच्या बदलावर त्याचा मुख्य भर आहे. वस्तुतः त्या क्रमाचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने महत्त्व असले तरी व्यवहारदृष्टचा फारसे महत्त्व नाही. कारण परस्परांचा परस्परावर परिणाम होत आहे असे मानल्यानंतर आधी कोण हा प्रश्न व्यवहारदृष्टचा फारसा महत्त्वाचा नाही. पण भर कोणावर द्यावयाचा ह्या दृष्टीने आधी कोण त्याचे व्यवहार-दृष्टचाही महत्त्व आहे. आधी चैतन्य मानले की अर्थात माणसावर व त्याच्या परिवर्तनावर अधिक भर दिला जाईल, ज्याप्रमाणे विनोबा आज देत आहेत व त्यामुळेच त्यांच्या तत्त्वज्ञानात अहिंसेला प्राधान्य आहे. माणसाचे

परिवर्तन छडीने किंवा दंड्याने होत नाही. परिस्थितीचे परिवर्तन बाह्य उपायाने किंवा दंड्याने होऊं शकते. पण माणूस मुख्य असल्यामुळे त्याचे परिवर्तन केले की परिस्थितीचे परिवर्तन सहजच व सुलभ होते. माणसाच्या परिवर्तनात श्री. बेडेकर म्हणतात त्याप्रमाणे त्याची ' परात्मता ' काढून टाकणेही येते. पण ' परात्मता' काढून टाकण्यावर कार्ल मार्क्सचा तितकासा भर नाही. त्याचा भर पद्धती व व्यवस्था बदलण्यावर मुख्य आहे. म्हणून परिस्थिती बदलून माणसाचे म्हणजे त्याच्या हृदयाचे परिवर्तन त्याला करावयाचे आहे, ह्यामुळेच त्याने अहिंसेचा मार्ग सोडून मजूर वर्गाच्या हुकुमशाहीचा संधिकाळात पुरस्कार केला. पण संधिकाळातील ही हुकूमशाही कायमचीच बोकांडी बसली आहे. ती कधी काळी जाऊन स्टेट म्हणजे राज्यव्यवस्था कधी काळी नाहीशी होण्याची आशा नाही. ह्याच्या उलट विनोबांना अहिंसेच्या मार्गाने, माणसातील सत् प्रवृत्तींना जागवून समाजाचे परिवर्तन करावयाचे आहे. त्यांचा मार्ग सद्यः परिणामी दिसला नाही तरी तो इंग्रजीत म्हणतात त्याप्रमाणे मंद (Slow) वाटला तरी (Sure) म्हणजे खात्रीचा आहे. माणसात सत् व असत् दोन्ही प्रवृत्ती आहेत. त्यामुळे तो नारायण किंवा सैतानही होऊ शकतो. विनोबांचा मार्ग त्यातील नारायण जागविण्याचा आहे. कार्ल मार्क्सचा मार्ग परिस्थिती जबरदस्तीने बदलून त्याच्या असत् प्रवृत्तींना आळा घालण्याचा आहे. ह्यावरूनच तो जडवादी आहे हे सिद्ध होते. तो चैतन्यवादी असता व माणसाच्या मनाला त्याने महत्त्व दिले असते तर त्याने हिंसेचा पुरस्कार केलाच नसता. परिस्थितीच्या आधी माणसाच्या हृदयपरिवर्तनाचा त्याने पुरस्कार केला असता.

साम्यवादातून हिंसा बाद केल्याने साम्ययोग राहतो हे समीकरण चुकीचे आहे. काहीच शिल्लक राहात नाही. कारण हिंसा हे साम्यवाद्यांचे शेवटचे हत्यार आहे. शेवटी माणूस ज्या साधनांचा आश्रय घेतो ते त्याचे खरे साधन. एकदा आम्ही विनोबांना प्रश्न विचारला होता की साम्ययोगातून अहिंसा काढली तर साम्यवाद शिल्लक राहतो. त्यावर त्यांनी उत्तर दिले. देह आणि प्राण ह्यातून प्राण काढून घेतला की काय शिल्लक राहील, प्रेत. त्या प्रेताचा उपयोग आहे काय ? ते जाळण्याच्या लायकीचे राहील. त्यावरून हिंसायुक्त साम्यवादाबद्दल ( आणि साम्यवाद म्हणजेच तो हिंसायुक्त असणार) त्यांचे मत काय आहे हे दिसून येते. सारांश साम्यवादाचा प्राण हिंसा व साम्ययोगाचा प्राण अहिंसा ह्या दोघांचा मेळ कसा बसणार ?

ह्याचा अर्थ असा नाही की साम्यवादात काहीच चांगला अंश नाही.
 पुष्कळ चांगला अंश आहे. पण हिंसा हा एवढा मोठा दोष आहे की त्यामुळ

त्या चांगल्या अशाचा प्रभाव पडणे शक्य नाही. धाकाने किंवा दंडयाने माणूस कायमचा सन्मार्गावर राहणे शक्य नाही.

ह्या मोठ्या दोषामुळेच रशियासारख्या देशाला जागतिक क्रांतीची ( world revolution) कल्पना सोडून द्यावी लागली, व शांततामय सह-अस्तित्वावर यावे लागले. चीन आडमुठेपणामुळे अजून त्या कल्पनेला चिकटून आहे व बंदुकीच्या बारुदीतून क्रांती होते असे मानून चालला आहे. त्याची प्रतिक्रिया जगातील राष्ट्रांवर प्रतिकूल होत आहे. मतपरिवर्तन किंवा हृदयपरिवर्तनाचे साधन सर्वांनाच मोकळे आहे.

गांधीजींनीं प्रसंगी हिंसेला मान्यता दिली आहे असे श्री. बेडेकरांनी जे विधान केले आहे तेही आमच्या मते बरोबर नाही. वीर माणूस प्रतिपक्षावर एकदा हत्यार उचलील, पण भ्याड माणूस त्याची हिंसा प्रतिक्षणी करीत राहील. म्हणून भ्याडापेक्षा वीराला तो कमी हिंसावादी आहे असे गांधीजींनी म्हटले आहे. त्यांचे हे म्हणणे सापेक्ष आहे, हिंसेला मान्यता देणारे नाही. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा केल्यास हरकत नाही असेही गांधीजींनी म्हटले आहे. पण परतंत्र राष्ट्र मनाने सारखी हिंसा करीत राहते, त्यापेक्षा एकदा हिंसा मार्ग पत्करून स्वातंत्र्य मिळवणे अधिक ठीक एवढाच त्याचा अर्थ आहे. पण अहिंसक प्रतिकार करणारा किंवा अहिंसक स्वातंत्र्योपासक त्यांच्या मते नेहमीच श्रेष्ठ आहे. सापेक्ष दृष्टीतही त्यांनी भ्याडापेक्षा वीर श्रेष्ठ व पारतंत्र्य सहन करणाऱ्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी हिंसायुक्त लढणारा श्रेष्ठ म्हणून अहिंसेलाच मान्यता दिली आहे. हिंसेला नव्हे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम .......... वि:
क्रमांक .......... नोंद दि ..........

# कम्युनिस्ट जाहीरनामा

'कम्युनिस्ट जाहिरनामा' हे अवघ्या पन्नास पानांचे छोटे पुस्तक आहे. तो जाहिरनामा प्रसिद्ध झाल्याला आज, बरोबर शंभर वर्षे पुरीं होत आहेत. या काळामध्ये या छोटया पुस्तकाचा प्रभावमात्र साऱ्या मानवजातीवर पडलेला दिसतो.

हा प्रभाव पडण्यासारखे त्या पुस्तकात काय आहे ?

या प्रश्नाचे एक असे उत्तर देता येईल की या पुस्तकात, किंवा जाहिरनाम्यात, साऱ्या जगातील कंगाल दुःखी जनतेला आशेचा मंत्र दिला आहे व युद्धाचा आदेश दिला आहे. साहजिकच जेथे जेथे दारिद्र्य व विपत्ति यांनी ठाण मांडले आहे तेथे तेथे या पुस्तकालाहि अढळ स्थान लाभणारच ! दुःख व विषमता जगभर असल्यामुळे या जाहिरनाम्याचा प्रभाव जगभर आहे. वारल्यांच्या झोपडयांतून, न्यूयॉर्कच्या चाळींतून, ब्रिटनच्या खाणींतून व चीनच्या शेतीवाडयांतून आज या पुस्तकाचे मनन होत आहे व त्याचे कारण त्यात आशेचा व युद्धाचा मंत्र दिलेला आहे.

पण केवळ आशेचा व युद्धाचा मंत्र दिल्याने एकाद्या पुस्तकाला अशी सार्वत्रिक मान्यता लाभणें आधुनिक युगात शक्य होईल काय ? मुळीच नाही. बायबलमध्ये, कुराणामध्ये, किंवा गीतेमध्ये मानवाला कोणत्या तरी मोक्षाची आशा दाखवलेली आहे व 'युद्धस्व' असा मंत्रही दिलेला आहे. पण आधुनिक युगातील माणसाला या मंत्राचा काय उपयोग ? त्याला आधुनिक समाजाचे ज्ञान देणारा व आजच्या विपत्तीतून 'मोक्ष' कसा मिळेल हे सांगणारा मार्गदर्शक असा ग्रंथ हवा. त्यालाच तो आजची 'गीता' समजणार. 'कम्युनिस्ट जाहिरनामा' हा नेमका असा मार्गदर्शक ग्रंथ आहे. त्यात भाबडा आशावाद व लढाऊ वीररसोत्पादक उपदेश नाही, तर त्यात खऱ्या अर्थाने ज्ञान आहे.

हे ज्ञान कशाचे ? तर आधुनिक युगात मानवसमाज हेच एक रणक्षेत्र आहे, त्या रणक्षेत्राचे !

सन १८४८ मध्ये युरोपातील देश नि देश क्रांतीने हादरून निघाला. पॅरिस, बर्लिन वगैरे सर्व युरोपियन राजधान्यांमध्ये कामगार वर्गाने बंडाचा झेंडा उभारला. ही सारी बंडे मोडली खरी, पण त्यामुळे रणक्षेत्राचा व एकंदर युद्धव्यूहाचा नकाशा स्पष्टपणे दिसू लागला. वासुदेव बळवंतांच्या बंडाने भारतीय स्वातंत्र्ययुद्धाच्या बाबतीत असेच काहीसे कार्य झाले नाही काय ? ही कामगारांच्या बंडाची वावटळ सुरू होती त्यावेळी व तिच्यातून 'कम्युनिस्ट जाहिरनाम्याचा' जन्म झाला. त्या बंडामध्ये कामगारांना जे ध्येय अस्पष्टपणे कळत होते पण सबळ प्रेरणा देत होते तेच स्पष्ट करण्याचे कार्य या जाहिरनाम्याने केले.

या दृष्टीने, हा जाहिरनामा म्हणजे उगाच कोणी तरी 'अडाणी लोकांना दिलेली चिथावणी' नसून प्रत्यक्ष वर्गयुद्धाच्या रणक्षेत्रावर सुचलेली व एका क्रांतिकारक द्रष्टयाने व सेनापतीने मांडलेलीं रणनीतीची सूत्रे आहेत, किंवा क्रांतिसूत्रे आहेत.

क्रांतीयुद्धाच्या या सूत्रमय ग्रंथाला आज जे महत्त्व लाभले आहे त्याचे कारण त्यात आधुनिक युगाबद्दलचे जे ज्ञान आहे ते अनुभवाने खरे ठरले आहे. या बाबतीत श्री. शंकरराव जावडेकर म्हणतात, 'त्याने (मार्क्सने) १८४८ साली कम्युनिस्ट जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यात, भांडवलशाही संस्कृतीत निर्माण होणारा वर्गविग्रह सर्व जगात फैलावेल आणि त्यात सर्व जगातील कामगार एकजूट होऊन सर्वत्र समाजवादी क्रांती यशस्वी करतील असे भाकीत केले आहे. यानंतर सत्तर वर्षांनी, १९१७ साली रशियात समाजवादी क्रांती यशस्वी झाली आणि त्यानंतर तीस वर्षांच्या आत समाजवादी संस्कृतीने मंडित असे प्रचंड रशियन राष्ट्र आज जगातील पहिल्या प्रतीचे राष्ट्र बनले आहे.' (नवभारत, ऑक्टोबर १९४७, पृ. ७). दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, 'मार्क्स व एन्जल्स् यांनी १८४८ मध्ये भविष्य वर्तविले त्याला आज एक शतक झाले. या शतकातील मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिल्यास त्यांचे भविष्य स्थूलमानाने तरी बरोबर आल्याचे प्रत्येक निप:क्षपाती विद्वानास मान्य करावे लागत आहे.' ( दत्तोपंत आपटे स्मारक-ग्रंथ, 'विरोधविकासी भौतिकवाद' पृ. १५८ ).

कम्यूनिस्ट जाहिरनाम्यामध्ये वर्तविलेले सामाजिक घडामोडीचे भविष्य 'स्थूल मानाने बरोबर ठरले आहे' असे श्री. जावडेकर म्हणत आहेत याचे कारण असे की, मार्क्सवादाच्या विरोधकांचा एक नेहमीचा युक्तिवाद व आक्षेप जमेस घेऊन त्यांना मार्क्सवादाचा शास्त्रशुद्धपणा प्रतिपादन कराव-

याचा आहे. विरोधकांचा हा युक्तिवाद असा असतो की मार्क्सवाद जर 'शास्त्र' आहे तर त्याला 'साऱ्या' घडामोडींचे तंतोतंत भविष्य सांगता येईलच असे प्रथम त्यावर लादावयाचे व मग कोणत्या तरी क्षुद्र घटनांच्या तपशिलात शिरून मार्क्सचे भविष्य खोटे ठरले म्हणून ओरड करावयाची. ही युक्ती इतकी शिळी परंतु नेहमीची झाली आहे की 'भविष्य' खरे ठरले याचा शास्त्रदृष्ट्या अर्थ काय ही गोष्ट सांगणे श्री. जावडेकरांना जरूर वाटले आहे. सामाजिक घटनाच्या शास्त्रातील भविष्यवाद हा 'स्थूलमानानच'--व्यापक व स्थूल नियम म्हणूनच--पडताळून पाहावयाचा असतो व त्या शास्त्रीयतेच्या खऱ्या कसोटीला मार्क्सवाद उतरतो, असा त्यांचा अभिप्राय आहे.

हीच गोष्ट वर्गयुद्धाच्या बाबतीत खरी आहे. कम्युनिस्ट जाहिरनाम्यात मानवी इतिहासाबद्दल एक व्यापक स्वरूपाचे विधान आहे. ते असे की, आजपर्यंतचा मानवी समाजाचा इतिहास हा वर्गयुद्धाचा इतिहास आहे. या विधानाचा येथे थोडक्यात विचार करू. कारण या विधानावरही विरोधकानी पुष्कळच झोड उठवलेली आढळते व ते विधानही मूलभूत व महत्त्वाचे आहे.

मानवी इतिहाससंबंधीचे हे विधान खरे की खोटे हे कसे ठरवावयाचे ? हा प्रश्न आहे. त्याचे उत्तर देतानाही समाजशास्त्रीय 'भविष्या' प्रमाणे येथेही स्थूलमानाची दृष्टी ठेवावी लागते. श्री. जावडेकरांच्या शब्दांत हीच गोष्ट सांगायची तर 'मानवी इतिहासातील प्रत्येक घटना अथवा घडामोड ही वर्गयुद्धाचीच होती किंवा मानवी इतिहासात वर्गयुद्धावाचून दुसरे काही घडलेले नाही असे मार्क्स व एन्जल्स् याचे मत होते' असा जाहिरनाम्यातील विधानाचा अर्थ होऊ शकत नाही. 'असा अर्थ करणे हा त्यांच्या विधानाचा सर्वस्वी विपर्यास आहे.' मग त्या विधानाचा अर्थ काय? तर, स्थूलमानाने एका विस्तृत देशकालाचा विचार केला म्हणजे सामाजिक घडामोडींच्या विविधतेखाली सूत्ररूपाने व आधारभूत असा वर्गयुद्धाचा पाया सापडतो.

सामाजिक घडामोडींच्या विविधतेबद्दल व भिन्नभिन्न व्यक्तींच्या, राष्ट्रसमूहांच्या, धर्मसमूहांच्या व इतर समूहांच्या विविध प्रेरणांबद्दल विचारच करावयाचा नाही, असा पर्याय वर्गयुद्धाच्या सिद्धान्तावरून निघत नाही. तसा पर्याय विरोधकांनी त्या सिद्धान्तावर लादला मात्र आहे. वस्तुतः मार्क्सला या सामाजिक विविधतेची नीट कल्पना होतीच. त्याने सिद्धान्त मांडला आहे तो असा की मानवी इतिहासामध्ये अनुभवास येणाऱ्या विविधतेच्या बुडाशी मूलभूत अशी एक बाब आहे, ती म्हणजे वर्गयुद्ध.

 रोजच्या साध्या अनुभवाने पृथ्वी सपाट आहे, किंवा कोठे उंच पर्वत तर कोठे

खोल दऱ्या आहेत असे आढळते, पण शास्त्रज्ञानाने कळते की साध्या अनुभवातील सपाटी किंवा उंचसखलपणा बाजूला ठेवून आपण असे मानले पाहिजे की, पृथ्वी ही गोल आहे. अर्थात, पृथ्वी गोल आहे हे शास्त्रत: पटल्यानंतरही मर्यादित व क्षुद्र अनुभवापुरती व व्यवहारापुरती जमिनीची सपाटी आपण मानतोच, किंवा पर्वताला पर्वत व दरीला दरी मानतो. तोच न्याय वर्गयुद्धाच्या सामान्य शास्त्रनियमाला व विविधतेच्या अनुभवाला लागतो.

वरील गोष्ट एका उदाहरणाने जास्त विशद होईल. वर्गयुद्ध हा सर्वसामान्य नियम मानला म्हणजे धार्मिक व राष्ट्रीय घडामोडींचा विचारच करतां येत नाही असा पेच आहे, असे कित्येकांना प्रामाणिकपणे वाटते. ही अडचण भासणार हे ओळखूनच मार्क्सवादाचे विरोधक दडपून असे म्हणत असतात की, धर्म व राष्ट्र या बाबींचा विचार मार्क्सवादाने कधी केलेलाच नाही.

खरी गोष्ट काय आहे ? १८४८ च्या कम्युनिस्ट जाहिरनाम्यातील दुसऱ्या प्रकरणात कम्युनिझमविरुद्ध घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांचा विचार केला आहे. आजच्या घटकेला घेतले जाणारे सर्वच्या सर्व आक्षेप शंभर वर्षांपूर्वीही अशाच स्वरूपात घेतले जात होते व त्यांची सूत्ररूपाने दिलेली उत्तरे या प्रकरणात आहेत. त्यांत व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, कुटुंबसंस्था, नीतिमत्ता वगैरे प्रश्नांबरोबरच धर्म व राष्ट्र यांचा विचारही केलेला आढळतो. जाहिरनाम्यात म्हटले आहे की, " कामगार वर्गाला प्रथम राजकीय सत्ता काबीज करणे जरूर आहे व सत्ताधारी वर्ग बनणे आवश्यक आहे, म्हणजेच राष्ट्रांतील एक वर्ग म्हणून स्वत:चे स्थान कमाविणे जरूर आहे. किंबहुना आपणच राष्ट्र म्हणून स्थिर होणे त्याला आवश्यक आहे. या अर्थाने कामगार वर्गही राष्ट्रीयच राहील. ' राष्ट्रीय ' या शब्दाचा भांडवलदारांच्या दृष्टीने मात्र अगदी वेगळा अभिप्राय आहे. " भांडवलदारी राष्ट्रीयत्व हे अंतर्गत दृष्टीने बहुजनसमाजाच्या शोषणावर व बाह्यसंबंधांच्या दृष्टीने दुर्बल राष्ट्रांच्या शोषणावर आधारलेले आहे, ही गोष्ट ब्रिटन, फ्रान्स वगैरे साम्राज्यवादी राष्ट्रांच्या प्रत्यक्ष जीवनावरून कळून येतेच. ह्यापेक्षा कामगार वर्गाचे राष्ट्रीयत्व वेगळे कसे ? ह्याचे उत्तर मार्क्स देतो : " एका नागरिकाने दुसऱ्याचे शोषण करण्याची प्रथा ज्या प्रमाणात कमी होईल त्याच प्रमाणात एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राचे शोषण करण्याची प्रथा बंद पडत जाईल. राष्ट्राच्या कक्षेतील वर्गविग्रह नाहीसा झाला की राष्ट्राराष्ट्रांतील विग्रहही नाहीसा होईल. " जाहिरनाम्यांतल्या राष्ट्रीयत्वासंबंधीच्या भूमिकेचे जास्त विवेचन सन 

१८५३ च्या हिंदुस्थानविषयक पत्रांत मार्क्सने केले आहे. आयर्लंड, हिंदुस्थान इत्यादि देशांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ व ब्रिटिश कामगारांची समाजवादी चळवळ यांत विरोध तर नाहीच, उलट एकाच सामाजिक क्रांतीची ही दोन अंगे आहेत व ती परस्पराश्रयी आहेत, असे मत मार्क्सने व नंतरच्या सर्व मार्क्सवाद्यांनी मांडलेले व आचरलेले आहे.

या ठिकाणी वर्गसमन्वयाच्या तत्त्वाचा विचार नीट करता येईल. इतर राष्ट्रांना लुटणाऱ्या ब्रिटनचे भांडवलदार व कामगार यांच्यातील वर्गयुद्ध या लूटीमुळे टळेल व त्यांच्यात सख्य किंवा वर्गसमन्वय वाढेल; तिकडे हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशातील भांडवलदार व कामगार यांच्यातले वर्गयुद्धही ब्रिटनविरोधी लढ्यामुळे थंड पडेल व वर्गसमन्वयाची वृत्ती बळावेल. ह्या गोष्टी मार्क्सने लक्षात घेतलेल्या नाहीत काय ? असे मुळीच नाही. उलट, या दुहेरी वर्गसमन्वयाचा पुरा विचार करूनच त्याने म्हटले आहे की ब्रिटनसारख्या देशांत या वर्गसमन्वयालाच परम तत्त्व मानणाऱ्या साम्राज्यप्रेमी दांभिक समाजवाद्यांची जात निर्माण होईल व परतंत्र देशांतही वर्गसमन्वयाचे तत्त्व स्वीकारणारे राष्ट्रीय समाजवादी निघतील. या दोघांनाही कामगारवर्गीय राष्ट्रवादाची व वर्गयुद्धाची दीक्षा देणे हे अवघड काम मार्क्सवाद्यांनी केले पाहिजे असे तो म्हणतो.

कामगारवर्गीय राष्ट्रवादामध्ये वर्गसमन्वयाला नुसता आडमुठा विरोध केलेला नाही, उलट वर्गसमन्वय अपरिहार्य मानला आहे. पण ह्या 'मानण्यात' एक गोष्ट लपविण्यात आलेली नाही. ती अशी की या वर्गसमन्वयाला एकसारखे वर्गयुद्धाच्या चौकटीतच नांदावयाचे आहे. वर्गयुद्ध हे अंतिम व व्यापक तत्त्व आहे आणि व्यवहारही त्याच तत्त्वानुसार झाला पाहिजे; राष्ट्रीय परिस्थितीला पाहून जो व्यवहार वर्गसमन्वयाला आवश्यक ठरेल तो या वर्गयुद्धाच्या चौकटीत करावा असे मार्क्सचे मत आहे.

राष्ट्रवाद व वर्गसमन्वय याचा विचार प्रत्येक भारतीयाला करावाच लागला. प्रत्येक भारतीय राजकीय पक्षाने वर्गसमन्वयाची भूमिका घेतली, पण त्यातही फरक पडला तो असा की, कॉंग्रेसने व तत्सम पक्षांनी वर्गसमन्वयालाच परम, अंतिम व व्यापक तत्त्व बनविले, व कामगार वर्गाच्या मार्क्सवादी पक्षाने ( कम्युनिस्ट पक्षाने ) वर्गसमन्वय कबूल करूनही वर्गयुद्धाला व्यापक तत्त्व मानले. श्री. जावडेकर यांनी या बाबतींत घेतलेली भूमिका तत्त्वतः मार्क्सवादी पक्षासारखी आहे, असे त्यांच्या पुढील उद्‌गारांवरून दिसून येईल. " धोरण या दृष्टीने काही परिस्थितीत वर्गसमन्वय इष्ट व हितप्रद आहे हे मान्य केले तरी समाजवादी क्रांती

अखेरीस वर्गविग्रहाचाच लढा आहे हे विसरता कामा नये. या क्रांतीचाच काळ आज आला आहे. " ( नवयुग, ' मी मार्क्सवादी का नाही ? ', दिवाळी अंक १९४७ ).

मार्क्सवादी नसूनही श्री. जावडेकरांची मते काही मर्यादेपुरती मार्क्सवादासारखी आहेत, व महाराष्ट्रामध्ये मार्क्सवादाचे जे अनुकुल ग्रहण झाले आहे त्याचे प्रतिबिंब त्यांच्या विचारांत दिसते. यापुढे मात्र त्यांच्या मतात व मार्क्सवादाच्या मूलतत्त्वात असणारा फरक मला दाखवावा लागणारा आहे. हा फरक तरी कशामुळे पडला आहे ? याचे थोडक्यात उत्तर देऊन मग पुढील चर्चेला सुरवात करू. या फरकाचे कारणही वर्गसमन्वयाच्या अपरिहार्य अशा घटनेत आहे. हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा लढा हेच मूलभूत सत्य व हीच सर्वंकष श्रद्धा मानून कार्यक्षेत्रात उतरलेल्या राष्ट्रवाद्यांमध्ये श्री. जावडेकर हे अग्रगण्य आहेत. त्या लढ्यामध्ये वर्गयुद्धाला गौण स्थानच होते, उलट वर्गसमन्वय ही सर्वव्यापी प्रतीत होणारी बाब होती. या राजकीय व सामाजिक परिस्थितीत समाजवादाचे तत्त्वज्ञान श्री. जावडेकरांनी अंगिकारिले खरे, पण त्यांची मूलभूत राष्ट्रीय वर्गसमन्वयाची श्रद्धा त्यामुळे नाहीशी झालेली नाही. वर्गयुद्ध हेच व्यापक समाजक्रांतीचे तत्त्व आहे ही गोष्ट त्यांना पटते खरी, पण तितक्याच तीव्रतेने त्यांना असेही वाटते की वर्गसमन्वयावर उभारलेली राष्ट्रसभा हीच या समाजक्रांतीचे वाहन होऊ शकेल. " राष्ट्रसभेने सत्याग्रही वर्गविग्रहास कचरता कामा नये " असे आदेशात्मक विधान करताना ' कचरणार नाही ' अशी श्रद्धाही त्यांच्या मनात आज घटकेला वसत आहे. त्यांच्या मताचा मार्क्सवादाशी फरक असण्याचे हे कारण आहे.

जाहिरनाम्यामध्ये वर्गयुद्धाचे तत्त्व जसे ठळकपणे सांगितले आहे, तसेच दुसरे तत्त्व कामगार वर्गाच्या सत्तेचे आहे. सगळा जाहिरनामाच मुळी शहरातल्या कामगार वर्गाला उद्देशून आहे. असे का ? तर एक सहज सुचणारे उत्तर असे की कामगार वर्ग समाजातला सर्वांत गांजलेला असतो म्हणून त्याला उठविण्याचा मार्क्सने प्रयत्न केला. हे उत्तर वरवर पाहाता ठीक दिसते, पण अगदी चूक आहे. दीनोद्धाराच्या कल्पना बाळगणारे समाजवादी या कामगारवर्गाला दीन व कंगाल समजून त्याला ' वर काढण्यासाठी ' प्रयत्न करतात व काही वेळी या कामी धनजीविवर्गाची मदत देखील मागतात. असे दीनोद्धारक समाजवादी मार्क्सच्याही आधीपासून झाले आहेत. या समाजवाद्यांचे ब्रीदवाक्य असे होते की, ' सर्व माणसे एकमेकांची भावंडे आहेत. ' तेव्हा

१८५३ च्या हिंदुस्थानविषयक पत्रांत मार्क्सने केले आहे. आयर्लंड, हिंदुस्थान इत्यादि देशांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ व ब्रिटिश कामगारांची समाजवादी चळवळ यांत विरोध तर नाहीच, उलट एकाच सामाजिक क्रांतीची ही दोन अंगे आहेत व ती परस्पराश्रयी आहेत, असे मत मार्क्सने व नंतरच्या सर्व मार्क्सवाद्यांनी मांडलेले व आचरलेले आहे.

या ठिकाणी वर्गसमन्वयाच्या तत्त्वाचा विचार नीट करता येईल. इतर राष्ट्रांना लुटणाऱ्या ब्रिटनचे भांडवलदार व कामगार यांच्यातील वर्गयुद्ध या लुटीमुळे टळेल व त्यांच्यात सख्य किंवा वर्गसमन्वय वाढेल; तिकडे हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशातील भांडवलदार व कामगार यांच्यातले वर्गयुद्धही ब्रिटनविरोधी लढ्यामुळे थंड पडेल व वर्गसमन्वयाची वृत्ती बळावेल. ह्या गोष्टी मार्क्सने लक्षात घेतलेल्या नाहीत काय ? असे मुळीच नाही. उलट, या दुहेरी वर्गसमन्वयाचा पुरा विचार करूनच त्याने म्हटले आहे की ब्रिटनसारख्या देशांत या वर्गसमन्वयालाच परम तत्त्व मानणाऱ्या साम्राज्यप्रेमी दांभिक समाजवाद्यांची जात निर्माण होईल व परतंत्र देशांतही वर्गसमन्वयाचे तत्त्व स्वीकारणारे राष्ट्रीय समाजवादी निघतील. या दोघांनाही कामगारवर्गीय राष्ट्रवादाची व वर्गयुद्धाची दीक्षा देणे हे अवघड काम मार्क्सवाद्यांनी केले पाहिजे असे तो म्हणतो.

कामगारवर्गीय राष्ट्रवादामध्ये वर्गसमन्वयाला नुसता आडमुठा विरोध केलेला नाही, उलट वर्गसमन्वय अपरिहार्य मानला आहे. पण ह्या 'मानण्यात' एक गोष्ट लपविण्यात आलेली नाही. ती अशी की या वर्गसमन्वयाला एकसारखे वर्गयुद्धाच्या चौकटीतच नांदावयाचे आहे. वर्गयुद्ध हे अंतिम व व्यापक तत्त्व आहे आणि व्यवहारही त्याच तत्त्वानुसार झाला पाहिजे; राष्ट्रीय परिस्थितीला पाहून जो व्यवहार वर्गसमन्वयाला आवश्यक ठरेल तो या वर्गयुद्धाच्या चौकटीत करावा असे मार्क्सचे मत आहे.

राष्ट्रवाद व वर्गसमन्वय याचा विचार प्रत्येक भारतीयाला करावाच लागला. प्रत्येक भारतीय राजकीय पक्षाने वर्गसमन्वयाची भूमिका घेतली, पण त्यातही फरक पडला तो असा की, काँग्रेसने व तत्सम पक्षांनी वर्गसमन्वयालाच परम, अंतिम व व्यापक तत्त्व बनविले, व कामगार वर्गाच्या मार्क्सवादी पक्षाने ( कम्युनिस्ट पक्षाने ) वर्गसमन्वय कबूल करूनही वर्गयुद्धाला व्यापक तत्त्व मानले. श्री. जावडेकर यांनी या बाबतींत घेतलेली भूमिका तत्त्वतः मार्क्सवादी पक्षासारखी आहे, असे त्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येईल. " धोरण या दृष्टीने काही परिस्थितीत
 वर्गसमन्वय इष्ट व हितप्रद आहे हे मान्य केले तरी समाजवादी क्रांती

अखेरीस वर्गविग्रहाचाच लढा आहे हे विसरता कामा नये. या क्रांतीचाच काळ आज आला आहे. " ( नवयुग, ' मी मार्क्सवादी का नाही ? ', दिवाळी अंक १९४७ ).

मार्क्सवादी नसूनही श्री. जावडेकरांची मते काही मर्यादेपुरती मार्क्सवादासारखी आहेत, व महाराष्ट्रामध्ये मार्क्सवादाचे जे अनुकुल ग्रहण झाले आहे त्याचे प्रतिबिंब त्यांच्या विचारांत दिसते. यापुढे मात्र त्यांच्या मतात व मार्क्सवादाच्या मूलतत्त्वात असणारा फरक मला दाखवावा लागणारा आहे. हा फरक तरी कशामुळे पडला आहे ? याचे थोडक्यात उत्तर देऊन मग पुढील चर्चेला सुरवात करू. या फरकाचे कारणही वर्गसमन्वयाच्या अपरिहार्य अशा घटनेत आहे. हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा लढा हेच मूलभूत सत्य व हीच सर्वंकष श्रद्धा मानून कार्यक्षेत्रात उतरलेल्या राष्ट्रवाद्यांमध्ये श्री. जावडेकर हे अग्रगण्य आहेत. त्या लढ्यामध्ये वर्गयुद्धाला गौण स्थानच होते, उलट वर्गसमन्वय ही सर्वव्यापी प्रतीत होणारी बाब होती. या राजकीय व सामाजिक परिस्थितीत समाजवादाचे तत्त्वज्ञान श्री. जावडेकरांनी अंगिकारिले खरे, पण त्यांची मूलभूत राष्ट्रीय वर्गसमन्वयाची श्रद्धा त्यामुळे नाहीशी झालेली नाही. वर्गयुद्ध हेच व्यापक समाजक्रांतीचे तत्त्व आहे ही गोष्ट त्यांना पटते खरी, पण तितक्याच तीव्रतेने त्यांना असेही वाटते की वर्गसमन्वयावर उभारलेली राष्ट्रसभा हीच या समाजक्रांतीचे वाहन होऊ शकेल. " राष्ट्रसभेने सत्याग्रही वर्गविग्रहास कचरता कामा नये " असे आदेशात्मक विधान करताना ' कचरणार नाही ' अशी श्रद्धाही त्यांच्या मनात आज घटकेला वसत आहे. त्यांच्या मताचा मार्क्सवादाशी फरक असण्याचे हे कारण आहे.

जाहिरनाम्यामध्ये वर्गयुद्धाचे तत्त्व जसे ठळकपणे सांगितले आहे, तसेच दुसरे तत्त्व कामगार वर्गाच्या सत्तेचे आहे. सगळा जाहिरनामाच मुळी शहरातल्या कामगार वर्गाला उद्देशून आहे. असे का ? तर एक सहज सुचणारे उत्तर असे की कामगार वर्ग समाजातला सर्वांत गांजलेला असतो म्हणून त्याला उठविण्याचा मार्क्सने प्रयत्न केला. हे उत्तर वरवर पाहाता ठीक दिसते, पण अगदी चूक आहे. दीनोद्धाराच्या कल्पना बाळगणारे समाजवादी या कामगारवर्गाला दीन व कंगाल समजून त्याला ' वर काढण्यासाठी ' प्रयत्न करतात व काही वेळी या कामी धनजीविवर्गाची मदत देखील मागतात. असे दीनोद्धारक समाजवादी मार्क्सच्याही आधीपासून झाले आहेत. या समाजवाद्यांचे ब्रीदवाक्य असे होते की, ' सर्व माणसे एकमेकांची भावंडे आहेत. ' तेव्हा

अन्याय वगैरे सर्व गोष्टी बंधुप्रेमाच्या या तत्त्वाशी विसंगत आहेत ! प्राचीन भारतीय ध्येयवाद्यांचा विश्वकुटुंबवाद किंवा सर्वभूतात्मैक्य यांनाहीं याच कोटींत घालावे लागेल.

मार्क्सने प्रथम बंधुप्रेमाच्या ह्या तत्त्वाला साफ झिडकारून टाकले व सांगितले की आजच्या समाजात एकच सत्य नांदत आहे. ' मानवी समता व बंधुप्रेम ' या कपोलकल्पनेपेक्षा ते अगदी वेगळे व भयंकर आहे. भांडवलदार किंवा धनजीवी वर्ग व श्रमजीवी वर्ग त्यांच्यातले अविरत वर्गयुद्ध हेच ते एकमेव सत्य आहे. ज्या समतावाद्यांना व समाजवाद्यांना हे सत्य दिसत नसेल ते खरे समाजवादी तर नाहीतच, उलट आजच्या समाजातच श्रमिकांना न्याय व सुख लाभेल असे मानणारे ते भ्रमजीवी लोक आहेत, असा कठोर निर्वाळा मार्क्सने दिला आहे.

धनजीवीही नाही व श्रमजीवीही नाही अशा मधल्या स्थितीतल्या लोकांना एकीकडे धनिकांची सत्ता दिसत नाही; आपणही कदाचित नशीबवान ठरू किंवा कुवतीने व स्पर्धेने फोर्ड व रॉकफेलर बनू शकू ही वृत्ती त्यांना समाजक्रमांत गुंतवून ठेवते; दुसरीकडे या लोकांना श्रमजीवींच्या अंतिम सत्तेची गरज दिसत नाही व त्याची शक्यता वाटत नाही. त्यांना अन्यायाची व दीनोद्धाराची जाणीव मात्र पदोपदी होते. या द्विधा परिस्थिती-मुळे ' समाजवादाचे तत्त्व ' मान्य पण ' कामगार सत्तेचा तपशील ' अमान्य असणारे समाजवादी या मधल्या स्थितींतल्या लोकांतून पैदा होतात, किंवा मूळचे कामगारवर्गीय असले तरी हे मध्यम वर्गीयांना आपल्याकडे सहज आकर्षित करतात. मॅक्डोनाल्ड प्रभृति ' मजूर ' पुढाऱ्यांच्या लोक-प्रियतेचे रहस्य हेच आहे. किंबहुना याच तऱ्हेचा पाठिंबा मुसोलिनी व हिटलर यांनीही बराच मिळविला असे आपल्याला दिसते.

समाजवादाच्या या श्रमजीवी स्वरूपापासून मार्क्सवादाला वेगळे समजले पाहिजे व तो वेगळेपणा यात आहे की ' कामगार वर्गाच्या हातीच राजदंड हवा ' ही गोष्ट मार्क्सने स्पष्ट सांगितली आहे.

राजदंडाचे किंवा या राज्यसंस्थेचे वर्गीय स्वरूप जाहिरनाम्यातच स्पष्टपणे मांडले गेले आहे, व सन १८७१ मधील ' पॅरिस कम्युन 'च्या अल्पजीवी कामगार सत्तेच्या अनुभवानंतर कामगारांच्या क्रांतिकारक शासनसंस्थेची अपरिहार्यता व आवश्यकता मार्क्सने जास्तच प्रगल्भ स्वरूपात मांडली आहे.

खरे पाहाता कामगारांच्या सत्तेचे तत्त्व वर्गयुद्धाच्या मूलभूत तत्त्वापासून सहजच निघते. साऱ्या सामाजिक व्यवहारांत व प्रत्येक सामाजिक अंगो-
 पांगांत धनजीवी वर्ग व श्रमजीवी वर्ग यांचा लढा या नाही त्या स्वरूपात

चालू राहणार, तर राज्यसंस्थेलाच तेवढी या लढ्यापासून अलिप्त मानणे कसे सयुक्तिक ठरते ? जर राज्यसंस्था अशी अलिप्त तर मग इतरही संस्था अशा अलिप्त मानाव्या लागणारच. कलावंताने म्हणावे माझी कला वर्गनिरपेक्ष आहे. न्यायाधीशाने म्हणावे न्यायदेवता वर्गनिरपेक्ष दृष्टीने पाहाते, धर्ममठांनी म्हणावे आम्हाला सर्व माणसे सारखीच ! पण दुर्दैव असे आहे की कला, न्याय, धर्म, नीती व राज्यसंस्था या साऱ्याच गोष्टी वर्गसापेक्ष आहेत ही साधी गोष्ट कलावंतांना, न्यायाधीशांना व अशाच इतर लोकांना दिसेनाशी होते.

अशाच तऱ्हेचा दोष या राज्यसंस्थेच्या बाबतीत श्री. जावडेकरांच्या मतप्रणालीत उत्पन्न झालेला आहे. वर्गविग्रह हा प्राचीन भारतीय संस्कृतीत मूलभूत आहे, व ' हिंदु संस्कृतीचा इतिहास हा वर्गयुद्धाचा इतिहास ' आहे असे ते मानतात. तसेच ब्रिटनविरोधी राष्ट्रीय चळवळींतही वेगवेगळे वर्ग समन्वयाने लढले तरी वर्गविग्रह होताच व तो यापुढेहि अटळ आहे असे ते सांगतात. पण पुढे मात्र म्हणतात, " या वर्गविग्रहात देशातील राजदंड कोणत्या पक्षास राहणार व तो कामकरी-शेतकरी पक्षास अनुकूल करून घ्यावयाचा तर तो कोणत्या साधनांनी बनवितां येईल एवढा प्रश्न आमच्यापुढे आहे." आहे ही राज्यसंस्था, म्हणजे आजचे लष्कर, पोलिस, नोकरशाही, प्रचारखातें वगैरे राजकीय वर्चस्वाची सर्व अंगेउपांगे, वर्गनिरपेक्ष आहेत हा श्री. जावडेकरांचा मूलभूत गृहीतसमज आहे हे ह्या उताऱ्यावरून दिसते. मार्क्सवादी दृष्टीने वर्गनिरपेक्ष राजदंड असूच शकत नाही. उदाहरणार्थ , ब्रिटिशांनी जी सत्ता मुठीत ठेवली होती ती त्यांच्या हातून निघून अधांतरी राहिलेली नाही. सत्तांतर झाले आहे. म्हणजे आज घटकेला सत्तेला पेलणारे कोणी तरी आहेच. मार्क्सच्या जाहिरनाम्यात जे वर्गयुद्धाचे तत्त्व सांगितले आहे त्या तत्त्वानुसार आज जी सत्ता आहे ती हिंदी भांडवलदारांच्या हाती आहे, म्हणजेच तो वर्गसापेक्ष राजदंड आहे. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी जे सत्तादान केले आहे ते आपल्याच भाईबंदांना किंवा भागिदारांना केले आहे, ही गोष्ट खुद्द श्री. जावडेकर अशी मांडतात की " आमच्या देशांतील मुमूर्षु भांडवलदारही त्यांची (ब्रिटन व अमेरिकेच्या धूर्त सावकारी भांडवलदारांची ) भागीदारी पत्करून आपले जीवनमान वाढविण्यास तयार आहेत. " ( नवयुग, दिवाळी अंक १९४७ )

जाहिरनाम्यातील एकदोन ठळक गोष्टींचे विवेचन येथवर आपण केले. वर्गयुद्ध, राज्यसंस्था, राष्ट्रीयत्व वगैरेसंबंधीच्या जाहीरनाम्यातील कल्पनांनी गेल्या शंभर वर्षांत मोठेच कार्य केले आहे. ' कल्पना ' या अमूर्त

भावरूप असल्या तरी त्यांच्यांत प्रचंड शक्ती साठवलेली असते ही गोष्ट मार्क्सने अनेकदा मांडली आहे. पण हे सामर्थ्य येण्यासाठी कल्पनेला देह लाभला पाहिजे असे मानणारा वस्तुवादी तो होता. मार्क्सवादाच्या अनुयायांनी जाहीरनाम्यातील कल्पनाबीजांचा तत्त्वतः तर विस्तार केलाच आहे, शिवाय या कल्पनांना सामाजिक क्रांतीचा व संस्थांचा देह दिला आहे. सोव्हिएत संघराज्य हा या अर्थाने जाहिरनाम्याचा प्रत्यक्ष असा विराट् व सामर्थ्यसंपन्न देह आहे.

मूळ जाहिरनाम्याचे पहिले वाक्य असे आहे की, " कम्युनिझमच्या बागुलबोवाची छाया युरोपवर पसरली आहे. साऱ्या युरोपचे सत्ताधारी या भुताच्याविरूद्ध लढण्यासाठी एक झालेले आहेत. . . . .सत्ताधाऱ्यांना उमगून चुकले आहे की कम्युनिझम ही एक शक्ति आहे. " सत्ताधारी शत्रूंच्या ताकदीची जाणीव आणि स्वतःच्या तत्त्वज्ञानाच्या उज्ज्वल भवितव्याचा विश्वास या वाक्यात दिसून येतो. आज शंभर वर्षांनंतर युरोपच्या भूमीवरच केवळ नव्हे तर कम्युनिझमचा ' बागुलबोवा ' साऱ्या पृथ्वीवर आपली छाया पसरीत आहे. पण आज हा ' बागुलबोवा ' उरला आहे काय ? का आज मानवतेचे तो एक आशास्थान बनला आहे ? चीनमधला शेतकरी व हेन्री वॅलेससारखा शांततावादी जुना मुत्सद्दी आज एकाच आशेने भांडवलदारीच्या जीर्ण परंतु जास्तच क्रूर अशा सत्तेविरुद्ध लढत आहेत. ब्रिटनमधला कामगार व हिंदुस्थानमधले समाजवादी सत्याग्रही, समाजवादी, कम्युनिस्ट, बहुजनसमाजवादी वगैरे पक्षांचे लोक एकाच आशेने नव्या समाजवादी लोकसत्तेच्यासाठी झगडत आहेत. माझ्या मताने या सर्वांना सांधणारी एकमेव आशा व सामाजिक क्रांतीवरील एकनिष्ठ श्रद्धा यांचा मूळ उगम शंभर वर्षापूर्वीच्या त्या छोटचा पुस्तकांत आहे. त्या पुस्तकाचे अंतिम वाक्य आहे, ' जगातील कामगारांनो ! एक व्हा ! गमावण्यासारखे तुमच्याजवळ काय उरले आहे तर बेडचाच ! कमावण्यासारखे मात्र आहे. साऱ्या पृथ्वीचे राज्य ! '

आज ही हाक कामगारांना आहे तशीच इतरांनाही आहे. साऱ्या पृथ्वीचे राज्य बुद्धिजीवी व श्रमजीवी कामगारांच्या हाती तरी येईल किंवा सर्वनाश तरी होईल अशी आणीबाणीची वेळ आली आहे. अशा वेळी गमाविण्यासारखे कोणाजवळ काय उरले आहे किंवा उरणार आहे ? जाहीरनाम्याची हाक आज साऱ्यांना आहे की ' एक व्हा ! मानवाच्या भवितव्यासाठी लढा ! '

# सोव्हिएट सांस्कृतिक पुनर्घटनेची भूमिका

राजकीय प्रचाराच्या मतलबीपणामुळे ‘ संस्कृती ’ या शब्दावर वरेच अवडंबर रचण्यात आले आहे व अहंकाराला चेतविण्यात आले आहे. ख्रिस्ताचे, महंमदाचे व श्रीकृष्णाचे नाव घेऊन व संस्कृति-संरक्षणाची ढाल पुढे करून राजकीय स्वार्थ साधावयाचा, हा कित्येक मुत्सद्द्यांचा शिरस्ता झालेला आहे; पण सारे अवडंबर व अहंकार टाकून संस्कृतीच्या स्वरूपाचा विचार केला म्हणजे दिसते की, व्यक्तीच्या सर्वांगीण जीवनाला व विकासाला आधारभूत अशी आर्थिक, राजकीय, कौटुंबिक, धार्मिक इत्यादी प्रकारच्या सामाजिक संस्थांची जी भूमी प्रत्येक काळांत व देशांत तयार झालेली आढळते, त्या भूमीलाच ‘ संस्कृती ’ ही व्यापक संज्ञा आहे.

नुसत्या “ त्यागप्रवृत्तीवर ” किंवा “ भोगप्रवृत्तीवर ” संस्कृतीची इमारत रचता येते, हा समजच कोता आहे व खोटाही आहे. सामाजिक संस्थांकडे वळूनच आपल्याला कोणत्याहि काळाचे किंवा समाजाचे सांस्कृतिक स्वरूप कळून येईल. हा निष्कर्ष ठामपणे मानला म्हणजेच सोव्हिएत संस्कृतीचे स्वरूप कळण्यासही सोपे जाईल. उलट संस्कृतीचे हे सामाजिक, प्रत्यक्ष व संस्थात्मक अधिष्ठान एकदा सोडले की, दोन दिशांनी विचारांची वाताहात सुरू होते; एका बाजूला सनातनी लोकांना वाटू लागते की, सोव्हिएतमध्ये वस्तुवादी मताची बोलशेव्हिक राजसत्ता असल्यामुळे खाणे, पिणे इत्यादी पशुवृत्तीच्या सुखांची परमावधी गांठणे व बौद्धिक आणि नैतिक मूल्यांकडे हेटाळणीने पाठ फिरविणे हाच सोव्हिएत संस्कृतीचा अर्थ आहे; दुसरीकडे नवमतवादी जहाल वृत्तीच्या लोकांना भासते की, जुन्या सांप्रदायिक व धर्मप्रधान मूल्यांवर विध्वंसक आघात करणे व मनुष्याला आर्थिक गोष्टीकडे खेचून नेणे हेच सोव्हिएत

संस्कृतीचे मुख्य सूत्र आहे. खरी गोष्ट मात्र अशी आहे की, सोव्हिएत समाज व तेथील समाजसत्ता यांना मानवी जीवनाचा निव्वळ आर्थिक किंवा " सुखवादी " उत्कर्ष साधावयाचा नसून सर्वांगीण अभ्युदय–सर्वोदय–साधावयाचा आहे. परंपरागत समाजजीवनात उत्पन्न झालेली पण आजवर व्यवहार्य न ठरलेली ध्येये त्यांना प्रत्यक्ष जीवनात आणावयाची आहेत. समता, न्याय, व्यक्तिविकास ही अशी ध्येये आहेत. त्यांच्या पूर्तीच्या दृष्टीने तेथील सांस्कृतिक पुनर्घटना चालू आहे. याचाच तपशील प्रस्तुत लेखात मी मांडला आहे.

सोव्हिएत युनियनविषयी काही म्हणावयाचे, त्यांतल्या त्यात अनुकूल असे काहीही म्हणावयाचे, म्हणजे प्रश्न येतो की, " या साऱ्या विधानांना पुरावा काय ?" आणि " पुरावे आणि आंकडे " ह्या साक्षीदारांचा स्वभाव सर्वश्रुत आहेच ! भारतीय जीवनाविषयी काळेकुट्ट व अधम वर्णन करणारी मिस मेयो सगळेच पुराव्यानिशी व आकडेवारीने बोलते ! नाझी जर्मनीत किंवा जपानमध्ये बरेच वास्तव्य करून आलेले काही हिंदी गृहस्थ आपल्या " प्रत्यक्ष निरीक्षणा "वरून सांगतात की, नाझी व जपानी राजवटींत सगळी आबादीआबाद होती व जर्मन आणि जपानी कामगार अगदी सुखात होते ! इतके दूर कशाला ? एखाद्या संस्थानामध्ये जाऊन आलेला, (म्हणजे गंमतीच्या सफरीसाठी किंवा कामानिमित्त तेथे राहून आलेला ), एखादा मनुष्य भेटला की सांगू लागतो की, तेथे रेशनचा त्रास कमी आहे, एकंदर लोक इकडल्यापेक्षा जास्त सुखी आहेत, वगैरे. सारांश पुरावे, आकडे, प्रवाशांचे अनुभव किंवा प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेल्या कादंबऱ्या या साक्षीदारांवर भरंवसा ठेवून अनुकूल वा प्रतिकूल मत बनविणे हे कोणत्याच देशाच्या बाबतीत शक्य नसते; त्यात सत्यापेक्षा कल्पनेचा व प्रचाराचा खेळ होण्याचा फार धोका असतो. सोव्हिएतच्या बाबतीत तर हा अगदी हमखास धोका आहे. कारण त्याचे मित्र थोडे व शत्रु प्रबळ अशी स्थिती आहे.

सोव्हिएतसंबंधी विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी सिडने व बिआट्रिस वेब या निःस्पृह, समतोल व कांटेकोर चिकित्सक वृत्तीच्या ग्रंथकारांचे मत ग्राह्य धरताना मात्र वरील सर्व धोका मला वाटत नाही. वेब हे कम्युनिस्ट नव्हते. उलट आपल्याकडील अहिंसावाद्यांप्रमाणे व नेमस्तांप्रमाणे " फेबिअन " प्रवृत्तीचे होते, किंबहुना फेबिअन पंथाचे अध्वर्यूच होते; शिवाय सोव्हिएत युनिअनमध्ये जाऊन व अक्षरशः सहस्रावधि कागदोपत्रांतून व प्रत्यक्ष निरीक्षणांतून मिळविलेल्या माहितीवरच त्यांनी " सोव्हिएत कम्युनिझम " हा प्रमाणग्रंथ लिहिला आहे.

त्यांनी सोव्हिएत संस्कृतीबद्दल काढलेला निष्कर्ष त्यांच्याच शब्दांत प्रथम देतो. तो असा :

" आतापर्यंत सोव्हिएत कम्युनिझमची वेगवेगळी वैशिष्टचे आपण तपासली. ही सर्व वैशिष्टचे एकत्र पाहिली म्हणजे एक स्वतंत्रच अशी समाजव्यवस्था आपल्यासमोर दिसू लागते, व असे दिसते की, एकीकडे पाश्चात्य संस्कृतीमध्ये बजबजपुरी माजली आहे, तर या व्यवस्थेचे स्वरूप एकात्म आहे. सामाजिक नियंत्रणामध्ये व व्यवहारामध्ये अनेकविधता राखून त्यांत सर्वच नागरिकांनी प्रत्यक्ष हातभार लावण्याची पद्धती हा सोव्हिएत व्यवस्थेचा विशेष आहे. यामुळेच सामाजिक समतेच्या पायावर उभारलेल्या समाजजीवनासाठी मन लावून काम करणे हा प्रत्येक माणसापुढील वागणुकीचा आदर्श आहे व यांतच प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याची व बुद्धिकौशल्याची जास्तीत जास्त वाढ होण्याचाही मार्ग आहे; तसेच वरील विशेषांशी पूर्णतः सुसंगत म्हणून एकाने दुसऱ्याच्या श्रमावर जगण्याला व नफ्याच्या आशेने काही करण्याला सपशेल मनाई करण्यात आलेली आहे.

" बाह्य विश्वाविषयी व मानवी मनाविषयी जे जे ज्ञान उपलब्ध आहे ते प्रत्येक नागरिकाला माहीत करून देण्यावर तेथे संपूर्ण भर देण्यात येतो. कारण या ज्ञानदानाचा परिणाम चांगलाच होईल अशी त्यांची श्रद्धा आहे व याच पायावर तेथील आर्थिक व राजकीय संस्था, तसेच नैतिक आचरणाचे शास्त्र उभारलेले आहे. मृत्युलोकापलीकडच्या पारलौकिकावर अवलंबून असणारी गूढवादी श्रद्धा व कल्पनेवर आधारलेली पारलौकिक सृष्टी त्यांना अमान्य आहे व सर्वांचा पाया " डायलेक्टिक्स "-च्या ( मार्क्सप्रणीत स्वयंगतिशील-वस्तुवादाच्या ) आधाराने चालणारे हे शास्त्रज्ञान आहे. ईश्वरभक्तीच्या जागी मानवधर्माची स्थापना त्यांनी केली आहे. " ( पृ. ११३८ )

वरील उताऱ्यामध्यें सोव्हिएत संस्कृतीची मूलभत प्रमेये, श्रद्धा व प्रेरणा वेब यांनी मांडलेल्या आहेत. याच संस्कृतीच्या अनुरोधाने गेल्या तीस वर्षात तेथील सामान्य माणसाचे नुसते बाह्य जीवनच नव्हे तर त्याची मानसिक अंत:सृष्टीही पालटली आहे.

सोव्हिएत क्रांतीमुळे झालेल्या पालटांपैकी सर्वांत महत्त्वाची गोष्ट आपण घेऊ. ती म्हणजे जुन्या एकाकी, आक्रमक, समाजविरोधी व्यक्तिवादाचा नाश व नव्या समाजनिष्ठ व्यक्तिवादाचा उदय.

आपल्या भारतीय मनाला या नव्या व्यक्तिवादाचे आकलन नीट होण्यासाठी आपण दोन गोष्टींचे कसोशीने व स्पष्टपणाने ज्ञान करून 

घेतले पाहिजे : ( १ ) भांडवलदारी समाजव्यवस्थेच्या आधी युरोपातही नांदलेले व पौर्वात्य देशांत " परंपरागत " म्हणून प्राचीन काळापासून चालत आलेले जीवन व्यक्तिवादाला कसे पारखे होते ते ध्यानात घेतले पाहिजे, आणि ( २ ) व्यक्तिवादाला पारखे असणाऱ्या त्या मध्ययुगीन जीवनातून फ्रेंच क्रांतिकालात ( म्हणजे भांडवलदारीच्या उदयकालात ) नव्याने उगम पावलेला व्यक्तिवाद हा कसा आक्रमक व समाजविरोधी होता हेही नीट उमगून घेतले पाहिजे.

गेल्या शेदीडशे वर्षांत, परंपरागत जीवनाला चिकटून राहणारे सनातनी व नव्या भांडवलदारी व्यक्तिवादाला कवटाळणारे सुधारक व नवमतवादी यांचा लढा हिंदी सुशिक्षितांच्या घरीदारीही झाला आहे, व तो चालूच आहे. परंतु या लढ्यामध्ये परंपरागत जीवनात व्यक्ति-स्वातंत्र्याचा अभाव किती व कसा होता याचेही नीट आकलन आपल्याला झालेले नाही व नव्या व्यक्तिवादाचे आक्रमक व समाजविरोधी स्वरूपही बाहेर आलेले नाही. त्यामुळे सोव्हिएतमधील नव्या समाजनिष्ठ व्यक्ति-वादाचे महत्त्व कळणे तर दूरच, पण त्याचे स्वरूपही आपल्याला उमगेनासे झाले आहे.

सनातनी समाजरचना, आक्रमक व्यक्तिवाद व सोव्हिएतचा व्यक्ति-वाद या तीन वेगवेगळ्या व परस्परभिन्न गोष्टी आहेत. हीच गोष्ट एका उदाहरणाच्या साहाय्याने पाहू. सनातनी युगातला एक महापुरुष म्हणून भीष्माचार्यांचे उदाहरण घेऊ. त्यांना कौरवांचा पक्ष असत्-पक्ष आहे हे नीट ठाऊक होते; परंतु " अर्था "ने, म्हणजे कर्तव्यपरायणतेमुळे, बांधले गेल्यामुळे कौरवांच्या सैन्याचे सेनापतीत्व त्यांनी केले व हे " प्राप्त कर्तव्य " करीत असताना मरण पत्करले. उलट, भांडवलदारी युगांतला आदर्श सेनापती म्हणून क्लाइव्ह, नेपोलियन, टोजो वगैरे लोकांची नावे देता येतील. आपल्या स्वत:चे किंवा राष्ट्राचे स्वार्थपूर्ण व राक्षसी लालसेने भरलेले हित साधण्यासाठी या सेनापतींनी सारे बुद्धिकौशल्य खर्च केले. या दोन्ही प्रेरणांपेक्षा सोव्हिएत व्यक्तिवादाची प्रेरणा वेगळी आहे. सोव्हिएत सैन्यामध्ये जर्मन, बल्गेरियन वगैरे राष्ट्रांतील सैनिकही आपापल्या राष्ट्रांच्या आक्रमक फॅसिस्ट सैन्याविरुद्ध लढण्यासाठी सामील झाले. ते का ? तर सोव्हिएत सैन्य केवळ " प्राप्त कर्तव्याच्या " सनातनी प्रेरणेने लढत नव्हते व आक्रमक राष्ट्रवादाच्या प्रेरणेनेही लढत नव्हते. एका नव्या जाणीवेने—मानवी बंधुत्वाच्या प्रेरणेने ते लढत होते. स्पॅनिश लोकसत्ताकासाठी लढणाऱ्या बहुराष्ट्रीय ब्रिगेडप्रमाणे सोव्हिएत सैन्यांतही नव्या बंधुभावनेची प्रेरणा होती. नव्या सोव्हिएत व्यक्तिवादाचे स्वरूप

समाजनिष्ठ आहे याचा अर्थही याच प्रेरणेने स्पष्ट होतो.

या नव्या सोव्हिएत व्यक्तिवादाचे स्पष्ट स्वरूप तेथील राष्ट्रीय जागृतीच्या अनेकविधतेत दिसून येते. झारकालीन एकछत्री साम्राज्यात त्या खंडप्राय प्रदेशातील अनेक राष्ट्रांचे व्यक्तित्व नष्टप्रायच होते. एखाद्या अविभक्त कुटुंबामध्ये कर्ता पुरुष जर अरेराव असला तर जी स्थिती होते तीच तेव्हाच्या समाजाची होती. पण क्रांतीनंतर युक्रेनसारख्या प्रगल्भ राष्ट्रापासून तो ताजिकांच्या छोट्या व मागासलेल्या राष्ट्रांपर्यंत सर्वांचेच वेगवेगळे राष्ट्रीय व्यक्तित्व उदयास आले व वाढीला लागले. परंतु समजा, हे व्यक्तित्व आक्रमक स्वरूपाचे असते तर ? युक्रेन व रशिया आणि उजबेग व ताजिक हे नवे राष्ट्रीय लोकसमूह यांच्यात यादवी होऊन पंजाबच्या हत्याकांडापेक्षा भयानक प्रकार झाले असते, किंबहुना असेच प्रकार झारकालीन राजवटीत घडत किंवा मुद्दामच घडविले जात.

जसे व्यक्तीचे अनाक्रमक वैशिष्टच सोव्हिएतमध्ये उदयाला आले तसेच सोव्हिएत राष्ट्रांचेही अनाक्रमक राष्ट्रीयत्व उदयाला आले. सोव्हिएत व्यक्ती सहजपणे समाजनिष्ठ आहे, त्याप्रमाणे ही राष्ट्रे आपखुषीने युनियनमध्ये ( संघराज्यात ) सामील आहेत, व त्यांची मूळ प्रेरणाही अनाक्रमक अशी आहे.

पण भारतीय मनाला असे वाटते की, संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार असून फुटून न निघणारी राष्ट्रे तर "बनावट" असली पाहिजेत, किंवा तो अधिकार तरी पोकळ असला पाहिजे. याचे कारण असे की, आजपर्यंत राष्ट्रवाद म्हटला की इंग्लंड, फ्रान्स इत्यादी आक्रमक राष्ट्रांचा राष्ट्रवादच आपल्या डोळ्यांसमोर येतो, व त्याच साच्यामध्ये घालून आपण सोव्हिएत राष्ट्रांच्या राष्ट्रवादाचेही मोजमाप करायला जातो.

सोव्हिएतचा नवा व्यक्तिवाद समाजनिष्ठ आहे, असे पक्के ध्यानात ठेवले की विवाहसंस्था, कुटुंबसंस्था वगैरे सांस्कृतिक संस्थांची पुनर्घटना कोणत्या तत्त्वांना अनुसरून तेथे झाली ते समजणे अवघड नाही. स्वैराचाराच्या पायावर सोव्हिएत समाजच काय, परंतु कोणताच, अतिप्राचीन रानटी समाजही, टिकू शकत नाही, तेव्हा सोव्हिएतमध्ये स्वैराचारच आहे हे मत वेडगळपणाचे किंवा मेयोमावशीच्या धाटणीचे आहे. म्हणून त्याचा विचारच नको. पण मग तेथे "पुनर्घटना" अशी काय झाली ? याचे साधे उत्तर असे की, स्त्रीला एक स्वतंत्र, वैशिष्टचपूर्ण व समाजनिष्ठ व्यक्ति मानून विवाहादि बाबीत नवे कायदे व नवी अलिखित नीतिमत्ता तेथे अंमलात आली आहे. स्त्रीला स्वतंत्र मानल्यामुळे घटस्फोटाचा कायदा तेथे करण्यात आला, तिच्या वैशिष्ट्याला ( स्त्रीत्वाला ) 

मान्यता देऊन मातृत्वाच्या कार्यांत समाजाकडून सर्वतोपरी मदत करण्याचे ठरले. तिच्या व्यक्तित्वाला स्वैर न मानता समाजनिष्ठ मानल्यामुळे अपत्यसंगोपन व समाजातले इतर कार्य यांचा समन्वय घालण्यात आला. सारांश, तेथील घटस्फोटाच्या कायद्यामुळे व शिशुसंगोपनाच्या जबाबदारीत सरकारने केलेल्या मदतीमुळे सोव्हिएत स्त्री स्वैर झाली नसून समाजनिष्ठही आहे व कुटुंबनिष्ठहि आहे. राष्ट्रीयत्वाच्या बाबतीत भारतीय मनाची आकलनाची जी अडचण आहे तीच या बाबतीतही आहे. आपला समाज परंपरेच्या दृष्टीने पुरुषप्रधान आहे व त्यावर पाश्चात्यांच्या स्वैर व आक्रमक व्यक्तिवादाचे रोगट कलम लागल्याने कित्येक स्त्रियांच्या व्यक्तित्वाला व स्वातंत्र्याला स्वैराचाराचे घातुक रूप आले. त्यामुळे आमच्या दृष्टीला अशी कावीळ झाली आहे की, गृहाबाहेरच्या क्षेत्रांत पाऊल टाकणे जर स्त्रीला शक्य झाले तर तिचे व्यक्तित्व प्रगल्भ न होता स्वैरच होईल. या काविळीमुळे स्त्रीला स्वतंत्र व समाजनिष्ठ व्यक्तित्व लाभण्यासाठी सोव्हिएत समाजात होणारा भगीरथ प्रयत्न म्हणजे सुखलोलुप स्वैराचाराची कायदेशीर सोय आहे, असे आपल्यापैकी अनेकांना वाटू लागले आहे.

नव्या स्वतंत्र राष्ट्रांचे राष्ट्रीय जीवन, नव्या स्वतंत्र स्त्रीचे स्त्री-जीवन अशा अनेकविध स्वतंत्र प्रवाहांनी किंवा सूत्रांनी एकवटून सोव्हिएतच्या सांस्कृतिक जीवनाचा महानद बनविला आहे. स्वतंत्र तऱ्हेने व आपापल्या वैयक्तिक लकबीप्रमाणे व कलाप्रमाणे तेथील साहित्यिक वाङमय लिहीत आहेत, चित्रकार चित्रे काढीत आहेत व दिग्दर्शक चित्रपट निर्मीत आहेत. चित्रपटाचे उदाहरण घेतले तर असे म्हणता येईल की, हॉलिवुडमधून निघणाऱ्या चित्रपटामध्ये जो एकसारखेपणा असतो तो सोव्हिएत चित्रपटात नसतो. याचे कारण देताना एक पाश्चात्य तज्ज्ञ म्हणतो की सोव्हिएतमध्ये प्रत्येक दिग्दर्शकाला आपल्या विशिष्ट वैयक्तिक पद्धतीनेच चित्रपट हाताळण्यास उत्तेजन देण्यात येते व प्रयोगांना संधी मिळते; उलट हॉलिवुडच्या निर्मात्यांपुढे "बॉक्स"ची लोभदृष्टी असल्याने दिग्दर्शकावरही त्याचे दडपण येऊन सर्व चित्रपट एकसारखे एका साच्यातले बनू लागतात. हिंदी चित्रपटांच्या निर्मितीत दिग्दर्शकांची ही अर्थवशता आपण सर्व पाहतोच.

कलात्मक निर्मितीमध्ये व्यक्तित्वाला असा स्वतंत्रपणा द्यावाच लागतो व तसा तो सोव्हिएतमध्ये मिळतो. पण शास्त्रीय व तात्त्विक बाबतीत तेथील संशोधनावर मार्क्सवादाची "हुकमत" आहेच, असा कांही लोकांचा

* "न्यू सोव्हिएत थिएटर" व "ॲक्टर्स ॲक्रॉस दि व्होल्गा" या ग्रंथाचे लेखक मि. जोफेस मॅक्लिऑड

समज आहे; पण वस्तुस्थिती मात्र तशी नाही. उदाहरणार्थ, संततिबीजशास्त्राच्या ( जेनेटिक्स ) बाबतीत ज्या सोव्हिएत शास्त्रज्ञांचे कार्य चालले आहे त्यांच्यात दोन स्पष्ट व विरोधी तट पडलेले आहेत. लायसेन्को व वाव्हिलॉव्ह यांच्या विरोधी नेतृत्वांखाली या शास्त्रातील संशोधन तेथे चालू आहे. यांपैकी लायसेन्को यांचा पक्ष मार्क्सच्या स्वयंगतिशील ( डायलेक्टिकल ) वस्तुवादाशी सुसंगत आहे व वाव्हिलॉव्हचा पक्ष जुन्या सिद्धान्ताना धरून आहे, असा तेथील वादविवादांचा निष्कर्ष समजण्यात येतो. ते काहीही असले तरी या दोन्ही पक्षांचे शास्त्रज्ञ सोव्हिएत सरकारच्या मदतीने, सारख्याच सन्मानाने व निर्वेधपणे, आपापले काम करीत आहेत; इतकेच नव्हे तर आपापली मते निर्भीडपणे व उघडपणे मांडीत आहेत. मार्क्सवादी समजल्या जाणाऱ्या पक्षावर सरकारची पक्षपाती मेहेरबानी आहे व दुसऱ्या पक्षाला कोठलेही दडपण सोसावे लागत आहे असे आढळत नाही. याचा अर्थ हा की, सोव्हिएतच्या सांस्कृतिक पुनर्घटनेचे व ज्ञानसंशोधनाचे कार्य कोत्या सांप्रदायिकतेच्या आंधळ्या पद्धतीने चाललेले नसून व्यापक अधिष्ठानावर ते उभारले जात आहे.

वरील विवेचन वाचून बऱ्याच जणांच्या मनात येईल की, सोव्हिएत व्यक्तिवादाचे जे सूत्र मी सांगत आहे ते काही तरी " काल्पनिक " आहे. त्यांच्या मनात येईल की, आजपर्यंत आपण तर ऐकत होतो कीं, सोव्हिएत संस्कृतीचा आत्मा " समता " हा आहे. " समता " हे व्यक्तिवादाशी न जुळणारे तत्त्व नाही का ?

माझ्या मते समता व व्यक्तिवाद यांचा विरोध आहे तो आजवरच्या प्राचीन व आधुनिक भांडवलदारी संस्कृतीतला आहे. कारण या दोन्ही संस्कृतींत थोडया लोकांचा-वरिष्ठ वर्गांचा-व्यक्तिवादच पोसला जाणे शक्य होते. हा व्यक्तिवादही त्यामुळे आक्रमक, समाजविरोधी व समतेला घातक होता. परंतु समाजनिष्ठ व्यक्तिवाद आक्रमक नसल्यामुळे समतेला घातक नसतो, उलट समतेचा तो आधारच असतो. समता कोणाची ? तर वैशिष्टचहीन, कीटकप्राय, एकसारख्या मानवपशूंची समता असूच शकत नाही. समतेसाठीच भिन्न प्रकृतीच्या व्यक्तींचे सहकार्यासाठी एकत्र जीवन आवश्यक असते. नेमकी हीच गोष्ट सोव्हिएत संस्कृतीने बरीच साधली आहे व त्याच दिशेने तेथील सांस्कृतिक पुनर्घटना चालू आहे. उदाहरणार्थ, तेथील शैक्षणिक पुनर्घटना घ्या. नुसती साक्षरता व शास्त्रीय ज्ञानाचा जनतेत प्रसार करणे, हे कार्य तर प्राथमिक म्हणून झालेच; पण खरे शिक्षण हे त्याहून पुढचे व वेगळे आहे. या शिक्षणाचा उद्देश व फल काय ? तर नुसता सुशिक्षित नागरिक निर्माण करणे हे 

तेथील ध्येय नाही. प्रत्येक नागरिकाला एका नव्या समताप्रधान समाजाचा घटक बनविणे व त्याच्यामध्ये इतर सोव्हिएत नागरिकांबद्दल जिव्हाळा व बंधुभाव निर्माण करणे, हे या सोव्हिएत शिक्षणाचे फळ आहे. या शिक्षणामुळे आपल्या देशातील व बाहेरच्या देशांतील अनेकविध लोकांबद्दल सोव्हिएत नागरिकांत जे ज्ञान व आपलेपणा आढळतो तो ब्रिटन, अमेरिका, जपान इत्यादी देशांतील नागरिकांतही आढळत नाही.

अनेकविधतेची जाणीव व सर्वांबद्दल आदर ही सोव्हएत नागरिकाची भूमिका व अंतःकरणाची ठेवणच झाली आहे, ही गोष्ट अनेक निरीक्षकांच्या नजरेस आली आहे, व समतेचा हाच वास्तविक अर्थ आहे.

सोव्हिएत नागरिकाची समतेची भावना ही कोणत्या वास्तविक व भक्कम पायावर आधारलेली आहे हे दर्शविणारी एक घटना या महायुद्धाच्या शेवटी घडली. सन १९४५ मध्ये जेव्हा सोव्हिएत सैन्य बर्लिनच्याजवळ पोचले होते त्या वेळी एऱ्हेनबुर्ग या प्रमुख सोव्हिएत लेखकाने एका लेखांत असे म्हटले की; जर्मनीने केलेल्या अत्याचाराचा बदला घेण्यासाठी आम्ही जात आहोत. सोव्हिएत भूमीवर नाझींनी केलेल्या अत्याचारांपुढे पंजाबचे हत्याकांड व पाशवीपणाही माणुसकीचे वर्तन ठरेल. तेव्हां नाझींच्या विरुद्ध केवढा त्वेष रशियन माणसाला वाटत असेल याची कल्पनाच केलेली बरी ! अशा पाशवी आक्रमकांविरुद्ध विजय मिळवीत असताना सूड घेण्याची भावना मनात येणे स्वाभाविक होते. एऱ्हेनबुर्गच्या उद्गारात ती भावना उघड झाली एवढेच ! पण सोव्हिएत संस्कृतीचे वैशिष्टच त्या उद्गारात नसून पुढील घटनेत आहे. एऱ्हेनबुर्गच्या लेखावर अनेक प्रख्यात लेखकांनी, साध्या सैनिकांनी व नागरिकांनी ताबडतोब टीका केली, व असे मांडले की, जर्मनांचा सूड घेण्याची भावना साहजिक असली तरी चूक आहे. जर्मन लोक आक्रमणाला व अत्याचाराला जबाबदार नसून ती जबाबदारी फक्त नाझी सत्ताधाऱ्यांवर व जर्मन कोटचाधीशांवर आहे. कारण त्यांनीच नाझीवादाचा राक्षस पोसला आहे. एऱ्हेन्बुर्ग हा सोव्हिएत लेखकांतील प्रमुख व सर्वांत लोकप्रिय असा कलावंत असूनही त्याच्यावर सगळीकडून टीकेचा भडिमार झाला व त्यांत शेवटी असा निष्कर्ष निघाला की, सूडाची घोषणा चुकीची आहे.

एऱ्हेन्बुर्गची अशा तऱ्हेने जी कानउघडणी झाली तिच्यामागे सोव्हिएत नागरिकांची सांस्कृतिक भूमिका आहे; याच भूमिकेमुळे जर्मनी, ऑस्ट्रिया व बाल्कन देश व्यापणारे सोव्हिएत सैन्य स्थानिक जनतेशी वरचढपणे किंवा सूड घेण्याच्या भावनेने वागले नाही. उलट सोव्हिएत सैनिकांची वागणूक संयमाची व जित जनतेशी समतेच्या भावनेने प्रेरित अशी होती,

अशी ग्वाही अनेकांनी दिलेली आहे. सोव्हिएतविरोधी प्रचारकांनाही सैनिकांच्या अत्याचारांच्या बातम्या रंगविता आल्या नाहीत, यावरून वरील गोष्ट उघड होते.

विजयी व त्यातल्या त्यात आक्रमकांना पराभूत करणारे प्रबळ सैन्य परदेशात कसे वागते यावरून त्या सैन्याच्या व त्या समाजाच्या संस्कृतीची नीट ओळख होते. या कसोटीने पाहिले तर सोव्हिएत नागरिकांच्या मनाची स्थिती अजमावून असे म्हणता येईल की, झारशाहीच्या काळातील रानवट रशियन सैनिकांच्या जागी संयमी असा नवा सैनिक आज तेथे उत्पन्न झाला आहे. या पालटाचे श्रेय सोव्हिएतच्या नव्या संस्कृतीला व ध्येयवादाला द्यावे लागेल.

सारांश, सोव्हिएत संस्कृतीच्या पुनर्घटनेचें सूत्र म्हणून सांगावयाचे तर तेथील समाजनिष्ठ व्यक्तिवाद व समतेची भावना हेच सांगता येईल. या सूत्राला अनुसरून तेथे अनेक राष्ट्रांचा उदय झालेला व एकंदर समाजाचा अभ्युदय झालेला दिसत आहे. पण अजूनही पुष्कळ प्रगती व्हायची आहे. या प्रगतीविषयी खात्री वाटते याचे कारण साध्या श्रमजीवी माणसांनी व बुद्धिजीवींनी तेथील पुनर्घटनेचे हे कार्य हाती घेतले आहे. आजपर्यंतचा मानवेतिहास पाहिला तर दिसते की, मूठभर धनजीवी व सत्ताजीवी लोकांनी स्वतःला सुसंस्कृत बनविण्याचा यत्न केला व इतरांना सुधारण्याचे प्रयत्न केले. त्यांनी अनेक मूल्ये निर्माण केली हे खरे; पण त्यांचे प्रयत्न खरेखुरे यशस्वी होणे अशक्यच होते. उलट असे घडत गेले की, आर्य, मुस्लिम, ख्रिश्चन, पाश्चात्य इत्यादि संस्कृतींच्या निर्मात्यांनी आपआपल्या श्रेष्ठत्वाच्या दुरभिमानाने अनेकवेळी दुष्कृत्येच केली. तो दीर्घ परंतु रक्तपाती इतिहास संपून मानवी संस्कृतीच्या पुनर्घटनेचा काळ आज सोव्हिएतमध्ये सुरू झाला आहे, असे बेबसारख्या अनेक ग्रंथकारांचे मत आहे. सोव्हिएत संस्कृति ही मूलतः "सोव्हिएत रशियाची" नसून जगातील सर्वच सामान्य माणसांची संस्कृती आहे. तिच्यात जुन्या सांस्कृतिक मूल्यांचा समावेश व त्यांच्या साफल्याची प्रत्यक्ष सामाजिक शक्यता आहे, हाच या ग्रंथकारांच्या आशावादाचा एकमेव आधार आहे. त्याच अनुरोधाने सोव्हिएत सांस्कृतिक पुनर्घटनेचे सूत्र सांगण्याचा हा प्रयत्न मी केला आहे.

# कम्यूनिझमलाच यशाची हमी

इतर देशातल्या सामान्य जनतेपेक्षा आपण हिंदुस्थानातले कारकून, शिक्षक, डॉक्टर, वकील, कामगार, शेतकरी, शेतमजूर, इत्यादि सामान्य लोक फारसे वेगळे नाही. सामान्य जनतेच्या अपेक्षाही सगळीकडे एकच आहेत. त्या अपेक्षा साध्या व स्पष्ट आहेत.

आज लोकांची अपेक्षा अशी आहे की, विज्ञानामुळे जे राहणीचे मान सर्वांनाच लाभू शकेल ते मान सर्वांना लाभावे. देशाची आणि जगाची अर्थव्यवस्था कुबेरांच्या नफेबाजीसाठी चालण्याऐवजी जास्तीत जास्त उत्पादनाच्या दृष्टीने नियोजित व्हावी. अशा नियोजनासाठी प्रत्येक देशातील अर्थव्यवस्था व राज्यकारभार लोकांनी प्रत्यक्ष चालवावा. सारांश, लोकांच्या सुखासाठी स्वतंत्र व समान अशा सर्व देशांची एक जागतिक कुटुंबसंघटना व्हावी. आर्थिक मंदी, बेकारी, अंतर्गत युद्धे व महायुद्धे यांची पुन: पुन्हा ओढवणारी संकटपरंपरा एकदा कायमची नष्ट व्हावी, यासाठीच धनिकशाही नष्ट व्हावी.

हिंदी जनतेची अपेक्षा तरी दुसरी काय होती ? व आज तरी सामान्य लोकांना आणखी काय हवे आहे ?

इंग्रजांनी सत्तेचा राजदंड नेहरू-पटेल सरकारच्या हाती दिला व या घटनेचे जनतेने मोठ्या उत्साहाने स्वागत केले खरे; पण खरा प्रश्न आहे तो लोकांच्या प्रासंगिक उत्साहाचा व भावुकतेचा नसून लोकांच्या दीर्घकालीन अपेक्षांचा आहे. त्या अपेक्षा सत्तांतराच्या आधी व नंतरही कायम आहेत. त्या साध्या स्पष्ट आहेत. सगळी सोंगे आणता येतात त्यात सत्तेचे म्हणजे स्थिर व लोकविश्वासपात्र सत्तेचे सोंगही आणता येते. पण सोंगे आणून लोकांच्या साध्या अपेक्षा मात्र पुऱ्या करता येत नाहीत. साहजिकच ही

सोंगेही टिकू शकत नाहीत, पण ती टिकवण्याचा प्रयत्न सत्ताधारी करतातच.

लोकांच्या अपेक्षा पुऱ्या न करता टिकू पाहणारे सरकार हे अर्थातच दोन मार्ग पत्करते : एक उघड दडपशाहीचा व दुसरा उघड फसवणुकीचा. आपल्या अपेक्षा व मागण्या पुऱ्या करून घेण्यासाठी लोकांनी तोंड उघडले, हातपाय हलवले किंवा संघटन केले की, वृत्तपत्रे, सभा, मिरवणुका, वगैरे सर्वांवर बंदीहुकूम बजावणे आणि लोकांना संघटित करू पाहणाऱ्या पक्षांना व व्यक्तींना चिरडून टाकणे व परकीय सत्तेचे हेर म्हणून बदनाम करणे, ही उघड दडपशाही सत्तेला करावी लागते; दुसरीकडे सरकारला स्वत:च एक बुरखा घ्यावा लागतो. तो बुरखा किंवा मुखवटा समाजवादाचा. रामाचे रूप घेऊन येणाऱ्या रावणाप्रमाणे जनतेला फसविण्यासाठी ही 'माया' आज सगळया देशांतील सत्ताधारी वापरीत आहेत. हिटलर व चँग-कै-शेक यांनी देखील समाजवादी कार्यक्रमावर निवडणुकी लढवल्या, मे-दिनाचे उत्सव साजरे केले, भांडवलदारांना फाशी देण्याच्या वल्गना केल्या व जगभर शांतता नांदविण्यासाठीच आमचे सारे प्रयत्न आहेत असे घोषित केले. पाच, दहा, वीस वर्षे ह्या मुखवटयाचा रंग टिकला, पण सोंग ते सोंगच. पण हे समाजवादाचे व जनहितैक बुद्धीचे सोंग करणे सरकारला भाग मात्र पडते.

## सरकारचे बांधलेले हात

लोकांच्या अपेक्षा स्पष्ट आहेत., पुऱ्या करता येणाऱ्या आहेत व त्यात गूढ किंवा कोडे असे काहीच नाही. बरे ! सरकार म्हणजे तर सर्वशक्तिमान राजदंडच. लोकांच्या अपेक्षा पुऱ्या करण्याची सदिच्छा जर सत्ताधारी व्यक्तींच्या मनात असली तर त्यांना अशक्य असे काय आहे? या व्यक्तींच्याकडे पाहावे तर राष्ट्रासाठी वर्षानुवर्षे धडपडणारे कर्तृत्ववान पुरुषच सत्तेच्या सिंहासनावर बसलेले आढळतात. मग बिनसते कोठे ? चुकते कोणाचे ? स्वकीयांचा पाठींबा व अमेरिकेकडून अव्याहत अब्जोगणती मदत मिळूनही चीनचा भव्य राष्ट्रपुरुष चँग-कै-शेक का कोसळला ? सन्यतसेनच्या या वारसदाराचा असा भीषण अध:पात का झाला ?

या घटनेचे काही लोकांना मोठे गूढ वाटते व कोडे वाटते. सत्ताधारी व्यक्ती दडपशाहीचा व समाजवादाच्या सोंगाचा अवलंब करतात, पण उलट पावले टाकून जनतेच्या अपेक्षाच सरळ पुऱ्या का करीत नाहीत ? जो सोपा, साधा व स्पष्ट मार्ग तो स्वीकारण्याच्या ऐवजी क्रूर वंचनेचा मार्ग का चोखाळतात? याचेच या लोकांना कोडे वाटते. जमीनवाटप, उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण, सोव्हिएटशी मैत्री ह्या मार्गांनी कम्युनिस्ट पक्ष जर जनतेचा पाठिंबा मिळवतो तर त्याच मार्गाने जाणे चँग-कै-शेकला का अशक्य वाटले ?

या प्रश्नांची उत्तरे आज सामान्य मनुष्यही मनातून किंवा जाहीरपणे विचारीत आहे.

या साऱ्या प्रश्नमालिकेचे थोडक्यात उत्तर आहे, ते असे की, व्यक्तींचे जरी सरकार बनले असले तरी सरकार किंवा राज्य ही काही चार-दोन व्यक्तींच्या खासगी चारित्र्याची, सदिच्छांची व स्वप्नांची बाब नाही. राज्य हे नुसते सिंहासन किंवा नुसता राजदंड नाही; ती एक सामाजिक संस्था आहे. व्यक्तींच्या बऱ्यावाईट इच्छांवरची त्यांना वरचढ ठरणारी ती संस्था आहे. राज्य म्हणजे राजदंड खराच; पण तो एकाद्या पहारेकऱ्यासारखा आहे. या पहारेकऱ्यानें काय करावयाचे असते? तर साऱ्या समाजाने काय करावे हे ठरविणाऱ्या वर्गाचा गाडदीपणा या पहारेकऱ्याकडे असतो. सारांश, समाजातला जो वर्ग, किंवा जे दोनतीन वर्ग, सामाजिक उत्पादनाचे धनी असतात त्यांच्याच धनाची, मालकी हक्कांची व आर्थिक सत्तेची मिरासदारी टिकवण्याचे काम या पहारेकऱ्याला या धनिकांनीच नेमून दिलेले असते.

याचाच अर्थ असा की, सरकार सर्वशक्तिमान असते ते सर्वशक्तिमान धनिकांचा गाडदी म्हणूनच. पण तोच सरकार नावाचा दंडधारी पुरुष आपल्या मालकाशी मात्र केवळ स्वामिनिष्ठेने नम्र असतो. थोडक्यात म्हणजे सारा समाज सोन्याच्या साखळीने बांधलेला आहे, तसेच व त्याच साखळीने 'सरकार' चे हातहि बांधलेले असतात. तसेच ज्याला कळत व नकळत हे बंधन नको असेल त्याला 'सरकारा'त स्थान नसते.

आता पुन्हा एकदा जनतेच्या अपेक्षांकडे आपण वळू. हिंदुस्थानच्या पुरतेच पाहिले तर जनतेच्या आज अपुऱ्या राहिलेल्या सर्व अपेक्षांची पुढील तीन सदरांत वर्गवारी होईल.

यात निव्वळ पोटभर अन्न व अंगभर कपडा यावरोबरच आणखी अनेक गोष्टींचा समावेश होतो. घरटंचाई, महागलेले शिक्षण, वाढती बेकारी तुटपुंजी आरोग्यव्यवस्था, इत्यादि अनेक गरजांनी आज आपणाला वेढले आहे. आज विज्ञानाची खूपच प्रगती झाली आहे व करणे शक्य आहे. लोक श्रमाला तयार आहेत. पोट बांधून काम करायला व पुढच्या आशेने आज शक्तीबाहेर खपायलाही लोक तयार आहेत. सोव्हिएट युनियनच्या प्रजेने नाही का असे श्रम केले? युद्धकाळात इंग्लिश समाज नाही का राबला? सर्व गोष्टींची टंचाई या समाजांनी सहन केली. वरून बॉम्बस्चा वर्षाव होत होता तरी कारखान्यांत बायकांनी यंत्रे चालवली. तेच धैर्य व सहनशक्ती हिंदच्या स्त्री-पुरुषांत आहे. पण, त्यांना एक विश्वास व हमी पाहिजे. आमच्या श्रमांतून निर्माण झालेल्या संपत्तीतून एकीकडे बँकेतल्या रकमांत भर पडावी व

दुसरीकडे बेकारीत भर पडावी असा प्रकार त्यांना आज येथेही दिसत आहे, व अमेरिकेसारख्या तथाकथित सुखी देशांतही घडताना दिसत आहे. हा प्रकार थांबला तर खऱ्या सामाजिक सुखासाठी आज जास्त राबायला लोक तयार आहेत. लोकांची अन्न-वस्त्राची, म्हणजेच सुखी, समृद्ध जीवनाची, अपेक्षा ती हीच.

स्वयंनिर्णय ही अपेक्षादेखील अगदी साधी व स्पष्ट आहे. हिंदुस्थानच्या आंतरराष्ट्रीय व अंतर्गत अशा दोन्ही व्यवहारांत लोकांना एकच तत्त्व प्रत्यक्ष अमलात यायला हवे आहे, ते म्हणजे स्वयंनिर्णयाचे. लोकांना आज ब्रिटन, अमेरिका, इत्यादि देशांतल्या जनतेशी वैर करावयाचे तर नाहीच, उलट सख्य हवे आहे. तसेच सख्य त्यांना सोव्हिएत व चीनी जनतेशी हवे आहे. मलायामध्ये आज ब्रिटिशांनी जालियनवाला बागेची मोठी आवृत्ती काढली आहे; तोच प्रकार इंडोनेशियात, इंडोचायनात तिबेटात, नेपाळात, फिलिपाइन्समध्ये व इकडे मुसलमानी देशांतही अमेरिका, हॉलंड, फ्रान्स, वगैरे देशांतील साम्राज्यवाद्यांनी चालविला आहे. या साम्राज्यवाद्यांना हिंदी जनतेचा विरोध आहे तो या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वासाठीच. "कॉमनवेल्थच्या नावाने ब्रिटिश साम्राज्यवाद्यांशी सोयरिक जोडायला तुम्ही जा, आम्ही तुम्हाला विरोध करू" हे जनतेचे नेहरू-पटेलांना उत्तर आहे.

आता अंतर्गत स्वयंनिर्णय म्हणजे काय ? तर मराठी, कानडी, इत्यादि लोकांची स्वायत्त व संयुक्त जीवनाची मागणी. एकाद्या कारखानदाराने आपल्या नियोजनाच्या सोयीप्रमाणे भारताचे हवे तसे भाग पाडावे, बंदरे वेगळी करावी, " एक भाषा, एक संस्कृती " असल्या एकतंत्री गोष्टी, बहुजिनशी–बहुभाषी लोकांवर लादाव्या, तसा प्रकार सरकारला सोयीस्कर वाटला तरी तो शतानुशतके विकसत गेलेल्या प्रौढ अशा लोकसमूहांना कसा सहन होईल ? निव्वळ मुंबई बेटाचा हा प्रश्न नसून खरोखर लोकांच्या जीवनाची ही साधी पण न डावलत येणारी अपेक्षा आहे.

वरील दोन्ही अपेक्षांचे राजकीय स्वरूप लोकसत्तेसंबंधीच्या अपेक्षेत स्पष्ट होते. सन १८८५ पासून काँग्रेसने केलेले नेतृत्व लोकांना ठाऊक आहे, पण म्हणून काँग्रेसचे एकपक्षीय राज्य लोकांना मान्य कसे होईल ? हा केवळ सुराज्याचा प्रश्न नाही. काँग्रेसजनांच्या आपसातील लाथाळीचा, भ्रष्टतेचा व दंभाचाही प्रश्न नाही. बंगाल, मद्रास व इतरही प्रांतातले काँग्रेसजन सत्ताधारी वरील कारणांनी लोकांना अप्रिय झाले आहेतच, पण त्या अप्रियतेहून मूलगामी अशी एक बाब आहे. लोकांना आता निव्वळ काँग्रेसची अंतःशुद्धी व जनतासंपर्काचे प्रकार नको आहेत.



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १७२८३

मग, त्याना हवे काय ? त्यांना लोकराज्य हवे आहे. चारदोन सज्जनांचे सुराज्य नको आहे,—कारण, अशा सुराज्याला आज मनोराज्याचेच रूप येणे अटळ आहे. गावपंचायतीपासून तो घटनापरिषदेपर्यंत लोकांनाच राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेण्याची संधी आजच्या राजवटीत मिळत आहे का ? या एकाच कसोटीवर आज अमूक लोकराज्य आहे की नाही हे ठरविता येते. लोक ठरवीतही आहेत.

लोकांनीच आपल्या मगदुराने, दैनंदिन राजकीय व्यवहारात घेतलेल्या अनुभवाने राज्य चालवावे, ही कल्पना प्रत्यक्षात कशी उतरेल व यशस्वी ठरेल हे आपण पुढे पाहू. एवढी गोष्ट येथे स्पष्ट समजून घेतली पाहिजे की, लोकांची ही अपेक्षा आहे व ती एका मूलभूत अनुभवावर आधारलेली आहे. तो अनुभव असा की, जोपर्यंत लोक स्वत: आपला कारभार करायला पुढे येत नाहीत तोपर्यंत राज्याची सूत्रे धनिकवर्गाच्याच हाती राहतात. त्यांच्याशी कळत वा नकळत निष्ठा असलेल्या व्यक्तीच राज्यशकटाचे सारथी बनतात. हा अनुभव नगरपालिका, लोकलबोर्डे, मंत्रिमंडळे यांतून लोकांना आला आहे.

येथवर आपण पाहिले की, आज इतर अनेक देशांप्रमाणेच अन्नवस्त्र, स्वयंनिर्णय व लोकसत्ता हे मुख्य प्रश्न येथे आहेत व त्यांची उत्तरे मिळाली की लोकांच्या अपेक्षा पुऱ्या होण्यासारखी स्थिति देशात उत्पन्न होईल. पण या तीनही प्रश्नांची उत्तरे मिळण्यात दिरंगाई होत आहे व त्याची जबाबदारी आज सरकार जनतेवरच टाकीत आहे. " अन्न-वस्त्र मिळत नाही, कारण तुम्हीच आळशी आहात, संप करता, काळाबाजार करता, लाचलुचपत देता', असा शहाजोग उपदेश सुनावला जात आहे. किंमतीचे मान ३५० टक्के वाढूनही महागाईभत्ता १५० टक्केच मिळतो. म्हणजे युद्धपूर्व काळातल्या अर्धपोटी वेतनातही कपातच झाली आहे, याची जबाबदारी धनिकांकडे व सरकारकडे आहे, याची ओरड कोणी केली तर तो कम्युनिस्ट ! " संयुक्त महाराष्ट्र मागता तर तुम्ही देशाचे तुकडे करू पाहता. बियाणी शेठना कोठे तुमच्या महाराष्ट्रात यायचे आहे ? प्रथम घर शुद्ध करा मग संयुक्त महाराष्ट्र मागा" असाही उपदेश मराठी जनता ऐकत आहे. ही जनता शेजारी असणाऱ्या भाषिकांशी सलोख्याने वागणारी आहे, उलट मुंबईचे धनिक व डांगचे जंगल मक्तेदारच आक्रमक आहेत, या गोष्टी सरकार लपवित आहे. तसाच प्रकार कॉमनवेल्थ करारासंबधी. ब्रम्हदेशातील यादवीत दाखल होणे, मलायात वापरल्या जाणाऱ्या गुरखा पलटणीसंबंधीच्या करारात ब्रिटनबरोबर सहभागी असणे, इत्यादि मार्गांनी हिंदचे भवितव्य ब्रिटिश साम्राज्यवादाबरोबर आधीच निगडित होते. आता कॉमनवेल्थचे

एक नवे शिक्कामोर्तब झाले एवढेच.

अशा या आजच्या परिस्थितीत लोकसत्तेचा व लोकांच्या विविध अपेक्षा पुऱ्या करण्याचा एकच मार्ग संभवतो; तो म्हणजे आजच्या धनिक सत्तेच्या विरोधाचा.

तो मार्ग आज काँग्रेसव्यतिरिक्त पक्षांनी स्वीकारला आहे. आता विरोधाच्या या मार्गाने जाणाऱ्या पक्षोपपक्षांत तत्त्वतः काय भेद आहेत ते पाहिले म्हणजे अखेर लोकसंघटनेचे यश कम्यूनिस्टांनाच लाभणे का अटळ आहे ते कळून येईल.

विरोधाच्या सर्व प्रकारांचे खरे दोनच वर्ग पडतात : एक विरोध हा केवळ सत्तानिष्ठ विरोध आहे; यात गांधीवादी सत्याग्रही विरोधकांपासून तो हिंसक दहशतवादी मार्गाने तक्त बळकावू पाहणाऱ्या विरोधकांपर्यंत सर्वांचा समावेश होतो. साधनांचा हा प्रश्न नाही तर साध्याकडे पाहिले तर या सर्व विरोधकांना आज असलेल्या व्यक्ती नको असतात, व फक्त खांदेपालट हवा असतो. रॉयपक्षीय मंत्रिमंडळ जाऊन काँग्रेसमधील किंवा बाहेरीलही दुसरे मंत्रिमंडळ आले की बंगाली लोकांच्या अपेक्षा पुऱ्या होतील, अशा धोरणाने हिंसा झाली; म्हणून तिला अराजक व क्रांती म्हणणे व त्यात कम्यूनिस्टांना गोवणे, हा वृत्तपत्रीय खेळ म्हणून पचेल. पण वस्तुस्थिति अशी आहे की, सत्ताधारी गटांच्या बाबतीत विटलेले गांधीवादी किंवा अहिंसेचे पथ्य न पाळणारे बंगाली काँग्रेसवादी हे दोन्ही फक्त व्यक्तींनाच किंवा गटांना विटले आहेत. त्यांना बदल हवा आहे तो फक्त व्यक्तींतच. फ्रेंच पार्लमेंटातल्या एकामागून एक येणाऱ्या मंत्रिमंडळांची सर्कस म्हणजे तरी असल्या सत्तानिष्ठ विरोधातून उत्पन्न होणारी राहाट-गाडग्यांची माळच असते.

धनिक सत्तेला विरोध करण्याची कम्यूनिस्टांची पद्धतो व रणनीती मात्र या अहिंसक, पार्लमेंटरी, किंवा हिंसक दहशतवादी सत्तानिष्ठ विरोधकांच्या पद्धतीहून अगदी मुळातच वेगळी आहे.

कम्यूनिस्टांचा धनिक सत्तेला विरोध असतो तो उघड व क्रांतिकारकच असतो, मग ती सत्ता परकीय असो की स्वदेशी असो. क्रांतिकारक म्हणजे काय ? तर त्या विरोधाचे साध्य धनिक सत्तेचा संपूर्ण, समूळ नाश हेच असते. तडजोड किंवा केवळ सत्ताधारी व्यक्तींचा बदल हे त्यांना नको असते. त्यामुळे तात्पुरत्या यशासाठी सत्ताधारी व्यक्तींवर टीकेचा हल्ला चढवणे, त्यांना बदनाम करणे व जपानी राजकीय उलाढालीत पूर्वी घडणारे व्यक्तींच्या खुनाचे प्रयत्न करणे, ह्या गोष्टी सत्तानिष्ठ विरोधात जितक्या अंगभूतच असतात तितक्याच उलट कम्यूनिस्ट पद्धतीत वर्ज्य

ठरतात. आज शंभर वर्षे जगाच्या पाठीवर सर्व देशांत कम्यूनिस्ट आहेत. अनन्वित दडपशाहीला त्यांनी तोंड दिले आहे. पण धनिकांच्या किंवा धनिक सत्तेचे चालक असलेल्या व्यक्तींच्या खुनाचे प्रयत्न त्यांच्याकडून झालेले कोठेही आढळत नाहीत. याचे कारण असे की, कम्यूनिस्टांचे साध्यच व्यक्तींवर किंवा सत्तेच्या सिंहासनावर झडप घालून ते बळकाविण्याचे नसते. त्यांना समूळ समाजक्रांती हवी असते. म्हणून सत्तानिष्ठांचे अहिंसात्मक किंवा हिंसात्मक दहशतवादाचे मार्ग कम्यूनिस्ट पद्धतीत त्याज्य असतात. त्या मार्गाने जाणारे गट समाजक्रांतीचे शत्रू आहेत असेच कम्यूनिस्ट मानतात. कम्यूनिस्टांना धनिक सत्तेचा विरोध व नाशच करावयाचा असतो. पण त्यासाठी त्याना एकच मार्ग चोखाळायचा असतो. तो मार्ग लेनिनने व मावत्सेतुंगने स्वीकारलेला असून प्रत्यक्ष यशाच्या रूपानेच दिसत आहे. तो मार्ग झटपट उरकण्याचा व मूठभर धाडशी वीरांनी आणीबाणीच्या क्षणी अमलात आणण्याचा नाही. सुमारे पंधरा वर्षे हजारो बोलशेविकांनी बलिदान करून जी क्रांती केली तीच कम्यूनिस्टांना साध्य करावयाची असते. मावत्सेतुंगला बावीस वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानंतर यश मिळाले ते याच क्रांतीच्या मार्गाने.

इतका दीर्घ काळ हे कार्य चालते याचा अर्थ काय ? झारला व धनिक सत्तेला विरोध करणारा लेनिन व चँगला विरोध करणारा मावत्सेतुंग यांच्या कार्याकडे पाहिले म्हणजे या दीर्घकालीन प्रयत्नांचा अर्थ व गाभा कळून येईल. रशिया व चीन या देशांत कम्यूनिस्टांनी एका नव्या पद्धतीने राज्यक्रांती केली. त्या पद्धतीचा पाया म्हणजे शहरी कामगारांची, शेतकऱ्यांची, सैनिकांची, "कौन्सिले" स्थापणे व पुढे देशव्यापी "सोव्हिएत" म्हणजे "लोकसभा" स्थापन करणे. या लोकसभांनीच मग सत्ता काबीज केली.

"सोव्हिएत" नावाच्या या लोकसभांची संघटना, निर्मिती व त्यांच्या हाती क्रांतीची व सत्तेची सूत्रे देण्याची पद्धती हीच कम्युनिस्टांची विशिष्ट पद्धती आहे. कम्यूनिस्ट पक्ष हा या सोव्हिएत सभांचे मार्गदर्शन करतो, असा हा अनुभव रशिया व चीन या देशांत व इतरत्रही आला आहे.

धनिक सत्तेला केवळ सत्तानिष्ठ गटबाजीच्या सत्याग्रही किंवा दहशतवादी विरोधाची तशी भीती वाटत नाही. मध्ययुगामध्ये राजा मेला तरी गादी राहत असे त्याप्रमाणे हा गट गेला तरी दुसरा गट सारथी बनून भांडवलदारीचा गाडा चालूच राहतो. म्हणून अशा सत्तानिष्ठ पक्षोपपक्षांना सनदशीरपणा, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, इत्यादी सवलती देण्यास

 सत्तारूढ भांडवलदारी पक्षही तयार असतो. पण कम्यूनिस्टांचा विरोध

सत्तानिष्ठ नसून क्रांतिनिष्ठ असल्याने त्यांच्याविरुद्ध मात्र दडपशाहीचा वरवंटा फिरविण्याचा मार्ग धनिक सत्ता स्वीकारते. प्रत्येक देशात कम्यूनिस्ट पक्षावर देशद्रोही, अराजकवादी, बँडिटस् ( म्हणजे पेंढारी ) असे आरोप ठेवून त्यांचे शिरकाण करण्यासाठी रक्ताचे पाट वाहवले गेले व आज जात आहेत. चीनमध्ये याचा कळस झाला आणि या भीषण दिव्यातूनच आज बावीस वर्षांनी तेथील कम्यूनिस्टांनी आपले ध्येय गाठले आहे.

यांतूनच कम्यूनिस्ट कार्यपद्धतीचा आणखी एक विशेष कळून येतो. जनतेमधील सर्व गरीब वर्गांची एकजूट करून त्यांची सोव्हिएट सभांतून संघटना करणे, हा त्यांचा मार्ग मागे सांगितलाच. पण त्यांतही त्यांची मुख्य मदार कामगार वर्गावर असते. याचे कारणही सरळ दिसणारेच आहे. धनिक सत्तेला व वर्गाला जर विरोध करावयाचा व तो निर्वाणीचा करावयाचा तर कामगार वर्गाचाच पाया घातला पाहिजे. इतर वर्गांचे भांडण असते पण ते कधी पेटते तर कधी विझते. खेड्यातील श्रीमंत शेतकरी घ्या. धान्याच्या भावासाठी तो धनिकाशी भांडेल, पण भाव चढता मिळाला की मिळते घेईल. शिवाय आपल्या हाताखाली राबणाऱ्या शेत-मजुराला दडपण्यासाठी धनिक सत्तेशी तो तडजोड करील. तेव्हा शहरी कारखानदारीत व संपाच्याा वणव्यात तावूनसुलाखून निघालेला कामगार हाच खरा धनिक सत्तेचा काळ आहे. त्याच वर्गावर भिस्त टाकून त्याच वर्गातील व्यक्तींचा वाढत्या संख्येने समावेश होऊन प्रत्येक कम्यूनिस्ट पक्ष वाढत गेला आहे. साहजिकच कामगारांचे मित्र-वर्ग म्हणून शेतमजूर, गरीब शेतकरी, गरीब मध्यम वर्गीय व्यापारी व सुशिक्षित यांचाही सोव्हिएत पद्धतीच्या क्रांतिकार्यात समावेश होत जाणे अटळ असते व तसा तो सर्व देशांतून झालेला आहे.

आता समारोपाच्या दृष्टीने पाहू. जनतेच्या साध्या व स्पष्ट अपेक्षा पुऱ्या करण्यात नेहरू-पटेलांचे सरकार व काँग्रेस पक्ष समर्थ नाही, कारण एकीकडे धनिकवर्गाच्या सत्तेचा नाश केल्याशिवाय त्या अपेक्षा पुऱ्या होऊच शकत नाहीत. तर दुसरीकडे ह्या सरकारचे हातच धनिक सत्तेने बांधले गेले आहेत. अर्थातच इतर विरोधी पक्षांकडे पहावे लागते. पण यांपैकी प्रत्येक विरोधी पक्ष हा सत्तानिष्ठ विरोधाची भूमिका घेत आहे व केवळ व्यक्तींच्या खांदेपालटाची धडपड करीत आहे. म्हणून या विरोधकांना तात्कालिक स्थान व यश मिळाले तरी जनतेच्या अपेक्षा पुऱ्या करता येणार नाहीत. उलट धनिक वर्गाचा अखंड वैरी असलेल्या कामगारवर्गाचा कम्यूनिस्ट पक्ष मात्र सत्तानिष्ठ नसून समाजक्रांतिनिष्ठ आहे. देशव्यापी सोव्हिएत पद्धतीचीसंघटना व जाळे विणण्याचा त्या पक्षाचा दीर्घकालीन, 

चिकाटीचा कार्यक्रम आहे. जनतेच्या प्रत्यक्ष मागण्यांच्या आधारावर तिला संघटित करावयाचे व क्रांतिकार्यासाठी तिला सोव्हिएत सभांतून राजकीय सामर्थ्य द्यावयाचे ही पद्धती कम्यूनिस्ट चीनमध्ये व इतर देशांतही अमलात आणली आहे. त्या पद्धतीत गुप्त, अराजकी धाटणीचे, पाताळयंत्री असे काहीच नाही. कम्यूनिस्टांचा आद्य प्रणेता मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे कम्यूनिस्टांचे बंडही उघड समाजक्रांतीचा उठाव आहे. या क्रांतीची ज्यांना दहशत आहे, ज्यांचे मिरासदारीचे स्थान जाणार आहे, त्यांनी या उघड बंडाला गुप्त, पाताळयंत्री आगलावेपणा म्हटले काय, किंवा पुंडावा, पेंढारीपणा म्हटले काय, जी पद्धती उघडपणे साऱ्या जगभर गेली शंभर वर्षे कम्यूनिस्टांनी अवलंबिली तिला " पाताळयंत्री कट " म्हणणे मूर्खपणाचे नाही का ? पण या भेडसावण्याने लोकांच्या डोळ्यांवर झापड येईल अशी एक क्षीण आशा धनिकांना आहे खरी !

दहा, वीस, कितीही वर्षे लागोत, पण आता हिंदुस्थानात आणि साऱ्या आशियात, युरोपात व अमेरिका खंडात धनिकसत्तेची सद्दी संपली आहे. व यशाचा मार्ग कम्युनिस्ट पक्षच दाखवीत आहे. कामगारांचा हा पक्ष इतर गरीब वर्गांच्या व त्यांच्या पक्षांच्या मित्रत्वाने अन्न, वस्त्र, स्वयंनिर्णय व लोकसत्ता या तीनही अपेक्षा पूर्ण करणार आहे व आधुनिक हिंदच्या खऱ्या नवयुगाचा जन्म या क्रांतिकार्याच्या विजयानेच होणार आहे

समाज चिंतन । ७ ।

# भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे भवितव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. दि: ..........
क्रमांक .......................... नों. दि. ..........

भारतामध्ये कम्यूनिस्ट चळवळीला काही भवितव्य आहे का नाही, या प्रश्नाची दोन उत्तरे येतील व तशी उत्तरे दिली जातातही. कम्यूनिस्टांना येथे भवितव्य नाही असे एक उत्तर आहे, तर आज ना उद्या येथे कम्यूनिस्टच विजयी होतील असे दुसरे उत्तर आहे. या ना त्या उत्तराने काही जण स्वतःचे व इतरांचे तात्कालिक समाधान करू शकतात. ह्या अर्थी दोन्ही उत्तरे 'समाधानकारक' आहेत. पण हा प्रश्न इतका सोपा आहे असे मला वाटत नाही.

कम्यूनिस्ट चळवळीच्या ऐवजी असाच प्रश्न दुसऱ्या कोणत्याही सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक चळवळीबद्दल विचारला तरी असेच म्हणावे लागेल. भारतातील लोकशाहीचे भवितव्य, धर्माचे भवितव्य किंवा खासगी उद्योगधंद्यांचे भवितव्य सांगावयाचे म्हटले तरी केवळ 'स्पष्ट' एकतर्फी उत्तरे देऊन भागत नाही. खरे असे आहे की एखाद्या संस्थेचे, पक्षाचे, चळवळीचे किंवा विचारसरणीचे भवितव्य सांगताना साऱ्या समाजव्यवस्थेतच जे उघड व गुप्त संघर्ष, तडजोडी व हेलकावे चालू असतात, त्याचे सर्वंकष आकलन भविष्यवाद्यास असावयास हवे; आणि असे आकलन पूर्णतया असणे तर मानवी बुद्धीच्या पलीकडची गोष्ट आहे असे दिसून येते. आपण साधी माणसे सोडून देऊ.पण मोठमोठ्या राष्ट्रांचे व क्रान्त्यांचे नेतृत्व ज्यांनी केले, अशा प्रतिभावान व्यक्तींनाही आपआपल्या राष्ट्राचे किंवा आंदोलनाचे भवितव्य नीट दिसलेले आढळत नाही. भारताच्या फाळणीचे 'भवितव्य' आपल्या नेत्यांना किती आधी दिसले होते?

म्हणून या बाबतीत विचार करताना अभ्यासकाने एक गोष्ट ध्यानात ठेवलीच पाहिजे ती अशी की, अशी 'भवितव्ये' पाहणे म्हणजे आपल्या

पूर्वग्रहांचे प्रकटीकरण नव्हे, किंवा या ना त्या आंदोलनाला एक मानवसदृश व्यक्ती समजून तिच्याबद्दल भविष्य वर्तविणे नव्हे! एखाद्या व्यक्तीच्या उदात्तपणाबद्दल किंवा हीनपणाबद्दल काही आडाखे बांधून आपण त्या व्यक्तीच्या वर्तनाबद्दल अंदाज बांधतो. पण तेही अनेकदा चुकतातच! आंदोलने एक तर व्यक्तिसदृश नसतात, दुसरे म्हणजे त्यांच्या व्यवहाराचे व यशापयशाचे धागे साऱ्या समाजाच्या जीवनपटात एकजीव गुंतलेले असतात.

वर सांगितलेल्या मर्यादा मानूनच कम्यूनिस्ट चळवळीच्या भवितव्याचा विचार करणे इष्ट होईल. तसा विचार करताना अनेक जुन्या नव्या भारतीय घटनांचा व आंतरराष्ट्रीय घटनांचा संबंध व संदर्भ आणणे व्यापक अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक ठरेलच. पण तशा अभ्यासाऐवजी फक्त काही मोजक्या गोष्टींचा संदर्भ ठेवून आपले विचार प्रस्तुत लेखात मी मांडणार आहे.

भारतीय लोकांच्या जीवनात पारतंत्र्य गेल्यानंतरचा मोठा प्रश्न म्हणजे राहणीचे मान वाढविण्याचा आहे. दुसरा मोठा प्रश्न सामाजिक जीवनात माणुसकी आणून व्यक्तीव्यक्तीमधील व समूहासमूहातील परस्पर संबंध व व्यवहार एका समंजस पातळीवर आणण्याचा आहे. राहणीचे मान वाढविण्यासाठी व माणुसकीच्या व्यवहारासाठी नुसता राष्ट्राभिमान पुरेसा नसून सामाजिक न्यायाच्या स्थापनेची व लोकशाहीच्या प्रत्यक्ष व्यवहाराची गरज आहे.

वरील ध्येय सर्वांनाच सुखाचे वाटते. पण त्यासाठी त्याग व कष्ट करावयाचे कोणी, हा प्रश्न आहे. गरीब व श्रीमंत ह्यांतील भेद कमी होत जावा हे मान्य झाले, तरी श्रीमंतांनी त्याग करावा हे तत्त्व त्यांना पटत नाही. असेच सारे विषमतेच्या बाबतीत घडत राहते. म्हणूनच वर्गकलह, जाति-संघर्ष, भाषिक समूहांचे सीमावाद, असे नाना प्रश्न आज घटकेला भारतात दिसत आहेत. हे प्रश्न अमूक एका व्यक्तीने किंवा पक्षाने उत्पन्न केलेले नाहीत. प्रश्न आपल्या भूमीतलेच आहेत. त्यांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करणारेही या भूमीचेच पुत्र आहेत.

या प्रयत्न करणाऱ्यांतील एक संघटना असे भारतीय कम्यूनिस्टांना आपण मानले पाहिजे. ही मूलभूत, नव्हे प्राथमिक, गोष्ट मानून त्यांच्या विचारांवर, आचारावर आणि मनोवृत्तीवर टीका करणे किंवा तिचा स्वीकार करणे योग्य होईल. या भूमिकेवरूनच कम्यूनिस्ट चळवळीच्या भवितव्याचा विचार करताना आजच्या केरळमधील आणीबाणीच्या अवस्थेत काय घडेल, हा प्रश्न मला विचारात घ्यावासा वाटतो. कारण त्या चिमुकल्या

राज्यात घडणाऱ्या प्रचंड खळबळीत आज भवितव्याची चिन्हे उमटताना दिसत आहेत.

केरळात काही गोष्टी इतरत्र न सापडणाऱ्या आहेत. तेथे चाळीस टक्के लोक ख्रिश्चन आहेत, इतकेच नव्हे तर त्यांचे दैनंदिन जीवन व श्रद्धा तेथील चर्चच्या पूर्ण वर्चस्वाखाली आहेत. असे दुसरीकडे कोठेच नाही. या शिवाय शिक्षितांचे प्रमाण ही इतरत्र न सापडेल इतके तेथे मोठे आहे. गरीबी व बेकारी आणि दाट लोकवस्तीमुळे अन्नाचा तुटवडा या गोष्टी आहेतच.

चर्चचा प्रभाव व सार्वत्रिक शिक्षण या दोन गोष्टी केरळात असूनही कम्यूनिस्ट चळवळीला तेथे बरेच सामर्थ्य मुळात का लाभले? याचे एक कारण उघड दिसते की कम्यूनिस्टांच्या आधी सत्ताधारी असलेल्या काँग्रसपक्षाला किंवा प्रजासमाजवादी पक्षाला तेथील जनतेच्या गरजा पुऱ्या करता आल्या नाहीत. त्यांनी प्रयत्न केले तेही आज कम्यूनिस्टांनी प्रत्यक्ष पावले टाकली त्याच दिशेने होते. शिक्षणविषयक बिल व शेतकरी कुळकायदा या दोन गोष्टींना आधीच्या सत्ताधाऱ्यांनी प्रारंभ केला होता. पण त्या गोष्टी इतक्या मंद गतीने व धरसोडीच्या पद्धतीने झाल्या की, लोकांना भरंवसा वाटेनासा झाला. या भावनेचा फायदा निवडणुकीत मिळाल्यामुळे कम्यूनिस्टांना स्वतंत्र सभासदांच्या मदतीने जेमतेम मंत्रिमंडळ मिळविण्यापुरते यश मिळाले. कम्यूनिस्ट राज्याविषयी शिक्षित मध्यमवर्गाच्या मनात अपेक्षा होत्या आणि राबणाऱ्या जनतेत श्रद्धा होती. आज मात्र मध्यमवर्गामध्ये बरीच विरोधाची भावना निर्माण झालेली दिसत आहे व तिचा पाठिंबा घेऊनच चर्च व नायरांचा वरिष्ठ वर्ग एकजुटीने कम्यूनिस्ट मंत्रिमंडळाविरुद्ध उभे राहिलेले दिसत आहेत.

या सर्व घटनेच्या मागे केरळच्या तात्कालिक प्रश्नापेक्षा फार व्यापक व दूरगामी प्रश्न आहेतच. कम्यूनिस्ट सत्ताधारी आहेत का अल्पमतवाले म्हणून विरोधक आहेत, एवढाच केवळ प्रश्न नाही. भारतातील सर्वच राज्यांतून सत्ताधारी व विरोधक यांच्यातील संघर्षाचे स्वरूप व 'युद्धनीती' काय ठरावी, असा हा प्रश्न आहे.

यातून दोन पर्याय संभवतात : एक, एकपक्षीय सत्तेसाठी केल्या जाणाऱ्या निर्णायक व निर्दय यादवीचा मार्ग व दुसरा लोकशाहीच्या मर्यादेत चालणाऱ्या समंजस संघर्षाचा मार्ग. यापैकी कोणता मार्ग कोणत्या देशात वापरला गेला, हा इतिहास सर्वांनाच साधारण माहीत असतो. मानवी जीवनात, (आणि मुळात मानवी मनाच्या घडणीतच), अमूक एक घडले नाही असे नाही. तसेच, अमूक देशात अटळ काय होते, ते सांगण्यानेही येथे

काय होणे श्रेयस्कर आहे, ते सांगण्याची जबाबदारी चुकविता येत नाही तेव्हा, वरील दोन पर्यायांपैकी कोणता पर्याय भारतात यशस्वी व्हावा, हा खरा यक्षप्रश्न आहे. केरळातील काँग्रेसपक्ष व इतर विरोधी शक्ती आणि तेथील कम्यूनिस्ट यांनी त्या प्रश्नाला उत्तर दिले पाहिजे. तसेच, या केरळीय शक्तींच्या मागे ज्या शक्ती उभ्या आहेत, त्यांना हा प्रश्न सोडवावा लागेल. या प्रश्नाचे उत्तर आज तात्पुरते कसेही दिले जावो, त्या उत्तरातून ज्या प्रतिक्रिया आज केरळात व भारतात संभवतील त्यांच्यामुळे कम्यूनिस्ट पक्षाचेच नव्हे तर आपल्या राष्ट्राचे भवितव्य ठरू पहात आहे. केरळ ही नुसती 'प्रयोगभूमी' आहे.

कम्यूनिस्ट चळवळीचे 'भवितव्य' नव्हे, पण भारतातील यशापयश ठरविणाऱ्या काही घटना या पूर्वी होऊन गेल्या. भाषिक व धार्मिक समूहांना स्वयंनिर्णयाचा हक्क द्यावा असे कम्यूनिस्टांनी म्हटले, सन १९४२ मध्ये महायुद्धाला लोकयुद्ध म्हणावे अशी भूमिका घेतली आणि सन १९४८ नंतर तेलंगणामध्ये 'मुक्त कम्यूनिस्ट शासित प्रदेश' स्थापन करून तो लढवीत राहण्याचे ठरविले. त्यांच्या या धोरणांमध्ये एकच मूलभूत चूक झालेली आढळते ती म्हणजे भारतीय लोकशाहीची घडण त्यांना उमगलेली नाही. भाषा, धर्मसंप्रदाय, जातिसंस्था, पारतंत्र्य व राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि भारतीय जीवनाच्या समृद्धीसाठी राजकीय व सामाजिक ऐक्याची गरज या सर्व गोष्टींची कम्यूनिस्टांना तीव्र व स्पष्ट जाणीव नसल्यामुळे या पूर्वीच्या चुका त्यांच्या हातून घडलेल्या दिसतात. पण आजचा केरळमधील प्रश्न हा आणखीच मोठा व गंभीर प्रश्न आहे. 'यादवी' होईल तर आम्ही तिला तोंड देऊ अशा तऱ्हेचा एक उद्गार मागे श्री. नंबुद्रिपाद यांनी काढला, व मग स्पष्टीकरण केले की यादवी टाळण्याचाही आम्ही प्रयत्न करू. त्यांच्या या स्पष्टीकरणावरून असे दिसते की आजच्या केरळीय परिस्थितीत मुख्य प्रश्न कोणता आहे याची त्यांना पूर्वीच जाणीव झाली आहे व त्यासंबंधी त्यांनी समंजस भूमिका घेतलेली आहे.

आज केरळच्या निमित्ताने यादवीचा प्रश्न डोकावत आहे व याचा गंभीरपणे विचार करणे जरूर आहे. समजा कम्यूनिस्ट मंत्रिमंडळ केंद्राने बरखास्त केले; मग यासाठी जरूर ते घटनात्मक फरक करून किंवा संसदेत बहुमताचा कौल घेऊन जरी हा निर्णय घेतला गेला तरी त्याचा परिणाम असाच होईल की सर्वच राज्यारूढ मंत्रिमंडळांना केरळीय विरोधकांच्या मार्गाने लढा उभारणाऱ्या विरोधकांपुढे नमते घ्यावे लागेल. केंद्राचा पाठिंबा नसेल त्या ठिकाणी विरोधकांची चळवळ जास्त दीर्घ व जास्त उग्र होईपर्यंत मंत्रिमंडळ स्थानावर राहील; पण त्यामुळे अशान्तता

माजेलच. उलट, समजा केंद्राने हस्तक्षेप न करता नंबुद्रिपाद यांचे मंत्रिमंडळ तसेच अधिकावर राहिले, तरी मग सध्याचा तेथील काँग्रेसपक्षाने चालविलेला विरोध कायम राहणार किंवा कदाचित जास्त चिघळणार.

हा केवळ एका राज्याचा प्रश्न नाही, तर भारतातील लोकशाही राज्यव्यवस्थेचा व लोकशाहीवरील लोकांच्या भरंवशाचा प्रश्न आहे. ब्रिटनमध्ये एकदा स्थानापन्न झालेला पक्ष पाच वर्षेपर्यंत स्थिरपणे राज्यकारभार चालवितो व ते इष्टच असते. परंतु तेथे विरोधी पक्षाच्या विरोध करण्याच्या पद्धतीला मर्यादा असतात आणि अधिकारारूढ पक्षही न्यायदान व इतर राज्यव्यवस्थेची खाती यात ढवळाढवळ करीत नाही. पण अशी ढवळाढवळ येथे होते. असे केरळच्या व इतर राज्यांतीलही अनुभवांवरून म्हणावे लागते. पण, या अपुरेपणाचा आधार घेऊन आज लोकशाही राज्यव्यवस्थेची पद्धत मोडूनच काढावी व सरळ एकपक्षीय सत्तेची पद्धत अवलंबावी असा निष्कर्ष काढणे म्हणजेच यादवीचा मार्ग मोकळा करून देणे आहे.

आज केरळमध्ये केंद्राने हस्तक्षेप करून तेथील मंत्रिमंडळ बरखास्त करावे असे मत काँग्रेसमधील उजव्या गटाचे आहे, हे उघडच दिसत आहे. त्यांच्या दृष्टीने कम्यूनिस्ट किंवा दुसरे कोणी समाजवादी देखील सत्तास्थानाच्या जवळपासही असणे धोक्याचे आहे. काँग्रेसची एकपक्षीय अधिसत्ता त्यांना सर्व राज्यांत कायमची हवी आहे! एका दृष्टीने बरखास्तीचा निर्णय कम्यूनिस्टातीलही काही प्रवृत्तींच्या लोकांना इष्ट वाटणारा आहे. या बरखास्तीमुळे पार्लमेंटरी पद्धतीवरचा लोकांचा भरवसा किंवा भ्रम नाहीसा होईल व सरळच क्रांतिकारक उठावाच्या मार्गाला हळूहळू लोकमत अनुकूल होईल, असे त्यांना वाटत असावे. आज बरखास्तीमुळे कम्यूनिस्टांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण होईल. यापेक्षा त्यांना भ्रमनिरासाचे महत्त्व जास्ती वाटणे साहजिकच आहे. या भ्रमनिरासामुळे आपण मतदान-पेटचा, लोकमताचे हेलकावे वगैरे साऱ्या भानगडींतून मुक्त होऊन धोपट पण प्रभावी अशा उठावाच्या मार्गाला लागू शकू, अशी त्यांची अपेक्षा होणे अटळ आहे.

सारांश, काँग्रेसमधील अतिरेकी उजवा भाग आणि कम्यूनिस्टांपैकी अतिरेकी जहाल भाग या दोघांनाही आपआपल्या दृष्टीने हा बरखास्तीचा निर्णय पथ्यावर पडणारा आहे व नेमका तोच भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने फार धोक्याचा आहे. नेहरू व नंबुद्रिपाद यांच्या सिमला येथील भेटीसंबंधी जे थोडे प्रकटपणे वाचावयास मिळत आहे त्यावरून असे दिसते की या दोघांही नेत्यांना या संकटाची नीट जाणीव आहे, व फेरनिवडणुकीला मान्यता

देऊन हा पेच सोडवावा अशी इच्छा व तडजोड अजून निघण्याची आशा आहे.

भारतातील कम्युनिस्ट चळवळीच्या भवितव्याच्या दृष्टीनेहि अशी तडजोड होणे अत्यंत आवश्यक आहे. शिवाय या सर्व केरळीय अनुभवातून राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांना एक नवी दृष्टी येणे अवश्य आहे. आज समाजाच्या व्यापक हितासाठी राज्यकारभार करणाऱ्या सर्वच सत्ताधाऱ्यांनी स्वतःच्या पक्षाच्या दडपणापासून निर्लेप व निःपक्षपाती राहणे, आणि पक्ष संघटनांनीहि राज्यकारभारात दखल न देता आपले बळ वाढविणे जरूर आहे. हा नियम किंवा पथ्य कम्युनिस्ट व इतरहि पक्ष पाळतील तरच येथे लोकशाहीची परंपरा निर्माण होणे शक्य आहे. स्वतःच्या संपत्तीला व स्वार्थाला जपण्यासाठी लोकशाहीला धाब्यावर बसवू पाहणारे वर्ग आणि समूह भारतांत आज आहेतच. त्यांना तोंड देण्यासाठी व त्यांचा विरोध दुबळा करण्यासाठी आज अशा तऱ्हेच्या मर्यादा राजकीय पक्षांनी पाळणे जरूर आहे. तसे जर झाले तरच येथे कम्युनिस्ट चळवळीला भवितव्य आहे. कारण भारतीय लोकशाहीच्या विकासात कम्यूनिस्टांनी सहभागी होणे हाच एक भवितव्याचा इष्ट असा अर्थ आहे.

अगदी प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे कोणत्याहि भारतीय पक्षांसंबंधी किंव आंदोलनासंबंधी सुटे भवितव्य सांगणे बरोबर होणार नाही. येथील प्रत्येक पक्षाला काही पूर्वकर्तृत्वाचा बरावाईट वारसा आहे. तसेच काही वर्तमान बळ व उद्दिष्टे आहेत. यातूनच प्रत्येक पक्षांचे भवितव्य थोडेफार ठरेल हे खरे. परंतु दूरवर पाहतां सर्वांचे भवितव्य भारतीय लोकशाहीच्या यशाने ( किंवा अपयशाने व नाशाने ) ठरणार आहे. ही लोकशाही ब्रिटनच्या लोकशाहीपेक्षा वेगळी असेल, नवे संकेत व परंपरा आपण निर्माण करू शकू; परंतु लोकांच्या भावना भडकावून दांडगाईने राज्य चालविणे किंवा लोकनियुक्त मंत्रिमंडळ बरखास्त करणे या 'संकेतातून' भारतीय लोकशाही निर्माण होणार नाही व मग लोकमताच्या पाठिंब्यावर चालणाऱ्या कोणत्याच राजकीय पक्षाला येथे भवितव्य व स्थान उरणार नाही. यादवीचा आणि लोकशाहीच्या नाशाचा धोका दिसत असला तरी तो अजून दूर आहे. आणि समंजस लोकशाहीचा मार्ग अजून सर्वांना मोकळा आहे, असेच मला वाटते. हा आशावाद समाजवादाचे ध्येय बाळगणाऱ्या सर्व संघटनांना प्रेरक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करून प्रस्तुत विवेचन मी संपवितो.

# सोव्हिएतमधील अनेकविध लोक

झारचे रशियन साम्राज्य व सोव्हिएत यूनियन ! तसे पाहिले तर या दोन राज्यांत नांदणारे लोक तेच व प्रदेशहि जवळ जवळ तोच. पण गेले ते साम्राज्य होते. त्याच्या जागी आले आहे ते लोकसत्ताक राष्ट्रांचे कुटुंब आहे.

सोव्हिएत यूनियन हे सुटसुटीत व संक्षिप्त नाव झाले. परंतु पृथ्वीवरील एकषष्ठांश प्रदेश व्यापणाऱ्या या खंडप्राय राज्याचे संपूर्ण नाव " यूनियन ऑफ सोव्हिएत सोशालिस्त रिपब्लिकस " असे आहे. रशियाचा उल्लेखहि या नावात नाही. उलट, या नावावरूनच दिसते की, सोव्हिएत पद्धतीच्या काही लोकसत्ताक राष्ट्रांचे हे संयुक्त राज्य आहे. अनेक लोकसत्ताकांपैकी रशिया हे एक घटक राष्ट्र आहे. त्याचा उल्लेख संयुक्त राज्याच्या नावात साहजिकच नाही. अजूनहि " रशिया " किंवा " सोव्हिएत रशिया " या नावाने सोव्हिएत यूनियनचा उल्लेख पुस्तकांतून व वृत्तपत्रांतून होतो. पण ती चूक आहे. सन १९१७ पूर्वी तेथे झारचे रशियन साम्राज्य होते त्यामुळे ही चूक चालत राहिली आहे. त्या साम्राज्याच्या अखंड प्रदेशात सरसकट रशियन लोक राहात होते किंवा आज सोव्हिएतमध्ये सर्व लोक रशियन आहेत असा हा गैरसमज अजून चालत राहिला आहे.

खरी गोष्ट अगदी वेगळी आहे. सोव्हिएतमधील लोक सरसकट रशियन नाहीत. झारचे साम्राज्य बरीच वर्षे चालल्यामुळे सर्व यूनियनच्या लोकजीवनावर पूर्वीपासून रशियन संस्कृतीची छाप आहे, व वरवर पाहता वरिष्ठ वर्गामध्ये एक रशियन वळण सगळीकडे आढळणे साहजिक आहे. पण झारच्या काळात ही रशियन संस्कृति राज्यकर्त्यांची म्हणून जुलुमाने लादलेली होती. साम्राज्यातील ५७ टक्के जनतेला ती संस्कृति परकी व

जुलमी वाटत होती. सम्राज्यातल्या या रशियनेतर लोकांना आपापली लोकभाषा व संस्कृति प्रिय होती. यहुदी व मुसलमान प्रजेला आपापला धर्म व आचारविचार प्रिय होते. परंतु साम्राज्यामध्ये या भिन्नपणाला वाव नव्हता. उलट सगळ्या लोकांना "बाटवून" रशियन बनविण्याचा झारशाहीचा सतत प्रयत्न होता. परंतु तो सिद्धीस गेला नाही. उलट झारशाहीचा डोलाराच कोसळला व आपापल्या परंपरागत वैशिष्टयांचा अभिमान धरणारे लोकसमूह नव्या पद्धतीने एकत्र नांदू लागले आहेत. "Crisis in Civilisation" ह्या रविंद्रनाथ टागोरांच्या सन १९४१ सालच्या लेखात ते म्हणतात, "सोव्हिएट यूनिअनच्या विस्तृत प्रदेशात राहणाऱ्या अनेक राष्ट्रांच्या हितसंबंधांचा समन्वय करण्याचा खराखुरा प्रयत्न तेथे होत आहे."

सोव्हिएत यूनियनमध्ये इतक्या वेगवेगळ्या तऱ्हेचे लोकसमूह वस्ती करून आहेत यात आश्चर्य कसले ? त्याचा भौगोलिक विस्तारच पहा. पृथ्वीला मोजण्याचा मानदंड म्हणून ज्या अजस्र हिमालयाला ओळखतात, तो सोव्हिएतच्या अफाट विस्तारामुळे नकाशात तोकडा दिसतो. भरतखंडाचे क्षेत्रफळ १८ लक्ष चौरस मैल, युरोपखंडाचे ३९ लक्ष चौरस मैल. तर सोव्हिएतचे ८३.५ लक्ष चौरस मैल ? आपल्या येथे आर्य, द्राविड मोंगल वगैरे वंशांचे, हिंदू-मुस्लीम वगैरे धर्मांचे; तसेच महाराष्ट्रीय, बंगाली, सिंधी वगैरे भिन्नभिन्न तऱ्हेचे लोक आहेत. युरोपांतही अनेक राष्ट्रे व लोकसमूह आहेत. मग सोव्हिएतमध्ये एकजिनसी लोकसमुदाय नाही यात नवल कसचे ?

या वेगवेगळ्या लहानमोठ्या लोकसमूहांना सोव्हिएत राज्यात कसे नांदता येते ? बहुसंख्य लोक अल्पसंख्य लोकांना कसे वागवितात ? युरोपवासी सोव्हिएत लोक आशियावासी सोव्हिएत लोकांकडे कोणाच्या भावनेने पाहतात ? पुढारलेले व प्रबळ लोक किरगीझ जिप्सी प्रभृती भटक्या व मागासलेल्या जमातीकडे तुच्छतेने पाहतात काय ? बहुसंख्य ख्रिश्चनधर्मीय समाज यहुदी व मुसलमान धर्मीयांकडे ससिष्णुतेने पाहतो काय ? मुसलमान धर्मीय लोकसमूह पॅन-इस्लामी वेदाने भारलेला आहे काय ? वगैरे अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला हशीवी वाटतील. अल्पसंख्याकांचा प्रश्न सोव्हिएतने नीट सोडविला आहे असे श्री. राधाकमल मुकर्जी, श्री. राजगोपालाचारी प्रभृती हिंदी विद्वानांनी अलीकडे प्रतिपादन केलेले आहे. त्यामुळेही याबाबतीत कुतुहल निर्माण झालेले आहे. यासाठी प्रथम सोव्हिएत जनतेमध्ये जे भेद आहेत त्याचा तपशील पाहू.

अशा या संयुक्त राज्याचे राष्ट्रीय व राजकीय विभाग आता पाहू. सोव्हिएत यूनियनमध्ये सन १९३९ मध्ये ११ राष्ट्रे होती, ती अशी :

| | | |
|---|---|---|
| | युरोपवासी राष्ट्रे | लोकसंख्या |
| १. | ग्रेट रशिया | १०,९०,००,००० |
| २. | बायलो रशिया | १,३८,६०,००० |
| | ( यालाच श्वेत रशियाही म्हणतात. ) | |
| ३. | युक्रेन | ४,००,००,००० |
| | कॉकेशसच्या दक्षिणेची राष्ट्रे | |
| ४. | अझरबैजान | ३२,१०,००० |
| ५. | जॉर्जिया | ३५,४२,००० |
| ६. | अर्मेनिया | १२,८२,००० |
| | आशियावासी राष्ट्रे | |
| ७. | काझाकिस्तान | ६१,४६,००० |
| ८. | उझबेगस्तान | ६२,८२,००० |
| ९. | तुर्कमेनस्तान | १२,५४,००० |
| १०. | किरगिझिस्तान | १४,६०,००० |
| ११. | ताजिकिस्तान | १४,८५,००० |

सन १९३९ नंतर पांच राष्ट्रे यूनियनमध्ये सामील झाली, ती अशी :

| | | |
|---|---|---|
| १२. | लिथुआनिया | २८,८०,००० |
| १३. | एस्थोनिया | ११,३१,००० |
| १४. | लॅतव्हिया | १९,७१,००० |
| १५. | कॅरेलिया | ४,६९,००० |
| | ( पूर्वी फिनलंडमध्ये होते ) | |
| १६. | मोल्दाव्हिया | ३२,००,००० |
| | ( पूर्वी मोल्दाव्हिया व वालाचिया मिळून रुमानिया बनले होते. ) | |

अशा रीतीने १६ राष्ट्रांचे हे संयुक्त राज्य असून या राष्ट्रांना घटक राष्ट्रे (Union Republics) म्हणतात. कॅरेलिया शिवाय या घटक राष्ट्रांची लोकसंख्या १० लक्षांवर असून ही सर्व राष्ट्रे सरहद्दीवर आहेत. म्हणजे पर्शिया, रुमानिया, पोलंड प्रभृति परराष्ट्रांशी यांच्या सरहद्दी लागून आहेत. घटक राष्ट्रांना हवे तर संयुक्त राज्यातून बाहेर निघण्याचा हक्क निरपवाद तऱ्हेने दिलेला असून त्यांना तसे करणे अशा सरहद्दींच्या दृष्टीने केव्हाही शक्य आहे.

काही ठिकाणी १० लक्ष वस्तीचे लोकसमूह नाहीत, किंवा काही ठिकाणी अशा लोकवस्तीच्या प्रदेशाला परराष्ट्राची सरहद्द लागलेली 

नाही. अशा लोकसमूहांना यूनियनमधील स्वायत्त राष्ट्रके ( Autonomous Republics ) म्हणतात. यांना घटक राष्ट्रांप्रमाणे फुटून निघण्याचा हक्क ( स्वयंनिर्णय ) नाही पण स्वायत्तता आहे. म्हणूनच, यांना स्वायत्त ( autonomous ) राष्ट्रके असे नाव आहे. यापैकी काही स्वायत्त राष्ट्रके किरगिझिस्तानसारख्या घटक राष्ट्राच्या मानाने पुढारलेली आहेत खरी, परंतु वर सांगितलेल्या कारणासाठी त्यांना घटक राष्ट्रे मानणे अव्यवहार्य आहे. अशी राष्ट्रके एकंदर २० असून, त्यापैकी १६ ग्रेट रशियांत, २ जॉर्जियात, १ अझरबैजानमध्ये व १ उझबेगस्तानात आहे.

घटक राष्ट्रे व स्वायत्त राष्ट्रके याच्यांत वसलेल्या राष्ट्रीय लोकसमूहांना अनुक्रमे स्वयंनिर्णय व स्वायत्तता दिल्याने एकजिनसी लोकसमूहांचा प्रश्न सुटला. परंतु इतरांची सोय काय ? त्यासाठी, प्रांत, जिल्हे यांसारखी निव्वळ प्रादेशिक विभागणी व अल्पसंख्याक लोकवस्तीची केंद्रे यांचा समन्वय करण्यात आला आहे. या दुहेरी पद्धतीचा पाया ' सोव्हिएत ' या लोकसभेत आहे. रशियन भाषेत सोव्हिएत म्हणजेच लोकसभा. अशी सोव्हिएतस् प्रत्येक खेडचात व शहरात आहेत. सन १९३१ मध्ये अशी ७१७८० सोव्हिएतस् खेडचांतून होती व १००० सोव्हिएतस् शहरांत होती. अर्थात ज्या ठिकाणी एखादा लोकवस्तीचा गट बेटाप्रमाणे भोवतालच्या लोकांपेक्षा वेगळा आहे, त्या ठिकाणी त्याला स्वतःचे वेगळे सोव्हिएत बनविण्याची मुभा दिली आहे. उदाहरणार्थ, केरळ प्रांतात महाराष्ट्रीय वस्ती आहे. त्यांना स्वतःचे ' सोव्हिएत ' बनवू दिले तर त्यांना आपली भाषा व महाराष्ट्रीयत्व राखता येईल. तशी सोय सोव्हिएत यूनियनमध्ये केली आहे. उदाहरण म्हणून ग्रेट रशियातील व्यवस्था पाहू.

### ग्रेट रशियामधील स्वायत्तता

या राष्ट्राची लोकसंख्या १० कोटी आहे. या राष्ट्रात १६ स्वायत्त राष्ट्रके आहेत व त्यांची एकंदर लोकवस्ती १.५ कोटी आहे. क्षेत्रफळाने पाहता ४२ टक्के प्रदेश या स्वायत्त राष्ट्रकांनी व्यापला आहे. बाकीच्या ५८ टक्के प्रदेशात ८.५ कोटी लोक सरमिसळ तऱ्हेने वसलेले आहेत. या प्रदेशात खालील दुहेरी विभागणी केलेली आहे.

प्रादेशिक : ५ **क्रे**, १९ **आब्लास्ट** ( प्रांत ) व १४ **ओक्रुग** (विभाग ). ओक्रुग हा प्रादेशिक विभाग आता रद्द केला असून, क्रे, आब्लास्ट व रेअन ( जिल्हे ) हे विभाग ठेवले आहेत; व सर्वात शेवटी खेडचांची व शहरांची सोव्हिएतस् आहेत.

 राष्ट्रीय : जेथे जेथे थोडी फार लोकवस्ती एकजिनसी आढळेल तेथे

स्वायत्तता देण्याच्या उद्देशाने ६ ' **स्वायत्त प्रदेश** ' Autonomous Provinces), १० " **राष्ट्रीय विभाग** "( National Regions), १४७ " **राष्ट्रीय लोकवस्ती** " ( National Areas) व ३२०० " **राष्ट्रीय प्राथमिक सोव्हिएटस्** " (National Soviets ) बनविलेली आहेत.

स्वायत्तता दिलेल्या स्वायत्त प्रदेशांना ' क्रे ' या मोठ्या राजकीय विभागाचा एक घटक म्हणून रहावे लागते. उदाहरणार्थ, " फार ईस्टर्न " क्रे मध्ये बिरोबिजान येथील दीडदोन लक्ष यहुद्यांच्या " स्वायत्त प्रदेशाचा " समावेश होतो. नीग्रो राष्ट्रीय सोव्हिएतना आपल्यावरच्या **रेअन** सोव्हिएत-मध्ये प्रतिनिधी पाठविता येतात. अशाच तऱ्हेने राष्ट्रीय लोकवस्तींच्या व विभागांच्या लोकांना प्रादेशिक सोव्हिएतच्या राज्यकारभारात भाग घेता येतो.

या दुहेरी पद्धतीमुळे लोकसभांच्या राज्यकारभारात एकसूत्रीपणा व नियोजन ठेवता येऊनही राष्ट्रीय जीवनाची विविधता व स्वायत्तता खालपासून वरपर्यंत अबाधित राहते.

सिडने व बिआट्रिस वेब यांनी " सोव्हिएत संस्कृति " नांवाचा एक प्रचंड ग्रंथ लिहला आहे व त्यात हीच गोष्ट वारंवार नमूद केली आहे की, सोव्हिएतच्या राजकीय, आर्थिक व इतर सर्व व्यवहारांत शिस्त व नियोजन आहे. पण ते अनेकविध आहे. ह्या अनेकविधपणातच लोकशाहीचे सार आहे, कारण हा गुण काढून टाकला की साम्राज्यवाद्यांची लोभी व राक्षसी शिस्त आलीच. निर्जीव, यांत्रिक व जुलमी एकजिनसीपणाऐवजी स्वायत्त अशा विविध घटकांच्या एकसूत्र बळावर सोव्हिएत लोकशाही अवलंबून आहे, ही गोष्ट वेब यांच्या ग्रंथात मांडलेली आहे, व राष्ट्रीय व राजकीय विभागणीत तिचा प्रत्यक्ष पुरावा आपण आताच पाहिला.

### कांही स्वायत्त लोकसमूह

आता या विभागणीप्रमाणे स्वायत्तता उपभोगणाऱ्या काही राष्ट्रीय लोकसमूहांचे राजकीय जीवन पाहू. सन १७६४ मध्ये व्होल्गा नदीच्या काठी काही जर्मन जमीनदार स्थाईक झाले. त्यांनी आपल्याबरोबर जमीन कसण्यासाठी हजारो जर्मन शेतकरीही आणले होते. क्रांतीनंतर या जर्मन वसाहतीला " व्होल्गा जर्मनांची " राष्ट्रभूमी मानण्यात आली. तेथील लोकसंख्या ६ लक्ष असून स्वायत्त राष्ट्रकाचा दर्जा या जर्मनांना मिळाला आहे. ग्रेटरशियन राष्ट्राच्या पार्लमेंटात इतर स्वायत्त राष्ट्रकांच्या बरोबरीचा मान व प्रतिनिधित्व यांना आहे. अंतर्गत राज्यकारभार जर्मन भाषेत जर्मन लोकच चालवीत आहेत. येथे जर्मन राष्ट्राचा इतिहास,

जर्मन कला व वाङमय यांचे संशोधन व वाढ होत आहे. आणि आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट अशी की, एकीकडे जर्मनांच्या पितृभूमीमध्येच आइन्स्टाइनसारखे शास्त्रज्ञ, थॉमस मॅनसारखे साहित्यिक व कार्ल मार्क्स-सारखे तत्वज्ञ यांच्या ग्रंथांची होळी करण्यापर्यंत नात्सी जर्मनांची मजल गेली असताना हे सोव्हिएतमधले जर्मन मात्र आपल्या राष्ट्रीय संस्कृतीची व कलेची जोपासना करताना दिसत आहेत.

या जर्मन स्वायत्त राष्ट्रकातही पुन्हा अल्पसंख्याकांचा प्रश्न आहे. पण तो नात्सी पद्धतीने न " सोडविता " सोव्हिएतच्या लोकशाही मार्गाने सोडविला आहे. खुद्द जर्मन वस्ती ६६ टक्के, ग्रेट रशियन २० टक्के, युक्रेनियन १२ टक्के व उरलेले २ टक्के असे या प्रदेशातील वस्तीचे वर्गीकरण आहे. या अल्पसंख्याकांची सोय लावण्यासाठी रशियनांचे बहुमत असलेल्या २ जिल्ह्यांमध्ये जर्मन व रशियन या दोन्ही भाषांतून सर्व व्यवहार चालतो व या जिल्ह्यांत रशियनांची प्राथमिक सोव्हिएतस् आहेत. दुसऱ्या दोन जिल्ह्यांत जर्मन व युक्रेनियन यांची जोडवस्ती आहे. तेथेही वरीलप्रमाणेच सोय केली आहे.

या जर्मनांची वस्ती ६ लक्षांवर असून त्यांना राष्ट्रभूमि आहे व औद्योगिक बाबतीत ते पुढारलेलेही आहेत. परंतु दुसरे उदाहरण आपण जिप्सी लोकांचे घेऊ. आपल्याकडील वंजारी किंवा इतर " गुन्हेगार " टोळ्यांच्या लोकांप्रमाणे यांची झारशाहीत दुर्दशा होती. पोलीस खात्याची क्रूर नजर त्यांच्यावर होती व भटकेपणाने, नाचतमाशा दाखवून किंवा इतर वाममार्गाने हे जिप्सी लोक गुजराण करीत. आता सोव्हिएतने त्यांच्या शिक्षणाची, स्थायी उद्योगधंद्यांची व शेतीची व्यवस्था केली आहे व त्यांची काही सोव्हिएतस् बनविण्यात आली आहेत. यांच्या जुन्या भाषेची, कलेची व लोककथांचीही जोपासना आता शास्त्रीय पद्धतीने होत आहे.

## युक्रेन व इतर राष्ट्रे

ग्रेटरशियानंतर मोठे व पुढारलेले घटकराष्ट्र म्हणजे युक्रेन. क्रांतीनंतरच्या काळात युक्रेनमध्ये पोलंड, जर्मनी व दोस्त राष्ट्रे यांची सैन्ये घुसली होती व सर्व प्रदेश या आक्रमकांनी उध्वस्त केला होता. शेवटी युक्रेनमधील जनतेने स्वयंसेवक सैन्य उभारून लोकसत्ताक स्थापले. परंतु युक्रेनियन लोकवस्तीचा एक मोठा भाग पोलंडने बळकाविलाच. तसेच या आक्रमणाचा फायदा घेऊन रुमानियाने बेसारेबिया हा विभाग बळकाविला. मोल्दाव्हिया राष्ट्राच्या दक्षिण विभागालाच बेसारेबिया हे नाव आहे. मोल्दाव्हियाचा

६,००,००० लोकवस्तीचा उत्तर भाग सोव्हिएतमध्य सामील झालेला व बेसारेबिया रुमानियाने आपल्या घशात घातलेला, अशी स्थिति या महायुद्धापर्यंत होती. नात्सींच्या पराभवानंतर दक्षिण व उत्तर विभागाचे संयुक्तीकरण करून मोल्दाव्हिया हे राष्ट्र नांदू लागले आहे. आज ते सोव्हिएटच्या घटक राष्ट्रांपैकी एक राष्ट्र आहे. गेल्या महायुद्धानंतर मात्र परिस्थिति वेगळी होती. पोलंडने बळकाविलेल्या युक्रेनच्या प्रदेशा-बद्दल किंवा बेसारेबियाबद्दल न्याय कोणापाशी मागावयाचा ? असा त्या वेळी प्रश्न होता. दोस्तांनी उभे केलेले राष्ट्रसंघाचे न्यायासन क्रांति-कारक सोव्हिएतला किंवा साम्राज्यवाद्यांच्या तावडीत सापडलेल्या गुलाम राष्ट्रांना न्याय देण्यासाठी नव्हते.

युक्रेनचे ३८० जिल्हे पाडलेले असून तेथे २५ " राष्ट्रीय लोकवस्ती " आहेत. त्यापैकी ७ जर्मन, ८ रशियन, ३ बुल्गेरियन, ३ ग्रीक, ३ यहुदी, व १ पोलिश लोकवस्ती आहे. याशिवाय १६ मोल्दाव्हियन, १० झेक, ४ बायलोरशियन, १ स्वीडीश व १ फ्रेंच अशी प्राथमिक सोव्हिएतस् आहेत.

युक्रेननंतर तिसरे युरोपियन राष्ट्र बायलो रशिया. या राष्ट्राचा एक मोठा भागही " रीगा " तहानुसार पोलंडने बळकाविला होता. परंतु सध्याच्या पोलिश लोकसत्ताकाने हा भाग बायलोरशियाला परत दिला आहे. ( युक्रेनचा बळकाविलेला भागही पोलंडकडून मिळाला असून रुमानियाने बेसारेबिया परत दिला आहे. )

यानंतर अझरबैजान, जॉर्जिया व अर्मेनिया ही राष्ट्रे घेऊ. यांपैकी अझरबैजानमध्ये १ स्वायत्त राष्ट्रक व १ स्वायत्त प्रदेश; आणि जॉर्जियात २ स्वायत्त राष्ट्रके व १ स्वायत्त प्रदेश आहे. पूर्वी या सर्वच प्रदेशावर जॉर्जियन राष्ट्राचा वरचष्मा होता. इतका की जॉर्जियन कम्युनिस्टां-मध्येही ही वरचढपणाची वृत्ति पुन्हा पुन्हा डोकावते ही गोष्ट स्टालिनला सन १९३६ मध्ये बजावून सांगावी लागली. परंतु, आता वेगवेगळ्या ८ राष्ट्रीय लोकसमूहांना तेथे स्वायत्तता मिळाली असल्याने समतेचे व सहकार्याचे शिक्षण सर्वांना लाभत आहे. झारशाहीच्या अमदानीत अर्मेनियन ख्रिश्चन व जॉर्जियन मुसलमान, तसेच मुसलमानांतील शिया व सुनी यांचे ' जातीय ' दंगे होत व अंगावर शहारे आणणाऱ्या कत्तली व जाळपोळ होई. परंतु, आता राष्ट्रीय व राजकीय व्यवहारांत या धार्मिक समजुतींना स्थान न राहिल्याने हे दंगे थांबले आहेत.

आशियावासी ५ राष्ट्रांसंबंधी आता थोडक्यात माहिती पाहू. त्यांपैकी 

सर्वात उत्तरेकडील काझाकिस्तान राष्ट्र विस्तृत परंतु एकजिनसी आहे. किरगीझस्तान राष्ट्र चिमुकले व मागासलेले आहे. उरलेल्या तीन राष्ट्रांपैकी उजबेगिस्तानमध्ये एक स्वायत्त राष्ट्रक व ताजिकिस्तानमध्ये १ स्वायत्त प्रदेश आहे. तुर्कमेनिस्तान एकजिनसी आहे. या पाच राष्ट्रांचा प्रदेश पूर्वी रशियन साम्राज्याच्या तीन प्रांतांत वाटलेला होता व आपल्याकडील संस्थानिकांसारखी तीन मांडलिक खान घराणीं तेथे आपला सुलतानी अंमल चालवीत होती. अधिकारी वर्ग, व्यापारी व कारखानदार ग्रेटरशियन राष्ट्राचे असत. त्यांच्या मदतीला उजबेग जातींतील वरिष्ठ वर्गाचे लोक असत. त्यामुळे त्यांना बाकीची राष्ट्रे पाण्यात पहात असत व या तीन प्रांतांतही एकसारखे दंगेधोपे चालत. मुल्लामौलवींचे प्रस्थ फार च होते आणि त्यामुळे अंधश्रद्धेच्या जोरावर हवी तशी चिथावणी देता येत असे.

आता तेथील लोकांची ७ लोकसमूहांत झालेली वाटणी भाषा व राष्ट्रीयत्व यांना धरून आहे व धर्म ही केवळ वैयक्तिक भावनेची बाब उरली आहे. याचा तेथील लोकांच्या जीवनावर काय परिणाम झाला आहे, याची कल्पना पुढे ताजिकीस्तानचे तपशीलवार वर्णन दिले आहे त्यावरून येईल.

सोव्हिएत युनियनच्या अनेकविध लोकसमाजाची व संयुक्त राज्यव्यवस्थेची ही ढोबळ रूपरेषा झाली. या राज्यात १६ घटक राष्ट्रे व २० स्वायत्त राष्ट्रके नांदत असून स्वायत्त प्रदेश, राष्ट्रीय विभाग, राष्ट्रीय लोकवस्ती व राष्ट्रीय सोव्हिएतस् यांची एकंदर संख्या ५००० चे वर जाईल. ही सर्व प्रादेशिक व राष्ट्रीय विभागणी कोणी वरून लादलेली नसल्यामुळेच लोकांच्या स्वयंस्फूर्त भावनांप्रमाणे व गरजांप्रमाणे विकास पावत गेलेली आहे, हे खालील माहितीवरून दिसेल.

| सन | घटक राष्ट्रे | स्वायत्त राष्ट्रे |
|---|---|---|
| १९२२ | ४ | १० |
| १९३७ | ११ | २२ |
| १९४६ | १६ | २० |

मोल्दाव्हिया व कॅरेलिया व या दोन स्वायत्त राष्ट्रकांना घटक राष्ट्रांचा दर्जा मिळाल्यामुळे १९३७ नंतर स्वायत्त राष्ट्रकांची संख्या कमी झालेली दिसते; परतु, त्याचबरोबर घटक राष्ट्रे व स्वायत्त प्रदेश यांच्यात वाढ झालेली आहे.

या लोकसमूहांपैकी एकदोन समूहांच्या जीवनासंबंधी जास्त तपशील पुढच्या प्रकरणात पाहू.

## यहुदी व ताजिक

सोव्हिएतमध्ये वसलेल्या अनेक राष्ट्रांचे जीवन एका अनेकराष्ट्रीय संयुक्त राज्याच्या एकसूत्र अंमलाखाली चाललेले आहे. त्या राज्यात वर्ण, वंश, धर्म वगैरे भेदांवर आधारलेल्या पंक्तिप्रपंचाला वाव नाही. माणुसकीला काळिमा आणणारे अत्याचार आज " सुधारलेल्या " अमेरिकेत नीग्रोंवर होत आहेत, व ब्रिटिशांच्या साम्राज्यात हिंदी व इतर लोकांवर होत आहेत. सर्व " सुधारलेल्या " राष्ट्रांत हे अनन्वित प्रकार चालू आहेत; इतकेच नव्हे तर सत्ताधाऱ्यांचा व लाचार राजनिष्ठ विद्वानांचा वंशश्रेष्ठतेच्या उद्दाम व रानटी तत्त्वाला व आचरणाला पाठिंबा आहे. परंतु सोव्हिएतमध्ये मात्र या हीन तत्त्वाला मुळीच थारा नाही. पॉल रॉबसनसारख्या प्रसिद्ध नीग्रोने, टागोर, जवाहरलाल प्रभृति हिंदी पुढाऱ्यांनी व इतरही वेगवेगळ्या वंशांच्या व राष्ट्रांच्या लोकांनी सोव्हिएतमधील समतेबद्दल प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे.

यहुदी लोक म्हणजे ख्रिश्चन संस्कृति पसरलेल्या सर्व राष्ट्रांतील एक दलित व पीडित समाज आहे. स्वतःला ' आर्य ' समजणाऱ्या जर्मन नात्सींनी तर यहुद्यांचा छळ करण्याचे एक ब्रीदच उचललेले होते. अशा या पीडित समाजाला सोव्हिएतमध्ये कसे वागविले जाते हे प्रथम तपशीलवार पाहू.

जगातील एकंदर यहुदी समाज सुमारे १६० लक्ष आहे. त्यापैकी ३० लक्ष पूर्वीपासून सोव्हिएतमध्ये रहात होते; शिवाय जर्मन, पोलंड वगैरे राष्ट्रांतून नात्सींच्या छळामुळे जीव घेऊन पळालेले सुमारे २२.५ लक्ष यहुदी सोव्हिएतचे रहिवासी झाले आहेत.

झारशाहीच्या काळात यहुद्यांच्या हालअपेष्टांना पारावर नव्हता. " घेटो " व " पेल " नांवाच्या महारवाड्यासारख्या वेगळ्या वस्त्यांमधून त्यांना कोंडून रहावे लागे. त्यांच्याबाहेर जर यहुदी भेटला तर त्याला लगेच पोलिसांच्या हवाली करण्यात येई व जबर शिक्षा होई. आपल्याकडे अंत्यजांच्या फक्त सावलीचा विटाळ मानीत. पण " घेटोचा " हा प्रकार त्याहून रानटी दिसतो. मधूनमधून पोलिसांच्या चिथावणीने या वस्त्यांवर गुंडांचे हल्ले होत व मग स्त्रियांवर बलात्कार, घरांची जाळपोळ व कित्येकदा सरसहा कत्तलही करण्यात येई. अशा हल्ल्यांना " पोग्राम " म्हणत व हीच अमानुष प्रथा सन १९३३ नंतर हिटलरने जर्मनीत जारी केली.

इतक्या असह्य परिस्थितीमध्ये हे लाखो यहुदी रहात होते, कारण अत्यंत दारिद्र्यामुळे त्यांना देशांतर करणेही शक्य नव्हते. तरीही सन १८८१ ते १९१० या काळात १० लक्षांवर रशियन यहुद्यांनी अमेरिकेत पळ काढला.

सोव्हिएत क्रांतीनंतर मात्र यहुदी लोकांचा छळ एकदम थांबला. यहुद्यांना कमी लेखणे हा गुन्हा ठरविला गेला. सोव्हिएत राज्यघटनेचे १२३ वे कलम असे आहे :

**" युनियनमधील प्रत्येक राष्ट्राच्या व वंशाच्या नागरिकाला इतरांइतकेच आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक हक्क आहेत व ही समानता या कलमान्वये निरपवाद व अढळ मानली जात आहे.**

**प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने समानतेच्या हक्काला बाध आणणे किंवा एकाद्या राष्ट्राच्या किंवा वंशाच्या नागरिकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने खास सवलती देणे, तसेच कोठल्याही राष्ट्राच्या किंवा वंशाच्या नागरिकांसबंधी द्वेषाचा, अनादराचा किंवा बहिष्काराचा प्रचार करणे हा गुन्हा समजून त्याविरुध्द कायदेशीर शासन केले जाईल. "**

पंक्तिप्रपंचाच्याबाबतीतला हा कायदा राष्ट्र व वंश यांच्यापुरताच लागतो असे नाही तर धार्मिक वगैरे बाबतींतही वरील कलमाची संपूर्ण अंमलबजावणी होते.

वरील कायद्याप्रमाणे यहुद्यांचा नुसता छळ थांबवून मात्र सोव्हिएतला स्वस्थ बसणे इष्ट वाटले नाही. कारण या पीडित समाजाला मदत करून त्यांना इतर नागरिकांच्याप्रमाणे सामाजिक व आर्थिक जीवनात भाग घेण्यास उत्तेजन देणे जरूर होते. या लोकांना नव्या उद्योगधंद्यांत, शेतीवाडीवर व सरकारी नोकऱ्यांत शिरकाव करून देणे जरूर होते; तसेच केवळ कारागिरीवर जेमतेम तगून राहणाऱ्या बहुसंख्य यहुद्यांच्या व्यवसायांची सहकारी पद्धतीने सोय लावणे व जम बसविणे आवश्यक होते. ह्या गोष्टी सोव्हिएतने झपाट्याने व मोठ्या प्रमाणावर केल्या. पूर्वी मज्जाव असलेल्या औद्योगिक कारखान्यांतून आता ७४.२ टक्के यहुदी लोकांना प्रवेश मिळाला आहे. अजून १६.१ टक्के यहुदी कारागीर आहेत. पण ते सर्व सहकारी पद्धतीने संघटित असून त्यांना सोव्हिएत आर्थिक नियोजनात मानाचे स्थान आहे. पूर्वी बहिष्कृत व तिरस्कृत यहुद्यांना झारच्या लष्करांत प्रवेश मिळणेच शक्य नव्हते. आता ५ लक्ष यहुदी लाल सैन्यात आहेत व त्यांत १०० वर जनरलच्या दर्जाला पोचले आहेत. इतके यहुदी सैनिक

इतक्या असह्य परिस्थितीमध्ये हे लाखो यहुदी रहात होते, कारण अत्यंत दारिद्र्यामुळे त्यांना देशांतर करणेही शक्य नव्हते. तरीही सन १८८१ ते १९१० या काळात १० लक्षांवर रशियन यहुद्यांनी अमेरिकेत पळ काढला.

सोव्हिएत क्रांतीनंतर मात्र यहुदी लोकांचा छळ एकदम थांबला. यहुद्यांना कमी लेखणे हा गुन्हा ठरविला गेला. सोव्हिएत राज्यघटनेचे १२३ वे कलम असे आहे :

**" युनियनमधील प्रत्येक राष्ट्राच्या व वंशाच्या नागरिकाला इतरांइतकेच आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक हक्क आहेत व ही समानता या कलमान्वये निरपवाद व अढळ मानली जात आहे.**

**प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने समानतेच्या हक्काला बाध आणणे किंवा एकाद्या राष्ट्राच्या किंवा वंशाच्या नागरिकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने खास सवलती देणे, तसेच कोठल्याही राष्ट्राच्या किंवा वंशाच्या नागरिकांसबंधी द्वेषाचा, अनादराचा किंवा बहिष्काराचा प्रचार करणे हा गुन्हा समजून त्याविरुध्द कायदेशीर शासन केले जाईल. "**

पंक्तिप्रपंचाच्याबाबतीतला हा कायदा राष्ट्र व वंश यांच्यापुरताच लागतो असे नाही तर धार्मिक वगैरे बाबतींतही वरील कलमाची संपूर्ण अंमलबजावणी होते.

वरील कायद्याप्रमाणे यहुद्यांचा नुसता छळ थांबवून मात्र सोव्हिएतला स्वस्थ बसणे इष्ट वाटले नाही. कारण या पीडित समाजाला मदत करून त्यांना इतर नागरिकांच्याप्रमाणे सामाजिक व आर्थिक जीवनात भाग घेण्यास उत्तेजन देणे जरूर होते. या लोकांना नव्या उद्योगधंद्यांत, शेतीवाडीवर व सरकारी नोकऱ्यांत शिरकाव करून देणे जरूर होते; तसेच केवळ कारागिरीवर जेमतेम तगून राहणाऱ्या बहुसंख्य यहुद्यांच्या व्यवसायांची सहकारी पद्धतीने सोय लावणे व जम बसविणे आवश्यक होते. ह्या गोष्टी सोव्हिएतने झपाट्याने व मोठ्या प्रमाणावर केल्या. पूर्वी मज्जाव असलेल्या औद्योगिक कारखान्यांतून आता ७४.२ टक्के यहुदी लोकांना प्रवेश मिळाला आहे. अजून १६.१ टक्के यहुदी कारागीर आहेत. पण ते सर्व सहकारी पद्धतीने संघटित असून त्यांना सोव्हिएत आर्थिक नियोजनात मानाचे स्थान आहे. पूर्वी बहिष्कृत व तिरस्कृत यहुद्यांना झारच्या लष्करांत प्रवेश मिळणेच शक्य नव्हते. आता ५ लक्ष यहुदी लाल सैन्यात आहेत व त्यांत १०० वर जनरलच्या दर्जाला पोचले आहेत. इतके यहुदी सैनिक

व सेनापति कोणत्याही काळात व देशात नव्हते, असे सोव्हिएत यहुदी अभिमानाने सांगतात.

या सर्व तरतुदी करताना यहुद्यांना प्राणाहून प्रिय असलेल्या धर्मावर काही गदा आणली काय ? नाही. सोव्हिएतचे धर्माच्याबाबतीत स्पष्ट धोरण कलम १२४ मध्ये असे मांडलेले आहे की ज्याला जो हवा तो धर्म आचरण्याची तेथे मुभा आहे. संयुक्त राज्य अमुक एका धर्माचे नसून धर्मनिरपेक्ष आहे. यहुदी समाज आपल्या धर्माचे व " यिडिश ' भाषेचे जतन सोव्हिएतमध्ये निर्वेधपणे करीत आहे, इतकेच नव्हे तर प्राचीन यहुदी ग्रंथांचे संशोधन तेथे चालू आहे. तेथे १००० यहुदी देवळे (सिनेगॉग) व २५०० राबी किंवा धर्मगुरू यहुदी धर्मीयांच्या धार्मिक आचाराची सोय करीत आहेत. तसेच बर्गत्सन, फेफर वगैरे तरुण यहुदी लेखक यिडिशमध्ये आधुनिक वाङमयही निर्माण करीत आहेत.

या बाबतीत झारच्या रानटी दडपशाहीचे व नात्सींच्या अमानुष छळाचे चित्र समोर असताना यहुदी समाज सोव्हिएत पद्धतीला किती मनापासून दुवा देत असेल याची कल्पना येईल.

## यहुदी राष्ट्रभूमी

यहुदी लोकांना युरोपमध्ये भोगावा लागलेला छळ व त्यांच्या मूळच्या पॅलेस्टाइन देशातून प्राचीन काळापासून झालेली त्यांची परागंदा अवस्था याचा परिणाम असा झाला आहे की आपल्याला एक स्वतःची राष्ट्रभूमी असली पाहिजे अशी आकांक्षा त्यांच्या मनात उत्पन्न झाली आहे, व त्या आकांक्षेसाठी धडपडणाऱ्या यहुदी लोकांची एक " झायोनिस्ट " नावाची आंतरराष्ट्रीय संस्था आहे. परंतु या चळवळीची व संस्थेची सूत्रे हलविणारे यहुदी पुढारी दुर्दैवाने ब्रिटिश व अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या आहारी गेल्यामुळे त्यांच्या आकांक्षेचा उपयोग करून घेऊन अरबस्तानमध्ये आपल्याला अनुकूल असा एक यहुदी प्रदेश साम्राज्यवाद्यांनी निर्माण केला आहे. पॅलेस्टाइनमधल्या १० लक्ष अरब जनतेवर लादलेला व साम्राज्यवाद्यांचा हस्तक बनलेला हा ४.८ लक्ष यहुदी लोकांचा समाज म्हणजे अरबस्तानच्या स्वातंत्र्यावर व लोकशाहीवर लटकणारी एक तलवारच आहे.

परंतु, यहुदी राष्ट्रभूमीची तरतूद निराळ्या व लोकशाहीच्या मार्गाने शक्य आहे हे सोव्हिएतने दाखवून दिले आहे. सोव्हिएतच्या कृषिशास्त्रज्ञांनी व यंत्रशास्त्रज्ञांनी लक्षावधि एकर जमीन अगदी नव्याने लागवडीखाली आणली. मोठमोठ्या यांत्रिक औतांच्या व इतर साधनांच्या साहाय्याने 

जुने पाणथळ प्रदेश पिकांना लायक केले. असाच बिरोबिजान नावाचा विस्तृत प्रदेश त्यांनी यहुदी वहसातीसाठी देऊ केला. हजारो यहुदी कुटुंबे तेथे जाऊन वसली व सोव्हिएतकडून मिळालेल्या मदतीने त्यांनी तेथे मोठमोठ्या सामुदायिक शेतवाडया निर्माण केल्या. सन १९२९ साली, या भागात ४२,००० एकर जमीन लागवडीखाली होती ती आज १००,००० एकर आहे व विजेची पॉवरस्टेशनस् व अनेक आधुनिक उद्योगधंदे उभारले गेले आहेत. या प्रदेशातील सार्वजनिक आरोग्य व संस्कृति यांच्या विकासासाठी पूर्वी ३,००,००० रुबल्स खर्च होत, ते आता ११,५००,००० रुबल्स खर्ची पडत आहेत. या प्रदेशात सध्या १०० वर शाळा, १७ हॉस्पिटलें व इतर सुखसोयी आहेत. पॅलेस्टाइनच्या दुप्पट मोठ्या क्षेत्रफळाचा हा प्रदेश आता यहुदी लोकांची राष्ट्रभूमि बनला आहे. सध्या त्यांची वस्ती कमी असल्याने त्याला स्वायत्त प्रदेशाचा दर्जा आहे. पण लवकरच त्याला स्वायत्त राष्ट्रकाचा दर्जा लाभेल.

याशिवाय बायलोरशिया, युक्रेन व क्रिमिया येथेही यहुद्यांची प्राथमिक सोव्हिएतस् असून तेथील सर्व कारभार स्वायत्तपणे चालत आहे. विशेषत: खेरसॉन विभागात अशी ११५ सोव्हिएतस् असून यहुदी वस्ती सुमारे १६००० आहे. ( १९२७ मधील ही माहिती आहे )

## ताजिकिस्तान

यहुदी लोकांची भाषा, धर्म व आचारविचार इतर लोकांपेक्षा वेगळे आहेत व म्हणून त्यांना अल्पसंख्याक जमात म्हणून सोव्हिएतमध्ये मानले जाते. परंतु, ताजिक लोकांची स्थिती थोडी वेगळी आहे. त्यांची भाषा व आचारविचार शेजारी राहणाऱ्या उजबेग वगैरे लोकांपेक्षा वेगळे आहेत, पण धर्म सर्वांचाच मुसलमानी आहे.तरीही ताजिक लोकांना वेगळे व स्वतंत्र राष्ट्र मानणे आवश्यक ठरले आहे. यावरून एक गोष्ट दिसून येते की केवळ एका धर्माचे अनुयायी म्हणून ते एका राष्ट्राचे नागरिक असे सोव्हिएतमध्ये मानले जात नाही. नाहीतर आशियावासी ५ सोव्हिएत राष्ट्रांचा धर्म एकच ( मुसलमानी ) आहे म्हणून येथील सुमारे २ कोटी लोकांना एकाच पॅनइस्लामी राष्ट्राचे नागरिक मानले असते. पण तसे केलेले नाही. उलट, या ५ राष्ट्रांच्या लोकसमूहांनी आपापले वेगवेगळे राष्ट्रीय अस्तित्व जाहीर केले आहे.

ताजिकिस्तानसंबधीची माहिती या दृष्टीने उपयोगी ठरेल. ( ताजिक लोकांशी आपला एक जुना ऐतिहासिक संबंधही आहे. "मोगल" पातशाहीचा संस्थापक बाबर हा ताजिक होता. त्याने आपल्या

मातृभाषेत. म्हणजे जुन्या ताजिक भाषेत लिहून ठेवलेली रोजनिशी प्रसिद्ध आहे. भरतखंडाच्या थेट उत्तरेस काश्मीरच्या सरहद्दीपासून फक्त ९ मैलांवर ताजिकिस्तान या समाजवादी सोव्हिएट लोकसत्ताकाची सरहद्द आहे. ताजिकिस्तान व काश्मीर यांच्यामध्ये अफगाणिस्तानचा निमुळता प्रदेश आहे; परंतु तो संपून पामीरच्या पठाराचा भाग लागतो. त्या ठिकाणी ताजिकिस्तानपासून काश्मीरची सरहद्द एक ठिकाणी अवघ्या ९ मैलावर येते. पामीरच्या पठाराचा हा प्रदेश कोणत्याच राज्याच्या हद्दीत येत नाही. अफगाणिस्तान, ताजिकिस्तान, तिबेट व काश्मिर यांच्या सरहद्दी या पामीरच्या अत्युच्च आणि निर्मनुष्य पठारावर जुळून येतात असे म्हणावयास हरकत नाही. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी अफगाणिस्तानमध्ये जे राजकीय व लष्करी डावपेच गेली कित्येक वर्षे लढविले त्यांचा उद्देश एवढाच होता की, सोव्हिएत ताजिकिस्तानसंबंधीच्या माहितीचा प्रसार होण्याच्या मार्गात अफगाणिस्तानमध्येच अडथळा उत्पन्न करावा व ते लोण परतंत्र हिंदुस्थानच्या बाहेरच थोपवावे.

ताजिकिस्तानचे क्षेत्रफळ सुमारे ब्रिटनइतके आहे, परंतु बराच भाग डोंगराळ असल्याने लोकवस्ती फक्त १५ लक्ष आहे.

झारच्या साम्राज्यातील " सेंट्रल एशिया " या भागात तीन प्रांत होते व ताजिकिस्तानची या प्रांतामध्ये हवी तशी वाटणी झालेली होती. काझाकिस्तान वगैरे इतर राष्ट्रांचीही हीच गत होती. बोखारा प्रांतात ताजिक लोकवस्तीचा बराच मोठा भाग होता. बोखारा प्रांतावर सन १९१८ मध्ये झारचा मांडलिक अमीर मीरअलीम सय्यद बहादुरखान राज्य करीत होता.

त्या काळात ताजिक लोकांवर शेजारच्या उजबेग लोकांतील सुखवस्तु वर्गाचे वर्चस्व होते, कारण हा अमीर उजबेग असल्याने त्यांच्या पाठीशी होता. त्यातून, ताजिक लोक मूळचे इराणी असून शिया पंथाचे, तर उजबेग सुनी पंथाचे होते. यामुळे नेहमी आपसात त्यांचे दंगे व कत्तली होत.

या परिस्थितीच्या विरुद्ध सन् १८८५ पासून अनेक वेळीं लोकांनी उठाव केले. सन १९०४ साली, या भागातील कारखान्यांतून सार्वत्रिक संप झाला व या संपाची संघटना रेल्वे कामगारांनी केली होती. यापैकी बहुतेक कामगार झारशाहीविरुद्ध चाललेल्या रशियन कामगारांच्या लढ्यात क्रांतिकारक चळवळीचा अनुभव घेतलेले रशियन कामगार होते. सन १९१६ साली पुन्हा एक सार्वत्रिक उठाव झाला, व ८०,००,००० लोकांनी त्यात भाग घेतला, झारशाहीने तो दडपून टाकला व १० लक्ष बंडखोरांनी शेजारच्या सिकींग प्रांतात पळ काढला. या उठावामुळे झारशाहीची पकड मात्र इतकी ढिली

झाली की मास्कोमध्ये झारशाहीचे आसन गडगडतांच कॉकेशस प्रांतातील राष्ट्रे व आशियावासी राष्ट्रे पुन्हा बंड करून उठली. ठिकठिकाणी कामगार, सैनिक व शेतकरी यांच्या क्रांतिकारक समित्या स्थापन झाल्या. इकडे, मॉस्कोमध्ये केरेन्स्कीचे समाजवादी म्हणविणारे परंतु संधिसाधू साम्राज्यवादी धोरण ठेवणारे "तात्पुरते" सरकार स्थापन झाले. या सरकारने झारशाहीचा कित्ता गिरविण्यास सुरवात केली. आशियावासी राष्ट्रांतील जनतेला व त्यांच्या "इत्तिफाकी" या संस्थेला लवकरच हे उमगले व ही संस्था बोल्शेव्हिकांच्याकडे वळू लागली. नोव्हेंबरमध्ये केरेन्स्कीची सत्ता संपून बोल्शेव्हिकांनी सत्ता घेतली व नवे धोरण अमलांत आणले. अवघ्या पंधरा दिवसांतच मॉस्कोहून एक जाहीरनामा निघाला व त्यात मुसलमान धर्माच्या जनतेस व आशियावासी राष्ट्रांस असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले की बोल्शेव्हिकांकडून कोणत्याही धर्मावर जलूम होणार नाही व सर्व राष्ट्रांचा वेगळे होण्याचा हक्क निर्वेधपणे मानला जाईल.

या जाहीरनाम्यामुळे व पूर्वीच्या अनुभवाभळे खिवा, बुखारा वगैरे ठिकाणचा मध्यमवर्गही बोल्शेव्हिकांकडे वळला व या ठिकाणी लोकसत्ताक राज्ये स्थापन होऊन त्यांनी स्वयंनिर्णयाचा हक्क अमलांतही आणला. खिवा व बुखारा ही दोन राज्ये सोव्हिएट संघराज्यातून बाहेर राहण्याचे ठरवूनदेखील मित्रभावाने वागत राहिली.

येथील रणक्षेत्रात प्रत्यक्ष लष्करी हस्तक्षेप करण्याचे ब्रिटिश साम्राज्यवादी मुत्सद्द्यांनी ठरविले. पॅनइस्लामिझमचा झेंडा उभारून एनवरपाशा पुढे झाला व त्याच्यामागे ब्रिटिशांची लष्करी ताकद व पैसा उभा होता. एनवरपाशा व जमिनदारवर्ग यांना विरोध करण्यास लोकसत्ताकांतील जनता उभी राहिली व पुढील लढचांत एनवरपाशा मारला गेला. त्याची जागा इब्राहिमखानाने घेतली व हा लढा सन १९२६ पर्यंत चालूच राहिला. या भागात जसे ब्रिटनने आक्रमण केले तसेच फ्रेन्च, जर्मन, जपानी साम्राज्यवाद्यांनी सगळीकडून आक्रमण चालविले होतेच, व ७५०० मैलांच्या आघाडीवर सोव्हिएट सत्तेला या वेळी लढावे लागत होते.

सन १९२६साली शेवटी इब्राहिमखानाचा पराभव झाला व तो अफगाणिस्तानात परतला. परंतु सन १९३१ च्या एप्रिलमध्ये इब्राहिमखानाने पुन्हा हल्ला चढविला. या चढाईत मात्र तो सोव्हिएत सैन्याच्या हाती सापडला व त्याच्या गावच्या सोव्हिएतने त्याची चौकशी करून त्याला देहान्त शासन दिले.

 सर्वच सोव्हिएत आशियावासी राष्ट्रांत अशा घडामोडी होत गेल्या व या

सर्व प्रदेशांतून जुने अमीर व सरदार यांची वाट लागली. यानंतर, प्रथम या प्रदेशात चार राष्ट्रीय विभाग पाडले गेले. या विभागणीमध्ये ताजिक लोकांना उजबेगिस्तानमध्येच सामील करण्यात आले, पण शेवटी ताजिकांचे स्वतंत्र राष्ट्र मानावे लागले व सन १९२९ मध्ये ताजिकिस्तान हे राष्ट्र जन्माला आले. या राष्ट्राच्या आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीसंबंधी नंतरच्या एका प्रकरणात माहिती दिली आहे.

**स्वयंनिर्णय कोणाला ?**

यहुदी लोक किंवा ताजिक लोक सोव्हिएत युनियनमध्ये अल्पसंख्याक आहेत व युनियनच्या सोव्हिएत समाजवादी पद्धतीमुळे त्यांना आपापला स्वतंत्र विकास करण्याची संधी मिळत आहे. परंतु स्वतंत्र विकासाची ही शक्यता वेगवेगळ्या लोकसमूहांना वेगवेगळ्या दर्जाची आहे. म्हणून कोणाला किती हक्क आहेत याचा थोडा तपशील पाहू.

प्रथमच एक गोष्ट सांगितली पाहिजे की आपल्याकडे जमाती किंवा जाती धार्मिक भेदाभेदाने ठरतात, (किंवा ब्रिटिश सत्ताधारी तसे ठरवितात), तसे सोव्हिएतमध्ये नाही. झारशाहीमध्ये कोणी आपखुशीने मुसलमान धर्म स्वीकारला तर शिक्षा होत असे व खुद्द कुराणातच फेरबदल करण्याचा प्रयत्न सन १८९१मध्ये करण्यात आला होता. त्या वेळी हजारो मुसलमानांनी देशत्याग केला. धार्मिक वैशिष्टयासाठी कोणाचा छळ किंवा उपेक्षा आता होत नाही, व धार्मिक वैशिष्टयाला तेथे स्थान नाही. तेथे धार्मिक जमातींना राष्ट्रीयत्वाचा हक्क दिलेला नाही. याचा स्पष्ट पुरावा हाच की तेथील मुसलमानांचे एक राष्ट्र नसून पाच वेगवेगळी राष्ट्रे आहेत.

मग याबाबतीत कोणते धोरण अंमलात येते ? व राष्ट्राचा दर्जा कोणत्या लोकसमूहाला मागता येतो ?

या प्रश्नाचे उत्तर सोव्हिएत युनियनने असे दिले आहे की सलग राष्ट्रभूमि, भाषा, आर्थिक सहजीवन आणि स्वभावरचना यांच्या ऐतिहासिक विकासामुळे ज्यांना एकजिनसी राष्ट्रीय संस्कृति लाभली आहे अशा लोकसमूहाला राष्ट्र हा दर्जा लाभतो. "राष्ट्रा" ची ही व्याख्या झाली. अर्थात ही व्याख्या कोणी कोणावर लादण्यासाठी किंवा एखाद्या लोकसमूहावर जबरदस्ती करण्यासाठी वापरावयाची नसून तिची अंमलबजावणी विभिन्न लोकसमूहांच्या इच्छेप्रमाणे व मतनोंदणीनेच झाली पाहिजे, असा सोव्हिएतचा दंडक आहे.

स्वयंनिर्णयाचा हक्क, म्हणजे नुसती स्वायत्तता नव्हे तर विभक्त होण्याचा हक्क, आणि हा हक्क फक्त राष्ट्रांनाच देता येतो. याबाबतीत सोव्हिएत

यूनियनच्या धोरणाचा तपशील असा आहे :

युनियनच्या १६ घटक राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा हक्क दिला गेला असून या राष्ट्रांना हवे तर विभक्त होणे भौगोलिक दृष्टचा व्यवहार्य आहे,कारण प्रत्येक घटक राष्ट्राला युनियनशी न लागलेली थोडीफार सरहद्द आहेच. घटक राष्ट्रांच्या बाबतीत दुसरे वैशिष्टच असे की प्रत्येकाची लोकसंख्या १० लक्षांहून जास्त आहे. दहा लक्षांहून जास्त लोकसंख्या असलेल्या लोकसमूहाला एकजिनसीपणे एका सलग भूप्रदेशावर राहता आल्याने त्याच्यात राष्ट्रीय जीवनाला आवश्यक शक्ति येऊं शकते, असा हा व्यवहार्य नियम आहे. ( हिंदी लोकसमूहांची उदाहरणे घेतली तर ही गोष्ट स्पष्ट होईल. ४९ लक्ष बुंदेले, १७ लक्ष गोंड किंवा २२ लक्ष भिल्ल घ्या. या लोकसमूहांना आपआपली राष्ट्रभूमि आहे व पूर्वी त्यांची वतंत्र राज्य होतीच. संख्येची मर्यादाही सोव्हिएत क्रांतीमध्ये आपोआपच उत्पन्न झाली आहे, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. राष्ट्राची नुसती पुस्तकी व्याख्या घेऊन दहापाच हजारांच्या टोळीलाही ती लागू करणे अशक्य नाही. पण अशा टोळीला 'राष्ट्र' म्हणणे म्हणजे त्या कल्पनेची थट्टा झाली. या दृष्टीने एक व्यवहार्य अशी संख्येची मर्यादा सोव्हिएतमध्ये सामील झालेल्या या राष्ट्रांनीच मान्य केली आहे. लोकसंख्येत वाढ होऊन काही स्वायत्तराष्ट्रके आता (सन १९३६मध्ये ) राष्ट्रे झाल्याचे सोव्हिएतने ठरविले. यावरून संख्येची मर्यादाही कोणाला मुद्दाम वगळण्यासाठी नाही, हे दिसून येते. घटकराष्ट्रांच्या बाबतीत आणखी एक तिसरे वैशिष्टच असे की त्या त्या राष्ट्रामध्ये लोकसंख्येपैकी भरीव बहुमत एका जमातीचे आहे. उदाहरणार्थ ताजिकिस्तानमध्ये असे भरीव बहुमत ताजिकांचे आहे. असे नसते तर त्याला ताजिकांचे राष्ट्र कसे म्हणता आले असते ?

वरील तीनही वैशिष्टचे व्यवहार्यतेच्या दृष्टीने व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या व विकासाच्या दृष्टीने ठरविली आहेत, आणि या १६राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा हक्क निरपवादपणे दिला आहे. एवढयानेच या संयुक्त राज्याचे लोकसत्तावादी स्वरूप दिसावयास हरकत नाही. पण याचे आणखी प्रत्यंतर आपल्याला स्वायत्त राष्ट्रके, स्वायत्त प्रदेश, राष्ट्रीय लोकवस्ती व प्राथमिक राष्ट्रीय सोव्हिएतस् यांच्या स्वायत्ततेच्या स्वरूपात दिसते. यहुदी व ताजिक लोकांच्या बाबतीत स्वायत्ततेचा तपशील आपण आधीच पाहिला आहे. तेव्हा आता संयुक्त राज्याच्या कारभाराला घटकराष्ट्रांकडून कसा हातभार लावला जातो, या कारभारात मतनोंदणी कशी होते, अल्पसंख्याकांना कोणत्या प्रमाणात मते मिळतात व या सर्व अनेकविधतेमध्ये एकसूत्रीपणा

व शिस्त कशी निर्माण होते याचा विचार पुढील प्रकरणात करू.

एका मुद्द्याचा येथेच संक्षेपाने विचार करावयास हरकत नाही. कोणी असे म्हणतात की, स्वयंनिर्णय व स्वायत्तता या हक्कांना जर व्यवहार्य व वास्तव स्वरूप आहे तर इतक्या वर्षांत एकाही घटकराष्ट्राने बाहेर पडण्याची इच्छाही दर्शविली नाहीं, हे कसे ? अशी शंकाही घेतली जाते की हे हक्क जरी जाहीर केले आहेत तरी सोव्हिएतची मध्यवर्ती सत्ता इतकी जबरदस्त आहे की विभक्त होण्याबद्दल ब्र काढण्याची कोणाची छाती होत नाही !

वरील कोटिक्रम व शंका निघण्याचे कारण असे की कोणत्या बिकट परिस्थितीतून ही सोव्हिएत राष्ट्रे वर आली व स्वतंत्र झाल्यावरही कोणत्या संकटाशी त्यांना झगडावे लागले याची कल्पना फार थोड्यांना असते. सन १९१७च्या आधी व नंतर या राष्ट्रांना साम्राज्यवादी शत्रूंशी निकराचा सामना द्यावा लागला. या लढ्यात एकएकटे राहून जगणेच त्यांना अशक्य होते. किंबहुना, पोलंड व फिनलंड ही वेगळी राहिली, पण त्याचा परिणाम असा झाला की, त्यांना इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी यांचे मांडलिक बनावे लागले. या परिस्थितीमुळे सोव्हिएत राष्ट्रांपैकी कोणालाही विभक्त होण्याची इच्छा झालेली नाहीं. उलट सोव्हिएत संयुक्त राज्यामध्ये जी समाजवादी नियोजनाची पद्धति स्वीकारली गेली त्याच्यामुळे दुर्बळ राष्ट्रांचाही फायदाच झाला व विभक्तीकरणाऐवजी या राष्ट्रांचे परस्पर सहकार्यच वाढत गेले. प्रत्येक राष्ट्र सार्वभौम व स्वतंत्र आहे ही गोष्ट नुसती तत्त्वतः मान्य करावयाची व व्यवहारात मात्र प्रत्येक राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आर्थिक व राजकीय वर्चस्व बसविण्याचा प्रयत्न करावयाचा, असा आजपर्यंत जगाचा अनुभव होता.पण अशी सार्वभौम व स्वतंत्र राष्ट्रे समानतेच्या व सहकार्याच्या पायावर एकत्र नांदू शकतात व संयुक्त राज्यही बनवू शकतात, हे सोव्हिएतमध्येच प्रथम अनुभवाला येत आहे.

## खरी संयुक्त राज्य घटना

स्वयंनिर्णयाचा हक्क असलेली १६ घटक राष्ट्रे व स्वायत्तता उपभोगणारी स्वायत्त राष्ट्रके, स्वायत्त प्रदेश व राष्ट्रीय लोकवस्ती या सर्वांचे मिळून सोव्हिएतचे संयुक्त राज्य बनले आहे; व या राज्याचा पाया अशा अनेकविध लोकसमूहांच्या स्वतंत्र विकासावर व सोव्हिएत ( लोकसभा ) पद्धतीवर उभारलेला आहे. आता या राज्याच्या दोन वैशिष्ट्यांकडे लक्ष देऊ. हे राज्य अनेकविध असले तरी प्राचीन साम्राज्यांप्रमाणे नावाला एकछत्री पण वस्तुतः विस्कळीत असे राज्य मात्र नाही.उलट ते अगदी सुसंघटित व एकसूत्र राज्य आहे. एकसूत्रपणाबरोबरच त्याचा दुसरा गुण म्हणजे ते राष्ट्रीयत्वा-

च्या दुरभिमानापासून अलिप्त असे राज्य आहे.

प्रथम दुसऱ्या मुद्द्याचा विचार करू. ब्रिटन, फ्रान्ससारखी राज्ये घेतली तर ती आपआपल्या राष्ट्रीयत्वाशी निगडित आहेत. जुने झारचे साम्राज्य किंवा ब्रिटन, जपान, जर्मनी वगैरे राष्ट्रांनी स्थापलेली साम्राज्ये घेतली तरी त्यांचे स्वरूपही राष्ट्रीयच आढळेल. गुलाम राष्ट्रांच्या राष्ट्रीयत्वाला ग्रासणारे जेत्यांचे राष्ट्रीयत्व या साम्राज्याशी निगडित असते. परंतु, सोव्हिएत संयुक्त राज्य मात्र रशियन किंवा इतर कोणत्याच राष्ट्रीय अभिनिवेशाने बांधलेले नाही. वेब या ग्रंथकाराने तर असे म्हटले आहे की असे "अराष्ट्रीय" राज्य (unnational State) बनविता येते हा एक नवा शोधच बोल्शेव्हिकांनी लावला आहे. सोव्हिएत राज्याला राष्ट्रीय रंग किंवा अभिनिवेश नाही असे म्हणावे तर सोव्हिएत राज्यघटनेत १६ घटकराष्ट्रांच्या राष्ट्रीय वृत्तीला विभक्त होण्यापर्यंत महत्त्व दिले आहे, असे कोणी म्हणेल. कोणाला यात परस्परविरोध दिसेल. पण यात विसंगत असे काही नाही. उलट असेच म्हणावे लागेल की घटकराष्ट्राना खरेखुरे व संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य देणारे संयुक्त राज्य कोणत्याही एका विशिष्ट राष्ट्रीयत्वापासून अलिप्त असणेच सयुक्तिक व न्याय्य आहे. अनेक धर्मांचे लोक असतात म्हणून राष्ट्रीयत्वाने धर्मापासून अलिप्त असावे ही गोष्ट जशी आपल्याला सहज पटते, त्याचप्रमाणे अनेकराष्ट्रीय संयुक्त राज्याचे स्वरूप "अराष्ट्रीय" का असले पाहिजे, हे देखील पटू शकेल.

आता संयुक्य राज्याच्या एकसूत्रीपणाचे स्वरूप पाहू, कारण अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविताना सोव्हिएतने आपले सामर्थ्य खच्ची न होण्यासाठी काय उपाय योजिले हे पाहिले पाहिजे.

पहिली गोष्ट ही लक्षात घेतली पाहिजे की सोव्हिएत युनियन हा नुसता राष्ट्रसंघ नसून संयुक्त राज्य आहे. सन १९२३ च्या जुलै महिन्यापर्यंत सोव्हिएत राष्ट्रे नुसती संघरूपाने एकत्र होती, परंतु ता. ६ जुलै रोजी या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन असा निर्णय घेतला की, "आपले संबंध जास्तजास्त दृढ होत गेले आहेत. म्हणून व आंतरराष्ट्रीय परिस्थितीकडे पाहून, आपण एक संयुक्त राज्य बनविले पाहिजे."

सोव्हिएत राज्यघटनेच्या कलम १३ पासून २१ पर्यंतची ९ कलमे या दृष्टीने तपासली पाहिजेत. यापैकी कलम १७ मध्ये स्वयंनिर्णयाचा हक्क नमूद केला आहे. कलम १८ मध्ये घटक राष्ट्रांच्या सरहद्दींबद्दल त्या त्या राष्ट्रांचे मत निर्णायक समजण्याचा दंडक आहे. कलम १३ मध्ये घटक राष्ट्राने आपखुषीने संयुक्त राज्यात प्रवेश केल्याचे नमूद केले आहे. तसेच

कलम १५ मध्य असे म्हटले आहे की घटक राष्ट्रांचे सार्वभौमत्व संयुक्त राज्याकडून संरक्षिले जाईल.

त्याचबरोबर कलम १४, १५, १९ व २० मध्ये असे म्हटले आहे की, संयुक्त राज्याकडे परराष्ट्रीय धोरण, युद्ध व तह, परराष्ट्रीय व्यापार, आर्थिक नियोजन वगैरे बाबतींत अधिकार आहेत. वेगवेगळ्या २३ प्रमुख बाबींमध्ये सर्व अधिकार केंद्रीय सत्तेकडे ( युनियनकडे ) आहेत. कलम २० मध्ये तर असे म्हटले आहे की घटक राष्ट्रांच्या कायद्यांपेक्षा संयुक्त राज्याचा कायदाच श्रेष्ठ मानण्यात येईल. याचा अर्थ काय ? मग घटक राष्ट्रांचे सार्वभौमत्व कोणते उरले ?

परंतु या वेगवेगळ्या कलमांमध्ये परस्परविरोधी असे काही नाही. विरोध भासतो त्याचे कारण असे की संयुक्त राज्याला शासनसंस्था (State) या नात्याने घटक राष्ट्रांनी आपखुशीने सोंपविलेले अधिकार व या राष्ट्रांचे सार्वभौमत्व यातला फरक आपण विसरतो. नागरिकाला व्यक्ति-स्वातंत्र्य असूनही तो शासनसंस्थेला जसे अधिकार सोंपवितो, तसेच काही अधिकार या ठिकाणी घटक राष्ट्रांनी शासनसंस्थेला सोपविले आहेत. नागरिकांचे स्वातंत्र्य व हवे तर बंड करण्याचा अधिकार नेहमी अबाधित राहतो, त्याप्रमाणे या घटक राष्ट्रांचा विभक्त होण्याचा हक्क अबाधित राहतो. संयुक्त राज्याचे अधिकार सर्वगामी आहेत खरे, पण ते केवळ शासनव्यवहारापुरते आहेत व सोपविलेले आहेत. अधिकार मुळात घटक राष्ट्रांचे असून ती राष्ट्रेंच खरी सार्वभौम आहेत. हीच गोष्ट कलम १५ मध्ये नमूद केली आहे.

या बाबतीत आपल्याकडे विद्वानांत फार गैरसमज आहेत. दोनच उदाहरणे पाहा. ता. ३-१-१९४५ रोजी, बेझवाडा येथील भाषणात डॉ. राधाकुमुद मुकर्जी यांनी असे उद्‌गार काढले की "सोव्हिएत फेडरेशनने सबंध राष्ट्राचे हितसंबंध अबाधित राखण्यासाठी स्वतःकडे बरेच अधिकार राखून ठेविले आहेत." दुसरे बॅरिस्टर जयकर यांचे ता. १२-८-१९४५ चे पुणे येथील पुढील उद्‌गार पहा: ते म्हणतात, " रशियाकडे स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाबाबत बोट दाखविणारांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, रशियात ह्या तत्त्वास आर्थिक व संरक्षणाच्या दृष्टीने योग्य ती मुरड घातली आहे." वस्तुस्थिति मात्र अशी आहे की आर्थिक, लष्करी किंवा इतर कोणत्याही सबबीवर राष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला, म्हणजे सार्वभौमत्वाला मुरड घालण्याचे धोरण सोव्हिएतने कधी पत्करले नाही. सोव्हिएत घटनेतील काही कलमे वेगळी काढून वाचली तर तसा गैरसमज होईल; पण एकंदर

घटना व प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहिल्यास तो दूर होईल.

यापुढे जाऊन जर आपण या संयुक्त राज्याची प्रत्यक्ष रचना पाहिली तर अनेक गोष्टी स्पष्ट होतील. हे राज्य चालविणारी मध्यवर्ती संस्था "सुप्रीम सोव्हिएत" या नावाने ओळखतात. तिच्यामध्ये दोन सभा आहेत. एक लोकप्रतिनिधींची व दुसरी राष्ट्रप्रतिनिधींची. पहिलीमध्ये बसणारे सभासद ३,००,००० नागरीकांना एक प्रतिनिधी याप्रमाणे निवडले जातात. दुसऱ्या सभेचे प्रतिनिधी खालीलप्रमाणे निवडतात :

| | | |
|---|---|---|
| प्रत्येक लहानमोठ्या घटक राष्ट्राचे | २५ | प्रतिनिधी |
| प्रत्येक स्वायत्त राष्ट्रकाचे | ११ | ,, |
| प्रत्येक स्वायत्त प्रदेशाचे | ५ | ,, |
| प्रत्येक राष्ट्रीय लोकवस्तीचा | १ | ,, |

या पद्धतीने निवडलेल्या १९४६ सालच्या मध्यवर्ती सोव्हिएतमध्ये एकंदर १३३९ प्रतिनिधी होते. लोकप्रतिनिधींच्या सभेत (Union Soviet) ६८२ व राष्ट्रप्रतिनिधींच्या सभेत (Soviet of Nationalities) ६५७ अशी संख्या होती. राष्ट्रप्रतिनिधी सभेत १६ राष्ट्रांचे ४००, स्वायत्त राष्ट्रकांचे २२० व स्वायत्त प्रदेश व राष्ट्रीय विभाग यांचे ३७ असे प्रतिनिधी निवडले गेले. एकंदर १३३९ प्रतिनिधींपैकी २६५ स्त्रिया होत्या व त्यांपैकी बऱ्याच जणी मागासलेल्या राष्ट्रांतून निवडल्या गेल्या होत्या, हे लक्षात घेण्यासारखे आहे. या दोन सभांची निवडणूक पाहिली तर दिसून येईल की, अल्पसंख्याकाना या मध्यवर्ती संस्थेत मोठेच स्थान आहे; शिवाय ते निर्णायकही आहे. कारण या दोन सभांना अगदी समान हक्क आहेत. कोणचाही कायदा यूनियनमध्ये लागू व्हायचा तर तो दोन्ही सभांत वेगवेगळा मान्य व्हावा लागतो. राष्ट्रप्रतिनिधींच्या सभेत एकंदर ६५७ सभासदांपैकी ग्रेटरशियाचे फक्त २५ सभासद आहेत; आणि मागासलेल्या राष्ट्रांचे सहज बहुमत होण्यासारखे आहे.

या व्यवस्थेमुळे अल्पसंख्याकांना कसे प्रतिनिधित्व मिळते ते पाहण्यासारखे आहे. प्रथम यहुद्यांची गोष्ट घेऊ. नुसती "दरडोई एक मत" या पद्धतीने निवडणूक करून या जमातीला एकही प्रतिनिधी मिळण्याची शक्यता नव्हती. कारण हा समाजच इतका विखुरलेला आहे. बरे यासाठी युनियनमधल्या सर्वयहुद्यांचा एक मतदारसंघ बनविणे म्हणजे लोकशाहीची विटंबना ठरली असती ! कारण ज्या उमेदवाराविषयी काहीच माहिती नाही त्याला केवळ आपला जातभाई म्हणून मत देण्याची पाळी यहुदी समाजावर आली असती; म्हणून, सोव्हिएतने ज्यूंचा असा जातवार मतदार संघ तयार

केला नाही. परंतु ज्या ठिकाणी हजारो यहुदी एकत्र वसाहत करून स्थायिक झाले त्या बिरोबिजान भागाला त्यानी स्वायत्त प्रदेशाचा दर्जा दिला, व तेथून निवडलेले ५ यहुदी प्रतिनिधी राष्ट्रप्रतिनिधी सभेत बसतात. एकंदर यहुदी लोकसंख्येच्या मानाने हें प्रतिनिधित्व कमी आहे. परंतु निवडले जाणारे पाच प्रतिनिधी हे खरोखरच आपल्या यहुदी समाजात राहणारे व म्हणून कार्यक्षम असे प्रतिनिधी असू शकतात.

दुसरे उदाहरण ताजिक लोकांचे घेऊ. या लोकांना नुसते संख्याबळाकडे पाहता ५ प्रतिनिधी मिळावयास पाहिजे होते, पण प्रत्यक्ष ३० मिळतात. त्यांपैकी ५ लोकप्रतिनिधी सभेत व २५ राष्ट्रप्रतिनिधी सभेत बसतात. यापैकी दुसऱ्या सभेत त्यांचे स्थान घेतले तर ०.८३ टक्के लोकसंख्येच्या ह्या गटाला ४·२ टक्के प्रतिनिधित्व मिळते. डॉ. आंबेडकर यांनी ता. ६ मे १९४५ रोजी मुंबई येथील भाषणात असे म्हटले की, शीख समाज १.५ टक्के असून त्याला ४ टक्के प्रतिनिधीत्व असावे. सोव्हिएतच्या मध्यवर्ती संस्थेत शिखापेक्षा लहान अशा ताजिक लोकसमूहाला किती जास्त प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत आहे, ही गोष्ट तुलना करण्यासारखी आहे. त्यांतून या ताजिकाना हवे तर विभक्त होण्याचा हक्क आहे, हे वेगळेच.

सोव्हिएतच्या मध्यवर्ती संस्थेत ( सुप्रीम सोव्हिएतमध्ये ) प्रत्येक राष्ट्रीय समूहाला प्रातिनिधिक स्थान आहे; आणि संयुक्त राज्याचे सर्व कायदे व नियोजन या प्रतिनिधी सभांतून पास होऊन मगच लागू होते.त्यामुळे त्यांत एकसूत्रपणा राहतो व घटकांच्या सहकार्याने उत्पन्न झालेल्या या सर्व नियोजनात एक स्वयंस्फूर्त अशी शिस्त राहते.

या संयुक्तराज्याची वर सांगितलेली वैशिष्टये जास्त स्पष्ट दिसण्यासाठी अमेरिकेच्या संयुक्त राज्याशी व सन १९३५ मध्ये तयार केलेल्या हिंदी फेडरेशनशी त्याची संक्षेपाने तुलना करू.

अमेरिकन संयुक्त राज्यात व सोव्हिएत राज्यामध्ये मुख्य फरक असे आहेत की, अमेरिकन राज्याची घटक राज्ये ही वैशिटयपूर्ण अशा लोकसमूहांची राष्ट्रे नसून एकाच राष्ट्रातील प्रांतासारखे निव्वळ प्रादेशिक विभाग आहेत. दुसरे म्हणजे तेथील मध्यवर्ती संस्थेतही दोन सभा असल्या तरी त्यात समानता नाही. स्टेटस्च्या प्रतिनिधींच्या सभेला ( सीनेटला ) पुष्कळच निर्णायक अधिकार आहेत. तिसरा भेद असा की, नीग्रो, रेड-इंडियन वगैरे अल्पसंख्याक लोकसमूहांना समानता दूरच राहिली, पण साधे नागरिकांचे अधिकारही कित्येक स्टेटस्मध्ये नाहीत. कित्येक स्टेटस्मधून त्यांना अमानुषपणे छळण्यात येते. एकंदरीत, अमेरिकेचे संयुक्त राज्य हे

वस्तुतः इतर एकराष्ट्रीय राज्याप्रमाणच असून लोकशाहीची अंमलबजावणी अनेक दृष्टींने अपुरी आहे.

आता सन १९३५ ची हिंदी फेडरल ( संयुक्त ) राज्यघटना घेतली तर तिचे सोव्हिएत राज्याशी मुळीच साम्य दिसणार नाही. हिंदी संयुक्त राज्यामध्ये प्रांतांना स्वायत्तता व संस्थानिकांना सामील होण्याचा किंवा न होण्याचा " स्वयंनिर्णय " दिलेला आहे. परंतु प्रांत व संस्थाने ही कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी एकजिनसी लोकसमूह नाहीत व त्यामुळे त्यांचे संयुक्त राज्य हे केवळ एकाद्या साम्राज्यासारखे बनणे शक्य आहे. हैद्राबादसारखे संस्थान म्हणजे मराठी, कानडी व आंध्र लोकसमूहांना एकत्र जखडून बनलेले राज्य आहे. तसेच मुंबई व मद्रास प्रांत म्हणजे मराठी, गुजराथी, कानडी, तामिळ, आंध्र वगैरे अनेकविध लोकसमूहांना हवे तसे विभागून व जुळवून बनविलेले कृत्रिम राज्यविभाग आहेत. महाराष्ट्राची गोष्ट घेतली तर त्याचा मोठा भाग हैद्राबाद संस्थानात, दुसरा मध्यप्रांतात व तिसरा मुंबई प्रांतात अशी फाळणी झालेली आहे; उलट कानडी प्रजा असलेला बराच प्रदेश व सुमारे ७ लक्ष कानडी प्रजा मराठी संस्थानिकांच्या अंमलाखाली असल्याने कृत्रिमपणे महाराष्ट्रात मोडत आहे. अशा स्थितीत खऱ्या लोकशाही स्वरूपाचे संयुक्त राज्य कसे निर्माण होणार ? व अशा कृत्रिम तऱ्हेने बनविलेल्या संयुक्त राज्याची सोव्हिएतशी तूलना तरी कशी करणार ?

आतापर्यंत सोव्हिएत संयुक्त राज्यामध्ये वेगवेगळ्या जमातींना कोणते राजकीय स्थान आहे व राज्यघटनेमध्येच सर्व लहानमोठ्या जमातींच्या धार्मिक व राजकीय स्वातंत्र्याची कशी हमी घेतली गेली आहे, हे आपण पाहिले. १९ कोटी लोकसंख्येच्या या खंडप्राय राज्यात अनेकविध अल्पसंख्याक लोकसमूहांची एकजूट घडवून आणण्यात सोव्हिएतला का यश आले, त्याची मुख्य राजकीय कारणे आपण पाहिली. आता या जमातींच्या आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक व इतर योगक्षेमाकडे त्या संयुक्त राज्यव्यवस्थेमध्ये कसे लक्ष पुरविले जाते, ते पाहू.

प्रथम या युद्धानंतर दिसू लागलेली एक गोष्ट नमूद करावीशी वाटते.

सोव्हिएतच्या या अनेकराष्ट्रीय संयुक्त राज्यपद्धतीची उपयुक्तता पूर्व युरोपमधील राष्ट्रांना पटू लागल्याची उदाहरणे आता दिसू लागली आहेत. झेकोस्लोव्हाकियामधील रुथेनियन लोकसमूहाने नुकतेच असे दर्शविले आहे की एक राष्ट्र म्हणून आपल्याला सोव्हिएत संयुक्त राज्यात सामील व्हायचे आहे; आणि झेकोस्लोव्हाकियानेही या इच्छेला संमति दिलेली आहे. युगोस्लाव्हियामध्ये क्रोट, सर्ब वगैरे तीनचार घटक राष्ट्रे आहेत व त्या

सर्वांचे सयुक्त राज्य बनविण्याची घोषणा नुकतीच मार्शल टिटोनी केली आहे. तसेच बुल्गेरिया, युगोस्लाव्हिया व ग्रीस यामध्ये विभागलेल्या मॅसिडोनिया नावाच्या राष्ट्राला आता संयुक्तीकरण व स्वातंत्र्य लाभणे शक्य झाले आहे, कारण या राष्ट्राचे तुकडे आपापल्या राज्यांतून मुक्त करण्याची इच्छा बुल्गेरिया व युगोस्लाव्हिया या राष्ट्रांनी दर्शविली असून ग्रीसलाही तसे करावे लागेलच. इतक्या सुलभ पद्धतीने पूर्व युरोपच्या लहानमो ्या राष्ट्रांचे स्वातंत्र्य रक्षण झाले असून हा मोठाच बिकट प्रश्न स्वयंनिर्णयाच्या व संयुक्तराज्य पद्धतीच्या मार्गाने आता सुटेल असे दिसत आहे.

राष्ट्रीय प्रश्न सोडविण्याची सोव्हिएत पद्धती अमेरिकन नीग्रोंच्याबाबतीत लावणे शक्य तर आहेच, पण आवश्यकही आहे. अमेरिकेतील "ब्लॅक बेल्ट" प्रदेशात नीग्रो समाजाचे राष्ट्र बनणे शक्य आहे. नीग्रोंच्या प्रश्नाकडे भूतदयावादाच्या व वांशिक समतेच्या दृष्टीने पाहण्याची प्रथा आजपर्यंत चालू आहे व अमेरिकेतील सर्व लोकसत्तावादी पक्ष, कम्यूनिस्ट व इतर समाजवादी पक्ष नीग्रोंच्या वतीने लढण्यास तयार आहेत. परंतु नीग्रोंना अमेरिकन राष्ट्राचे नागरिक समजावे व समतेने वागवावे, एवढीच सर्वांची मागणी आहे. परंतु नीग्रोंचे राष्ट्र बनू शकते व प्रत्यक्षात "ब्लॅक बेल्ट" प्रदेशाला नीग्रो राष्ट्रभूमि समजणे आवश्यक आहे, ही गोष्ट आजपर्यंत कोणी मांडलेली नव्हती. याच वर्षी, जानेवारीमध्ये, अमेरिकन कम्युनिस्ट पक्षाने आजपर्यंतची ही चूक सुधारली असून नीग्रोंच्या चळवळीला वांशिक समतेबरोबरच राष्ट्रीय जीवनाचे व स्वयंनिर्णयाचे अधिष्ठान आहे, असे म्हटले आहे. संयुक्त अमेरिकन राज्य जर अशा राष्ट्रीय आधारावर पुनर्घटित झाले तर ते अमेरिकन लोकशाहीचे व स्वातंत्र्याचे खरेखुरे प्रतीक व सोव्हिएत युनियन सारखेच एक अनेकराष्ट्रीय प्रबळ राज्य होईल, असे अमेरिकन कम्यूनिस्ट पक्षाचे मत आहे. ("Political Affairs" या अमेरिकन कम्यूनिस्ट मासिकाच्या जानेवारी १९४७ च्या अंकात या विषयासंबधी दोन लेख आहेत )

## सोव्हिएत आशियातील कारखाने

राज्यघटनेतील कलमे व आश्वासने कित्येकदा नुसती देखाव्यासाठी व पोकळ असू शकतात, याचा अनुभव आपल्याला आहे. "ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन" असे भरगच्च, ऐसपैस व सोज्वळ नाव पण व्यवहार मात्र उलटा, असे आपण पाहातच आहोत. अनेक राष्ट्रांची संपत्ती मूठभर भांडवलदारांच्या खिशात ओतली जाणे याला "कॉमनवेल्थ" हे नाव आहे हे आपण ओळखतो. आपल्या दृष्टीने शेवटी स्वयंनिर्णयाच्या

हक्काची किंमत व कसोटी तरी काय? तर ती कसोटी आपल्याला प्रत्यक्ष आर्थिक व सांस्कृतिक भरभराट पाहूनच लावता येईल. सोव्हिएत संयुक्त राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहांना हक्क असतील, पण त्यांची पिळवणूक होत असेल तर मग ते हक्क नुसते निरुपयोगीच नव्हेत तर उलट भोंदूपणाचे दिलेले "हक्क" आहेत असेच कोणीही समजेल.

यासाठी तेथील जनतेच्या, विशेषत: मागासलेल्या, अल्पसंख्याक व दुर्बळ लोकसमूहांच्या, प्रत्यक्ष स्थितीचा विचार करू.

झारशाहीच्या काळात ग्रेटरशिया व युक्रेन ही राष्ट्रे पुढारलेली होती व तेथील कारखानदारीला कच्चा माल व बाजारपेठ पुरविणे हे इतर राष्ट्रांच्या नशिबी होते. इतर सर्व प्रदेश वसाहतीसारखे होते. आजचे उजबेगस्तान घ्या. या भागातील मुख्य शहर ताश्कंद. येथील काही धनिकांनी एक कापडाची गिरणी काढण्याची परवानगी मागितली. झारने ती नामंजूर केली. कारण तसे होणे ग्रेटरशियन मालकांना नको होते. मुबलक नैसर्गिक संपत्ती, कच्चा माल,कसबी लोक वगैरे सर्व काही असून झारच्या राजवटीत आशियावासी राष्ट्रे अगदी मागासलेली व दरिद्री राहिली. किरगिझिस्तानसारखे प्रदेश तर नुसते मेंढपाळांचे देश राहिले.

झारशाहीचे हे साम्राज्यवादी धोरण ग्रेटरशियन भांडवलदारांच्या फायद्याचे होते, परंतु तेथील कामगारांची गुलामगिरी त्यामुळे कमी जाचक नव्हती. आणि शेवटी तेथील कामगारांनी क्रांति करून सोव्हिएत समाजवादी राजवट स्थापन केल्यावर असे धोरण आंखले की युनियनमधील सर्व राष्ट्रांमध्ये कारखानदारीची वाढ होऊ द्यावयाची. युनियनने जी आर्थिक योजना आंखली तिचा उद्देशच हा होता कीं,शेतीच्या व्यवसायात तसेच मागासलेल्या प्रदेशात आधुनिक यंत्रपद्धतीचा जास्तीत जास्त उपयोग करून उत्पादन वाढवीत जावयाचे. चढाओढ, बाजारपेठासाठी धडपड वगैरे गोष्टी सोव्हिएत पद्धतीमुळे नाहीशा झाल्या होत्या व जितकी उत्पादनात वाढ होईल तितकी जनतेच्या फायद्याचीच होती. ग्रेटरशियन राष्ट्रालाच सर्व कारखानदारीचा मक्ता देण्यात कोणचाच वैयक्तिक फायदा नव्हता व ग्रेटरशियन कामगार वर्ग व त्याचे बोल्शेव्हिक पुढारी संकुचित राष्ट्रीय स्वार्थाच्या आहारी जाणारे नव्हते.

सोव्हिएतच्या अवाढव्य पंचवार्षिक योजनांमुळे उजबेगस्तानसारख्या पूर्वीच्या शेतकीप्रधान राष्ट्रांचे स्वरूपच पालटून गेले. ज्या ताश्कंदमध्ये एक गिरणी काढणे झारने गैरकायदा ठरविले होते तेथेच आता १.१ लक्ष वार सुती कापड दरवर्षी विणले जात आहे. शेजारीच फेरगाना

या छोटया शहरात ४७,००० स्पिंडल्सची गिरणी सुरू आहे. रेशमाचे कापड, " वनस्पति " तेल वगैरे गोष्टींचे मोठमोठे कारखाने निघाले असून दुसरे अनेक लहानमोठे धंदे सुरू झाले आहेत.

उजबेगिस्तानमध्ये खनिज तेल व कोळसा निघेल अशी भूगर्भशास्त्रज्ञांना पूर्वीपासून कल्पना होती. झारच्या काळात देखील ही गोष्ट ठाऊक होती, इतकेच नव्हे तर ब्रिटिश भांडवलदारांची या भागावर एकसारखी नजर होती ती या तेलासाठी व कापसासाठीच.पण झारच्या साम्राज्यवादी धोरणामुळे या भागाची औद्योगिक प्रगति होऊ शकली नाही, तसेच ह्या खाणींकडेही दुर्लक्ष झाले.झारशाहीच्या जागी सोव्हिएत सत्ता येताच सर्व बदलले.अनेक उजबेग तरुणांना भूगर्भशास्त्राचे शिक्षण देण्यात आले, या संशोधकांनी सर्व प्रदेश धुंडाळला व अखेरीस तेल व कोळसा यांच्या खाणी शोधून काढल्या. पूर्वी बाहेरून तेल व कोळसा पाठवून उजबेगस्तानच्या कारखानदारीला मदत द्यावी लागत होती; आता सन १९३८ मध्ये तेथे २,२५,३०० टन तेल निघते. बुखारा, शिराबाद व समरकंद विभागाला आता खाणींच्या या उद्योगधंद्यामुळे भरभराटीचे स्वरूप आले आहे.शिराबाद येथील कोळशाच्या खाणी व आलमिल्क विभागांतील तांब्याच्या खाणी सुरु झाल्या असून तेथे तांबे शुद्ध करण्याचा प्रचंड कारखाना निघाला आहे.

हा भाग डोंगराळ असल्याने जलनिर्मित विद्युतशक्तीचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर होत आहे,व हे राष्ट्र शक्य तोवर सर्व बाबतीत स्वयंपूर्ण व्हावे असा प्रयत्न केला जात आहे. सन १९२५ पर्यंत आपल्याकडील राजस्थान किंवा सिंधप्रमाणे औद्योगिक बाबतीत मागासलेले हे राष्ट्र आज इतके पुढे गेले आहे की तेथील वट उत्पन्नापैकी ७५ टक्के उत्पन्न आता कारखानदारीचे आहे. ही प्रगति फक्त २० वर्षात झाली व ती वैयक्तिक नफ्याचे आमिष नसताना सामुदायिक नियोजन पद्धतीने झाली, हे लक्षात घेण्यासारखे आहे. तेथील सामुदायिक शेतीवरील उत्पादनदेखील खरे म्हणजे यंत्रांनी व मोठ्या प्रमाणावरच होत आहे. तेव्हा तेही जमेला घेतले तर ९९.१ टक्के उत्पादन आधुनिक यंत्रसाधनांनी मोठ्या प्रमाणावर होत आहे. उजबेगस्तानच्या या विलक्षण प्रगतीचा वेग लक्षात येण्यासाठी हिंदुस्थान किंवा इतर परतंत्र देशातील उद्योगधंद्याची साम्राज्यवादाने केलेली गळचेपी पाहण्यासारखी आहे. सन १९३६ मध्ये हिंदुस्थानच्या एकंदर उत्पादनापैकी फक्त १७ टक्के उत्पादन उद्योगधंद्याचे होते. सन १९६० पर्यंत, हे १७ टक्के औद्योगिक उत्पादन 

३५ टक्केपर्यंत नेता येईल अशी बिर्ला व टाटा यांची औद्योगीकरणाची योजना आहे. आणि ही योजना महत्त्वाकांक्षी समजली जात आहे !

औद्योगीकरणाच्या बाबतीत परकीय भांडवलदारी सत्तेखालील हिंदुस्थानासारख्या देशाची किती गळेचेपी झालेली आहे ही गोष्ट येथील एकंदर भांडवलाच्या रकमेवरूनही थोडीफार दिसेल. सध्या हिंदी उद्योगधंद्यांतून व रेल्वे वगैरे वाहतुकीच्या साधनांमधून १५८० कोटि रुपये गुंतले आहेत. लहान धंद्याचे भांडवल धरून ही रक्कम २,००० कोटि धरली तर दर माणशी रु. ५० इतके अल्प हे प्रमाण पडते. टाटाबिर्ला योजनेप्रमाणे सन १९६० पर्यंत हे प्रमाण रु. २५० इतके वाढावयाचे आहे. हे प्रमाण ब्रिटनमध्ये दर माणशी रु. ४५०० इतके आहे. ब्रिटिश वसाहतीचा आफ्रिकेतील एक प्रदेश, नॉर्थ ऱ्होडेशिया, घेतला तर तेथे दर माणशी रु. ६००इतके भांडवल आहे. हे प्रमाण हिंदुस्थानच्या मानाने इतके जास्त दिसते कारण तेथे लोकवस्ती फार थोडी असून सोन्याच्या खाणी आहेत. पण या भांडवलाच्या बाबतीतही पुढील माहिती लक्षात घेण्यासारखी आहे.

ऱ्होडेशियामधील परिस्थिति स्पष्ट तऱ्हेने दाखविणारे कांही आकडे मि. लिओनार्ड बार्नेस या इंग्रज ग्रंथकाराने दिले आहेत. ऱ्होडेशियामध्ये दर माणशी रु. ६०० इतके भांडवल गुंतले आहे खरे, पण त्यांतही मुख्य गोम अशी की ऱ्होडेशियांतले हे भांडवल गोऱ्या लोकांच्या हाती आहे. तेव्हा तेथील गोऱ्या लोकसंख्येशी भांडवलाचे प्रमाण काढले तर ते दर माणशी रु. २२,५०० इतके पडते. पण खरी स्थिति याहून वाईट आहे. ऱ्होडेशियातले सर्व गोरे लोकही तेथील भांडवलाचे मालक नाहीत; उलट, बहुतांश भांडवल मूठभर बँकवाल्यांच्या हाती आहे व ते लंडनमधून सर्व सूत्रे हालवीत आहेत.

सोव्हिएतमध्ये उजबेगस्तानची संपत्ति तेथील जनतेच्या सामुदायिक मालकीची असल्याने भांडवलदारी औद्योगिक विकासाबरोबरच दिसून येणारे दुष्परिणाम व शहरी राहणीने निर्माण होणारी अनीति, दारिद्रच व्यसने व रोगराई, उजबेग जनतेला भोगावी लागलेली नाहीत. उलट, आधुनिक यंत्रपद्धतीमुळे व ज्ञानप्रसाराच्या साधनांमुळे त्यांच्यामधील मध्ययुगीन अंधश्रद्धा व कूपमंडूक वृत्ति नाहीशी झाली आहे. आर्थिक विकासाची ही सोव्हिएत योजना लक्षात घेता कोणत्याही घटकराष्ट्राने
 विभक्त होण्याचा आपला हक्क आजपर्यंत का बजावला नाही त्याचे

आर्थिक कारण स्पष्ट होईल.

राजकीय व आर्थिक प्रगतीच्या मागोमाग शिक्षण व आरोग्य या बाबतीतला विकास क्रमप्राप्तच असतो. त्यांतून सोव्हिएत पद्धतीचा पायाच नागरिकांच्या स्वयंस्फूर्त अशा राजकीय व आर्थिक कार्यक्षमतेवर आहे. तेव्हा प्रत्येक नागरिकाच्या शिक्षणाची व आरोग्याची जबाबदारी तेथील सोव्हिएतवर, म्हणजे लोकसभांवर, आपोआपच पडते. इतर लोकसत्ताक देशांतून मतदानापलीकडे नागरिकांची राजकीय व आर्थिक कार्यक्षमता व जागरूकता नको असते, कारण शासनव्यवस्था पाहणारी एक नोकरशाही असते. एखादा भांडवलदारी पक्ष सत्ताधारी असतो, आणि आर्थिक व्यवस्था भांडवलदार संभाळीत असतात. सोव्हिएतमध्ये असे नाही. तेथे प्रत्येक नागरिकाला आपल्या गावाच्या किंवा शहराच्या सोव्हिएतमध्ये एकसारखे लक्ष घालावे लागते व तिचे व्यवहार चालवावे लागतात. कारखाने देखील कामगारांच्या अशा कमिटयांना चालवावे लागतात. अशी सतत कार्यमग्न राहणारी लोकांची सोव्हिएतस् म्हणजेच युनियनचे राजकीय, आर्थिक व सामाजिक जीवन. या जीवनाला ज्ञानाची व आरोग्याची अत्यंत आवश्यकता आहेच.

सोव्हिएतमध्ये ज्ञानाची वाढ कशी वेगाने झाली हे प्रथम पाहू. त्यातही सर्व युनियनची परिस्थिति न पाहता मौलवींचा धार्मिक पगडा व खानाचा जुलुम यांच्या रगडयांत निःस्त्राण झालेल्या आशियावासीयांची प्रगति पाहू. पुढील आंकडे घेऊन हिंदुस्थान, ब्रिटन व आशियावासी सोव्हिएत लोकसमाज यांची तुलना आपल्याला करता येईल.

ह्या प्रगतीमुळे शिक्षणाच्या बाबतीत आशियावासी राष्ट्रे व ग्रेटरशिया-प्रभृति राष्ट्रे यांच्यात आता विषमता उरलेली नाही. तसेच आरोग्याच्या बाबतीतही झाले आहे असे पुढील कोष्टकांवरून स्पष्ट दिसेल आधुनिक वैद्यकीय ज्ञानाचा व रोगनिवारणांच्या साधनांचा जर उपयोग केला तर बालमृत्यूंचे प्रमाण खाली नेता येते, व जनतेचे आरोग्य व आयुर्मर्यादा वाढविता येते. तसेच सांसर्गिक व साथींच्या रोगांचा पूर्ण प्रतिबंध करता येतो. पण हे सारे करण्यासाठी समाजाच्या हितासाठी चालणारे लोकांचेच राज्य व प्रत्यक्ष राज्यकारभारही लोकांचाच पाहिजे. तसे राज्य आज सोव्हिएत-मध्ये असल्याने इतक्या थोडया अवधीत ही आरोग्याची सुस्थिती आपल्याला दिसून येते.

**कोष्टक १ : लोकसंख्येशी साक्षरतेचे प्रमाण°**

| देश | १८९१ | १९१३ | १९४० | १९६१ |
|---|---|---|---|---|
| अखंड भारत | ५.२ | | १३.० | |
| भारत | | | | २४.० |
| सोव्हिएत तुर्कमेनस्तान | | ०.७ | ७६.५ | १००.० |
| सोव्हिएत युनियन | | | | १००.० |

°साक्षरतेची कसोटी केवळ सही करता येणे ही मानली जाऊ शकते-तशी ती काही देशांत अजूनही मानली जाते. सोव्हिएतमध्ये चौथ्या इयत्ते-तील विद्यार्थ्याइतके लिहतो व वाचता येणे ही कसोटी मानली जाते.

कोष्टक २ : दर हजार लोकसंख्येशी एकंदर विद्यार्थ्यांचे प्रमाण.

| देश | १९१४ | १९३९ | १९६४-१९६५ |
|---|---|---|---|
| भारत | | | १३३* |
| सोव्हिएत यूनियन[२] | ५० | १७५ | २३४ |
| सोव्हिएत आशियाई राष्ट्रे : | | | |
| उझबेगस्तान | ४ | १८८ | २४८ |
| ताजिकीस्तान | ०.४ | १७८ | २३४ |
| कझकीस्तान | १९ | १८७ | २४५ |
| तुर्कमेनस्तान | ७ | १७७ | २३६ |
| किरगीझस्तान | ७ | २१० | २४९ |
| सोव्हिएत युरोपीय राष्ट्रे : | | | |
| युक्रेन | ६४ | १९० | २१६ |
| बायलोरशिया | ५३ | २१० | २२६ |
| जॉर्जिया | ६० | २२० | २२६ |
| अर्मेनिया | ३५ | २६३ | २५८ |

**संदर्भ :** * Statistical Pocket Book of the Indian Union, Central Statistical Organisation; Government of India. 1967. हा आकडा १९६३-६४ चा आहे. (२) The Economy of USSR मूळ रशियन ग्रंथावरून सर्व सोव्हिएत राष्ट्रां-संबंधीचे आंकडे घेतलेले आहेत.

**कोष्टक ३ : दर हजार लोकसंख्येशी शाळकरी विद्यार्थ्यांचे प्रमाण.**

| देश | १९६३–६४ | १९६४–६५ |
|---|---|---|
| भारत[1] | १२९ | |
| ब्रिटन[2] | १६७ | |
| अमेरिका (यु. स्टेटस)[2] | २३६ | |
| सोव्हिएत यूनियन[3] | | २०३ |
| सोव्हिएत आशिआई राष्ट्रे :[3] | | |
| उजबेगस्तान | | २२४ |
| ताजिकीस्तान | | २१५ |
| कझ्झकीस्तान | | २२१ |
| तुर्कमेनस्तान | | २१६ |
| किरगिझस्तान | | २२७ |
| सोव्हिएत युरोपीय राष्ट्रे :[3] | | |
| युक्रेन | | १८९ |
| बायलोरशिया | | २०२ |
| जॉर्जिया | | २०१ |
| अर्मेनिया | | २२९ |

संदर्भ : (१) कोष्टक २–संदर्भ*; (२) Statistical Outline of India (1964), Tata Industries Private Ltd.; हे आकडे सुमारे १९६३ चे आहेत. (३) कोष्टक २– संदर्भ २.

कोष्टक ४ : विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या.

| देश | लोकसंख्या (हजार) १९६४ | विद्यार्थी (हजार) १९३९+ | विद्यार्थी (हजार) १९६४ |
|---|---|---|---|
| भारत | ४६,४१,६५* | | १४१९* |
| सोव्हिएट युनियन (समग्र) | २२,९१,९८** | | ३६०८.४** |
| सोव्हिएत आशिआई राष्ट्रे[3] | | | |
| उझबेगस्तान | १,०१,३० | १८.३ | १५४.३ |
| ताजिकीस्तान | २४,८२ | १.४ | २६.९ |
| कशकीस्तान | १,१८,५३ | ७.९ | १३२.० |
| तुर्कमेनस्तान | १८,६२ | २.४ | १८.५ |
| किरगीझस्तान | २५.६९ | १.५ | २९.० |
| एकूण | | ३१.५ | ३६०.७ |
| सोव्हिएत युरोपीय राष्ट्रे[3] | | | |
| युक्रेन | ४,५१,०० | | ६४३.८ |
| बायलोरशिया | ८५,३३ | | ९६.३ |
| जॉर्जिया | ४४,८३ | | ७४.८ |
| अर्मेनिया | २१,४३ | | ३३.७ |

संदर्भ : (*) कोष्टक २– संदर्भ; (**) कोष्टकातील आशिआई व युरोपीय सोव्हिएट राष्ट्रांचे आकडे, १९३९ चे सोडून बाकीचे, कोष्टक २– संदर्भ २ वरून घेतले आहेत. (+) सन १९३९ चे सर्व आकडे Leonard Barnes ' Light on Soviet Colonies ' (1944) या ग्रंथातील आहेत.

कोष्टक ५ : बालमृत्यूंचे प्रमाण (दर हजार जन्मांमागे)

| देश | १८९१ | १९१३ | १९३७* | १९६४** |
|---|---|---|---|---|
| भारत[१] | | | १६१.७ | १४२.३ |
| ब्रिटन | १६४ | – | ६१.१ | २०.५ |
| अमेरिका (यु. स्टे.) | | | ५४.४ | २४.८ |
| सोव्हिएत युनियन (आशिआई व युरोपीय, | | ३००+ | ७७.० | २९.४ |

संदर्भ : (*) Demographic Year-book—United Nations, 1948. (**) Demographic Year-book—United Nations, 1967. भारतात जन्ममृत्यूची नोंद नीट होत नाही. म्हणून ही आकडेवारी काटेकोरपणे बरोबर मानता येत नाही. (+) हा आकडा रशियात झारशाही होती त्यावेळेचा आहे.

कोष्टक ६ : लोकसंख्या, डॉक्टर व इस्पितळांतील पलंग.

| देश | वर्ष | लोकसंख्या (लक्ष) | एक डॉक्टरमागे लोकसंख्या | एक पलंगामागे लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| अखंड भारत[१] (संस्थाने सोडून) | १९३१ | २,७०० | ६,००० | ३,८६७ |
| भारत[२] | १९६१ | ४३९० | ५,८९२ | २,२७० |
| ब्रिटन[3] | १९६७ | – | ८३३ | १०० |
| सोव्हिएत[४] यूनियन | १९३७ | १,८०० | १,५०० | २४० |
| सोव्हिएत[५] यूनियन | १९६४ | २,२९२ | ४३० | १०७ |
| उझबेगस्तान[५] | १९६४ | १०१ | ५९६ | ११० |
| तुर्कमेनस्तान[५] | १९६४ | १८ | ४७७ | ११४ |

सदर्भ : (१) डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ ( हिंदुस्थान ) यांचा सन १९३५ चा रिपोर्ट आणि ग्रँट यांचा 'हेल्थ इन इंडिया' हा ग्रंथ (२) कोष्टक ३ संदर्भ २. (३) Basic Statisties of the Community Statistical Office of the European Community (1967) (४) कोष्टक ४– संदर्भ ४ (५) कोष्टक २– संदर्भ २.

आरोग्य व शिक्षण याबरोबरच आशियावासी लोकसमूहांच्या सांस्कृतिक जीवनाचा विकासही असाच पद्धतशीर व नियोजित स्वरूपाचा झालेला दिसतो व त्यांत लोकजीवनाशी समरस होण्याच्या हेतूने सर्व आखणी केलेली आढळते. इतर देशांतून चित्रपट, रेडिओ, नाट्य व वाङमय याचा उपयोग बहुतांशी करमणूक व नफा यांकडे पाहून होतो. सोव्हिएत राष्ट्रांमध्ये सर्व निर्मिती लोकशिक्षणाला पोषक अशी होते. उदाहरणार्थ, ताजिक वगैरे लोकांना आजपर्यंत जागतिक संस्कृतीपासून तोडून वेगळे ठेवल्यासारखे झाले होते; पण सोव्हिएत ताजिकिस्तानमध्ये युरोप, ग्रेटरशिया व आशिया येथील सर्व साहित्याचा व विज्ञानशास्त्रांचा परिचय जनतेला होत आहे. शेक्सपीअर, डार्विन, न्यूटन वगैरे युरोपियन साहित्यकांचे व शास्त्रज्ञांचे ग्रंथ वेगवेगळ्या लोकभाषांतून प्रसिद्ध होत आहेत, तसेच व्यासांचे महाभारत, तुलसीदासांचे रामायण व प्रेमचंद, टागोर प्रभृति लेखकांचे ग्रंथही या लोकसमूहांच्या प्रमुख भाषांतून अनुवादित होत आहेत. दुसरीकडे, काझाक कवी जांबूल, बाश्कीर कवि फराक, कॉकेशसमधला लोकगीते रचणारा सुलेमान स्टालस्की वगैरे स्थानिक कवि व ग्रंथकार नवेनवे वाङमय लिहित आहेतच व त्यामध्ये या लोकसमूहांच्या राष्ट्रीय आकांक्षा, सुखदु:खे व नव्या आशा यांचे चित्र उमटत आहे.

ही सांस्कृतिक जागृति किती व्यापक आहे याची कल्पना पुढील माहितीवरून येईल. सन १९३६ सालांत, फक्त आशियावासी राष्ट्रांमध्ये एकंदर २३१२नवी पुस्तके प्रसिद्ध झाली व त्यांच्या एकंदर २,२७,००,०० प्रति छापल्या गेल्या. एकंदर ७३५ वृत्तपत्रे निघत होती. ८२ नाटयगृहे व १९६१ चित्रपटगृहे चालू होती. या आधुनिक कलात्मक साधनांचा उपयोग करून मागासलेल्या, गुलाम व उपेक्षित जमातींनी आज नव्या सांस्कृतिक जीवनाला आत्मसात केले आहे. जगातल्या सर्व साम्राज्यवाद्यांनी त्यांच्याविरूद्ध सतत कारस्थाने केली व नात्सी साम्राज्यवादी तर सुसज्ज युद्धसामुग्री व शस्त्रास्त्रे घेऊन हिरीरीने त्यांच्यावर तुटून पडले. परंतु सोव्हिएतमधील सर्व राष्ट्रे व लोकसमूह एकजुटीने व आत्मविश्वासाने लढू शकले व विजयी होऊ शकले, याचे कारण वरील सांस्कृतिक क्रांती-मध्ये आहे.

**सोव्हिएत पुढील उद्दिष्टे कोणती ?**

सोव्हिएतमधील अल्पसंख्यांक लोकसमूहाचे जीवन कसे स्वतंत्र व विकासशील आहे व तेथील लहानमोठ्या राष्ट्रांच्या स्वाभिमानाचा व संस्कृतीचा कसा विकास होत आहे हे येथपर्यंत पाहिले. सोव्हिएतच्या

संयुक्त राज्याचे हे एकंदर चित्र डोळ्यासमोर धरले तर मुख्यत: दिसते की झारची साम्राज्यवादी केंद्रीय सत्ता नाहीशी करून त्याऐवजी राष्ट्रीय स्वातंत्र्यावर उभारलेले परंतु अनेकराष्ट्रीय असे एक संयुक्त राज्य तेथे निर्माण झाले आहे आणि वर्ण, वंश वगैरे भेदांवर उभारलेली विषमता जाऊन राष्ट्रीय समानता स्थापन झाली आहे. याशिवाय एक तिसरी गोष्ट सोव्हिएतविषयी लक्षात घेणे आवश्यक आहे. ती अशी की, तेथे लोकसत्तेचा उदय झाला असून जगात इतरत्र आढळणारी भांडवलदारी हुकूमत तेथे उरलेली नाही.

या तीन वैशिष्टचांचा एकत्र विचार केला म्हणजे असे दिसू लागते की, सोव्हिएत पद्धतीचे व संस्कृतीचे स्वरूप जरी राष्ट्रीय असले तरी तिचा गाभा समाजवादी व आंतरराष्ट्रीय आहे. ही गोष्ट निरनिराळ्या तऱ्हेने एकसारखी प्रत्ययालाही येते. सोव्हिएतचे अंतिम उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय समाजव्यवस्थेचे आहे, ही गोष्ट ओळखूनच ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी प्रभृति साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांकडून त्याच्याविरूद्ध अनेक कारस्थाने सतत रचली गेली, हे लोकांना दिसत आहे. तसेच, सोव्हिएतच्या तीन पंचवार्षिक योजना, सामुदायिक शेती वगैरे समाजवादी पद्धतींची ओळख लोकांना पुष्कळच झालेली आहे. सोव्हिएतच्या या समाजवादी ध्येयाची ओळख ढोबळमानाने जरी झालेली असली तरी तेथील राष्ट्रीय धोरणाचा व या आंतरराष्ट्रीयत्वाचा परस्पर मेळ कसा बसतो, हे मात्र लोकांना अजून एक कोडेच वाटत आहे.

पण त्यात कोडे असे काही नाही. सोव्हिएतच्या आंतरराष्ट्रीयत्वाचा अर्थ स्पष्ट आहे. आज जगावर प्रभुत्व गाजविणाऱ्या ब्रिटन, अमेरिका प्रभृति राष्ट्रांची साम्राज्ये नष्ट होणे व लहानमोठ्या, युरोपीय व इतर सर्व राष्ट्रांना निर्वेधपणे स्वयंनिर्णय लाभणे, हाच सोव्हिएतच्या विश्वकुटुंबवादाचा साधा व स्पष्ट अर्थ आहे. याबाबतीत सोव्हिएतच्या सर्व तत्त्वज्ञानाचा आद्य प्रणेता कार्ल मार्क्स याने सन१८५३ मध्येच असे म्हटलेले आढळते की हिंदुस्थान, आयर्लंड, पोलंड, वगैरे दलित राष्ट्रे स्वतंत्र होणे, ही समाजवादी क्रांतीची मूलभूत व आवश्यक पायरी आहे. ब्रिटनप्रभृति देशांतले भांडवलदार गुलाम राष्ट्रांना स्वतंत्र करणार नाहीत, पण तेथील कामगार वर्गाचे हित कशात आहे ? मार्क्सने याचे उत्तर दिले आहे की, तात्पुरते पाहिले तर वसाहतींची लुटलेली संपत्ति ब्रिटनसारख्या देशांतील कामगारांना थोड्या प्रमाणात लाभेल; त्यांच्या राहणीचे मान गुलाम जनतेच्या राहणीपेक्षा वरचढ राहील. परंतु दूरदृष्टीने पाहिले तर वसाहतींना लुबाडून बलिष्ठ 

झालेला भांडवलदार वर्ग स्वदेशातील कामगारांच्या बेड्या जास्तच घट्ट करील. बेकारी, महायुद्धे व गुलामगिरी यांची परंपरा टळणार नाही. ब्रिटनमधील कामगार वर्गाला साम्राज्यापासून तात्पुरता लाभ झाला तरी राजकीय गुलामगिरीच्या दृष्टीने जास्त जास्त वाईट दिवसच येतील, असे मार्क्सने भाकित केलेले आढळते. सारांश, ब्रिटिश कामगार वर्गाचेही अंतिम व खरे हित साम्राज्याच्या नाशात आहे व अंतिम मुक्तता समाजवादी आंतरराष्ट्रीयत्वात आहे ही गोष्ट मार्क्सने सांगितलेली आहे.

मार्क्सचा हा उपदेश एकदम सर्व जगातील कामगार वर्गाला पटणारा नाही, हे उघड आहे. त्यांतल्यात्यात ब्रिटनसारख्या धनिक प्रबळ राष्ट्रांतल्या कामगारांना तो फार उशीरा पटेल ह्यांत नवल नाही. पण, महायुद्धे, बेकारी, वगैरे आपत्तींच्या दिव्यांतून जाणारा हा कामगार वर्ग समाजवादाच्या वरील ध्येयवादाकडे झुकत आहे, हे कोणालाही दिसेल. ग्रेटरशियन राष्ट्रांतला कामगारवर्ग झारच्या जुलूमाखाली रगडला जात असताना त्याला मार्क्सवादाची विचारसरणी मान्य झाली. त्याचा परिणाम म्हणजेच नव्या सोव्हिएत पद्धतीची रचना आपल्याला दिसत आहे. या ठिकाणी ग्रेटरशियन कामगार वर्गाने झारच्या साम्राज्यातील राष्ट्रांना स्वतंत्र केल्याचे अपूर्व दृश्य आपण पाहतो. आणि जे ग्रेटरशियात झपाट्याने घडले, तेच आज ना उद्या सर्व भांडवलदारी राष्ट्रांत घडेल व कामगार वर्गाच्या अशा नव्या विचारसरणीमुळे साम्राज्ये जाऊन मानवी समाज हे स्वयंनिर्णित राष्ट्रांचे एक विश्वकुटुंब बनेल हेच सोव्हिएतचे अंतिम ध्येय व उद्दिष्ट आहे.

साम्राज्ये टिकून राहिली तर प्रबळ राष्ट्रांतील कामगारांना व जगातील सर्वच जनतेला कोणत्या भयंकर आपत्तीला तोंड द्यावे लागते, हे गेल्या दहा-वीस वर्षांत जनतेच्या अनुभवाला आलेले आहेच. स्पेनमध्ये जनतेविरुद्ध लढण्यासाठी वसाहतीमधून मूर लोकांच्या पलटणी जनरल फ्रॅन्कोने आणविल्या. युरोपमधील बहुतेक राष्ट्रांतून नागरिकस्वातंत्र्याची गळेचेपी तर झालीच, पण या फॅसिस्ट राजवटीखाली लोकांच्या राहणीचे मानही खालावले. शेवटी दुसऱ्या महायुद्धाच्या अमानुष संहारात कोट्यवधि बळी पडले. कामगार वर्गाला व जनतेला साम्राज्यवादाचे हे भीषण परिणाम जाणवले आहेत. केवळ स्वार्थापुरते पाहूनही तेथील जनतेला आंतरराष्ट्रीयत्वाकडे वळावे लागत आहे. मार्क्सच्या भविष्यवाणीची सार्थता व सोव्हिएतच्या अंतिम उद्दिष्टाची व्यवहार्यता या ताज्या घडामोडींमुळे दिसून येण्यासारखी आहे.

साम्राज्यवादाच्या नाशानंतरही जर राष्ट्राराष्ट्रांमध्ये युरोपियन व आशियाटिक, औद्योगिक व शेतकीप्रधान, लष्करी व बिनलष्करी असे भेद व विषमता राहिली तर काय होईल ? थोड्याच अवधीत पुन्हा दुर्बळ राष्ट्रांना गिळून टाकणारी राष्ट्रे साम्राज्यवादी बनतील व आंतरराष्ट्रीयत्वाचे ध्येय दुरावेल. याला उपाय म्हणजे सोव्हिएतने स्वीकारलेले राष्ट्रीय समानतेचे धोरण. या धोरणानुसार शेतकीप्रधान राष्ट्रांनाही औद्योगिक प्रगति करण्यास मदत करणे कसे आवश्यक असते व ती जबाबदारी सोव्हिएतने कशी पार पाडली आहे, ते मागे आपण पाहिलेच.

अर्थात, अशी सर्वगामी राष्ट्रीय प्रगती होण्याच्या मार्गात एक विघ्न म्हणजे खासगी तऱ्हेने औद्योगिक कारभार चालविणाऱ्या भांडवलदार वर्गाचे. ही अडचण इतरत्र सर्व जगभर आहे, पण सोव्हिएतपुरता हा प्रश्न त्यांनी सोडविला असल्याने, तेथे राष्ट्राराष्ट्रांतील औद्योगिक व इतर विषमता घालविणे त्यांना शक्य झाले आहे. या अनुभवावरून असे म्हणता येते की, साम्राज्यवादाच्या नाशानंतर जगातील सर्व राष्ट्रांनी खऱ्याखुऱ्या समानतेच्या दर्जाला पोचण्यासाठी समाजवादी लोकसत्तेची जरूर आहे. सोव्हिएतने आपल्या आंतरराष्ट्रीयत्वाच्या ध्येयामध्ये ही गोष्ट महत्त्वाची समजलेली आहे.

सारांश, सोव्हिएतच्या आंतरराष्ट्रीयत्वाचे उद्दिष्ट असे आहे की, स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाप्रमाणे प्रथम जगातील सर्व राष्ट्रे स्वतंत्र व्हावीत व त्यांतील शेतकीप्रधान राष्ट्रांची औद्योगिक प्रगति व्हावी. या घडामोडी आपोआप होणार नाहीत. त्यासाठी ब्रिटनप्रभृति देशांतील कामगारवर्गाला व जनतेला आपली आजची आंधळी साम्राज्यवादी दृष्टि टाकून द्यावी लागेल, व मूठभर स्वार्थी लोकांकडून देशातील व साम्राज्यातील अधिकार काढून घ्यावा लागेल. तसेच गुलाम राष्ट्रांतील कामगार वर्गाला व जनतेला आपल्या राष्ट्रीय विकासासाठी ब्रिटनमधील लोकसत्तेशी खराखुरा बंधुभाव व सहकार्याची वृत्ति बाळगावी लागेल.

सोव्हिएतचे हे ध्येय फार दूरगामी आहे. जगात आज सगळीकडे वर्णद्वेष, साम्राज्यवाद आणि राष्ट्रीय अभिनिवेश पसरला आहे. मग हे ध्येय केवळ मनोराज्यासारखे व पोकळ नाही का ? नाही. कारण, आज जगाच्या एकषष्ठांश प्रदेशावर हे ध्येय प्रत्यक्ष कार्यक्षम स्वरूपात अवतरले असल्यावर त्याला मनोराज्य कसे म्हणता येईल ? या आंतरराष्ट्रीय ध्येयाची पूर्ति होण्याच्या मार्गात अडथळे येतील व स्वतःला समाजवादी म्हणून घेणारे बेव्हिन प्रभृति प्रच्छन्न साम्राज्यवादी लोक या ध्येयाची 

विटंबनाही करतील. परंतु, त्यामुळे सोव्हिएतने मिळविलेल्या प्रत्यक्ष यशाला बाध येत नाही, व त्याचे ध्येय अव्यवहार्य ठरत नाही.

याबाबतीत लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की सोव्हिएत क्रांति घडवून आणणाऱ्या रशियन बोल्शेव्हिक पक्षातील काही प्रमुख पुढाऱ्यांनाही राष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाचा हा प्रश्न नीट उमगलेला नव्हता. सन १९१४ मध्ये पोलंडचा स्वयंनिर्णयाचा हक्क मानावा की नाही यासंबंधी बोल्शेव्हिकांमध्ये अंतर्गत वाद झाले.त्यावेळी लेनिनचे असे मत होते की पोलंडचा हा हक्क निर्वेधपणे कबूल करावा. उलट ट्रॉटस्की व त्याचे काही मित्र यांचे मत होते की हक्क मानू नये, व पोलंडला फक्त सांस्कृतिक स्वायत्तता द्यावी. लेनिनने ट्रॉटस्कीच्या या मतासंबंधी लिहिताना म्हटले आहे की " मार्क्सवादाच्या कक्षेत येणाऱ्या एकाही प्रश्नासंबंधी ट्रॉटस्कीला अजून कधी निश्चित मते बनविता आलेली नाहीत, " व स्वायत्ततेचा हक्क देण्याची ट्रॉटस्कीची कल्पना मार्क्सवादाला सोडून आहे. ( लेनिन " सिलेक्टेड वर्क्स, व्हॉल्यूम वन. " मॉस्को १९४६, पान ६०५ ) राष्ट्रीय स्वयंनिर्णयासंबंधी बोल्शेव्हिक पक्षाला जे खंबीर व यशस्वी धोरण ठेवता आले याचे कारण लेनिन व स्तालिन या दोघा पुढाऱ्यांना या प्रश्नाचे क्रांतिकारक महत्त्व कळले होते व बहुसंख्य बोल्शेव्हिक सभासदही त्यांच्या बाजूला होते. त्यामुळे सोव्हिएत पद्धतीमध्ये राष्ट्रीय स्वयंनिर्णय व संयुक्त प्रबळ राज्य यांचा उत्कृष्ट व्यवहार्य संगम साधू शकतो, हे प्रत्यक्ष उदाहरणाने दाखविण्याचे श्रेय रशियन बोल्शेव्हिक पक्षाला मिळविता आले.

सोव्हिएतच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणाचे असे दुहेरी व सुसंबद्ध स्वरूप पुष्कळांच्या ध्यानात येत नाही, व त्यांचा साहजिकच असा गैरसमज होतो की समाजवादी तत्त्वज्ञानाचे नुसते नाव घेणारे परंतु वस्तुतः राष्ट्रीय अभिनिवेशाने भारलेले असेच सोव्हिएत हेही एक राष्ट्र आहे. त्याला साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षा आहेत, असे समजण्यात येते. झारच्या साम्राज्याचीच ही एक नवी व जास्त प्रबळ आवृत्ति आहे, असेही मानण्यात येते. परंतु मागील सर्व प्रकरणांतील माहितीवरून स्पष्ट दिसेल की, सोव्हिएत राज्याची आपल्या घटक राष्ट्रांच्या व लहानमोठ्या लोकसमूहांच्या बाबतीत जी वागणूक आहे ती साम्राज्यवादी पद्धतीची नाही. नुकतीच ता. १ फेब्रुवारी १९४४ ची घटना घ्या. हिटलरशी निकराचा लढा चालूच होता, पण या धामधुमीतही सोव्हिएत सुप्रीम पार्लमेंटमध्ये असे ठरले की घटकराष्ट्रांचा औद्योगिक व राष्ट्रीय विकास पुरेसा झालेला असल्यामुळे संयुक्त राज्याकडे सोपविलेली दोन महत्त्वाची खाती त्यांनी परत घ्यावी.

लष्कर खाते व परराष्ट्रीय संबंधाचे खाते ही दोन खाती आता प्रत्येक घटकराष्ट्राने सांभाळावयाची आहेत. याच क्रमाने संयुक्त राज्याच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण अधिकाधिक होत जाईल. कोणत्या साम्राज्यवादी केंद्रीय सत्तेला असे विकेंद्रीकरण रुचेल किंवा परवडेल ?

यावरून सोव्हिएतच्या एकंदर कार्याचा, धोरणाचा व प्रत्यक्ष परिणामांचा आढावा घेतला तर, सन १९३६ साली स्तालिनने सोव्हिएत पद्धतीचे केलेले वर्णन यथातथ्य दिसते. तो म्हणतो " सोव्हिएत पद्धतीचे बाह्य स्वरूप किंवा शरीर राष्ट्रीय आहे. तिचा गाभा किंवा आत्मा समाजवादी आहे. " या वर्णनावरून सोव्हिएतच्या सध्याच्या परिस्थितीची व अंतिम उद्दिष्टांची कल्पना नीट येऊ शकते.

फिनलंड, पोलंड, रुमानिया, झेकोस्लोव्हाकिया वगैरे राष्ट्रे गेल्या महायुद्धापूर्वी रशियन, जर्मन व ऑस्ट्रियन साम्राज्यांत गुलाम राष्ट्रे म्हणून नांदत होती. जर्मन व ऑस्ट्रियन साम्राज्ये पराभवामुळे मोडली व रशियन साम्राज्य क्रांतीने नाहीसे केले. त्यानंतरही बरीचशी लहान राष्ट्रे राष्ट्रसंघाकडून ( लीग ऑफ नेशन्सकडून ) नव्याने बनविण्यात आली, व त्यांच्या राज्यांमध्ये अनेक वेगवेगळे लोकसमूह अल्पसंख्याक म्हणून अडकविले गेले. उदाहरणार्थ, पोलंड घ्या. पोलंडच्या नव्या राज्यात जर्मन, लिथुआनियन, रशियन वगैरे लोक व त्यांचे सलग वस्तीचे प्रदेशही सामील केले गेले.

या नव्या राष्ट्रांपैकी प्रमुख अशा चार राष्ट्रांत लोकसंख्येची विभागणी अशी होती:

| | राष्ट्रीय लोकवस्ती | अल्पसंख्याक लोकवस्ती |
|---|---|---|
| पोलंड | १,७७ लक्ष | ९५ लक्ष |
| झेकोस्लोव्हाकिया | ८७ लक्ष | ४८ लक्ष |
| युगोस्लाव्हिया | १,०० लक्ष | २२ लक्ष |
| रुमानिया | १,१६ लक्ष | ६२ लक्ष |
| | ४,८० लक्ष | २,२७ लक्ष |

अशा तऱ्हेने ४.८० कोटि लोकांच्या अधिराज्याखाली २.२७ कोटि लोकांना अल्पसंख्याक म्हणून डांबून टाकण्यांत आले. साम्राज्यवाद्यांच्या प्रभावाखाली चालणाऱ्या राष्ट्रसंघाने राष्ट्रांच्या व अल्पसंख्याकांच्या बाबतीत असे धोरण का ठेवले ते पाहणे जरूर आहे.

राष्ट्रसंघाच्या एकंदर योजनेत यासंबंधी चार करारनामे आहेत; ते असे : 

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७१८३

१ पॅरिस येथील शांतता परिषदेच्या वेळीच, पोलंड, रुमानिया प्रभृति राष्ट्रांनी मान्य केलेले वेगवेगळे ५ तहनामे.

२ शांतता परिषदेच्या कलमात घातलेले व आस्ट्रिया, हंगेरी, बुल्गेरिया व तुर्कस्थान यांनी मानलेले ४ करार.

३ राष्ट्रसंघाच्या कौन्सिलपुढे अल्बानिया, एस्थोनिया, फिनलंड वगैरे राष्ट्रांनी दिलेली ५ आश्वासने.

४ अपर सायलेशिया व मेमेल यासंबंधीचे दोन करार.

या सर्व करारांमध्ये एक गोष्ट प्रथमच मानलेली आहे, ती म्हणजे फक्त " वांशिक, धार्मिक व भाषिक " दृष्टीने, एकंदर लोकसंख्येच्या २० टक्क्यांहून कमी असलेल्या, अल्पसंख्याकांचाच विचार यात केलेला आहे. तसेच, अशा सर्वच अल्पसंख्याकांना न्याय मागता येईल अशीही तरतूद केलेली नाही. " फक्त काही देशांतील " अल्पसंख्याकांचे प्रश्न सुटण्यासाठी मदत करणे एवढाच या करारनाम्यांचा उद्देश आहे.

अशा मर्यादित स्वरूपात हे करारनामे झाले हे लक्षात ठेवले पाहिजे. या करारांप्रमाणे अल्पसंख्याक लोकसमूहातील व्यक्तीला सर्वसाधारण असे नागरिकत्वाचे अधिकार मिळाले होते. त्याचप्रमाणे त्यांना जीविताची, आणि व्यक्तिस्वातंत्र्याची सुरक्षितता व धार्मिक स्वातंत्र्य लाभले होते. राष्ट्रीय नागरिकांबरोबर समानता लाभली होती व भाषिक स्वातंत्र्यही लाभले होते. यहुदी व मुसलमान अल्पसंख्याकांना आपल्या देवळांचे व स्मशानभूमींचे संरक्षण करण्याची मुभा मिळाली होती.

राष्ट्रसंघाच्या कारकीर्दीमध्ये अल्पसंख्याकांचे अनेक बिकट प्रश्न उद्भवले व कित्येक लहानसहान बाबतीत ते सोडविलेही गेले. उदाहरणार्थ, ग्रीसमधील अल्बानियन मुसलमानांचा प्रश्न अल्बानियाने धसाला लावला, व सुमारे दोन वर्षांच्या घासाघिसीनंतर सन १९२६ मध्ये तो नीट सुटला. त्याचप्रमाणे पोलंडमधील जर्मनांचा प्रश्न आणि झेकोस्लोव्हाकियांतील रुथेनियन्सचा प्रश्न हे बऱ्याच अंशाने सुटले. परंतु राष्ट्रसंघाच्या एकंदर धोरणाचे यशापयश एवढ्यावरून ठरविता येत नाही, उलट राष्ट्रसंघाच्या एकंदर रचनेकडे पाहून काही दुसरीच अनुमाने निघतात.

राष्ट्रसंघाचे खरे सूत्रधार म्हणजे ब्रिटन, फ्रान्स वगैरे साम्राज्यवादी राष्ट्रे. पोलंड वगैरे नवी राष्ट्रे म्हणजे या प्रबळ राष्ट्रांची नुसती मांडलीक प्यादी म्हणून निर्माण झाली. किंबहुना, लोकमत अजमावून जर या नव्या राष्ट्रांच्या सरहद्दी आंखल्या असल्या तर अल्पसंख्याकांचा एवढा प्रश्नच उद्भवला नसता. पण ब्रिटन व फ्रान्स यांनी कृत्रिमपणे वाढविलेल्या

सरहद्दी आखल्या. त्यांचा उद्देश प्रथम जर्मनीला व सोव्हिएतला शक्य तितके मागे रेटून त्यांच्या सरहद्दीवर ही मांडलिक राष्ट्रे रखवालदारीला बसविण्याचा होता. परंतु, ब्रिटन व फ्रान्स यांची आपसांतही तेढ होतीच; त्यामुळे आणखीच गोंधळ उडाला. उदाहरणार्थ, पोलंडला युक्रेन व बायलोरशिया ह्या सोव्हिएत राष्ट्रांचा काही प्रदेश बळकावू द्यावा असे फ्रान्सचे मत होते, तर असे करण्याने पोलंडचे राज्य अस्थिर होईल, असे ब्रिटनचे मत होते. शेवटी फ्रान्सने आपले म्हणणे जबरदस्तीनेच पार पाडण्यासाठी जनरल वेंगाँ यांना पोलंडमध्ये पाठविले. त्याने बायलोरशिया व युक्रेनमध्ये चढाई करून बराच मुलूख बळकाविला. सन १९३९ पर्यंत हा विस्तृत प्रदेश व येथील ६५,००,००० नागरिक जबरदस्तीने पोलिश राज्यात डांबले गेले होते; व त्यांचा छळ होत होता.

लुथुआनिया हे त्यावेळी सोव्हिएत राष्ट्र नसून मांडलीक राष्ट्रच होते; पण पोलंडला फ्रान्सचा एवढा पाठिंबा होता की सन १९२० मध्ये लुथुआनिआच्या व्हिल्ना या राजधानीसह काही प्रदेश पोलंडने जबरदस्तीने घेतला. या उघड अन्यायाविरुद्ध, ता. १५ ऑक्टोबर १९२७ रोजी, लुथुआनिआने फिर्याद केली. तोपर्यंत त्याला तसे करण्याचेही धैर्य झाले नाही ! त्यानंतर, राष्ट्रसंघाच्या कौन्सिलपुढे लागोपाठ १८ वेळा हा प्रश्न चर्चेला आला व असेंब्लीपुढेही दोन वेळी आला. पण काही दाद लागली नाही. शेवटी सन १९३९ च्या पोलिश पराभवानंतर सोव्हिएतने ज्या वेळी आपला प्रदेश परत घेतला त्या वेळी लुथुआनियाचा हा प्रदेश त्या राष्ट्राला परत दिला.

राष्ट्रसंघाने सोव्हिएतच्या बाबतीत पक्षपाती वागणूक दाखविली यात आश्चर्य कसले ! सोव्हिएतनेही राष्ट्रसंघाला व तेथील सूत्रधारांना प्रथम पासूनच ओळखले होते व अल्पसंख्याकांच्या बाबतीत खरा न्याय देणारे न्यायासन हे नव्हे, असे सोव्हिएत परराष्ट्रीय मंत्री मा. चिचेरिन यांनी, सन १९२० मध्येच स्पष्ट केले होते. प्रेसिडेंट विल्सन यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी राष्ट्रसंघाला असे विचारले होते की, वंश व वर्ण यांच्यावर आधारलेली गांजणूक आज ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका प्रभृति राष्ट्रांत व त्यांच्या साम्राज्यात होत आहे, ही तुम्ही बंद करणार आहात काय ? वर्णभेदाला कायमची मूठमाती देण्याचा प्रश्न असा राष्ट्रसंघापुढे येताच लॉर्ड सेसील व प्रेसिडेन्ट विल्सन यांनी सांगितले की, ब्रिटिश साम्राज्यामध्ये व जगभर हा प्रश्न उठेल म्हणून यासंबंधी काही योजना स्वीकारणे योग्य नाही.

राष्ट्रसंघाचे अल्पसंख्याकांच्या बाबतीत धोरण ठरविताना, फ्रान्सप्रभृती

राष्ट्रांकडून अशीही दक्षता घेण्यात येत असे की, त्यामुळे या मांडलीक राष्ट्रांना अल्पसंख्याकांच्या गाऱ्हाण्याचा कायमचा शह देता यावा व त्यांनी आपल्या कह्यातून जाऊ नये. अस्पसंख्याकांना हाताशी धरून असा शह देण्याची भेदनीति आपल्याला परिचित आहे, आणि तिचाच अवलंब करून राष्ट्रसंघाच्या नावावर साम्राज्यवादी मुत्सदी आपले राजकारण चालवित होते. शेवटी हीच युक्ति जर्मन साम्राज्यवादानेही वापरली व सुडेटन जर्मनांचा प्रश्न पुढे करून सबंध झेकोस्लाव्हाकिया गिळंकृत केला.

अल्पसंख्याकांसंबंधीची सर्व योजना आपल्या स्वार्थी उद्देशासाठी वापरणाऱ्या साम्राज्यवादी राष्ट्रांचे व त्यांच्या राष्ट्रसंघाचे कार्य मर्यादित व निष्फळ का राहिले, ते वरील माहितीवरून कळून येईल. सोव्हिएतच्या एकंदर पद्धतीमध्ये व उद्देशांमध्ये असा अपुरेपणा व साम्राज्यवादी स्वार्थ नाही, उलट अल्पसंख्याकांना वांशिक, धार्मिक व भाषिक स्वायत्तता देऊन राष्ट्रांना राष्ट्रीय स्वयंनिर्णयही निरपवादपणे देण्याची योजना असल्याने अल्पसंख्याकांचा प्रश्न तेथे सलोख्याने सुटला आहे. हा फरकही साहजिकच पडणारा आहे, कारण साम्राज्यवादावर आधारलेल्या राष्ट्रांचे धोरण व सोव्हिएत लोकसत्ताकाच्या संयुक्त राज्याचे धोरण यांच्यात दक्षिण व उत्तर ध्रुवामधील अंतरासारखे हे अंतर नेहमी आढळणारच !

समाज चिंतन । ९ ।

# रशियाचे परराष्ट्रीय धोरण साम्राज्यवादी स्वरूपाचे आहे काय ?

" रशिया म्हणजे बड्या दादांपैकी सर्वांत बडा, चाणाक्ष नि प्रबळ ' दादा' आहे ", "रशियात काय सुखसमृद्धी असेल व समाजवाद असेल तो असो. पण परराष्ट्रीय धोरणापुरता रशिया साम्राज्यवादीच आहे," "रशियाने इराण, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया वगैरे अनेक देश आपल्या पाशवी जोरावर मांडलीक बनविले आहेत", " रशियाला शक्य तर साऱ्या जगावर आपले साम्राज्य स्थापावयाचे आहे ", हेच विचार आज प्रत्येक हिंदी माणसाच्या मनांत घोळत आहेत. मूठभर कम्यूनिस्ट व इतर समाजवादी आणि सोव्हिएतप्रेमी लोक सोडा. त्यांची मते आजकाल साधारण हिंदी माणसाला पटत नाहीत.

सामान्य माणसाची रशियाविषयी अशी मते आहेत खरी; पण ती तशी का आहेत, याचा थोडा विचार करण्यासारखा आहे. आंतरराष्ट्रीय माहिती आधी आपल्याकडे फार तुटपुंजी असते; त्यातून रशियन समाजक्रांति, तेथील नवी समाजव्यवस्था इत्यादी गोष्टींबद्दल उलटसुलट माहिती मिळालेली असते; अशा परिस्थितीत सामान्य मनुष्य रशियन हालचालीचा अन्वयार्थ लावतो तरी कसा ? याचे उत्तर असे, की वृत्तपत्रे वाचून मनुष्य ही मते बनवितो.

वृत्तपत्रसंस्थांचे सामाजिक महत्त्व व कामगिरी मला मान्य आहे; पण वृत्तपत्रे बहुतांशी तात्कालिक दृष्टीने उथळ व जुजबी माहिती देतात; एवढेच नव्हे तर 'बोलवित्या धन्या'ची मते आपल्या शब्दांतून वाचकांच्या गळी उतरवितात. ही आज सर्रास उजळ माथ्याने घडणारी गोष्ट झाली आहे. रशियन परराष्ट्रीय धोरणाचा अर्थ केवळ जुजबी वृत्तपत्रीय गोष्टी वाचून लावणे

धोक्याचे आहे एवढेच मला वरील विधानाच्या आधाराने म्हणावयाचे आहे.

मग वृत्तपत्रांच्या पडद्यामागे जाऊन खऱ्या घडामोडी व हालचाली सामान्य माणसाने कशा पाहावयाच्या ? रशियन परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत खरे ज्ञान मिळवणे कसे शक्य आहे ? या प्रश्नाचे मी थोडक्यात उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे.

कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणाकडे पाहताना आक्रमण, तहनामे व इतरांशी संगनमत वगैरे करताना त्याराष्ट्राला मुख्य काय साधावयाचे आहे हे आपण नीट पाहिले पाहिजे. नेहमीच्या परिचयाची उदाहरणे घेऊ. ब्रिटिशांची परराष्ट्रीय मुत्सद्देगिरी आजदेखील आपल्या साम्राज्यरक्षणासाठीच आहे, हे कोणीही सांगेल. तसेच स्वतंत्र हिंदुस्थानला चीन, सिलोन इत्यादि राष्ट्रांशी मैत्री हवी व परस्परसहकार्याने व्यापारवृद्धी आणि साम्राज्यवादापासून संरक्षणक्षमता हवी हे उघड आहे. ब्रिटन व स्वतंत्र हिंदुस्थान यांच्या परराष्ट्रीय धोरणात इतका आमूलाग्र फरक आहे. या फरकाचे मुख्य कारण या दोन देशांच्या आजच्या परिस्थितीत सापडेल. हा फरक लक्षात न घेता चर्चिल किंवा बेव्हिन आणि नेहरू यांना आपआपल्या राष्ट्राचे हित पाहावयाचे आहे, तेव्हा त्यांची मुत्सद्देगिरी एकच आहे, असे कोणी म्हणेल तर ते चूक ठरेल. तेव्हा, केवळ एकादे राष्ट्र प्रबळ आहे, लष्करी सामर्थ्याची जोपासना करीत आहे आणि इतर राष्ट्रांशी तहनामे करीत आहे, एवढ्या पुराव्यावरून त्या राष्ट्राला "साम्राज्यवादी" ठरविता येणार नाही. अशी जुजबी कसोटी लावल्यास उद्याचा प्रबळ व स्वतंत्र हिंदुस्थानही साम्राज्यवादीच ठरेल !

रशियाच्या बाबतीत आपण मुख्य पाहिले पाहिजे, की सोव्हिएतला मुख्य काय साधावयाचे आहे ?

माझ्या दृष्टीने सोव्हिएतला मुख्यतः या तीन गोष्टी हव्या आहेत :

१ आर्थिक व इतर नियोजनाच्या मार्गाने सोव्हिएत समाजातील प्रत्येक नागरिकाची राहणी व संस्कृती वाढवीत न्यावयाची आहे.

२ ही नियोजने पार पाडण्यासाठी सोव्हिएतला शांतता हवी आहे. अशी शांतता जागतिक स्वरूपाची असेल तरच टिकू शकेल अशी सोव्हिएतची खात्री आहे.

३ जागतिक अशांततेचे मूळ साम्राज्यवादात आहे अशी सोव्हिएतची भूमिका आहे. साम्राज्यवादाविरुद्ध ब्रिटन, अमेरिका इत्यादि भांडवलदारी राष्ट्रांतील कामगार वर्ग व जनता लोकशाहीच्या व समाजवादाच्या ध्येयाने लढत आहे. आणि त्याच साम्राज्यवादाच्या शक्तीविरुद्ध

 इराणसारखी मांडलिक राष्ट्रे व इजिप्त, हिंदुस्थान वगैरे परतंत्र राष्ट्रे लढत

आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, भांडवलदारी राष्ट्रांतील समाजवादी लोकशाही चळवळीला आणि परतंत्र मांडलीक राष्ट्रांच्या स्वातंत्र्यवादी चळवळीला मदत करणे सोव्हिएतला आवश्यक वाटत आहे. या दिशेनेच त्याचे परराष्ट्रीय धोरण आखले जात आहे.

या तीन मूलभूत ध्येयांसाठी आपल्या परराष्ट्रीय धोरणात योग्य तो संयम व त्याचबरोबर कडवेपणाही सोव्हिएतने गेली २८ वर्षे दाखविला आहे. या परराष्ट्रीय धोरणाचा वरवर पाहून असा अर्थ लावणे सोपे आहे की, सोव्हिएतही साम्राज्यवाद्यांप्रमाणेच चाणक्यनीतीचा अवलंब करीत आहे. परंतु सामदामदंडभेद इत्यादी मार्गांनी स्वतःच्या देशातील लोकशाहीला व अंकित राष्ट्रांतील जनतेला चिरडू पाहणाऱ्या साम्राज्यवादी राजनीतीशी सोव्हिएतचे मूलभूत उद्देशच वेगळे व विरोधी आहेत.

सोव्हिएत परराष्ट्रीय धोरणाचा पाया म्हणून वर तीन मुद्दे सांगितले ते लक्षात घेतले तर आजच्या जागतिक घडामोडींचा अर्थ सरळ लागतो. इंडोनेशियामध्ये ब्रिटिश फौजा स्वातंत्र्यवाद्यांविरुद्ध लढत आहेत; ग्रीस-मध्ये लोकशाहीचा बीमोड करून ब्रिटिशधार्जिण्या राजेशाहीला ब्रिटिश लष्कराच्या जोरावर स्थापण्यात येत आहे. फ्रँकोच्या जुलमी राजवटीला 'मजूर' पक्षाचे प्रधानमंडळ पाठिंबा देत आहे. इजिप्त, पॅलेस्टाइन, हिंदुस्थान वगैरे देशांत राष्ट्रवाद्यांवर गोळ्या चालविण्यात येत आहेत. जपानमध्ये जुन्या जुलमी भांडवलदारांच्या हाती राज्यकारभार देण्यात आला आहे. पूर्व-युरोपमध्ये कम्युनिस्ट पक्षाशी इतर लोकशाही पक्षांनी सहकार्य करून नव्या राजवटी स्थापल्या म्हणून तेथे सोव्हिएतचीच 'साम्राज्यवादी हुकमत आहे' असा कांगावा करण्यात येत आहे!

या सर्व साम्राज्यवादी धोरणाच्या विरुद्ध धीमेपणाने आणि नेटाने सोव्हिएतचे कार्य चालू आहे. प्रत्येक लहानमोठ्या प्रश्नावर राळ उडविण्यात आली तरी सोव्हिएतला एक माहीत आहे की या साम्राज्यवाद्यांच्या गर्जनांनी जगांतील जनता आज फसणार नाही, व युद्धाच्या धमक्या देऊन साम्राज्ये टिकवून धरणे आता ब्रिटनला व त्याच्या दोस्तांना शक्य नाही. बेव्हिनने चर्चिलचे अनुकरण करून जरी साम्राज्यरक्षणाची धडपड चालवली असली तरी साम्राज्यवादाला विरोधी बनत चाललेली ब्रिटिश जनता व इजिप्त, हिंदुस्थान वगैरे देशांतील राष्ट्रवादी व समाजवादी शक्ति आपल्याला अनुकूलच आहेत हे गृहीत धरून सोव्हिएतचे परराष्ट्रीय धोरण आखण्यात येत आहे.

आता सोव्हिएत धोरणाचा पाया म्हणून जे तीन मुद्दे सांगितले, त्यांचा

संक्षेपाने विचार करू. पहिल्या मुद्दयावर फारसे सांगावयास नकोच; कारण आर्थिक नियंत्रणाच्या मार्गाने सर्व जनतेच्या हिताचे संवर्धन तेथे होत आहे, ही गोष्ट आज सोव्हिएतचे शत्रूही कबूल करीत आहेत. समाजात वर्गकलह आहे हे सत्य आता सर्वजणांना पटले आहे. त्या सत्यावर अधिष्ठित अशी क्रांति होऊन सोव्हिएत समाजव्यवस्था जन्मास आली. त्या क्रांतीचा मार्ग सोडून वर्गसमन्वयाचा मार्ग स्वीकारणे चांगले असे काही लोकांचे मत आहे हे खरे; पण क्रांति झाल्याने भांडवलदार जमीनदार वर्गाचा समूळ उच्छेद रशियात झाला आहे, ही गोष्ट सोव्हिएतचे कट्टे वैरीही कबूल करतात. सारांश, इंग्लंड, अमेरिका इत्यादि भांडवलदारी राष्ट्रांच्या समाजव्यवस्थेपेक्षा वेगळी व सामुदायिक नियोजनाची व जीवनाची सामाजिक घडी रशियात आहे, याबद्दल संशयाला जागाच नाही.

सोव्हिएतचा वर्गकलहाचा मार्ग चुकीचा का बरोबर ते इतिहासावरून ठरेल; पण एक गोष्ट निश्चित, की तेथे सामुदायिक नियोजन चालू आहे व अशा आर्थिक व्यवस्थेने स्वतःची उन्नति करून घेण्यासाठी सोव्हिएतला शांतता हवी आहे.

आपल्या विकासासाठी युद्धाच्या आपत्तीपासून आपण अलिप्त राहावे अशी सोव्हिएतची इच्छा असणारच. पण ही शांतता जागतिक असावी हा सोव्हिएतचा आग्रह किंवा सिद्धान्त प्रथमदर्शनी न पटणारा वाटतो. "युद्धे ही होत राहणारच", असा सामान्य माणसाचा ग्रह असतो. आजपर्यंत शांततेच्या घोषणा हवेत विरल्या व एकापेक्षा एक भयानक युद्धे होतच गेली; तेव्हा 'जागतिक शांतते'बद्दलचा सोव्हिएतचा आग्रह लोकांना आडमुठेपणाचा किंवा दांभिक वाटतो. पण त्यात आडमुठेपणा किंवा दंभ नसून अगदी व्यवहार्य अशी कल्पना आहे. सोव्हिएतचे म्हणणे असे, की जर लाखो स्वतंत्र नागरिक सहकार्याने राबून एका राष्ट्रात व समाज व्यवस्थेत सुखाने नांदू शकतात,तर जगातल्या सर्व राष्ट्रांना असे सहकार्या नांदता येणे मुळीच अवघड नाही. उलट एकमेकांचे गळे कापू पाहणाऱ्यांचा जसा समाज बनू शकत नाही तसा लुटारूपणानेच जगू पाहणाऱ्या राष्ट्रांचाही खरा मानवसमाज बनू शकत नाही.

"चढाओढीची मोकळीक" वगैरे सोज्वळ तत्वांसाठी एकमेकाचे गळे कापू पाहणाऱ्या व्यक्तींच्या समुदायाचे स्वरुप भांडवलदारी राष्ट्रातील समाजव्यवस्थेला आले आहे. श्रीमंतांनी गरीब जनतेचे वैर करा. वयाचे तसेच आपसात वैर करावयाचे, गरिबांनी श्रीमंतांच्या जुलूमा-
 विरुद्ध बंड करण्याची संधी पाहात राहावयाचे, गोऱ्यांनी काळ्यांविरुद्ध

लढावयाचे, "आर्यांनी" यहुद्यांच्या विरुद्ध झगडावयाचे ! आपल्याकडेही हाच प्रकार नाही का ? हिंदुविरुद्ध मुसलमानांनी, स्पृश्यांविरुद्ध अस्पृश्यांनी, जमीनदाराविरुद्ध शेतकऱ्यांनी असे सगळे विरोध व झगडेच दिसत आहेत ! "न्यायासाठी" म्हणूनच प्रत्येक व्यक्ती व समाज इतर सर्वांच्या विरुद्ध लढत आहे.

पण सोव्हिएत पद्धतीमध्ये अशा वांशिक, धार्मिक व आर्थिक लढ्यांचे कारणच उरले नसल्यामुळे सोव्हिएत नागरिकांना समाजाच्या अंतर्गत शांततेचा अनुभव येत आहे. सोव्हिएत नागरिकाला जागतिक शांतता अशक्य कोटीतील वाटत नाही, याचे हे कारण आहे.

अर्थात शांतता अशक्य नसली तरी शांतता प्रत्यक्ष प्रस्थापित करणे म्हणजे महाप्रयासाचे काम आहे, याची जाणीव सोव्हिएतला आहे. शांतता कशी प्रस्थापित करावयाची ? या प्रश्नाला सोव्हिएतचे उत्तर अगदी साधे व सरळ आहे. त्याचे म्हणणे असे की, जागतिक अशांतता होण्याचे कारण साम्राज्यवादात आहे तेव्हा तो नष्ट झाला पाहिजे.

या ठिकाणी प्रत्येक हिंदी माणसाच्या मनात असा विचार येतो, की सोव्हिएतचे हे जर ध्येय आहे तर त्याचे दृश्य फळ आम्हाला का दिसत नाही ?

या बाबतीत नुसत्या इच्छा किंवा शाब्दिक घोषणांना महत्त्व नाही, व सोव्हिएतने नुसत्या पोकळ घोषणाच केल्या असत्या तर त्याचा काही उपयोग नव्हता. पण सोव्हिएतच्या जन्मापासून आजपर्यंतची २८ वर्षे घ्या. या घडामोडींच्या व खळबळीच्या काळात सर्व जागतिक राजकारणात एक मोठा विरोध एकसारखा वाढत गेलेला दिसतो. तो विरोध म्हणजे साम्राज्यवादी राष्ट्रे ( मुख्यतः ब्रिटन ) व समाजवादी सोव्हिएत यांच्यातील लढा. जुन्या इतिहासाकडे पाहिले तर असे दिसते, की सोव्हिएत-विरोधी आक्रमणासाठी ब्रिटनने कोट्यवधि पौंड सन १९१८ ते सन १९२५ या काळात खर्चले. फिनलंडपासून अफगाणिस्तानपर्यंत व तिकडे मांचूरियापर्यंत अनेक फौजा पाठविल्या व सोव्हिएतच्या सत्तेला जन्मतःच चिरडून टाकण्यासाठी जंगजंग पछाडले. तेव्हापासून सर्व युरोपभर व आशिया खंडात ब्रिटिशांच्या लष्करी व राजकीय डावपेचांचा मुख्य उद्देश सोव्हिएतला पायबंद घालणे हा होता. सोव्हिएत राज्य अशा तऱ्हेने या प्रबळ साम्राज्यसत्तेशी झुंजत होते व अप्रत्यक्ष रीतीने त्याच साम्राज्य-सत्तेशी झगडणाऱ्या ब्रिटिश मजूरवर्गाला व हिंदुस्थान आणि इराण वगैरे परतंत्र मांडलिक राष्ट्रांना मदत करीत होते.

या "अप्रत्यक्ष" मदतीचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी एक परिचयाचा दाखला घेऊ. आज हिंदी संस्थानांतून तेथील अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध जनतेचा लढा चालू आहे. या लढ्याला ब्रिटिश मुलखातील साम्राज्य-विरोधी लढ्याची अप्रत्यक्ष मदत होत नाही काय? राजसत्तेविरुद्ध लढणाऱ्या संघटनेला व व्यक्तींना खालसा मुलखातून प्रत्यक्ष मदत मिळते, परंतु शेवटी या लढ्याची जबाबदारी संस्थानातील प्रजेवरच असते. अप्रत्यक्ष मदत मात्र या लढ्याच्या यशाला नेहमी जरूर आहे व या मदती-शिवाय एकट्या संस्थानी प्रजेचा लढा कधीच यशस्वी होऊ शकणार नाही.

संस्थानी प्रजेच्यासमोर फक्त जुलमी राजसत्ता असली तरी ब्रिटिश साम्राज्यसत्तेविरुद्ध झगडणाऱ्या खालसा प्रदेशातील साऱ्या लोकपक्षांची अप्रत्यक्ष मदत संस्थानी प्रजेच्या चळवळीला होते. कारण मुख्य शत्रु सर्वांचा एकच आहे. त्याच्यावर अनेक बाजूंनी चढाई करणारे पक्ष व शक्ति एकमेकांना अप्रत्यक्ष मदतच करीत आहेत. हाच न्याय जागतिक लोकशाहीच्या लढ्याला लावला तर असे दिसते, की ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लढणाऱ्या इजिप्त, इराण, हिंदुस्थान इत्यादि राष्ट्रांना, तसेच ब्रिटनमधील लोक-शाहीला सोव्हिएतची अप्रत्यक्ष मदत होत आहे. म्हणून चर्चिल, बेव्हिन प्रभृति साम्राज्यवादी मुत्सद्दी सोव्हिएतविरुद्ध गर्जताना दिसत आहेत. या बाबतीत चालू घडामोडींपैकी अनेक उदाहरणे देता येतील.

सॅनफ्रान्सिस्को परिषदेच्या वेळचा एक वाद घ्या. सर्व वसाहतींना 'स्वयंनिर्णय व स्वातंत्र्य' यांची हमी नव्या राष्ट्रसंघाने द्यावी असे सोव्हिएतचे म्हणणे होते; उलट ब्रिटन व त्याचे दोस्त म्हणत होते, की 'स्वातंत्र्य किंवा स्वायत्तता' एवढीच हमी असावी. वाद शब्दाचा नव्हता, कारण केवळ तसे असते, तर हवे ते शब्द कबूल करण्याइतका 'उदारपणा' ब्रिटिश मुत्सद्द्यांत आहे. पण प्रश्न तत्त्वाचा होता, व सोव्हिएतचा राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्त्वासाठी आग्रह होता. ते तत्त्व अमलात आणायला भाग पडू नये म्हणून ब्रिटनची धडपड होती. ग्रीस, इराण संबंधीच्या वादां-मध्येही खोलवर जाऊन पाहिले तर दिसेल, की या देशांतील लोकशाहीला सोव्हिएत मदत करीत आहे; उलट राजसत्तेला किंवा धनिक सत्तेला ब्रिटन मदत करीत आहे; सोव्हिएतची ही मदत सोव्हिएत सरहद्दीजवळील जनतेला सहजच मिळत आहे. यासंबंधी कुर्द या राष्ट्रीय लोकसमूहाचे उदाहरण पाहण्यासारखे आहे.

तुर्कस्तान, इराण, इराक आणि सोव्हिएत या चार राज्यांच्या सीमां-मध्ये विभागलेले कुर्दिस्तान हे एक लहान राष्ट्र आहे. ६०० मैल लांब व

१५० मैल रुंद एवढ्या प्रदेशावर कुर्द समाज वसलेला आहे. सध्या या समाजाचे चार विभाग झालेले आहेत. फारच थोडे कुर्द सोव्हिएत कुर्दिस्तानमध्ये आहेत. बाकीचे तुर्कस्तान, इराण व इराक यांमध्ये अल्पसंख्याक जमाती म्हणून जगत आहेत. गेल्या महायुद्धानंतर सोव्हिएतला शह देण्यासाठी म्हणून एक मांडलिक कुर्दिस्तान बनविण्याचा बूट ब्रिटनने काढला व सव्हरेच्या तहात 'स्वतंत्र कुर्दिस्तान'चा उल्लेख करण्यात आला. पण पुढे ब्रिटनला माघार घ्यावी लागली व कुर्दिस्तानचा बराच मोठा भाग तुर्कस्तानने गिळला. बाकीचा इराण व इराकमध्ये जोडण्यात ब्रिटनला यश मिळाले.

तुर्कस्तानातल्या कुर्द लोकांची स्थिति फारच वाईट झाली. त्यांच्या भाषेचा व स्वतंत्र अस्तित्वाचा मागमूस राहू न देण्यासाठी तुर्कस्तानने हवे ते अत्याचार करण्यास सुरवात केली व कुर्द राष्ट्रीय चळवळीने प्रखर प्रतिकार केला. सन १९२५ मध्ये कुर्द लोकांनी एक मोठा उठाव केला. पण तो चिरडला गेला. मोठमोठ्या कत्तली करण्यात येऊन कुर्द लोकसंख्या नाहीशी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. इराण व इराक या देशांतही त्या मानाने बरी, परंतु परतंत्र अशी स्थिति कुर्द राष्ट्राच्या लोकांना भोगावी लागली.

आता दुसऱ्या महायुद्धानंतर कुर्द राष्ट्रीय चळवळीने पुन्हा जोर धरला आहे. मार्च महिन्यात या उठावाबद्दलच्या बातम्या 'टाइम्स'-सारख्या साम्राज्यवादी पत्रालाही द्याव्या लागल्या. एका अग्रलेखात या नव्या कुर्दिश उठावाची मीमांसा करताना "टाइम्स"ने म्हटले आहे की कुर्द राष्ट्राचे काही हजारच लोक सोव्हिएतमध्ये आहेत; पण त्यांना एक स्वायत्त लोकसमाज समजण्यात आले असून त्यांची आर्थिक, राजकीय, शैक्षणिक प्रगति झालेली आहे. सोव्हिएतच्या नेहमीच्या धोरणानुसार ही प्रगति झाली असून तशाच सवलती व सुधारणा तुर्कस्तान, इराण व इराक या देशांतील कुर्द समाज मागत आहे. यामुळे "मोठी अवघड व नाजुक परिस्थिति" उत्पन्न झाली आहे!

स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या राष्ट्रांना सोव्हिएतच्या धोरणामुळे शक्य तेवढ्या परिणामकारक तऱ्हेने मदत कशी होते, याचे वरील एक उदाहरण आहे. याच धोरणामुळे इराणमध्येही शेवटी ब्रिटिश राजनीतीला सोव्हिएतपुढे माघार घ्यावी लागली. केवळ 'लाल फौजेच्या' जोरावर इराणमध्ये रशियाने ब्रिटनवर मात केली, असा समज ब्रिटनने मुद्दाम जगभर पसरविला आहे; पण खरी गोष्टही लपू शकलेली नाही.

आजपर्यंत ब्रिटनने इराणमध्ये तेलाचे उत्पादन केले; पण खुद्द इराणी लोकांना तेलाच्या उत्पादनाच्या धंद्यात केवळ अंगमेहनतीचे काम दिले व सर्व फायदा आपण गिळंकृत केला. याच्या उलट सोव्हिएत करारामध्येच असे घातले आहे की इराणी लोकांना तेलाच्या धंद्यातील कौशल्याचे व तज्ञांचे काम आम्ही शिकवू व निम्मा फायदा इराणला देऊ. केवळ अशा महत्त्वाच्या सवलतीच्या कलमामुळे सोव्हिएत–इराण करार होऊ शकला व नेमका तोच टळावा म्हणून ब्रिटन व अमेरिका यांनी 'यूनो' परिषदेत गोंधळ माजविला.

हा सर्व इतिहास मागून समजतो तेव्हा लोकांना आढळते, की आपण ज्याला "सोव्हिएतचा साम्राज्यवाद" म्हणत होतो, तो ब्रिटिश साम्राज्यवादाने उभा केलेला बागुलबोवा होता. मग लोकमताला सोव्हिएतबद्दल वाटू लागलेला राग कमी कमी होत जातो. तेवढ्यात पुन्हा एखादे कारण काढून ब्रिटिश प्रचारक व वृत्तपत्रे "सोव्हिएत साम्राज्यवादावर" झोड उठवितात.अशा रीतीने लोकमताची एकसारखी कुतरओढ चालू ठेवण्यात येते.

आपल्याकडील राष्ट्रीय वृत्तपत्रांतूनही ब्रिटिश व अमेरिकन साम्राज्यवादी धोरणाचे सूर उमटलेले दिसतात हे एक दुर्दैव आहे; परंतु "हिंदु", "अमृतबझार पत्रिका" व "हिंदुस्थान टाइम्स" या प्रमुख वृत्तपत्रांत पाहिले तर असे दिसते, की या पत्रांचे स्वतंत्र बातमीदार परदेशी असल्याने त्यांच्या परदेशीय बातमीपत्रांतून ब्रिटिश प्रचाराचा पडसाद नसतो; उलट सोव्हिएतच्या खऱ्या साम्राज्यविरोधी धोरणाचे स्पष्ट चित्र या वृत्तपत्रांतून बरेचवेळा वाचावयास मिळते. परंतु बहुसंख्य हिंदी वृत्तपत्रे मात्र सध्या या ब्रिटिश प्रचाराच्या आहारी गेलेली दिसतात. हिंदी वृत्तपत्रांवर हल्ली मोठमोठ्या भांडवलदारांची मालकी बसत चालली आहे व त्यांना सोव्हिएत तत्त्वज्ञानाविषयी साहजिकच भीति व विरोध वाटतो. या कारणामुळेही ब्रिटिश साम्राज्यवादी प्रचाराच्या सुरात सूर मिळवण्याचा मोह या वृत्तपत्रांना होत आहे.

वरील परिस्थितीत आपण सर्वांनी किती जागरूक राहिले पाहिजे हे उघड आहे. सामान्य हिंदी माणसाला सोव्हिएतविरोधाची नवी दीक्षा मिळत आहे व हिंदी राजकारणात अस्थिरता व विसंवादी शक्तींचा संघर्ष वाढत आहे. अशा वेळी ब्रिटिश साम्राज्यसत्तेशी झगडणाऱ्या सर्व शक्तींशी व त्यातल्या त्यात समाजवादी सोव्हिएत सत्तेशी आपण स्नेहभाव ठेवण्याची जरुरी आहे. असा स्नेहभाव सोव्हिएतच्या परराष्ट्रीय धोरणाचा मूळ तात्त्विक पाया समजल्यानेच निर्माण होईल.

## समाज चिंतन । १० । जग की वेड्यांचे इस्पितळ ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ......... वि: निबंध
क्रमांक ......... नों: दि:

---

रोज सकाळी वर्तमानपत्राकडे नजर टाकावी तर अमुक शहरावर बाँब टाकण्यात आले, इतकी माणसे ठार झाली, अमुक ठिकाणी शाळा व इस्पितळे यांच्यावर मशिनगन्सचा मारा झाला आणि लहान मुले जखमी झाली व आजारी माणसे प्राणाला मुकली, अशा हृदयविदारक बातम्या वाचावयास मिळतात. माणसांची माणुसकी गेली आहे तरी कुठे व मानवी संस्कृतीचा सुसंस्कृतपणा कोणीकडे नाहीसा झाला आहे असे वाटू लागण्यासारखी परिस्थिति आज निर्माण झाली आहे. जगाला वेडयाच्या इस्पितळाचे स्वरूप येत चालले आहे असे म्हणावयास हरकत नाही.

परवा याचा एक उत्तम पुरावा मिळाला तो असा: गेले महायुद्ध ११ नोहेंबर १९१८ रोजी थांबले व शांततेचा तहनामा त्या दिवशी लिहिला गेला. म्हणून तो दिवस मौनधारणाचा समजला जातो व त्या दिवशी युद्धात मेलेल्या नातेवाइकांचे स्मरण करावे आणि जागतिक शांततेसाठी ईश्वराची प्रार्थना करावी अशी प्रामाणिक भावना युरोपमधील सर्वसाधारण जनतेच्या हृदयात असणेही साहजिकच आहे. परंतु राज्यकर्त्यांच्या दृष्टीने तो दिवस म्हणजे स्वतःच्या लष्करी सामर्थ्याच्या प्रदर्शनाला उपयोगी संधी असा समजला जातो. लंडनच्या रस्त्यांतून ११ नोहेंबर १९३७ रोजी प्रचंड लष्करी मिरवणूक चालली होती व मौनधारणेचाही फार्स होताच. त्या वेळी फूटपाथवरील गर्दीतून एक माणूस त्या गर्दीत घुसला व मोठमोठयाने ओरडू लागला:– "ऐका ! ऐका ! हे सगळे ढोंग आहे. मौन व शांततेसाठी प्रार्थना करणारे हे लोक आतून दुसऱ्या महायुद्धाची तयारी करीत आहेत." त्या माणसाला अर्थातच पोलिसांनी

धरले व ठाण्यावर नेले आणि मिरवणूक शांतपणे पुढे चालली.

खरा आश्चर्यकारक प्रकार नंतर घडला. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये सर होअर यांनी त्या घटनेचा खुलासा करताना म्हटले की "सरकारी डॉक्टरांच्या चौकशीत असे आढळून आले आहे, की तो मनुष्य वेडा आहे व त्याच्यावर कोणताही राजकीय आरोप लादणे शक्य नाही." या खुलाशासंबंधी जास्त काय म्हणावे? एकीकडे शस्त्रास्त्रवाढीच्या पंचवार्षिक योजना चालू ठेवायच्या व दुसरीकडे मौन धारण करायचे, याला ढोंग म्हणणारा माणूस वेडा ठरतो व बाकी सारे जग स्वतःला शहाणे समजते, याचा अर्थच कळत नाही! कसेही असो, एवढे खास, की आज आपल्या भोवतालच्या घडामोडी, अनवस्था, पाशवी वृत्ती व क्रौर्य यांनी अशी काही परिसीमा गाठली आहे, की त्या भयंकर स्थितीतून एक प्रकारचा विनोद उत्पन्न झालेला काही वेळा दिसत आहे. वेड्याच्या विकट हास्याप्रमाणे हा विनोदही विपरीतच आहे!

उदाहरणार्थ स्पेनमधील परिस्थिति घ्या. वर्तमानपत्रांनी प्रथम असे उठविले, की स्पेनमध्ये स्पॅनिश सरकारविरुद्ध राष्ट्रीय पक्षाने बंड उभारले आहे व हा राष्ट्रीय पक्ष स्पेनचे परराष्ट्रांपासून रक्षण करण्यासाठी हे बंड उभारीत आहे. या बातमीपासून कोणाला काय बोध होणार? पण लवकरच अशा बातम्या आल्या, की स्पेनमध्ये जी यादवी सुरू झाली तिची सुरुवात मोरोक्कोमधून करण्यात आली. यादवीचा अर्थच देशातील दोन पक्षांमधील युद्ध! मग ही 'यादवी' अशी बाहेरून कशी सुरू झाली? पुढे अशा बातम्या आल्या, की जनरल फ्रँको या राष्ट्रीय सेनापतीने मूर शिपायांच्या मदतीने ही चढाई केली व या सेनापतीला मुसोलिनीकडून मदत मिळत आहे. पुढे तर असे दिसून आले, की कित्येक हजार इटालियन सैनिकच या 'राष्ट्रीय' सेनापतीसाठी स्पेनवर चढाई करीत आहेत.

काय ही 'यादवी' शब्दाची थट्टा व 'राष्ट्रीय' शब्दाची थट्टा! स्पेनमधील शहरामागून शहरे जर्मन बॉम्बस् आणि इटालियन मशिनगन्स.चा मारा यामुळे बेचिराख होत असताना, त्या प्रकाराला स्पेनमधील यादवी असे नाव मिळावे यात विसंगतिजन्य विनोद नाही काय? स्पेनच्या बाबतीत इतर राष्ट्रांनी आखलेल्या धोरणाला जे नाव आहे त्यामध्ये आणखी विनोद व विडंबन आहे. इतर युरोपियन राष्ट्रांनी स्वतःच्या धोरणाला 'तटस्थता' हे नाव दिले आहे व एक तटस्थता-कमिटी' प्रथमपासून काम करीत आहे. ती कसले व काय काम करीत आहे ह्याच्या तपशिलात शिरण्यात अर्थ नाही. या कमिटीचे सभासद

म्हणजे इंग्लंड, इटली वगैरे हेच लोक. म्हणजे अगदी डॉक्टर जेकील व हाइडचा प्रकार चालू आहे. एकाच माणसाने दिवसा परोपकार करावयाचा व रात्री खून करावयाचे, तसा मुसोलिनी प्रभृतींचा प्रकार चालू आहे आणि या प्रकाराला नाव मात्र तटस्थता !

सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात असे ध्वर्थी, किंवा निरर्थक-शद्ब खूपच बनले आहेत; त्यामुळेच एक प्रकारचा विनोद उत्पन्न होत आहे. अशा शब्दांमुळे परराष्ट्रीय मंत्र्यांची भाषणे म्हणजे हास्यास्पद नाटकी पाठांतरे होत आहेत. शांघायचा जपानी सैन्याने कबजा घेतल्यानंतर एक बातमी प्रसिद्ध झाली. तीमध्ये सुटका (rescue) या शब्दाचा फारच गमतीचा अर्थ करण्यात आला होता. बातमी जपानकडून प्रसिद्ध करण्यात आली होती. बातमीत असे म्हटले होते, की अमुक एक क्ष हा चिनी गृहस्थ सध्या शांघायचा नगराध्यक्ष झाला आहे. या गृहस्थाने नगराध्यक्षाची जागा स्वीकारल्यानंतर असे जाहीर केले, की शांघायची ‘ संकटातून सुटका ’ केल्याबद्दल जपानी सेनापतिसाहेबांचा तो आभारी आहे व शांघायच्या जनतेतर्फे तो हे आभार मानीत आहे. आता या ‘ सुटके’ बद्दल या नगराध्यक्षांचे आभार मानण्याची संधि चीनच्या सैन्याला मिळेल असे सध्या दिसत नाही ! जपानच्या एकंदरच बातम्या व शब्द मोठे विलक्षण असतात. मध्येच जपानचा बादशहा जाहीर करतो, की हे युद्ध कशासाठी असेल तर फक्त यासाठी, की चीनने जपानी मालाविरुद्ध चालविलेला प्रचार थांबवावा व चीनमधील कम्यू-निस्टांचा बंदोबस्त करावा. चिनी सरकारने चिनी कम्युनिस्टांशी कसे वागावे हे सांगण्याची उठाठेव जपानला कशासाठी ? तुम्ही तुमच्या मुलाला चाबकाने बडविणार नसाल तर मी तुमच्या घराला आग लावीन असे म्हणणाऱ्या शेजाऱ्याचा शेजारधर्म व जपानची वागणूक यात फरक दिसत नाही.

जपानने चीनवर केलेल्या चढाईमधील बातम्यांमध्ये कत्तली, जाळपोळ व विध्वंस यांचे इतके भयानक चित्र असते, की जपानच्या सैनिकांना मन नाहीच की काय असे वाटण्याची वेळ येते. परंतु या बातम्यांमध्येही कधी-कधी हास्यास्पद किंवा विचित्र बातम्या असतात. परवा डिसेंबर ३ तारखेला शांघायच्या आंतरराष्ट्रीय वसाहतीमध्ये जपानने एक विजयाची मिरवणूक काढली. सीमोल्लंघनाची स्वारीच होती ती. पण त्या मिरव-णुकीत काही मजेदार प्रकार घडले. एक तर त्या मिरवणुकीची आघाडीच गमतीची होती. जपानने शांघाय जिंकल्याचे निदर्शक म्हणून ती मिरवणूक

पण तिचा मार्ग आंतरराष्ट्रीय वसाहतीमधून; तेव्हा अग्रभागी सर्वशक्तीमान ब्रिटिश सत्तेचे सैनिक मार्गदर्शक म्हणून होते. एक ब्रिटिश घोडेस्वार व सहा साफेवाल्या शीख घोडेस्वारांचे पथक हे मार्गदर्शकाचे काम करीत असताना काय दृश्य दिसत असेल? मिरवणूक एका चौकात आली. तेथे एक निराळाच प्रकार घडला. एका अमेरिकन गृहस्थाला जपानच्या त्या अघोरी वर्तनाची चीड येऊन त्याने रस्यातून बाजूला होण्याचे नाकारले. एका जपानी सैनिकाने फार वेळ न घालविता असा एक ठोसा त्या गृहस्थाच्या नाकावर चढविला, की रक्तच वाहू लागले. रुडयार्ड किपलिंगच्या प्रसिद्ध वाक्याची आठवण होण्याची वेळ होती. पूर्वेने पश्चिमेच्या नाकावर ठोसा लगावला, अर्थात पूर्व व पश्चिम एकत्र येणे अशक्यच. परंतु चीनच्या जनतेशी बंधुभावाने एकजीव होऊन एक अमेरिकन गृहस्थ जपानी मिरवणुकीला आडवा येतो यामध्ये किप्लिंगच्या वाक्याचा फोलपणा ही सिद्ध होतोच.

या जपानी मिरवणुकीच्या प्रसंगी एक विलक्षण परंतु हृदयद्रावक प्रकार घडला. तो कित्येकांच्या वाचण्यात आलाच असेल. एका चिनी गृहस्थाने आपला संताप व द्वेष व्यक्त करण्यासाठी एका उंच इमारतीच्या वरच्या मजल्यावरून खाली उडी टाकून आत्महत्या केली. या गृहस्थाच्या बलिदानाबद्दल कोणालाही आदरच वाटेल, पण हा बलिदानाचा प्रकार मात्र विलक्षण खराच.

या जपानी आक्रमणावरून राष्ट्रसंघाची आठवण होते. खरोखरच राष्ट्रसंघाबद्दल हंसू येऊ लागते. आता इटलीने तर संघातून पायच बाहेर काढला आहे. अमेरिका संघात कधी नव्हतीच. म्हणजे आता राष्ट्रसंघाचे वजन कोणावर व ऐकणार कोण? ॲबिसिनीयाच्या वेळी 'दंडयोजनांची' भाषा बोलण्याइतकी शक्ति राष्ट्रसंघामध्ये होती. स्पेनच्या वेळी तीहि शक्ति उरली नाही व 'तटस्थते' पुरते त्राण उरले होते. तेही नाहीसे होऊन चीनच्या वेळी काहीच होताना दिसत नाही. अगदी प्रारंभी अशा बातम्या आल्या होत्या, की शहरातील निःशस्त्र जनतेवर बॉम्ब टाकण्यापासून जपानला परावृत्त करण्यासाठी राष्ट्रसंघाने जपानला खलिता पाठविला आहे. नंतर असे प्रसिद्ध झाले की जपानने खलित्याला उत्तर न देता बॉम्ब फेकणारी विमाने नानकिंगवर पाठवली यावर राष्ट्रसंघाने निषेधप्रदर्शनाचा एक ठराव केला. ही ठरावाची बातमी प्रसिद्ध झाली तेव्हा एक गृहस्थ म्हणाले, 'काय हो! आता राष्ट्रसंघाने निषेध केला त्याचा काहीच परिणाम नाही का होणार?' मी त्यांना थंडपणे

विचारले, " राष्ट्रसंघ ? कसला ? कोणता ?'
राष्ट्रसंघाच्या ठरावाप्रमाणेच आपल्या भारतीयांच्या निषेधप्रदर्शनाचे वैय्यर्थ्य जाणून कधीकधी आपले आपल्यालाच हसू येणे साहजिक आहे. इटलीने अबिसिनियावर स्वारी केली की आमचा निषेध आहेच. स्पेनवर आक्रमण झाले की आम्ही स्पॅनिश जनतेसाठी संदेश पाठवतोच. परंतु या आपल्या प्रयत्नांची त्यांच्या अगदी काटेकोर 'उपयुक्तते'कडे पाहून हेटाळणी करणाऱ्यांना राजकारण समजत नाही असेच म्हणावे लागेल. या प्रयत्नांचे व 'कागदी' ठरावांचे महत्त्व काय हे कळण्याला आपल्याकडील राजकीय चळवळींना उग्र स्वरूप यायला पाहिजे. जपानच्या सध्याच्या आक्रमणाविरुद्ध आपण जपानी मालावर बहिष्कार घातला पाहिजे, अशी घोषणा चालू आहे. त्या बहिष्काराच्या प्रचाराच्या वातावरणात पुढील बातमी कशी विडंबनात्मक वाटते पाहा : जानेवारी ते जून १९३७ या काळात फक्त मद्रासच्या बंदरातून ७,००० टन जुनेपाने लोखंड जपानला रवाना झाले व नंतरही असेच होत राहिले आहे. हे लोखंड एका ब्रिटिश बोटीने निर्यात केले व याच लोखंडाच्या तोफा व टँक्स बनवून चिनी शिपायांना चिरडले जात आहे !

राष्ट्रसंघाची जी हास्यास्पद स्थिति झाली आहे तीच वस्तुतः अनेक संस्थांची झाली आहे. त्यात वाईट किंवा चांगले असे असते की त्या संस्था किंवा ती परंपरा चिकटपणे आयुष्य कंठीत असते. 'नोबेल शांतता' प्राइझची संस्था घ्या. नोबेलसाहेब हे एक स्फोटक द्रव्याचे कारखानदार होते ही गोष्ट पुष्कळांना ठाऊकहि असेल. युद्धातील भयानक संहाराला स्वतःच्या संशोधनामुळे मदत केल्याबद्दल पश्चात्ताप होऊन या उदार गृहस्थाने एक " जागतिक शांतता " प्राइझ देण्याची व्यवस्था केली. जागतिक शांततेसाठी सर्वांत जास्त कोणी प्रयत्न केले असतील अशा एखाद्या महापुरुषाला हे बक्षीस मिळावयाचे असते. यंदाच्या वर्षी लॉर्ड सेसिल यांना ते बक्षीस मिळाले आहे. त्यांनी शांततेसाठी लोकशाहीच्या वतीने जे कार्य केले आहे ते महत्त्वाचे आहे व फॅसिझमविरुद्ध चाललेल्या संघटनेला त्यांनी मदत केलेली आहे. तेव्हा बक्षीस त्यांना मिळाले यात हास्यास्पद असे काहीच नाही. परंतु त्या 'शांतता' प्राइझचा शांततेच्या रक्षणासाठी काय उपयोग व नोबेलसाहेबांचा उद्देश कितपत सफल होत आहे याचा विचार केला, की सर्व प्रकार हास्यास्पद वाटू लागतो. कारण मुसोलिनी किंवा जपानचे सेनापति काही सेसिलसाहेबांना बधत नाहीत हे खास.

जागतिक शांततेसाठी काय केले पाहिजे, ह्या प्रश्नाचा नीट विचार करण्यासाठी एकच काय, अनेक लेख लिहिले गेले पाहिजेत व अनेक लेखकांनी आणि विद्वानांनी या प्रश्नाचा खल करून जनतेला शहाणे केले पाहिजे. पण प्रस्तुत स्थळी तो प्रश्न नाही. या शांततेसाठी होणाऱ्या वादात कित्येक वेळा विनोद कसा असतो हे मला दाखवाचे आहे. एका टोकाला काही प्रामाणिक शांततावादी आपल्या पोचट कल्पनांनी विनोद उत्पन्न करतात, तर दुसऱ्या टोकाला शांततेची भाषा मानभावीपणाने बोलणारे मुत्सद्दी आपल्या निर्भीड किंवा निर्लज्ज उद्गारांनी शांततेच्या भावनेचे मजेदार विडंबन करतात. पहिल्या कोटीमधले उदाहरण एका फार मोठ्या विद्वानाचे आहे. बर्ट्रांड रसेल यांना आज न ओळखणारे वाचक थोडेच असतील. त्यांची शांततेसाठी योजना मोठी विचित्र आहे. त्यांचे मत असे की, ताबडतोब सर्व राष्ट्रांतील अगदी लहान मुलांना सध्यापेक्षा निराळेच शिक्षण देण्याला सुरुवात केली पाहिजे. मुलांच्या शिक्षणात भित्रेपणा किंवा आडदांडपणा या भावनांची वाढ होऊ न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. मग महायुद्धाचा प्रसंग आणू म्हटल्याने आणता येणार नाही. कारण काय? तर सध्याचे नागरिक ज्याप्रमाणे खाकी कपडे चढविले की बेभान होऊन एकमेकांची कत्तल करतात, तशी गोष्ट ही नवी नागरिकांची पिढी करणार नाही.

आता या विलक्षण कल्पनेला हसावे की काय करावे तेच कळत नाही. 'चिकत्सक भला भला म्हणुनि फार नावाजिला' अशी रसेलसाहेबांची ख्याति आहे व त्यांची योग्यताहि फार मोठी आहे; पण त्यांच्या योजनेचे मात्र आश्चर्य वाटते. मुसोलिनी तर रांगत्या मुलांच्या हातात रायफल देण्याला तयार होईल. शिक्षणाचा व शाळांचा प्रश्न निघालाच आहे; तेव्हा हिटलरच्या शाळेत कोवळ्या मुलांना काय शिकवले जात आहे हे पाहा. भास्कराचार्यांच्या लीलावतीमधील उदाहरणे कमलपुष्पांची असतात किंवा गोखल्यांच्या उदाहरणात चहाची मिसळ करणारे वाणी असतात, तसे जर्मन नाझींच्या अंकगणितात काय असते ते पाहा–

"आपल्या ४६ विमानांनी शत्रूच्या एका शहरावर बाँबस् टाकले. प्रत्येक विमानात दीड किलोग्रॅम वजनाचे पांचशे बाँबस् होते. तर एकंदर किती वजनाचे बाँबस् टाकले गेले ? प्रत्येक तिसरा बाँब घरावर पडला असे धरून चालले तर किती घरांनी पेट घेतला असेल ?"

('मॉडर्न रिव्ह्यू'च्या डिसेंबर १९३७ च्या अंकांतून.)

काय हे भयंकर उदाहरण ! परंतु लहानपणी मुलांची मने वळवावी तशी वळतात व जर्मन मुलांना कदाचित् ही उदाहरणे भयंकर वाटत नसतील. प्रत्येक पेट घेतलेल्या इमारतीत घरात २० पुरुष, २० बायका व ४० मुले आहेत आणि प्रत्येक पुरुषास, स्त्रीस व मुलास प्रत्येकी एक जीव आहे असे धरून चालल्यास या शहरातील किती जीव ठार झाले असतील याचे गणितहि करायला नाझी शाळामास्तर सांगत असतील तर नवल नाही. अशा परिस्थितीत रसेलसाहेबांच्या सर्वराष्ट्रीय शैक्षणिक योजनांचे हसू नाही का येणार ?

अट्टल मानभावी मुत्सद्द्यांच्या शांततावादी भाषणातून विनोद उत्पन्न होतो तो निराळ्या प्रकारचा असतो. त्यामध्ये हेटाळणीची छटा असते. उदाहरणार्थ, अशा मुत्सद्द्यांचे नेहमीचे भाषण या सुरात असते की, शांतता राखण्यासाठी युद्धाची जय्यत तयारी करायला पाहिजे. बिचारा नागरिक आ वासून पहात राहतो, की याचा अर्थ काय ? तेव्हा हे मुत्सद्दी हसून सांगतात की, ' बाबा रे ! या जगात नुसत्या सांगोवांगीने कामे होत नसतात. आपण एक सज्जन आहोत, पण इतर पहा कसे मस्त व क्रूर आहेत ते. तेव्हा युद्ध आपल्याला नकोच; पण इतरांनी गडबड करू नये यासाठी आपला धाक पाहिजे व युद्ध न करता शांततेसाठी युद्धाची तयारी केली पाहिजे. ' बिचारा नागरिक गप्प बसतो. वैमानिक हल्ल्यांच्या बाबतीत नागरिकाला साहजिकच भयंकर दहशत वाटत आहे. तेव्हा मुत्सद्द्यांची यासंबंधी भाषणे मोठी गंमतीची असतात. 'आपल्या शहरावर येणारी विमाने पांखरांसारखी खाली पाडू. तुम्ही उगाच घाबरू नका ' असे प्रथम सांगण्यात येते. मध्येच एखादा मुत्सद्दी किंवा सेनापति जाहीर करतो की वैमानिक हल्ल्यांपासून कोणत्याहि शहराचे संरक्षण होणे अशक्य आहे. मग काय करावयाचे ? सोपा उपाय आहे. शत्रु जर आपल्या शहरांना आग लावील, तर आपण त्याच्या शहरांतील बायकामुलांनाहि भाजून काढू. जे करणे प्राप्त आहे ते करताना शोक कशाचा ?

या बाँबच्या आणि वैमानिक हल्ल्यांच्या प्रकारासारखाच गॅसचा व गॅसमास्कचा ( मुखवट्याचा ) प्रकार आहे. आता कराची, कलकत्ता वगैरे ठिकाणी सर्वांना गॅसचे मुखवटे मिळणार आहेत व त्यासंबंधी प्राथमिक योजना अंमलातहि येत आहेत. कराचीच्या एका मिलिटरी ऑफिसात काम करणाऱ्या सर्व लोकांना हे मुखवटे पुरवण्यात आले व आपले एक दक्षिणी गृहस्थ तो मुखवटा घेऊन लवकर घरी गेले आणि 

अंगणात मुखवटा तोंडावर चढवून स्वारींनी पत्नीला हाक मारली. पुढचे सांगावयास नकोच ! तिने किंकाळी फोडून देहाचे अवधान सोडले. पण गंमत पुढेच आहे. पंतांनी तिला सावध केले व तिला एकंदर प्रकार समजावून सांगितला. तिची भीति थोडी कमी झाली. पण ती घाबरलेल्या स्वरात म्हणाली, 'आता कमलची नि वसंताची शाळेतून येण्याची वेळ झाली. ते मेलं सोंग लपवून ठेवावं कुठंतरी; नाहीतर पोरं धास्ती खातील.' पंतांना बायकोची सूचना पटली व ते ती अंमलात आणणार एवढ्यात कमलची व वसंताची दारापुढे गडबड ऐकू आली. 'आई ! आई ! लवकर दार उघड, गंमत आहे !' असे कमल म्हणाली. तेव्हा मुखवटा पलंगाखाली लपवून दोघेजणांनी बाहेर जाऊन अंगणाचे दार उघडले तो काय! कमलने व वसंताने दोन चिमुकले गॅस-मुखवटे चढविले होते व दोन्ही पोरे हसत होती व उड्या मारीत होती. त्यांना काय, गंमतच वाटत होती सारी !

एकंदरीत, आज जगात जे विलक्षण प्रकार चालले आहेत, त्यांच्याकडे पाहून हास्यनिर्मिति कधीकधी होते हे खास. 'हे सर्व कशासाठी ?' हा प्रश्न सगळ्यांना पडतोच, पण उत्तर कितीजणांना सापडत असेल ? महायुद्ध हा एक प्रचंड हिमालयाएवढा वेडेपणा आहे. ती एक भयंकर गोष्ट आहे, पण काही लोकांना ती तितकीच फायद्याची गोष्ट वाटत असल्यामुळे युद्धे ही काही आपोआप थांबणार नाहीत हेही खरे. गेल्या महायुद्धात १ कोटी २० लक्ष तरुण ठार झाले व एका आकडे मोडणाऱ्या विद्वानाने असे गणित केले आहे, की या तरुणांपैकी प्रत्येक तरुणाला ठार मारायला ६५००० रुपये खर्च आला. किती महाग पडला प्रकार हा! ६५००० रुपयांमध्ये तर एका तरुणाला संसार करून सुखाने रहाता आले असते. पण आजच्या समाजव्यवस्थेची 'थोरवी' ती हीच, की ज्या संपत्तीमुळे नागरिकाला सुख मिळेल, ती संपत्तीच त्याच्या संहाराला कारणीभूत होत आहे. अमृताचे विष करणारी ही समाजव्यवस्था आहे इतका वेळ सांगितलेल्या हास्यास्पद गोष्टींपेक्षा जास्त हास्यास्पद गोष्ट ही आहे की धर्म, नीति, कुटुंबव्यवस्था इत्यादि पवित्र गोष्टींवर ही समाजव्यवस्था अधिष्ठित आहे अशी प्रामाणिक गैरसमजूत आपल्यापैकी बहुतेकांची आहे.

# गॉर्कीच्या ‘ आई ’ चे माझ्यावरील संस्कार

ग्रंथ संग्रहालय
दि:
अनुक्रम

---

सोविएत क्रांती झाली त्या वेळी मी आठ वर्षांचा होतो. मुलांना काय, मोठ्या माणसांनाही या क्रांतीबद्दल काही माहीत नव्हते. मी कॉलेजमध्ये गेलो तेव्हाही आम्ही या क्रांतीबद्दल काही ऐकले नाही. लेनिन, कार्ल मार्क्स यांची नांवेही आम्हाला ठाऊक नव्हती. मोठ्या माणसांच्या बोलण्यातही ही नावे कधी येत नसत. मी १९ वर्षांचा असताना कराचीस इंजिनियरिंग कॉलेजात होतो. तेथे प्रथम टॉलस्टॉय यांचा ‘ माय रिलिजन ’ हा ग्रंथ व नंतर त्यांच्या कादंबऱ्या मला वाचावयास मिळाल्या. तसेच थॉमस हार्डी यांच्या कादंबऱ्या मी वाचीत गेलो. येथेच पार्सन्स यांचे ‘अनार्किझम’हे लहानसे पुस्तक मला मिळाले. त्यात ‘ सोशॅलिझम ’, अनार्किझम ’ इत्यादि मतांची थोडी माहिती मिळाली.

सन १९३० च्या स्वातंत्र्यचळवळीत हजारो तरुणांनी भाग घेतला व त्यात मी सामील झालो, पण माझे मन ‘ धर्म ’ आणि ‘ तत्त्वज्ञान ’ या विषयांच्या अभ्यासाकडे वळले होते. अशा वेळी, गॉर्की यांची ‘ आई ’ ही कादंबरी सन १९३० मध्ये माझ्या हाती आली. टॉलस्टॉय आणि हार्डी यांचे खोल संस्कार मनावर झालेले नसते तर या कादंबरीचा माझ्यावर काय परिणाम झाला असता, ते सांगणे कठीण आहे. पण हे संस्कार फार दृढ होते, व म्हणून ‘ आई’ या कादंबरीने मला धर्माचे एक नवे रूप दाखविले. माणसाने काय ध्येय ठेवावे ? मनुष्याला कोणते श्रेय गाठता येईल ? अशा प्रश्नांचे उत्तर देणारा तो धर्म, अशी माझी भावना झालेली होती. ‘ पार-लौकिक ’ धर्माचे श्रेय मला आधीच पटेनासे झाले होते. टॉलस्टॉयने ख्रिश्चन धर्माची नव्या स्वरूपात केलेली मांडणी मला प्रिय होती. दुःखाला

धैर्याने तोंड देणारी हार्डीच्या कादंबरींतील साधी माणसे मला परिचित झाली होती. पण, माणुसकीचा नवा धर्म सांगणारा गॉर्की मला वेगळाच वाटला. ' आई ' या कादंबरीतील आईच्या शेवटच्या उदात्त भाषणाने मला एक नवीन प्रत्यय आला. एका दुर्दम्य आशेने मानवजातीच्या उज्वल भवितव्यासाठी धैर्याने लढणारी माणसे मला या कादंबरीत भेटली.

पुढे तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातून हेगेल व मार्क्स यांच्या तत्त्वमीमांसांचा परिचय मला झाला. मी मुंबईस येऊन कामगारवर्गाच्या संघटनेचे काम करू लागलो व तेथे काही कम्युनिस्ट कार्यकर्त्यांशी ओळख होऊन मी कम्युनिस्ट पक्षात सामील झालो. या नंतरच्या कार्यात असताना,१९३३ मध्ये गॉर्कीचे आत्मचरित्र मला वाचायला मिळाले. ' आई ' या कादंबरीत मानवजातीच्या भवितव्याचे व श्रेयाचे जे चित्र रेखाटले आहे त्याचे मर्म गॉर्की यांच्या आत्मचरित्रपर लिखाणात मला सापडले. जीवनाचा केवढा विशाल पट त्यामध्ये दिसून येतो ! सर्व तऱ्हेची माणसे गॉकी यांना भेटतात. गरीब व श्रीमंत, माणुसकीला वंचित झालेले व माणुसकीची ऊब जपून ठेवणारे, अनेकजण या विस्तृत जीवनपटात सामावून जातात. आणि त्यांत थोर सहृदयतेने, दृढ सत्यनिष्ठेने अचल राहिलेले गॉर्की डोळ्यांसमोर उभे राहतात.

एका अपंग झालेल्या लहान मुलाची गोष्ट गॉर्की यांनी सांगितलेली आहे. कम्युनिझमचे ध्येय काय हे सांगण्यासाठी मी ती गोष्ट नेहमी सांगतो व ती परिणामकारक ठरते. त्या अपंग मुलाचे सवंगडी आपापले खेळ खेळतात, पण त्या मुलाला विसरत नाहीत, फुलपाखरे, तिकिटे इत्यादी वस्तू जमविण्याचा छंद मुलांना असतो व अशा जमा केलेल्या वस्तू त्या अपंग मुलाजवळ ते सवंगडी आणून देतात. तो मुलगा त्या वस्तूंना जपण्याचे, वर्गीकरण करून ठीकठाक लावून ठेवण्याचे काम करतो. त्याचे अपंगत्व तो विसरून जातो व सवंगड्यांच्या आनंदात सहजपणे सहभागी होतो. अगदी साधे व भाबडे वाटणारे लहान मुलांच्या आनंदी जीवनाचे हे चित्र आहे. पण, ते आजच्या बेगडी संस्कृतीत नांदणाऱ्यांना लाजविणारे आहे. लहान मुलांना आयुष्याचा जो अर्थ समजला, सहृदय सहकार्याचे जे जीवन चिमुकल्या विश्वात त्यांनी निर्माण केले, ते मोठ्या माणसांना का करत येऊ नये ? देशच्या देश बेचिराख करणारी युद्धे का व्हावीत ? धर्ममंदिरातून पवित्रतेचा उद्घोष चालू असताना साऱ्या मानवजातीचे जीवन अमंगल का व्हावे ?

 गॉर्की यांच्या साऱ्या लहानमोठ्या कृतींतून बेगडी संस्कृती, खोटा

धर्म व निराशेत कुढत बसणाऱ्या मनाची दुर्बलता यांचा खड्या शब्दांत निषेध आहे. युरोपातील संस्कृतीवर जेव्हा फॅसिझमचा भीषण आघात झाला, तेव्हा रोमाँ रोलाँ प्रभृति थोर साहित्यिकांनी फॅसिझमविरुद्ध झगडण्याचा आदेश दिला. तेव्हा युरोपच्या साहित्यिकांनी हे स्पष्ट दाखवून दिले की जीवनात भल्याबुऱ्यांचा जो संघर्ष आहे, त्यात साहित्यिकाने तटस्थ राहणे योग्य नाही. हीच भूमिका टॉलस्टॉय यांनी घेतली होती व गॉर्की यांनी तीच भूमिका सतत घेतलेली दिसते.

आज गॉर्की यांच्या 'आई'चे मला स्मरण होत राहते. त्या अपंग मुलाचे चित्र माझ्या डोळ्यांसमोर तरळत राहते. तरुणपणी ज्या तऱ्हेचा जिवंतपणा व सामर्थ्य त्या प्रत्ययामुळे मला अनुभवास आले तोच जिवंतपणा आजही अनुभविता येतो. याचे कारण मला वाटते की मानवी जीवनामध्ये असलेल्या आंतरिक सामर्थ्याला, सहेतुकतेला व शोध घेण्याच्या प्रवृत्तीला गॉर्की यांचे आवाहन आहे. मराठी भाषेत लिहिलेले, तसेच इंग्रजीत लिहिलेले किंवा भाषांतरित झालेले, साहित्य आज मी वाचतो. त्यातले काही वाङ्मय समकालीन जीवनातल्या भीषण विसंवादाच्या मुळाशी जाऊन शोध घेऊ पाहणारे आहे. ते वाङ्मय काही वेळी निराशेने आणि वैफल्याने काळवंडलेले वाटले तरी त्यात सत्याचा व मानवी श्रेयाचा शोध आहे. मानवाची सुसंस्कृत होण्याची, विवेकाने आणि सामंजस्याने जगण्याची मनीषा व धडपड व्यर्थ आहे, असे म्हणणारा लेखकही शेवटी श्रेयाचा शोध घेऊ पाहात आहे. ते त्याला सापडेनासे झाल्याने तो उद्वेग आणि संताप प्रकट करीत आहे, असे मला दिसते. आज एकेका देशात व देशांच्या परस्पर व्यवहारांत जे चालले आहे, त्यामुळे माणूस भांबावून जाणे साहजिकच नाही का ? कोणत्याहि तत्त्वप्रणालीची प्रतिमा आज अभंग राहिलेली नाही, अशा वेळी साधा माणूस व साहित्यिक अगतिक बनावा अशी ही विपरीत अवस्था आहे.

आणि, अशी अवस्था आहे म्हणूनच गॉर्की यांच्या खंबीर व समर्थ शब्दांना मोठे मोल आहे. जुलुमाविरुद्ध झगडणाऱ्या स्वतंत्र मानवाची हाक गॉर्कीच्या साहित्यात आहे. झारशाही गेली, फॅसिझमचा नाश झाला, पण अजून मानवजात निरंकुश सत्ताधाऱ्यांच्या, धनिकांच्या व युद्धपिपासूंच्या पाशांतून मुक्त झालेली नाही. आज म्हणूनच गॉर्की यांचे स्मरण धैर्याचा संदेश देणारे आहे. शेक्सपिअर व रवींद्रनाथ हे जसे मानवजातीला वंद्य व प्रिय आहेत, तसेच गॉर्की आहेत. ते रशियाचे किंवा कम्युनिस्टांचे लेखक नसून सर्व जगाचे लेखक आहेत. तरुणपणीच गॉर्कीच्या साहित्याचे 

संस्कार माझ्या मनावर झाले व ते आजही दृढ आहेत, म्हणून आज त्यांचे स्मरण करताना मला त्यांच्याबद्दल कृतज्ञता वाटते. त्याचबरोबर मराठी वाचकांना विनंती करावीशी वाटते की या थोर साहित्यिकाच्या सहृदय व स्फूर्तिदायक वाङमयाचा त्यांनी लाभ घ्यावा.

# लेनिनग्राद–रीगा–मास्को

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... दि: ..........
क्रमांक .................... नोंद दि: ..........

---

तारीख ११ ऑगस्ट रोजी सकाळी ६ ला सांताक्रूझ तळावरून आम्ही निघालो. विमानाचा प्रवास म्हणजे फक्त ४४ पौंड वजन बरोबर घेता येते. तोच वजनाचा नियम आणखी एका अर्थाने मी पाळला. फार अवजड असे पूर्वग्रह आणि बोजड अपेक्षा बरोबर बाळगावयाच्या नाहीत. मन हलके ठेवायचे, प्रवासाचा स्वच्छंद आनंद घ्यावयाचा. एवढेच मी ठरविले. त्यामुळे अपेक्षाभंगाचे दु:ख टळले व अनपेक्षित अनुभवांचे वेगळेच मोल वाटले.

लेनिनग्रादला ऑक्टोब्रस्काया नावाच्या मोठ्या आलिशान होटेलमध्ये मी व माझे सहप्रवासी नागपूरचे हायकोर्ट जज्ज श्री. अभ्यंकर उतरलो. सिमल्याच्या जुन्या व्हाईसरिगल लॉजमध्ये एका सेमिनारसाठी जाण्याची मला संधी आली होती. तेथल्या खोलीत जशी सारी आधुनिक सोयसाधने होती तशी या होटेलात होती. पण आपल्या अंगवळणी पडलेल्या गोष्टींचा प्रश्न येतोच. सहा वाजता उठून चहा मिळणे येथे शक्य नव्हते. एकदम नऊ वाजता न्याहारी. झोप साडेपाचलाच संपे व मी लगेच सारे आटोपून कपडे घालून तयार होई. पहिल्या सकाळी प्रश्न आला की नऊ वाजेपर्यंत काय करायचे ? म्हणून फिरायला जायचे ठरविले. होटेलमधून बाहेर पडू देतील का ? मागे कोणी गुप्तहेर लागेल का ? अशा शंका मनात आल्या !

मी होटेलच्या बाहेर पडलो. सरळ लागला तो रस्ता घेतला. थोड्या वेळाने उजव्या बाजूला लहान रस्त्यात वळलो. माझा पाय दुखावला असल्याने फार चालणे मला शक्य नव्हते. सुदैवाने तेथेच एक चौक लागला

व लहानशी पार्कवजा बसण्याची जागा दिसली. आठदहा बाके वर्तुळाकार मांडलेली व मध्ये फुलझाडांचे ताटवे होते. नुकतेच कोवळे ऊन पडले होते. मी एका बाकावर बसलो. थोडयाच वेळात बाकांवर रशियन वृद्ध स्त्रिया मुलांना घेऊन बसल्या. रस्त्यावर माणसांची ये-जा चालू होती. एखादा दुसरा मनुष्य माझ्या बाकावर बसे. तुम्ही कोण ? म्हणून त्याने विचारावे. 'मी हिंदी आहे' असे मी सांगावे. एकमेकांची भाषा कळत नाही. या गोष्टीमुळे दोघांनाही हसू यावे, असा प्रकार चालायचा.

मी थोडा वेळ एकटाच बाकावर होतो व सिगारेट ओढीत, खेळणाऱ्या मुलांकडे पहात होतो. एवढयात माझ्या उजवीकडून दोन वीस-बावीस वर्षांची तरूण मुले कारखान्यातील कामकऱ्यांच्या पोषाखात येत होती. दोघांची आपसात काही मस्करी चालली होती. एकाच्या तोंडात सिगारेट होती. माझ्यासमोरून ती मुले पलीकडे चार-आठ पावले गेली व मग वळून माझ्याकडे आली. त्यातला एक मुलगा मला काही म्हणू लागला. 'मी हिंदी आहे' हे माझे ठराविक उत्तर मिळाले, तरी तो रशियनमध्ये बोलत राहिला. मला हसण्याशिवाय दुसरे काही करणे शक्य नव्हते. त्या मुलाने हात पुढे केला. तेव्हा मला कळले की तो काही मागत आहे. त्याला काडयाची पेटी हवी असेल असा अंदाज करून मी खिशातून त्याला पेटी दिली. तो हंसून मानेने नको म्हणाला व 'सिगारेटी' असे म्हणाला. तेव्हा माझ्या लक्षात आले व मी सिगारेटची पेटी काढून त्याला एक सिगारेट दिली. दुसरा मुलगा हसत उभा होता. मग 'पसीबा' ('धन्यवाद' याअर्थी रशियन शब्द) म्हणून ते दोघे हसतहसत निघून गेले. आजूबाजूच्या रशियन स्त्रिया व येणारेजाणारे लोक हे सारे पाहात होते.

या प्रसंगात तसे काही नाही. पण मला हे अनपेक्षित मात्र वाटले. परकीय माणसाशी आतिथ्यपूर्व वागणूक मला अपेक्षित होती. इतर कोठेही आतिथ्याबद्दल अगदी सहजपणे माणसे जागरूक असतात. रशियातल्या प्रवासात आम्हाला हे आतिथ्य खूपच अनुभवास आले. सर्वच रशियनांचे काही सहज तर काही थोडे रीतिरिवाजाच्या पद्धतीचे आतिथ्यशील वागणे होते. पण, या तरुण रशियनांचे वागणे वेगळेच होते. परकीय माणसांबद्दल परकेपणाची भावनाही न ठेवणारी ही मुले मला वाटली.

मी आधीच सांगितले आहे की मी रशियात जाताना सारे पूर्वग्रह भारतातच ठेवले होते. दहा दिवसात काय पाहता येईल ? काय पाहणे अशक्य ठरेल ? याची मला अटकळ होती. 'समाज व्यवस्था' पाहणे याला अर्थ नसतो, असे मी धरून चाललो होतो. माणसे, इमारती, रस्ते व बागबगीचे

पाहता येतात.'व्यवस्था' ही अशी मूर्त नसते. माणसांच्या तोंडावरून, वागण्यावरून तेथील राज्ययंत्राचे रूप कळेल, सोव्हिएत सत्तेविषयीचे असमाधान किंवा समाधान कळेल, अशी समजूत भाबडेपणाची मला वाटते. ते असो.

मी व श्री. अभ्यंकर तेथे निमंत्रित म्हणून गेलो, त्याचे काही अधिकृत प्रयोजन होते, ते सांगायला हवे. सोव्हिएत यूनियन व भारत यांच्यांतील लोकांमध्ये आपसात मित्रभाव वाढावा या उद्देशाने भारतात भारत-सोव्हिएत मैत्री-संघ ही भारतीय संस्था काम करीत आहे, तशीच एक सोव्हिएत. भारत-मैत्री-संघ नावाची संस्था तिकडे काम करीत आहे. भारतातील एक राज्य व सोव्हिएत यूनियनमधील एक राज्य यांच्यात जास्त जवळचे संबंध आणणे सोयीचे होईल, या दृष्टीने अशीही व्यवस्था करण्यात आली आहे की लेनिनग्राद प्रदेश व महाराष्ट्र राज्य यांना निकटचे मानावे. याच तऱ्हेने,ब्रिटनमधील मँचेस्टर परगणा व लेनिनग्राद प्रदेश यांचे संबंध जोडण्यात आले आहेत, असे मला तेथे कळले. लेनिनग्रादच्या शाखेने १५ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करावयाचे ठरविले व त्या उत्सवात भाग घेण्यासाठी संबंधित अशा महाराष्ट्र राज्यातून दोन प्रतिनिधी बोलविण्याचे ठरले. या निमंत्रणावरून आम्ही दोघे लेनिनग्रादला गेलो व १५ ऑगस्टच्या समारंभात आम्ही भाषणे केली. मी माझे भाषण मराठीत लिहिले होते. त्याचे भाषांतर प्रथम इंग्रजीत मी लिहून दिले व त्यावरून ते रशियन भाषेमध्ये प्रत्यक्ष समारंभाच्यावेळी माझ्या मराठी भाषणाबरोबर श्रोत्यांना ऐकता आले.

या समारंभाला लेनिनग्रादमधील भारतीय, व इतर देशांतील लोक होते व रशियन लोकही होते. समारंभ एका टोलेजंग सभागृहात होता व गर्दी चांगली होती. समारंभानंतर रशियन गाणी, कसरतीचे प्रयोग व नंतर भिलाई कारखान्याची फिल्म होती. दोन भारतीय विद्यार्थ्यांनी गाणी म्हटली व तोंडात धरून वाजविण्याचा बाजा वाजवून दाखविला.

या समारंभाच्या आधीपासूनच तेथील भारतीय विद्यार्थ्यांपैकी बहुतेकांशी आमचा परिचय झाला. आमचे रशियन दुभाषी डॉ. बरन्निकोव्ह यांनीच हा परिचय करून दिला. या विद्यार्थ्यांमध्ये एक मुंबईचा शरद देसाई हा विद्यार्थी होता. त्याच्या मदतीने रशियन भाषेची अडचण दूर होऊन आम्हांला दोनतीन रशियन व्यक्तींशी ओळख करता आली.

येथे एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. दोन-तीन भारतीय विद्यार्थी व दोन रशियन तरुण स्त्रिया असे आम्ही दुपारी चहाला जमलो होतो. एक एक रशियन स्त्री फार अबोल होती, दुसरी तशी नव्हती. आम्ही बोलता 

बोलता युद्धाच्या भवितव्याबद्दल बोलू लागलो. तो विषय सहज आला होता व आम्ही चर्चा करीत होतो. दोघाही रशियन स्त्रियांना थोडेफार इंग्रजी समजत होते. अगदी अनपेक्षितपणे ती अबोल स्त्री उठून उभी राहिली व म्हणाली, "कृपा करून युद्धाबद्दल बोलू नका. सुंदर ऊन पडले आहे. मला फक्त जगायचे आहे." एवढेच बोलता बोलता ती सद्गदित झाली, खाली बसली व तोंड खाली घालून रडू लागली. आम्ही सारेजण स्तंभित झालो. आमच्या मित्रांपैकी एकजण म्हणाला तिचे आईबाप व भावंडे लेनिनग्रादच्या भीषण वेढयात ठार झाले. ती त्या वेळी लहान होती. 'आम्ही हा विषय काढला. माफ करा. आम्हाला माहीत नव्हते' असे मी म्हटले. पण, आमच्या सर्वांच्या मनावर विलक्षण खिन्नता आली. तेव्हा ती मुलगी सावरली व हसण्याचाप्रयत्न करीत म्हणाली, 'मला काही आठवत नाही व आठवण करून घ्यायची मला भीती वाटते."

जर्मन आक्रमणाच्या वेळचा लेनिनग्रादचा ९३० दिवसांचा भीषण वेढा म्हणजे अमानुष क्रौर्याची व असीम धैर्याची एक विलक्षण गाथा आहे. मी रूढ अर्थाने 'अध्यात्मवादी' नाही, पण माणूस काय करू शकतो, माणूस आहे तरी कोण व कसा, याची उत्तरे खऱ्या गूढ आंतरिक पातळीवर मिळतात ती अशा कसोटीच्या प्रसंगी, असे मला वाटते. सोव्हिएत संस्कृति ही भोगवादी आहे व माणसाला समाधानी जनावर बनविणारी आहे, असे काहीजण मानतात. मला ते पटत नाही, कारण या वेढयाचे चित्र माझ्या डोळयांसमोर उभे राहते. हिटलरच्या बॉम्बफेकीला दाद न देता धैर्याने लढणारी ब्रिटिश जनता, व्हिएटनाम मध्ये लढणारी जनता आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देणारी भारतीय जनता यांच्यात जी 'आध्यात्मिकता' व मनोधैर्य आहे, तेंच येथील रशियन जनतेत आहे, याची साक्ष लेनिनग्रादच्या जनतेने दिलेली आहे.

लेंनिनग्रादच्या आमच्या अनुभवांत आम्हाला आठवणीत राहतील अशी तेथील चित्रसंग्रहालये, पीटर द् ग्रेटची भव्य उद्याननिवासस्थाने, अशा गोष्टी सांगता येतील. प्रेक्षणीय स्थळे पाहताना होणारा आनंद आम्हाला मिळत होताच, आणखी एक गोष्ट सतत जाणवत होती. क्रांती करणाऱ्या या रशियन लोकांना इतिहासाची आदरपूर्वक जाणीव पक्की आहे. पीटर हा प्रगतिप्रिय झार होता. अिव्हान द् टेरिबल हा नावाप्रमाणेच भयंकट क्रूर होता. झारशाही हीच मुळी प्रजेला पिळून काढणारी निरंकुश राजवट होती. पण या साऱ्या झार सम्राटांची स्मारके या क्रांतिकारकांनी मोठया समतेने जतन केलेली दिसतात. खरी क्रांती

इतिहासाला विसरत नाही, व जुन्यातले भलेबुरे सारेच निस्पृहपणे जतन करते, असा प्रत्यय आम्हाला आला. लेनिनच्या लहानसहान स्मारकांची तर फारच जिव्हाळ्याने जपणूक केलेली आढळते.

पुष्किन-हाऊसमध्ये क्रांतिपूर्व काळातील साहित्यिकांच्या जीवनाची स्मारक–चिन्हे अशीच भक्तिभावाने जतन केलेली मला दिसली. पुष्किन, टॉलस्टॉय, अलेक्झांडर ब्लॉक यांच्याशी संबंधीत लहानसहान गोष्टीही मांडून ठेवलेल्या होत्या.

लेनिनग्रादमधून १७ तारखेला आम्ही रीगा या लॅतव्हियाच्या राजधानीच्या शहरी गेलो, या शहराचा तोंडवळा आम्हांला वेगळा जाणवला. बाल्टिक समुद्रावरचे हे बंदर म्हणजे इतिहासात गाजलेले व अनेक संकटांना व झंझावातांना झेलून आज पुन्हा हसत उभे असलेले सुंदर शहर आहे. मी हिंदुस्थानाबाहेरचे कोणतेच देश पाहिलेले नाहीत, पण वास्तुशिल्पाचा परिचय चित्रांतून व चित्रपटांतून होत जातो. त्यामुळे मला येथील जुन्या वास्तूंमध्ये युरोपीय वास्तुशिल्पाची वेगळीच भव्यता व रचना दृष्टीसमोर आली. येथील लॅतव्हियन भाषा ही जर्मन भाषेला जवळची आहे व लिपी रोमन आहे. यामुळे एक नवाच अनपेक्षित अनुभव आला. मराठी भाषा संस्कृतच्या जवळची म्हणून रीगाच्या लोकांना आम्ही जवळचे वाटत होतो, कारण जर्मन भाषासमूह हा संस्कृतच्या जवळचा, असे हे दूरचे व जवळचे नाते होते! आजवर अनेक भारतीय सोव्हिएत युनियनमध्ये येऊन गेले. पण ते सारे दक्षिणेकडील काझाकिस्तान, उजबेगिस्तान इत्यादी मुसलमान राष्ट्रांतून गेले होते. लॅतव्हियात जाणारे भारतीय प्रतिनिधी आम्ही नवीन होतो. आमच्या बरोबर डॉ. बरन्निकॉव्ह होतेच, शिवाय चांगले इंग्रजी जाणणारे एक लॅतव्हियन गृहस्थ होते. त्यांनी म्हटले की येथे डॉ. सुनीतिकुमार चतर्जी हे भारतीय भाषाशास्त्रज्ञ तेवढे येथून गेले आहेत.

रीगामध्ये सांस्कृतिक खात्याचे उपमंत्री व पौर्वात्य संस्कृतीच्या अभ्यासकेंद्राचे विद्वान यांच्याशी आमची चर्चा झाली. थोडया वेळात फारसे खोलात आपण कोणी शिरू शकत नाही, व तसा प्रयत्न करणे फाजिल शहाणपणाचेच ठरते. पण, एक गमतीदार गोष्ट चर्चेत निघाली ती अशी : ते विद्वान म्हणाले की एका जुन्या लॅतव्हियन पंडिताने असे मांडले आहे की आम्ही लॅतव्हियन भारताकडून उत्तरेकडे आलो आहोत. तेव्हा मी त्यांना म्हटले की भारतीय आर्य उत्तर ध्रुवाजवळील प्रदेशातून दक्षिणेकडे आले असा आमच्या पंडितांनी सिद्धान्त मांडला

आहे! प्राचीनतम काळातली मानवसमूहांची परिभ्रमणे कोणीकडून कोणीकडे झाली यांची काही अनुमाने कशी उलटसुलट असू शकतात, याचे प्रत्यंतर आम्हाला सर्वांनाच आले.

एकमात्र खरे की लॅतव्हिया हा देश रशियापेक्षा वेगळा, जर्मन संस्कृतीच्या जवळचा आहे. पण, संस्कृतीची जवळीक असूनही लॅतव्हियावर मोठे संकट आले ते हिटलरच्या जर्मन आक्रमणाचे. आमच्या प्रवासात हृदयाला हेलावून टाकणारे दृश्य आम्ही पाहिले ते रीगा शेजारच्या कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पच्या जागी बांधलेल्या स्मारकभूमीचे. या कॅम्पमध्ये एक लक्ष चाळीस हजार लॅतव्हियन देशभक्त व समाजवादी नाझींनी डांबले होते. त्यापैकी फक्त ३०० माणसे जिवंत बाहेर पडली. त्यापैकी एक वृद्ध स्त्री व एक पुरुष तेथील कबरींवर फुले वाहण्यासाठी त्या दिवशी आलेले आम्हाला भेटले. चार वर्षे ती स्त्री त्या कॅम्पमध्ये राहिलेली होती. एका कुटुंबाला धरून आणावयाचे, पुरुषांना एकीकडे, स्त्रियांना दुसरीकडे व मुलांना तिसरीकडे ठेवावयाचे अशी कॅम्पची व्यवस्था होती. ह्या स्त्रीला मुलांचा संभाळ करण्याचे काम दिले होते. या कॅम्पमधील माणसांचे ३७,००० लिटर रक्त काढून ते जर्मन फौजेसाठी पाठविण्यात आले. "मुलांचेही रक्त काढण्यात येई, व 'रक्तदाना'नंतर बेशुद्ध झालेली मुले मी हातावर घेऊन परत घेई," असे सांगताना ती स्त्री रडू लागली.

या कॅम्पमध्ये एक विस्तीर्ण काळी शिळा हुतात्म्याचे स्मारक म्हणून आहे. तिच्यावर एक कुंड असून त्यात एक ज्वाला सतत धगधगताना दिसते. तिच्यापासून दूरवर असतानाच नाडीचे ठोके पडतात त्या लयीत एक करुण क्षीण आवाज ऐकू येऊ लागतो. शिळेच्या जवळजवळ जावे तसतसा तो आवाज आपल्या काळजाचा ठाव घेऊ लागतो, आपल्या रक्ताच्या स्पंदनाशी लय साधतो. येथील हजारो स्त्री–पुरुषांच्या व अर्भकांच्या आत्म्यांचा अविरत आक्रोश अशा लयीत चाललेला ऐकवत नाही. या शिळेखाली एक टेपरेकॉर्ड कायम फिरण्याची योजना केलेली असावी. या विस्तीर्ण कॅम्पच्या प्रांगणाचे प्रवेशद्वार छायाचित्रात दाखविल्याप्रमाणे मोठ्या सूचक प्रतीकाचा उपयोग करून बांधले आहे. या दाराच्या प्रचंड तिरप्या शिळेवर अक्षरे आहेत : "या दाराच्या मागे भूमाता आक्रोश करीत आहे."

हे सारे प्रांगण, त्यातील ४०–५० फुटी प्रचंड मानवाकृती, सतत तेवणारी ती ज्वाला व आक्रंदनाची ती लय, आणि ते मृत्यूद्वार हे सारे

एक भीषणकरुण काव्य वाटावे, असे रचले आहे. ज्यांनी एवढे भीषण सोसले, त्यांनाच एवढे करुण प्रतीक कल्पिता आले असे माझ्या मनात आले. ज्या प्रांगणात मुलांना डांबण्यात आले होते त्या जागेतून, मी एक लहानसा दगड आणला आहे व तो जपून ठेवला आहे.

रीगाहून आम्ही सरळ मास्कोला परतलो. २० तारखेची संध्याकाळ होती. त्या दिवशी मॉस्कोला बराच काळ राहिलेल्या एका मराठी मित्राची गाठ पडली व दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे चहाला जायचे ठरले. सकाळी आठला आम्ही त्यांच्या घरी गेलो. त्यांनी मास्को रेडिओ लावला होता. बातम्यांची वेळ होती. पहिलीच बातमी आली की वॉरसा कराराच्या राष्ट्रांची सैन्ये प्रागमध्ये गेली आहेत. आम्हाला बातमी फक्त ऐकू आली. पण समजली नाही. मित्राने नंतर समजावून सांगितली. रणगाडे, विमाने, युद्धाच्या वादळापूर्वीची भीषण शांतता. काय घडते आहे ? काय घडणार आहे ? काही अंदाज होईना. या आक्रमणाने आमची मने विद्ध झाली व क्षुब्ध झाली. एका राष्ट्राचे स्वातंत्र्य रणगाड्यांखाली चिरडले जात होते. हे सारे कशासाठी ? आणि यातून कोणता भस्मासूर पुन्हा थैमान घालू लागणार आहे ?

आमचे मित्र डॉ. बरन्निकोव्ह यांना आम्ही परत होटेलवर जाऊन भेटलो. त्या दिवशीचा कार्यक्रम त्यांनी सांगितला. झेकेस्लोव्हाकियातील घटनेमुळे आमचे मन स्थळे पाहण्याच्या अवस्थेत नाही, हे आम्ही त्यांना सांगितले. ते एवढेच म्हणाले, आपण ठरलेला कार्यक्रम पार पाडू. आम्ही न्याहरी करून टॅक्सीत बसलो. सभोवारची माणसे या घटनेने चिंताग्रस्त झालेली दिसतात का ? हे आम्ही न्याहळून पहात होतो. रस्त्यात, दुकानात कोठेच काही अस्वस्थता दिसत नव्हती. आम्ही मोठमोठ्या 'सुपरबाझार' सारख्या दुकानातून गेलो. दुकानातून गर्दी होती. मालाचे ढीग होते व स्त्रीपुरुष माल घेत होते. एका खेळण्याच्या दुकानात आम्ही गेलो. लहान मुलांसाठी हर तऱ्हेची सुंदर खेळणी होती. मुलांना घेऊन खेळणी विकत घेणारे आईबाप शांतपणे हिंडत होते.

आम्ही परत टॅक्सीत बसल्यावर डॉ. बरन्निकोव्हच्या मार्फत टॅक्सीवाल्याला विचारले की झेक घटनेबद्दल त्याला काय वाटते. तो एक २२ वर्षांचा तरुण मुलगा असावा. तो म्हणाला, "माझे वडील दुसऱ्या महायुद्धात ठार झाले. लाखो रशियनांनी नाझींच्या विरुद्ध लढून झेकोस्लोव्हाकियाला स्वतंत्र होण्यास मदत केली. यात हजारो रशियनांचे प्राण गेले. आम्ही झेकोस्लोव्हाकीयाचे स्वातंत्र्य कशाला नाहीसे करू? पण, त्यांचे

व आमचेही स्वातंत्र्य धोक्यात आहे. म्हणून या फौजा गेल्या आहेत." आपल्या भाषेतच एकेक तुटक वाक्य अडखळत तो बोलत होता व त्याचे भाषांतर डॉक्टर आम्हाला सांगत होते. भाषांतर संपले व आम्ही गप्प राहिलो. थोडा वेळ तसाच गेला व तो मुलगा म्हणाला, "डॉक्टर! पाव्हण्यांना माझे म्हणणे पटले का?" ते वाक्य डॉक्टरांनी आम्हाला हिंदीत सांगितले. (डॉक्टरांना हिंदी भाषा नीट बोलता येत होती). आम्ही एवढेच म्हटले की, "आम्ही तुझे फक्त ऐकून घेतले असे त्याला सांगा." ते ऐकून त्या मुलाचा चेहरा गंभीर झाला. त्याला जे मनातून वाटले ते त्याने सांगितले. ते आम्हाला पटले नाही हे ओळखून त्याला आश्चर्य वाटले असावे किंवा खिन्न वाटले असावे.

सोव्हिएत युनियन मधील वृद्ध व तरुण, पुरुष व स्त्रिया, कम्युनिस्ट व इतर, अशी सारी आम्हाला तरी प्रांजळ व निर्भयपणाने बोलणारी वाटली. पण, ती खरोखर तशी होती याला पुरावा काय? आम्हाला वाटले एवढाच.

आमचे तेथील मित्र म्हणाले की, मी इतका दीर्घ काळ येथे आहे. माझे रशियन मित्र आहेत. त्यांच्या बोलण्यात भीती किंवा खोटेपणा व दंभ मला कधी वाटला नाही. पण याचे कारण त्यांना स्वतंत्र विचार करण्याची सवयच उरलेली नाही. आपले काम प्रामाणिकपणाने व नेटाने ते करतात. त्यांना मुलांच्या शिक्षणाची चिंता नाही, वृद्धापकाळाची चिंता नाही. बेकारीची भिती नाही. जनावरांसारखे तृप्त व निष्काळजी जीवन ह्या नागरीकांचे आहे, असेही तुच्छतेने कोणी म्हणेल!

मी मनात विचार केला की असेही असेल! विचार हे तरी श्रमच! सुखासुखी श्रम कोण कशाला करील? आपली समाजव्यवस्था बरी नाही व राज्यकर्ते चुकत आहेत, असे गृहीत धरून आपण भारतीय सुशिक्षित माणसे अनेक प्रश्नांवर चर्चा करतो. तेथील नागरिकाला त्या समाजव्यवस्थेबद्दल राग नाही. राज्यकर्ते चुकत नाहीत व चुकले तर आपली चूक ते सुधारून घेतील, असा त्यांचा विश्वास आहे. मग आपण करतो तशी चर्चा ते कशाला करतील?

पण, मग या नागरिकांच्या जगण्याला काय म्हणायचें? झेक आक्रमणाविरुद्ध निषेधाची भूमिका माझी होती, म्हणून २१ व २२ हे दोन दिवस मी मॉस्कोत हाच विचार करीत होतो.

जगड्व्याळ व्यूहांचे व युद्धाच्या पवित्र्यांचे राजकारण सामान्य माणसाच्या आकलनात येणारे उरले आहे का? शासकीय मतप्रचाराने भारावून जाण्या-

पलीकडे हा सोव्हिएत नागरिक जात नाही. हा मठ्ठच नाही का ? आणि आपण ? जगातले इतर देशांतले सामान्य नागरिक ? आपण ' सुबुद्धपणे स्वतंत्र विचार ' करतो का ? का शासकीय व शासनविरोधी अशा मत-प्रचारांच्या वावटळीत आपणही तरंगत जातो ?

या प्रश्नांचेही कोणाला वावडे वाटेल ! झेक घटनेबद्दलची माझी निषेधाची भूमिका निःशंक आहे. पण, आपण स्वतंत्रपणे साकल्याने विचार करून बोलतो, किंबहुना बोलू शकतो, हे मला पटत नाही. आपले मानवी जीवन, सोव्हिएत तसेच इतर समाजव्यवस्थांतूनही, फार गुंता-गुंतीचे व परिमाणाने व्यक्तीच्या आकलनाच्या बाहेर गेलेले असे आहे. या वस्तुस्थितीकडे डोळेझांक करून, या ना त्या व्यवस्थेत मात्र व्यक्तीला स्वतंत्र विचाराचे वरदान लाभले आहे, असे मानणे मला प्रौढीचे वाटते. आज साऱ्याच देशांतील व समाजव्यवस्थांतील व्यक्ती असहाय आहे. ही स्थिती स्पृहणीय नाही हे मला समजते. पण सोव्हिएत नागरिक तेवढे समाधानी जनावरे बनले आहेत, हा मला दुरभिमान वाटतो. याचे कारण मी दहा दिवसांतच का होईना जी माणसे पाहिली ती मला आपल्यासारखीच वाटली, स्वाभिमानी सरळ माणसे वाटली.

आम्ही या विषयावर आपसातही बोललो. मी डॉ. बरन्निकोव्ह यांच्याशी व इतरांशीही बोललो. असाच एकदा विषय निघाला तेव्हा तेथील स्त्री-पुरुष संबंधाचा प्रश्न निघाला. येथील स्त्रिया अनेक व्यव-सायांत पुरुषांच्या बरोबरीने कामे करतात. काम करणाऱ्या माणसांपैकी निम्म्या स्त्रिया आहेत. मग याचा परिणाम काय होत असेल ? तेथील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांत वेगळी विद्यार्थिनींची होस्टेल्स नाहीत, हे पाहून आम्हाला आश्चर्यच वाटले. भारतीय विद्यार्थ्यांमध्ये शांती नावाची तरुण मुलगी होती. तिला मी विचारले की अशा व्यवस्थेत तुला भीती वाटत नाही का ? तिने अगदी सहज म्हटले की ' मुळीच भीती वाटत नाही. "

सोव्हिएत समाजाबद्दल राग असणाऱ्या तेथील एका भारतीय मित्रा-कडे गप्पा करताना स्त्रीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निघाला. तेव्हा त्या गृहस्थाची पत्नी म्हणाली मॉस्कोच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत मध्य-रात्रीही जाऊन येण्याला मला भीती वाटणार नाही. स्त्रीच्या अब्रूला येथे धोका नाही व त्याला पोलिसांचा वचक हे कारण नाही. पुरुष व स्त्री यांच्यामध्ये हे नवे नाते केवळ दहशतीने निर्माण होणारे नसून यात कोठेतरी सामाजिक मूल्यांमध्ये व संस्कारांमध्ये मोठा बदल झालेला आहे. ' पौरुषाच्या ' कल्पना जाऊन एक समानतेचे नाते पुरुषांनी खरो-

खरच मानले आहे.

पण, सोव्हिएत समाजाचे आणि माणसांचे आम्हाला घडलेले दर्शन त्रोटक काळातले व धावते आहे. यातून फार खोलवरचे असे काही अंदाज सांगणे धाडसाचे होईल. एवढे खरे की तिसऱ्या महायुद्धाचा वणवा पेटला नाही तर येथील समाजव्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्याचे धैर्य व माणुसकीची चाड येथील माणसांतही आहे.

तारीख २२ रोजी रात्री आम्ही मॉस्कोच्या विमानतळावर आलो. डॉ. बरन्निकोव्हची ओळख झाली होती. एका देशाचा धावता परिचय झाला होता. पुन्हा जर युद्धाचा डोंब उसळला नाही तर साऱ्या मानव-जातीच्या मित्रत्वाचे स्वप्न साकार होईल असे मनात आले. पण मनात भीती होती की माणसांवर मात करणारी यंत्रे व राज्ययंत्रे, धनलोभ व दुरभिमान यांचा जय झाला तर सारेच स्वप्न विरून जाईल.

सुरुवातीला मी म्हटले आहे की पूर्वग्रह मागेच ठेऊन मी हा प्रवास केला. दहा दिवसांत तेथील समाजाची आर्थिक परिस्थिती, नीतिमत्ता, बौद्धिक विकास वगैरे गोष्टींचे मोजमाप घेण्याचा भलताच हव्यास मी केला नाही. सोव्हिएत यूनियनचा दौरा करून आलेले लोक अनुकूल किंवा प्रतिकूल ठाम विधाने करताना आढळतात. पूर्वग्रहांच्या आधाराने त्यांचे हे निरीक्षण असते. पण 'प्रत्यक्ष पाहिल्याचा' दावा ते करू शकतात आणि तो मानला जातो, हे आश्चर्य. 'प्रत्यक्ष पाहिले' आणि ठामपणे सांगितले असे मी केलेले नाही. कारण ते मला योग्य वाटत नाही. तरी देखील मी जे म्हटले आहे ते पक्षपाती आहे असे काहीजण म्हणतीलच, याची मला जाणीव आहे. मी आपल्याकडील समाजव्यवस्थेला व इतर भांडवलदारी देशांतील समाजव्यवस्थांना, 'आतून' म्हणजे प्रत्यक्ष दीर्घ अनुभवाने, ओळखतो. सोव्हिएत समाजव्यवस्था वेगळी आहे, हेही जाणतो. दोन्ही व्यवस्थांतील गुणदोषांची तात्त्विक आणि व्याव-हारिक कल्पना मला विचाराने आलेली आहे. माझ्या प्रवासातील अनुभव मात्र केवळ प्रांजलपणे मी येथे मांडले आहेत.

सोव्हिएत समाजव्यवस्थेचे बारकाईने व शास्त्रीय पद्धतीने निरीक्षण करणे अशा प्रवासात अशक्य असते आणि म्हणून अशा निरीक्षणांतूनच उपलब्ध होणारी माहिती मी देऊ शकलो नाही. तेथील वस्तूंचे बाजार-भाव, विविध व्यवसायांतील माणसांची आमदनी व राहणीचे मान, विषमतेचे प्रमाण, व्यवसाय निवडण्याचे किंवा बदलण्याचे स्वातंत्र्य, घटस्फोटांचे प्रमाण, चोऱ्या व गुन्हेगारी यांचे प्रमाण, या सर्व गोष्टींविषयी

आपल्याला जिज्ञासा असते. पण यांची माहिती मिळविण्यासाठी वेगळी साधने असावी लागतात. तेव्हा, या प्रवासवृत्ताचे स्वरूप मर्यादित आहे, हे ज्यास्त मी सांगावयास नको.

भांडवलदारी व समाजवादी अशा दोन विभागांत नांदणाऱ्या मानवजातीबद्दल प्रेम व युद्धाच्या भयामुळे मनाला आलेली विषण्णता या दोन भावनांच्या सांवलीत माझे मन होते, प्रवासाच्या आरंभी तसेच शेवटीही.

अजस्त्र पंख पसरलेल्या विमानाचे दिवे दूर लुकलुकत होते. त्याच्या पोटात आम्ही शिरणार होतो. ते अंतराळात झेप घेऊन आम्हाला घरी पोचवणार होते: पण हेच विमान बाँबस् घेऊन हजारो लाखो माणसांचा बळीही घेऊ शकेल !

अशा विचाराच्या अर्धवट गुंगीत मी डॉ. बरन्निकोव्हचा निरोप घेतला. त्याचेही मन भरून आले होते. 'काय होणार असेल ते कोणी सांगावे. पण दोस्ती विसरू नका ' एवढेच तो म्हणाला.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ दि: ..
क्रमांक ........................ नोंद दि ..........

# महाराष्ट्रातील समाजवादी विचार

---

भारत स्वतंत्र झाला त्या सुमारास जन्मलेली आजची तरुण पिढी समाजवादाचा, राष्ट्रवादाचा आणि महाराष्ट्रवादाचाही विचार करीत आहे. हे सारे वाद निरुपयोगी आहेत असे मानून हिंदुत्वनिष्ठ एकसत्ता-वादी ( किंवा हुकूमशाही ) विचारप्रणालीचे आकर्षणही पुष्कळ तरुणांना आज वाटत आहे. विचारांचा असा संघर्ष तरुण मनात चालू आहे. वर सांगितलेले सर्व विचार महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनात गेली शंभर वर्षे आधी बीजरूपाने व मग कमी अधिक स्पष्ट रूपांत नांदत आलेले आहेत. सामाजिक चळवळी व राजकीय आंदोलने म्हणजे या साऱ्या विचारांच्या संमिश्र प्रेरणा व अभिनिवेश यांतून निघालेली क्रियाशीलता आहे. विचार म्हणजे भावनांना व कृतींना चालना देणारी प्रेरक तत्त्वे, आणि कोणताही प्रेरक विचार व्यक्तींना व समूहांना हलवितो, जागे करतो व कृतिप्रवण करतो.

आजच्या तरुण पिढीला महाराष्ट्रातील समाजवादी विचारांचा प्रवाह कसा वाढत गेला, त्याला भरती व ओहटी कशी आली हे कळून घ्यावेसे वाटते. याचे कारण या विचाराचे मोजमाप करण्यास, महाराष्ट्रातील पारंपरिक व आधुनिक जीवनाशी त्याचा संदर्भ पाहण्यास अशी माहिती उपयोगी पडते. त्या विचाराचे गुणदोष आणि सामर्थ्य व अधूपणा समजणेही त्यामुळे सोपे होते. ‘ समाजवादी ’ विचारांमध्ये विविध पंथांचे मार्क्सवादी आणि मार्क्सवादाला न स्वीकारणारे परंतु भांडवल-दारी व्यवस्थेला बदलून स्पर्धेच्या जागी सामाजिक सहकार्य व नियंत्रण यावे असे मानणारे समाजवादी यांच्या विचारांचा समावेश करता येईल.

प्रस्तुत लेखामध्ये समाजवादी विचारांची माहिती माझ्या स्वतःच्या वैचारिक आणि राजकीय अनुभवांच्या आधारे मी देत आहे. वैयक्तिक अनुभवांना मर्यादा असते व कल असतो. त्यामुळे प्रस्तुत मांडणी म्हणजे एक वस्तुनिष्ठ विश्लेषण नाही. १९१० साली जन्मलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीला समाजवादाची ओळख कशी झाली, माझ्या पिढीच्या व्यक्तींना समाजवादाने कार्यप्रवण कसे केले, आम्हांला कसकसे अनुभव येत गेले आणि त्याबद्दल माझी आज भूमिका काय आहे, यांचे निवेदन मी करीत आहे.

सन १९५० नंतर मी कोणत्याही पक्षात सामील झालेला नसल्यामुळे माझी भूमिका वैयक्तिक आहे, तशीच कोणत्याही पक्षाबद्दल आग्रही समर्थनाची किंवा विरोधाची नाही. (कम्युनिस्ट पक्षाचा १९५१ मध्ये राजीनामा देताना केलेले निवेदन लेखाच्या शेवटी परिशिष्ट म्हणून दिलेले आहे).

फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहात १९२५ मध्ये पहिल्या वर्षाचा विद्यार्थी म्हणून मी दाखल झालो. त्या वेळी विद्यार्थी वर्गामध्ये, निदान माझ्या परिचितांमध्ये, समाजवाद ही गोष्ट माहीत नव्हती. विद्यार्थी वादविवाद करीत तो राष्ट्रीय चळवळीच्या अंतरंगातील जहाल व मवाळ तसेच सुधारक व सनातनी प्रवृत्तींबद्दल. टिळकांचे नेतृत्व बहुतेकांना मान्य होते. माझी प्रवृत्ती आगरकरांच्या लेखांच्या वाचनामुळे सामाजिक सुधारणेला अनुकूल झाली होती. केवळ पारतंत्र्य गेले म्हणजे झाले असे मला वाटत नव्हते. त्यामुळे कित्येक वादविवादांत माझी भूमिका मवाळ राजकीय पुढाऱ्यांना अनुकूल असल्याचा आरोप माझ्यावर केला जाई. पण त्या बाबतीत आगरकरांच्या मताचा स्वीकार एवढीच माझी भूमिका आहे असे सांगून मी थांबत असे. ही आठवण सांगण्याचे कारण असे की टिळकपक्ष व गांधीपक्ष यांतील संघर्षाची जाणीव मला त्या वेळी नव्हती व राजकीय पक्षोपपक्षांच्या भूमिका समजावून घेण्याचा मी किंवा माझ्या सहाध्यायांनी प्रयत्न केलेला मला आठवत नाही. त्या वेळी महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात तो संघर्ष प्रखर असूनही आम्ही त्या बाबतीत उदासीन होतो. पण लवकरच ही स्थिती पालटली व ' यूथ लीग ' ही तरुण पिढीची संघटना मुंबईत व नंतर पुण्यात प्रभावी होत गेली. माझा व्यक्तिशः संबंध ह्या घटनांशी आला नाही, कारण कराची येथील इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळून मी तेथे गेलो.

तेथे माझा संबंध टॉलस्टॉय यांच्या वाङ्मयाशी विशेष आला व थॉमस हार्डी यांच्या कादंबऱ्यांमुळेही मला काही दृष्टी आली. माणसाचे 

धार्मिक, नैतिक व वैचारिक जीवन कसे असावे, यासंबंधी काही कल्पना मनात दृढ झाल्या. विज्ञानामुळे माणसाचें समग्र जीवन सुखी होऊ शकेल ही आशावादी दष्टी मी ठेवीत होतो, पण सामाजिक विषमता, दारिद्र्य व पिळवणूक यांचे चित्र आमच्या पिढीच्या मनापुढे होतेच. अशा वेळीच स्वातंत्र्याचे आंदोलन प्रखर होत चालले होते. त्यात नवजवान भारत सभेसारख्या तरुणांच्या संघटनाचे दहशतवादी कार्य डोळ्यांसमोर येऊ लागले होते. कराचीस या चळवळीशी संबंध असलेल्या एका पंजाबी तरुणाशी माझी ओळख झाली. तो तरुण थोडाफार समाजवादाकडे झुकलेला विशेषेत: अनार्किस्ट मताचा होता. अमेरिकेतील अनार्किस्ट पंथाचा एक लेखक पारसन्स याचे 'अनार्किझम' हे लहानसे पुस्तक तेव्हा अचानक मला वाचावयास मिळाले. या सर्व गोष्टींचा प्रभाव होऊन दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस मी इंजिनियरिंगचा अभ्यासक्रम सोडण्याचे ठरविले व एका अर्थाने दिशाहीन होऊन मी प्रथम शांति–निकेतनमध्ये चित्रकला शिकण्यासाठी गेलो. तेथे आजारी पडल्याने मला शांतिनिकेतन सोडावें लागले व बनारसला हिंदु विश्वविद्यालयात मी दाखल झालो. तत्त्वज्ञान आणि अर्थशास्त्र ह्या विषयांचा अभ्यास करण्याचे मी ठरविले, कारण समाजवादाच्या मागे ह्या शास्त्रांची भूमिका आहे, इतपत मला त्या विचाराची ओळख झाली होती.

भगतसिंगाचा खटला व फाशी, मीरतला चाललेला कम्युनिस्ट कटाचा खटला व गांधीजींच्या नेतृत्वाखाली १९२० मध्ये झालेली चळवळ यांचा समन्वित परिणाम त्या वेळी तरुण मनावर होता. लाहोर काँग्रेस अधिवेशनास मी हजर राहिलो व जवाहरलालजींना पाहिले. तेही समाजवादी आहेत व काँग्रेसच्या चळवळीतच समाजवादी प्रभाव वाढत आहे, अशी माझी साधारण कल्पना झाली होती. तेवढ्यात १९३० ची चळवळ सुरू झाली व मी काही मित्रांसह जंगलसत्याग्रहाच्या कार्यासाठी नगर जिल्ह्यात गेलो. प्रत्यक्ष राजकीय चळवळीशी व खेडेगावातल्या लोकांशी माझा येथे प्रथम संबंध आला. चळवळीचे गावोगावचे नेते भाषणे करीत त्यात सामाजिक दृष्टचा अत्यंत प्रतिगामी बोलत, जातीजातींतील वैमनस्ये उघड होत आणि व्यक्तींचे स्वार्थ व भंपकपणा नजरेस येई. या गोष्टी चालावयाच्याच असे मानून डोळे मिटून घेण्याइतकी नजर मरण्यासाठी माणूस पुष्कळ प्रौढ असावा लागतो. मी तसा नव्हतो. तरुणपणातला भाबडेपणा गेलेला नव्हता. त्यामुळे माझे मन विटत गेले. गांधी-आयर्विन करार होऊन चळवळीला विराम मिळाला. तेव्हा माझ्या मनात काहूर

उठले व मी परत बनारसला अभ्यासासाठी निघून गेलो. जंगल सत्याग्रहाच्या चळवळीमुळे श्रीनिवास सरदेसाई या मुंबईच्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांशी माझी ओळख झाली व तेथून मी मार्क्सवादाकडे वळलो.

बनारसला १९३० ते १९३२ च्या दोन वर्षांत माझा तत्त्वज्ञानाचा व अर्थशास्त्राचा तसेच गांधीजींच्या तत्त्वांचा व मार्क्सवादाचा अभ्यास चालू राहिला. मार्क्सवादाच्या अभ्यासासाठी व प्रचारासाठी आम्ही काही विद्यार्थ्यांनी तेथे स्टडी सर्कल चालविले होते व गावात 'बंगाली तोला' या बंगाली वस्तीतील दहशतवादी तरुण संघटनेशी मी संबंध ठेवला होता. अनेक भारतीय प्रदेशातले तरुण बनारस विद्यापीठात शिकत होते व एकंदरीत राष्ट्रीय भावना तेथल्या वातावरणात प्रखर होत्या. दहशतवादी संघटनांचा प्रभाव एकंदर विद्यार्थ्यांवर मोठा होता व प्राध्यापक वर्गातही अनेकजण राष्ट्रीय दृष्टीने जहाल वृत्तीचे व आतून तरुणांना मदत करणारे होते. त्या काळात रा. स्व. संघटनेच्या कार्यासाठी गणेशपंत सावरकर तेथे अनेकदा येत व राहत. आणि मराठी विद्यार्थ्यांत ह्या संघटनेला जास्त जास्त पाठिंबा मिळत होता. मी मार्क्सवादी असल्याचे इतरांना माहीत होते, पण तरी एकंदर मराठी मुलांशी माझे संबंध चांगले होते, व त्यामुळे संघाच्या तत्त्वांची व प्रकारकार्याची मला जवळून ओळख झाली.

बनारसहून १९३२ मध्ये बी. ए. झाल्यावर माझ्यापुढे प्रश्न आला की पुढे कोणत्या क्षेत्रात कार्य करावयाचे ? माझ्या तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांचा, प्रा. फणिभूषण अधिकारी यांचा, माझ्यावर फार लोभ होता व त्यांनी मला पुढील कार्याबद्दल विचारले. तेव्हा मजूरवर्गाच्या संघटनेमध्ये मला भाग घ्यावयास हवा कारण मी मार्क्सचे तत्त्वज्ञान मानीत आहे असे मी त्यांना सांगितले. तो काळच असा होता की माझ्या या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. आदर्श तत्त्वचिंतक, शिक्षक व उदार हृदयाचा थोर माणूस अशी त्यांची एक आदरणीय प्रतिमा माझ्या नेहमी स्मरणात येते.

मी कामगार संघटनेचे कार्य करण्याचे ठरवून सरळ मुंबईस आलो व स्कूल ऑफ सोशॉलॉजीमध्ये एम्. ए. चा विद्यार्थी म्हणून नाव दाखल केले. दोन तीन महिने मुंबईच्या कामगार विभागात हरवल्यासारखा मी फिरत होतो. मला सगळेंच नवे होते. या नव्या वातावरणात मी खेडवळासारखा होतो. सातारा येथील शालेय शिक्षण, कराचीचे व बनारसचे कॉलेजचे जीवन आणि गांधी, टॉलस्टॉय, हार्डी यांच्या तत्त्वांनी भारल्यामुळे मनाला आलेली एक प्रकारची वैराग्याची छटा यामुळे 

माझा पिंडच शहरी जीवनात रुळणारा राहिला नव्हता. पोषाख, खाणेपिणे व बोलणे या साऱ्या गोष्टीत येथे नवेपणा होता. पण कामगारांच्या जीवनात समरस होण्याची ईर्षा होती व तोच एक ध्येयवाद होता. मी परळ भागात होणाऱ्या लहानसहान सभांना हजर राहण्याचे ठरवून त्यांना हजर राहिलो. त्या वेळी रॉयिस्ट, कम्युनिस्ट, बोल्शेव्हिक व लालजी पेंडसे यांचा डांगे यांना मानणारा गट हे डावे गट संपाच्या सभा घेत. कामगार संघटनेच्या कार्यात त्या वेळी भारतसेवक समाजाचे श्री. ना. म. जोशी व पुढे कम्युनिस्ट पक्षात सामील झालेले श्री. शामराव परुळेकर प्रभृती कार्यकर्तेही काम करीत होते. १९३४ मध्ये गिरणी कामगारांचा सार्वत्रिक संप मुंबईस झाला त्याची ही पूर्वतयारी होती. सभांमधून गोंधळ होई, दगड पडत व सभा मोडत. काही वेळां संपावर गेलेल्या एखाद्या गिरणीतल्या कामगारांच्या सभा चांगल्या होत. कामगार लढाऊ निश्चयाने सभांत गोंधळ होऊ देत नसत.

या विखुरलेल्या संघटनांच्या मागे निश्चित धोरणे काय आहेत ? राष्ट्रीय चळवळीशी या संपाच्या तयारीचा संबंध काय ? सोव्हिएत क्रांतीसारखी कामगार शेतकरी वर्गाची क्रांती हे लोक कशी घडविणार आहेत ? असे प्रश्न माझ्यापुढे होते. जंगल सत्याग्रह, दहशतवादी तरुण संघटना, रा. स्व. संघ अशा आंदोलनाशी पूर्वी माझा संपर्क आलेला होता. मुंबईतील कामगार क्षेत्रांतील कार्यकर्त्यांशी माझा परिचय नव्हता. म्हणून या बाबतीत मी त्यांच्याशी वरील सर्व प्रश्नांबाबत चर्चा करू लागलो. त्या चर्चेत मला समाजवादी चळवळीच्या आंतरराष्ट्रीय संबंधाचाच मुख्य भाग दिसू लागला. मानवेंद्र रॉय कम्युनिस्ट इंटरनॅशनलला मान्यता देत नाहीत व विरोध करतात, कम्युनिस्ट लोक इंटरनॅशनलला संपूर्णतया मानतात व बोल्शेव्हिक हे तसे संपूर्णपणें मानीत नाहीत, असे फरक मला कळले. राष्ट्रीय चळवळ ही भांडवलदारांच्या नेतृत्वानें चालणारी व ब्रिटिश सत्तेशी तडजोड करणारी आहे, ही कम्युनिस्टांची त्या वेळची भूमिका मला पटली नाही. काँग्रेसच्या ब्रिटिशसत्ताविरोधी लढ्यात भाग घेण्यास बोल्शेव्हिक गट अनुकूल होता. म्हणून मी त्यात सामील झालो. सरदेसाई हे त्यात एक पुढारी होते व रणदिवे हे प्रमुख होते.

महाराष्ट्रामध्ये मुंबईस अशी अवस्था होती व पुणे, सोलापूर, नागपूर वगैरे ठिकाणी रेल्वेतील, गिरण्यांतील व इतर धंद्यांतील कामगारांच्या संघटनेचे काम बोल्शेव्हिक पक्षाचें माझ्यासारखे कार्यकर्ते करीत होते.

मला हिंदी भाषा येत असल्यामुळे मुंबईहून गुजरातमधून उत्तरेस जाणाऱ्या (त्या वेळच्या बी. बी. सी. आय. रेल्वे) रेल्वेवर काम करणाऱ्या कामगारांना संघटित करण्याचे काम मला देण्यात आले. हे कामगार हिंदी भाषिक होते व त्यांच्यातले लढाऊ वृत्तीचे कामगार आर्यसमाजी व त्यांतले काही दहशतवादी संघटनांशी संपर्क असलेले, निदान प्रभावित असलेले होते. त्यांना कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली व कार्यपद्धती यांचे महत्त्व सांगण्याचे व त्यांची संघटना दृढ करण्याचे काम अवघड असले तरी मला ते चांगले वाटले. गोध्रा, दोहद, अजमेर अशा ठिकाणी राहून व लाइनवर फिरून मी व माझे सहकारी काम करीत होतो. आम्हांला घरून किंवा पक्षाकडून काही निर्वाहासाठी मिळत नव्हते. युनियनचा थोडा पगार, मित्रांकडून थोडी मदत व कामगारांकडून जेवण वगैरे मिळे व हाच क्रम पुढे वर्षानुवर्षे सतत चालू होता.

मुंबईमध्ये इ. स. १९२० पासूनच कामगारांची लढाऊ संघटना होत होती. सन १९२४ पासून डांगे प्रभृती पुढाऱ्यांची नावे लोकांना परिचित झाली होती. रशियामध्ये झारची एकतंत्र जुलमी सत्ता कम्युनिस्टांनी नष्ट केली व कामगारांचे राज्य स्थापले, ही गोष्ट राष्ट्रीय जहाल वृत्तीच्या काही नेत्यांना कौतुकाची वाटत होती. एकंदर पांढरपेशा वर्गामध्ये कम्युनिस्ट तत्त्वांची ओळख नव्हती, पण कुतूहल व आस्था होती. अशी एक सहानुभूतीची व अनुकूल अवस्था १९३० पर्यंत तरी असावी. याला एक चांगला पुरावा असा की इंदूरचे श्री. विनायक सीताराम सरवटे यांनी सन १९२१ मध्ये 'सामाजिक वाद' हे २०४ पृष्ठांचे पुस्तक या विषयावर लिहिले. दाभोळकरांसारख्या मोठ्या प्रकाशकांनी ते छापले हेही लक्षात घेण्यासारखे आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत 'मॉडर्न सोशॅलिझम' (लेखक अनुल्लेखित), रॅमसे मॅकडोनाल्डचे 'सोशल मुव्हमेंट', किरकप यांचे 'हिस्टरी ऑफ सोशॅलिझम', बर्ट्रांड रसेलचे 'रोडस् टु फ्रीडम' या ग्रंथांचा उल्लेख आधारग्रंथ म्हणून केला आहे. आठव्या प्रकरणात बोलशेव्हिकांच्या तत्वांची व रशियन क्रांतीची माहिती देताना त्यांनी लेनिनचे 'स्टेट अ‍ॅण्ड रेव्होल्यूशन' आणि पोस्टगेटचे 'बोल्शेव्हिक थिअरी' या दोन ग्रंथांचा आधार घेतल्याचे सांगितले आहे.

हे पुस्तक मी आता वाचून पाहिले. सत्तेचाळीस वर्षांपूर्वी मराठी पांढरपेशा वर्ग कम्युनिझमचे ध्येय समजावून घेण्याचा कसा निराग्रही व प्रांजल प्रयत्न करीत होता, याचे उत्कट चित्र या पुस्तकामुळे माझ्या

मनापुढे आज उभे राहते. तुलनेनें आजची या वर्गांची मनःस्थितीही उभी राहते. आणखी एक मनात येते की, १९३२ पासून कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट चळवळीत कार्य करणाऱ्या सुशिक्षितांना हे पुस्तक जिज्ञासेनें म्हणूनही वाचण्याची इच्छा झालेली दिसत नाही, याचे कारण काय? मी स्वतः ह्या पुस्तकाचे नुसते नाव अधूनमधून ऐकले, पण प्रत्यक्ष ते कधी वाचले नव्हते असे का झाले ?

समाजवादी व कम्युनिस्ट विचारांचा व कृतींचा उद्‌भव भारतात किंवा महाराष्ट्रात झाला तो ब्रिटिश सोशॅलिस्टांच्या आणि रशियन कम्युनिस्टांच्या विचारांच्या अनुकरणाने झाला. यात नवल नाही व त्यात वावगेही नाही. परंतु परकीयांकडून घेतलेले विचार किंवा कार्यपद्धती आपण आत्मसात कशी करतो व तिला आपल्या परिस्थितीशी मिळवून घेण्यात किती यश मिळवितो, यावर सारे अवलंबून असते. परकी गोष्ट उपरी राहिली तर ती रुजत नाही व निकोपपणे वाढू शकत नाही. महाराष्ट्रातील आधुनिक विचारांचा विकासक्रम पाहताना असे आढळते की मिल्ल-स्पेन्सर, इटलीचे माझिनी, जर्मनीचे मार्क्स आणि रशियाचे लेनिन या सर्वांचे विचार येथे आले, पण उपरेपणानें, अपुऱ्या सामर्थ्यानें व एकेरीपणानें आले. ते विचार मराठी लोकमानसात रुजविण्यासाठी मराठी पारंपारिक विचारांची जाणीव आणि मराठी लोकजीवनाचे संस्कार लक्षास घ्यावयास हवेत, ते होऊ शकले नाहीत. प्रार्थनासमाजाने अपेक्षिलेली धर्मसुधारणा, आगरकरांनी अपेक्षिलेली समाजसुधारणा, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, गोखले, टिळक व गांधी यांनी पुरस्कारलेला विशुद्ध राष्ट्रवाद, आणि नंतरच्या काळात समाजवाद्यांना अभिप्रेत असलेली दलित वर्गाची एकजूट व क्रांतिकारक जाणीव व सामर्थ्य यांची प्रत्यक्षात घडण झालेली दिसत नाही. गेल्या सबंध शतकामध्ये विचारांचे व प्रत्यक्षाचे नाते असे दिसते; विचार अधांतरी राहतात व कोळपतात आणि प्रत्यक्षात आहे तीच स्थिती स्थिर राहते, व तिचा आधार घेऊन चाललेले सत्तेचे व प्रतिष्ठेचें राजकारण वा समाजकारण यशस्वी होत राहते. बेगडी क्रांतिवाद आणि बेगडी सनातनीपणा नांदत राहतो.

वर मांडलेला विचार समाजवादी आंदोलनातील दोषांना झाकण्यासाठी मी सांगितलेला नाही. सर्वसाधारणपणे आपल्या सामाजिक स्तररचनेतच काही मूलभूत प्रवृत्ती आहेत, म्हणून बाहेरच्या किंवा अस्सल देशीय अशा नव्या विचारांमध्ये व प्रेरकांमध्ये येथे गती देण्याचे सामर्थ्य कोते आहे ही गोष्ट फक्त मी नजरेस आणली. ती ओळखून

वागणे समाजवाद्यांना जमले नसते का ? या परिस्थितींवर उपाय म्हणून काय करावयास हवे होते ? ते उपाय केले नाहीत याचा दोष मग येईल काय ? हे प्रश्न सरळ आहेत. त्यांचे प्रांजळ व सरळ उत्तर द्यावयाचे तर असे द्यावे लागेल की, आम्ही समाजवाद्यांनी भारतीय परिस्थितीचा नीट विचार केला नाही, भानच ठेवले नाही म्हटले तरी चालेल. समाजवादी चळवळ आंतरराष्ट्रीय आहे हे अगदी खरे, पण तिचा आशय राष्ट्रीय असणे आवश्यक असते, ' अपरिहार्य ' असते. पण अपरिहार्य म्हणावे तर तसा आशय येथे प्रत्यक्षात लाभलेला दिसत नाही.

आता निवेदनाच्या कालक्रमानुसारी सूत्राकडे पुन्हा वळणे इष्ट होईल. सन १९३० च्या आधीच्या दहा वर्षांत मानवेन्द्र रॉय यांच्या प्रयत्नांमुळे भारतीय राष्ट्रवादी आंदोलन आणि समाजवादी परिवर्तन यांच्या परस्परसंबंधाचा विचार रशियात झाला. खिलाफत चळवळीमुळे देशत्याग केलेल्या तरुण मुसलमानांशी संबंध जोडून भारतात समाजवादी प्रचार व संघटना करण्याचे प्रयत्न करण्यात आले. रॉय आणि लेनिन यांच्यामध्ये भारतीय चळवळीच्या डावपेचांविषयी चर्चा व मतभेद झाले. पॅनइस्लामिझमच्या ( पर्यायाने खिलाफतीच्या ) चळवळीला क्रांतिकारक रूप देण्याचा प्रयत्न चूक आहे व ती चळवळ प्रतिगामी आहे असे लेनिन व स्तालिन प्रभृतींचें मत झाले. रॉय यांनी प्रयत्न करून भारतातील काही तरुणांशी संबंध जोडले. परंतु ब्रिटिश सत्याधाऱ्यांच्या सावध नजरेतून हे सुटणे शक्य नव्हते. १९२४ साली डांगे प्रभृतींना अटक करून हे सारे प्रयत्न सरकारने बंद पाडले. रॉय यांच्या कार्याला या दहा वर्षांत तसे यश येऊ शकले नाही. परंतु १९२८–२९ साली देशव्यापी संपाची लाट उसळली तेव्हा पूर्वीच्या या प्रयत्नांमुळे समाजवादाकडे वळलेले तरुण या नव्या संघटनेच्या क्षेत्राकडे वळले. याचे श्रेय या दशकातील प्रारंभिक कार्याला व रॉय यांना द्यावे लागेल. तसेच ' इंडिया इन ट्रँझिशन ' हा १९२६ सालचा ग्रंथ व पुढील काळातील रॉय यांचे लेखन मार्क्सवादी व समाजवादी दृष्टीकोनातून भारतीय समाजाकडे व तत्त्वज्ञानाकडे पाहण्याचे प्रयत्न म्हणून महत्त्वाचे आहेत. रशियन नेत्यांनी भारतीय राष्ट्रवादी आंदोलनाकडे पाहताना समाजवादाला पोषक अशी शक्ती म्हणून तिच्याकडे पाहिले हे येथे लक्षात घ्यावयास हवे. टिळकांच्या १९०८मधील अटकेमुळे मुंबईत जो सार्वत्रिक संप कामगारांनी केला त्याचे सहर्ष स्वागत त्यावेळी लेनिनने केले होते व राष्ट्रवादी आंदोलनाला जास्त जास्त प्रखर व क्रांतिकारक स्वरूप यावे यासाठी समाजवाद्यांनी प्रयत्नशील राहावे अशी लेनिनची

स्पष्ट भूमिका होती. १९२८ नंतरच्या काळात, कम्युनिस्ट, रॉयिस्ट इत्यादी पक्षांचे प्राथमिक कामगार संघटनात्मक कार्य चालू असताना राष्ट्रीय चळवळीतच समाजवादी विचारांना कूस मिळू लागली. १९३१ साली कराची येथे कांग्रेस अधिवेशनातच कामगार व शेतकरी यांच्या वर्गीय हितसंबंधांना पोषक असा एक कार्यक्रम मान्य करण्यात आला होता, ही सुरवात मानता येईल. नेहरुंचा व त्यांच्या पिढीच्या काँग्रेस नेत्यांचा कल समाजवादाकडे झुकत होता. १९३४ मध्ये काँग्रेसच्या कक्षेतच नांदणारा काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन झाला. महाराष्ट्रातून मसानी, अशोक मेहता, अच्चुतराव पटवर्धन व रावसाहेब पटवर्धन प्रभृती पुढारी या पक्षाला लाभले. आचार्य जावडेकर व सानेगुरुजी या पक्षाचे समर्थक होते. लोहिया, नरेंद्रदेव, जयप्रकाश, प्रभृती नेते लाभून हा पक्ष भारतीय स्वरूप धारण करू शकला व काँग्रेस-मधील तरुण कार्यकर्ते या पक्षाने प्रभावित केले. कामगारांच्या संघटनांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये नव्याने काम करणाऱ्या 'किसान सभा' या संघटनेचे कार्य करण्यासाठी हे तरुण कार्यकर्ते पुढे आले. या कार्यामध्ये इंदूलाल याज्ञिक, स्वामी सहजानंद, राहूल सांकृत्यायन प्रभृती कार्यकर्ते होतेच. पूर्वीपासून समाजवाद पत्करलेले माझ्यासारखे मार्क्सवादी व हे समाजवादी यांच्यात सहकार्यही होऊ लागले. १९३४ नंतरचा १९३८ पर्यंतचा काळ हा अशा प्रकारे समाजवादी कार्यविस्ताराचा व भिन्न उगमां-पासून आलेल्या समाजवादी कार्यकर्त्यांचा एकमेकांजवळ येण्याचा काळ होता. आजच्या विकीर्ण, क्षीण व फुटीर अवस्थेमध्ये त्या काळातील कार्याचे व वैचारिक समन्वयाचे चित्र डोळ्यापुढे आणणेही दुरापास्त झाले आहे. पण तो काळ विसरता येत नाही व त्या काळात बीजरूपाने वसणाऱ्या संघर्षांनाही समजावून घेतल्याशिवाय आजच्या दुरवस्थेचे रूप आकलन होणार नाही.

अखिल भारतीय स्वरूपाच्या कामगार संघटनांचे सामर्थ्य राष्ट्रीय आंदोलनामध्ये थोडेफार प्रभावी होण्याचा तो काळ होता व 'किसान सभा' ही संघटना अखिल भारतीय स्वरूपाची होऊन ती जमीनदारीच्या प्रथेविरुद्ध लढाऊ कार्यक्रम अंमलात आणीत होती. कम्युनिस्ट, सोशालिस्ट, रॉयिस्ट, सुभाषबाबूंच्या नेतृत्वाला मानणारा 'फॉर्वर्ड ब्लॉक' अशा सर्व डाव्या संघटनांचा काँग्रेसवर होणारा प्रभाव एकवटून होत होता. आधीच्या काळातील 'नवजवान भारत सभा', 'अनुशीलन समिती' व 'युगांतर' पक्ष अशांसारख्या दहशतवादी तरुणांच्या

संघटनाही या एकवटणाऱ्या समाजवादी प्रवाहात सामील होत होत्या.

१९३७ नंतरच्या काळात मी संयुक्त प्रांतात पुन्हा बनारसमध्ये काम करीत होतो. विद्यार्थिदशेत मी अनुभवली तिच्याहून फार वेगळीच अवस्था आता तेथे होती. विद्यापीठामध्ये समाजवादी विचारांची लाटच होती. मार्क्सवादी अभ्यासमंडळे मोठ्या प्रमाणावर सतत चालू होती. बनारस शहरात वीज व पाणीपुरवठा करणाऱ्या म्युनिसिपल खात्यांचे कामगार, छापखान्यातील कामगार, टांगेवाले, हमाल, नावाडी वगैरे लोकांचे संघ स्थापन झालेले होते. अशी वाढ होत होती, पण त्या वाढीतच सत्तेसाठी होणारी स्पर्धा डोकावू लागली होती. समाजवादी पक्षाचे श्री. कमलापती त्रिपाठी वगैरे नेते व कम्युनिस्ट पक्षाचे नेते एकत्र येत व आमच्यांत अनेक बाबतींत सहकार्य होई. पण आमच्या त्या काळच्या सहकार्यात व चर्चांमध्ये संघर्षाची बीजेही दिसत. सर्व डाव्या आणि समाजवादी पक्षांमध्ये सुशिक्षित, सुखवस्तू आणि काही त्यागप्रवण व काही महत्वाकांक्षी अशा व्यक्तींकडे पुढारीपण होते. संघटनेचे नित्याचे काम करणारे कार्यकर्ते नेतृत्वाबद्दल असंतुष्ट असत. ते कमालीच्या हालअपेष्टांमध्ये काम करीत होते. नेते व आपण यांतील दुराव्याची जाणीव त्यांना सतत राही. आपल्या समाजात परंपरेने नांदत आलेली गरीबश्रीमंतांमधली विषमता, जातीय विषमता व शिक्षणामुळे आलेली विषमता तर होतीच. या सर्व अंतरांमध्ये नेता व अनुयायी यांच्यांतील अंतराने भर पडली व तीव्रता आली. पक्षांतर्गत लोकशाही कोठेच अंमलात येत नव्हती.

परिस्थिती अचानकपणे पालटली नसती तर तिला कसे वळण लागत गेले असते ते सांगणे कठीण आहे. संघर्ष निर्माण होत होतेच, पण ते मर्यादेत ठेवून समाजवाद्यांचे एकवट सामर्थ्य वाढणेही शक्य होते. ब्रिटिश सत्तेविरुद्ध चाललेला लढा प्रखर होत जाण्यामुळे हे सामर्थ्य अभंग राहिले असते व त्यातून भारतीय समाजवादाचे प्रौढ आणि समंजस रूप विकसित झाले असते. आव्हान निदान असे होते की, त्यामुळे एकसंध-पणाकडे वाटचाल होण्याची शक्यता होती. पण फुटीरपणाकडे वळण्याचा धोकाही दिसत होता.

अशावेळी, दुसऱ्या महायुद्धाचा एकदम भडका उडाला. भारतीय स्वातंत्र्यासाठी व समाजवादासाठी लढण्याची संधी समोर येत आहे असे आम्हांस वाटले. राष्ट्रवाद्यांना तर असे वाटलेच, पण समाजवादी विचारसरणी पत्करलेल्या आम्हांला सर्वांना ब्रिटिशांवरील संकट ही संधी

वाटली, आणि आता दडपशाहीची चक्रे फिरू लागणार म्हणून आम्ही तयारीला लागलो. बनारसच्या कम्युनिस्ट पक्षाचे कार्य चालू राहावे यासाठी आम्ही दोघेतिघे भूमिगत राहू लागलो; लवकरच मोठ्या प्रमाणावर धरपकडींना सुरुवात झाली व समाजवादी, दहशतवादी, काँग्रेसवादी वगैरे सर्व प्रमुख पक्षांचे राजकीय कार्यकर्ते पकडले गेले. एरवीच्या काळात चाललेले सारे काम विस्कळित झाले व जवळजवळ बंद पडले. भूमिगत राहून काम करणे इतके कठीण झाले की गुप्त बैठकी घेणे अशक्य होऊन बसले. गुप्त जागा धोक्याची झाली असल्याचा संशय यावा व ती बदलत राहावे. असा प्रकार होऊ लागला. उघड काम चालले असताना संघटनेचा कमकुवतपणा लक्षात येत नाही, तो अशा वेळी लक्षात येऊ लागतो. ही परिस्थिती थोडे महिने चालली व शेवटी मी बनारस सोडावे व महाराष्ट्रात जावे, असे ठरवावे लागले.

या एकंदर काळात मराठीमध्ये बरेच समाजवादी वाङ्मय प्रसिद्ध झाले. य. गो. जोशी प्रकाशन संस्थेने काढलेली 'वादविवेचनमाला' व तिनेच प्रसिद्ध केलेला 'कॅपिटल सारग्रंथ' हा पां. वा. गाडगीळ यांचा ग्रंथ त्या वेळच्या समाजवादासंबंधीच्या जिज्ञासेमुळे लोकप्रिय झाले. १९३० साली प्रसिद्ध झालेल्या वा. म. जोशी यांच्या 'सुशीलेचा देव' या कादंबरीत समाजवादाचे रूप सहानुभूतीपूर्वक काढलेले दिसते. मराठी ललित वाङ्मयात हीच सहानुभूती व जिज्ञासा या काळात दिसून येते. 'पुरोगामी' वाङ्मय व 'नवमतवाद' या नावांनी समाजवादी प्रचाराचे जे वाङ्मय निर्माण झाले, ते मराठीतील वाङ्मयाच्या वरंपरेशी व प्रवाहाशी सुसंवाद राखणारे नव्हते व त्यामुळे ते स्वत: संपन्न होऊ शकले नाही व मराठी वाङमयालाही संपन्न करू शकले नाही. हा अधूपणा समाजवादी विचाराच्या व आंदोलनाच्या एकूण क्षीणतेचा परिणाम मानावा लागेल. एकंदर समाजाच्या जाणीवांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याइतके सामर्थ्य समाजवादाला त्या वेळेपर्यन्त लाभू शकले नाही.

इकडे आल्यानंतर लवकरच युक्तप्रांताच्या पोलिसांकडून वॉरंट येऊन मला अटक झाली व माझी बनारसला व तेथून देवळी येथील राजबंद्यांच्या कँम्पमध्ये रवानगी झाली. या कॅम्पमध्ये जयप्रकाशजी प्रभृती समाजवादी नेते, आणि डांगे, रणदिवे प्रभृति कम्युनिस्ट नेते होते; तसेच 'कामागाटामारू' कटातील वयोवृद्ध शीख नेते व उत्तर भारतातील काँग्रेसवादी, दहशतवादी, असे अनेक विचारांचे लोक होते. अगदी तरुणांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वप्रांतीय राजकीय कार्यकर्त्यांचा तो एक

मेळावा होता व आम्ही तेथून कधी व कसे सुटू याची आम्हाला कल्पनाही करणे शक्य नव्हते.

समाजवादी व मार्क्सवादी नेत्यांची येथे जी गाठ पडली यांतून एक–जुटीला पोषक असे काही घडू शकलें असते. पण उलटच घडत गेलें. आम्ही कम्युनिस्ट पक्षातील सामान्य कार्यकर्ते इतरांशी स्नेहाने वागत होतो व राजकीय मतभेद होत त्यांवर मोकळेपणी चर्चाही होत असे. पण लवकरच तेथे एका संघर्षाचे वातावरण सुरू झाले व पक्षोपपक्षां-मध्ये आडपडदे आले. कॅम्पच्या कमांडरशी लढा देण्याच्या बाबतीत मत-भेदाचे प्रश्न निघू लागले. कम्युनिस्ट पक्षाच्या आतही यावर तीव्र मतभेद होत गेले. त्या सर्व बाबींचा तपशील आठवला म्हणजे माझे मन खिन्न होते. एक मोठी संधी लहान गोष्टींसाठी घालविण्यात आली, असे थोडक्यात म्हणता येईल. पण, त्याचे परिणाम समाजवादी चळवळीच्या एकजुटीच्या दृष्टीने घातक ठरले. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय प्रश्नावर मतभेद होणे स्वाभाविक होते, कारण समाजवादी व कम्युनिस्ट यांच्या भूमिकांत तफावत पूर्वीपासून होती. परंतु, या काळात परस्परविश्वासही नाहीसा झाला. एकमेकांच्या राजकीय दानतीची शंका घेण्यात येऊ लागली व त्याचे द्वेषात पर्यवसान झाले. हे सारे अटळ नव्हते असे मला तेव्हा व आजही वाटते.

सन १९४२ मध्ये, फॅसिझम जिंकेल का ब्रिटिश व रशियन सेना फॅसिझमचा लोंढा थोपवू शकतील, याचे उत्तर देता येत नव्हते. या संघर्षात जयापजयाचे पारडे दर क्षणी हेलकावत होते. अशा वेळी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याची ताकद कशी, कशासाठी व कोणत्या मर्यादेत वापरा-वयाची हा प्रश्न भारताच्या दृष्टीने आणीबाणीचा होता. एकीकडे मानवेंद्र रॉय यांची बिनशर्त सहकार्याची भूमिका होती; उलट टोकाला सुभाषबाबूंची भूमिका होती. कम्युनिस्ट पक्षातील आमच्यासारखी माणसे दोन्ही भूमिकांना स्पष्ट विरोध करीत होती. देवळी कॅम्पमध्ये कम्युनिस्ट पक्षात यावर झालेली चर्चा व मतभेद यामुळे झाले. गांधीजी व नेहरू यांची भूमिका सुभाषबाबूंच्या प्रयत्नाला विरोधी होतीच, पण बिनशर्त सहकार्य देण्यालाही त्यांचा विरोध होता. सशर्त सहकार्याचा हात पुढे करून तो झिडकारल्यावर लगेच 'भारत छोडो'ची घोषणा गांधीजींनी दिली. फॅसिझमविरुद्ध चाललेल्या जागतिक संघर्षात ब्रिटनला किंवा दोस्त राष्ट्रांना विजयाची मुळीच खात्री नव्हती, तरी केवळ साम्राज्य-वादी उन्मत्तपणामुळे सशर्त सहकार्याची काँग्रेसची भूमिका इंग्रजांनी

झिडकारली. अशा वेळी राष्ट्रीय आंदोलनाची व शक्तीची धार कायम टिकविण्यासाठी 'भारत छोडो'चीं घोषणा गांधीजींना करावी लागली; तिच्यामुळे जागृत झालेली जनशक्ती फॅसिझमच्या आक्रमणा-विरुद्धही निकराने लढू शकेल, अशी भूमिका राष्ट्रवाद्यांनी घेतली. उलट या आंदोलनामुळे फॅसिस्ट आक्रमणाला सहज वाट करून दिल्यासारखे होईल ही भीती कित्येक राष्ट्रवाद्यांनाही वाटली. कम्युनिस्टांपैकी अनेकजणांनी या आंदोलनाला पोषक भूमिका घेतली व इतरांनी तटस्थ-पणांची भूमिका घेतली. पण पक्षाचे धोरण मात्र आंदोलनाला विरोध करण्याचे होते. ब्रिटिश सत्तेच्या वतीने राष्ट्रवाद्यांच्या विरोधी कृत्ये पक्षाच्या सभासदांनी केली नाहीत, पण अलिप्तपणा मात्र स्वीकारला. 'भारत छोडो' या घोषणेला विरोध करण्यात कम्युनिस्टांचे धोरण चुकले होते, पण यासाठी त्यांना देशद्रोही व ब्रिटिशांचे हस्तक मानणेही चूक होते. एखाद्या अंतिम मानलेल्या लढ्यात भाग न घेणाऱ्यांना शत्रू मानले जाते हे खरे, पण यामुळे समाजवादी व कम्युनिस्ट यांच्यात द्वेषाची भिंत बांधली गेली. ती भारतीय समाजवादी सामर्थ्याला कायमचे क्षीण करणारी ठरली, ह्या गोष्टीचा गंभीरपणे फेरविचार करणे अवश्य आहे.

महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीत नंतरच्या काळात घडलेली घटना म्हणजे शेतकरी–कामगार पक्षाचा उदय, खेडेगावांतून याचा विस्तार आणि त्या पक्षाला पुढे आलेले क्षीण स्वरूप. मार्क्सवाद आणि समाजवाद यांचे स्वरूप प्रथमपासून शहरी होते व नेतृत्व पांढरपेशा वर्गाचे होते. या चळवळीचा स्वाभाविक विस्तार खेड्यांतील दलित वर्गांमध्यें व्हावयाचा. किसान सभेच्याद्वारे तो होण्याची शक्यता होतीच पण ही स्वाभाविक वाढ झाली नाही. शहरी समाजवादी चळवळीचे अधूपण याला जबाबदार आहे. परिणाम असा झाला की जुन्या ब्राह्मणेतर चळवळीचे शहरी नेते काँग्रेसमधून बाहेर पडून शेतकरी कामकरी पक्षाचे नेतृत्व करू लागले. आज ज्याप्रमाणे वेगवेगळ्या राज्यांमध्यें 'बंगला काँग्रेस' सारखें पक्ष काँग्रेसमधील फुटीरपणाने बनत आहेत, तसाच तो काहीसा प्रकार होता. या पक्षाच्या कार्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत समाजवादाची काही तत्त्वे पोचली असे मानता येईल. पण सामाजिक व राजकीय आंदोलनाची मुळे रुजण्यास व दृढ होण्यास अशीं वरवरची तोंडओळख कामास येत नाही; जनतेचे राजकीय शिक्षण नुसत्या जहाल घोषवाक्यांनी व प्रचाराने होत नाही.

 महाराष्ट्रातील समाजवादी विचारांचा क्षीणपणा व 'शहरीपणा' हीच

त्यांच्या सांप्रतच्या फुटीरपणाची कारणे आहेत, ही गोष्ट स्पष्टपणे नजरेस येण्यासाठी अस्पृश्य जमातीच्या दीर्घ लढ्याचा संदर्भ येथे मला घ्यावासा वाटतो. महात्मा फुले यांच्या कार्यामुळे ह्या प्रश्नाचें महत्त्व व गांभीर्य न्यायमूर्ती रानडे प्रभृति नेत्यांना गेल्या शतकापासून नीट उमगलेले होते. पण टिळकयुगात किंवा १९२० नंतरच्या गांधीयुगात अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग आपल्या नेत्यांना दिसला नाही. त्यासाठी फार खोल व मूलभूत अशा सामाजिक परिवर्तनाची दृष्टी हवी होती. ब्राह्मण वर्गाचे नेतृत्व कमी होत होत मराठा वर्गाचे नेतृत्व काँग्रेसला लाभले तरी त्या प्रश्नाचे उत्तर मिळू शकलेले नाही. कम्युनिस्ट पक्ष व समाजवादी पक्ष अस्पृश्य जातींच्या या प्रश्नाबाबत जुन्यांचा वारसा बदलू शकले नाहीत. १९३२ च्या सुमारास मार्क्सवादाच्या समतेच्या आवाहनात डॉ. आंबेडकरांना काही आश्वासन वाटले, त्यांनी आपल्या पक्षाला 'स्वतंत्र मजूर पक्ष' असे नाव दिले व काही काळ समाजवादी कामगार संघटनांबरोबर सहकार्यही केले. पण नंतर ते दूर जात चालले. शेवटी धर्मांतराच्या मार्गानें ही जातीय गुलामगिरी सुटेल, निदान कमी होईल, असे वाटून त्यांनी धर्मांतराचे पाऊल टाकले.

मुंबईस मी प्रथम कामाला प्रारंभ केला तेव्हा महाडच्या चवदार तळ्याच्या लढ्यात भाग घेतलेले व बोल्शेविक पक्षात सामील झालेले श्री. मोरे हे एक अस्पृश्य तरुण माझे मित्र झाले. नेहमी आमचे बोलणे होई ते अस्पृश्यता व जातिसंस्था यांवर होई. एका मोठ्या समाजक्रांतीतच हे सारे विषमतेचे जीर्ण नष्ट होईल, अशा आशावादी पण अतिदूरच्या निर्णयावर आम्ही दोघे पोचत असू ! पण हा भाबडा आशावाद होता. राष्ट्रीय असो की समाजवादी असो कोणतीही राजकीय चळवळ अशा गंभीर प्रश्नांना डावलून किंवा अतिदूरची मनोराज्ये सांगून लोकमानसात खोलवर रुजू शकत नाही; डावललेले प्रश्न आंदोलनाच्या मार्गात अडथळ्यासारखे उभे राहतात व मनोराज्ये ही गतीला घातक ठरतात. आज धर्मांतरित पूर्वास्पृश्य समूहांना समाजवादी चळवळीचे क्षीण फुटीर वास्तव दिसत आहे, म्हणून सत्तेच्या आधारानें व सवलतीने तग धरून राहणे एवढेच राजकीय अस्तित्व आपल्या नशिबी आहे, असा त्यांचा समज होणे अटळ आहे. समाजवादी चळवळ एकवटून समर्थ झाली व समाज-परिवर्तनाची प्रत्यक्ष पावले तिला टाकता आली, तर इतर दलित समूहांप्रमाणे नवबौद्ध 

समाजही या परिवर्तनाचे स्वागत करील. पण हे आज कल्पनेतच आणता येत आहे!

महाराष्ट्राच्या समाजवादी आंदोलनातील काही प्रयत्नांचा व धडपडींचा वरील अनुभव मी माझ्या वैयक्तिक संदर्भातच सांगत आहे, हे प्रथम मी सांगितलेले आहे. या पुढील कालखंडात, म्हणजे स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या काळात, कम्युनिस्ट पक्षाच्या कलकत्ता अधिवेशनात ठरलेले धोरण, तेलंगणातील सशस्त्र लढ्याचे पर्व व त्याला विरोध म्हणून मी व माझ्या काही सहकाऱ्यांनी पक्षाचा दिलेला राजीनामा ह्या गोष्टी येतात. तेलंगणाच्या भागात सशस्त्र लढा करून आपली सत्ता पक्षाने दृढ केली आहे व यातूनच सत्तेचे क्षेत्र जास्त जास्त व्यापक करीत नेण्याचा मार्ग अवलंबिला पाहिजे, हे धोरण साहसवादी व मनोराज्यात्मक आहे अशी आमची भूमिका होती. निवडणुकींचा मार्ग ही एक भुलावण आहे व यादवी युद्धाची प्रत्यक्ष तयारी केली पाहिजे, ही पक्षाची भूमिका होती. १९५० मध्ये, आमच्या राजीनाम्यानंतर, पक्षानेही आपली भूमिका संदिग्धपणे बदलली. आमचे राजीनामे हे त्याला कारण नव्हते व आमच्या चार–दोन जणांच्या राजीनाम्याने पक्षाची भूमिका बदलेल असा आमचा भ्रमही नव्हता. भूमिका बदलली ती बाहेरच्या, विशेषतः ब्रिटिश व रशियन पक्षांच्या, टीकेमुळे बदलली. नंतरचा काळ पाहिला तर कम्युनिस्ट पक्ष निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेला दिसतो व लोकमताचा पाठिंबा मिळेल तेथे सत्ता हाती घेण्यासही पुढे झालेला दिसतो.

समाजवादी पक्षापुढेही निवडणुका व सत्तास्पर्धा यांची समस्या होती व त्यानेही निवडणुकीवरच भर दिलेला आहे. कामगारांचे व खेड्यातील शोषितांचे संघटन हे सर्व पक्षांना निवडणुकीच्या राजकारणाला दुय्यम झालेले आहे. सामाजिक विषमतेचे प्रश्न ज्वलंत वाटेनासे झाले आहेत. ही टीका अमुक एका कोणत्याच पक्षावर नाही, तर आजच्या राजकीय वास्तवाचे नुसते चित्र आहे. एकदा हे वास्तव नीट उमगलें तर आज डाव्या पक्षांतही अंतर्गत स्पर्धा व फूट का होत आहे त्याचे एक कारण स्पष्ट होईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परकीय सत्तेचा प्रश्न तसा उरलेला नाही; तसा म्हणजे साक्षात रूपात उरलेला नाही. पण, परराष्ट्रीय धोरणाबाबतचे प्रश्न हे आडवळणानें पुन्हा अप्रत्यक्ष परकीय सत्तेचे प्रश्नच आहेत. कम्युनिस्ट पक्षांतच दोन तट झाले आहेत ते परराष्ट्रीय धोरणाबातच्या अशा मतभेदामुळे. समाजवादी पक्षात तट झाले, ते सत्ते-

साठी स्पर्धा करताना कसे धोरण ठेवावे, तडजोडी व संलग्नता कशा कराव्या यावरील मतभेदांमुळे. सारांश, परराष्ट्रीय धोरण किंवा अंतर्गत सत्तास्पर्धेचे पथ्यापथ्य या प्रश्नावर समाजवादी विचाराची माणसे पूर्वी दोन पक्षांत विभागली होती ती आता चार ठिकाणी विभागली आहेत.

सन १९५० पासून मी कोणत्याच पक्षात नाही. एक सामान्य नागरिक म्हणून राजकीय व सामाजिक परिवर्तनांकडे पाहात आहे. समाजवाद हा विचार १९३० पासून १९३८ पर्यंत निरनिराळ्या उगमांतून आला, विस्तारला व एकवटत गेला, व नंतर त्यात संघर्षाची-ठिणगी पडली; सामर्थ्य विभागू लागले. गेल्या तीस वर्षांत कम्युनिस्ट पक्ष प्रबळ झाला नाही, पण खच्चीही झाला नाही. समाजवादी पक्षही प्रबळ झालेले नाहीत. एकंदर समाजवादी विचार व त्याचे लोकमानसातले स्थान दृढ होत गेलेले नाही. समाजवाद हे बहुजनसमाजाच्या हिताचे तत्त्वज्ञान असल्यामुळे ते कितीही चुका झाल्या तरी सरळ रेषेत व आपसूख वाढतच जाते असा एक आत्मविश्वास समाजवादी विचार पत्करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये असतो व तो रास्त असतो. पण हा आत्मविश्वास आशावादी, भाबडा व घातकही ठरू शकतो. शोषित वर्गातली माणसे ही केवळ पोटासाठीच जगत नाहीत; भलीबुरी, पारंपरिक आणि नवी, समजुतींची गाठोडी सामान्य लोकही मनात वागवितात. त्यांना खोटी आशा, भंपक तत्त्वे व नेत्रदीपक सामर्थ्याचे प्रदर्शन लोभावू शकते. फॅसिझमचा उदय व विस्तार यांमुळेच होऊ शकतो. आपल्याकडे जातीय अहंकार व द्वेष, भाषिक वादांतील कट्टता यांचे विष श्रमजीवी जनतेतही पसरू शकते. विभूतिपूजा किंवा या ना त्या तऱ्हेची बुवाबाजी भुरळ घालू शकते. जर्मनी, अमेरिका, रशिया व चीन येथील जनताही अशा असंमजसपणात गुरफटू शकते याची उदाहरणे देता येतील. या सर्व गोष्टींचा विचार आज भारतीय समाजवादाच्या पुढील वाटचालीच्या दृष्टीने निकडीचा व महत्त्वाचा ठरेल.

समाजवादी पक्षोपपक्षांच्या नेत्यांना वरील गोष्टींची जाणीव आहे व आपल्या परीने ते फॅसिस्ट वळणाच्या मनोवृत्तींचा निषेध करीत आले आहेत. परंतु या मनोवृत्तींची वाढ भारतात व महाराष्ट्रात होत आहे. लोकशाहीसाठी होणाऱ्या प्रयत्नांतच सत्तेच्या स्पर्धेला खतपाणी मिळते. मतदारांच्या कलांचे, समजुतींचे व स्वार्थभावनांचे सत्तास्पर्धेत निराकरण न होता उलट त्यांचे पोषण होत जाते. तसेच समाजवादी तत्त्वांचा केवळ आर्थिक संदर्भात प्रसार होत राहिला म्हणजे वैचारिक मतपरि-

वर्तनाची बाजू लंगडी पडत जाते. ही गोष्ट महाराष्ट्राच्या जीवनात गेली जवळजवळ शंभर वर्षे होत राहिली. राष्ट्रीय आंदोलनाचे उद्दिष्ट पुढे ठेऊन सामाजिक सुधारणेचा प्रयत्न हा १९२० पर्यंत राष्ट्रद्रोहच मानला गेला. सन १९२० नंतरच्या काळात सामाजिक सुधारणा हा गांधीजींच्या 'विधायक' कार्यक्रमाचा एक भाग होऊन बसला. पण राजकीय आंदोलनापासून तो विलगच राहिला. यामुळे, राजकीय आंदोलनाचे फळ म्हणून स्वातंत्र्य व सत्ता प्राप्त झाल्यावर सामाजिक सुधारणाचे कार्य सर्वोदयी कार्यकर्त्यांवर सोपवून सत्तेचे निर्भेळ कार्य काँग्रेसच्या नेत्यांकडून सुरू झाले. भूदानाचे आंदोलन, बाबा आमटे यांचे प्रयोग, खादीग्रामोद्योगाचें कार्य, अस्पृश्यता निवारणाचे कार्य या साऱ्या गोष्टींना समाजाच्या अंतरंग शुद्धीच्या व पालटाच्या दृष्टीने केवढे महत्व आहे ? पण, या गोष्टी सत्तेच्या प्रवाहापासून अलग फेकल्या गेल्या आहेत, आणि त्यांना जिव्हाळ्यावाचून गौरविले जात आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्याला जमेल त्याने आपला आर्थिक उत्कर्ष साधण्यात राष्ट्रीय हित आहे असे मानण्यात आले आहे. शहरांतून व ग्रामीण भागांतून एक अल्पसंख्य समूह 'आर्थिक' प्रेरणेलाच सर्वस्व मानून भरभराटीला आलेला दिसत आहे, व आपणही त्याच दिशेने जावे, निदान तिकडे डोळे लावून बसावे, अशी वृत्ती गरीब जनतेत आपोआपच निर्माण होत आहे. इंग्रजी सत्ता असताना शिकलेला वर्ग, व्यापारी व भांडवलदार वर्ग तसाच जुना प्रतिष्ठित 'संस्थानी' वर्ग सुखवस्तूपणाच्या मागे लागला होता व परिवर्तनाची भाषा समजून घेण्याच्या मन:स्थितीत नव्हता. तीच अवस्था पुढे चालू राहिली आहे. पण आर्थिक, सामाजिक व नैतिक परिवर्तनाची गरज पूर्वीपेक्षाही आज निकडीची आहे. अशा वेळी भुलावणीची भाषा व घोषणा जनतेला भ्रमात टाकू शकतात. हाच राष्ट्रवादी व समाजवादी लोकांनी ओळखावयाचा मोठा धोका आहे.

समाजवादी विचारांच्या विकासाचा, किंवा भरतीओहटीचा, येथवर मी एक धावता आणि वैयक्तिक अनुभवांच्या मर्यादित संदर्भात आढावा घेतला. आजच्या परिस्थितीचे मला दिसणारे चित्रही मी रेखाटले. समाजवादी पक्षांच्या नेत्यांना पक्षसंघटनेचे प्रश्न, जनतेचे प्रत्यक्ष संघटन व सत्तेच्या स्पर्धेतील पावले ह्या गोष्टी विचारात घ्यावयाच्या असतात. ही गोष्ट अवघड, नाजूक व गुंतागुंतीची असते. राजकीय पक्षांच्या नेत्यांना बाजूला सारून सत्ता बळकवणारा लष्करी हुकूमशहा किंवा हिटलरसारखा डिक्टेटर अशा नेत्यांची हेटाळणी करून 'शुद्ध व कार्यक्षम

सत्तासंचालनाचा ' पवित्रा घेतो. लोकांनाही काही वेळा राजकारणाचा उबग येऊन असे सत्तांतर बरे वाटते. पण, अशा रीतीने राजकारणाबद्दल उबग येणे व पक्षोपपक्षांच्या नेत्यांबद्दल सरसकट हेटाळणीची प्रवृत्ती बळावणे धोक्याचे असते. माझ्या निवेदनात समाजवादाच्या प्रसारामधील ज्या उणीवा मी दाखविल्या आहेत त्यांमध्ये कोणत्याही पक्षाची व नेतृत्वाची अवहेलना करण्याचा माझा हेतू नाही. किंबहुना आज समाजवादाबद्दल जिज्ञासा असणाऱ्या तरुणांना उद्देशून व उपयोगी वाटेल, अशा रीतीने माझे अनुभव मी सांगितले आहेत. गेली कित्येक वर्षे पक्षोपपक्षांच्या कार्यापासून दूर असल्याने जास्त काही सांगण्याचा माझा अधिकारही नाही.

समाजवादी तत्त्वज्ञान व त्याचा प्रसार या दृष्टीने आज महाराष्ट्राच्या संदर्भात मुख्य लक्षात ठेवण्याच्या बाबी कोणत्या हे आता समारोपादाखल मी सांगतो. सामाजिकच्या मार्गाने श्रमजीवी जनतेचे व एकंदर समाजाचे निकोप जीवन साधणे हा समाजवादाचा एकमेव उद्देश आहे. ' निकोप जीवन ' म्हणजे आर्थिक सुरक्षितता वगैरे आली; तसेच व्यक्तिमात्राचे स्वतंत्र वैचारिक व भावनिक जीवनही आले. धर्माला समाजाचे धारक तत्त्व मानताना त्याची जी ऐहिक बाजू अभिप्रेत असते तीही आली. ऐहिकाच्या पलीकडे जाण्याचे व्यक्तिमात्राचे स्वातंत्र्यही आले. आणि हे सारे होण्यासाठी प्राप्त परिस्थितीत जे आर्थिक हितसंबंधांचे व सांस्कृतिक प्रतिष्ठांचे अडथळे आहेत ते दूर करणेही आले.

ह्या साध्याच्या दृष्टीने प्राप्त परिस्थितीवर संस्कार करणे, तिला लोकांनी कोणत्या दिशेने बदलावी हे लोकांना सांगणे, बदलासाठी द्यावी लागणारी किंमत देण्याची त्यागवृत्ती लोकांत जागृत करणे, हे निकडीचे कार्य आहे. ' वर्गकलह ' हा समाजवादी भूमिकेतील केवळ एक तत्त्वाचा भाग नसून प्राप्त परिस्थितीतील एक वास्तव घटक आहे. कलह आहेच. तो निर्माण करण्याचा प्रश्न नाही. जशी जातीय विषमता आहे व ती कोणी निर्माण करू म्हणत नाही. वर्गकलहातून सरधोपट यादवी युद्धाचे ध्येय आज आमच्यापुढे आहे असे म्हणणे, म्हणजे मात्र प्राप्त परिस्थितीवर मनोराज्य लादणे आहे. उलट, नुसत्या शिक्षणाने, औद्योगीकरणाने, महाराष्टातून बिगर मराठी लोकांना काढून टाकण्याने किंवा थोडक्यात म्हणजे चालू दिशेनेच समाजाचा गाडा चालत राहाण्याने, समाजपरिवर्तन होईल व निकोप जीवन सर्वांना लाभेल असे म्हणणेही भ्रामक आहे. समाजवादी कार्यकर्त्यांनी वर्गकलहाचे तत्त्व एकेरी पद्धतीने सांगावयाचे

नसून, महाराष्ट्रातील प्राप्त परिस्थितीशी एकात्म होऊन ते स्वतः समजावून घ्यावयाचे आहे व लोकांना सांगावयाचे आहे.

आजचे राजकारण निवडणुकांचे आहे व ही प्राप्त परिस्थिती नाकारून समाजवादी विचार तरी पुढे कसा जाईल ? पण, मतदार मते कशी देतील एवढेच पाहणे वेगळे, व निवडणूकींना लोकसंघटनेचा आजचा मार्ग असे मानणे वेगळे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात, सीमावादात, अंतर्गत अल्पसंख्यांकांच्या बाबतीत, मराठी जनतेला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव तीव्र होत गेली आहे. पण तेवढ्याच एका भावनेच्या बळावर मते मिळवून पुढचा मार्ग सुकर होत नाही, याचा अनुभव येत आहे. समोर दिसणारा अन्याय हा त्याच्या मागील अन्यायी यंत्रणेचा फक्त दर्शनी भाग असतो. अन्याय करणारा बहुधा पडद्याआडच राहतो. आजचे सारे समाजाचे तंत्र असे पडद्याआड होणाऱ्या घालमेलींचे झाले आहे. यामुळे, पुष्कळसे ' मतदायी ' प्रश्न हे खऱ्या प्रश्नावर टाकलेले बुरखे असतात. निवडणुकीचे राजकारण मते देणाऱ्या अशा प्रश्नांवरच खिळून राहते व खोलवर पाहण्याची जनतेची दृष्टी अधू होते. ही गोष्ट भारतातच नव्हे तर आज साऱ्या देशातून घडत आहे. व्हिएतनामचे युद्ध चालविणे हे आवश्यक आहे का नाही यावर अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीचे राजकारण हेलकावत आहे. मानवी स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, अमेरिकेची सुरक्षितता व जागतिक शांततेसाठी व्हिएतनामशी समंजस संबंध यापैकी अमेरिकन मतदाराला काय हवे व काय नको ! सारेच हवे असे समंजस मतदार म्हणेल. पण मग मतभेद कशावर आहे ? तेच एक कोडे पडते. प्रचारयंत्रांमुळे हे कोडे जास्तजास्त अवघड होत जाते.

सत्ता काबीज करणे व त्यासाठी निवडणुका जिंकणे एवढ्याच राजकारणामुळे मतदारांची व निवडून आलेल्या प्रतिनिधींची राजकीय दृष्टी अधू होत जाते, व थिल्लरपणे पक्षांतर करून सत्तेच्या जागांवर बसण्याची धावपळ होऊ लागते. अशा प्रकारांमुळे राजकीय, सामाजिक व आर्थिक दानतच घसरत जाते. समाजवादी आंदोलनाच्या दृष्टीने दानत व ध्येयवाद नष्ट होणे हा सर्वात मोठा धोका आहे. तो धोका गंभीर स्वरूप धारण करून आज आपल्यापुढे उभा आहे. त्याचा परिणाम आज पॅरिस, बर्लिन, रोम वगैरे मोठ्या राजधान्यांतून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रखर आंदोलनाच्या रूपाने दिसत आहे. या किंवा त्या सत्ताधारी शक्तीकडून न्याय मिळेल किंवा न्यायाची समाजरचना निर्माण करण्यात येईल ही आशा तरुणांना वाटेनाशी झाली आहे. बेकारी, रोगराई

वंशद्वेष आणि धर्मद्वेष यांतून उद्‌वणाऱ्या दंगली, राष्ट्राराष्ट्रांतील युद्धे या साऱ्या आपत्तींना वारंवार जन्म देणारी व्यवस्था तरुणांचें बळी घेऊन स्वतः कायम राहताना दिसत आहे. मग या साऱ्या व्यवस्थेशी निकराचा सामना देत मरण आले तर बरे नाही का? किंवा या व्यवस्थेशी वांझ बंड पुकारून नग्नता पत्करली तर बिघडले कोठे? असे प्रश्न जगातली तरुण पिढी आज स्वतःला आणि वयस्क पिढ्यांना आक्रोशून विचारीत आहे

भारतीय तरुणांमध्येही आज उद्वेग व संताप आहे. या पिढीला लोकशाही व समाजवाद यांची परंपरा नीटशी परिचित झालेली नाही. त्यामुळे तिला आंधळावैताग किंवा आडदांड क्रियाशीलता यांची भुरळ पडत आहे. कोणत्या तरी जुन्या चाकोरीतून तरी जाणे चांगले किंवा कोणत्याही हडेलहप्पीत स्वतःला सुरक्षित मानणे चांगले असे वयस्क पिढी मानीत आहे. पण हे दोन्ही मार्ग तरुणांना आणि समाजाला सुखाचे ठरणारे नाहीत. समाजवादाचा मार्ग आशियातील व सर्वच जगातील तरुणांना सुखदायी होऊ शकतो व तो मार्ग अवलंबिण्याचें धैर्य तेच दाखवू शकतील, अशी आज भारताची व इतर देशांची परिस्थिती आहे. याच मार्गाने न्यायासाठी व शांततेसाठी आवश्यक ते समाजाचे परिवर्तन घडविता येईल.

समाजवादी विचार जर पोथीबंद न राहता समंजस व समतोल राहील, आणि जनतेच्या तात्कालिक भावनांच्या आवेगाला आवाहन न देता तिला विचारांचें व भावनांचे मार्गदर्शन करू शकेल तर परिवर्तनाची दिशा जनतेला दिसू शकेल. येथें तरुणाच्या कर्तृत्वाला व विचारशक्तीला एक अवघड आव्हान आहे प्राप्त परिस्थितीशी समरस होऊन आणि लोकजीवनाला सन्मुख राहून, प्राप्त परिस्थितीच्या पलीकडे जाण्याचा मार्ग स्वतः पाहणे व ध्येयाची दिशा इतरांना दाखवीत राहणे हे कष्टाचे व तितकेच कल्पनाशक्तीचें कर्तृत्व आहे. संयमाची व कौशल्याची, तसेच त्यागाची व धैर्याची कसोटी पाहणारा समाजवाद हा ध्येयमार्ग आहे.

# परिशिष्ट

*लोकशक्ती ( पुणे ), २४ जानेवारी १९५०*

हिंदी कम्युनिस्ट पक्षातून नुकतेच फुटून बाहेर पडलेल्या ८ महाराष्ट्रीय कम्युनिस्ट कार्यकर्त्यांपैकी श्री. दि. के. बेडेकर यांनी आज एक पत्रक काढून आपल्या धोरणाचे स्पष्टीकरण केले आहे. त्यांचे समग्र पत्रक पुढे दिले आहे. :—

कम्युनिस्ट पक्षाच्या 'एकपक्षीय' (सेक्टेरियन) भूमिकेच्या अनेक घातुक परिणामांपैकी एक म्हणजे पक्षाचे दहशतवादासंबंधीचे धोरण आहे, असे आम्ही आमच्या राजीनाम्यांत म्हटले होते. आजची दहशतवादी कृत्ये ब्रिटिशांविरुद्ध होणाऱ्या सुशिक्षित तरुणांच्या दहशतवादांपेक्षा वेगळी आहेत. आजची देशातील परिस्थिती व कम्युनिस्ट पक्षाचे एकपक्षीय धोरण जमेस घेतल्याशिवाय आजच्या प्रकारांचे खरे स्वरूप कळणार नाही. आमच्या राजीनाम्यासंबंधी टीका करणारांनी या गोष्टीचा विचार केलेला आढळत नाही.

देशाची आर्थिक घडी झपाट्याने मोडत चालल्यामुळे हलाखी व असंतोष देशभर पसरला आहे व ह्यांतच आजच्या दहशतवादाचे मूळ आहे. आपल्या देशाचे सर्व आर्थिक आणि राजकीय जीवन मुठभर मक्तेदार धनिकांच्या मगरमिठीत सापडले आहे हे सामान्य नागरिकाला जाणवत आहे. राजकीय वा सामाजिक जीवनाची लांचलुचपतीमुळे आणि दडपशाहीमुळे गळचेपी होत आहे व ती मक्तेदारांच्या स्वार्थासाठी होत आहे हे लोकांना दिसत आहे. मक्तेदारांच्या ताकदीविरुद्ध कम्युनिस्ट, सोशालिस्ट व लोकसत्तावादी यांची संयुक्त आघाडी म्हणजे लोकसत्ताक आघाडी तयार झाली व तिला विजय मिळविता आला तरच आजच्या अरिष्टांतून वाचण्याचा खरा मार्ग सापडेल. या आघाडीच्या संयुक्त निशाणामागे लक्षावधी जनता खंबीरपणाने चालू लागेल व शेवटी एक नवे भारतीय लोकसत्ताक स्थापन करील. संकटांतून हा एकच खरा मार्ग आहे व लोक त्याकडे आशेने पहात आहेत. पण लोकांच्या पदरी मात्र आज निराशा पडत आहे. आघाडीवरचे काही लढाऊ कामगार व मध्यम आणि मागसलेल्या थरांतील लक्षावधी कामगार यांचे एकजीव संबंध व एकजूट घडविण्यात कम्युनिस्ट पक्षाला यश आलेले नाही.

साहजिकच पक्षाने एकामागून एक संपाचे आदेश दिले तरी संप झालेले नाहीत. त्यामुळे, बेकारी व इतर जुलूम कामगारांवर लादण्याच्या मक्तेदाराच्या कारवायांना आळा न बसता त्या वाढतच गेल्या आहेत. कामगार वर्गाची एकजूट साधून त्यांना पुढे नेण्याचे न साधल्यामुळे लोकसत्ताक आघाडी निर्माण करण्याच्या बाबतीतही पक्षाला अपयश आले आहे. पक्षाची भूमिका व कार्य यांचा अर्थ व्यवहारांत असा ठरला आहे की, कम्युनिस्ट पक्ष स्वत:लाच लोकसत्ताक आघाडी समजून चालत आहे व मक्तेदारांविरुद्ध लढून त्यांच्यावर मात करण्याची इच्छा व ताकद फक्त आपल्यामध्येच आहे अशी पक्षाने समजूत करून घेतली आहे. ह्याच एकपक्षीय वृत्तीने मग इतर डाव्या पक्षांनाही ग्रासले आहे. साऱ्याच पक्षांच्या संघटनेत व परस्पर संबंधात वितुष्टे वाढण्यात आणि लोकसत्ताक आघाडीच्या आशेला हरताळ फासण्यात सारे पर्यवसान झाले आहे.

## जनतेपासून कम्युनिस्ट अलग पडले

अशा तऱ्हेने, मक्तेदारांवरच रोख धरून त्याच्याशी लढा देण्यात पक्षाला यश आले नाही आणि उलट या अपयशामुळे पक्ष मात्र जनतेपासून अलग पडत आहे. आज पक्षाच्या हे लक्षातही येत नाही. कारण पक्षाच्या साध्या कार्यकर्त्यांना न पटणारे आदेश नुसते अंमलात आणण्यास पक्ष सांगत असून त्यांना प्रत्यक्ष येणाऱ्या अनुभवांपासून शिकण्याची पक्षाची इच्छा नाही. सामान्य लोकांपासुन शिकण्याचे व आजच्या आंतरराष्ट्रीय अनुभवांपासून धडे घेण्याचे आज पक्षाला वावडे आहे.

हा सर्व पक्षाच्या एकपक्षीय भूमिकेचा परिपाक आहे. पण यामुळेच असे घडत आहे की, पक्षाच्या अपयशामुळे व लोकसत्ताक आघाडीबद्दल निराशा झाल्यामुळे कोटयावधी जनतेची क्रांतीकारक उमेद व ताकद कुचंबून आडवळणाला जात आहे आणि थोडया तरुणांच्या, कामगार गटांच्या व शेतकऱ्यांच्या साहसी कृत्यांमध्ये तिचा शेवट होत आहे. आजच्या घटना व पक्षाचे त्यासंबंधी चुकीचे धोरण याचा असाच उलगडा होऊ शकतो. साऱ्या दहशतवादाविरुद्ध जी स्पष्ट व खंबीर भूमिका मार्क्सवादी घेतात ती पक्ष का घेण्याचे टाळतो व आपल्या कार्यकर्त्यांना व जनतेला बिनचुक मार्ग का दाखवू शकत नाही तेही यावरून कळेल.

## लोकसत्ताक मार्ग

आम्ही एकपक्षीय भूमिका सोडली आहे व आम्ही स्पष्ट सांगतो की, साहसी कृत्यांना आणि एन्जल्स म्हणतो त्याचप्रमाणे 'गुप्त कट कारस्थ'-नाच्या पद्धतींना' साऱ्या क्रांतिकारक कार्यात घातुक समजले पाहिजे. त्यानेच असे स्पष्ट बजावले आहे की, एखाद्या पक्षाने आराखडा आखून घेऊन समाजक्रांती बनविता येत नाही किंवा उभी करता येत नाही. दहशतवादी पद्धतीने राजकीय सत्ता काबीज करण्यास सोपे जावे म्हणून समाजात अंदाधुंदी व दंगल माजवावी आणि ती वाढवावी असा उपदेश आजपर्यंत एकाही मार्क्सवादी पुढाऱ्याने केलेला नाही.

ज्या सत्ताधाऱ्यांचे आसन कोसळू लागलेले असते तेच समाजातील जातीय दंगे व गुंडगिरी यांना पोसतात व हाताशी धरतात. अंदाधुंदीला वाढविण्याचा प्रयत्न केल्याने अशा सत्ताधाऱ्यांना खाली ओढता येत नाही व नवी राजसत्ता त्यांच्या जागी आणता येत नाही. ते कार्य संघटित व खंबीर अशा लक्षावधी लोकांनाच करता येते. समाजविघातक कल्पना किंवा कृत्ये मार्क्सवादाशी पूर्णपणे विसंगत आहेत.

एकपक्षीय भूमिका सोडून लोकसत्ताक मार्गासंबंधी आमचा विश्वास आम्ही मांडला व पक्षातून राजीनामा देण्याचे गंभीर पाऊल टाकले. कारण आपल्या देशांतील कामगार व इतर सामान्य जनता यांच्याबद्दल आमच्या मनांत जी निष्ठा आहे तीच मूलभूत आहे व ती दुसऱ्या कशावरून अवलंबून नाही. ही निष्ठा हाच पक्षावरील दृढनिष्ठेचा उगम आहे. आज आमच्या मूलभूत निष्ठेकडेच आम्ही पुन्हा परतलो आहोत.

आम्ही जनतेमध्ये जाऊ आणि लोकसत्ताक आघाडीमधील कार्यकर्ते म्हणून काम करू. सर्व जनतेला आणि विशेषतः कामगारवर्गाला जे प्रत्यक्ष अनुभव येत आहेत त्यावरून मक्तेदारांच्या मगरमिठीमुळे आजची हलाखी व दुर्दशा कशी वाढत आहे, याची जाणीव आम्ही जनतेत उत्पन्न करू. मक्तेदारांविरुद्ध संघटित होऊन त्यांच्यावर मात करण्यास आम्ही मदत करू. एक नवीन अर्थव्यवस्था आणि राजकीय व सामाजिक जीवन, म्हणजे नवी भारतीय लोकसत्ता, निर्माण करण्याची संघटना व सामर्थ्य सामान्य लोकांमध्ये येण्यासाठी आम्ही त्यांच्यामध्ये कार्य करू.

लोकक्रांतीला विजयी करण्याचे सामर्थ्य फक्त लोकांतच आहे. या क्रांतीमध्ये साधनांचा प्रश्न क्रांतिच्याच अनुरोधाने ठरविता येईल.

## क्रांतिसाठी जनतेस समर्थ करू

आपल्या समोर लुई बादशाह, आणि चँग के शेक यांची उदाहरणे आहेत. जुन्या व्यवस्थेच्या समर्थकांना व शासकांना लष्करी बळाने देखील जिंकण्याची गरज पडते व मगच जनतेला नव्या समाजव्यवस्थेची रचना करता येते असे यावरून दिसते, ही गोष्ट कोणालाही दृष्टिआड करता येत नाही. परंतु असे असूनही आम्ही मनापासून काय इच्छितो ते एन्गल्सने पुढील शब्दात सांगितले आहे. तो म्हणतो की शांततेच्या मार्गाची " प्रबळ इच्छा ठेवली पाहिजे. शांततेच्या मार्गाने प्रश्न सुटल्याच्या आड न येण्याची इच्छा जगात इतर कोणापेक्षाही कम्युनिस्टच बाळगतील. " आम्ही लोकांमध्ये जागृती करून समाजक्रांतीच्यासाठी त्यांनाच समर्थ करू व हेच लोकसत्ताक मार्गाचे खरे सार आहे.

आम्ही या लोकसत्ताक मार्गानेच जाऊ कारण आमचा लोकांवर विश्वास आहे आणि आजच्या आणीबाणाच्या घटकेला कम्युनिस्ट, समाजवादी व इतर देशाभिमानी कार्यकर्ते लोकांच्या हितरक्षणांसाठी एकत्र येऊ शकतील अशी आम्हाला खात्री आहे.

देशांचे स्वातंत्र्य, आणि लोकसत्ता व शांतता ह्या ध्येयासाठी बिनचूक निर्णय घेता यावा म्हणून सर्व कम्युनिस्टांना आपल्या मतांची चर्चा करता यावी, एकत्र येता यावे आणि यासाठी अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यात यावे अशी भूमिका कित्येक पत्रकारांनी व पत्रांनी घेतली आहे. त्यांचे मी शेवटी आभार मानतो.

## समाज चिंतन । १४ । विषमता राहणारच ! पण ........

काहीजणांनी ऐषआरामात लोळावे व लाखोंनी हालअपेष्टात पिचत जन्म काढावा असे विपरीत दृश्य आज आपल्याला पाहावयास मिळते. पण ही गोष्ट आपल्या इतकी अंगवळणी पडली आहे, की ही स्थिती जाऊन तिच्या जागी दुसरी काही गोष्ट येऊ शकेल ही कल्पनाच आपल्या मनाला शिवत नाही; नि आपल्यापुढे कोणी आणलींच तर तिला आपण बुजतो व बिचकतो. अपरिचित व अनाकलनीय अशा कल्पनेला दूर ढकलण्याच्या स्वाभाविक इच्छेने आपण एक विचार मनात आणतो तो हा, की आपल्यासमोर दिसणारी ही विषमता निष्ठुर व कठोर भासली व अप्रिय वाटली तरी ती नैसर्गिक आहे व म्हणून अटळ आणि चिरंजीवी आहे.

"विषमता ही एक नैसर्गिक बाब आहे" हा विचार वस्तुतः एका इच्छेचेच अपत्य आहे; किंवहुना त्या इच्छेचेच ते एक रूप आहे. हा विचार इतका मूळ धरून का आहे याचे आणखी एक कारण आहे. विषमतेला नैसर्गिक मानणाऱ्या लोकांना असे उघड दिसते, की माणसा-माणसांत खरोखरच उच्चनीच, बुद्धिमान व मंद, शूर व नेभळट असे फरक आहेत. एकाच समूहांतील व कुटुंबांतील अनेक व्यक्तींमध्ये फरक असतात; त्याचप्रमाणे स्त्री-पुरुषांतील प्रवृत्तींत व कर्तृत्वात भेद आढळतात. वेगवेगळ्या धर्मांचे अनुयायी, वंशांचे लोक व राष्ट्रांचे नागरिक 'स्वभावतःच' एकमेकांपासून वेगळे आहेत असा अनुभव सर्वांना येतो. या भेदांना 'नैसर्गिक' समजून विषमतेला या 'नैसर्गिक भेदां'चा आधार देणे अशास्त्रीय नाही, असा समज त्यामुळे रूढ व दृढ होऊन बसलेला आहे.

## एक गैरसमज

सामाजिक विषमतेवर प्रखर व मूलगामी हल्ला चढविणाऱ्या समाजवाद्यांची या 'नैसर्गिक विषमते'बद्दल काय भूमिका आहे, या प्रश्नाचे उत्तर मी प्रस्तुत लेखात देणार आहे.

आजच्या सामाजिक विषमतेच्या पोटीच समाजात प्रत्यही घडणारे अन्याय, अनर्थ व वेश्याव्यवसायासारख्या अनीतिकारक गोष्टी घडतात व या विषमतेचा नाश करण्यासाठी दलितांनी सशस्त्र क्रांती करणे हाच एकमेव मार्ग आहे, ही गोष्ट समाजवाद्यांनी स्पष्टच जाहीर केलेली आहे. पण याचा अर्थ असा नव्हे, की विषमतेच्या 'नैसर्गिक' अस्तित्वाचा त्यांनी विचारच केलेला नाही. 'हाताची पाचही बोटे सारखी नसतात ही साधी गोष्ट मार्क्सवाद्यांना कशी कळत नाही?' हा प्रश्न ज्यांना खरोखरच पडला असेल त्यांना प्रथम एवढे सांगितले पाहिजे, की ती 'साधी गोष्ट' मार्क्सला माहीत होती आणि मार्क्सवाद्यांनी व साऱ्याच समाजवाद्यांनी या गोष्टींचा गंभीर विचारही पूर्वीपासून केलेला आहे.

नैसर्गिक विषमता ढळढळीत दिसत असून न मानण्याचा आंधळेपणा समाजवादी पत्करीत नाहीत; तसेच या विषमतेलाहि जबरदस्तीने नाहीशी करून समता स्थापन करण्याचा शेख महंमदी बाणा त्यांचा नाही. "हातांची पाचहि बोटे जशीच्या तशीच ठेवून" त्या हाताच्या भक्कम मुठीत स्वत:चा सर्वांगीण अभ्युदय साधण्याचे सामर्थ्य मानवाला आणता येईल, ही समाजवादाची शिकवण आहे. हाताची बोटे कापून सारख्या लांबीची करणारी समतेची आवरट कल्पना समाजवाद्यांच्या पदरी बांधणे हा एक मोठाच गैरसमज आहे; किंवा काही वेळी तो नुसता धूर्तपणाचा व समाजवाद्यांच्या वावदूक निन्देचा प्रकार आहे.

## विषमतेच्या तीन अवस्था

नैसर्गिक विषमतेबद्दल समाजवादी कोणती भूमिका घेतात हे सांगण्यासाठी विषमतेच्या तीन सामाजिक अवस्थांचा विचार केला पाहिजे. या विचारामुळे नैसर्गिक विषमतेवरच आधारलेली व सर्व व्यक्तींच्या हिताची अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय समाजवाद्यांना का व कसे व्यवहार्य वाटते ते उमगून येईल.

विषमतेच्या या तीन सामाजिक अवस्था आपल्याला तशा परिचितच आहेत. पहिली अवस्था **जन्मसिद्ध** विषमतेची, दुसरी **धनसिद्ध** विषमतेची तिसरी **व्यक्तिसिद्ध** विषमतेची. जातिसंस्थेवर उभारलेला व स्थिरपणे

कित्येक शतके नांदलेला भारतीय समाज हे जन्मसिद्ध विषमतेचे सर्वात ठळक उदाहरण आहे. आज ज्याला भांडवलदारी समाज म्हणतात तो वस्तुत: धनसिद्ध विषमतेवर आधारलेला आहे व समाजवाद्यांना जी आदर्श समाजव्यवस्था हवी आहे ती व्यक्तिसिद्ध विषमतेवर आधारलेली आहे. या तीनही अवस्थांमध्ये सामान्य, रूढ, व्यापक जीवन कोणत्या तत्त्वावर रचले गेले होते हे आपण पाहात असताना 'अलौकिक' व्यक्तींचा प्रश्नही त्या त्या अवस्थेच्या चौकटीतच पाहावा लागतो. प्रत्येक अवस्थेबद्दल जास्त तपशिलाने विचार करताना हे स्पष्ट होईलच.

## जन्मसिद्ध विषमता

मानवसंस्कृतीच्या इतिहासात प्राचीनतम काळी परिणत झालेला व त्यानंतर अनेक शतके स्थिर राहिलेला भारतीय समाज ब्रिटिश अमदानीपर्यंत जन्मसिद्ध जातिव्यवस्थेवर आधारलेला होता. त्रिगुणात्मक प्रकृति, तिचा कर्मविपाकाचा नियम, जीवात्म्याची कर्मबद्धता, पुनर्जन्म व मोक्ष हा भारतीय तत्वज्ञानांतील मूलभूत कल्पनाव्यूह म्हणजे जातिव्यवस्थेचे प्रतिबिंबच आहे. जातिव्यवस्थेशिवाय या कल्पनाव्यूहाला अर्थ व आधार राहात नाही. उलट या व्यूहाशिवाय इतर कोणताही तात्त्विक आधार जातिव्यवस्थेला देता येत नाही. त्यांचा असा अन्योन्याश्रय आहे व त्यात नवल असे काही नाही; कारण समाजातील प्रत्यक्ष संस्थात्मक जीवन व समाजाच्या धारणेचे तत्त्वज्ञान यांचा हाच अन्योन्याश्रयाचा संबंध असणे अटळ आहे.

पण नवल वाटण्यासारखी एक गोष्ट इंग्रजी अमदानीत अलीकडे घडली आहे; ती अशी, की भारतीय जातिव्यवस्थेमधील जन्मसिद्धतेचे तत्त्व भारतीय विद्वानांनाच अलीकडे दिसेनासे झाले आहे. जाति-व्यवस्था ही जन्मसिद्ध नसून 'गुण व कर्म' यांवर आधारलेली होती; म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला तिच्या नैसर्गिक कलाप्रमाणे व आवडीच्या कार्याप्रमाणे 'जात' दिली जात होती असा युक्तिवाद आज अनेकांकडून केला जात आहे. परंतु वस्तुस्थिती स्पष्टपणे अशी आहे, की आपण समजतो तो 'गुण' प्राचीन तत्त्वज्ञानात 'गुण' संज्ञेने अभिप्रेत नव्हता व 'कर्मा'च्या बाबतीतही तोच प्रकार आहे. मागे निर्देशिलेल्या कल्पनाव्यूहांत 'गुण व कर्म' यांना खास प्राचीन अर्थ आहेत. ते अर्थ लक्षात घेतले म्हणजे भारतीय जातिव्यवस्था जन्मसिद्धतेवर उभारलेली

होती यात तिळमात्र संशय उरत नाही. (श्रीयुत ज. स. करंदीकर यांनी 'गीतातत्त्वमंजिरी'त ही गोष्ट स्पष्टपणे प्रतिपादिली आहे. पाने ८१७ ते ९२३ पाहावी. या जन्मसिद्ध जातिसंस्थेला आजच्या वंशबीजशास्त्राचा (जेनेटिक्सचा) व नीत्शेसारख्या तत्त्वज्ञांचा आधार आहे, असे श्री. करंदीकरांनी म्हटलेले आहे. ते चूक आहेच, शिवाय वरिष्ठ वर्गांना धुंदीत ठेवण्यासही ते कारणीभूत होणारे आहे.)

जातिव्यवस्थेचा जन्मसिद्धपणा मुळातच नाकारणे किंवा त्या व्यवस्थेला जन्मसिद्ध मानताना तिला आधुनिक वंशबीजशास्त्राच्या (जेनेटिक्सच्या) आधारे आधुनिक दृष्टीने शास्त्रशुद्ध ठरविण्याचा प्रयत्न करणें हे दोन्ही युक्तिवाद चूक आहेत. तरीहि यांच्या आहारी आपले विद्वानही जातात ते का? माझ्या मते, जन्मसिद्ध विषमतेचा (आणि एकंदरीतच विषमतेचा) ते नीट विचार करीत नाहीत. तसा विचार केला तर जातिव्यवस्थेचे कोडे वाटायला नको व तिची आधुनिक सशास्त्रीयताही बळेच प्रतिपादायला नको. त्यांत साधा, खरा विचार असा आहे, की जन्मसिद्ध अशी जातिव्यवस्थाच त्या प्राचीन भारतीय कृषिप्रधान वर्गात्मक समाजाला अनुरूप होती. संपत्तीचे उत्पादन शेतकीवरच मुख्य भर देऊन होत होते; त्यामुळे कौटुंबिक स्थैर्य, सामाजिक स्थैर्य व संरक्षणाची आवश्यकता त्यामुळेच संस्थांची घडण होत होती. त्यांत वंशपरंपरेचे तत्त्व क्रमप्राप्त व सहजच आले. ब्राह्मण व क्षत्रिय या शासक व शोषक वर्गांना ही जन्मसिद्ध जातिसंस्था वर्गीय शासन टिकविण्यासाठी सोयीची होती हे खरे; पण सर्व समाजाची घडी वंशपरंपरेच्या तत्त्वावरच बसविणे त्या अवस्थेत भाग होते; म्हणून जातिसंस्थेला सार्वत्रिकता, स्थैर्य व 'पावित्र्य' लाभले. नाहीतर वरिष्ठ वर्गांना पदच्युत करणारी दलितांच्या सामाजिक क्रांतीची लाट उत्पन्न झाली असती व तिला कोणी अडवू शकले नसते!

ही जन्मसिद्ध जातिव्यवस्था म्हणजेच जन्मसिद्ध विषमता. ही विषमता व्यक्तीव्यक्तीमधील स्पष्ट, व्यक्त व अनाकलनीय अशा भेदांवर उभारलेली नाही. ज्या 'गुणा'वर व 'कर्मा'वर एखाद्याची जात ठरे ते 'गुण' व ती 'कर्मे' व्यक्तीने पूर्वजन्मात केलेली असत. या जन्मी व्यक्तीमध्ये अमुकच 'गुण' आहेत व त्याचा 'धर्म' अमुकच आहे, हे केवळ गृहीत धरले जाई. "तू युद्ध कर, कारण तू क्षत्रिय आहेस; लढणे हा तुझा धर्म आहे" असा उपदेश श्रीकृष्णांनी अर्जुनाला केला, पण एखाद्या शूद्राला त्यांनी 'युद्धस्व' असे सांगितले नसते, उलट 'दीनवाणा राहा आणि 'राब' असेच 

सांगितले असते. जन्मसिद्ध जातिधर्माला 'स्वभावज' कर्म असे गीतेत म्हटले आहे खरे, पण येथेही 'स्वभाव' म्हणजे व्यक्तीचा प्रत्यक्ष स्वभाव (मराठीतला) अभिप्रेत नसून 'त्रिगुणात्मक प्रकृती' हा प्राचीन अर्थच लागू आहे. या दृष्टीने भारतीय समाजातील जन्मसिद्ध विषमतेचा अर्थ नीट लक्षात घेतला तर असे दिसून येते, की ही विषमता व्यक्तिगत विषमतेवर, म्हणजेच खऱ्या अर्थाने जिला **नैसर्गिक** विषमता म्हणता येईल, तिच्यावर अवलंबून नाही. जन्मसिद्ध जातीय विषमता व नैसर्गिक व्यक्तिगत विषमता यांच्यात मूलतःच काही साम्य नाही व तसे साम्य व संबंध लावण्याचे आधुनिक प्रयत्न व्यर्थ आहेत.

या प्राचीन जातिव्यवस्थेच्या काळांत व्यक्तित्वाचा विकास होण्याला मुळीच वाव नव्हता असे नाही, पण तो वाव मर्यादित होता. सर्व क्षत्रिय हे 'गुणकर्मांनी' इतरांपेक्षा वेगळे व वरचढ होते, पण त्यांचा आपसांतील श्रेष्ठकनिष्ठपणा बाहुबलाने ठरणे अपरिहार्य होते. तेव्हा क्षत्रियांच्यापुरती एक 'समता' मानली जात होती व तिच्या मर्यादेत प्रत्येक क्षत्रियाला व्यक्तिविकास करणे शक्य होते. यामुळेच प्रत्येक राजा एकसारखा युद्धाच्या तयारीत असे व शेजारच्या मित्रराजांना मांडलिक बनवून चक्रवर्ती बनण्याच्या महत्त्वाकांक्षेने जगत असे. प्रत्येक जातीत अशीच 'समता' व त्या त्या मर्यादेतील जीवनकलह व स्पर्धा चालू असे. या जीवनकलहांत स्पर्धेच्या जोडीला गण किंवा श्रेणीसंघांचे सहकाराचे तत्त्वही येई. परंतु सांघिक जीवन असो की भीषण स्पर्धा असो, ती जन्मसिद्ध जातिव्यवस्थेच्या व विषमतेच्या चौकटीत चालत होती. व्यक्ति-विकासाला जो वाव होता तो जातीय विषमतेच्या मर्यादा संभाळून मिळणारा होता.

## धनसिद्ध विषमता

जन्मसिद्ध जातिव्यवस्थेसारखीच पण काही बाबतीत वेगळी अशी समाजव्यवस्था मध्ययुगीन युरोपातही होती. पंधराव्या शतकापासून मात्र तेथे एक नवी विषमता निर्माण होत गेली. तिला भांडवलदारी समाजव्यवस्था म्हणतात. या नव्या व्यवस्थेमुळे जन्मसिद्ध विषमतेचा नाश झाला व धनसिद्ध अशी नवीन विषमता जन्माला आली. केवळ अमुक जातीत जन्मला म्हणून एखाद्या व्यक्तीला राजा, ब्राह्मण किंवा मजूर होण्याची सक्ती या नव्या धनसिद्ध विषमतेत केली जात नाही; उलट **निसर्गतः** म्हणजे जन्मानें, **सर्व व्यक्ति सारख्याच** आहेत ही समतेची

कल्पना या भांडवलशाही विषमतेच्या बुडाशी आहे. फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये राजाला ठार मारून समतेचे तत्त्व प्रस्थापित करण्यात आले ते या अर्थाने.

जन्मसिद्ध विषमतेचे युग संपले आणि धनसिद्ध समतेचे युग अवतरले. पण या नव्या युगातही स्पर्धा व जीवनकलह नव्या रीतीने चालू राहिला. नव्हे, तो जास्तच भीषण व क्रूर झाला. पूर्वी स्पर्धेचें क्षेत्र जातीजातींमध्ये विभागलेले व त्यामुळे कोते होते. आता नवी समता आली व स्पर्धेला सारा समाज हेच क्षेत्र झाले. या स्पर्धेमध्ये प्रबळ ठरलेले धनिक लोक हे इतर सर्व समाजाच्या तनमनधनाचे व नीतिसंस्कृतीचे शासक, पालक व खरे पाहता भक्षक बनले ! आज हीच स्थिती भारतात निर्माण झालेली आहे.

धनसिद्ध विषमता म्हणजे काय ? ह्याचे थोडेसे दिग्दर्शन मी वर केलेंच. आता एक पाऊल पुढे जाऊन या विषमतेच मूलभूत स्वरूप काय काय ते नीट पाहू. धनसिद्ध विषमतेमध्ये **कोणाही व्यक्तीला** हवे तेवढे धन मिळविण्याचा व त्याच्या साहाय्याने हवी तेवढी राजकीय सत्ता बळकाविण्याचा अधिकार समाजाने दिलेला आहे. पण या अधिकाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे मात्र आधीच गबर असलेल्या व्यक्तींना व त्यांच्या आसमंतातील आश्रितांना शक्य असते. पूर्वीच्या युगात काही वेळा खालच्या जातींतील व्यक्तींनी राजपद भोगल्याची उदाहरणे आहेत. गुलामही बादशहा झाल्याचे इतिहासात नमूद आहे. राजाच्या पदरी असणाऱ्यांना असे राजपद बळकाविता येई, पण या 'अपवादांनी' जन्मसिद्ध जातिव्यवस्थेच्या सर्वंकष तत्त्वाला बाध आला नाही. धनसिद्ध विषमतेच्या काळातही काही असेच अपवाद घडले आहेत. उदाहरणार्थ नेपोलियन, हिटलर, मुसोलिनी, अॅटली इत्यादी सामान्य व्यक्तींनी राजसत्तेच्या शिखरावर चढाई केली असे वरवर पाहता दिसते. पण व्यक्तींचा हा उत्कर्ष डोळे दिपविणारा असला तरी डोळे उघडून नीट पाहिले तर असे स्पष्ट दिसते, की धनजीवी वर्गाच्या राजकीय व आर्थिक सत्तेचा महारथ हाकणारे कुशल सारथी एवढेच महत्त्व हिटलर, नेपोलियन प्रभृती व्यक्तींच्या कार्याला आहे. या असामान्य व्यक्तींचे 'अपवाद' जमेला धरूनही सामान्य नियम असा सांगता येतो, की धनसिद्ध विषमतेच्या या युगात धनिक वर्गातील व्यक्तींना, त्यांच्या आप्तांना, वंशजांना आणि आश्रितांना समाजावर सर्वंकष नियंत्रण जारी ठेवणे 

सोपे असते. इतर सर्व समाजाला ह्या नियंत्रणाखाली मान देणं किंवा क्रांतिकारक उठाव करणे हे दोनच मार्ग मोकळे असतात.

या भांडवलदारी विषमतेच्या चौकटीतच एक समताही नांदत असते. ती कोणती ? तर धनजीवि वर्गाकडून शोषला जाणारा सर्व समाज, त्यातील कोटचवधी व्यक्ती, दारिद्रचाच्या, भीतिग्रस्ततेच्या व अगतिकतेच्या एकाच समपातळीवर आयुष्य कंठीत असतात. या व्यक्तींमध्ये प्रतिभाशाली लेखक, संशोधक व शास्त्रज्ञ असतात; तसेच कुशल व्यवस्थापक, संघटक व कारागीर असतात. कोटचवधी श्रमजीवी तर असतातच; पण कोटचवधी व्यक्तींच्या या मेळाव्यामध्ये प्रत्येक व्यक्तीचें वैशिष्टच व व्यक्ती-व्यक्तीमधील अनेकविध विषमता यांचे मूल्यमापन कोणी करते काय ? मुळीच नाही. उलट, या सर्वांना एका यंत्रबद्ध हडेलहप्पी शिस्तीत राबविणे व प्रत्येक देशांतील उत्पादनाचा अजस्र प्रपंच आपल्या इशाऱ्यावर व आपल्या फायद्यासाठी चालू ठेवणे हे कार्य प्रत्येक देशातील धनजीवी वर्ग करीत असतो. वृत्तपत्रासारखा बुद्धिजीवी वर्गाच्या श्रमावर चालणार व्यवसाय घ्या. यातील उत्पादनही आज भांडवलदारांच्या इषाऱ्याने चालत आहे. संपादकापासून वार्ताहरापर्यंत प्रत्येक व्यक्तीची काहीही वैशिष्टचे असोत, कसब असो व कल असो, त्याचे वृत्तपत्र–मालकाला सोयरसुतक नसते. हिंदुस्थानच्या दहापांच प्रमुख शहरांतील मुख्य दैनिके एका सूत्रांत गोवून टाकून शिस्तबद्ध तऱ्हेने चालविणे एवढीच डालमिया प्रभृती मालकांची दृष्टी असते व त्यांच्या शिस्तीमध्येच संपादकापासून खालपर्यंत सर्वजण बांधलेले असतात. या दावणीमध्ये बद्ध झालेल्यांना आपापल्या प्रामाणिक प्रवृत्ती खिशांत ठेवून एका समपातळीवर नांदावे लागते. या समपातळीलाच धनसिद्ध विषमतेच्या पोटी नांदणारी समता असे नाव देता येईल.

धनसिद्ध विषमतेच्या आधारावर रचलेल्या समाजव्यवस्थेत ‘ कर्म ’, ‘ पुनर्जन्म ’ असल्या अव्यक्त कल्पनांची अडगळ नसते हे खरे; तरीपण नैसर्गिक विषमतेला जन्मसिद्ध विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेत जसे मुळीच स्थान नव्हते, त्याचप्रमाणे धनसिद्ध विषमतेतही नैसर्गिक विषमतेला काहीही स्थान नसते.

## व्यक्तीसिद्ध विषमता

जन्मसिद्ध व धनसिद्ध विषमतेच्या पद्धतीने प्राचीनतम कालापासून आजपर्यंत सर्व जगभर समाजजीवन चालू आहे. या विषमतेचे व्यक्तीच्या

अंगभूत गुणाशी व कार्याशी काहीही नाते नाही. थोडेफार नाते असलेच तर ते व्यस्त आहे; कारण जन्मसिद्ध जातिसंस्था–निर्मित विषमता होती त्या युगात किंवा धनसिद्ध विषमतेच्या या युगात आपल्याला असे दिसून येते, की श्रेष्ठ बुद्धिमत्ता, चारित्र्य, शौर्य व कर्तुत्व याचा वाटा श्रेष्ठ जाती किंवा धनिक वर्ग यांच्याकडे फार थोडा असतो व ‘कनिष्ठ’ वर्गातूनच श्रेष्ठ गुणाची माणसे निपजतात. यापैकी काही माणसे लोभामुळे व परंपरेमुळे आपल्या कर्तृत्वाचा उपयोग श्रेष्ठवर्गीय सत्ता दृढमूल ठेवण्यासाठी करतात व त्यामुळेच स्वतः आळशी व नादान बनलेला सत्ताधारी व श्रीमंत वर्ग आपले समाजावरील वर्चस्व शतकानुशतके टिकवून धरू शकतात.

या शतकानुशतकांच्या परंपरेमुळे आज साहजिकच असा भ्रम सर्वांना होतो, की सत्ता व मत्ता यांचा वाटा ज्यांना देवाने (किंवा दैवाने) दिला आहे ते निसर्गतःच वर्चस्व गाजविण्याला लायक आहेत. या भ्रमामुळे खऱ्या नैसर्गिक विमषतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेची कल्पना कोणी जर पुढे मांडली तर लोकांना वाटते, ‘हा गृहस्थ काहीतरी वेड्यासारखे बोलत आहे आणि अगदी पिसाट क्रांतिकारक आहे!’

पण भ्रम टाकून दिला व नैसर्गिक विषमतेचा नीट पायाशुद्ध विचार केला तर असे दिसून येईल, की जात व श्रीमंती यांच्या बेगडी विषमतेच्या खाली एक खरोखुरी विषमता माणसामाणसांत नांदत आहे. ती विषमता व्यक्त व स्पष्ट गुणदोषांवर आधारलेली आहे व त्या विषमतेचा साक्षात्कार प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या व इतरांच्या तुलनात्मक निरीक्षणाने होत असतो.

एखादा कोठलाहि मित्रसंघ किंवा दहापाच लोकांचा गट घ्या. गटात प्रत्येक व्यक्तीचे एक वैशिष्टच म्हणून असते व त्याची जाणीव प्रत्येकाला स्वतःपुरती असते. तसेच इतरांनाही त्या व्यक्तीच्या या वैशिष्टचांची दखल असते एखादा उत्सवप्रसंग असेल तर त्याला रंग आणण्यासाठी त्या मंडळीतला एखादा माणूस उपयोगी पडणारा असतो. त्याच्या विनोदी व उत्साही स्वभावाची त्याला स्वतःला व इतरांना जाणीव असते. त्याप्रमाणे त्याची निवड लोक करतात व तोही आपले काम लादलेले म्हणून नव्हे, तर स्वयंस्फूर्तीने पार पाडतो. संघाच्या जास्त अवघड व जबाबदारीच्या कामाला लायक असे गुण असलेला

मनुष्य संघाचा पुढारी बनतो. त्यात कृत्रिमपणा काही नसतो. पुढारीपणाला आवश्यक असे गुण त्याच माणसांत उत्कटतेने आहेत याची खात्री इतर सर्वांना वाटत असल्याने त्याच्या पुढारीपणात इतरांना हुकूमशाही दिसत नाही.

मी वर सांगितलेला प्रकार इतका निरागस, अकृत्रिम व निर्बंध तऱ्हेने होण्याची शक्यता आपल्या आजच्याही समाजात आहे. फक्त अशा स्वयंस्फूर्त संघजीवनाचे क्षेत्र सध्या छोट्या मित्रमंडळापुरते मर्यादित असते. संघाची व्याप्ति वाढली की जाती किंवा श्रीमंती यांचा दुष्ट प्रभाव जाणवू लागती व संघाची छकले होतात ! (परप्रांतीय शहरांतून जे महाराष्ट्रीय समाज आहेत त्यांच्यात महाराष्ट्रीयत्वाचे प्रेमबंधन असल्याने प्रथम स्वयंस्फूर्त संघजीवन तयार झाले; पण त्यात पुढेपुढे जात व श्रीमंती यांच्या प्रभावाने फाटाफुटी पडत गेल्या, असा इतिहास बहुतेक ठिकाणी घडला आहे. तो वरील नियमाचे एक उदाहरण म्हणून सांगता येईल. )

सारांश, नैसर्गिक विषमतेवर आधारलेली अशी समग्र समाजव्यवस्था आज फक्त कल्पनेतच आणावी लागते. पण हीच कल्पना म्हणजे समाजवादाचे मूळ आहे.

समाजवादाचे मुख्य तत्त्व **समता**. पण **ही समता म्हणजे विषमतेचा अभाव नव्हे !**

वरील विधानाचे अनेक वाचकांना आश्चर्य वाटेल. कारण समाजवाद म्हणजे साऱ्याच विषमतेचे उच्चाटन असे त्यांनी ऐकले असेल. ते खोटेही नाही; पण त्यात थोडे खोल शिरले पाहिजे. समाजवादाला समता हवी; ती कोणती ? तर फक्त जन्मसिद्ध व धनसिद्ध विषमतेच्या नाशाने उत्पन्न होणारी सामाजिक आणि वर्गीय समता हवी. निर्वर्गीय समाज हवा.

समाजवादाला विषमताही हवी; ती कोणती? तर प्रत्येक व्यक्तीच्या बौद्धिक व शारीरिक गुणदोषांवर आणि कर्तृत्वावर आधारलेली विषमता हवी.

समाजवादी समता व समाजवादी विषमता यांच्यात विरोध नाही; उलट, दोन्ही एकाच सत्याची दोन अंगे आहेत. प्रत्येक माणसाच्या गुणदोषांनुरूप त्याच्याकडून जर स्वयंस्फूर्त असे उत्कृष्ट सहकार्य समाजाला
 हवे असेल, तर प्रत्येक व्यक्तीला आपण समाजात एक स्वतंत्र व

समानतेचे स्थान दिले पाहिजे. उच्चनीचतेच्या, 'बळी तो कान पिळी' या रानटी नियमाच्या, जन्मत: जाति निश्चित करण्याच्या प्राचीन पद्धतीच्या व धनिक वर्गाच्या वंशपरंपरागत मालकी हक्काच्या, आज रूढ असलेल्या साऱ्या कल्पनांची व संस्कारांचीही होळी केली पाहिजे. याचाच अर्थ असा, की माणसामाणसातील खऱ्या वेगळेपणाच्या ( विषमतेच्या ) आधारावरच विविधतेने नटलेला भव्य मानवसमाज निर्माण करावयाचा तर व्यक्तीव्यक्तींमध्ये समता मानली पाहिजे. एकाच सत्याची ही दोन अंगे आहेत व म्हणून त्यात विरोध नाही.

ह्या सहकार्याच्या, माणुसकी व समतेच्या व्यवहारालाच समाजवाद हे शास्त्रीय नांव आहे; तसेच समाजवादी संस्कृतीमधल्या विविधतेला वव्यक्ति-स्वातंत्र्याच्या तत्त्वालाच नैसर्गिक विषमतेचा व्यवहार असे म्हणता येईल.

व्यक्तिसिद्ध विषमतेचा अर्थ आणखी थोडा स्पष्ट करण्यासाठी सोव्हिएत समाजातील वेतनपद्धतीचे उदाहरण घेऊ. तेथेही अजून 'कामाच्या मापाने दाम' देण्यात येतात आणि व्यक्तिगत गरजेप्रमाणे वेतन देण्याचे तत्त्व तेथे संपूर्णत: अमलात आलेले नाही. परंतु अपूर्णतेने का होईना, व्यक्तिगत विषमता कशी ध्यानात घेतली जाते पाहा. तेथे स्त्री कामगाराला प्रत्येक अपत्यागणिक वाढती मजुरी देण्यात येतेच; शिवाय गर्भवती व बाळंतीण असताना तिला भत्ता देण्यात येतो. वैद्यकीय सल्ला, औषधे व पोषक अन्ने यांचाही लाभ तिला मोफतच होतो. या सर्व लाभाच्या मोबदल्यात ती अमुक कारखान्यात अमुक तास काम करते असे नाही; तिच्या इतकेच काम करणाऱ्या दुसऱ्या व्यक्तींच्या गरजा कमी म्हणून त्यांना वेतन कमी. तिची गरज जास्त म्हणून तिला जास्त वेतन व इतर लाभ. हा भेदभाव कोणत्या तत्त्वा-वर केला जातो ? तर **व्यक्तिगत विषमतेच्या तत्त्वावर.** शास्त्रज्ञाची गरज म्हणजे एक प्रयोगशाळा व मध्यमवर्गीय सुखवस्तूपणाचे जीवन ! तेवढे त्याला देण्यात येते. उलट, मजुराला इतके सुखाचे जीवन आज लाभत नाही. ही विषमता तर खरीच; पण तिचा पाया कोणता आहे ? जन्मसिद्ध विषमता हा आहे काय ? नाही. धनसिद्ध विषमताही नाही. व्यक्तिगत गरजांचा कमीअधिकपणा म्हणजेच विषमता ही या नव्या विषमतेच्या बुडाशी आहे.

### खऱ्या व्यक्तिस्वातंत्र्याचा लाभ

शेवटी, एकच मुद्दा घेऊन हे विवेचन संपवितो. व्यक्तिगत विषमतेचे 

तत्त्व जर समाजधारणेचे मूलतत्त्व बनले, तर व्यक्तिस्वातंत्र्याचे काय होईल ? याचे स्पष्ट उत्तर असे, की प्रत्येक व्यक्तीला तिच्या कलाप्रमाणे काम करावयास सांगणे व गरजेप्रमाणे सुखसोयी पुरविणे जर समाजाला शक्य झाले, तर प्रत्येक व्यक्तीला साहजिकच अशा समाजाशी एकनिष्ठ राहावेसे वाटेल व आपल्या खऱ्याखुऱ्या सर्व शक्तींचा व्यय व विकास समाजासाठी करण्यात धन्यता व सार्थकता वाटेल; म्हणजेच पुरे व्यक्तिस्वातंत्र्य लाभेल. उलट आज काय होत आहे पाहा !

आमच्या स्पर्धेच्या, पिळवणुकीच्या व भीतिग्रस्ततेच्या समाजांत व्यक्ती व धनजिवी वर्गाची सत्ता यांचे परस्पर वैर आहे. अगतिकतेमुळे आणि विफलतेमुळे समाजशत्रू बनण्याच्या विकृत इच्छा काही व्यक्तींच्या दुर्बल मनात आज उद्‌भवत आहेत. कोठल्यातरी शिस्तबद्ध संघटनेच्या पायी व्यक्तित्वाचा होम करून समाजावर हुकुमत गाजविण्याच्या विकृत इच्छा या व्यक्तींच्या मनात वावरत आहेत. या विकृत मार्गांनी व्यक्तिस्वातंत्र्याचे सामाजिक ध्येय साध्य होण्याऐवजी व्यक्तीला फॅझिझम-सारख्या गुलामगिरीत मान अडकविणे भाग पडणार आहे. पण त्यातच सार्थक मानण्याइतका भ्रंश, विकृती व भ्रम आज व्यक्तीच्या दुर्बल मनाला ग्रासीत आहे !

आजच्या श्रमजीवी व्यक्तींचा भ्रमनिरास कसा होईल ते सांगणे येथे प्रस्तुत नाही. पण एक गोष्ट खरी, की मार्क्सवादी समाजवादाने ज्या आदर्श समाजव्यवस्थेचे चित्र रेखाटून प्रत्यक्ष क्रांतीचा मार्गही आखला आहे, त्या समाजव्यवस्थेत व्यक्तिगत विषमतेला व वैशिष्टयपूर्ण व्यक्तिविकासाला पूर्ण वाव आहे. तशा आदर्श समाजात व्यक्तीच्या समाजशत्रूत्वाला प्रेरणा नाही व सर्वाधिकारित्वाची भ्रामक महत्वाकांक्षाही व्यक्तीच्या मनात उरणार नाही.

हे व्यक्तिगत विषमतेचें समाजवादी तत्त्व मार्क्सने ‘ गोथा प्रोग्राम ’ नावाच्या आपल्या पुस्तकात विशद केले आहे व एकंदर कम्युनिस्ट वाङमयात ते सुपरिचितच आहे. पण, आपल्याकडे पाहावे तर चांगले सुविद्य लोक अजूनही या गैरसमजाला चिकटून आहेत, की समाजवाद्यांन नैसर्गिक (व्यक्तिगत) विषमताच दिसत नाही व दिसत असलीच तर त्यांना ती जबरदस्तीने नष्ट करावयाची आहे ! हा रूढ गैरसमज नाहीसा होण्यास व विषमतेची जातीय, वर्गीय व नैसर्गिक रूपे वेगळेपणाने कळण्यास प्रस्तुत विवेचनाने मदत होईल अशी आशा आहे.

## समाज चिंतन । १५ । कार्ल मार्क्स

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...................... दि:
क्रमांक ........................ नों: दि: ........

पेशवाई १८१८ त संपली. १८५३ मध्ये इंग्रजी राज्य स्थिरावू लागले होते. त्या वेळी लंडनमध्ये निर्वासित म्हणून राहणारा मार्क्स भारताच्या स्वातंत्र्याबद्दल लेख लिहीत होता. एका अमेरिकन वृत्तपत्रात ते लेख प्रसिद्ध होत होते. एका प्राचीनतम संस्कृतीचे माहेरघर असलेला हा देश इंग्रजाकडून लुबाडला जात आहे, पण या पारतंत्र्यातून बाहेर निघण्याची भौतिक साधने व वैचारिक धैर्य भारतीयांना यातून मिळत आहे. इंग्रजी सत्तेचा नाश करणारी लोकसत्ताक राष्ट्रीय चळवळ म्हणून यशस्वी होणार आहे, असे भाकित मार्क्सने केले आहे. तेही १८५३ मध्ये.

मार्क्सचे हे भाकित शंभर वर्षांनी खरे ठरले. पेशवाईच्या अंताचे वर्ष हेच मार्क्सच्या जन्माचे वर्ष. पेशवाईतल्या शहाण्यासुरत्या मुत्सद्द्यांना भारताबाहेरील घडामोडींची फारच जुजबी माहिती होती. युरोपात काय घडत आहे आणि टोपीकरांची संस्कृती तरी काय आहे ? याचे थोडे जास्त ज्ञान त्यांना असते तर पेशवाई बुडालीही नसती. पण तसे व्हायचे नव्हते. मार्क्सला मात्र भारताच्या संस्कृतीची व पारतंत्र्याची नीट जाणीव होती. असा जाणीवांतला फरक का दिसतो ?

या फरकाचे कारण थोडक्यात उमगून घ्यायला हवे. मार्क्सच्या वेळचा सारा युरोपच पृथ्वीचे आक्रमण करायला निघाला होता. शस्त्राने, व्यापाराने, लबाडीने, धर्मप्रसाराच्या मिषाने, सांपडेल व सुचेल त्या मार्गाने युरोपीय माणसे सगळीकडे घुसत होती, जिंकत होती, लुबाडीत होती व राज्ये स्थापित होती. एका क्रूर व लोभी लालसेने पछाडल्याप्रमाणे युरोपचे सारे देश साम्राज्यांचा व त्याच बरोबर भीषण दारिद्र्याचा,

जुलमाचा व रोगराईचा विस्तार वाढवीत होते. युरोपचे आक्रमण हे क्रूर व लोभी होते. तसेच ज्ञानाच्या दृष्टीने मोठे समर्थ होते. पण ज्ञानाचे सारे सामर्थ्य धनलोभाच्या एकमेव हव्यासाचे साधन बनले होते.

कार्ल मार्क्सच्या काळातला हा हव्यासी युरोप साथीच्या रोगासारखा फैलावत होता, आणि त्याच्या अंतरंगातही एक न विझणारी आग धुमसत होती. एखाद्या लोभी व क्रूर माणसाचे आक्रमण शेजाऱ्यापाजाऱ्यावर होते तसेच स्वतःच्या कुटुंबावरही होते. पूर्वी प्रजेला छळणाऱ्या राजघराण्यांतूनच विषप्रयोग व खून होत. कौरवपांडवापासून भाऊबंदकीने झालेली रणकंदने गाजत आलेली दिसतात. युरोपातही तीच यादवीची आग भडकत होती. मार्क्स तीस वर्षांचा होता त्या वेळी अंतर्गत संघर्षाची आग साऱ्या युरोपभर पसरली. जर्मनी, फरान्स, इंग्लंड, सारेच मातवर धनाढ्य देश. त्यांच्या राजधान्यांतून रस्तोरस्ती मोर्चे बांधले गेले. कारखान्यातून राबणारे मजूर सैनिकांशी प्राणपणाने लढत होते. या लढ्याला एक वेगळेच गांभीर्य होते, गरीब जनता श्रीमंत लोकांच्या सत्तेविरुद्ध बंड करून उठली होती. फ्रेंच समाजक्रांतीने जागवलेले बंडाचे वारे आता प्रचंड वादळ बनले होते.

१८४७ मध्ये तरुण मार्क्स व त्याचा मित्र एंगल्स यांनी या वादळी वणव्याचे दृश्य उघड्या डोळ्यांनी पाहिले. उघड्याच नव्हे तर शास्त्रज्ञांच्या डोळसपणाने पाहिले. जनतेच्या बंडामागील भावना त्यांनी ओळखली, पण भावनावश न होता, त्यांनी युरोपच्या संस्कृतीचा पिंड, त्यातील धनलोभाचे मूळ आणि त्या संस्कृतीचे भवितव्य शोधले.

" कम्युनिस्ट मॅनिफेस्टो " नावाच्या लहानश्या चोपड्यात मार्क्सने युरोपच्या रोगाचे निदान केले आहे. नफा कमाविणे हाच परमधर्म मानणारी ही संस्कृती आपल्या चितेची लाकडे रचीत आहे. या संस्कृतीला अग्नी देणारा कामगार वर्ग आता कम्युनिझमचे ध्येय उमगून पुढे सरसावला आहे. आपणच निर्माण केलेल्या या कम्युनिझमच्या निशाणाकडे पाहून धनिक वर्ग कापू लागला आहे.

कम्युनिस्ट निशाणाखाली पांची खंडातली माणसे, राबणारी साधी जनता, संपत्ती निर्माण करणारी जनता, एकवटणार आहे, असे एक विलक्षण भाकित आणि आर्त साद या मॅनिफेस्टोत आहे.

मार्क्सची भाकिते खरी ठरली नाहीत असे पुष्कळजण समाधानाने म्हणतात, ते अगदी खोटे नाही. अनेक घटना आज आपल्या डोळ्यासमोर

घडत आहेत. जगातले कामगार एकमेकांशी बंधुभावाने वागताना दिसत नाहीत.

कम्युनिझमचा स्वीकार करणारे रशिया व चीन हे देश एकमेका-विरूद्ध लढाईचा पवित्रा घेत आहेत. जगातल्या कामगारांची एकजूट, सर्व राष्ट्रांचे सहकार्य व शांतता ही मार्क्सची स्वप्ने होती, व स्वप्ने विरून जातात तशीच ती विरली. उरले काय तर भांडवलशाहीची, राष्ट्राराष्ट्रांतील संघर्षाची, अणुस्फोटाने मानव नष्ट होण्याची भीषण प्राप्तस्थिती. केवढे प्रचंड समाधान मानून, सुटकेचा निःश्वास टाकून मार्क्स विचारा भाबडा स्वप्नाळू होता असे म्हटले जाते !

पण, मार्क्स असा संपू शकत नाही. कारण युरोपच्या संस्कृतीतील उदात्त मूल्यांचा वारसा घेऊनच मार्क्सने आपले तत्त्वज्ञान निर्माण केले आहे. उदात्त मूल्ये संपतील त्या क्षणी मार्क्स विसरला जाईल. पण मग युरोपीय संस्कृतीच भीषण विकृती झालेली असेल. मार्क्सच्या जर्मनीतच या विकृतीने काही काळ प्रचंड झंझावाती आकार घेतला. हिटलर म्हणजे संस्कृतीच्या विडंबनाची प्रत्यक्ष मानवमूर्ती. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या उदात्त मूल्यांना रणगाड्यांखाली रगडणारा हिटलर विजयी झाला असता तर. मग मात्र म्हणता आले असते की मार्क्सने जे काही म्हटले ते संपले, कायमचे संपुष्टात आले, पण हिटलर पराजित झाला.

मार्क्सने आपले तत्त्वज्ञान सांगतानाच म्हटले आहे की युरोपच्या भूमीत निर्माण झालेली तीन प्रमेये मी मार्गदर्शक मानली आहेत. एक ब्रिटनमधील रिकार्डोप्रभृती अर्थशास्त्रज्ञांचे श्रममूल्याचे प्रमेय, दुसरे फ्रेंच समाजवाद्यांचे समाजक्रांतीचे प्रमेय. तिसरे जर्मन तत्वज्ञ हेगेल यांचे डायलेक्टिक्सचे प्रमेय. या तीन प्रमेयांचा विलगपणा घालवून त्यांना एकवटणे ही एक सर्जनशील प्रतिमेची झेप होती. अनेक क्रांतिकारक सिद्धान्त असेच असतात, मग ते निसर्गविज्ञानातील असोत की समाज-विज्ञानातील असोत. एकमेकांपासून विलग अशी अनेक प्रमेये नांदत असतात, प्राप्त परिस्थितीचा एकेक अंश एकेका प्रमेयाने माणसाला उमगतो. पण परिस्थितीने टाकलेले मोठे कोडे विलगपणाने उलगडत नाही. प्रतिभेचे कार्य सुरू होते. एकवटलेल्या एका सिद्धांताचा जन्म होतो व त्यात विलग प्रमेये एकसंध होतात व परिस्थितीचे साकल्याने ग्रहण करण्याचा मार्ग विचारवंताना दिसू लागतो.

मार्क्सच्या सिद्धान्ताला हा एकसंधपणा व व्यापकपणा आहे. नेमके हेच न कळल्यामुळे मार्क्सचे टीकाकार त्याला झोडपीत सुटले. त्याच्या हयातीत व आज घटकेपर्यंत. इतिहास म्हणजे आर्थिक प्रेरणांची व घटनांची साखळी आहे, एवढेच मार्क्सने म्हटलेले नाही. पण, त्याच्या पदरी ही एकेरी अर्थदास्याची भूमिका टीकाकारांनी बांधली. टीकाकारांनीच नाही तर त्याच्या अनुयायांनीही. मी मार्क्सवादी नाही असे वैतागाने म्हणण्याची पाळी मार्क्सवर आली. ख्रिस्ताला लाज आणणारी ख्रिश्चन संस्कृती आज नांदत आहे ना !

मार्क्सने सांगितलेली इतिहासमीमांसा, धर्ममीमांसा, राष्ट्रीयत्वाची मीमांसा व राज्यसंस्थेसंबंधीची मीमांसा त्याच्यानंतर युरोपीय विचारांत प्रभावी ठरलेली दिसते. भांडवलशाहीच्या संबंधीची त्याची अर्थशास्त्रीय मीमांसाही अनेक स्पष्ट किंवा नकळत मार्गांनी मानवी अर्थजीवनात मार्गदर्शक ठरलेली दिसते. कल्याणकारी राज्यसंस्थेने लोकहिताच्या दृष्टीने आर्थिक व्यवहारांचे नियोजन करावे ही कल्पना घ्या. वैयक्तिक नफेबाजीचे स्वातंत्र्य अमान्य करूनच नियोजन होऊ शकते, व अशा नियोजनामागे मार्क्सचा अर्थशास्त्रीय सिद्धान्तच उभा आहे. तो नियोजनकारांना दिसेल किंवा अदृश्य राहील, तो भाग वेगळा.

"धर्म ही अफूची गोळी आहे" असे मार्क्सने म्हटले ते खरे आहे. पण ते याच संदर्भात म्हटले की सामान्य लोकांना गुंगीत ठेवण्यासाठी, बंडाचा वणवा पेटण्याला कोरडी मने राहू नयेत यासाठी, धर्माचा ओलावा कायम राहण्याचा अट्टाहास सत्ताधारी करीत आले आहेत. असे प्रत्येक देशात घडताना दिसते. धर्मभेद, वंशभेद, जातिभेद यांचा ओलावा टिकून राहावा, लोकांमधील अंधश्रद्धा आंधळी, पांगळी व क्रूरही व्हावी, यासाठी धर्ममार्तंडांचे साहाय्य सत्ताधारी घेतात की नाही ? राजकारणात हे साहाय्य मोलाचे ठरते की नाही ? ह्या सत्याकडे डोळे उघडून पाहा असे बजावण्यासाठी सत्तेला व मत्तेला आशीर्वाद देणाऱ्या धर्माला मार्क्सने अफू म्हटले. मग दुसरे काय म्हणायला हवे होते !

पण, मानवी मनात धर्मभावनेचा व धर्मकल्पनांचा उदय कसा झाला धर्मसंस्था आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे यांचा अन्योन्यसंबंध कसा शोधावा ? यासंबंधीही मार्क्सने लिहिले आहे. मॅक्स वेबर प्रभृती समाजशास्त्रज्ञांनी धर्ममीमांसेबाबत स्वीकारलेल्या दृष्टिकोणात मार्क्सच्या मीमांसेचा प्रभाव दिसतो. एरिक फ्रॉम, सी राइट मिल्स प्रभृति, अमेरिकन समाजशास्त्रज्ञही

मार्क्सच्या एकंदर सिद्धान्ताने प्रभावित झालेले दिसतात.

निसर्गविज्ञानाच्या क्षेत्रात मार्क्सच्या विचारांचा प्रभाव आहे का ? याचे उत्तर द्यावयाचे तर जे. डी. बर्नालप्रभृती ब्रिटिश वैज्ञानिकांच्या कार्याकडे बोट दाखविता येईल. १९३० च्या सुमारास बर्नाल व इतर अनेक वैज्ञानिक स्वतःला मार्क्सवादी शास्त्रज्ञ म्हणवू लागले. वैज्ञानिक प्रगती आणि तंत्रविज्ञानाचा विकास कोठेतरी अंधातरी म्हणजे प्रयोगशाळेच्या भिंतीआड चालतो, व त्याचा समाजाच्या रचनेशी व मूल्यांशी संबंध नसतो, अशी सोवळी शुद्ध भूमिका बर्नालप्रभतींना मान्य नव्हती, आणि विज्ञानाची समाजसापेक्षता त्यांनी परखडपणे मांडली. अशाच रीतीने वाङमय आणि इतर कला यांची समाजसापेक्षता मांडणारे मार्क्सवादी कलावंतही युरोपांत निर्माण झाले.

भारतामध्ये युरोपातील या साऱ्या वैचारिक घडामोडींचा पडसाद नाही. जो काही आहे तो त्रुटित व पुष्कळसा विपरीत आहे. याचे मूळ कारण पुन्हा हेच की युरोपच्या विचारविश्वाशी आम्ही अजून नीट परिचितही नाही. " मार्क्स कधीच संपला आहे, " असे म्हणण्यात काहीजण मश्गूल आहेत, तर मार्क्सवादाचा अभ्यास न करता मार्क्सवादी म्हणवून घेण्यात काहीजण समाधान मानीत आहेत. खरे तर असे आहे की ज्या विचारभूमीत मार्क्सचे पूर्वसूरी नांदले व मार्क्सचा प्रभाव ज्या भूमीत कायम राहिला, तिलाच आंम्ही पारखे आहोत. पारखे राहिलो तर बिघडले काय ? भारतीय सत्व निर्भेळपणे टिकवून आम्ही स्थिर राहणे हाच पुरुषार्थ आहे असे मानता येते......आज मानलेही जाते.

मार्क्सच्या दृष्टीने पुरुषार्थाला अशा देशकालाच्या सीमा नाहीत. माणसांनी इतिहास घडविला तो साऱ्या सीमा ओलांडीत घडविला आणि आता यापुढेही तो असाच घडवावयाचा आहे. सारी मानवजात, तिचे सारे जुने नवे संचित आदरणीय मानणारा मार्क्स दुसरे काही सांगत नाही.

पासष्ट वर्षांचे आयुष्य मार्क्सला लाभले पण त्यात स्वास्थाचे क्षण फारच थोडे. मुलीच्या दफनालाही पैसे जवळ नाहीत अशी अकिंचन अवस्था त्याने वर्षांनुवर्षे भोगली. एका सरदारकन्येशी त्याचा प्रेमविवाह झाला व तिलाही त्याच्याबरोबर दारिद्र्याशी झुंजावे लागले. पण तिने धैर्याने सर्व आपत्तींना तोंड दिले. आदर्श दांपत्याचा तो संसार होता;

पण खडतर होता. थोडा कच्चेपणा असता तर या झुंजार पतिपत्नींचे सत्वहरण केव्हाच झाले असते.

एका दुर्धर व भीषण कालखंडात आपण आज वावरत आहोत. या भीषणतेची चाहूल मार्क्सच्या फार आधीपासून लोकांनाही लागली होती. पण चाहूल लागणे वेगळे आणि सावध होणे वेगळे. मार्क्सने सावधपणे आणि अखंड ज्ञानसाधना करीत आपले आयुष्य व्यतीत केले. युरोपच्या विचारवंतांना सावध केले. इतकेच नव्हे तर पाची खंडांतल्या दलितांना दिलासा दिला व आत्मविश्वास दिला.

मार्क्स स्वतःला प्रेषित मानीत नव्हता. त्याला प्रेषित मानणे हा त्याचा अवमान आहे. तो स्वतःला लोकोत्तर विभूती मानीत नव्हता. म्हणून त्याला असामान्य विभूती मानणेही चूक आहे. सामान्यांसाठी त्याने आपले अंतःकरण जितेजागते ठेवले, आणि आपली प्रतिभाही त्याने सामान्यांसाठी राबवली. तो स्वतःला एक वैज्ञानिक मानीत होता आणि मानवाच्या जीवनशास्त्राला आपले क्षेत्र मानीत होता. आजच्या विज्ञानाच्या युगात मार्क्सची हीच खरी ओळख ठरेल, आणि त्याची शिकवण सतत मार्गदर्शक राहील.

# भाग दुसरा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ८११३८ दि:
क्रमांक ... नोंद दि: ...

समाज चिंतन । १६ ।

# परिवर्तन :
# भ्रम व सत्य

---

केशवसुत म्हणाले, ‘ देवदानवा नरे निर्मिले ’. लोकांनी त्यांचे हे म्हणणे ऐकले. पण कवीचे वचन म्हणजे कल्पना. तिचे नुसते कौतुक करायचे, रसग्रहण करायचे आणि मग सोडून द्यावयाचे !

पण कधीकधी अशा वचनांचा थोडा जास्त अर्थ लावण्याचा मोह मला होतो. अलीकडच्या काही ‘ अनर्थ ’ काव्यांतून अर्थ शोधीत बसण्यापेक्षा ह्या मोहालाच बळी पडणे बरे नाही का ? केशवसुतांनी जे काही म्हटले आहे ते उघड व सोपे आहे. पण त्यात मला एक शंका आली की माणसाने देव बनविले, एवढे म्हणूनच भागले नसते का ? दानवहि निर्मिले हे सांगायला कशाला हवे होते ?

पण नंतर माझ्या लक्षांत आले की केशवसुत अर्धसत्य सांगणारे नव्हते. माणसाने देव घडविला हे अर्धवट खरे आणि देवाबरोबरच दानव घडविला हेच संपूर्ण सत्य. तेच सांगणे त्यांना भाग होते. पुराणे रचणाऱ्या प्राचीन कवींची प्रतिभा आणि केशवसुतांची प्रतिभा एकच होती. देव आणि दानव. नुसते देवच असते तर सारी पुराणे रिती राहिली असती. ते प्राचीन कवी जर कवि नसते तर त्यांनी समुद्रमंथनाची कथा अशी साधी व गद्य रचली असती : एका रम्य उषःकाली देव समुद्रतीरावर जमले, मेरूला रवी करून वासुकीला दोरी करून मंथन करते झाले व समुद्रांतून निघालेले अमृत प्राशन करते झाले !

जरा स्पष्टच बोलायचे तर अशा या कथेला एखाद्या कल्याणकारी राज्यातर्फे पारितोषिक मिळणेही शक्य होते. पण सुदैवाने तसले राज्य

तेव्हा नव्हते, व त्या वेळचे कवीही मोठे कलंदर होते. 'देवांच्या मदतीला चला' असे केशवसुतांनी माणसांना आमंत्रण दिले, पण त्या पुरातन कवींनी देवांच्या मदतीला दानवांना बोलावले. पुढचा गमतीचा प्रकार, त्यांतल्या त्यात विष्णूने मोहिनीरूपाने दानवांची केलेली वंचना तुम्हाआम्हाला माहीतच आहे.

देव आणि दानव यांपैकी एक देवच तेवढे निर्माण करणे मानवाला अशक्य होते आणि जणू काय त्याच कारणासाठी देव-दानवांनी केलेल्या समुद्रमंथनातून नुसते अमृत निघणेही अशक्य होते. अमृताबरोबर सुरा व हलाहलहि निघाले व निघणे प्राप्त होते. यात काही तरी संकेत नव्हे तर अटळ नियम नाही का ?

'देवदानवा नरे निर्मिले' या कविवचनांत म्हणूनच मला जरा जास्त, किंवा गहन म्हणा, अर्थ आहेसा वाटू लागला. तो अर्थ थोडा विशद करून सांगण्याचे केशवसुतांच्या मनात आले असते तर बरे झाले असते. पण त्यांनी तो सांगितला नसला तरी आजच्या व आजपर्यंतच्या आपल्या मानवी जीवनातच तो दिसत नाही का ?

आपण असे मानतो की आज माणसाच्या ज्ञानाची रास खूप मोठी डोंगराएवढी झाली आहे. तेनसिंगाने एवरेस्टचे शिखर गाठले आहे व शास्त्रज्ञांनी अणूच्या गाभ्याला हात घातला आहे. आज शाळेतील पोरही म्हणते की पृथ्वी नारिंगासारखी वाटोळी आहे. बिचाऱ्या प्लेटोला किंवा भीष्म–द्रोणांना एवढे ज्ञान कोठे होते ?

पण, आपण असे मुळीच मानीत नाही की आजची शाळकरी पोरे प्लेटोएवढी मोठी झाली आहेत ! ज्ञान (म्हणजे माहितीची बेरीज व बिनचूकपणा) शतकानुशतकाच्या सामाजिक बेरजेमुळे वाढले आहे हे कबूल. पण ज्ञान मिळविण्याची व्यक्तीची मूळ शक्ती वाढली आहे असे आपण मानीत नाही व मला वाटते मानू नये.

जे ज्ञानाच्या बाबतीत तेच कलेच्या बाबतीत. हजारो वर्षांपूर्वीच्या, गुहेत नागव्या उघड्या राहणाऱ्या कलाकाराने रंगविलेले हरणाचे चित्र पाहिले म्हणजे आजही कलाभिज्ञाचे मन आश्चर्याने व आनंदाने भरून जाते. गेल्या हजारो वर्षांत मिसर, भारत, ग्रीस, युरोप, चीन वगैरे देशांतील कलाकारांनी रंगविलेली चित्रे व घडविलेल्या मूर्ती आपण पाहू शकतो. आणि 'नवचित्रे' व 'नवशिल्पें' बनवू शकतो.
 ही सारी कलेची सामाजिक समृद्धि, विविधता व संपन्नता मोठीच

आहे. पण, पुन्हा त्या गुहेतल्या कलाकाराचा हुंकार हजारो वर्षांच्या पडद्यामागून ऐकू येतोच. 'मी तुमच्यातला, नव्हे तुमच्याएवढाच मोठा कलावंत आहे' हे त्याचे आत्मविश्वासाचे शब्द त्या हरिण–चित्रांच्या रेषांतून उमटत आहेत ते ऐकावेच लागतात.

ज्ञानाची व कलेची सामाजिक रास वाढली पण मानवाची शक्ती जशीच्या तशीच आहे, हे म्हणणे नीतीच्या बाबतीत निदान खोटे असणे जरूर होते ! कारण आजच्या माणसाची स्वतःच्या मोठेपणाची व प्रगत असण्याची कल्पना मुख्यतः नीतीवर आधारलेली असते. हे आजच आहे असे नाही, पूर्वपार आहे. आजचा हाच अहंकार आर्यांना होता व ग्रीकांना होता. तोच खिश्चनांनी, महंमदीयांनी, युरोपीयनांनी, कम्युनिस्टांनी व गांधीवाद्यांनी उराशी धरलेला आढळतो. 'आम्ही कम्युनिस्ट वेगळ्या घडणीची माणसे आहोत' अशी स्तालिनची दर्पोक्ति होती. तिला हसणे भाग आहे. कारण 'स्तालिनचे रहस्य' आता रहस्यमय उरलेले नाही. पण हसायचेच म्हटले तर साऱ्या इतिहासाकडे पाहात वेड्यासारखे हसत सुटावे लागेल. आम्ही नीतीने श्रेष्ठ, बाकी साऱ्या मानवांना अध्यात्माचा मार्ग दाखविणारे व माणसांत आणणारे, असेच सारे 'आम्ही' म्हणत आलो आहोत; आणि...

पण, नैतिक प्रगतीच्या बाबतीत पुन्हा केवळ सामाजिक रास व बेरीजच आहे. गुलामगिरीला नैसर्गिक मानणारा साक्रेटिस आज हास्यास्पद ठरेल व नीग्रो मुलांना शाळेच्या दाराशी अडविणाऱ्या गव्हर्नर फॉगसप्रमाणे त्याची फजिती होईल. जन्मसिद्ध जातिव्यवस्था ही विषमताच नाही, फक्त नैसर्गिक श्रमविभागणी आहे असे म्हणणारे गृहस्थ आज आपल्यात नाहीत असे नाही, पण त्यांना मनातून पोकळ वाटत आहे. निरंकुश राजसत्तेऐवजी लोकशाही चांगली असे शाळकरी मुले आज सांगतील. पण यावरून एवढेच सिद्ध होते की आमच्या नीतिविषयक ज्ञानात व सामाजिक आचारांत फार मोठा बदल झालेला आहे. तो बदल प्रगतीच्या दिशेनें झालेला आहे. पण हा बदलही बेरजेसारखाच आहे. मुळात नैतिक आचार करण्याच्या शक्तीचा प्रश्न आला की आम्ही सारी सारी माणसेच आहोत. साक्रेटिस गुलामगिरीला चांगली समजत होता हे वाईट होते. पण सत्यासाठी मृत्यू पत्करण्याचे नीतिधैर्य ग्रीसमधल्या लोकांत होते तेवढेच आज आपल्यात नाही का ? तेव्हा व आजही साक्रेटिस एखादाच निघावयाचा !

‘ देवदानवा नरे निर्मिले ’ यांत म्हणूनच मला असा अर्थ दिसतो की, ‘ मानव ’ या कल्पनेत ‘ देवत्व ’ व ‘ दानवत्व ’ या दोन्हींची समसमान बेरीज किंवा मिलाफ केलेला आहे. मानव हा ‘ ममेवांश ’ आहे असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितलेला आहे. पण, समजा, वृत्रासुराची गीता उपलब्ध झाली ! त्यात वृत्र आपल्या प्रियतम शिष्याला तेच शब्द म्हणाला असे वाचावयास मिळेल. आंता, स्वतःच्या देवत्वाबद्दलच्या खोटया अभिमानामुळे मानव आंधळा झाला आहे व वृत्रगीता उघडून पाहण्याची त्यास इच्छा होत नाही, व खरे म्हणजे धीर होत नाही. त्याला इलाज नाही.

आतापर्यंतचे सारे धर्मसंस्थापक, साधुसंत, महात्मे व आदर्श समाज-रचनेचे ध्येय सांगणारे क्रांतिकारक मानवाला दिलासा देण्यात यशस्वी झाले आहेत, हे खरे. पण हा दिलासा एका भ्रमावर आधारलेला होता असे वाटू लागते. ज्ञान, कला व नीती याबाबतीत पुढचे पाऊल टाकण्याचा मार्ग या थोर लोकांनी सांगितला व लोकांनी ते पाऊल टाकले. म्हणून तर आज मानव समाजाची एवढी प्रगती झालेली दिसत आहे. **मानव समाजाची प्रगती झालेली आहे हा भ्रम नाही,** पण **भ्रम आहे** तो **मानवाच्या पुढे मांडलेल्या ‘ नराचा नारायण ’ होण्याच्या कल्पनेत आहे.** ख्रिस्त प्रभृती ‘ धर्मसंस्थापनेचे नर ’ घेतले तर ते मनुष्याला सांगतात कीं, ईश्वर आहे आणि मनुष्य ईश्वराचा पुत्र आहे. ईश्वराचे राज्य आपण पृथ्वीवर आणू. बुद्धाने ईश्वर मानला नाही पण मानवाला बुद्ध होता येते असे सांगितले. पाप, मोह वगैरे गोष्टींचा त्यांनी विचार केला आहे. पण या दोषांना झटकून टाकता येते असे सांगितले आहे. ‘ देवत्व ’ आणि ‘ दानवत्व ’ यांचे अभेद्य अक्षय द्वंद्व मानवात आहे, हे सत्य त्यांनी लोकांना सांगितले नाही. म्हणून तर पूर्णत्वाकडे जाण्याचा मार्ग त्यांना सांगता आला. पण तोच भ्रममार्ग होता.

युरोपियन समाजात नेमके हेच झाले. ‘ निसर्गातला मानव ’ नावाचा भ्रम तिथे मानला गेला. व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणे मिळाले तर प्रत्येक मानव पूर्ण विकसित होईल, हे रूसोचे तत्त्व म्हणजे ह्या आधुनिक संस्कृतीचा मंत्र होय. पण मानवाच्या ‘ नैसर्गिक चांगुलपणावरचा ’ विश्वास हा एक महाभ्रम होय. याला टॉल्स्टॉयनेही उराशी धरले. अहिंसेचा धर्म त्याने मानवाला सांगितला. दुसरीकडे विवेकवादी तत्त्वज्ञांनी असे मानले की ‘ मानव हा विवेकशील आहे. ’ हेगेलने, व नंतर त्याच्या

शिष्याने म्हणजे मार्क्सने, हा विवेकशीलतेचा आदर्श मानवापुढे ठेवला. पूर्ण विवेकी सहजीवन, म्हणजे कम्युनिस्ट तत्वज्ञानाचे अंतिम साध्य, मानवाच्या विवेकशीलतेवर आधारलेले आहे. पण मानव हा असा विवेकशील आहे का ? या प्रश्नाची उत्तरे हेगेल किंवा मार्क्स यांनी जी दिलेली आहेत ती इतिहासात पडताळून पाहता चूक ठरतात. दुर्दैव असे की, सारा आजवरचा मानवी इतिहास अविवेकाचा, हिंसेचा, पिळवणुकीचा व वंचनेचा आहे ही गोष्टही मार्क्सनेच सांगितली आहे.

आणि, गांधीजी आणि विनोबाजी यांचे तरी काय ? त्यांनीही असेच मानलेले आढळते की, हिंसा, पिळवणूक वगैरे सर्व गोष्टी आगंतुक आहेत व प्रत्येक माणसात जो हृदयस्थ जनार्दन आहे त्याला जागे करण्याचा फक्त प्रश्न आहे. आता माणसातला चांगुलपणा केव्हा केव्हा जागा नसतो व तो जागा करण्यासाठी आत्मक्लेश व बलिदान उपयोगी पडते हे अगदी खरे आहे. त्या बलिदानाचा मार्ग राष्ट्रीय लढ्यात किंवा जमीनमालकीच्या दुर्धर प्रश्नाच्या सोडवणकीत उपयुक्त ठरेल यातही शंका नाही. पण मानवी हृदयाच्या परिवर्तनाचे तत्त्व खरे असूनही हृदयाबद्दल जो एकेरीपणा स्वीकारण्यात येतो तो बरोबर नाही, एवढाच येथे आक्षेप आहे. मानवी हृदय किंवा माणसातली ' माणुसकी ' म्हणजे काय ? बलिदानाने माणसांतला चांगुलपणा जागा होतो हे जितके खरे तितकेच मोहाने त्याच माणसातला दुष्टपणा जागा होता हेहि खरे नाही का ? म्हणजेच, **माणसाचे हृदय हे सत्प्रवृत्तच आहे हा भ्रम असून ते सुष्टदुष्ट प्रवृत्तीचे सारखेच माहेरघर आहे हे सत्य आहे.** पण दोष, मोह, दुष्टपणा हा तेवढा आगंतुक, ' सैतानाची प्रेरणा ' किंवा विषम समाजव्यवस्थेमुळे निर्माण झालेला दुष्टपणा, असे मानून मानवजातीच्या उद्धारकांनी मानवांना उपदेश केलेला आढळतो. तो उपदेश भ्रमावर आधारलेला व भ्रमाला पोषक आहे एवढेच मला म्हणावयाचे आहे.

सामाजिक प्रगति हा भ्रम नाही, पण सामर्थ्यात माणूस बदलत नाही मर्यादित राहतो व्यक्ति ही स्थिर वस्तु आहे व तरी मानवजातीच्या ज्ञानाची, कलेची व नैतिक व्यवहारांची रास वाढत आहे; ती रास ही बदलती गोष्ट आहे. ज्ञानाची धडपड व अज्ञानात गुरफटून राहण्याचा मठ्ठपणा, उदात्त श्रद्धा आणि कृपण अश्रद्धा, कलानिर्मितीची 'दिव्य' शक्ति आणि कळाहीन जडत्व, उत्कट नीतीधैर्य आणि दुराचारांकडे धांव अशा द्वंद्वानी मानवी मन घडलेले आहे, आणि या त्याच्या घडणीत

फरक होणेही शक्य नाही. पण माणसाच्या मनाची घडण न बदलता मानवांचे सामाजिक जीवन बदलत आहे व प्रगति होत आहे; हे नुसते मानावे लागत नाही तर प्रत्यक्ष घडलेले दिसत आहे.

पण प्रत्येक मानवी मनाची घडणच बदलण्याचा भ्रम आपल्या तत्त्वज्ञानात व सामाजिक ध्येयसृष्टीत फार खोलवर रुजलेला आहे. देवाबरोबरच दानवाला जन्म देणारे दैवी आणि आसुरी मन माणसाला लाभलेले आहे. हे कटु सत्य आपल्याला सहज पटणारे नाही. पण याबाबतीत जीवशास्त्राची साक्ष घेतली तर काय दिसते ? गाय, कुत्रा, हत्ती वगैरें कोठलाहि प्राणी घेतला तर त्याचे शरीर व मन अपरिवर्तनीय आहे असे आपण पाहतो. विकासक्रमामध्ये नवीनच जीवकोटि (species) जन्माला येतात खऱ्या, पण प्रत्येक जीवकोटीला एक स्थैर्य लाभलेले असते. माणूस हा असाच एक प्राणी आहे. तो जंतुसारखा क्षुद्र नाही व कुत्रा, घोडा इत्यादी प्राण्यांहूनहि वेगळा आहे; पण प्राणीच आहे. एक जीवकोटि म्हणून त्याला जे शरीर व मन लाभले आहे त्याचा उपयोग करीत, निसर्गाशी झगडत, त्याने आपले जीवन उन्नत केले आहे. यात त्याचा मोठेपणा आहे. पण म्हणून, त्याचे प्राणित्व कोठे जाईल ? त्याला लाभलेला देह कसा बदलेल ? मनाची घडणहि कशी बदलेल ? त्या घडणीत जर समजा काव्यात्मता असली (व सुदैवाने तशी काव्यात्मता मानवी मनात अंगभूतच आहे) तर माणूस काव्य करणारच ! मग तो रंग फासून नागवा हिंडणारा रानमाणूस असो की नागरजीवनाने लपेटलेला माणूस असो. आणि जी गोष्ट काव्यात्मतेची तीच सुजाणपणाची, तर्कशुद्ध ज्ञानाची, श्रद्धाळूपणाची, नीतिपरायणतेची व अधमपणाची !

शेवटी प्रश्न आहे तो माणसाला खरे 'आत्मज्ञान' होण्याचा ! सारी सृष्टि कर्मबद्ध आहे, नामरूप आहे, माया आहे, त्या नामरूपाच्या मागे एक सत्, चित् व आनंद आहे व त्या ब्रह्माशी माझा आत्मा एकरूपच आहे. हा साक्षात्कार म्हणजे आत्मज्ञान असे म्हणतात. हा साक्षात्कार होणे अवघड असले तरी होत असला पाहिजे; कारण तशी साक्ष देणारे साक्षात्कारी लोक असतात. पण मला त्या साक्षात्काराचा व आत्मज्ञानाचा हेवा वाटत नाही. मला वाटते की मानवाला 'आत्मज्ञान' हवे म्हणजे आपण एक प्राणी आहोत हे ज्ञान हवे. मला हा साक्षात्कार जास्त मोलाचा व खराखुरा वाटतो.

 नराचा नारायण झालेला पाहाण्याची मला इच्छा नाही. पण 'नरेच

केला हीन किती नर ' समोर दिसत असूनहि 'जंतु' 'जंतु' म्हणून आक्रोश करणेहि मला समंजसपणाचे वाटत नाही. माणसाला 'जंतु' किंवा 'नारायण' म्हणणे मला भ्रमाचे वाटते. हा भ्रम सोडला की माणसाला 'आत्मज्ञान' झाले! मग उपदेश करणाऱ्या महात्म्यांना आणि क्रांतिकारकांना आपण साधी माणसे असे स्पष्ट सांगू शकू की तुमची हिंसा–अहिंसेची, प्रगति–परागतीची, धर्म–अधर्मांची भांडणे थोडी बाजूला ठेवा. आम्ही माणसे आमच्या देहाची व हृदयाची घडण बदलण्याचा खटाटोप आता करणार नाहीं. मनुष्य म्हणून लाभलेल्या मनाच्या आधारानेच जी सामाजिक प्रगति निरनिराळ्या वंशांच्या व संस्कृतींच्या मानवसमूहांनी आजवर केली आहे तिचा वारसा घेऊ व तीच प्रगति चालू ठेवू.

माणसाचे मन 'प्राणी' म्हणून, 'व्यक्ती' म्हणून, अपरिवर्तनीय आहे तरी पण प्रगती झाली आहे व ती एक सामाजिक बेरीज आहे; असे म्हणणे कोणाला विसंवादी वाटेल. पण असेच घडले आहे की नाही एवढा प्रश्न आहे! मधमाशा समूह करून राहतात पण नुसती षटकोनी जाळीची पोळी सतत बांधीत रातातात. तेव्हा नुसता समूह करता येतो म्हणून नाही तर शिवाय एक आगळेच मन आहे म्हणून माणसाने समाजाचे व्यूह बदलले आहेत, हत्यारे बदलली आहेत, नीतीचे नियम व कलेची रंगरूपे बदलली आहेत; आणि या उन्नतीची चढण चढत असताना सामाजिक व्यवहारांत बदलणारा हा माणूस व्यक्ती म्हणून मात्र आपली ठराविक शिदोरीच घेऊन चालला आहे. हे सत्य जर माणसाला व त्याच्या उद्धारकर्त्यांना पटले तर फार बरे होईल?

परिवर्तनाची दिशा व मर्यादाहि कळून आल्या म्हणजे त्याची साधने व वेग यासंबंधीच्या मतभेदांना फारशी कूस उरणार नाही. देवदानवांना कल्पनेच्या विश्वात निर्माण करणारा मानव मग प्रत्यक्ष व्यवहाराच्या विश्वात स्वत:साठी सुखी व निकोप जीवन निर्माण करू शकेल. पण, प्राणिजीवनाच्या विकासक्रमातच आपला मानवकोटि म्हणून जन्म झाला आहे हे 'आत्मज्ञान' होण्यासाठी मानवाला केवढा अवधि लागला! सन १८५९ साली. म्हणजे मोठमोठ्या संस्कृतींचे उदयास्त झाल्यावर व चारपाच हजार वर्षे ज्ञानसाधना झाल्यावर, आपण प्राणिकोटीतले व विकासप्रवाहातले आहोत एवढे डार्विनला उमगले. सामाजिक प्रगती-मुळे, व कदाचित् आता भेडसावणाऱ्या सार्वत्रिक संहारभयामुळे, आपल्या 

मनाच्या घडणीचा व मर्यादांचा उगम होण्यास आता असा अवधि लागणार नाही. डार्विन, मार्क्स, फ्राइड, गांधीजी अशा आधुनिक विचारवतांना माणसाच्या जीवनाचा, मर्यादांचा व सामर्थ्याचा, जो साक्षात्कार झाला तो सामान्य माणसांच्या आकलनापर्यंत आता येऊन पोचला आहे. हे आकलन जेव्हा पुरतेपणी होईल तेव्हा परिवर्तनातील भ्रम व सत्य यांतील भेदाचा अर्थ मानवजातीला पुरतेपणी उमगू शकेल.

समाज चिंतन । १७ । **बळीराजाचे व्यथित मानस**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. म्यु.
अनुक्रम ............ दि: ........
क्रमांक ............ नों. दि: ..........

दिवाळीच्या सणाशी बळीराजाचा फार घनिष्ट संबंध आहे. बळीची कथा सर्वांना ठाऊक आहे ती अशी की तो बलाढ्य राजा होता, पण भोळा होता. वामनाने येऊन त्याला तीन पावले जमीन दान मागितली. त्याने ती देऊन टाकली. पण वामनाच्या एका पावलाने स्वर्ग व्यापला, दुसऱ्याने पृथ्वी व्यापली व तिसरा पाय बळीच्या डोक्यावर देऊन वामनाने बळीला पातळात दडपला. या कथेत एक तपशील असाही आहे की वामनाच्या 'तीन पावलांचा' खरा व्याप बळीच्या गुरूला माहीत होता, व बळीने ते अचाट दान देऊ नये म्हणून शुक्राचार्यांनी प्रयत्न केला; दानाचे उदक सोडण्याच्या झारीत आचार्य जाऊन बसले, पण वामनाने त्या झारीच्या नळीत काडी घातली व त्यांचा डोळा फोडला, वगैरे.

कथा म्हटली की तिच्या स्वरूपात सारखे बदल होत जातात; तपशील, भेसळ, चमत्कार यांची गल्लत होत पौराणिक कथा वाढत जातात. पण, या कथांच्या मागे कोठे तरी काही एक बीज असते. ते शोधून काढणे शक्य असते का ?

## पुराणकथातील अलौकिकत्व

तसे पाहिले तर बळीराजाच्या कथेचे मूळ शोधणे दुरापास्त, नव्हे अशक्यच आहे. पण एक गोष्ट अशी आढळते की अनेक देशोदेशींच्या पुराणकथांतून काही सारख्या घटना सापडतात. 'चौदा वर्षाचा वनवास' ही घटना घेऊ. रामचंद्रांनी असा वनवास भोगला, पांडवांनीही भोगला आणि ग्रीक व इतर पुराणांतील अवतारी पुरुषांनीही तसाच वनवास

भोगलेला आढळतो. सर्व देशांतील पुराणग्रंथांतून राम-सीता, पांडव–द्रौपदी अशासारखी अलौकिक माणसे आहेत. त्यांचा जन्म सामान्य माणसांप्रमाणे न होता अलौकिक तऱ्हेने झालेला आढळतो. सीता यज्ञभूमीत सापडलेली तर द्रौपदी यज्ञसंभवच आहे. या साऱ्यांचा मृत्यूही साधा नसतो. रामचंद्र समुद्रात प्रवेश करतात. सीता भूमीत नाहीशी होते; पांडव व द्रौपदी हिमालयात नाहीसे होतात. बळीराजाचे पातळात जाणे असेच अलौकिक आहे.

## अभिनिवेशांची भर

पुराणातल्या गोष्टी म्हणजे काहीतरी हरदासांनी बनविलेल्या भाकड-कथा आहेत अशी समजूत इंग्रजी अमलाच्या प्रारंभी आपल्याकडे झाली. ही समजूत आपल्या सुधारकांची. याच्या उलट सनातनी लोकांनी असे म्हणायला सुरुवात केली की, पुराणे म्हणजे भाकडकथा नाहीत तर तो प्रत्यक्ष घडलेला इतिहासच आहे. महाभारत व रामायण यांना महाकाव्ये असे रूढीने मानलेले आहे. इतर बाबतीत रूढीला शिरोधार्य मानणारे हे लोक या बाबतीत मात्र रूढीच्या विरुद्ध महाकाव्यांना इतिहास म्हणू लागले. सुधारक व सनातनी यांच्यातला संघर्ष बहुतेक साऱ्याच बाबतींत असा काही झाला की साधे सत्य शोधण्याचा प्रयत्न बाजूला पडला आणि नुसते अभिनिवेशांचे तुमुळ युद्ध होत राहिले. युरोपीय पंडितांनी याच युद्धात भाग घेतला व कोणी या तर कोणी उलट अशा अभिनिवेशाना भर दिली.

## कथांतील बीजे

रामायण महाभारत ही महाकाव्ये किंवा आणखी साऱ्या देवांच्या व असुरांच्या पुराणकथा यांच्यामागे मानवी प्रज्ञेचा काही तरी खोलवर रुजलेला आविष्कार आहे असे प्रथम मानायला हवे. दुसरे असेही मानणे इष्ट आहे की या कथांच्या मागे नुसती भाबडी कल्पनाशक्ती नसून काही तरी भक्कम पायावर उभे असे सत्य आहे. ते सत्य केवळ भारतीय पुराणकथांच्याच मागे नाही तर प्राचीन मानवांच्या देशोदेशींच्या कथांच्या मागेही आहे. एकच अतिप्राचीन, अलिखित व अत्यंत मूलगामी अशा सत्याचे बीज साऱ्या प्राचीन पुराणकथांच्या जगभर पसरलेल्या शाखोपशाखांच्या बुडाशी आहे. इलियड व रामायण यात साम्य दिसते. अशा साम्यांत उसनवारीचा प्रश्न नसून बीजाच्या एका विस्तारात दिसणारे हे शाखांचे साम्य आहे. देशोदेशींच्या पुराणकथांतून जे फरक दिसतात

ते या विस्ताराच्या वेळी झालेले संस्कार आहेत. पुराणांतल्या कथांना नाके मुरडणेही बरोबर नाही व त्यांना इतिहास मानणेही योग्य नाही. या कथांच्या मागे अतिप्राचीन मानवाच्या मनाचा ठाव घेण्यासाठी काही बीज गवसते काय ते पाहिले पाहिजे.

## बळी, यम, यज्ञपुरुष

बळीच्या कथेला बळीराजाच्या उदारपणाचा व भोळेपणाचा मुख्य आधार आहे. हा उदारपणा सर्वस्व गमविणाऱ्या धीरोदत्त पुरुषाचा उदारपणा आहे. ब्रीदासाठी, वचनपूर्तीसाठी किंवा एखादा पण जिंकण्यासाठी प्राण गमविण्यास तयार असणारे बळी, हरिश्चंद्र किंवा असेच पुराणकथेतील पुरुष पाहिले म्हणजे या साऱ्यांच्या मनोरचनेतील साम्य विलक्षण आहे हे सहज लक्षात येते. यांच्या कथा वेगवेगळ्या आहेत पण यांच्या सर्वांच्या मानसिक घडणीत जे साम्य आहे त्यावरून वाटू लागते की या साऱ्यांच्या मागे कोठे तरी बीजरूपाने वसणारी एक व्यक्ती आहे. मानवी मनाने कल्पिलेली व प्रत्यक्ष आचाराने घडविलेली अशी एक व्यक्ती आहे की ती आपला प्राण अर्पण करण्यास सहज पुढे होते. अशा व्यक्तीचा उल्लेख यमसूक्तात येतो. ती व्यक्ती म्हणजे स्वतः यमच. दिवाळीत बळीबरोबरच यमाचीही आपण आठवण करतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. यम हा मृत्यूचा देव मानला आहे व तो इतरांना मरण देतो ते खरे, पण मुळात असे आहे की यम हा आपल्या शरीराचे बलिदान करतो; मृत्यूला जवळ करतो तोच मग मृत्यचा देव बनतो.

यमाने व त्याच्याबरोबर त्याच्या बहिणीने ( यमीने ) स्वतःच्या प्राणांचे बलिदान केले असे यमसूक्तात म्हटलेले आहे. हे बलिदान कशासाठी ? तर ' जनानां संगमनाय ' म्हणजे मानवांनी एकजीव सहजीवन जगावे म्हणून. प्राणांचे बलिदान यमयमीने केले ते एखाद्या लढाईत केले नाही, तर एका यज्ञात केले; किंबहुना यज्ञ म्हणजे असे बलिदानच. या ठिकाणी संस्कृतीच्या प्राचीनतम स्तरांच्या अभ्यासाचा व शास्त्राचा प्रश्न येतो. वेदकाल किंवा प्राचीनतम ईजिप्शियन सम्राटांचा काल हा अगदी अलीकडचा व ' आधुनिक ' मानावा लागेल, इतक्या प्राचीन कालाकडे दृष्टी टाकली तरच मानवी मनाचे काही आविष्कार लक्षात येतील. अशा आविष्कारांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांपैकी अनेकांनी ही गोष्ट आता मान्य केली आहे की ' यज्ञ '

ही प्रथा फारच पुरातन आहे व तिला ‘ आधुनिक ’ रूप येत येत अश्वमेध किंवा अशीच इतर रूपे आली आहेत. पण पशूंच्या यज्ञात ज्याचे परिवर्तन झाले तो मूळ यज्ञ हा पुरुषयज्ञच होता. पुरुषाच्या जागी हळूहळू अश्व, अज इत्यादी पशू केवळ प्रतिनिधि म्हणून आले. यमसूक्तातील प्राणार्पणाचा उल्लेख किंवा भारतीय यज्ञवाङमयातील व कथांतील नरमेधाचे उल्लेख हे प्राचीनतस अशा पुरुषमेधाचे अवशेष आहेत. पुरुषमेध हाच मूळचा यज्ञ होय.

## यज्ञपुरुष हाच राजा

वेदातील ऋचा रचणारे आर्य सामर्थ्यवान व युद्धकलेत प्रवीण तर होतेच, पण शिवाय राजा, पुरोहित प्रभृती शासकांच्या अनुशासनाने संघटित झालेले होते. ज्याला आपण आज ज्ञात इतिहासकाल म्हणू त्या काळातील सर्वच जेते व पराजितही असेच सुसंघटित होते. ‘ अराजक ’ टोळ्यांनी राहणारे लोक रानावनातून कंदमुळे खात व पारध करीत जगत होते, पण त्यांनी राजकीय किंवा सांस्कृतिक इतिहास घडविलेला नाही. ‘ गणराज्ये ’ म्हणून नांदणारे लोकही अराजक पद्धतीने नांदत नव्हते, उलट त्यांचे जीवन शासक कुलांच्या अनुशासनाने बद्ध होते असे लिच्छवी व इतर गणांच्या प्रत्यक्ष वर्णनावरून दिसते. सारांश, प्राचीनतम काळात जे जे लोक शासक किंवा जेते म्हणून उदयाला आले ते ‘ राजा ’ या संस्थेला मानणारेच होते. ‘ राजा ’, त्याचे संरक्षक (म्हणजेच क्षत्रिय) आणि पुरोहित यांची प्रत्यक्ष निर्मिती ज्ञात अशा मानवी इतिहासाच्या फार पूर्वी झाली व ही सारी संस्था ज्या मानवी समूहांनी स्वीकारली व तिचा उपयोग केला तेच प्राचीन जगात नावारूपाला आले.

‘ राजा ’ ही संस्था इतकी प्राचीन आहे ही गोष्ट प्राचीन मानवसंस्कृतीच्या अभ्यासकांनी मान्य केलेली आहे ‘ यज्ञ ’ ही संस्था अतिप्राचीन आहे व ‘ राजा ’ ही तसाच आहे. मग या दोघांत संबंध असेल का ? या सहज सुचणाऱ्या प्रश्नाचे उत्तर अस्तिपक्षी द्यावे लागते. निदान पुष्कळ शास्त्रज्ञांचे असे मत आहे की, ‘ राजा ’ म्हणजे दुसरा कोणी नसून यज्ञाच्या बलिवेदीवर स्वतःचे प्राण अर्पण करणारा यज्ञपुरुषच होय. यज्ञाच्या बलिवेदीवर होणारे हे बलिदान कशासाठी होत होते ? आपल्यातीलच एका प्रिय व्यक्तीला बलिवेदीवर चढून मृत्यूला कवटाळण्याचे दिव्य करणे भाग

पडावे ही प्रथा मानवी मनाला पटली तरी कशी ? या बलिदानातून मानवाने साधले तरी काय ? या प्रश्नांची उत्तरे सोपी नाहीत. ही उत्तरे सापडणार कोठे ? वेद इत्यादि सारे ग्रंथ हे अगदी ‘ आधुनिक ’ ठरतील इतक्या पूर्वी, वीस–पंचवीस हजार वर्षांपूर्वी, कोठे तरी या पुरुषमेधाची प्रथा निघाली व ती साऱ्या मानवसमूहांनी स्वीकारली असे संभवते. तेव्हा या प्रथेच्या उगमाबद्दल वाङमय, शिलालेख वगैरे सापडणे अशक्यच. तथापि, या प्रथेची अवशेष रूपाने ओळख होऊ शकते. हे अवशेष अश्वमेधाच्या मंत्रात सापडतील, पुरुषसूक्त, यमसूक्त इत्यादि सूक्तांतून सापडतील, किंवा काही वन्य मानलेल्या खोंड प्रभृती टोळचांच्या नरमेधाच्या प्रत्यक्ष चालू प्रथेतून सापडतील. असे हे अवशेष अभ्यासून प्राचीन मानवसंस्कृतीच्या अभ्यासकांनी काही महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत. त्यांना प्रमाण मानून या यज्ञपुरुषाच्या मानसिक अवस्थेबद्दल प्रस्तुत लेखात काही विवेचन मी करीत आहे.

## इच्छामरणी राजा

‘ जनानां संगमनाय ’, (म्हणजे आजच्या भाषेत लोककल्याणासाठी), बलिवेदीवर स्वखुषीने प्राणार्पण करणारा पुरुष हा लोकांनी आपला ‘ राजा ’ मानला. ‘ राजा ’ म्हणजे केवळ शासक नव्हे. महाभारतात ‘ राजा ’ ह्या संस्थेची निर्मिती कशी झाली याबद्दल अशी कथा आहे, की मागे केव्हा तरी माणसे अगदी गुण्यागोविंदाने व दानतीने नांदत होती; माणसे माणुसकीने वागत होती. मग अचानक असे घडले की ती मात्स्यन्यायाने म्हणजे ‘ बळी तो कान पिळी ’ या तत्त्वानुसार वागू लागली; तेव्हा शेवटी सगळेजण कंटाळले व भयग्रस्त झाले. यातून तोड काढणे अशक्य होऊन बसले. त्या काळात एक मार्ग नेहमी खुला होता तो म्हणजे ब्रह्मदेवाला (किंवा विष्णूला) शरण जाण्याचा. लोक ब्रह्मदेवाकडे गले. या शिष्टमंडळात बलाढच ‘ मत्स्य ’ ही सामील झाले होते, किंबहुना तेच सर्वांच्या वतीने गेले असावेत ! कारण असे की, ब्रह्मदेवाने असा उपाय सुचविला की तुम्ही ‘ राजा ’ निर्माण करा. तो साऱ्यांचे रक्षण करील. पण या ‘ रक्षणात ’ अशी गोम होती की अगोदर साऱ्या लोकांचे शासक व प्रजा असे दोन भाग पाडून हीच व्यवस्था ‘ राजा ’ रक्षण करील असा राजधर्म ब्रह्मदेवाने घालून दिला. थोडक्यात म्हणजे मात्स्यन्यायालाच व्यवस्था बनविली. महाभारतातली ही कथा म्हणजे उघडच राजसत्तेच्या स्तुतीसाठी बनविलेली स्वार्थकल्पित कथा आहे.

यज्ञवेदीवर प्राण अर्पण करणारा राजा मात्र असा शासक नाही. तो बळी आहे. या राजाचा प्रथम अभिषेक होत असे व मग तो ठराविक काळ 'राज्य' करी. हा काळ एक वर्ष किंवा चार वर्षे असे असा पुरावा नरमेध करणाऱ्या टोळयांच्या प्रथा व इतर काही गोष्टींवरून मिळतो. हा ठराविक काळ संपला की त्या राजाचा बळी दिल्याने जमीन सुपीक होऊन धान्याची समृद्धी होते व राजा हाच पाऊसपाणी योग्य वेळी पाडतो अशा कल्पना प्राचीन मानवाने केल्या. या कल्पना म्हणजे आजचा कवी करतो तशा कल्पना नव्हत. त्यांचे स्वरूप कविकल्पनांपेक्षा वेगळे असून त्यांना 'धारणा' म्हणणे योग्य होईल. 'राष्ट्र' ही कल्पना आहे पण ती कविकल्पना नसून हजारोलाखो मानवांची धारणा आहे; जीवनाला तिचा आधार आहे व तिच्या रक्षणासाठी हजारो प्राण अर्पण करताना दिसत आहेत. मानवी जीवनाची, जीवनाला आधार असलेल्या कृषिकर्माची, या कर्माला आधार असलेल्या पावसाची व्यवस्था राजा करतो अशी ही प्राचीन धारणा आहे. हा राजा बळी जातो व बलि-दानाने ही धारणा करतो, या अर्थानेही तो समर्थ आहे, बळी आहे. राजाच्या कृपेवर सारे मानवी जीवनाचे चक्र, चालू आहे. या धारणेला अनुरूप असे चिन्ह राजचिन्ह म्हणून अस्तित्वात आले यात आश्चर्य नाही. 'चक्र' हे चिन्ह राजाचे प्रतीक आहे. तो चक्रवर्ती मानलेला आहे. या 'राजा'च्या धारणेतून, या राजाच्या बलियज्ञातून देवांची कल्पना निघाली व म्हणून देवांना 'यज्ञसंभव' असे आपल्याकडे मानलेले दिसते. विष्णू म्हणजे हा राजाच. 'राजा' या कल्पनेतून व प्रत्यक्ष बलियज्ञातून विष्णू, यम, इंद्र इत्यादि देवतांचा जन्म झाला. पुढे ह्या उत्पत्तीच्या सत्याला उफराटे रूप आले व राजा हा विष्णूचा अंश बनला. जे मूळ होते तेच अंशरुप बनले. या उलटापालटीच्या मागे मानवी मनाची विलक्षण सर्जनशीलता व अद्‌भुत अशी किमया आहे. तिच्याकडे न वळता आपण केवळ राजाच्या जीवनक्रमाकडे वळू.

## निष्काम व निष्क्रिय जीवनाचा शाप

अभिषेक झाल्यापासून यज्ञवेदीवर जाईपर्यंत राजा हा आपले जीवन कसे घालवीत असेल? अमुक एका मुहूर्तावर आपण इच्छामरण स्वीकारीत आहोत याची जाणीव मनात ठेवून जगणाऱ्या या मानवाला काय वाटत असेल? त्याच्या भोवताली कशा प्रकारची यंत्रणा सहजच रचली गेली असेल? याचा विचार करीत असताना काही

उपलब्ध ज्ञात गोष्टी डोळ्यासमोर ठळकपणे येतात. राजा अभिषिक्त झाल्यानंतर त्याच्या देहाचे संरक्षण ही लोकांची जबाबदारी होऊन बसते. त्यासाठी प्राचीन मानवांनी फार मोठी काळजी घेतलेली दिसते. राजाच्या भोवती प्रथम देहरक्षकांची सोय करण्यात आली, यांनाच क्षत्रिय म्हणता येईल. त्यांचे काम साऱ्या समाजाचे रक्षण करणे हे मागाहून झाले. पण मुळात ते राजाच्या देहाचे रक्षक होते. अश्वमेधाचा घोडा सोडल्यावर त्याचे रक्षण करणे व जरूर तेथे लढाया करीत जाणे हे काम क्षत्रियांचे होते हे आपण पाहतोच. हा अश्व वस्तुतः राजपुरुषच असतो आणि त्याचा मेध किंवा बळी हा खरे म्हणजे राजाचा बळीच असतो. फक्त, अश्वाने प्रतिनिधि म्हणून राजाचे स्थान घ्यावयाचे असते. ( हे प्रतिनिधित्वच पट्टराणी व अश्व यांच्या संभोगक्रियेचा विधी अश्वमेधात असतो यावरून स्पष्ट होते. )

राजाच्या देहाचे रक्षण होईल याची, तशीच त्याच्या योगक्षेमाची संपूर्ण जबाबदारी लोकांनी घेतली. राजा हा लोकांच्या प्रेमाचा व आदराचा एकमेव विषय बनला. उपलब्ध वस्तूंपैकी उत्तम वस्तू त्याला देणे हे समाजाने आपले ईप्सित मानले. त्याची दिनचर्या म्हणजे लोकांच्या प्रेमाचा स्वीकार करणे एवढीच होऊन बसली. क्षत्रिय त्याचे रक्षण करीत आणि पुरोहित त्याची दिनचर्या ठरवीत. आज कित्येक देवळांतून देवाच्या काकडआरतीपासून तो रात्री देवाने झोपण्यापर्यंत सर्व सोहाळे पुजारी करीत असतो. तो देव पाषाणाचा असतो व निमुटपणे सारे सोहळे भोगीत असतो. अगदी तीच अवस्था या जिवंत देवाची, म्हणजे राजाची होती. याला रक्षणकर्ते क्षत्रिय होते, उपचारांचे कर्मकांड करणारे पुरोहित होते व सेवेसाठी सेवेकरी पुरुष व स्त्रिया होत्या. खंडोबाचे वाघ्ये व मुरळ्या असतात, तसा प्रकार या 'राजाचा' होता. त्याच्या भोवताली स्त्रिया असत त्या कोठून जबरदस्तीने आणलेल्या नसत तर 'देवदासीं' प्रमाणे राजाला अर्पण केलेल्या असत.

राजाबरोबर त्याचे देहरक्षक आणि स्त्रिया मृत्यू पत्करीत असत ही गोष्ट ईजिप्तमधील राजांच्या थडग्यांतील प्रेतांवरून स्पष्ट दिसते. केरळमध्ये राजाबरोबर मरण्याची शपथ घेतलेले वीर असत. ही राजाबरोबरच्या सहगमनाची प्रथा सर्व संस्कृतींमधून रूढ दिसते.

हे सारे राज-जीवन बाकीच्या सामान्य जनांच्या जीवनापेक्षा अगदी 

वेगळे व कृत्रिम होते. ते एका अ–लौकिक व्यक्तीचे दिव्य व तेजोमय जीवन होते. सामान्यांच्या जीवनापासून ते अलग केलेले होते. सामान्य माणसे शेतीत राबत, पारध करीत, असुरक्षित राहत; पण आपल्या राजाला मात्र ते सुरक्षित ठेवीत व कष्टमय जीवनापासून अधांतरी ठेवीत. हे सारे प्रेमाने, आदराने व भक्तीने होई, सक्तीचा त्यात लेश नव्हता. पण असे हे जीवन राजाला, आणि त्याच्याच भोवती जगणाऱ्या क्षत्रिय–पुरोहितांना व सेवेकरी स्त्री–पुरुषांना, कसे वाटत असेल? ते जीवन निष्क्रिय, अधांतरी व एका वेगळ्याच जगात अलगद ठेवल्यासारखे होते. सामान्य माणसे किंवा प्रजा श्रम करीत, चिंतेत जगत होती. श्रमाचे फळ मिळावे या अभिलाषेने प्रत्येक क्रिया करीत होती. राजाचे जीवन श्रमशून्य होते. फलाची आशा ठेवण्याची त्याला गरज नव्हती, कारण आपोआप विनायास त्याला सारे काही अर्पण होत होते. आजचे पाषाणाचे देव जो निष्कामपणा पत्करतात तो निष्कामपणा त्या जिवंत राजाच्या मनोवृत्तीत साठवला जात होता.

## मृत्यूचे भय व त्यावर उपाय

राजाच्या जीवनाचे स्वरूप थोडक्यात असे आहे. निष्काम व श्रमशून्य, सर्व भोग मिळणारे व सर्वांचे प्रेम व आदर लाभणारे, हे जीवन एका अर्थी संपन्न होते, ते पुण्यवानाचे भाग्य होते. बलिदानाला तयार होऊन अभिषिक्त होणाऱ्या व्यक्तीला हे दिव्य जीवन प्राप्त झाले यात नवल नाही. त्या व्यक्तीचा त्याग दिपविणारा होता. प्राणाचे मोल देण्यास लागणारे असामान्य धैर्य व लोककल्याणाची पवित्र भावना त्या व्यक्तीने दाखविली होती.

पण अभिषेकापासून बलिदानापर्यंतचा राजाच्या जीवनातील विलक्षण काळ संपन्नतेने व कृतार्थतेने पूर्ण असला तरी त्यावर मृत्यूची गडद छाया सतत पसरलेली होती. एका मुहूर्तावर तो मृत्यूला जवळ करणार होता.

या मृत्यूचे राजाला भय वाटत असेल का? का बलिदानाला तयार झालेल्या त्याच्या मनाला मृत्यूचे भयच वाटेनासे झाले असेल? या बळीराजाच्या बरोबरच ज्याचे जीवन व मृत्यूही निगडित होते त्या क्षत्रियांच्या व सेवेकऱ्यांच्या मनात मृत्यूचे भय नसेल का? मानवी मनाचा थोडा विचार केला तर असे सहज कळून येईल की बळीराजा,

 त्याचे क्षत्रियगण व गणिका यांना मृत्यूचे हे सतत स्मरण ग्रासीत

असले पाहिजे. ह्या स्मरणात भय असले पाहिजे आणि या भयातून मुक्त होण्याचे उपाय चिंतणे हा त्यांच्या मनाचा एक निदिध्यास असला पाहिजे. हवे तेव्हा कोणालाही व कोणत्या तरी रोगाने किंवा अपघाताने उचलून नेणारा मृत्यू या दिव्यजीवन जगणाऱ्यांना भेडसावू शकत नव्हता. तो मृत्यू सामान्यांना येणारा असतो. अशा मृत्यूला साधा माणूस अनिच्छेने पत्करतो. याच्या उलट दिव्यजीवन जगणारांनी या सामान्य मृत्यूला जिंकून इच्छामरण पत्करलेले असते. पण इच्छामरण झाले तरी ते मरणच ! त्याचेही भय असणारच व त्यावर उपाय शोधण्याची धडपड मानवी मन करणारच !

या मृत्यूला सामोरी जाणारी माणसे सामान्यांपेक्षा वेगळ्या तऱ्हेने विचार करू लागली. सामान्यांच्या व्यथा त्यांना भेडसावीत नव्हत्या. त्यांचे जीवनच असे अधांतरी व निष्क्रिय होते की त्यांच्या मनाला व कल्पकतेला स्वतःचे एक वेगळे व विलक्षण विश्व निर्माण करण्याला भरपूर वेळ होता. असे एक विश्व निर्माण करून त्यात रमणे ही एकच क्रिया त्यांना उरली होती.

आपण ज्यांना धर्मकल्पना म्हणतो त्यांचा उदय या दिव्यजीवनात गुंतलेल्या पुरोहितांनी व क्षत्रियांनी केलेल्या चिंतनातून झाला. धर्मकल्पना किंवा दैवतसृष्टी निसर्गातील शक्तींविषयीच्या कुतूहलातून उत्पन्न झाली असे एक प्रमेय मानले गेले आहे. वैदिक देवता म्हणजे पर्जन्य, उषःकाल, पृथ्वी व अंतरिक्ष यांच्यावर रचलेली रूपके आहेत असे मानले जाते. हे सारे प्रमेय म्हणजे मानवी प्रज्ञेच्या जिज्ञासा, कुतूहल, भय, इत्यादि प्रत्यंगांचा आधार घेऊन रचलेली एक उपपत्ती आहे. पण तिचा कच्चेपणा यात आहे की कुतूहल किंवा भय या मानवी मनोविकारांतून धर्मकल्पनांचा प्राचीन व्यूह कसा उत्पन्न झाला ? तो व्यूह मानवसमाजाने कसा स्वीकारला ? त्या व्यूहावर आधारलेली 'राजा' ही संस्था कशी स्थिर झाली ? या सर्व घटनांची नीट संगती लागत नाही. धरणीकंपाचे भय वाटले असेल पण त्या भयाचे रूपांतर दैवतकल्पनेत कसे झाले ? अशा तऱ्हेच्या आक्षेपापुढे वरील उपपत्ती टिकत नाही व म्हणून प्रथम सुचविलेली, 'राजाच्या' दिव्यजीवनातून धर्मकल्पनांचा उदय झाल्याची, उपपत्ती जास्त स्वीकार्य वाटू लागते. आज कित्येक मानवशास्त्रज्ञांनी ही उपपत्ती वेगवेगळ्या संदर्भात पुढे मांडलेली आहे. ती ग्राह्य धरून एकदोनच नवीन गोष्टी मी येथे

सूचित करणार आहे.

## प्रवृत्तिमार्ग व संन्यासमार्ग

राजाचे व त्याच्या अनुचरांचे दिव्यजीवन हे एकीकडे अत्यंत भोगसमृद्ध होते व दुसरीकडे अगदी अधांतरी, एकलकोंडे व निर्णीत अशा मृत्यूच्या भयाने ग्रासलेले होते दिव्यजीवनाच्या भोग व भय या दोन प्रमुख धारणा होत्या; त्या एकमेकांत गुंतलेल्या, परस्पर आश्रयाने राहणाऱ्या व परस्परांना छेद देणाऱ्या होत्या. मृत्यूला पत्करले म्हणूनच भोग प्राप्त झालेले आणि भोगांना या मृत्यूच्या छायेने रितेपण आलेले या जीवनात क्षणोक्षणी जाणवत असले पाहिजे. हे जीवन जगणारी माणसे अ-लौकिकपणे जगत असली तरी मुळात तुमच्याआमच्यासारखी माणसेच होती. आणि कोणत्याही माणसाचे मन जर अशा भोग–भयाच्या कैचीत सापडले तर ते व्यथित व विकृत झाल्याशिवाय कसे राहील ? अशा मनाला भोग व भय यांची आंदोलने बसत असताना त्यात भव्य भ्रम, विलक्षण ईप्सा, व अलौकिक (म्हणजे सामान्यांना न सुचणारे) विचार उदय पावणारच.

बळीराजांची मने व त्यांना वेढून राहणारांची मने अशा व्यथांनी, भ्रमांनी, व ईप्सांनी भारलेली होती. म्हणूनच प्राचीनतम काळात उदयाला आलेली धर्मकल्पनांची सृष्टी ही उदात्त आणि बीभत्स, भोगलोलुप आणि आत्यंतिक विरागी, अशी द्वंद्वांनी परिपूर्ण दिसते. राजाचे सेवेकरी, विशेषतः स्त्रिया, या राजाबद्दलच्या अनन्यभक्तीने भारलेल्या होत्या. राजाच्या मनोरंजनासाठी त्यांनी निर्माण केलेले नृत्य गान, शिल्प, चित्र, नाटय इत्यादि सर्व ललित सर्जन हे भक्तिभावानेच ओथंबलेले होते. त्यात शृंगार व प्रणय होता तो गोपींच्या कृष्णप्रेमाप्रमाणे भक्तिशृंगार होता. या साऱ्या भावविश्वात दोन भिन्न मार्ग किंवा पंथ हळूहळू आकार घेताना दिसतात : एक प्रवृत्ति किंवा भोग मार्ग व दुसरा निवृत्ति किंवा संन्यास मार्ग. प्राप्त भोग भोगावयाचे पण ते सर्व भोगताना पुढचे इच्छामरण सतत मनात वागवून एक अलिप्तता राखावयाची–भोगजीवनही कर्तव्य म्हणून भोगावयाचे, हा एक मार्ग सामान्यांचे भोगजीवन हे केलेल्या श्रमाचे फळ म्हणून माणसाने भोगावयाचे असते. राजाने भोगावयाचे भोग श्रमाचे फळ नसतातच व ते भोगही 'क्षणभंगुर' वाटण्यासारखे मृत्यूच्या सन्मुखतेने निष्प्राण झालेले असतात. आता, ह्या प्रवृत्तिमार्गाने जगण्याऐवजी दुसरा व उलटा मार्ग म्हणजे निवृत्तीचा. स्वतः राजाला हा मार्ग अवलंबिणे अशक्यच होते. कारण राजा म्हणून

भोग भोगणे त्याला प्राप्त होते. पण त्याच्या परिसरात अशी माणसे होती की ज्यांना संन्यस्त वृत्तीने जगणे शक्य होते. राजाबरोबरच त्यांचे जीवन निगडित होते खरे, पण या राजपरिवारातील काहीजणांना भोगांचा उबग येऊन विरक्ती येणे साहजिक होते. दिव्यजीवन जगणाऱ्या या साऱ्याच माणसांना आपण सामान्यांहून वेगळे व सामर्थ्यशाली आहोत हे भासत होते. या सामर्थ्याची किंवा शक्तीची साधना करणे काहीजणांनी आपले इतिकर्तव्य मानले. मग या साधनेची अंगे-उपांगे विकसित होत गेली. एका अलौकिक पूर्णशक्तिशाली जीवनाची ओढ असणाऱ्या या साधकांनी तप, मंत्र, देहदंडाचे व नियमनाचे काही उपाय, इत्यादि गोष्टी शोधून काढल्या. या सर्व साधनेचे उद्दिष्ट शक्ती संपादणे हेच होते. भोगांच्या बाबतीत प्रवत्तिमार्गाची जशी वाढ होत गेली, भक्तीच्या बाबतीत जशा अनेकविध भक्तिसाधना वाढत गेल्या त्याप्रमाणे निवृत्तिमार्गामध्येही ध्यानधारणेपासून तो वज्रोलीसारख्या प्रक्रियांपर्यंत जास्तजास्त जटिल उपायांची वाढ होत गेली.

ही सारी गोष्ट घडली असावी हे प्रमेय आहे. त्याला पुरावा म्हणून काही मांडावयाचे तर भारतीय उपासना पंथ, भिन्नभिन्न साधना व संप्रदाय या सर्वांमध्ये या प्राचीनतम राजमानसव्यथेची अवशिष्ट रूपे पाहिली पाहिजेत. तशी ती दिसू शकतात, इतकेच नव्हे तर या आद्य स्त्रोताचा मागोवा घेतला (किंवा पार्श्वभूमी स्वीकारली) तर आपल्या धर्मकल्पनांचा व दर्शनांचा एक सुश्लिष्ट व्यूह पाहता येतो. अमुक एक पंथ अवैदिक आहे की वैदिक आहे, तमुक आचार हे भारतात चीन-तिबेटमधून आले की मुळात येथलेच आहेत, अशा प्रश्नांना मग आजचे महत्त्व राहात नाही. कारण प्राचीन मानवसमाजाने अंगिकारलेल्या काही बीजतत्त्वांतूनच सर्व देशांतील धर्मकल्पनांचा व उपासनांचा उदय झालेला आहे ही गोष्ट आपल्या शोधाला मार्गदर्शक ठरते. राजा म्हणजेच यज्ञपुरुष, आणि त्याचा परिवार यांच्या दिव्यजीवनाच्या विकसित रूपाने मानवी संस्कृतीचा जगव्यापी प्रपंच थाटला गेला आहे, असे जर मानले तर अनेक समस्यांची उकल होऊ शकेल.

बळीराजाच्या मानसातून संस्कृतींचा प्रपंच वाढत गेला, हे म्हणत असतानाच हे मन व्यथित होते असे मी म्हटले आहे. तसे शीर्षकच मी लेखाला दिले आहे. यात त्या बळिराजाचा अवमान होतो किंवा नंतरच्या संस्कृति-प्रपंचाचा अधिक्षेप होतो, असे मला वाटत 

नाही. सर्जनशील मन हे व्यथित असू शकते, नव्हे सर्जनक्रिया ही दु:खपूर्ण आहे हे निसर्गक्रमातच दिसते. बळीराजाची व्यथा ही त्याच्या महान त्यागाच्या क्रियेतून पुढे क्रमाने त्याला प्राप्त झालेली आहे. आजही काही सर्जनशील व्यक्तींच्या बाबतीत असा अनुभव येतो की त्यांची मने व्यथित असतात व अंतिम आत्मसमर्पणाला त्या व्यक्ती प्रवृत्त होतात. परंतु आत्मसमर्पण करणारी ही माणसे व्यथितमनस्क असूनही मानवजातीला आपल्या प्रतिभेचे अमोल आविष्कार देऊन जातात. संस्कृतीची वाटचाल ही मोठी सुखाची व सुरळीत झालेली नाही हे इतर मानवी व्यवहारांवरून दिसतेच. धर्म, तत्त्वज्ञान इत्यादि बाबतीत तोच न्याय लागू होतो. व्यथा, विकृति, भ्रम, विसंगति यांच्या असह्य भारांतूनच शेवटी मांगल्याचे दर्शन मानवाला घडावे असा शाप मानवजातीला आहे असे वाटावे अशी ही परिस्थिती आहे. पण ती डोळसपणे पाहिली तर मग यात काही आश्चर्य किंवा खंत वाटायला नको. मानवाची धर्मसाधना ही बळीराजाच्या व्यथित मानसातून निर्माण झाली, हे मानणे योग्य होईल. उलट एका सुवर्णयुगात कोणा एक ऋषीला धर्मतत्त्वाचे स्फुरण झाले, ही कथा इतकी भाबडी व साधी आहे की ती खरी मानणे भ्रामक ठरेल. धर्मतत्त्वांचे व इतरही संस्कृतीच्या उपांगांचे ज्ञान माणसाला झाले ते कष्टमय आणि व्यथित जीवनातून झाले हे मानणेच जास्त योग्य आहे व आपल्या पूर्वजांना योग्य आदर दाखविणारे आहे.*

***टीप :–** पुरुषमेधाला आद्य मेध का मानावा लागतो याचे विवेचन Raglan यांच्या ‘ Hero in Myth and History ’ या ग्रंथात आहे. तसेच ‘ राजा व त्याचा परिवार ’ याबद्दलची तपशीलवार माहिती Hocart च्या ‘ King and his Consellers ’ या ग्रंथात आहे. ‘ Primitive Society and Yajna ’ हा माझा लेख भांडारकर इन्स्टिटयूट आनाल्स, व्हा. XXXI सन १९५० मध्ये प्रसिद्ध झाला, तोही या संदर्भात पाहावा. तसेच नवभारत फेब्रु. १९५५ च्या अंकात ‘ यज्ञव्यवस्थेचे प्राचीन स्वरूप ’ हा माझा लेख पाहावा.

समाज चिंतन । १८ । **परंपरा हवी**

# नवी दृष्टीही हवी

---

कुटुंब, गाव, जात या गोष्टी म्हणजे परंपरा; तसे आतिथ्य, भूतदया, खऱ्याखोटयाची चाड हे परंपरेने अंगी येणारे गुण. ही परंपरा माणसांच्या अंगी मुरलेली असते; जिवंत असते. सवयीच्या घरात किंवा रस्त्यावर माणूस जणू काय डोळे मिटून चालत असतो, तसे परंपरेच्या वाटेने माणसे डोळे मिटून चालत असतात. सुखाचा प्रसंग साजरा कसा करावयाचा ? दुःख ओढवले तर त्याचा भार हलका कसा करावयाचा ? कोणी अपंग झाले तर त्याचा सांभाळ कोणी करावयाचा ? याबद्दलचे संकेत परंपरेने ठरविलेले असतात. एकटा माणूस जगणार कसा ? त्याच्या सुखदुःखात कोणी साथ द्यावी लागते. कोण साथ देईल, कोणी साथ द्यायला हवी, हे सारे परंपरेने ठरते. आणि परंपरा राखलेली असेल तर सर्वांचे व एकटयाचे जगणे डोळे मिटून सुरळीत चालू शकते.

मुंबईपुण्यातल्या शहरी राहणीतला माणूस गोव्यात, वऱ्हाडात किंवा मराठवाडयात गेला म्हणजे त्याला जाणवते की किती प्रेमाने व सहजतेने तिकडची माणसे आतिथ्याने वागतात. थोडी लाज वाटते की हे वागणे शहरीकरणामुळे आपल्याला जमत नाही. कोठेतरी परंपरेचा धागा तुटला आहे. कृत्रिमपणा आला आहे, नवे संकेत नाहीत, जुने टिकले नाहीत. परंपरेतला जिवंत भाग आपण गमावला याची त्याला खंत वाटते.

अशाच एका मनाच्या स्थितीत मला वाटले की परंपरेवर आघात करण्यास जुने सुधारक का सरसावले ? या सुधारकांना साहेबाच्या पुढेपुढे

करावयाचे नव्हते किंवा पाटलोण टाय घालून मिरवायचे नव्हते. आगरकरांचे वागणे व वेष अगदी साधा सनातनी असे. त्यांनी कशावर नेमका आघात केला? जिवंत परंपरेवर? का परंपरेतल्या मृत भागावर? थोडे बारकाईने पाहिले तर मग असे उमगते की त्यांनी मृत भागावरच शस्त्र धरले.

परंपरा म्हणजे आचाराच्या व विचारांच्या रुळलेल्या सवयी. यात काही चांगल्या, काही वाईट; काही जिवंत तर काही मेलेल्या अशा असावयाच्याच. परंपरेचा काही भाग तर मरून दगडासारखा झालेला असतो व त्याला परंपराही म्हणता येणार नाही. आजचा इजिप्तमधला समाज घ्या. नाईल नदीच्या काठी हजारो वर्षांपूर्वी पिरामिड बांधणारे सम्राट होऊन गेले. तेव्हाची काही समाजरचना होती. आज त्या पिऱ्यामिड काळच्या गोष्टींना परंपरा म्हणावयाचे का? केवळ आजचा इजिप्शियन समाज नाईलच्या काठी जगतो म्हणून त्या गोष्टींना त्यांची परंपरा म्हणता येणार नाही. ग्रीस, रोम, प्राचीन भारतातील आर्यपूर्वांचा प्रदेश व आर्यांचा प्रदेश या ठिकाणी प्राचीन संस्कृती नांदल्या. आज, त्या संस्कृतींचा अभिमान ठेवता येईल, पण त्या परंपरा नाहीत. त्या परंपरामधील काही विधी आज आपण करीत राहिलो, तरी आजच्या जगात त्या काळातल्या सवयी व संकेत जिवंत राहिले नाहीत. जेवढे खरे जिवंत असेल तेवढेच परंपरेचे खरे देणे किंवा ऋण मानले पाहिजे,—बाकीचा जड, पुजलेला इतिहास आहे. सुधारकांना या जडाला जिवंत मानावयाचे नव्हते, व ते बरोबरच होते.

## सुधारकांची शिकवण

परंपरेत काही भाग जिवंत असतो. काही संस्था, संकेत व सवयी तशा नसतात. सर्वांनाच तिचा आश्रय असतो व आधार असतो. सुधारकांच्या टीकाकारांनी त्यांच्यावर प्रहार करताना म्हटले की यांना जुने काही नको, नवे सारे हवे. हा प्रहार खोटा होता. आगरकरांनी सारे जुने नको असेही म्हटले नाही व नवे ते सारे चांगले असेही कधी म्हटले नाही. मग त्यांच्यावर हा खोटा प्रहार का झाला! त्याचे कारण असे की परंपरेतले जड नको असे त्यांनी म्हटले; नव्यातले जिवंत घ्या असे म्हटले. टीकाकारांनी हे समजून घेतले नाही किंवा समजूनही खोटी टीका केली.

 न्यायमूर्ति रानडे, लोकमान्य टिळक, आगरकर, ज्योतिबा फुले

यांच्या काळातला जुन्यानव्याचा वाद आता मागे पडला आहे, अंधुक झाला आहे, व आज त्याची आठवण तरी कशाला असे म्हणता येईल. ते खरेही आहे. पण तो वाद होऊन प्रश्न सुटला आहे का? प्रश्न नीट उमगला तरी आहे का? अशी भ्रांत पडते; की त्या वेळचा प्रश्न आजही आहे, न सुटलेला आहे व आपल्याला न उमगलेलाही आहे.

सुधारकांची खरी शिकवण मराठी सुशिक्षिताने अव्हेरली, समजूनच घेतली नाही असे म्हटले तरी चालेल. आज नव्या गरजा व नव्या समस्या आहेत; त्यांना तोंड देण्यासाठी आपण तात्कालिक व तात्पुरते उपाय योजतो व योजायला हवेतच. पण थोडे थांबून कांही प्रश्नाकडे पाहणे जरूर आहे.

सुधारकांनी विधवाविवाहाचा प्रश्न महत्त्वाचा मानला, जातपातीची विषमता नकोशी मानली, हे सारे त्यांनी का केले? याचे उत्तर खरे असे आहे की आमच्या परंपरेत प्रतिष्ठा कोणाला व का मिळावी याचे काही संकेत होते. ते सुधारकांना जड, मृत व म्हणून टाकाऊ वाटले. आतिथ्यासारखे सद्गुण त्यांना कधीच टाकाऊ वाटले नाहीत.

## प्रतिष्ठेची उतरंड

भारतीयच नव्हे तर साऱ्या प्राचीन संस्कृतींत प्रतिष्ठेची उतरंड रचलेली आढळते व ती काही जन्मसिद्ध गुणांवर आधारलेली असते. 'जन्मसिद्ध गुण' म्हणजे मुलाचे 'पाळण्यात दिसणारे पाय', 'रक्तातून' उतरलेले गुण! 'गवयाचे मूल तालसूरावरच रडते' या न्यायाने (किंवा खरे म्हणजे चूक श्रद्धेने) मानले गेलेले वंशपरंपरागत गुण! आपल्याकडे जातिव्यवस्थेच्या रूपाने ही उतरंड रचलेली आढळते. ग्रीसमध्ये गुलाम व त्यांचे मालक हा भेद मानला होता. असे भेद असलें तरी प्रतिष्ठेंची उतरंड सगळीकडे मानलेंली होतीच.

या उतरंडीच्याच जोडीला साऱ्या प्राचीन परंपरांमधून स्त्रीला बांधलेली आढळते. मनुस्मृतीत स्त्रीला स्वातंत्र्याला अपात्र ठरविले आहे. महाभारतातील तेजस्वी द्रौपदी द्यूतात पणाला लावली गेल्याची घटना आहे. स्त्रीने व्यभिचार केला तर भयंकर गोष्ट, पण पुरुषाने केला तर क्षम्य, किंबहुना रखेली ठेवणे ही पुरुषाच्या वैभवाची, प्रतिष्ठेची साक्षच. प्रतिष्ठेच्या बाबतीत जातीजातीमध्ये विषमता. तशीच स्त्रीपुरुषांमधील विषम संकेतांची ही परंपरा आहे;

या प्रतिष्ठेच्या उतरंडीला व पुरुषाच्या श्रेष्ठतेला धक्का लागला पाहिजे ही गोष्ट मुळात मनाशी धरून सुधारकांनी पावलें टाकली, व प्रतिष्ठेला व अहंकाराला धक्का लागल्यानेच प्रतिष्ठितांनी सुधारकां-विरुद्ध रान उठवले. कुटुंबातील पुरुषांच्या प्रतिष्ठेच्या संवयी होत्या, जातीजातींमध्ये विषमतेच्या भावना दृढ होत्या. साहजिकच, रान उठवणे सोपे होते. प्रतिष्ठेच्या प्रश्नाबाबत जास्त विचार करणे सोयीचे नव्हते.

## नव्या उद्योगसंस्कृतीचा आघात

प्रतिष्ठेच्या उतरंडीला सुधारकांनी धक्का दिला, पण रूढ संकेतांच्या जागी काय घ्यावे असे सांगितले? हा प्रश्न फार महत्वाचा आहे. प्रतिष्ठा मिळविणे किंवा त्यासाठी प्रयत्न करणे यात खरी कृतार्थता आहें हें मान्य करून सुधारकांनी म्हटले की प्रतिष्ठा ही कार्यावर आणि ज्ञाना-वर अवलंबून असावी. काम अधिक करील व अधिक कौशल्याने करील त्याला अधिक प्रतिष्ठा मिळावी. ज्ञान ज्याला जास्त त्याला जास्त प्रतिष्ठा समाजाने द्यावी.

काम आणि ज्ञान किंवा कौशल्य यांवर प्रतिष्ठेचे मोजमाप व्हावे हा नवा संकेत आहे. तो उद्योगप्रधान संस्कृतीत उदयास आला व प्रथम युरोपात नांदू लागला. राजेरजवाडे, धर्मगुरु व सरदार यांची प्रतिष्ठा काम किंवा ज्ञान यावर अवलंबून नव्हती. म्हणून या वर्गाच्या सत्तेवर व प्रतिष्ठेवर युरोपच्या नव्या संस्कृतीने आघात केला. फ्रेंच राज्यक्रांती रक्तानें न्हाऊन निघाली खरी, पण त्या क्रूरपणाच्या डोंबातही एका राक्षसी संकेताचा नाश झाला, ते इष्टच झाले. तो संकेत म्हणजे काम व ज्ञान यांशिवाय मिळणाऱ्या प्रतिष्ठेचा.

## प्रतिष्ठेचा संकेत तगून आहे

इंग्रजी राज्य हे दुर्दैव खरे, पण प्रतिष्ठेचा नवसंकेत आम्हाला या दुर्दैवी राजवटीत मिळाला व सुधारकांचा डोळसपणा व निःस्पृहपणा यात होता की समाजातले सारे प्रतिष्ठित दुखावतील हे माहित असून त्यांनी या नव्या संकेताची जाणीव समाजाला करून दिली.

आज हा नवा संकेत, प्रतिष्ठेचा खरा अर्थ, सर्वमान्य झाला आहे का? परिचयाचा तरी झाला आहे का? आज खेदाची गोष्ट अशी आहे की उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें व्हावी म्हणून आर्थिक योजनांची सांखळी होत आहे. पण, आमची मनें अजून प्रतिष्ठेच्या जुन्या संकेतातच गुरफट-लेली आहेत.

काम करून उदरनिर्वाह करावा लागणाऱ्या वर्गाला ' राष्ट्रीय संपत्तीचा उत्पादक ' म्हणून कागदोपत्री गौरविण्यास आम्ही शिकलो असलो, तरी आमच्या मनात अजून असेच आहे की शेतातली माती किंवा यंत्राचे तेल ज्यांच्या हाताला लागत नाही व ज्याचे कपडे पांढरे स्वच्छ राहतात तो प्रतिष्ठित. कमी काम करून चांगली कमाई करील तो मेहनती माणसापेक्षा जास्त हुषार व मोठा.

ज्ञानाच्या बाबतीतही प्रतिष्ठेची कसोटी अशीच घातुक आहे. प्रयोगशाळेत तासाचे तास गढून गेलेला रसायनशास्त्रज्ञ आम्हाला हवा, कारण आम्हाला उद्योगधंद्यात त्याची गरज आहे. पण, त्याला आम्ही जो मान देऊ त्यापेक्षा हजारपट मान आम्ही एखाद्याला ज्ञानी म्हणून देऊ ! त्याला साक्षात्काराने ज्ञानाचे सर्वस्वच लाभले आहे अशी आमची सहज श्रद्धा बसेल. आपल्या परंपरेत ज्ञानाला काही चाकोऱ्या होत्या. संस्कृत भाषा व परंपरागत शास्त्रे यावर प्रभुत्व असणे हे ज्ञानाचे लक्षण मानलेले होते. दुसरे ज्ञान म्हणजे आध्यात्मिक क्षेत्रातले व ते साक्षात्कारी मानलेले होते. या दोन प्रकारच्या ज्ञानाला प्रतिष्ठा होती व त्यांच्या जोडीला विश्वविद्यालयीन पदव्यांनी मोजले जाणारे ज्ञान प्रतिष्ठित झाले. याचा परिणाम असा झाला की आमच्या समाजात ज्ञानार्जनाची परंपरा असलेल्या कुटुंबांतील बुद्धिमान तरुण सतत या प्रतिष्ठित ज्ञानाकडे वळत गेले. उद्योगधंद्यांमध्ये व भौतिक शास्त्रांमध्ये प्राविण्य मिळविण्याकडे आमच्या ज्ञानजिज्ञासूंनी लक्ष कमी केले, कारण या प्राविण्यामुळे प्रतिष्ठा मिळणे कठीण होते.

## प्रतिष्ठेच्या कल्पनांची नवी दिशा

परंपरा जिवंत आहे तरच तिला परंपरा म्हणून टिकवायला हवी, ही गोष्ट प्रथमच मी मांडली व नंतर प्रतिष्ठेच्या परंपरेबाबत वरील विवेचन केले. प्रतिष्ठेची परंपरा ही जिवंत आहे खरी, परंतु ती उद्योगप्रधान भारताच्या नव्या संस्कृतीला अडथळ्यासारखी आहे, म्हणून ती बदलायला हवी असे मला वाटते. यंत्रयुग, यंत्राची गुलामगिरी, विज्ञानाची संहारक शक्ती व भय, या गोष्टींबद्दल आपल्या विचारात प्रतिकूल ग्रह जमा झालेले आहेत. ते ग्रह जुन्या संस्कारांमुळे आहेत व इंग्रजी राज्याच्या काळांत त्यांना खतपाणी मिळाले आहे. ते ग्रह दूर करून, उद्योगप्रधान संस्कृती आणणे हे सामान्य माणसाच्या जीवनात सुख आणण्याच्या दृष्टीने आवश्यक व निकडीचे आहे. 

त्यासाठी भांडवल, यंत्रें व इतर सामुग्री हवी, त्याप्रमाणे आमच्या प्रतिष्ठेच्या कल्पनांत आमूलाग्र फेरबदल हवा.

हीच नवी दिशा आगरकरांनी त्यांच्या काळाला अनुरूप त्या पद्धतीने दाखवून दिली. आज काळ बदलला असून उद्योगप्रधान भारताचे चित्र जास्त स्पष्ट व जवळचे झाले आहे. यावेळी ही नवी दिशा आपल्या विचारांना लावून घेणे जरूर आहे, निकडीचे आहे.

या नव्या दिशेने समाज गेला तर आज शहरी माणसांत तुटकपणा, बेपर्वाई, आतिथ्याचा अभाव हे दोष दिसतात ते वाढत जातील त्यांचे काय? याचे उत्तर एवढेच की आपण एवढ्या बाबतीत परंपरेची जपणूक केली तर हे दोष टाळण्याची शक्यता आहेच. उद्योगप्रधान संस्कृती म्हणजे काही निर्दोष स्वर्गीय संस्कृती नाही. तिच्यात उत्पन्न होणारे दोष पुन्हा प्रयत्नाने टाळावे लागतील किंवा नव्या संकेतांनी त्यांचे निराकरण करावे लागेल.

उद्योगप्रधान किंवा यंत्रयुगीन संस्कृतीमध्ये तिच्या जन्मापासून एक नवा पण भयंकर संकेत रूढ झाला, हे मात्र विसरून चालणार नाही. हा संकेत असा की माणसाची प्रतिष्ठा त्याच्याजवळील धनाने मोजावयाची, व त्याच्या खर्चाच्या मानाने मोजावयाची. या धन-प्रतिष्ठेला अनिर्बंध लोभ, चढाओढ, झटपट श्रीमंतीच्या मार्गाचे मोह असे स्वरूप आज आले आहे. भ्रष्टाचार, मग तो व्यापाऱ्याचा असो, पुढाऱ्याचा असो, की सामान्य नागरिकाचा असो, ही एक भीषण समस्या होऊ पहात आहे. 'लोकशाही' व 'समाजवाद' ही ध्येये या धनप्रतिष्ठेला आळा घालणारी आहेत, पण ती भारतात आज प्रत्यक्ष प्रभावी नाहीत. म्हणून उद्योगप्रधान संस्कृतीचे स्वागत व स्वीकार करताना जुन्या प्रतिष्ठेच्या कल्पनांचा त्याग व धनप्रतिष्ठेच्या नव्या दोषांचाही त्याग आपल्याला करावा लागेल. काम, कौशल्य, ज्ञान व एकंदर दानत व माणुसकी यावर प्रत्येकाला प्रतिष्ठा लाभेल, असे आपले सामाजिक जीवन व परस्परांशी वर्तन ठेवले पाहिजे. ही गोष्ट सोपी नाही पण ती कसोशीने अंमलात आणणे मात्र आपल्याला शक्य आहे.

आज स्वतंत्र गोमंतकात नव्या उद्योगप्रधान रचनेचा अवघड काळ आला आहे. जितका अवघड तितकाच सामान्य माणसाच्या सुखाला पोषक ठरू शकेल असा हा काळ आहे. या रचनेचे स्वागत करावयाला हवे आणि जुन्या प्रतिष्ठांचे संकेत बाजूला केले पाहिजेत. नवे संकेत आज

उद्योगप्रधानतेत पुढे गेलेल्या महाराष्ट्राच्या विभागांतही रूढ झालेले नाहीत व त्यामुळे तेथील शहरी जीवनाला अवकळा येऊ पहात आहे. या बाबतीत नव्याने पाऊल टाकणारा गोमंतक नवे संकेत निर्माण करण्यास समर्थ ठरला, तर ते साऱ्या महाराष्ट्राला अभिमानाचे ठरेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ...६९७३८... वि: गोमंत
क्रमांक ...१०८... नोंद दि: २९/७/८०

 

# आपली परंपरा : भारतीय की वैदिक ?

हिमालयाच्या सर्वोच्च शिखरावर तेनसिंगने भारताचा राष्ट्रध्वज रोविला. साऱ्या जगाने विस्मयाने त्याकडे पाहिले, आपण भारतीयांनी अपूर्व अभिमानाने त्या ध्वजाला वंदन केले. त्याच ध्वजाच्या रक्षणासाठी हसत प्राण अर्पण करणाऱ्या सत्याग्रह्यांकडे पाहून जग विस्मित झाले होते. कोटयावधी भारतीयांच्या हृदयातील राष्ट्राभिमान आज ज्वालेसारखा दाहक बनू पहात आहे. आसेतुहिमाचल पसरलेल्या भरतखंडातील एवढ्या प्रचंड लोकसमूहामध्ये एकाच वेळी स्फुरणारी व त्याला एकजीव सांधणारी ही **भारतीयत्वाची जाणीव** एखाद्या विलक्षण शक्तीसारखी आहे. भारतीय जनतेला आपले भवितव्य जर उज्वल आणि मानवजातीला कल्याणकारक असे घडवावयाचे असेल तर श्रम व बुद्धी यांच्या बरोबरच या विलक्षण शक्तीचीही जोपासना केली पाहिजे, भारतीयत्वाची ही भावना दृढ झाली पाहिजे व डोळसहि झाली पाहिजे.

भारतीयत्वाची जाणीव डोळस व्हावयाची असेल तर जातिभेद, धर्मभेद आणि पंथभेद, त्याचप्रमाणे भाषाभेद व संस्कृतिभेद यांच्यामुळे भारतीय **एकतेत सामावलेल्या विविधतेचा** अर्थ प्रत्येक भारतीयाला समजला व उमजला पाहिजे. मग, या विविधतेतूनच निर्माण होणाऱ्या समृद्ध एकतेचा समन्वय साधणे आपल्याला सहज शक्य होईल; आज दुस्तर वाटणारे भेदच भिन्नभिन्न लोकसमूहांची वैशिष्टये म्हणून परस्परांना आदरणीय वाटू लागतील. हे सारे व्यर्थ मनोराज्य आहे असे म्हणणारे लोक आज आहेत, इतकेच नव्हे तर त्यांच्या म्हणण्यात 'व्यावहारिक

वास्तववाद ' आहे असे वाटण्यासारख्या घटनाही भारतात घडत आहेत, हे खरे. परंतु, तरीहि एक गोष्ट मानावीच लागेल की भारतीय एकत्वाची जाणीव दृढतर होत आहे व यावरच आपले सर्वांचे भवितव्य अवलंबून आहे.

भारतीयत्वाच्या जाणीवेला दृढ व डोळस करण्यासाठी **वर्तमानकालीन** अनेक प्रश्नांची योग्य ती उकल केली पाहिजे. असे प्रश्न तातडीचेही असणारच, कारण त्यांत अनेकांचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे ते प्रश्न लवकर सुटले नाहीत तर त्यातून कटुता व दाहकताही निर्माण होऊ शकते. **भारतीयत्वाच्या परंपरेसंबंधीचे** प्रश्न त्या मानाने कमी निकडीचे आहेत. भारतीयांच्या प्राचीन इतिहासाचे, तत्त्वज्ञानाचे व सांस्कृतिक विकासाचे प्रश्न अशा रीतीने सापेक्षतः कमी निकडीचे आहेत हे खरे, पण ते आजच्या व्यवहाराच्या दृष्टीने गैरलागू किंवा केवळ शास्त्रीय काथ्याकूटासारखे आहेत असे मात्र नाही. काही उदाहरणांवरून ही गोष्ट स्पष्ट होण्यासारखी आहे. आज हिंदी ही भारतीय संघराज्याची भाषा आणि मराठी, तामिळ इत्यादि देशभाषा यांच्यात व्यवहारक्षेत्रांची न्याय्य विभागणी होणे निकडीचे आहे; परंतु अशा योग्य विभागणीला सर्व बाजूंनी अडथळे होत आहेत व त्यात उत्तरभारतीय आणि दक्षिणभारतीय किंवा ' आर्य ' आणि ' द्रविड ' अशा भेदांमुळे कटुता निर्माण होत आहे. दुसरीकडे अस्पृश्यतेसारख्या कठीण प्रश्नाकडे पाहिले तर असे दिसते की वैदिक परंपरा व बौद्धादि अवैदिक परपंरा यांच्या संबंधांचा ( किंवा संघर्षांचा ! ) ऐतिहासिक वाटणारा प्रश्न वर्तमानकाळातही डोकावत आहे, आणि त्या कठीण प्रश्नाला गुंतागुंतीचा बनवीत आहे.

तेव्हा भारतीयत्वाच्या प्राचीन परंपरेचा प्रश्न व्यवहारनिरपेक्ष शास्त्राभ्यासासाठी नाही. भारतीयत्वाच्या जाणीवेला निकोप बनविण्यासाठी तो शक्य तेवढ्या नेटाने व लवकर सोडविला जाणे आवश्यक आहे. या दृष्टीने आपल्या प्राचीन परंपरेसंबंधी एकदोन प्रश्नांची चर्चा मी प्रस्तुत लेखांत केली आहे. वैदिक मंत्राच्या संहिताकरणाचा काळ, वैदिक आर्यांचे वसतिस्थान व परिभ्रमण, त्यांची समाजरचना आणि आर्यपूर्व भारत-वासियांची संस्कृती यासंबंधी आपल्याकडे पूर्वीच महत्त्वाचे संशोधन झाले आहे, व ' ओरायन ' व ' आर्टिक होम ऑफ दि वेदाज् ' यांसारखे ग्रंथ महाराष्ट्रात निर्माण झाले आहेत. अव्वल इंग्रजीच्या काळापासून सन १९२० पर्यंत, या क्षेत्रात झालेल्या प्रचंड कामगिरीचा

अभिमान व आदर आज प्रत्येकाला वाटत आहे, आणि महाराष्ट्रातील सुशिक्षितांच्या मनामध्ये त्या काळातील संशोधनाचे संस्कार फार खोलवर गेलेले व दृढ झालेले आहेत. त्या काळातील संशोधकांचे हे ऋण मान्य करून व आजच्या रूढ संस्कारांबद्दल आदर बाळगून कोठलीही चर्चा झाली पाहिजे हे खरे. परंतु, गेल्या वीस वर्षांत, या सर्व प्रश्नांशी निगडित असलेल्या शास्त्राभ्यासांत जी नवीन प्रमेये मांडली गेली आहेत त्यांची ओळखही आपण करून घेतली पाहिजे. आपल्या रूढ कल्पनांचा व्यूह विस्कळित करणारी अशी नवी प्रमेये सहज स्वीकारणे योग्य नाही, परंतु त्यांचा निराग्रही बुद्धीने विचार केलाच पाहिजे. या भूमिकेवरून पुढील चर्चा मी करीत आहे.

## वैदिक संकृस्तीचा विकास !

प्रथम एक प्रश्न आपल्यापुढे येतो तो असा: **भारतीय संस्कृतीचा** जन्म, वृद्धी, प्रौढावस्था, वर्तमान अवस्था व भवितव्य या सर्व अवस्थांतरांना मिळून जर 'विकास' हे नाव दिले तर या विकासक्रमाला "**वैदिक संस्कृतीचा विकास**" म्हणणे युक्त होईल काय? विकासाच्या या क्रमामध्ये केवळ 'वैदिक' या विशेषणाने ज्याचे स्वरूप स्पष्ट होईल असे एखादे प्राणतत्त्व सांगता येईल काय?"

या बाबतीत रूढ कल्पनांशी विसंवादी असे काही मुद्दे मी पुढे मांडणार आहे. तसे करण्याच्या आधी विसंवाद किंवा वादहि नसलेली एक गोष्ट नमूद करणे योग्य होईल. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी "वैदिक संस्कृतीचा विकास" या आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत एके ठिकाणी म्हटले आहे, "भारतीय संस्कृती म्हणजे मुख्यत: हिंदु संस्कृती होय. भारतांतील मुसलमान, ख्रिश्चन, पारशी इत्यादि जमातीसुद्धा हिंदी संस्कृतीच्या परिघात अंतर्भूत होतात. कार्ल मार्क्सने सुद्धा आपल्यां भारतवर्षावरील निबंधात याच विधानास पुष्टी दिली आहे." (पान १३). तर्कतीर्थांचे हे म्हणणे मान्य होण्यासारखेच आहे. फक्त नागर जीवनात इस्लामी आक्रमणाचा वरपांगी परिणाम येथे झाला. हे खरे असले तरी शेवटी ग्रामीण जीवनांत व एकंदर समाजाच्या भौतिक आणि वैचारिक स्थितीत या आक्रमणाचा टिकाऊ परिणाम झालेला नाही. इस्लामी आक्रमण होत गेले तरी "शेवटी भारतीय संस्कृती आपले सत्व व वैशिष्टच टिकवू शकली" [१] ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. अर्थात ब्रिटिश राजवटी-

१ किता, २६४

मुळे येथे झालेले स्थित्यंतर हे मात्र अगदी नव्या तऱ्हेचे व मूलगामी स्वरूपाचे आहे ही गोष्ट खुद्द तर्कतीर्थांनी मांडलीच आहे. ते म्हणतात " संपूर्ण बदललेला जीवनक्रम आणि मानसिक मूल्यांतील क्रांती या दोन्ही गोष्टी सामाजिक सर्वांगीण स्थित्यंतरास समुच्चयाने कारणीभूत होतात. इंग्रजी राज्याने या दोन्ही गोष्टी केल्या "[1] या क्रांतीमुळेच व्यक्ति-स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्ष व सर्वधर्मसहिष्णु असे भारतीय लोकशाही राज्य व नागरिक धर्मावर आधारलेला राष्ट्राभिमान अशा नव्या प्रेरणा आज आपल्या हृदयांत दृढमूल झाल्या आहेत. भारतीय संस्कृतीला प्रधानत: हिंदु संस्कृति म्हणताना या घटनांची व बदलांची दखल ठेवली म्हणजे हे समीकरण रास्तच आहे असे म्हणता येईल.

वादाचा प्रश्न मग कोणता ? तो मांडतानाही मी तर्कतीर्थांचेच पुढील विधान सादर करतो. ते म्हणतात, " हिंदु संस्कृती ही वैदिक संस्कृतीचेच विस्तार पावलेले स्वरूप होय......शिव व विष्णु, राम व कृष्ण यांचे देवत्व वैदिक महिम्याने भरलेले आहे. या हिंदूंचा जीवनविषयक दृष्टिकोण वेदांताच्या अध्यात्मवादाने संस्कारिलेला आहे. जैन व बौद्ध धर्मसुद्धा वैदिक संस्कृतीचेच विस्तार होत. हे विस्तार मुळापासून फारकत झाल्याची कल्पना बाळगतात; म्हणूनच त्यास सामान्यजन वैदिक म्हणत नाहीत. "[2]

**भारतीय संस्कृति ही प्रधानत: हिंदु संस्कृति आहे व हिंदुसंस्कृति ही वैदिक संस्कृतीचा विस्तार आहे** असा तर्कतीर्थांचा व्यापक सिद्धान्त आहे. पहिले विधान बरोबर मानता आले तरी अशा स्वरूपात हा सिद्धान्त सदोष आहे; बौद्धादि अवैदिकांचा स्वत:च्या अवैदिकत्वाबद्दलचा ' दुराग्रह ' व ' सामान्य जनांचे अज्ञान ' या गोष्टींकडे बोट दाखवून हा सिद्धान्त ग्राह्य मानावा हा तर्कतीर्थांचा युक्तिवाद बरोबर नाही, असे नम्रपणे मला सुचवावयाचे आहे. हा केवळ बौद्ध जैनादि अवैदिकांचा प्रश्न नाही, तर विष्णुलक्ष्मी, कृष्णराधा, शिवपार्वती इत्यादि देवता व मूर्तिपूजा, जातिव्यवस्था, कर्मसिद्धान्त, ग्रामसंस्था, ब्राह्मी लिपी, षोडश-गणनपद्धती इत्यादि अनेकविध बाबींचा प्रश्न आहे; इतकेच नव्हे तर निवृत्तिमार्गाला अधिष्ठानभूत असलेल्या ' संन्यास ' या तत्वाचा व उपासना-पद्धतीचाही नव्या पुराव्यांनिशी विचार होणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृती ही वैदिक संस्कृतीचा विस्तार आहे. हा आपला सिद्धांत

१ कित्ता, २२५
२ कित्ता, १३.

विद्वानांनाही सर्वमान्य नाही ही गोष्ट स्वत: तर्कतीर्थांनीच मांडली आहे. ते म्हणतात, " गेल्या शतकांतील भारतीय संस्कृतीचा व हिंदु धर्माचा अभ्यास करणाऱ्या आधुनिक पंडितांनी हिंदु संस्कृती ही वैदिक संस्कृतीचा विकास व विस्तार होय ही कल्पना अमान्य केली आहे. विद्यमान हिंदु संस्कृती वैदिक व अवैदिक, आर्य व अनार्य लोकांच्या विविध संस्कृतींच्या संमिश्रणाने बनली आहे, अशा निर्णयास हे पंडित पोचले आहेत." आपल्या सिद्धान्ताविरुद्ध 'गेल्या शतकांतील आधुनिक पंडितां'चा अभिप्राय नमूद करून त्याला तर्कतीर्थांनी असे उत्तर दिले आहे : " आम्हांस या ठिकाणी एवढेंच सिद्ध करावयाचे आहे की वेदपूर्वकालीन संस्कृतीचे स्वरूप काय होते, हे समजण्यास आवश्यक असलेल्या योग्य पुराव्याची योग्य तपासणी अजून झाली नाही, तोपर्यंत असे म्हणावे लागते की आजच्या हिंदु संस्कृतीचा ज्ञात उगम वेद—राशि होय. वैदिक संस्कृतीच्याच विकासक्रमांत वेदपूर्व अवैदिक संस्कृती संगम पावली. व त्यांतून इतिहासपुराणांची संस्कृती वैदिक यज्ञसंस्थेंच्या साहाय्याने उद्भव पावली.... भेदक व विघटक वैचित्र्यापेक्षां संघटक व एकसूत्रित करणारे बीज मूळ वैदिक संस्कृती होय. कारण हिंदु संस्कृतीचा ध्येयवाद व उच्चतम मूल्ये वैदिक संस्कृतीच्या बीजांतून आविर्भूत झाली आहेत हेच मुख्यत: येथे सिद्ध करावयाचे आहे; " (पृष्ठ १४)

तर्कतीर्थांनी सिद्ध करावयासाठी जे प्रमेय हाती घेतले आहे ते आधुनिक शास्त्रीय पुरावे जमेस घेता सिद्ध करता येण्यासारखे नाही; उलटपक्षी या पुराव्याच्या आधाराने असे सूचित होते की प्राचीनतम भारतीय संस्कृतीचे बीज **एकटच्या वैदिक आर्यांच्या** संस्कृतींत सापडत नसून **वैदिक आर्य व आर्यपूर्व भारतीय**, (विशेषत: सिंधु–संस्कृतीचे निर्माते असणारे भारतीय) यांच्या **संस्कृतिसंगमात** आढळणार आहे. या संगमातही आर्यपूर्व भारतीयांच्या संस्कृतीचा वाटा फार मोठा व निर्णायक आहे. या दृष्टीने भारतीय (किंवा पर्यायाने हिंदु) संस्कृतीला वैदिक आर्यांच्या संस्कृति–बीजाचा विस्तार ठरविणे अयोग्य आहे. गेल्या चार हजार वर्षांचा भारतीय संस्कृतीचा विकासक्रम हा " वैदिक संस्कृतीचा विकास " नसून तो मुळातच एका समृद्ध अशा अवैदिक–वैदिक घटकांच्या संगमनातून जन्म पावलेल्या 'भारतीय' अशा संस्कृति-बीजाचा वृद्धिप्रपंच आहे.

## वैदिक आर्यांचा भारत–प्रवेश



वरील प्रमेयाचा विचार करताना प्रथम वैदिक आर्यांबद्दलच्या काही

रूढ कल्पनांचा परामर्ष घेणे जरूर आहे. आपल्या धार्मिक कल्पनाव्यूहात संन्यास किंवा निवृत्ती यांना फार मोठे स्थान आहे व लोकाचारांमध्ये जातिव्यवस्था, स्पृश्यास्पृश्यता, नवससायास, दैवतपूजा इत्यादींचे प्राबल्य आहे. मिशनऱ्यांनी व काही पाश्चात्य पंडितांनीही, या गोष्टींकडे बोट दाखवून एकंदर हिंदु संस्कृतीची चेष्टा केली व तिला तोंड देण्यासाठी आपल्या भारतीय पंडितांनी संरक्षक स्वरूपाचे अनेक युक्तिवाद पुढे केले. त्यात एक असा होता की मुळचा हिंदु धर्म हा वैदिक आर्यांचा शुद्ध, निरागस, निसर्गदेवता–पूजनाचा धर्म होता व या आर्यांचे सामाजिक जीवनही निरागस व आनंदमय होते. आर्यांच्या समाजरचनेत जन्मसिद्ध जातिव्यवस्था, राजशासनपद्धती, भाबडी मूर्तिपूजा, नरमेधासारखे विधी व जादूटोणा, इत्यादी काही वाईट अभद्र चाली नव्हत्या. परंतु आर्य हे जात्याच सहिष्णु व उदार स्वभावाचे असल्याने त्यांनी आर्यपूर्व भारतीय रानटी लोकांची दैवते, पूजा वगैरे गोष्टी स्वीकारल्या व या जित रानटी लोकांना नीच जातींच्या संयमात गोवून सुसंस्कृत होण्याच्या मार्गावर आणून ठेवले.

अव्वल इंग्रजीनंतरच्या काळात वरील युक्तिवादाचा अवलंब करून भारतीय सुशिक्षितांनी एकीकडे परकीयांच्या उपहासाला तोंड दिले, पण दुसरीकडे भारतीय समाजात स्वतःला जे वरिष्ठ-वर्णीय परंपरागत स्थान होते ते जणू काही ऐतिहासिक शास्त्रीय पुराव्यांनीच दृढतर केले. प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ सुनीतिकुमार चटर्जी म्हणतात त्याप्रमाणे, आर्यांच्या भारत-विजयाचा नवा सिद्धांत सुशिक्षितांना एकदम ग्राह्य वाटला कारण, " हे सुशिक्षित लोक म्हणजे हिंदु समाजातील उच्चवर्णीय होत. त्यांचा स्वाभिमान या नव्या प्रमेयाने दुखावला जाण्याचे कारणच नव्हते. काळ्या कातडीच्या अनार्य बर्बरांच्या देशात खऱ्या सुसंस्कृतीचा प्रकाश आणणारे आर्य विजेते मध्य आशियातून आले व त्या उच्च संस्कृतीच्या गौरवर्णीय आर्यांचे आपण खरे वंशज आहोत ही नवीच अस्मिता त्यांना लाभली. शिवाय इंडोयुरोपियन म्हणजे आर्यवंशीयच भाषा बोलणाऱ्या जेत्या युरोपियनांचे आपण सोयरे आहोत हे अभिमानाचे नाते लाभले. " (इंडोआर्यन अ‍ॅन्ड हिंदी, पृष्ठ ३०)

वैदिक आर्यांच्या संस्कृतीबद्दलच्या या प्राथमिक गौरवपूर्व कल्पनांची अलीकडे एक प्रतिक्रिया झालेली दिसते. विशेषतः दक्षिण भारतीय सुशिक्षितांनी आर्यविजयाच्या व आर्यपूर्व भारतीयांच्या बर्बरतेच्या कल्पनेला खंडून काढण्यासाठी द्राविड संस्कृतीच्या गौरवाचे प्रमेय जोराने 

पुढे मांडले आहे. सिंधु संस्कृतीचे निर्माते द्रविडजन होते, इतकेच नव्हे तर त्यांच्या नागर प्रौढ संस्कृतीवर आघात करणारे आर्य हे केवळ टोळ्यांनी भटकणारे, गोपालन व लुटमार यावर उपजिविका करणारे, रानटी लोक होते, असे या विरुद्ध पक्षाच्या विद्वानांनी अभिनिवेशाने प्रतिपादन केलेले आढळते.

वस्तुतः आर्यजन हे रानटी टोळ्यांनी हिंडणारे गोपाल नव्हते. किंवा आर्यपूर्वजनही रानटी नव्हते. आर्यपूर्व भारतात जी नागर व प्रगल्भ संस्कृती नांदत होती तिच्या परिसराबाहेर अगदी पाषाणयुगकालातच भारतवासी झालेले ऑस्ट्रीक व निग्रिटो वंशांचे लोक होते व ते वन्यावस्थेत होते हे खरे. आजमितीलाही मुंबईसारख्या अगदी आधुनिक महानगरीपासून शंभर मैलावरच वारली लोकांचा वन्यावस्थेत जीवनक्रम चालू आहेच. पण ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थित्यंतरांच्या दृष्टीने पाहता या बर्बरावस्थेतल्या जनसमूहांचा प्रश्न आज किंवा प्राचीन काळीही जमेस घ्यावयाचा नसतो. आर्यजन व आर्यपूर्व संस्कृतीचे निर्माते सिंधु-जन यांचाच प्रश्न समोर ठेवला पाहिजे.

या दोन लोकसमुहांच्या संस्कृतीमध्यें भेद असला तरी उच्चनीचतेच्या **दृष्टीने फारसे अंतर** नव्हते ही गोष्ट आपण ठळकपणे लक्षात घ्यावयास हवी. ह्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ काही बाबी मांडणे जरूर आहे.

## भारत-प्रवेशापूर्वीचे आर्यजन

आर्यांच्या भारतप्रवेशाचा काळ ठरविण्यास साधनीभूत झालेले व आर्यांच्या भारत-प्रवेशापूर्वीच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे विटांवरील लेख बोघाझकोई (Boghazkoi) या आशियामायनरमधील जागी सन १९०७ मध्ये सापडले. या लेखांची भाषा आकलन करण्यासाठी अनेक युरोपियन पंडितांनी श्रम घेतले व बेडरिख ऱ्हॉत्स्नी या चेक पंडिताने या भाषेचा उलगडा करून असे निदान केले की ही भाषा इंडो-युरोपियन भाषाकुलाच्या पश्चिम शाखेपैकी आहे. त्याचे हे मत सन १९३० च्या सुमारास सर्वमान्य झाले आहे. [१]

१ मात्र बेडरिख ऱ्हॉत्स्नी या पंडिताने मांडलेली सिंधु लिपीबद्दलची मते निर्णायक म्हणून समजता येत नाहीत. तरी त्या दिशेने केलेला तो एक शास्त्रीय प्रयत्न आहे असे निश्चितपणे समजता येते. त्याच्या पुस्तकाचे फ्रेंच भाषांतर १९४७ मध्ये झाले व इंग्रजी भाषांतर जिर्नड्रिश प्रोचात्सका (Prochazka) यांनी 'Ancient Hisory of Western Asia, India and Crete' या नावाने न्यूयॉर्क येथे १९५३ साली प्रसिद्ध केले आहे.

बोघाझकोई याचेच जुने नाव 'हट्टी' असे होते व म्हणून त्या ठिकाणी राजधानी असलेल्या लोकांना 'हिटाइट' असे नाव आहे. यांच्या राज्याचा उल्लेख इ. स. पूर्व २००० पासून बॅाबिलोनी व इजिप्शियन शिलालेखांतून येतो. या 'हिटाइट' जनांच्या भाषेवरून त्यांना आर्यवंशाच्या शाखेचे मानता यते. बोघाझकोई येथील विटांवरील लेखांत दुसरे 'हूरी' जनांचे नाव येते. एका 'हिटाइट' राजाने 'हूरी' जनांच्या राजाशी केलेल्या तहनाम्याचा लेख सापडला असून त्यात इंद्र, वरुण, मित्र व नासत्य या वैदिक आर्यांच्या दैवतांची नावे (जरा वेगळ्या रूपांत) आहेत. हा तहनामा इ. स. पूर्व १४०० च्या सुमारास झाला हे सिद्ध करता येते.

यावरून, तर्कतीर्थांनीही मानलेली एक गोष्ट सिद्ध होते की "भूमध्य समुद्राजवळील प्राचीन संस्कृतींशी वैदिक आर्यांचा संबंध होता." [१] परंतु नुसता संबंध सिद्ध होण्यापेक्षा या पुराव्याचे महत्त्व फार मोठे आहे. या पुराव्यावरून असे सिद्ध होते की "इ. स. पूर्व २००० ते १००० या वर्षसहस्रकामध्ये मेसापोटेमियामध्ये व बाबिलोनमध्येही, काही लोकसमूहांची वस्ती होती व त्या लोकांच्या राजांची व सामान्यांची नावे वैदिक संस्कृत व प्राचीन इराणी नांवाशी सदृश दिसतात. हे लोक त्या भागांतील राजकीय सांस्कृतिक घडामोडींत प्रामुख्याने दिसतात. त्यांच्या भाषा जुन्या इराणी भाषेशी जुळतात."[२] यावरून नुसता आर्य-संबंध दिसत नाही तर **हे लोक भारत प्रवेशापूर्वीचे आर्यजन आहेत असा निष्कर्ष** निघतो. भाषाशास्त्रज्ञ डॉ. चतर्जी म्हणतात, भारतात जेते म्हणून स्थिर झाल्यावर आर्यांनी पश्चिम आशियामध्ये हे नवे संबंध जोडले असे काही विद्वानांचे मत असले तरी ते असमर्थनीय आहे, कारण "मेसापोटेमियात उत्खनित झालेल्या लेखांतील भाषा वैदिक संस्कृतपेक्षा निश्चितपणे जुन्या आहेत. तो भाषांचा थर इंडो-आर्यन नसून आधीचा इंडोइराणीयन थर आहे...**आर्यवंशीय भाषा बोलणारे मेसोपोटेमियांतील हे लोक वैदिक आर्यांचे किंवा भारतीय आर्यांचे पूर्वजन होत**"[२]

यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात :(१) आर्यांच्या भारत-प्रवेशाचा काळ इ. स. पूर्व १५०० च्या मागे नेता येत नाही. व (२) भारतीय किंवा वैदिक आर्यांचे पूर्वजन भारत-प्रवेशापूर्वी कित्येक शतके राजकीय

१ "वैदिक संस्कृतीचा विकास", पान १९.

२ "इंडोआर्यन ॲन्ड हिंदी", पान १४. जाडा टाईप प्रस्तुत लेखकाचा आहे.

व सांस्कृतिक उलाढाली करण्याइतके प्रगल्भ होते हे स्पष्ट होते. इ. स. पूर्व ४००० वर्षांपासून पश्चिम आशिया, ईजिप्त, क्रीट या भागांत नांदलेल्या कास्य-युगीन नागर संस्कृतींचे संचित त्यांनी आत्मसात केलेले होते. घोडदळ व रथ, तसेच लोखंडी शस्त्रे यांच्या साहाय्याने त्यांनी आधीच्या कास्ययुगीन प्रगल्भ साम्राज्यांवर लष्करी विजय मिळविला होता व त्या साम्राज्यांच्या छायेत वाढलेल्या शासनसंस्थेच्या व इतर परंपराही त्यांनी उचलल्या होत्या.[१] हा प्रकार रोमन जेत्यांच्या व बाबरपासूनच्या इस्लामी जेत्यांच्या बाबतीत आपल्याला दिसतोच.

## हिटाइट जन, सिंधु संस्कृती व आर्यजन

वरील वर्णनावरून कोणाला असे वाटेल की मग आर्यांनी जर एवढ्या प्रगल्भ साम्राज्यांचा व संस्कृतींचा वारसा घेतला होता तर त्यांना सिंधु संस्कृतीचे लोक बर्बर वाटले असतील तर नवल नाही. पण वस्तुस्थिती तशी नाही. भारतात आर्यपूर्व **सिंधु–जनांची जी संस्कृति नांदत होती तीही कास्ययुगीन प्रगल्भ संस्कृतिव्यूहाचाच एक भाग होती.** हिटाइट, कासाइट, हूरियन इत्यादि आर्यजनांनी पश्चिम आशियातील प्राचीन साम्राज्यांना जिंकले व तेथील प्रौढ संस्कृतिकेंद्राचा पाडाव केला. त्याप्रमाणे व कालांतराने सिंधु संस्कृतीवरही वैदिक आर्यांनी विजय मिळविला. या विजयी आर्यांनी मध्य आशियातच जुन्या संस्कृतींचे ऋण घेऊन स्वतःला सुसंस्कृत बनविले होते व तो वारसा घेऊन ते भारतात आले. पण त्यांच्या येण्यापूर्वीपासूनच सिंधु संस्कृतीचा व मध्य आशिया-वासी सुसंस्कृत जनांचा संबंध शतकानुशतके दृढ झालेला होता. या बाबतीत ऱ्हॉस्नी यांचे मत असे आहे की सिंधुजनांची लिपी हिटाइटांच्या चित्रलिपीशी जुळणारी आहे. सिंधु लिपीचा या अन्वयाने अर्थ लावून त्यांनी असे दाखविले आहे की मोहेंजदारो येथे सापडलेल्या वटिकांवरील ( सीलस्वरील ) मजकूर हिटाइट भाषेच्या मदतीने वाचता येतो व त्यांत राजगृह ( किंवा महा–देवाचे मंदिर ) याचा निर्देश असून राजाला ( किंवा देवाला ) समर्पित वस्तूंचा उल्लेख आढळतो. काही वटिकांवर 'नटय' हे देवतानाम आढळले असून तो शब्द 'नटराज' या नावाचे सिंधुजनकालीन पूर्वरूप असावे व हरप्पा येथे सापडलेली नृत्य करणारी देवमूर्ति 'नटय' किंवा 'नटराज शिव' याची असावी असे ऱ्हॉस्नी यांचे म्हणणे आहे.[२]

१ कित्ता, पान १७.

२ डॉ. ऱ्हॉस्नी यांचा पूर्वी उल्लेखिलेला ग्रंथ, पाने १७०–१७२

हिटाइटांची चित्रलिपी व सिंधुजनांची लिपी यांतील संबंधाबरोबरच सिधुलिपी व ब्राह्मीलिपी यातील संबंधही फार महत्त्वाचा आहे. या बाबतीत डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांचा पुढील निष्कर्ष लक्षात घेतला पाहिजे. ते म्हणतात, " वेदांचे संहिताकरण केव्हा झाले ह्या प्रश्नाला निर्णायक महत्त्व आहे. लिपीच्या अभावी हे संहिताकरण झाले असणे अशक्य आहे. प्रथम आर्यजनांच्या बोलभाषेला लिपीबद्ध करून मगच लोकांच्या तोंडी असलेल्या देवस्तवनांच्या व्यवस्थित रूपांत चार वेद-संहिता बनविणे शक्य झाले........ ( महाभारतांतील परीक्षित राजाचा ) हा काळ खिरस्तपूर्व ९५० असावा हे मानले तर भारतीय इतिहास व भारतीय आर्यांची भाषा यांच्या विकासाचा अर्थ नीट लागतो. प्राचीन सिंध – पंजाब विभागांतील आर्यपूर्व जनांना द्रविडजन म्हणता येईल की नाही हे वादग्रस्त असले तरी त्यांच्या सिंधुलिपीचा स्वीकार आर्यजनांनी आपल्या भाषेसाठी केला व इ. स. पूर्व ९००–१००० या सहस्रकात ही घटना घडली असावी; अशा स्वीकृत लिपीच्या बाबतीत प्रथमतः नेहमी असे घडते की तिच्यात बदल होत जातो. असा बदल सहासात शतके होत होत मौर्यकालीन ब्राह्मी लिपीचे रूप स्थिर झाले असावे.[१] "

वरील प्रमेयांच्या आधाराने आपल्या रूढ कल्पनाव्यूहाचा फेरविचार करावा लागेल. प्रतिभाशाली, साहसी व धीरोदात्त अशा एकवंशीय गौरवर्णीय आर्यजनांनी धूमकेतूप्रमाणे एकदम इतिहासाच्या रंगभूमीवर प्रवेश केला आणि या देवसदृश्य सर्वगुणसंपन्न जनांनी एका भौतिक व आध्यात्मिक संस्कृतीचे उज्वल निशाण घेऊन आर्यपूर्व बर्बर मानवजातीला सुसंस्कृत केली; तसेच आर्यजनांचा काळ हा कास्ययुगीन मानवसंस्कृतीच्या दहावीस सहस्र वर्षांपूर्वीचा पुरातन काळ आहे. अशा रुढ कल्पनांना आता आपल्या प्राथमिक संशोधनातील अभिनिवेशांचा आणि अनुपलब्ध पुराव्यांच्या आधारावर रचलेल्या अनुमानांचा दर्जा द्यावा लागेल. ग्रीकांच्या नागर संस्कृतीपासून मानवजातीच्या संस्कृतीचा प्रारंभ झाला

[१] आपल्याकडे खिरस्तपूर्व ३१०१ हा कलियुगारंभाचा व भारतीय युद्धाचा काळ मानला जातो. परंतु, पार्जिटर व राय चौधरी या पंडितांच्या संशोधनाचा आधार घेऊन चटर्जी यांनी इ. स. पूर्व ९५० हा महाभारतीय युद्धाचा काळनिर्णय ग्राह्य ठरविला आहे आणि याच वेळी वेदांचे संहिताकरण झाले असा चटर्जी यांचा निष्कर्ष आहे. (पाहा, चटर्जी यांचा वर उल्लेखित ग्रंथ, पाने ४९–५२).

हा यूरोपियनांचा भ्रम असाच होता. तो आता त्यांनी सोडला आहे, कारण ग्रीकांच्या संस्कृतीला आता क्रीट व ईजिप्त येथील संस्कृतींचा **एक नवा समन्वय एवढेच स्वरूप** आहे ही गोष्ट त्यांना आता पटली आहे. आर्यजनांच्या बाबतीत आज आपण हीच वृत्ति स्वीकारणे भाग आहे.

'वैदिक' म्हणून ज्यांना आपण म्हणू शकतो ते आर्यजन स्वयंभू संस्कृतीचे निर्माते नसून मध्य आशियातील आर्यपूर्व मानवसंस्कृतीचे वारसदार आहेत; त्याच **व्यापक संस्कृतिव्यूहात नांदणाऱ्या सिंधुजनांच्या संस्कृतीचा व भारतात आलेल्या आर्यजनांच्या संपादित संस्कृतीचा समन्वय होऊन** वेदांचें संहिताकरण, ब्राह्मी लिपीचा उदय व अनेक संस्कृतिघटकांची रचना येथे झाली आहे. म्हणून कितीही कालमर्यादा मागे नेली तरी जिला ज्ञात अशी भारतीय संस्कृती म्हणता येईल ती संस्कृती केवळ 'वैदिक' किंवा 'आर्य' नाही हें उघड आहे. डॉ. चटर्जी यांच्या शब्दांत सांगायचे तर, "भारतीय संस्कृतीची रचना करण्याचे श्रेय एकटया आर्यजनांचे नसून त्यात आर्येतर जनांचा भाग आहे. इतकेच नव्हे तर पायाभरणीच्या कामात त्यांचा जास्त मोठा हिस्सा आहे. नागर व सुसंस्कृत आर्यपूर्व जनांच्या तुलनेने आर्यजन हे अस्थिर असंस्कृत लोक होते. ही नागर संस्कृती काही भारतीय प्रदेशांवर नांदत होती, व तिला अर्थोत्पादनादि बाबतीत प्रगलभता लाभलेली होती. भारतीय संस्कृतीच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक घडणीत आणि पुराणकथावाङमय व इतिहास यांच्या रचनेतही आर्यपूर्व जनांचे कर्तृत्वच जास्त मोठें आहे असे आता अधिकाधिक स्पष्ट होत आहे. आर्यपूर्व विचारांना आर्यांच्या भाषेत मांडले गेले हे खरे, परंतु याचे कारण ती भाषा महत्त्व पावली हे आहे. आणि त्याबरोबर या आर्यभाषेवरही आर्यपूर्वांच्या कर्तृत्वाचा परिणाम झालेला दिसत आहे. कर्म व पुनर्जन्म, योगसाधना, रुद्र, शिव, देवी, विष्णु[१], शिव या देवतांच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या तत्त्वज्ञानांतील विचार आणि

१. विष्णु या देवतेच्या बाबतीत जी. गोंडा ( G. Gonda ) यांचा "आस्पेक्टस् ऑफ विष्णुइझम" हा ग्रंथ उल्लेखनीय आहे. त्या पंडिताने म्हटले आहे की विष्णु ही आर्यपूर्व भारतीयांची देवता असावी. असेच मत प्रा. रा. ना. दांडेकर यांनी व्यक्त केले आहे. ( "Vishnu in the Veda", Kane Festschrift, Poona, 1941, pp.9 5–111)

उपासनेचे मार्ग व कल्पना, होमाच्या आर्यविधीला विरोधी पर्यायरूप असलेला पूजाविधी, या आणि अशा अनेक इतर बाबी आर्यपूर्वांची देणगी आहे. तसेच, महाकाव्ये व पुराणे आणि वीरकथा व इतिहास–सदृश कथा यातील बराच मोठा भाग त्याचाच आहे.

## तत्त्वविचारांचा उगम

भारतीय संस्कृतीचा उगम आर्य ( वैदिक ), आर्यपूर्व सिंधुजन आणि काही बाबतीत पाषाणयुगापासूनचे ऑस्ट्रिक व निग्रिटो जन यांच्या सांस्कृतिक संगमनात आहे; एकटचा वैदिक संस्कृतीला या संगमनातील "संघटक व एकसूत्रित करणारे बीज" मानणे योग्य नाही. नवी शास्त्रे व नवे पुरावे यांचा आधार घेऊन असे विधान आज करावे लागते. "वैदिक संस्कृत व इतर संस्कृत यांचा सूक्ष्म अभ्यास करून जे सार व जी प्रमाणे निघाली, त्यांतून तुलनात्मक पाश्चात्य विद्येत चार शास्त्रांची भर पडली. पुराणकथाशास्त्र, भाषाशास्त्र, तुलनात्मक धर्मविचार आणि तुलनात्मक साहित्यचर्चा ही ती होत," असे तर्कतीर्थांनी म्हटले आहे, व ते ठीकच आहे. परंतु त्या शास्त्रांच्याच आधाराने नवीन उपलब्ध झालेली प्रमेये व पुरावे आता डोळ्याआड करून चालणार नाहीत. उदाहरणार्थ प्राथमिक अवस्थेतील संशोधनात उत्खनित पार्थिव पुरावे व भाषाशास्त्रीय प्रमाणे उपलब्ध नसल्यामुळे वेद व महाकाव्ये या वाङमयांतील ज्योतिष उल्लेख घेऊन केलेले कालनिर्णय आता सोडावे लागतील. या बाबतीत डॉ. चटर्जी यांचे मत आहे की संहिताकालीन भारतीयांना ज्योतिषविषयक ज्ञान अपुरे असून ही ज्ञानशाखा प्रथम खाल्डियनांनी रचली व त्यांच्यापासून ग्रीकांनी उचलली ही गोष्ट जमेस धरली पाहिजे; आणि ते ज्ञान ग्रीकांपासून भारतीयांनी घेतल्यानंतर उत्तरकालात, म्हणजे गुप्तांच्या कालात, 'आपल्या प्राचीनत्वाविषयी स्वतःचे जे अपुरे ज्ञान होते त्याच्या आधारे प्राचीन घटनांच्या काळी ग्रहांची स्थिती कशी असावी याचे गणित या भारतीयांनी केले असावे व तसे ज्योतिषविषयक उल्लेख प्राचीन वाङमयात घातले असावेत."[१] म्हणूनच ज्योतिष पुराव्यांनी

---

१ कित्ता, पाने ३१–३१.

केलेले निर्णय त्याज्य ठरवून नवे कालनिर्णय नव्या उपलब्ध शास्त्रीय प्रमाणांच्या आधारे केले पाहिजेत.

आता, आधीच सूचित केलेला एक महत्त्वाचा प्रश्न चर्चेला घेऊन प्रस्तुत विवेचन मी संपवितो. इतर साऱ्या बाबतींत नव्या पुराव्यांनी काही सिद्ध होवो, पण वेद आणि उपनिषदे यांच्या अधिष्ठानावर उभारलेल्या 'पुरुष', 'आत्मा' व 'ब्रह्म' या तत्वविचारांचे काय? 'आत्मा' व 'ब्रह्म' यांच्या अद्वैताचे जे तत्वज्ञान आहे त्याचे काय? या सर्व अध्यात्मविचाराचे एकमेव सूत्र 'वैदिक' नाही काय?

वरील प्रश्नाच्या उत्तराची दिशा तेवढी येथे सांगता येईल. 'पुरुष', 'ब्रह्म' व 'आत्मा' या तीन कल्पना उपनिषत्पूर्व वेदवाङमयात वाढीस लागलेल्या आहेत. त्यांची पूर्णता उपनिषदांत झाली. या कल्पनांचा इतिहास भारतीय तत्वज्ञानाची पार्श्वभूमी होय. उपनिषदांतील तत्वज्ञानाचा वैचारिक कार्यकारणभाव समजण्यास चारी वेदांतील देवताविषयक विचार ध्यानात घेतले पाहिजेत. "कर्मकांडाचा व ज्ञानकांडाचा एकजीव सांधा जर समजला नाही तर उपनिषदांतील ज्ञानकांड कसे प्रकट झाले हे समजणे शक्य नाही."[१] हे तर्कतीर्थांचे म्हणणे मान्य करूनच असे विचारता येते की कर्मकांड व ज्ञानकांड यांचा जो व्यूह आहे तो निर्भेळ वैदिक आहे काय? 'पुरुष' 'ब्रह्म' व 'आत्मा' या कल्पना वेदवाङमयात वाढीस लागलेल्या आहेत हे ठीक, पण यांचा उगमही वेदांतच मानावा का?

या तीन कल्पना घ्या, किंवा देवतांचा व यज्ञसंस्थेचा विचार घ्या. त्यात आपल्याला आर्यपूर्व कांस्ययुगीन मानवी तत्त्वविचारांचा प्रगल्भ प्रपंच आढळून येतो. **यज्ञसंस्था ही भारतीय (वैदिक) आर्यांची किंवा पूर्वीच्या आर्यजनांची स्वनिर्मित संस्था नाही.** आर्यजनांचे नावगावहि क्षितिजावर दिसू लागले नव्हते, किंबहुना कास्ययुगीन संस्कृतिव्यूहहि अस्तित्वात आला नव्हता, अशा फारच पुरातन काळी यज्ञसंस्थेची निर्मिती मानवी प्रज्ञेने केली.[२] यज्ञपुरुषाची दोन भिन्न रूपे म्हणजे राजपुरुष व बलिपुरुष. ती आपल्याला प्राचीनतम संस्कृतीत आढळतात व

१ 'वैदिक संस्कृतीचा विकास', पान ४५.

२ 'नवभारत'च्या फेब्रुवारी १९५९च्या अंकात, "यज्ञकल्पनेचा उगम, स्वरूप व पुनरुज्जीवन" हा माझा लेख पाहावा.

साऱ्या पृथ्वीवरील मानववंशात आढळतात. जी गोष्ट यज्ञाची तीच देवतांचीही. कारण 'यज्ञातून देवांची निर्मिती झाली' ही कल्पना नसून मानवी विचारविकासातील एक सत्य आहे. यज्ञ व दैवते यांच्या अतिप्राचीन मानवी विचारव्यूहातील एखाद्या अंशावर जास्त भर देणारी संस्कृती दुसऱ्या अंशावर भर देणाऱ्या संस्कृतीहून भिन्न वाटली तरी मुळातील हा कल्पनास्रोत एकच मानावा लागेल.

कोणत्या अंशावर भर आहे या दृष्टीने भारतीय तत्त्वविचारांचा वेदांपासून अलीकडच्या दर्शनांपर्यंतचा विकास तपासून पाहता असे दिसते की त्यामध्ये 'कर्म', 'संन्यास', 'चित्तवृत्तिनिरोधात्मक' योग यांचाच मुख्य व अखंड प्रभाव दिसतो. या प्रमेयांच्या जोडीला, व अविरोधाने, रुद्र, शिव, विष्णु, शक्ति इत्यादि देवतांची भक्तियुक्त उपासना दिसते. इंद्रादि देवतांच्या स्तोत्रांचा व होमहवनाचा भाग प्रभावाच्या दृष्टीने गौण व अल्पकालीन दिसतो.[१] आता जो मुख्य भाग दिसतो तो सिंधुजनांच्या अध्यात्मविचारातून आलेला आहे असे म्हणता येते व गौण भाग आर्यजनांनी दिलेला दिसतो. म्हणजे, पुन्हा, या वैचारिक बाबतीतही **'संघटक' सूत्र म्हणून वैदिक बीज** मानता येत नाही; उलट पक्षी, सिंधुजनांच्या विचारांनीच प्रधानतः भारतीय तत्त्वज्ञानाची घडण केली असे म्हणावे लागते.

समारोपादाखल एवढेच मला सुचवावयाचे आहे, की भारतीय जीवनाचे भवितव्य सर्व मानवजातीच्या भौतिक व सांस्कृतिक भवितव्याशी आज निगडीत आहे, तसेच प्राचीनकाळीही भारतीय संस्कृतीची घडण त्या काळातील सर्व मानव संस्कृतीशी नुसता संबंध ठेऊन नव्हे तर आदानप्रदान व संगम करून झालेली आहे. म्हणून प्राचीन इतिहासाच्या बाबतीत आज जेवढे ज्ञान उपलब्ध झाले आहे त्याचा आधार घेतला पाहिजे; आवश्यक किंवा अपरिहार्य अशा अभिनिवेशाने प्राथमिक काळात आपण केलेले संशोधन व ठरविलेले निर्णय जरूर तर बदलले पाहिजेत. असे करावयाचे तर आपली प्राचीन परंपरा **वैदिक नसून वैदिकजन व सिंधुजन यांच्या संगमातून निर्माण झालेली एक नवीन भारतीय परंपरा** आहे, हे तत्त्व स्वीकारले पाहिजे. हे तत्त्व स्वीकारून जर संशोधन केले तर

१ प्रा. हिरिअन्ना, "इसेन्शियल्स ऑफ इंडियन फिलॉसॉफी", पाने ३१–३९.

'आर्य–द्रविड', 'वैदिक–अवैदिक', 'आर्य–शूद्र' वगैरे वादांच्या बावतीत वस्तुनिष्ठ, निकोप व निरभिमानी भूमिका घेऊन सत्यान्वेषणाचा मार्ग सुकर होईल, एवढीच आशा प्रकट करून हे विवेचन मी संपवितो.

# डांगे यांचे 'प्राचीन भारत' *

वेदसंहितेच्या काळापासून महाभारतीय युद्धापर्यंतचा काळ म्हणजे भारतीय आर्यांच्या प्राचीनतम इतिहासाचा काळ आहे व त्या काळात समहजीवनापासून गुलामगिरीपर्यंत भारतीय समाजाची स्थित्यंतरे होत गेली आहेत, असा सिद्धान्त कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांनी मांडला आहे. भारताचा इतिहास त्यांना मांडावयाचा आहे. केवळ आर्यसंज्ञक जातीचा प्राचीन इतिहास त्यांना अभिप्रेत नाही. शिवाय, ते म्हणतात, "वर्णव्यवस्था, खासगी मालमत्तेची पद्धती व शुद्ध गुलामगिरी यांची प्रौढ व स्थिर स्वरूपे, भारतात आल्यानंतर दीर्घ कालान्तराने, आर्यगणांनी निर्माण केली, असे पुष्कळशा खात्रीलायक तऱ्हेने म्हणता येते", (पान १३७). भारताच्या भूमीवर आर्यांनी घडविलेल्या समाजव्यवस्थेचे विश्लेषणच डांगे यांना अभिप्रेत आहे.

भारत ही भूमी आणि आर्य हेच त्या भूमीवरील इतिहासाचे एकमेव निर्माते, एवढी विषयमर्यादा स्वतःला घालून घेऊन कॉ. डांगे यांनी संशोधनाला प्रारंभ केला आहे. या संशोधनात सिद्धान्तरचनेला लागणाऱ्या वास्तवातील प्रत्यक्ष पुराव्याची सामग्री डांगे यांनी वेदब्राह्मणादि वाङमयातून आणि रामायण– महाभारतादि महाकाव्यांतून निवडली आहे.

त्यांच्या संशोधनाचा साराच भार व भर केवळ या वाङमयावर आहे आणि मुख्यतः यज्ञसंस्थेच्या आधाराने त्यांनी आपले सिद्धांत मांडले आहेत. भारतीय आर्यांचा मुख्य जो ग्रंथ वेद त्याचे प्रयोजनच यज्ञासाठी आहे आणि यज्ञामध्ये आर्यांच्या समाज–अवस्थांच्या विकासाचे प्रतिबिंब

* 'India : From Primitive Communism to Slavery', Peoples Publishing House, Bombay, March 1949.

उमटत गेलेले आहे, अशा मूलभूत प्रमेयावरच त्यांच्या सर्व सिद्धांतांची इमारत आहे. ( पान २९ पाहा ). यज्ञाइतकेच महत्त्व त्यांनी गणगोत्रांना दिलेले आहे. आर्यजन प्राचीनतम काली ज्या बर्बरसमूहांत राहत होते त्या बर्बरसमूहांनाच गणगोत्रांचे रूप होते, या प्रमेयाला त्यांच्या मीमांसेत फार महत्त्व आहे.

डांगे यांनी आपल्या सर्व ग्रंथाला आधारभूत धरलेली हीच यज्ञविषयक आणि गोत्रविषयक प्रमेये एक जुने पंडित श्री. कुंटे [१] यांनी अशीच मांडली आहेत. त्यांनी म्हटले आहे की, ब्रिटिश लोकांचा सामाजिक इतिहास समजून घेण्यासाठी मॅग्नाचार्टापासून अद्ययावत राज्यघटनेपर्यंत सर्वांचा अभ्यास केला पाहिजे, त्याचप्रमाणे आर्यांचा इतिहास संशोधण्यासाठी यज्ञसंस्थेचा अभ्यास केला पाहिजे; (पान २०). यज्ञसंस्थेच्या विकासाच्या चार अवस्थांचा श्री कुंटे यांनी ( १ ) बर्बरावस्था ( २ ) गोपालन–अवस्था ( ३ ) कृषिप्रधान अवस्था आणि ( ४ ) राजसत्ताक मध्ययुगीन –अवस्था या चार सामाजिक स्थित्यंतरांशी अन्वयही लावून दाखविला आहे.[२] हा सिद्धान्त आपण जॉन स्टुअर्ट मिलच्या ' पोलिटिकल एकॉनॉमी '[२] च्या प्रस्तावनेतून घेतल्याचे श्री कुंटे यांनी पान ७ वर नमूद केले आहे.[3]

यज्ञाप्रमाणेच गोत्रव्यवस्थेबद्दलही श्री. कुंटे यांनी असे म्हटलेले आहे की, " आर्यांची गोत्रव्यवस्था त्यांच्या समाजाचे जे एकरक्तानुबंधी ( consanguine ) समूह होते त्यावर रचलेली आहे. ' ( पान १४ ).

आर्यांच्या सामाजिक स्थित्यंतराचा यज्ञसंस्थेशी व गोत्रव्यवस्थेशी असा संपूर्ण अन्वय लावण्याचे श्री. कुंटे यांनी केलेले प्रयत्न हे सन १८८० मधील आहेत. त्यावेळी मार्क्सचा या बाबतीतील गुरू जो मॉर्गन

[१] Kunte M. M., 'Vicissitudes of Aryan civilization in India,' published by author, Bombay. 1880, pages 599.

[२] " The system of Aryan sacrifices affords the best criteria for dividing the hymns of the Rik-Samhita into four parts corresponding to the four Stages of civilzation "

[3] Mill J. S., 'Politcal Economy,' Colonial Press, onLdon, edition of 1900, vol. I., pp. 10–19.

त्याचें नावही हिंदुस्थानात ठाऊक नव्हते, व मार्क्सही माहीत नव्हता; इतकेच काय पण एन्गल्सचा प्रमाणभूत ग्रंथ 'फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अ‍ॅन्ड स्टेट' हा देखील कुंटे यांच्या ग्रंथानंतर, म्हणजे सन १८८५ मध्ये प्रसिद्ध झाला. तेव्हा असा अन्वय लावण्याचा प्रयत्न करणारे जुने भारतीय

पंडित म्हणून श्री. कुंटे यांचा आदर कॉ. डांगे यांनी ग्रंथारंभीच करावयास नको होता काय? 'यज्ञ' व 'गोत्र' या मुख्य कल्पनांच्या बाबतीत कॉ. डांगे यांनी हे गुरुऋण फेडणे. हे त्यांचे कर्तव्य होते, असे मला वाटते.

डांगे यांनी हे गुरुऋण फेडले आहे. पण ते असे की, साऱ्या ग्रंथात त्यांनी श्री. कुंटे यांचा इतर पंडितांबरोबर तीनदाच ओझरता उल्लेख करून त्यांची 'राष्ट्रीय अभिनिवेशाने भारावलेली कोती संशोधन–वृत्ती' उपहासिली आहे! दोन ठिकाणी त्यांनी सोमयागाबद्दलची श्री कुंटे यांची कल्पना उल्लेखिली आहे. (पान ४८ व ८३ पहा). श्री. कुंटे यांनी सोमयागात आर्यांच्या भ्रमणाचें प्रतिबिंब ओळखले तरी पण यज्ञामध्ये आर्य-समूहांचे सर्वच दैनंदिन समाजजीवन प्रतिबिंबित आहे, हे त्यांना उमगले नव्हते, असा शेरा मात्र डांगे यांनी मारून ठेवला आहे (पान ८३). तो साफ चुकीचा आहे हे श्री. कुंटे यांच्या ग्रंथाविषयी मी दिलेल्या माहितीवरून दिसून येईलच.

यज्ञसंस्थेचा आर्यगणांच्या प्रत्यक्ष स्थित्यंतरांशी घनिष्ठ जिवंत अन्वय लावण्याचा प्रयत्न सन १८८० मध्येच करून, आपल्या ५९९ पृष्ठांच्या ग्रंथांत तपशीलवार सामग्री जुळवून मांडणारे कुंटे यांचे गुरुऋण न फेडता, 'त्यांना तो अन्वय कळलाच नव्हता व मी प्रथमच हा अन्वय लावीत आहे' असे डांगे यांनी प्रतिपादन करणे हे मला वाटते अन्यायाचे आहे. त्या प्रमेयाचे ऋण आदराने उल्लेखून आपण त्यात अमुक भर घातली व सुधारणा केली असे सांगणे हेच संशोधक या नात्याने कर्तव्य होते. पण ऋणाची बाब सोडून आपण आता हे पाहू की, डांगे यांनी भर तरी कोणती घातली?

डांगे यांनी मुख्यत: जी भर घातली आहे ती अशी की, मिलच्या चार अवस्थांशी श्री. कुंटे यांनी अन्वय लावला, त्या ऐवजी एन्गल्सने मांडलेल्या मानवसमाजाच्या अवस्थांशी कॉ. डांगे यांनी तोच संबंध लावून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे!

पण मिलच्या आराखड्याऐवजी एन्गल्सचा आराखडा घेतल्याने तशी फारशी गैरसोय न होता सरळ जुनीच सामग्री डांगे यांना नव्या

सांच्यात रचता आली आहे. हे कसे आपोआप सहज साधले आहे, ते स्पष्ट होण्यासाठी कुंटे व डांगे यांच्या प्रतिपादनांच्या अनुषंगाने तुलना करून पाहण्यासारखे आहे.

आपल्यासमोरील विषयापुरतीच ही तुलना मी करीत आहे. या विषयात खोल न शिरता मी एवढेच दाखवू इच्छितो की, एन्गल्सचा आराखडा घेऊनहि कुंटे यांच्या प्रतिपादनाहून मूलत: वेगळे असे सांगण्याची गरजच डांगे यांना पडलेली नाही. ( लेखाशेवटी कोष्टक पाहा.) बर्बरसमूह काळातील आर्यसमाज बदलत गेला व शेवटी महाभारतीय युद्धाच्या काळापर्यंत त्या समाजात वर्णव्यवस्था व शूद्रांचे दास्य उत्पन्न झाले, असेंच कुंटे यांनी तपशीलवार मांडले आहे. त्यांनी वेदांपासून महाकाव्यांपर्यंत सर्व वाङमयातून सामग्री गोळा करून ही स्थित्यंतरे वर्णन केली आहेत. अनार्यांना जिंकून त्यांना शूद्रांचे स्थान देण्यात गुलामांचा वर्गच आर्यांनी निर्माण केला, व त्यामुळे पूर्वीच्या आर्यगणांचे वर्गविहीन सामूहिक जीवन जाऊन, भारतीय आर्यांचा समाज वर्गनिष्ठ झाला, असे कुंटे यांनी स्पष्ट म्हटले आहे.[१] अशा दासप्रधान आर्यसमाजातील क्षत्रिय सत्ताधाऱ्यांच्या यादवीने महाभारतीय युद्धाचा भयंकर संहार शेवटी घडून आला व त्या संहारामुळे सत्ताधारी दुबळे झाल्याने दलित वर्गांना डोके वर काढण्यास पुढे वाव मिळाला, हे विवेचनहि श्री. कुंटे यांनी केले आहे; (पाने २५१ ते २५५).

या साऱ्याचा सारांश माझ्या मताने असा निघतो की, एन्गल्सच्या आराखड्यांत जुनी सामग्री ढाळणे हे कार्यहि डांगे यांच्यासाठी कुंटे यांनी पुष्कळच सोपे करून ठेवले होते.

आता अगदी वेगळ्याच तऱ्हेने डांगे यांच्या या संशोधनव्यापाराचा परामर्श घेणे जरूर आहे. भारताच्या प्राचीन सामाजिक विकासाचे संशोधन करताना खरोखर जो मूलभूत प्रश्न उभा राहतो तो असा की, कोणाही संशोधकापुढे संशोधनाची दिशा व सामग्री कोणती हवी ? भारताच्या प्राचीनतम इतिहासाचे संशोधन करावयाचे कोणीही ठरविले तर किमान कोणत्या गोष्टी त्या संशोधकाने केल्या पाहिजेत ? कोणती पथ्ये पाळली

१. " They (Shudras) were the slaves of the Aryas... The history of the Shudra slaves reproduced itself in that of the Negro-slaves... Thus the Aryan community was stratified " ( ' Vicissitudes etc ', pages 202-203, )

अनुक्रम........................ दि:
.................................. नों: दि: ..................

पाहिजेत ? म्हणजेच जर रोकडा सवालच टाकावयाचा तर, असे संशोधन करावयाचे म्हणजे काय करावयाचे ?

डांगे हे नुसते संशोधक नाहीत, तर 'मार्क्स'चे शिष्य आहेत आणि संशोधक आहेत. म्हणून तर, माझ्या मते, वरील सारे प्रश्न जास्तच रोखठोकपणे त्यांनी स्वत:ला विचारावयास हवे होते !

माझ्या अल्पमतीला मार्क्सवादी संशोधनाचे व विशेषत: मार्क्सच्या वस्तुनिष्ठ इतिहासदर्शनाचे जर काही आकलन झाले असेल तर ते असे आहे की, वस्तुनिष्टता हे मार्क्सच्या सर्व पद्धतीचे सार आणि मर्म आहे. आराखडे घेऊन त्यांत वस्तूंना कोंबण्याची व जुळविण्याची पद्धती सर्वच खऱ्या संशोधकांना निंद्य वाटते तशी मार्क्सलाही वाटते. मग तो आराखडा मार्क्सवादाचा का असेना ! ह्या वस्तुनिष्ठेचा अर्थ प्रत्यक्ष संशोधनाच्या व्यवहारात असाच लावावा लागतो की, संशोधनाच्या विषयाला अधांतरी उचलून कोणत्या तरी कप्प्यात टाकण्याचा मोह संशोधकाला टाळावा लागतो व त्या विषयाला स्वत:चे असे काही वैशिष्टच ( व्यक्तित्व म्हटले तरी चालेल) आहे, हे संशोधकाने क्षणभरही विसरून चालत नाही. पोस्टांतील पत्रांची विभागवार छाननी करणारा सॉर्टर आणि संशोधक यांच्यात हाच फरक आहे !

म्हणूनच डांगे यांच्या साऱ्या ग्रंथावर व त्यांतील प्रपंचावर खरा मूलभूत आक्षेप हाच घ्यावा लागेल की, भारतीय आर्यांना त्यांनी अलगद अधांतरी उचलून घेतले आहे व मग एन्गलसप्रणीत मानवविकासाच्या आराखड्यात त्यांना सांचेबंद रीतीने 'जमविले'. आहे; प्राचीन संस्कृतीच्या, आणि विशेषत: प्राचीन भारतीय संस्कृतीच्या, शास्त्रात प्रसिद्ध असलेल्या आणि मार्क्सवादीही असलेल्या गॉर्डन चाइल्ड, थॉम्पसन प्रभृति काही तज्ज्ञांनी मिळून डांगे यांच्या ग्रंथावर एक परीक्षण लिहिले आहे त्यात हाच आक्षेप घेतला आहे की, "केवळ वाङ्मयीन पुराव्यावर भिस्त टाकून राहिल्यामुळे, आर्य या संज्ञेचा आशय केवळ भाषा-कुल-संबंधापुरताच मर्यादित नसून विशिष्ट मूलभूत सांस्कृतिक बाबींमुळे, निश्चित होणारे संबंधही त्या संज्ञेमुळे अभिप्रेत होतात, याचा विचारही डांगे यांना करावासा वाटलेला नाही. याचा परिणाम असा झाला आहे की, स्थलकालाच्या भूमीवरून आर्यांना उचलण्यात आले आहे व एक स्वयंभू स्वयंपूर्णता त्यांच्यावर डांगे यांनी लादली आहे यामुळे अग्नी, कृषी, धातुविज्ञान इत्यादि जे मूलभूत शोध मानवीं

समाजाने लावले ते सारे आर्यांनी लावले असा समज डांगे यांनी करून घेतला आहे. प्राचीन मानवशास्त्र व प्राचीन अवशेषशास्त्र यांची ते दखल घेत नाहीत. विधी व कथा यांच्यातले केवळ अंतर्गत पुरावे धुंडाळून त्या विधींच्या व कथांच्या स्वरूपाचा अर्थ लावतात व त्याला ते साकार करू पाहतात. "[१] खरे पाहता, आर्यपूर्वजन, मूळचे अविभक्त आर्य आणि मग भारतीय आर्य या साऱ्यांच्या कालक्रमासंबंधी आज भाषा-अवशेष-शास्त्र, प्राचीन-अवशेष-शास्त्रादि क्षेत्रांतील नव्या संशोधनांमुळे पूर्वीची (लोकमान्यांच्या वेळी मान्य असलेली ) अनुमाने टाकावी लागली आहेत. इ. स. पू. ४००० ते ३००० पासून आर्यपूर्वजांचा सुगावा लागतो आणि इ. स. पू. २००० ते १५०० या काळात आर्यांचा उदय इतिहासात झालेला दिसतो. ताम्रयुगीन मानवसंस्कृतीच्या परिसरात व लोहयुगाच्या प्रारंभीच ओळखू येऊ लागलेल्या लोकसमूहाला 'आर्य' ही संज्ञा लावता येते व या पार्श्वभूमीपासून आर्यांना तोडणे अशास्त्रीय आहे. बर्बरसमूहावस्थेचा काळ हा इतका प्राचीन आहे की, आर्यांच्या इतिहासाचे शेपूट त्या काळापर्यंत मागेच न्यावयाचे तर वानरावस्थेपर्यंत का नेऊ नये ? व एन्गल्सप्रमाणे डार्विनलाही पाठिंबा देणारे पुरावे वेदवाङ्मयांतून का गोळा करू नयेत ? एकंदर ताम्रयुगीन व लोहयुगीन मानवसंस्कृतींच्या परिसरातून आर्यांना अधांतरी उचलून धरण्याची ही चूक डांगे यांनी मुळातच केली आहे.

आर्यांना अधांतरी उचलण्यामुळे, आर्यपूर्वजांपासून फुटून निघण्याच्या

१. Review by the Indologists Study Group, in 'Modern Quarterly', (No. 3, 1950, page 278.) The authors say : " Depending entirely on literary sources, he is untroubled by the problem of the original cultural entity underlying the linguistic entity of the Aryans. This leads him to endow the Aryans with a unity removed from time and space, and to credit them with all the basic inventions of human progress the discovery of fire, agriculture, metallurgy, etc. He neglects the anthropological and archaeological approches and reconstitutes and interpretes a phase of ritual and myth on its own internal evidence. "

काळापासूनचा आर्यांचा व त्यानंतरच्या भारतीय आर्यांचा इतिहास डांगे यांनी डावलला आहे, व पन्नास वर्षांपूर्वीची आता खोडली गेलेली प्रमेये घेऊन एक भोंगळ कालक्रम, तोही नावालाच आखला आहे. त्याहिपेक्षा गंभीर प्रमाद असा की, भारताच्या प्राचीन इतिहासातील आर्यपूर्व भारताचा, म्हणजे मोहन–जो–दरोच्या प्रौढ, विस्तृत व नागरसंस्कृतीचा व भरतखंडभर पसरलेल्या अनार्य जमातींच्या जीवनाचा, त्यांना पूर्ण विसर पडला आहे.

खरी गोष्ट अशी आहे कीं, मोहोन–जो–दरोचा काळ व अशोकाचा काळ या दोन कालस्तंभांना पक्के धरून मगच आधीचा व नंतरचा भारताचा प्राचीन इतिहास तपासला पाहिजे. त्यात लोहयुगाच्या प्रारंभकालापासून ( म्हणजे इ. स. पू. २००० ते १५०० ) आर्यांच्या भ्रमणाचा व भारत–प्रवेशाचा विचार केला पाहिजे. ह्या विचारातही मूलत: प्राचीन–अवषेश–शास्त्रादि प्रत्यक्ष पुराव्यांचा शास्त्रीय आधार घेतला पाहिजे व विधी ( ritual ) वाङमय फक्त पूरक सामग्रीसाठी, साक्षेपाने व सावधगिरीने तपासले पाहिजे.

प्राचीन भारताचा इतिहास वस्तुनिष्ठ रीतीने तपासावयाचा ठरविला तरच मग मार्क्सवादी दृष्टीचा फायदा काय ते सप्रमाण दाखविणे शक्य होईल. पण डांगे यांची पद्धती व दिशाच वेगळी आहे. अर्थात तिलाही परंपरा आहे. वस्तुनिष्ठतेची भूमिका सोडून धाडसी व नेत्रदीपक संशोधन करणाऱ्या किंवा वस्तुनिष्ठेच्या नावाने व साचेबंद ‘ आर्थिक वर्गदृष्टी ’ ने साऱ्याच घटनांचा ‘ मार्क्सवादी अर्थ ’ लावीत बसणाऱ्या भ्रष्ट संशोधकांची निपज खुद्द मार्क्सच्या व एन्गल्सच्या काळातच झाली होती; आणि आपल्या अशा शिष्यवरांकडे पाहूनच मार्क्सने वैतागाने म्हटले की मी मग मार्क्सिस्ट नाही ! त्या शिष्यवरांची परंपरा अखंड चालूच आहे व डांगे यांनी, मला वाटते, त्याच संप्रदायाची दीक्षा घेतली आहे.

त्यांच्या ग्रंथातील सगळ्या अपसिद्धांताचे खंडन करीत बसणे अशा परीक्षणात्मक लेखात अशक्य व अनावश्यक आहे. पण एका महत्त्वाच्या बाबतीत त्यांनी केलेले प्रतिपादन नीट खोडून काढणे मला जरूर वाटते. ती बाब यज्ञयागादि विधी ( ritual ) आणि जीवनाचे साधे वास्तव ( real ) यांच्या परस्पर संबंधाची आहे. भारताचा इतिहास सांगताना त्यांचा इतर प्राचीन समाजांपासून वेगळेपणा किंवा वैशिष्टच काय हे न सांगता, सर्व एकाकारच करण्याची जी 

अशास्त्रीय वृत्ती डांगे दाखवितात तीच विधी व वास्तव यांच्या बाबतीतही ते दाखवितात.

विधीचे महत्त्व काय हा खरा प्रश्न आहे. विधीचा वास्तवापासून वेगळेपणा नेमका कशात आहे. हा त्यातून निघणारा दुसरा प्रश्न आहे.

विधी म्हणजे काय ? त्याला डांगे यांचे सोपे उत्तर आहे. ते म्हणतात, विधी म्हणजे वास्तवाची नक्कल आहे. ' ममी ' केलेले प्रेत ही मनुष्यदेहाची अवशिष्ट व संस्कारित अवस्था आहे, तसा विधी हा वास्तवाच्या देहाचा एक और्ध्वदेहिक आविष्कार आहे असा त्यांचा ठाम सिद्धान्त आहे. म्हणजेच विधी व वास्तव यांना एकाकार, एकच मानण्याची त्यांची भूमिका आहे. कुंटे यांची मात्र ही भूमिका नाही. तिचे श्रेय डांगे यांनाच दिले पाहिजे, हे येथे नमूद केले पाहिजे.

'अमुक एक गोष्ट आता निव्वळ विधी झाली आहे ' असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा डांगे यांच्या अर्थानेच आपण विधी हा शब्द वापरतो हे खरे! पण हा प्राकृत अर्थ झाला. एखाद्या महत्त्वपूर्ण संस्काराचे निर्जीव थोतांड उरले आहे या अर्थी ' विधी ' या शब्दाला मराठीने राबविले आहे. पण तो अर्थ शास्त्रीय विवेचनाचा व गंभीर ग्रंथाचा आधार बनविणे हे मात्र थोतांड ठरेल. दुर्दैव असे की, डांगे यांनी ' विधी ' शब्दावर हा मराठी श्लेष लादला आहे व मग या श्लेषावर यज्ञसंस्थेचे स्वतःचे अजब ' मार्क्सवादी ' विश्लेषण रचले आहे.

खरे पाहता विधी हे थोतांड नाही व वास्तवाची स्मृती, अवशेष व प्रतिबिंबात्मक नक्कलही नाही. ती एक मानवी मनाची निर्मिती आहे, विचारक्रिया आहे. उदाहरणार्थ, स्त्रीपुरुषसमागम ही प्राकृत क्रिया व विवाह हा संस्कार किंवा विधी घ्या. या विधीमध्ये मानवी कुटुंबसंस्था, मालमत्तेचा विचार, प्रगल्भ प्रणय, इत्यादी विचारांचा गाभा आहे; नुसती जंतुक्रियेची ती आवृत्ती नाही.

या अर्थीच विधी हा वास्तवापासून, म्हणजे प्राकृत जीवनकर्मापासून, वेगळा असतो. विधी हा वस्तुतः मानवी विचारच असतो. विचार ही अमूर्त गोष्ट असते असा आपला आधुनिकांचा पक्का ग्रह असतो, पण विचारांना आपण मूर्त रूपेही देतो व त्याना कलाकृती म्हणतो ही गोष्ट आपल्याला विसरून चालणार नाही. प्राचीनतम काळातील मानवी मनाने आपल्या बहुतेक विचारांना क्रियात्मक देह दिला व त्यांनाच विधी म्हटले, ही गोष्ट आपण ओळखली पाहिजे. तरच प्राचीन मानवाच्या मनाचा

 व समाजाचा आशय आपल्या आधुनिक मनाला उमगू शकेल.

विधी व वास्तव यांमधील हाच फरक साधे शब्द व मंत्रशब्द यांतही आहे. एका शक्तीचा (गारुडाचा) संचार झालेले शब्द म्हणजे मंत्र. मंत्राच्या सामर्थ्याची ही कल्पना जर त्यातून काढून घेतली तर, मंत्राचे मंत्रत्व राहत नाही. कारण मंत्राचा आत्मा त्यात अभिप्रेत असलेल्या या सामर्थ्यांच्या विचारात आहे. तसेच विधीमधील वैचारिक आत्माच जर त्यातून वजा केला तर विधीला अर्थच उरत नाही.

म्हणूनच विधी आणि वास्तव यांचा एकाकार करता कामा नये आणि त्यांचा अन्योन्यसंबंध विचार आणि वास्तव यांच्या अनुबंधा-सारखा मानला पाहिजे. विस्तृत देशकाल घेतले तर विचार हे शेवटी वास्तवावर आधारलेले असतात, पण वास्तवाचे निव्वळ जड प्रतिबिंब म्हणजे विचार नव्हे. मार्क्सने ज्या जडवस्तुवाद्यांवर कठोर टीका केलेली आढळते, त्यांचें मत मात्र असे होते की विचार जडाशी एकरूप व या अर्थी निव्वळ प्रतिबिंबात्मक आहेत. मार्क्सच्या तत्त्वज्ञानात व इतिहास-दर्शनात अशा जडवस्तुवादाला व विचारवास्तवांच्या एकाकाराला वस्तुतः मुळीच वाव नाही. दुर्दैव मात्र असे की, मार्क्सवादाच्या नावावर असा जडवस्तु-वादच खपविण्याचा गुन्हा पूर्वीही अनेक भ्रष्ट मार्क्सवाद्यांनी केला व तोच आज डांगे करीत आहेत.

मार्क्सच्या इतिहासदर्शनाचे स्वरूप सांगण्याची ही जागा नव्हे. येथे एवढेच सांगणे जरूर आहे की, यज्ञविधीला तत्पूर्वकालीन प्राकृत दैनंदिन वास्तवाची स्मृतिरूप आवृत्ती मानणे, हे मार्क्सवादाला तर सोडून आहेच, पण साध्या इतिहासमीमांसेलाही सोडून आहे. यज्ञविधी हे समकालीन समाजातील विचारांचे क्रियात्मक स्वरूप आहे व त्या समाजातील वास्तवाशी त्याचा केवळ परोक्ष अन्वय आहे, ही गोष्ट पक्की मनात वागवून प्राचीन मानव संस्कृतीचा मागोवा घेत गेले पाहिजे.

मग यज्ञविधीला काही ऐतिहासिक विकासाचा कालक्रम नाही काय? तसा आहेच, व तो अभ्यासिला पाहिजे. तो तपासताना अशीही अपेक्षा करणे योग्य ठरेल की, वेदकालीन यज्ञविधीत, वेदपूर्व कालातील व बर्बर समूहकालातीलही विधींचे अवशेष सापडतील. विधींना पावित्र्य असल्या-मुळे या अवशेषांचा संभव जास्तच आहे. किंबहुना असे अवशेष सापड-तातच. अश्वमेघातील 'अश्व-महिषी-उपसंवेशनविधी' हा असाच अवशेष आहे. पण कशाचा? तर एखाद्या प्राकृत समागमाचा नव्हे, तर यज्ञीय अश्व व पट्टराणी यांच्या समागम-विधीचा आहे. प्राचीनतम अशा पुरुषमेधातील मेध्य पुरुषाच्या जागी अश्व हा असल्या-

मुळे अश्वमेधातील ‘ उपसंवेशना ’ला वाह्यतः विपरीत रूप आले आहे, ही गोष्ट सहज दिसणारी नाही काय? पण गंमत अशी आहे की, डांगेच नव्हेत तर इतर काही पंडितही या बाबतीत विधी आणि वास्तव यांचा एकाकार करून स्वतःची व इतरांची भयंकर दिशाभूल करीत आहेत. प्रा. र. द करमरकर यांनी नुकताच अश्वमेधासंबधी लेख लिहून त्यात असे अजब प्रतिपादन केले आहे की, ‘ अश्वमहिषीउपसंवेशना ’चा विधी हा वर्बरावस्थेतील स्त्रियांच्या पशुसमागमाच्या वास्तवाचीच विधिरूप आवृत्ती आहे ! [१] ‘ यज्ञ ’ म्हणजे एकंदरीत स्वैर व सामूहिक पशुसम समागमाच्या वास्तव प्रसंगाचे चित्र आहे, असाही निष्कर्ष प्रा. करमरकर यांनी काढला आहे, व ‘ यज्ञ ’ संज्ञेचा धात्वर्थ ‘ य ’ व ‘ ज ’ या धातूंपासून काढून आपल्या या निष्कर्षाचे भाषाशास्त्रीय समर्थन केले आहे ! [२] योगायोग असा की, डांगे यांनीही हाच निष्कर्ष अशाच व्युत्पत्तीने सिद्ध केला आहे.

असली व्युत्पत्ति, असले निष्कर्ष व असला ‘ मार्क्सवाद ’ डांगे यांनी प्रतिपादन केला किंवा प्रा. र. दा. करमरकरांसारख्या जुन्या पद्धतीच्या पंडितांनी तसलेच निष्कर्ष काढून प्राचीन यज्ञविधीचे व समाजव्यवस्थेचे विराट विडंबन केले तरी, सुदैव असे आहे की, समाजशास्त्र, प्राचीन-मानवशास्त्र, प्राचीन-अवशेषशास्त्र व मार्क्सवाद ही आज इतकी प्रौढ झाली आहेत की, अशा भ्रष्ट संशोधनाने तज्ज्ञांची व खऱ्या जिज्ञासूंची दिशाभूल होण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. प्राचीन भारतीय समाजाचे विश्लेषण मार्क्सवादी दृष्टीने करणे, हे नुसते अवघडच नव्हे तर राजमार्ग नसलेल्या प्रदेशात नवीच पाऊलवाट काढण्याइतके दुर्घट आहे. साहजिकच, हा प्रयत्न करीत असताना डांगे यांच्या प्रतिपादनांत मोठेही दोष राहिले असले तरी ते क्षम्य असून त्यांच्या धैर्याचे कौतुक करावयास हवे, असा अभिप्राय त्यांच्या ग्रंथाबाबत योग्य नाही काय, असाही मुद्दा निघणे शक्य आहे. किंबहुना अशी कौतुकाची व सढळ गौरवाची भूमिका डायकॉव्ह या रशियन पंडिताने घेतलेली मला आढळली. भारताचा इतिहास वैशिष्ठ्यपूर्ण आहे अशा ‘ गांधीप्रणीत ’ अपसिद्धांताचे खंडन करण्याचे कार्य कॉ. डांगे यांनी मोठ्या कौशल्याने व पांडित्यपूर्ण तऱ्हेने पार पाडले आहे, अशी ग्वाही

१ Annals of the Bhandarkar Research Institute, Vol. XXX, 1949, p. 344;

२ Ibid, p. 340.

डायकोव्ह यांनी दिली आहे.[1] हा अभिप्राय वाचून मला आश्चर्य तर वाटलेच पण खेदही वाटला !

या घटनेचा अर्थ काय ? डांगे यांच्या ग्रंथावर इतका आंधळा अभिप्राय डायकॉव्हनी द्यावा हे कशाचे द्योतक आहे ? या प्राचीन भारतीय इतिहासाबद्दल व पर्यायाने सर्व प्राचीन मानवेतिहासाबद्दल व विधीच्या मूलस्वरूपाबद्दल या रशियन मार्क्सवाद्याच्या विचारांत स्पष्टता नाही. भारताचा सर्वच इतिहास वैशिष्ट्यपूर्ण असणार हे साधे तत्त्वहि डायकॉव्हने धिक्कारावे याचा दुसरा अर्थ लागत नाही.

वर एके ठिकाणी गॉर्डन चाईल्डप्रभृति ब्रिटिश मार्क्सवाद्यांचा अभिप्राय मी उद्धृत केला आहेच. त्यांनी मात्र डायकॉव्हची चुकीची भूमिका घेतलेली नसून, उलट "भारतीय समाजाच्या वैशिष्ट्याचा विचार डांगे यांनी केलेला नसून ढोबळ मानवेतिहासाच्या चौकटीत भारतेतिहासाला बसविण्याचा प्रयत्न केला आहे", असा स्पष्ट आक्षेप घेतला आहे. कॉ. पामी दत्त या प्रसिद्ध मार्क्सवाद्यानेहि हाच आक्षेप कॉ. डांगे यांच्या ग्रंथाचे परीक्षण करताना घेतला आहे.[2] यावरून मात्र असे दिसते की, ब्रिटिश मार्क्सवाद्यांनी डायकॉव्हची चूक भूमिका न घेता डोळसपणा राखून डांगे यांच्या ग्रंथाचे मोजमाप केले आहे. हाच डोळसपणा राखून प्रा. कोसंबी या मार्क्सवादी संस्कृतज्ञानेंहि डांगे यांच्या एकंदर रचनेवर कठोर उपहासपूर्वक टीका केली आहे. ( भांडारकर प्राच्यविद्यामंदिराची पत्रिका सन १९४८, भाग २९)

खरी गोष्ट हीच आहे की, शूद्रांच्या दास्याला गुलामगिरीची प्रथा समजून चालण्यासारखे श्री. कुंटे यांचे व आता कॉ. डांगे यांचे प्रमाद टाळावयाचे असतील तर सर्वच संशोधकांनी, व विशेषत: मार्क्सवाद्यांनी, डांगे यांनी दाखविलेल्या नव्या पाऊलवाटेचे कौतुक न करता त्यांचे मार्गदर्शन साफ टाकले पाहिजे. शिवरायांच्या राज्यसंस्थापनेला शेतकरी क्रांति[3] समजण्याच्या ' मार्गदर्शना ' प्रमाणेच ही दिशाभूलही महाराष्ट्रीय व भारतीय मार्क्सवाद्यांनी कटाक्षाने टाळली पाहिजे. भारताच्या प्राचीन

१ 'कम्युनिस्ट ' या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या इंग्रजी मासिकाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर १९५० च्या जोडअंकात हा लेख प्रसिद्ध झाला आहे.

२ लेबर मंथली, ( जानेवारी १९५० ; पान ४३ )

३ ' क्रांति ', १७ फेब्रुवारी १९३८ च्या अंकांतील लेख पाहा. याच अनुरोधाने श्री. लालजी पेंडसे यांनी लिहिलेली ' धर्म की क्रांति ' ही पुस्तिका पाहावी.

इतिहासात मोहन-जो-दारोच्या संस्कृतीमुळे व नंतरच्या घडामोडींमुळे जी वैशिष्टयपूर्ण वर्णव्यवस्था, विशिष्ट ग्रामसंस्था, वतनदारी व राजसत्ता निर्माण झाली, तिचा परिश्रमपूर्वक व नम्र जिज्ञासू वृत्तीने अभ्यास करण्याचे कर्तव्य आज भारतीय मार्क्सवाद्यांच्यापुढे आहे. ते पार पाडण्यासाठी डांगे यांनी घातलेला पायंडा म्हणजे एक टाळावयाचा व धोक्याचा मार्ग आहे एवढेच सांगणे, हे प्रस्तुत परीक्षणाच्या मर्यादेत मला शक्य आहे.

शेवटी मला हे मांडणे आवश्यक वाटते की, संशोधनाच्या क्षेत्रात डांगे यांनी ग्रंथरूपाने एक भ्रष्ट, साहसी व दिशाभूल करणारी कृती निर्माण केली आहे. शिवकालाविषयीचे संशोधन, प्राचीन भारताचे संशोधन, साहित्याचे मूल्यमापन, गांधीवादाचे व राष्ट्रवादाचे आकलन, आंतरराष्ट्रीय बंधुत्वाचें आकलन या व अशा सर्वच क्षेत्रात या अधांतरी, साचेबंद व साहसी प्रवृत्ती टाकणे जरूर आहे. केवळ प्राचीन भारतीय संशोधनाच्या दृष्टीनेच नव्हे, तर भारतातील मार्क्सवादाच्या व संशोधनाच्या भवितव्याच्या दृष्टीने व भारतीय मार्क्सवाद्यांना अंतर्मुख करण्याच्या दृष्टीने, ही गोष्ट स्पष्टपणे नमूद करणे मला जरूर वाटते.

**समाजविकासाच्या अवस्था**

| मिल व कुंटे | डांगे | एन्गल्स |
|---|---|---|
| पारधजीवी | पारधजीवी | |
| वर्गविहीन समूह | वर्गविहीन आर्यसमूह | मिलप्रमाणेच |
| पशुपाल भटके समूह | गोपाल भटके आर्यसमूह | मिलप्रमाणे |
| कृषक वर्गनिष्ठ | कृषक वर्गनिष्ठ | मिलप्रमाणे |
| दासप्रथेचे समूह | दासप्रथेचे आर्यसमूह | |
| भूदास ( सर्फ ) व्यवस्था | | मिलप्रमाणे |
| भांडवलदारी व्यवस्था | | मिलप्रमाणे |
| | | कम्यूनिझमची अवस्था |

# बुवाबाजीचा भस्मासुर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 67236 वि: निबंध
क्रमांक 9889 नों. दि: 11/1/80

किर्लोस्कर मासिकाने तीस वर्षांपूर्वी बुवाबाजीविरुद्ध जी मोहीम केली ती अद्यापही वाचकांच्या स्मरणात ताजी असेल. गेल्या तीन दशकांत समाजात शिक्षणाचा प्रसार होऊनही बुवाबाजीची आपल्या जीवनातून उचलबांगडी झाली नाही; उलट ती भूमिगत होऊन अनेक क्षेत्रांत आपला प्रभाव गाजवीत आहे, असे दिसून येते. बुवाबाजीचा हा भस्मासुर कायमचा नष्ट करणे शक्य आहे का, हा खरा प्रश्न आहे.

बुवाबाजीचे ओंगळ प्रकार चव्हाटयावर आणणे हे एक महत्त्वाचे कार्य आहे. आचार्य अत्रे यांनी नारायणमहाराजांच्या दुष्कृत्यांबद्दल नवयुगच्या दिवाळी १९६४ च्या अंकात लेख लिहिला आहे. 'सत्यकथेत' ( दिवाळी १९६४ ) श्री. चिरमुले यांनी 'श्रीशिल्लक' या नावाची एक करूणकथा लिहिली आहे. हे सारे वाचून मन उद्विग्न होते व संताप येतो. यापूर्वी अनेकदा या ना त्य. बुवाच्या लीलांचे वर्णन मराठी वाचकांसमोर आलेले आहे. मला स्वतःला एका बुवाचे लीलाचरित्र लहानपणापासूनच जवळून पाहावयास मिळाले व तेव्हापासून मला एका गोष्टीचे मात्र नवल वाटत आले आहे. अनेकदा उघडकीस आलेला हा ओंगळ प्रकार पुन्हा राजरोस चालू शकतो कसा ? यावर उपाय कोणता ? का हे असेच चालावयाचे ? उद्वेग व संताप थोडावेळ बाजूला ठेवून या प्रकाराकडे पाहिले तर मग आपल्याला असे दिसू लागते, की हा प्रकार ओंगळ आहे, पण पारलौकिकाच्या क्षेत्रापुरताच मर्यादित नाही. राजा प्रजावत्सल असावा, पण पुष्कळसे राजे प्रजेला छळणारेच होते. पुढारी लोकसेवक असावा, पण अनेक पुढारी स्वार्थसाधूच असतात. विद्वान लोकसेवक असावा, पण प्रत्यक्षात अनेकांचे पांडित्य म्हणजे द्रव्य, मान व सत्ता मिळविण्यासाठी धडपड करण्याची

चातुरीच ठरते. प्रत्येक व्यवसायातच खोटेपणा, दंभ व ओंगळपणा दिसतो, साहजिकच बुवाबाजीही आढळते. या ना त्या आमिषाने किंवा धाकाने दुबळ्या माणसांना 'नादी लावण्याची' किमया ज्यांच्या अंगी असते तो आपल्या क्षेत्रात किंवा व्यवसायात 'बुवा' बनतो. त्याचे भोळे व धूर्त शिष्य त्याची आरती करतात. भोळे शिष्य लुबाडले जातात. धूर्त शिष्य बोवांची व आपली तुंबडी भरून घेतात. सारांश बुवाबाजीचा प्रकार सगळ्या मानवी व्यवहारांत सदासर्वदा चालू आहे. विभूतिपूजेचे स्तोम माजणे हे बुवाबाजीच्या रोगाचे मूळ आहे. अध्यात्माच्या किंवा पारलौकीकाच्या बाबतीत हे स्तोम माजले म्हणजे त्याला आपण बुवाबाजी म्हणतो. प्रस्तुत लेखात या अध्यात्मक्षेत्रातील बुवाबाजीपुरतेच लक्ष केंद्रित करून उपायाचा विचार या ठिकाणी मी केला आहे.

अध्यात्म, तत्त्वज्ञान किंवा काही गूढ असामान्य असे अनुभव मिळविण्याची जिज्ञासा आपल्यापैकी अनेकांना असते व ती श्रद्धान्वित असते. ही श्रद्धा नसलेल्या माणसाला नास्तिक, पाखंडी, संसारात गुरफटलेला म्हणून हिणविण्यास हे भाविक लोक तयार असतात. नुसत्या बुद्धीने किंवा तर्काने विश्वाचे कोडे सुटत नाही, भावनेला व अनुभवाला महत्त्व आहे, वगैरे युक्तिवाद ह्या भाविकांकडून केला जातो. अशा या भाविकांना तरी नेमके काय हवे असते ?

## भाविकाला काय हवे असते ?

भाविकाचे ईप्सित काय असते ? या प्रश्नांची उत्तरे अनेक आहेत; आणि अनेक असूनही उत्तर शेवटी एकच आहे. कसे ते पाहा. कोणी या ना त्या देवाला मानणारे आहेत; त्यांना त्या देवाची कृपा हवी असते. कोणी असे देवभोळे नसणारे 'तत्त्वज्ञानी भाविक' आहेत. त्यांना विठ्ठल, शंकर अशा सगुण देवांची भक्ती म्हणजे अज्ञ लोकांची भावडी भाविकता वाटते. या भाबडेपणाची कीव करीत ते म्हणतात की आम्हाला ब्रह्मज्ञान हवे आहे. मीपणा हा केवळ एक संकुचितपणा आहे, अहंकार आहे व तो गळाला की 'मी ब्रह्मच आहे' असा अनुभव येतो, असीमत्वाशी एकरूपता लाभते व आत्मा पूर्ण आनंदमय होतो. तो आनंद म्हणजेच आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान असे सांगणाऱ्या या तत्त्वज्ञानी भाविकांना या अनुभवाची तीव्र इच्छा असते. हा अनुभव घेण्यासाठी कुंडलिनी जागृत करावी लागते असे मानून काही भाविक योगमार्गाकडेही वळले आहेत. भाविकांचे ईप्सित काय ? या प्रश्नाची उत्तरे मला अशी भाविक मित्रांनी वेगवेगळी दिलेली आहेत. या वेगवेगळ्या

उत्तरांत शेवटी एकच गर्भित अर्थ आहे, याची कल्पना मला एका 'अवलिया' माणसाने दिली. एका सामान्य व्यक्तीचे बोलणे मी येथे देत आहे, कारण अशा व्यक्तीचे आध्यात्मिक अनुभवाचे निवेदन हे तुमच्या आमच्या मनाला जास्त पटणारे व उमगणारे ठरेल.

बसने वाईला जात असता बस बंद पडल्यामुळे आम्ही सारे उतारू तास दीड तास रस्त्याच्या कडेला खोळंबून बसलो होतो. तेथे एका झाडाखाली एक माणूस एकटाच बसला होता. तेथेच जवळ मी बसलो होतो. त्याने खिशातून सिगरेटची पेटी काढली व मला काडचाची पेटी मागून, मला एक सिगरेट दिली व आपण एक शिलगाविली. तो उतारूपैकी नव्हता. तो येथे एकटाच का बसलेला असावा अशी कल्पना माझ्या मनात आली. ती जणू काय त्याने हेरली व म्हणाला, 'मला इथेच बसावेसे वाटले. कारण तुमची व माझी भेट व्हावयाची होती !' मी थोडे चकित होऊन त्याच्याकडे पाहिले. तो साधा शेतकरी नव्हता. हे त्याच्या धेडगुजरी पोषाखावरूनच दिसत होते. मळकी पँट व थोडा फाटलेला शर्ट, दाढी वाढलेली व तोंडात सिगारेट. तो कोण असावा असे माझ्या मनात येते तोच त्याने आपली हकीकत सांगायला सुरवात केली.

तास दीड तास आम्ही बोलत होतो. त्यात मुख्य विषय त्याच्या एका गुरूच्या सामर्थ्याचा, त्याच्या स्वतःच्या योगसाधनेचा, लोकांच्या हितासाठी एखाद्या ग्रामोद्धार करू पाहणाऱ्या कार्यकर्त्याप्रमाणे त्याने केलेल्या सेवाकार्याचा होता. एकंदरीत मोठा विलक्षण आणि सत्प्रवृत्त माणूस वाटला, पण अवलिया प्रवृत्तीचा वाटला. त्याच्या वागण्यावरून तो मोठ्या समाधानी वृत्तीत दिसला आणि त्याच्या हलाखीची त्याला पर्वा नव्हती असेही दिसले. तो कोणी मोठा सिद्धपुरुष नव्हता, पण मला तो विरक्त व प्रामाणिक वाटला.

त्याच्याशी झालेल्या बोलण्यातले एक वाक्य मला नेहमी आठवते. तो म्हणाला, ' माझ्या गुरूंनी मला सांगितले की कोणतीही साधना व पंथ असला तरी खऱ्या साधकाला शेवटी एक मिळते व ते म्हणजे पूर्ण समाधान. काही इच्छा उरत नाही किंवा होईल ती इच्छा ईश्वर पुरी करतो. संसारी माणसांनाही समाधान मिळते, पण ते कधीकधी मिळते व अपुरे मिळते. " एका फाटक्या विक्षिप्त साधकाने सांगितलेले ते वाक्य फार मार्मिक होते, असे मला वाटते. ईश्वरी कृपा, आत्मज्ञान, कुंडलिनीची जागृती ह्या साऱ्यांतून काय मिळते ? संसारी जीवांना न मिळणारे असे एक पूर्ण समाधान !

## पूर्ण समाधानाची दृष्टी

अध्यात्माची दृष्टी ही अशी आहे. ही दृष्टी मुद्दाम पत्करावी लागते किंवा पारंपरिक भाषेत बोलावयाचे तर ही दृष्टी पूर्वजन्मींच्या सुकृतामुळे आपोआपच येते. कधी असेही घडते की संसारात आलेल्या दु:खद अनुभवामुळे माणूस वैराग्यशील होतो व साधक बनतो. तुकाराममहाराजांना असे वैराग्य आले, असे त्यांनीच सांगून ठेवलेले आढळते. पण कारण काही घडो, माणसाला साध्या जीवनातला अपूर्णपणा जाणवतो व तो 'पूर्ण समाधाना'च्या मार्गाकडे वळतो. मग ज्याची जशी परंपरा असेल त्याप्रमाणे तो सगुण भक्ति करतो, ज्ञानमार्गाला लागतो किंवा योग-मार्गातील अवघड साधना करू लागतो. यांतच त्याला मग मार्गदर्शकाची गरज भासू लागते व त्याच्या पुण्याईने त्याला गुरू भेटतो.

येथवर जे अध्यात्माबद्दल सांगितले ते 'पूर्ण समाधानाच्या' प्रेरणेबद्दल झाले. साध्या संसारी माणसाला ही प्रेरणा नसते. ती प्रेरणा काही कारणाने मनात उत्पन्न झाल्यावर माणूस अध्यात्माच्या बौद्धिक तत्त्वज्ञाना-कडे वळतो; उलट, काही वेळी माणसाला 'पूर्ण समाधान' मिळणे शक्य आहे अशी स्वत:ची बौद्धिक खात्री पटल्यावर मगच ती प्रेरणा उत्पन्न होते. बौद्धिक खात्री पटल्यावर श्रद्धा उत्पन्न होते, का श्रद्धा अस-ल्यामुळे बौद्धिक खात्री पटते, हे सांगणे या बाबतीत कठीण आहे. किंबहुना, इतर कोणत्याही बाबतीत हे सांगणे कठीण असते. अमुक एक माझ्या बुद्धीला पटते आणि श्रद्धेला पटते असे जेव्हा मनुष्य मानतो, तेव्हा तो जवळजवळ एकच गोष्ट अनुभवीत असतो व सांगत असतो. श्रद्धा आंधळी व बुद्धी डोळस असते असे आपण मानतो खरे, पण हा फरक प्रत्यक्षाच्या कसोटीवर टिकत नाही. कौटुंबिक जीवन किंवा सामूहिक जीवन घ्या किंवा व्यक्तीचे जीवन घ्या. त्यात आपली वागणूक पुरती डोळस नसते किंवा पुरती आंधळीही नसते. श्रद्धा व बुद्धी यांतील भेद व्यवहारात दिसत नाही. माणूस काही उद्देश मनात धरून कार्य हाती घेतो व तो उद्देश सफल होण्याची शक्यता मनात बाळगूनच तो पहिले पाऊल टाकतो. ही शक्यता त्याला वाटते ती अर्धवट श्रद्धेच्या स्वरूपाची व अर्धवट बौद्धिक स्वरूपाची असते. साध्या व्यवहारात असे असते आणि 'पूर्ण समाधानाची' दृष्टीहि अशीच असते. प्रयत्न केल्यास माणसाला 'पूर्ण समाधान' मिळविता येईल अशी बौद्धिक धारणा व श्रद्धा एकवटून मगच माणूस या मार्गाकडे वळतो.

 अध्यात्म-मार्गाकडे नेणारी श्रद्धायुक्त बुद्धी अनुभवावर आधारलेली

असते. हा अनुभव साधकाला आलेला नसतो. परंतु अध्यात्ममार्गातील ऋषिमुनींना किंवा सिद्धांना आलेला असतो. सिद्धांनी ग्रंथांतून उपदेशिलेल्या मार्गाने गेले असता तो अनुभव आपल्याला येईल अशी केवळ बौद्धिक धारणा काही साधकांची असते. पण बहुतेक वेळी साधकाला हा उपदेश देणारा सिद्ध प्रत्यक्षच भेटतो. त्याला गुरु मानून साधक आपली साधना करू लागतो. प्राचीन काळी होऊन गेलेल्या ऋषिमुनींचा किंवा आपल्याला भेटलेल्या गुरूचा अनुभव साधकाला प्रमाण असतो. या अनुभवास खऱ्याखोटयाची कसोटी लावता येत नाही. तत्त्वत: कोणताच अनुभव आपण खोटा मानू शकत नाही. उदाहरणार्थ कावीळ झालेल्या माणसाने 'मला साऱ्या वस्तू पिवळ्या दिसत आहेत' असे सांगितले तर आपण ते खोटे मानीत नाही; पांढऱ्या वस्तूदेखील त्याला पिवळ्या दिसतात व त्याचा हा अनुभव खराच असतो. एखाद्याच्या साध्या अनुभवाचेही खंडन करणे, म्हणूनच व्यर्थ असते. तसेच या आध्यात्मिक अनुभवाबाबतही आहे. मानवाचे मन कल्पना करू शकते व काल्पनिक अनुभवहि घेऊ शकते. आपली स्वप्ने म्हणजे अनुभवच असतात. स्वप्न असो की जागृत मनाचा अनुभव असो, अनुभव घेणाऱ्या व्यक्तीला तो अनुभव आलेला असतो, हे कोणालाही नाकारता येत नाही. आध्यात्मिक अनुभव किंवा इतरही काही तसे अनुभव खोटे असतात किंवा ते एक ढोंग असते असे म्हणणारे 'नास्तिक' आढळतात. मला वाटते की अशा नास्तिकांची भूमिका तत्त्वत: चूक असते. मानवी मन किती विविध तऱ्हेचे अनुभव घेऊ शकते याची अशा नास्तिकांना कल्पना नसते.

सिद्धांना आलेला आध्यात्मिक अनुभव शब्दांनी पूर्णपणे सांगता येत नाही असे म्हटले जाते व तेही अगदी बरोबरच असते. याचे कारण असें आहे की कोणताही अनुभव शब्दांनी वर्णन करू गेले तर शब्द तोकडे पडतात. समजा, एक मनुष्य रोगाने जर्जर होऊन महिनोमहिने अंथरुणाला खिळलेला आहे. त्याला येणारा कंटाळा त्याला असह्य होतो, परंतु त्याचे त्याने वर्णन केले तर ते अपुरेच ठरते. नंतर तो बरा झाल्यावर, समजा, एखाद्या डोंगरमाथ्यावर चढून गेला तर तेथून दिसणारे भव्य सृष्टिसौंदर्य पाहून त्याचे मन भरून येईल. त्याचा हा आनंदही त्याला शब्दांनी व्यक्त करता येणार नाही. साध्या इंद्रियांच्या अनुभवांचे व नित्याच्या मनोव्यापारांचे शब्दांनी पुरते वर्णन होऊ शकत नाही. हीच गोष्ट आध्यात्मिक अनुभवांबाबत खरी आहे. आध्यात्मिक मार्गाने साधक जात असताना त्याला येणारे अनुभव

किंवा सिद्धाला आलेला 'पूर्ण समाधानाचा' किंवा 'पूर्ण ज्ञानाचा' अनुभव अनिर्वचनीयच असतो. यात विलक्षण असे काहीच नाही, कारण 'अनुभव' ही गोष्ट शब्दातीत असते.

## सर्वंकष ज्ञान व सामर्थ्य यांचा लाभ

सामान्य संसारी माणसाच्या जीवनात 'पूर्ण समाधान' लाभू शकत नाही, म्हणून अध्यात्माकडे वळून 'पूर्ण समाधाना'चे श्रेय मिळवू पाहणारे साधक या ना त्या साधनेत मग्न झालेले आढळतात. पण, अध्यात्माच्या मार्गात आणखी काही प्रेरणा असू शकतात. नुसते 'पूर्ण समाधान' नव्हे, तर सामान्यांना कधी न लाभणारे 'पूर्ण ज्ञान व सामर्थ्य' लाभावे अशी कांही साधकांची इच्छा असते. त्यांची अशी श्रद्धा व बौद्धिक धारणा असते, की ईश्वरी कृपेमुळे किंवा योगसाधनेमुळे साधक सर्वज्ञ बनू शकतो व त्याच्या अंगी अलौकिक शक्तीचा संचार होऊ शकतो. भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांतील घडामोडींचे संपूर्ण साक्षात ज्ञान, रोग बरे करण्याचे गूढ सामर्थ्य किंबहुना सचेतन व अचेतन अशा वस्तुजातावर पूर्ण प्रभुत्व मिळविता येणे हा आध्यात्मिक मार्गाकडे जाणाऱ्या काही साधकांचा उद्देश असतो. पूर्ण ज्ञान व सर्वंकष सामर्थ्य सिद्धांना लाभलेले असते असे या साधकांना पटलेले असते. या बौद्धिक खात्रीच्या मागे त्या साधकांना स्वतःला आलेले किंवा ऐकून माहीत झालेले 'अनभव' असतात.

सर्वंकष व साक्षात्कारी ज्ञान व वस्तुजातावर प्रभुत्व गाजविण्याचे सामर्थ्य सिद्धाना लाभलेले असते असे मानणारा साधक साऱ्या विश्व-रचनेसंबंधी एक कल्पना मानीत असतो. तो असे मानतो की विश्व ही एक विराट रचना आहे व तिच्या दृश्य पसाऱ्यामागे एक ईश्वर आहे किंवा चित्शक्ति आहे. जे काही घडते ते ईश्वराच्या इच्छेने किंवा या शक्तीच्या स्फुरणाने घडते. सारांश, सामान्य मानवाच्या आवाक्या-पलीकडचे असे एक ज्ञानाचे व सामर्थ्याचे केंद्र आहे व त्या केंद्रांतील स्फुरणाचा कमीअधिक स्पर्श मानवाच्या हृदयाला झालेला आहे. आता, या केंद्राशीच जर एखादा मानव एकरूप झाला तर काय होईल? त्या मानवालाही पूर्ण ज्ञान व पूर्ण सामर्थ्य लाभेल. सिद्धांना ही एकरूपता साधलेली असते म्हणून ते त्रिकालज्ञ व सर्वसामर्थ्यसंपन्न असतात. ते आपल्या ज्ञानाचा लाभ केवळ दृष्टिपाताने शिष्याला करून देतात, किंवा 'शक्तिपाता'ने, (म्हणजे शिष्याच्या कुंडलिनीला जागी करण्या-साठी शक्तीचे संक्रमण करून) साधकाच्या अंगी ते सामर्थ्य आणू

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........................ दि:
क्रमांक ........................ नों: दि: ..................

शकतात. आध्यात्मिक भाविकाच्या दृष्टीने विश्वाचे स्वरूप व मानवाला साधनेने लाभू शकणारे पूर्ण ज्ञान, सामर्थ्य व समाधान अशा तऱ्हेचे असते.

पूर्ण समाधान, पूर्ण ज्ञान आणि पूर्ण सामर्थ्य अशा या सर्वकष पूर्णतेचे श्रेय साधकाला साधावयाचे असते. यापैकी केवळ पूर्ण समाधानाचे श्रेयच ज्यांना पुरेसे वाटते असे साधकहि मला परिचित आहेत. त्रिकालज्ञ होणे किंवा दिव्य सिद्धी प्राप्त करून घेऊन अलौकिक चमत्कार करणे या गोष्टींना ते महत्त्व देत नाहीत. त्यांना असेही वाटते की या गोष्टी खऱ्या आध्यात्मिक साधनेत अडथळा आणणाऱ्या आहेत. पातंजल योगमार्गाच्या परपरेतही सिद्धींना असेच अनिष्ट मानलेले आहे. पण या साधकांना असे मात्र पटलेले दिसते, की त्रिकाल ज्ञान प्राप्त होणे किंवा चमत्कार करण्याचे सामर्थ्य लाभणे या गोष्टी आध्यात्मिक साधनेमुळे शक्य आहेत. या गोष्टी अडथळ्यांसारख्या आहेत खऱ्या, पण त्या लाभतात हे मात्र सत्य आहे.

## बुवाबाजीचे मूळ

येथवर मी आध्यात्मिक साधनेचे स्वरूप व उद्दिष्टे सांगितली. आपल्या सुशिक्षित व अशिक्षित समाजात यालाच अध्यात्म म्हणून ओळखतात व यावरच बहुसंख्य माणसांची श्रद्धा असते. ही श्रद्धा जोवर सर्व लोकांमध्ये पसरलेली व दृढ आहे तोवर या आध्यात्मिक साधनेकडे काही लोक वळणे अटळ आहे आणि या साधनेत मार्गदर्शकाची म्हणजे गुरूची गरज वाटणेही अटळ आहे. या गुरूला पूर्ण ज्ञान व पूर्ण सामर्थ्य लाभलेले आहे असे मानल्याशिवाय तो साधकाचा मार्गदर्शक होऊच शकत नाही. ईश्वराची कृपा होण्याइतकेच महत्त्व गुरुकृपेला आहे ते यामुळेच. हे गुरुकृपेचे महत्त्व गुरुमहाराजांनाही किती मनोमन पटलेले असते हे पाहण्यासारखे आहे. स्वामी नित्यानंद महाराजांची पुढील दोन वचने पाहा :

(१) ‘भवतारक श्रीसद्गुरू नित्यानंद समर्थांच्या चरणकमलाचे तू निरंतर स्मरण कर.’

(२) ‘श्रीसद्गुरूंना मनुष्य समजणे महापाप आहे म्हणून त्यांना परःशिव समज.’

आध्यात्मिक साधनेत साधकाने प्रयत्न करावयाचे असतात हे खरे, परंतु ज्ञानाचा व शक्तीचा लाभ होतो तो गुरूकडून कृपेच्या स्वरूपात होतो. मेघातून वृष्टी व्हावी तशी गुरूची कृपा व्हावयाची असते. सामर्थ्याचा लाभही असाच होतो. यात साधकाने केवळ शिकून संपादन

करण्याने ज्ञान किंवा सामर्थ्य लाभते अशी कल्पनाच नसते. यात मंत्र-तंत्राच्या कल्पनेशी जुळणारी भूमिका असते. समजा, एका माणसाजवळ सर्पविष उतरविण्याचा मंत्र आहे. हा मंत्र म्हणजे एक ज्ञान आहे. आता हा मंत्र त्याने दुसऱ्याला शिकवावयाचे ठरविले तर तो त्याच्याकडून काही पथ्ये व बंधने पाळण्याचे वचन घेतो व त्याची कडक परीक्षा घेतो. तो शिष्य कसोटीला उतरला म्हणजे त्याला मंत्र देण्यात येतो. मंत्र मिळताच शिष्याला ज्ञान व सामर्थ्य लाभते.

आध्यात्मिक साधनेत साधक व गुरु यांच्यातील नाते लौकिक तऱ्हेचे नसते—नुसते शिक्षक व विद्यार्थी यांचे नसते. त्यात एक वेगळाच एक-रुपतेचा संबंध असतो. एकदा असा संबंध मानला की मग गुरुशिष्यांतल्या संबंधांना लौकिक अर्थाने आदर, प्रेम इत्यादि भावनांपेक्षा जास्त दृढता येते आणि मग असे एक वातावरण निर्माण होते, की, 'बुवाबाजी'च्या कमी अधिक ओंगळ प्रकारांना वाव मिळू शकतो. प्रत्यक्षात घडलेल्या प्रकारांना चव्हाटचावर आणूनही बुवाबाजीचे प्रकार नित्य नवे घडतच राहतात, याचे रहस्य या वातावरणात आहे व पर्यायाने आध्यात्मिक साधनेच्या मूलभूत उद्दिष्टांत आहे. यावरून मी तरी असाच निष्कर्ष काढू शकतो, की हे वातावरण प्रभावी आहे तोपर्यंत बुवाबाजीवर काही तोडगा सापडणे फारच कठीण आहे.

## अपूर्ण ज्ञान व सामर्थ्य

आध्यामिकतेच्या वातावरणात, बुवाबाजीवर उपाय सापडणे कठीण आहे, ह्या माझ्या भूमिकेशी माझे आध्यात्मिक मार्गातले मित्र सहमत होणार नाहीत. ते म्हणतील की बुवाबाजीचे पाप हे अध्यात्ममार्गावर लादणे चूक आहे. उदात्त गोष्टींचे विडंबन नेहमीच होते. तसेच अध्यात्माचे विडंबन होते. काही अंशी त्यांचे म्हणणे खरे आहे व म्हणून बुवाबाजीच्या पापाला चव्हाटचावर आणणे आवश्यक आहे, हे मलाही पटते. परंतु बुवाबाजीचा धोका खरोखर कमी करावयाचा असेल तर आणखी एका गोष्टीची गरज मला वाटते. ती अशी की 'पूर्ण समाधान', 'पूर्ण ज्ञान', 'पूर्ण सामर्थ्य' या पूर्णतेच्या उद्दिष्टाबद्दलच आपण गंभीरपणे विचार करायला हवा. किंबहुना, एक वेगळाच अनुभव मोलाचा मानायला हवा. हा अनुभव कोणता ?

जीवनात येणारा अपूर्णतेचा अनुभव हाच माझ्या दृष्टीने सर्वांत मोलाचा आहे. ही अपूर्णता प्रत्येक बाबतीत अनुभवास येते. आपले समाधान अल्प काळ टिकणारे असतेच; शिवाय त्यातही असमाधानाचे

शल्य असते. आपले ज्ञान कोते असतेच; शिवाय त्यात भ्रमाचे मिश्रणही आढळते. आपले सामर्थ्य तोकडे तर असतेच, शिवाय त्यात कोठेतरी दुबळेपणाचा भाग असतो. सिद्धांचा व साधकांचा आध्यात्मिक अनुभव जर अनुभव म्हणून सत्य मानावयाचा तर तुमचा–आमचा सामन्यांचा अनुभवही सत्यच मानायला हवा. या अपूर्णतेच्या अनुभवाला फार मोठा अर्थ आहे. मानवाला जर खऱ्या अर्थाने नम्रता यावयाची असेल तर त्याने आपली अपूर्णता दृढपणे जाणली पाहिजे. जर खऱ्या अर्थाने कर्तृत्वाची प्रेरणा त्याला हवी असेल तर देखील ही अपूर्णताच नीट ओळखली पाहिजे.

विश्वरचना ही नियमबद्ध आहे ही गोष्ट अगदी प्राचीनतम काळीच मानवाला उमगली. परंतु नियबद्धता कळूनही सृष्टीचे नियम किती अपूर्णपणे कळले आहेत! एखाद्या यंत्रासारखे किंवा घड्याळासारखे त्याच त्याच चाकोरीत फिरणारे हे विश्व आहे, ही विज्ञानाची न्यूटनच्या काळातील कल्पना होती. आता असे उमगले आहे की विश्व चाकोरीत फिरणारे नसून त्यांत सतत नवनिर्मिती होत आहे. पण हे कळूनही फारसे न कळल्यासारखे आहे. आज अणुशक्तीचा वापर करण्याचे सामर्थ्य मानवजातीला देणारा वैज्ञानिकही न्यूटनप्रमाणेच नम्रपणे म्हणत आहे की आमचे ज्ञान वाळूच्या कणाएवढे तोकडे आहे. विश्वातील सर्व शक्तींचे केंद्र आपल्या हाती गवसेल असा अभिमानही वैज्ञानिक कधीच बाळगीत नाही. त्याचा प्रयत्न एकेका शक्ति–कणासाठी असतो. आपले ज्ञान व सामर्थ्य अपूर्णच राहणार आहे याची त्याला नित्य जाणीव असते. वैज्ञानिकाची ज्ञानसाधना या अपूर्णतेच्या जाणिवेने सतत नम्र अशी असते.

विज्ञानाची दृष्टी अपूर्णतेच्या जाणिवेची व नम्रतेची आहे. ही दृष्टी मानवी व्यवहारातील नैतिकतेबद्दलही ठेवता येईल. मानवी जीवनात अनेक संस्था व संकेत निर्माण झाले, व नैतिकतेचे आदर्श पुढे ठेवून माणसे जगली. पण कुटुंबसंस्था, विवाहसंस्था इत्यादि संस्थांचा इतिहास पाहिला तर काय दिसते ? अपूर्णताच अनुभवाला येते. दांपत्यजीवनाला एक पवित्रतम व पूर्ण आदर्श मानला खरा, पण प्रत्यक्षामध्ये तो आदर्श अपूर्णच राहिला; आणि या अपूर्णतेमध्येच आदर्शासाठी प्रयत्न करणे ही नैतिकतेची कसोटी अनुभवाला आली. हीच गोष्ट आपल्या साऱ्या वैयक्तिक व सामूहिक जीवनात पदोपदी दिसून येते.

मानवी ज़ीवनाची ही अपूर्णता जर पुरतेपणी ओळखली तरच मनाला एक समतोलपणा व खरे समाधान लाभू शकते असा अनुभव मला येतो. हाच अनुभव, मला वाटते, सर्वसामान्य माणसाला येतो. या समाधानाला फोल समजून 'पूर्ण समाधाना'च्या अध्यात्माचा मार्ग माणसे का स्वीकारतात, ते मला उमगत नाही. जन्मताच मातापित्यांना आनंदित करणारा चिमुकला जीव दुबळा असतो. तरी आपल्या अपूर्णतेमुळे व असहायतेमुळेच तो आनंद देऊ शकतो. मृत्यूच्या क्षणीही जीव दुबळा असतो, पण तरीहि आपल्या जीवनयात्रेतील कर्तृत्वामुळे तो कृतार्थतेचा आनंद भोगू शकतो. जन्ममृत्यूच्या सीमांनी बांधलेले हे अपूर्ण आयष्य 'समाधान' देऊ शकते व ते समाधान खरेखुरे असते. या आयुष्याकडे पाठ फिरवून, संसारापासून निवृत्त होऊन, 'पूर्ण समाधाना'च्या मागे माणसाने का लागावे ?

याचे उत्तर देताना अध्यात्ममार्गी लोक सामान्य माणसाच्या अपूर्ण आयुष्याला मोहमय, दुःखमय व भ्रमात्मक मायापाशातले गुरफटणे मानतात. 'तरीच जन्मा यात्रे दास ईश्वराचे व्हावे. नाहीतरी काय थोडीं श्वानसूकरे बापुडी' असे म्हटले जाते. संसारातच आसक्तीने राहणाऱ्या माणसांना कुत्री व डुकरे म्हणून त्यांची निर्भत्सना करण्याची ही अध्यात्ममार्गीयांची प्रवृत्ती मला असहिष्णुतेची वाटते. ही असहिष्णुता का निर्माण होते ? तर अपूर्णतेचा अनुभव पचवून आयुष्यात समाधानी राहण्याची व येणाऱ्या सुखदुःखाशी निर्भयपणे झगडण्याची इच्छाच त्यांच्यामध्ये उरलेली नसते. उलट, अपूर्णतेकडे पाठ फिरवून 'पूर्ण समाधाना'च्या मागे हे लोक लागलेले असतात व म्हणून सामन्यांच्या-बद्दल इतक्या तुच्छतेने व असहिष्णुतेने ते बोलू शकतात.

केवळ पाखंडी, निरीश्वरवादी, जडवादी, किंवा 'मानव हाच विश्वाचा मानदंड' मानणारे मानवतावादी अध्यात्ममार्गावर आपापली टीका करीत असतात. त्या टीकेत आध्यात्मिक अनुभवाचे व तत्त्वभूमिकेचे खंडन अभिप्रेत असते. मला तसे खंडन करावयाचे नाही, कारण मला दिसत आहे की अध्यात्ममार्गीयांनाही एका अनुभवाचा आधार दृढपणे लाभला आहे. या अनुभवाला हजारो वर्षांची परंपरा आहे. केवळ भारतीय परंपरेतच नव्हे, तर प्राचीन संस्कृतींच्या परंपरांतून, खिश्चन, मुस्लिम इत्यादि धर्मपथांतून आणि थिऑसफीसारख्या आधुनिक काळातील संप्रदायांतून या पूर्णत्वाचा अनुभव आधारभूत मानलेला आहे. शिवाय

फलज्योतिष, मंत्रतंत्र, प्लॅन्चेट, टेलिपथी, भूताखेताबद्दलच्या घटना इत्यादी बाबतीत येणारे अनुभव देखील या पूर्णत्वाच्या अनुभवाला पोषक ठरणारे आहेत.

या साऱ्या पारलौकिकाच्या अनुभवांची एक प्रचंड व्यूहरचना आहे. यांत सुशिक्षित–अशिक्षित अशा सर्वांचीच मने गुरफटलेली आहेत. या व्यूहाचे खंडन करू पाहणारा नास्तिक मनुष्य कोणती 'अनुभवा'ची गोष्ट सांगू शकतो? 'ईश्वर मी पाहिलेला नाही' हा नकारात्मक अनुभव तो सांगतो व तो साहजिकच परिणामकारक ठरत नाही. मानवतावादी सांगतो की मानव हा विवेकशील (रॅशनल) आहे, पण आपला सर्वांचा नित्याचा अनुभव आहे की मानवी व्यवहारांत अविवेकाचा भागच मोठा असतो. मग ह्या साऱ्या खंडनाचा बोजवारा उडतो व पूर्णत्वाचे परंपरागत तत्त्वज्ञान आणि साधना प्रभावी राहते.

## अपूर्णतेचा अनुभव

या परंपरागत व प्रभावी अनुभवाइतकाच अपूर्णतेचा अनुभवही श्रेष्ठ आहे, ही गोष्ट माझ्या दृष्टीने म्हणूनच फार महत्त्वाची आहे. मानवी जीवनात ही अपूर्णता सर्वांना सतत अनुभवाला येत असते. तिचा तात्विक आधार घेऊन मानवी जीवनाला वळण लावण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आपण अपूर्णतेला तुच्छ समजतो ही चूक आहे. आपले समाधान अपूर्णच असते, आपले ज्ञान तोकडे असते व आपले सामर्थ्य मर्यादितच राहते या अनुभवांमुळे मनुष्य नम्र होऊ शकतो, इतरांशी सहकार्याने वागण्यास तयार होतो व प्रयत्नशील राहूनदेखील भलत्याच आशाआकांक्षांच्या स्वप्नांत मग्न होत नाही. एक मनाची समतोल व शांत वृत्ती या अपूर्णतेच्या खऱ्या जाणिवेमुळे हृदयात नांदू शकते. आज अशा जाणिवेची गरज आपल्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात फार मोठी आहे.

विज्ञानपूर्व काळात आध्यात्मिक भाविकता ही माणसांची सर्वांत मोठी प्रभावी प्रेरणा होती. 'धर्म' ही त्या काळातली समाजधारक शक्ती होती. ह्या शक्तीचे दुष्ट व चांगले असे दोन्ही तऱ्हेचे आविष्कार इतिहासात आपल्याला पाहावयास मिळतात. संसाराकडे पाठ न फिरविता नेकीने वागणारी सदाचारी माणसे त्या काळात धर्मभावनेनेच वागत होती. तसेच प्रपंच नेटका करावा, शुद्ध व्यवहार करून धनसंचय करावा व गरिबांवर दया दाखवावी, आपले प्राप्त कर्तव्य करताना प्राण गमवावे लागले तरी माणसाने कचरू नये, अशा तऱ्हेचा उपदेश त्या काळातल्या संतांनी केलेला आढळतो. या संतांनी पूर्णत्वाचे अध्यात्म

स्वीकारूनदेखील अपूर्ण अशा मानवी जीवनात प्रवृत्तिमार्गाने जाण्याची शिकवण समाजाला दिली व सदाचाराचे व नीतीचें धडे लोकांना दिलें. धर्मप्रवण अशा त्या युगात संतांनी केलेल्या या उपदेशाबद्दल त्यांना धन्यवाद देऊन आपण त्यांच्यापुढे आदराने मान वाकवितो. पण ही आदराची व कृतज्ञतेची भावना मनात वागविताना आपण आध्यत्मिकतेच्या व पूर्णतेच्या तत्त्वज्ञानाला अगतिकपणे शरण जाऊ नये; उलट अपूर्णतेची, 'सान्त मानवते'ची भूमिका दृढपणे स्वीकारावी असे मी येथवर मांडले आहे.

आध्यात्मिक क्षेत्रातील 'बुवाबाजी' पुरता विचार करावयाचा तर 'सान्त मानवते'ची भूमिका लोकांनी दृढपणे स्वीकारणे हाच बुवाबाजीच्या बाबतीत कायमचा व प्रभावी उपाय आहे, असे आपण मानले पाहिजे.

मानवी ज्ञानाच्या व सामर्थ्याच्या अपूर्णतेची नम्र जाणीव जर बहुसंख्य लोकांमध्ये दृढमूल झाली तर पूर्णत्वाच्या कल्पनेकडे लोक डोळसपणे पाहू लागतील. साहजिकच, पूर्ण ज्ञानाचा किवा अलौकिक सामर्थ्याचा लाभ अमक्याला झाला आहे व म्हणून त्याला परात्पर गुरु मानून आपले कोटकल्याण होणे शक्य आहे, ही आशा कोणाच्याही मनात उद्‌भवणे कठीण होईल. आजही आपण जेव्हा एखाद्या विषयातील तज्ञ माणसाकडे सल्ला घ्यावयास जातो तेव्हा त्याला सर्वज्ञ समजत नाही. एका तज्ञाचे मत दुसऱ्या तज्ञाच्या मताशी ताडून पाहतो. हा व्यवहार अपूर्णतेच्या जाणिवेमुळे होणारा डोळस व्यवहार आहे. हा डोळसपणा आला तर बुवाबाजीमुळे होणाऱ्या फसगतीला व अनर्थाला आळा बसणे शक्य आहे. मला तरी एवढा एकच उपाय बुवाबाजीच्या रोगाविरुद्ध प्रभावी दिसतो. हा उपाय जर अनावश्यक किंवा परिणामशून्य म्हणून अंमलात येणार नसेल, तर बुवाबाजीचा प्रकार या ना त्या स्वरूपात चालूच राहील असे मला भय वाटते.

---

'म-हाटी संस्कृती' या ग्रंथातील मुख्य प्रमेय असे आहे की, आर्यपूर्व भारतातील 'हट्ट' नावाच्या एका लोकसमूहाने नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत एक संस्कृती नांदविली; आजचे मराठे व कानडी लोक यांचे पूर्वजीवन अभिन्नत्वाने या संस्कृतीत पोसले गेले; नंतर आर्यांनी दक्षिणापथात प्रवेश केल्यामुळे हट्टजनांच्या संस्कृतीचे आर्यीकरण सुरू झालें व हळूहळू मराठी व कानडी लोकांची भाषा, दैवते, आचार व स्वभाव यांचे द्वैत निर्माण होऊ लागले. यादव काळापर्यंत हे द्वैत पूर्ण झाले व सहोदर अशा मराठी-कानडी संस्कृतींमध्ये वेगळेपणाबरोबरच स्पर्धा व तेढही उत्पन्न होऊ लागली. 'हट्ट' जन हे वेदकाली आर्यांशी संबंध असलेले 'पत्ति' जन असावे असा अंदाजही ग्रंथकर्त्याने मांडला असून, अनुषंगाने आर्यद्रविड संस्कृतीच्या संगमाची चर्चा केली आहे. देशनाम मुळात 'मर' व 'हट' या आर्यपूर्व शब्दांवरून व 'म-हाट' या पूर्वरूपापासून बनविले गेले आहे अशी व्युत्पत्ती त्यांनी मांडली आहे.

श्री. जोशी यांनी मांडलेल्या प्रमेयांचा सहज स्वीकार होणे जसे दुरापास्त होईल, तसेच त्यांची सवंग हेटाळणी करणेही अनुचित ठरेल. ज्ञात इतिहासाच्या जरा मागे गेल्यावर जो अज्ञात अशा प्राचीन जनांच्या देशनामांचा व भाषांच्या पूर्वरूपांचा इतिहास आहे त्याबद्दल आज फक्त अनुमाने व विचारार्ह प्रमेये मांडणे एवढेच संशोधकाला शक्य असते. आर्यांच्या मूळ वसतीस्थानाबद्दलचा लोकमान्यांचा सिद्धान्त घ्या किंवा मोहोन-जो-दरोच्या रहिवाश्यांच्या भाषेबद्दल, दैवतांबद्दल किंवा जीवन-क्रमाबद्दल करण्यात आलेले तर्क घ्या; जेव्हा हे सिद्धांत किंवा तर्क

१ जोशी, शं. बा. 'म-हाटी संस्कृति : काही समस्या', आंतरभारती प्रकाशन,' पुणे १९५२, पृष्ठे २२५

मांडण्यात आले तेव्हा संशोधकांनी अनुमानाचा पाया म्हणून घेतलेला पुरावा व त्याच्यावर उभी केलेली इमारत भक्कम वाटली, पण थोड्याच अवधीत त्या पुराव्याला रद्द ठरविणारी माहिती पुढे आली. ग्रहस्थितीवर आधारलेली कालगणना किंवा कथास्तोत्रादी वाङमयावर रचलेली समाजस्थितींची अनुमाने यांचे दुवे तर फारच कच्चे ठरतात. परंतु उत्खननादि द्वारा उपलब्ध होणाऱ्या अवशेषांच्या आधारावरही निश्चित अनुमाने काढणे या अज्ञात मानवेतिहासाच्या क्षेत्रात शक्य होत नाही. कारण शेवटी अवशेष पार्थिव असले तरी त्यांच्या मूळ स्वरूपाचा व कार्याचा अर्थ लावण्याचा प्रश्न राहतोच.

श्री. जोशी यांच्या ग्रंथातील प्रमेयांची रचना मुख्यतः भाषाशास्त्र व तदनुषंगिक अनुमानपद्धती यांच्यावर आधारलेली आहे. अर्थातच या शास्त्राला प्राचीन अज्ञातात शिरण्याचे एक प्रमुख साधन म्हणून आजपर्यंत मोठे स्थान लाभले आहे. परंतु अग्नी हा जितका उपयोगी तितकाच विघातक ठरू शकतो. तसेच संशोधनाच्या या साधनाचेही दुहेरी स्वरूप आहे हे विसरता येत नाही.

अतिप्राचीन इतिहासाच्या संशोधनामधील हे सर्व धोके व अनिश्चितता ओळखून जिज्ञासु व विनम्र वृत्तीने आपली प्रमेयें लोकांपुढे मांडणारा संशोधक जे मांडील ते उद्या खरे ठरो वा न ठरो; त्याचे संशोधन कार्य नेहमीच अभ्यसनीय असेच राहील. अशा आदराला सर्वस्वी पात्र असलेल्या ग्रंथकर्त्याचा प्रस्तुत ग्रंथ मराठी वाचकांना उपलब्ध झाला आहे याचे मुख्य श्रेय ग्रंथकर्त्याला आहे. त्याबरोबरच प्रकाशनाची जबाबदारी अंगावर घेणाऱ्या 'आंतरभारती' या संस्थेच्या प्रमुखांनाही आपण सर्वांनी धन्यवाद दिले पाहिजेत.

सुरुवातीसच दिलेल्या सारांशावरून वाचकांना कळून आलेले आहेच की, श्री. जोशी यांच्या संशोधनातील नाविन्य व महत्त्व खालील तीन प्रमेयांमध्ये आहे :

(१) मराठी व कानडी संस्कृतींचा आर्यपूर्व अशा हट्टजनसंस्कृतीमधून उद्गम.

(२) 'पडु' या तामिळ धातूपासून निघालेल्या पट्टि-हट्टि-वाडी अशा स्थलवाचक संज्ञांच्या अनुसंधानानें 'मरहाट' या देशनामाची सिद्धि व या पूर्वरूपापासून मऱ्हाट–वऱ्हाट, 'विदर्भ', तसेच 'महाराष्ट्र' या संस्कृत पेहरावांतील देशनामांची व्युत्पत्ति.

 (३) 'वेद व महाभारतकालीन यदु-तुर्वसु, अशोककालीन रिष्टिक-

भोजक, रामायणकालीन ऋषिक-भोजक व मूळ हट्टिकार (कण्णजन व मरहट्ट)' अशी हट्टजनांची अखंड परंपरा.

आता या तीन प्रमेयांची जास्त ओळख यापुढे मी करून देत आहे. मराठी व कानडी संस्कृतीच्या जुळेपणाचे म्हणजे एकाच पूर्वरूपापासून झालेल्या त्यांच्या उद्‌गमाचे प्रमेय प्रस्तुत ग्रंथाचा गाभा समजावा लागेल. हे प्रमेय स्वीकारण्यासारखेच आहे असे मला वाटते. तसे पाहिले तर, अनेक पूर्वसूरींनी हाच निर्णय पूर्वीच देऊन ठेवलेला आहे. त्यांचे ऋण ठिकठिकाणी आदराने नमूद करूनच श्री. जोशी यांनी या प्रमेयाच्या पुष्टीसाठी भाषाविषयक, दैवतविषयक आणि इतर बराच पुरावा सादर केला आहे.

मुख्यत: भाषेचा प्रश्न घेतला तर न्यायमूर्ति रानडे, स्टेन कुनो, ग्रिअर्सन, गोविंद पै, सुनीतिकुमार चटर्जी प्रभृति विद्वानांचा हा अभिप्राय दिसतो की, गुजराती, मराठी, कानडी व तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील भाषांचा अर्वाचीन विस्तार एका द्राविड मूळ रूपावर (base, substratum) झालेला दिसतो; इतकेच नव्हे तर, वायव्येकडे ब्राहुई व पूर्वेकडे बंगाली या भाषा घेतल्या तर त्यांच्याहि तळाशी द्राविड पाया दिसतो. याचा अर्थ असा की, आर्यांच्या आगमनापूर्वीच्या भारतवासियांच्या सर्व प्रादेशिक भाषांना आधारभूत असे एक द्राविड मूलरूप होते व पुढे शतकानुशतकांच्या विकासक्रमात या प्रादेशिक भाषांवर संस्कृत भाषेचा परिणाम होऊन वेगवेगळ्या देशी किंवा प्राकृत भाषा विस्तारल्या गेल्या. श्री. जोशी यांनी हा विचार जमेस घेऊन आर्यपूर्व द्राविड भाषाकुलातील एक भाषा म्हणून हट्टजनांची भाषा गृहीत धरली आहे. नंतर या गृहीत भाषेतून महाराष्ट्री प्राकृत आणि जुनी कानडी अशा दोन भिन्न भाषा निघाल्या व या दोन भाषांचे विभिन्नत्वच वाढत जाऊन बाराव्या शतकाच्या आधी मराठी व कानडी या आजच्या दोन भाषा स्थिरावल्या असे त्यांचे मत आहे.

मराठी व कानडी या भाषांचा तुलनात्मक अभ्यास करून श्री. विठ्ठल रामजी शिंदे व श्री. भास्करराव जाधव यांनी मांडलेल्या पुराव्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून, श्री. जोशी यांनी असे दाखविले आहे की, या दोन भाषांचा केवळ संपर्क मानल्यामुळे त्यांचा परस्परांशी असलेला पूर्वापार संबंध कळून येणार नाही. तेराव्या शतकातील ज्ञानेश्वरांपासून सतराव्या शतकातील मुक्तेश्वरापर्यंत अविच्छिन्नपणे मराठी कवींना कानडी साहित्याशी परिचय ठेवावासा वाटे याची त्यांनी उदाहरणे

दिली आहेत. विशेषत: मुक्तेश्वरांच्या सभापर्वातील मंगलाचरणाचे कुमारव्यास या कानडी महाकवीच्या उद्योगपर्वातील मंगलाचरणाशी साम्य दाखविणारा जो उतारा त्यांनी दिला आहे तो महत्त्वाचा आहे. सन १५०० च्या आधीच्या कानडी काव्यातील मंगलाचरणाशी इतके विलक्षण तऱ्हेने जुळणारे मंगलाचरण सन १६५० च्या सुमारास मुक्तेश्वरांनी लिहिले याचा अर्थ, आपल्या कवींचा कानडीशी गाढ परिचय होता. कानडी भाषेच्या आणि साहित्याच्या प्रभावाची ही परंपरा अनेक संशोधकांनी आजवर मान्य केलेली आहे.

परंतु काव्य आणि साहित्य यांची देवाण-घेवाण ही निर्णायक बाब मानणे प्रस्तुत मुद्द्याच्या दृष्टीने योग्य होणार नाही व म्हणूनच श्री. जोशी यांनी जास्त निश्चितीचा असा पुरावा मांडला आहे. श्री. शिंदे यांनी दाखविल्याप्रमाणे नात्याचे (अप्पा, बाबा इत्यादि) अनेक शब्द या दोन्ही भाषांत समान आहेत. शिवाय अनेक संख्यावाचक शब्द मराठीत व कानडीत एकच आढळत आहेत. यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे किडणे, मिरवणे, कालविणे वगैरे अनेक कानडी धातू जसेच्या तसे मराठीत आहेत.

सारांश, मराठी व कानडी यांचा नुसता संपर्क नसून त्यांचा कुसवा एकच आहे, असे श्री. जोशी यांचे प्रमेय आहे. त्यांनी यापुढे जाऊन कानडीची व मराठीची संस्कृत भाषा आत्मसात् करण्याची कमी-जास्त तत्परता व प्रक्रिया यांचेही मोठे तपशीलवार वर्णन केले आहे. या प्रक्रियेत बौद्ध-जैनांनी आणि ब्राह्मण पंडितांनी कशी भिन्न प्रवृत्ति दाखविली आणि या नागर घडामोडीत सामान्य म्हणजे ग्रामीण जनतेने कसा हातभार लाविला त्याची माहिती प्रस्तुत ग्रंथातूनच जिज्ञासूंनी वाचावी. ' भाषिक पुरावा ' हे सबंध प्रकरण व उपसंहारातील २०८ ते २१६ ही पाने या दृष्टीने वाचनीय आहेत.

या सर्व विवेचनात ' महाराष्ट्री 'च्या उद्‌भवाची व विस्ताराची चिकित्सा मात्र मला पुरेशी वाटली नाही.

भाषिक पुराव्याच्या जोडीला राजकीय घटनांचा जो पुरावा श्री. जोशी यांनी सादर केला आहे तो विचारार्ह आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट इत्यादि राजवंशांनी ज्या प्रदेशात आपली राज्ये स्थापिली तो प्रदेश ' महाराष्ट्र ' म्हणावा तर ही राजघराणी कानडी होती असे दिसते. परंतु तसे पाहिले तर या घराण्यांना ' महाराष्ट्रीय 'ही म्हणता येते ' इतके त्यांचे आजच्या महाराष्ट्राशी घनिष्ठ नाते दिसते. त्यांच्या

राजधान्या कधी महाराष्ट्रात तर कधी कर्नाटकात आढळतात आणि याच्याही बुडाशी जावे तर भारतीय व परस्थ समकालीनांची स्पष्ट समजूत अशी दिसते की, नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंतचा आजच्या महाराष्ट्राला व कर्नाटकाला व्यापणारा सर्वच प्रदेश एक आहे. त्या सर्व प्रदेशाला मिळूनच कधी कुंतल हे नाव आढळते, तर कधी कर्णाट, तर कधी महाराष्ट्र ! सारांश एका सलग प्रदेशातच या राजवंशाचा उदयास्त, राजधान्यांची अदलाबदल आणि व्यापार, कारागिरी व शिल्प यांची अखंडता दिसून येते.

राजकीय घटनांकडून दैवते व धर्मपंथ यांच्याकडे वळले तरी ह्याच एकरूपतेचा प्रत्यय येतो असा निष्कर्ष ग्रंथकर्त्याने मोठ्या तपशीलाने मांडलेला आहे. विठ्ठल आणि खंडोबा, यल्लम्मा ( किंवा अंबाबाई ), मरगव्वा ( किंवा मरिआई ) अशी अनेक दैवते आहेत की जी कानडी व मराठी लोकांना सारखीच आपलीशी वाटतात. आणि विशिष्टत्वाने भक्तिविषय झालेली ही सामान्य दैवते म्हणजे मराठीच्या व कानडीच्या एकरूपतेची प्रतीकेच होत.

दैवताचा विचार करताना या विशिष्ट मराठी कानडी दैवतांची इंद्र, पर्वत, सूर्य, रुद्र, शिव, पार्वती या आर्यांच्या दैवतांशी ग्रंथकर्त्याने कधी सरुपता कल्पिली आहे, तर कधी वैर कल्पिले आहे. या बाबतीत त्यांची मांडणी मला घोटाळ्याची वाटते. आर्यांच्या दैवतांचा तसाच आर्येतर ( किंबहुना आर्यपूर्व ) दैवतांचा उगम यज्ञमिथुनाचे अमरत्व व दिव्यत्व कल्पिल्यामुळे झाला व यज्ञपुरुष व यज्ञस्त्री यांनाच विश्वाचा जनक व जननी, भव व भवानी, सूर्य व सूर्या अशी दैवत रूपे लाभली असावी.[१] हा सिद्धान्त जर खरा असेल तर प्राचीन मानवसंस्कृतींमधील सर्वच दैवतांचा विस्तार एकाच दैवतव्यूहापासून मानावा लागेल. मग, आर्य दैवते आणि द्राविड दैवते यांची यज्ञीय सहोदरत्वामुळे आलेली साम्ये

१ ही भूमिका माझ्या पुढील लेखात पाहावी :
Primitive Society and Yajna, Bhandarkar Oriental Institute, Annals, Vol. XXXI, 1950, pp, 9 –92.

सहज दिसू लागतील. त्या ऐवजी आज असे मानले जाते की, आर्यांच्या पूर्व भारतीयांशी झालेल्या विग्रहात दैवतांचाही जणू विग्रह झाला व मग देवाणघेवाण आणि संकर झाला. साऱ्या मानवजातीच्या प्राचीन दैवतांचे किंबहुना भिन्न दैवतव्यूहांचे एकच मूळ आहे व त्यामुळे प्रादेशिक फरकाने तोच तो दैवतव्यूह साऱ्याच प्राचीनांनी पूजिलेला दिसतो ही

गोष्ट श्री. जोशी यांना मान्य नसावी. त्यामुळे शिव, रुद्र, इंद्र, पर्वत, मल्लय्या, मल्हारी, मार्तंड इत्यादी विविधरूपांचा एकाच यज्ञसंभव देव-कल्पनेशी अन्वय न लावता त्यांनी आर्य दैवते व आर्येतर दैवते यांच्यात मूलभूत भेद कल्पिला आहे. प्रस्तुत ग्रंथातील मूळ प्रमेयांवर या कल्पने-मुळे आघात होत नाही. परंतु दैवतविचारात झालेली ओढाताण एकंदरीत वाचकांचे लक्ष विचलित करणारी ठरेल, असे भय वाटते.

पण दैवतविचारांतून आपण धर्मपंथाकडे आलो म्हणजे मात्र ग्रंथकर्त्याने सढळपणाने मांडलेली माहिती फार उद्‌बोधक वाटते. महाराष्ट्रीय संतांच्या वारकरी पंथाबद्दल जो साधारणत: मराठी माणसाचा समज असतो, त्यात स्वयंभूपणाची भावना दृढ झालेली आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया' ह्या उक्तीचा आपण शब्दश: असा अर्थ घेतो की, जणू काय कोणत्याही पूर्वपरंपरेशिवाय आपोआप मराठी संतांना साक्षात्कार होऊन लाखो लोकांना पंढरीच्या वारीची स्फूर्ती झाली. संतवाङ्मयाचे अभ्यासक ज्ञाने-श्वरांची पूर्वपीठिका पाहतात व नाथसंप्रदायापर्यंतचा ऋणानुबंध पाहतात हे खरे; परंतु श्री. जोशी यांच्या ग्रंथामुळे या ऋणानुबंधाचे स्वरूप नाथां-पुरते ओळखण्यापेक्षा, फारच विस्तृत अशी जुनी नाती जुळविण्याची गरज वाटू लागते. चक्रधरांना 'नग्नदेव' किंवा 'गोमटदेव' म्हणत असत. वीरशैवांचे परमध्येय 'शून्यसाधन' होते. शून्याची परिभाषा बौद्धांत व नाथांतही आहे. तशीच परिभाषा लिंगायतपंथीही वापरतात आणि या सर्वच मार्गांत गुरुसेवेचे परमतत्व सांगितले आहे. या साऱ्या गोष्टींचा संगम होऊन मराठी कानडी धर्मपंथांच्या मागे एकच परंतु बहुशाखायुक्त अशी साध्य व साधना यांची परंपरा दिसू लागते. ही गोष्ट मांडताना श्री. जोशी यांनी केलेले सर्वच विवेचन महत्त्वाचे आहे. मराठी व कानडी राजधान्यांतून दहाव्या शतकानंतरच्या काळात जे विलक्षण विचारमंथन चालू राहिले, त्यात पैठणासारखी शहरे ही नव्या धर्मप्रसाराची केंद्रे बनली. या काळातील राजवंश ज्याप्रमाणे मराठी–कानडी मुलखांवर एकदमच असत त्याप्रमाणे हे धर्मपंथही या मुलखांना एकदमच व्यापीत असत. या दृष्टीने वारकरी, नाथ, वीरशैव, लिंगायत, दत्त व पूर्वीचे दक्षिणभारतीय जैन व बौद्ध या सर्वांचा एका परिसरात व सूत्रात विचार केला पाहिजे, हे श्री. जोशी यांचे मत विवाद्य होऊ शकत नाही. किंबहुना, संतवाङ्मयाच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरावे इतके ते मूलगामी आहे.

 मराठी व कानडी संस्कृतींच्या एका मूळरूपाचे प्रमेय मांडल्यावर

श्री. जोशी यांच्यापुढे सहजच प्रश्न आला की, या मूळरूपाचे कर्ते म्हणून कोणाला मानावयाचे ? यासाठी त्यांनी 'हट्ट'जनांची कल्पना पुढे मांडली आहे. या 'हट्ट' जनांतच विदर्भवासी 'भोजक' जन व आजच्या खानदेशातील 'कण्ण'जन अशा शाखा त्यांनी कल्पिल्या आहेत व या दोन शाखांचा विस्तार आजचा महाराष्ट्र व कर्णाटक यात झाला आहे असे त्यांचे मत आहे. या बाबतीत वऱ्हाडातील हटगार जात, खानदेशातील कानडी गवळ्यांची जात व एकंदरच नर्मदेपासून तुंगभद्रे-पर्यंत आढळणाऱ्या बंट, नाडव, रठ्ठ इत्यादि जाती लक्षात घेऊन जोशी यांनी आपला सिद्धांत विस्तारला आहे. हा सर्व विषय विवाद्य ठरेल. परंतु ग्रंथकर्त्यांने मांडलेली माहिती महत्त्वाची आहे. एखाद्या नव्या प्रमेयात गृहीत धरलेले मूळरूप, उदाहरणार्थ श्री. जोशी यांचे 'हट्ट'जन नुसते कपोलकल्पित आहे, अशी टीका कोणालाहि करता येईल. पण अशी मूळरूपे गृहीत धरूनच संशोधनाचे जहाज अज्ञाताच्या सागरात हाकारावे लागते. तीच गोष्ट श्री. जोशी यांना करावी लागली आहे. अशा अनेक प्रमेयांचा परिश्रमपूर्वक विस्तार करतानाच शेवटी इतिहासवस्तू हाती लागते. ह्या वृत्तीने त्यांनी आपले विवेचन सादर केले आहे, म्हणूनच ते अभ्यसनीय आहे.

आता श्री. जोशी यांच्या दुसऱ्या प्रमेयाकडे वळू. 'महाराष्ट्रा' चे नांव हे संशोधकापुढे मोठे कूटच आहे, व आतापर्यंत अनेक थोर संशोधकांनी केलेल्या प्रयत्नांचा परस्परछेद व अपयश पाहिले म्हणजे हा प्रश्न जास्तच गूढ वाटू लागतो. त्यामुळे संशोधकाला वाटणारे त्याचे आकर्षणहि वाढते ! पण सुरुवातीस हे नमूद केले पाहिजे की, 'महाराष्ट्रा'च्या व्युत्पत्तीसाठी म्हणून श्री. जोशी यांनी तसा प्रारंभ केलेला नाही. 'पडु' या 'पडणे' किंवा 'वसणे' या अर्थाच्या तामिळ धातूपासून निघालेल्या स्थलनामांचा, ग्रामनामांचा ( व मग पर्यायाने देशनामांचा) विचार करून त्यांनी प्रथम पाडा, पट्टी, हाट, हट्टि वगैरे संज्ञांचा अभ्यास केला. त्याचवेळी 'हाट' हा देशवाचक शब्द आणि 'वऱ्हाट' हे विदर्भाचे मूळ नाव यांचा अन्वय त्यांना अनुषंगाने लागला. मग कानडीत 'म'चा 'व' होतो या नियमावरून 'वऱ्हाट'चे 'मऱ्हाट' हे रूप त्यांना लाभले व संस्कृत 'महाराष्ट्रा'चे ते रूप मूळ आहे असे प्रमेय त्यांनी मांडले. म्हणूनच आपणहि स्थलनामांचा विचार मुख्य व 'मऱ्हाट'चे प्रमेय गौण असा क्रम मानला पाहिजे.

या प्रमेयाच्या सिद्धीसाठी 'महाराष्ट्रा' च्या व्युत्पत्तीचे पूर्वीचे 

प्रयत्न त्यांनी अग्राह्य ठरविले आहेत. 'महाराष्ट्र' या संज्ञेपेक्षा 'मऱ्हाट' किंवा 'मरहट्ट' ह्या संज्ञा ज्ञानेश्वरादिकांच्या काळीही जास्त रूढ होत्या व हीच मूळ व शुद्ध रूपे मानली पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे व तो रास्त आहे असे मला वाटते. रठींच्या पुढाऱ्यांनी महारठी हे नाव धारण केले व त्यांच्या भाषेला 'महाराष्ट्री' व प्रदेशाला 'महाराष्ट्र' ही नावे लाभली असा सिद्धांत मांडणारे संशोधक श्री. स. आ. जोगळेकर यांनीही असे मान्य केले आहे की, "निश्चितपणे शकपूर्वकालांत मोडता येतील अशा संस्कृत वा प्राकृत ग्रंथांत महाराष्ट्राचा स्पष्ट उल्लेख आढळत नाही. रामायण व महाभारत या प्राचीन इतिहास-ग्रंथांवरून अनेकांनी अनेक वेळा हात फिरविला असेल तरी त्यांतहि महाराष्ट्राचे नाव आढळत नाही."[१] यानंतर एरणच्या शिलालेखात (सन ३६५) व ऐहोळीच्या शिलालेखात (सन ६३३) 'महाराष्ट्रा' चा उल्लेख प्रथम आढळतो. परंतु, श्री. जोशी यांनी असा रास्त प्रश्न विचारला आहे की, शकपूर्व कालात नर्मदा-तुंगेच्यामधील प्रदेशांतील जनांना व जनपदांना नावेच नव्हती काय? जर तशी नावे असलीच पाहिजेत, तर मग याच नावांच्या मागोव्याने महाराष्ट्राच्या मूळ नामाकडे जाणे योग्य नाही काय?

जननामांवरून जनपदांची नावे ठरतात हे तत्त्व मला वाटते, निरपवादपणे मानूनच आपण पुढे पाऊल टाकावयास हवे. या दृष्टीनेच श्री. जोशी यांनी व इतर अनेकांनी वेगवेगळे अंदाज केले आहेत. उदाहरणार्थ रठि जनांवरून महारठींचा 'महाराष्ट्र' बनला ही जोगळेकरांची व्युत्पत्ति आहे. मल्ल, मार, महार अशा नावांवरूनही इतरांनी अंदाज बांधले आहेत. अशा या प्रयत्नांपैकी एक प्रयत्न या दृष्टीने श्री. जोशी यांची व्युत्पत्ति अभ्यसनीय आहे. 'हट्ट' या पदाचे दोन अर्थ त्यांनी घेतले आहेत : (१) 'हट्ट' म्हणजे 'पट्ट' धातुसाधित स्थलवाचक शब्द व (२) 'हट्ट' म्हणजे गोधन व त्यावरूनच 'हट्ट' (किंवा हटगार) हे गोपालवृत्तीने जगणाऱ्या एका जनांचे नाव. आता 'महाराष्ट्रा'चे पूर्वरूप 'मऱ्हाट' यांची 'मर' व 'हट्ट' अशी दोन पदे समजून 'हट्ट' पदाचा अर्थ हट्टजनांचा देश असा ते घेतात. म्हणजेच 'हट्ट'चे वर दिलेले दोन्हीही अर्थ, मला वाटते, त्यांना एकदमच घ्यावे लागतात.

'मर' व 'हट्ट' या दोन पदांपैकी पहिल्या पदाचा अर्थ कानडीत

१ स. आ. जोगळेकर 'महाराष्ट्र-परिचय' या सर्वसंग्रहग्रंथाची प्रस्तावना, पान १६ पाहा.

'झाड' असा आहे व म्हणून 'मरहट्ट' म्हणजे 'झाडदेश' किंवा 'झाडीमंडळ' असा भाषांतरवजा शब्द तयार होतो. नेमका हाच शब्द विदर्भ या मूळ महाराष्ट्राला जुन्या वाङ्यात लावलेला आढळतो व हा नुसता योगायोग वाटत नाही; आणि योगायोग नसून 'मरहट्ट' हेच जर 'झाडी-मंडळा'चे मूळरूप असल्याचे सिद्ध झाले तर श्री. जोशी यांची व्युत्पत्ति अचूक ठरेल असा संभव दिसतो.

संशोधनामध्ये अशा धाग्यांना धरून कोठवर जावे व कोठे थांबावे हा विचार मोठा बिकट असतो. परंतु श्री. जोशी यांची व्युत्पत्ति केवळ 'झाडी-मंडळा'च्या धाग्यावर आधारलेली नाही, हे ग्रंथाचे पहिले व दुसरे ही प्रकरणे समग्र वाचल्याने कळून येईल.

या बाबतीत मला एक आक्षेप घ्यावासा वाटतो. तो असा : जनांचे नाव व त्यावरून जनपदांचे नाव हा नियम पक्का धरून ठेवला तर 'मर–हट्ट' यांत हट्ट हे पद (किंवा 'मर' हे पद) जननामच हवे. त्या पदाचा अर्थ जनवाचक आणि देशवाचक असा एकदमच दुहेरी घेण्याची ही आपत्ति कशी टाळावयाची ? 'हट्ट' हे जननामच धरले, तर आणखी एक प्रश्न उद्भवतो. जननामे कशी पडतात हा तो प्रश्न. गोपालन करणारे, शेती करणारे, व्यापार करणारे किंवा आयुधजीवी व पौरोहित्यजीवी लोकसमूह असतात. पण त्यांच्या धनगर, वाणी, रजपूत किंवा ब्राह्मण अशा जाती मानावयाच्या का त्यांना 'जन' मानावयाचे ? वृत्तीवरून जातिवाचक नावे पडतातच. पण ती जननामे कशी ठरतील ? मला वाटते की, वृत्तीवरून किंवा सामाजिक अवस्थेच्या स्वरूपावरून जननामे पडत नाहीत.[१] याचाच उलट पर्याय असा की, जी जननामे वृत्तीचा बोध करून देतात ती खरी जननामे नसून जातिवाचक संज्ञाच होत. आजचे गुरव, ब्राह्मण, धनगर इत्यादि लोकसमूह 'जन' नव्हेत. तर मग पूर्वीच्या काळांतही अशा लोकसमूहांची 'जनां'शी गल्लत करणे चूक ठरेल.

ही कसोटी बरोबर असेल तर 'हट्ट' जनांबद्दल विकल्प मनात येतो. हे केवळ वृत्तिवाचक नांव आहे कां ? ते तसे आहे अशी श्री. जोशी यांचीही कल्पना दिसते. मग त्यांना विशिष्ट 'जन' म्हणणे

१ देशनामे भौगोलिक वैशिष्टयांवरून पडत नाहीत व म्हणून 'अश्मक' हे नाव दगडांमुळे लाभले असे तर्क दुबळे मानावे लागतात. नावे ही वर्णनात्मक नसतात. हाच नियम जननामे व देशनामे यांना लागतो.

योग्य होणार नाही. हाच आक्षेप इतर संशोधकांच्या प्रमेयाबद्दलही घेता येईल. उदाहरणार्थ. 'महार' ही आपल्या गावगाड्यातील एक एक वृत्ति किंवा वतन आहे व म्हणून 'महारां'ना जन म्हणता येत नाही. 'नाग' जनांचे वंशज म्हणजे 'महार' असे मानणे हे मग व्यर्थच ठरते. तीच गोष्ट रठ, रिस्टिक ( किंवा राष्ट्रिक ), भोज व पेत्तनिक यांच्याबद्दल म्हणावी लागेल. शेवटच्या तीन शब्दांच्या अर्थाबद्दल हा उतारा पाहा :

"अंगुत्तरनिकाय (३. पान ४५६) व त्यावरील टीका यांतील उल्लेखांच्या अनुरोधाने डॉ. देवदत्त भांडारकरांनी अनुमानिले की, पतेनिक म्हणजे वंशपरंपरागत. 'पितरा दत्तम् सापतेय्यम् भुञ्जतीति पेतनिको'–पूर्वार्जिताचा उपभोग घेतो तो पेत्तनिक, अर्थात् रिस्टिक–पेतेणिक म्हणजे कुलक्रमागत राष्ट्रिक, आणि भोज – पेतेणिक म्हणजे कुलक्रमागत स्थानिक राज्यकर्ता."[१] यावरून असे स्पष्ट दिसते की अशोककालीन रज्जुक, तसेच रिस्टिक, राष्ट्रिक, रठि किंवा भोज ही सारी नंतरच्या काळातील देशमुख, देशपांडे, पाटील व बलुतेदार यांच्या प्रमाणेच वृत्तिवाचक व काही अधिकारवाचक नावे आहेत. तीच गोष्ट राष्ट्रकूट या संज्ञेबद्दलही म्हणता येते. अनेक दानपत्रांतून त्या प्रदेशांतील राष्ट्रकूट (देशमुख), ग्रामकूट (पाटील) आणि प्रमुख कुटुंबी (गांवचे पंच) यांचा निर्देश असतो नंतरच्या काळात देशमुखांना नांगराचे चित्र असलेल्या मुद्रेचा हक्क होता आणि काही शिलालेखांवर आरंभीच नांगराचे चित्र आढळते. यावरून राष्ट्रकूट हे कोणत्याही प्रदेशातील मूळच्या जनांचे नाव न ठरता ते देशमुख वतनदार होते हेच जास्त स्पष्ट होते. पण श्री. जोशी यांनी याच नांगराच्या चिन्हावरून राष्ट्रकूटांना मूळ 'जन' मानले आहे. त्यांनी मांडलेले राष्ट्रकूट ॥ राष्ट्रिक = नाडव हे समीकरण मानूनही राष्ट्रकूटांना (किंवा नाडवांना) 'जन' मानता येईल असे नाही. राष्ट्रकूट राजवंश हा एका पराक्रमी देशमुख व्यक्तीचा राजवंश ठरतो; पूर्वी गुलाम असलेल्या सबक्तगिनाला पराक्रमाने राज्यपद मिळाल्यावर त्याचा 'गुलाम' नांवाचा राजवंश ठरतो त्यातलाच हा प्रकार होय. परंतु यावरून राष्ट्रकूटांना 'जन' कसे मानता येईल ?

जननामांच्या बाबतीत हा आक्षेप नमूद करताना मला अर्थातच ही जाणीव आहे की, भोज, राष्ट्रिकप्रभृति संज्ञा जनवाचकच आहेत असे

१. श्री. स. अ. जोगळेकर, कित्ता, पान १० पहा.

बहुतेक संशोधकांचे मत आहे. उदाहरणार्थ, भोजांना जन समजून त्यांचा विस्तृत इतिहास डॉ. बी. सी. लॉ यांनी 'ट्राइब्स इन एन्शंट इंडिया' (पा. ३६६–३७३) या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात दिला आहे. परंतु हट्ट, पत्ति इत्यादी जननामांचा विचार श्री. जोशी यांनी माडला आहे, त्या अनुषंगाने वरील विकल्प मी मांडला आहे एवढेच. 'जनांची' नावे ही गोपालनादि उपजीविका वृत्तीवरून किंवा राष्ट्रिकादी अधिकार वृत्तीवरून पडलेली असणे असंभवनीय आहे. मग जननामांचे मूळ स्वरूप तरी काय असावे ? याचे उत्तर असे देता येईल की, एखाद्या जनांचे विशिष्ट देवक (totem) हे त्या जनांचे नावही असते. उदाहरणार्थ नाग, वृक्ष सूर्य ही देवके व म्हणूनच निशाणावरील चिन्हे असणाऱ्या जनांना 'नाग' जन, 'वृक्ष' जन किंवा 'सूर्य' जन अशी नावे असतात. जपानी लोक स्वतःला 'सूर्य' जन मानतात. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

अशा तऱ्हेची खरीखुरी देवकनामे धारण करणारे जन व त्यांची जनपदे प्रथम ठरविता आली तरच मग अशा जनपदांच्या संकोच-विस्ताराचा क्रम शोधून महाराष्ट्र व कर्णाटक यांचा पूर्वेतिहास ठरविता येईल. त्या दिशेने जाण्याचा मार्ग जननामावरून 'मऱ्हाट' हे देशनाम साधण्याच्या परिश्रमपूर्वक प्रयत्नामुळे श्री. जोशी यांनी मोकळा करून दिला आहे. आणि 'हट्ट', 'कण्ण' प्रभृति जनांच्या अस्तित्वाचे प्रमेय अभ्यासकांपुढे मांडले आहे, हेच महत्त्वाचे आहे.

आता श्री. जोशी यांच्या ग्रंथातील तिसऱ्या प्रमेयाचा थोडक्यात परिचय देऊन मी ही ग्रंथाची ओळख पुरी करतो. पहिल्या दोन प्रमेयांच्या बाबतीतहि मी आधीच एक गोष्ट सांगावयास पाहिजे होती की, गेली वीस वर्षे याच विषयाचा व्यासंग करून ग्रंथकर्त्याने मांडलेल्या प्रमेयांची ग्राह्याग्राह्यता पारखणेच काय, परंतु परिचय करून देण्याइतकाहि माझा अभ्यास नाही. तरी पण एक जिज्ञासू म्हणून येथवर मी आपले विचार मांडले. परंतु तिसऱ्या प्रमेयाच्या बाबतीत तर माझा मुळीच अधिकार नाही. तेव्हा त्या प्रमेयाची थोडी आणि जुजबी ओळख करून देणे हेच काम राहते.

कानडी-मराठीच्या मूळरूपाचा शोध घेत 'हट्ट' जनांपर्यंत पोचल्यावर, तेथूनही मागे दूरवर जाण्याचा मार्ग संशोधकाला एक प्रकारे आमंत्रणच देत असतो. असा प्रकार श्री. जोशी यांचा झाला आहे, व तोच प्रकार एकंदर भारतीय प्रागितिहासाच्या बाबतीत नेहमीच झालेला आढळतो. भारताच्या प्रागितिहासाचे लोण आर्यांच्या आगमन-काळापर्यंत नेऊनच

पूर्वीच्या संशोधकांना सिंधु-संस्कृतीच्या अज्ञात सीमेपर्यंत जाणे भाग पडले. या बाबतीत श्री. जोशी यांनी प्रथम असे म्हटले आहे की, आर्यपूर्व भारतीयांच्या संस्कृतीपैकी एक अवयवच असलेल्या तमिळ (किंवा संस्कृतात 'द्राविड') संस्कृतीच्या मापाने तिला मोजणे योग्य होणार नाही. या आर्यपूर्व संस्कृतीला 'पत्ति'जनांची संस्कृती या व्यापक नावाने ओळखावे. हे पत्तिजन म्हणजे वेदकालीन आर्यांना ठाऊक असलेले रूद्रपूजक जन होत. या जनांच्या भाषेतील श्चेंद्र, लिंग, वगैरे शब्द संस्कृतात शिरले आहेत व 'पड्' धातुसाधित स्थलवाचक संज्ञाहि पत्तिजनभाषेतूनच आर्यांनी घेतल्या आहेत. श्चेंद्र, लिंग व पट्टि-हट्टि या शब्दांपुरती त्यांची भूमिका बरोबर ठरेल असा अभिप्राय मला एका संस्कृतज्ञाने दिला. परंतु काही शब्दांच्या देवाण-घेवाणीपुरता प्रश्न नसून फारच व्यापक अशा दोन संस्कृतींच्या संगमाचा व संघर्षाचा हा प्रश्न आहे.

या बाबतीत श्री. जोशी यांच्या एकंदर भूमिकेचे वैशिष्टच असे की, भारताच्या प्रागितिहासाचा विचार करताना आर्यपूर्व भारतीयांना वन्य असंस्कृत अवस्थेतून 'माणसां'त आणण्याचे कार्य आर्यांनी केले ह्या परंपरागत दृष्टीचा त्यांनी त्याग केला आहे. आर्यांनी मूळच्या अनार्य बर्बरांचा उद्धार केला असे मानून सर्व प्रागितिहास रचण्याचें तत्त्व पाश्चात्य, विशेषतः जर्मन, विद्वानांनी आपल्याकडील पहिल्या पिढीच्या विद्वानांना शिकविले. जातिसंस्थेची विषमता ऐतिहासिक व वांशिक घटनांमुळे उत्पन्न होणे कसे अपरिहार्य (व रास्तही) होते हे सिद्ध करण्यासाठी आर्यांच्या उद्धारकार्यांचे हे तत्त्व उच्चवर्णीय विद्वानांना ग्राह्य वाटले. परंतु, अलीकडच्या संशोधनांमुळे या तत्त्वाची पकड ढिली होत गेलेली आहे व काही वेळा तर नेमकी उलट भूमिका घेण्याचा एकांतिक विचारही डोकावू लागला आहे. श्री. जोशी ह्यांनी ही प्रतिक्रियात्मक एकांतिक भूमिका स्वीकारलेली नाही, परंतु आर्यांच्या उद्धारकार्यांचें तत्त्वही मानलेले नाही. किंबहुना त्यांच्या प्रस्तुत ग्रंथामुळे त्या तत्त्वावर अप्रत्यक्षपणे पुष्कळ आघात झाले आहेत व आर्यपूर्व भारतीयांच्या संस्कृतीकडे, भाषेकडे, जनांकडे व दैवतांकडे आत्मीयतेने व आदराने वळण्याची गरज त्यांच्या विवेचनामुळे स्पष्ट होणार आहे. मराठी, कानडी इत्यादि लोकभाषांचा व त्याच्या पूर्वरूपांचा शोध घेणे, तसेच लोकांच्या दैवतांचा, सणांचा व क्षुल्लक भासणाऱ्या पंथांचा अभ्यास करणे संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासापेक्षाहि आता जास्त निकडीचे आहे

ही गोष्ट श्री. जोशी यांच्या ग्रंथामुळे आपल्या अभ्यासकांच्या समोर ठळकपणे आली आहे. आर्यप्रधान संशोधनाच्या चाकोरीतून बाहेर पडण्यास या ग्रंथामुळे मदत होणार आहे, व ग्रंथकर्त्याचे निष्कर्ष सदोष ठरले तरी ही नवी दिशा स्पष्ट केल्याचे श्रेय त्याला निश्चितच द्यावे लागेल.

आर्य-द्रविड प्रश्नासंबंधीच्या श्री. जोशी यांच्या प्रमेयाचा जास्त परिचय करून घेण्यासाठी जिज्ञासूंनी व तज्ज्ञांनी मूळ ग्रंथातून या व्यापक प्रमेयाची समग्र मांडणी पाहावी अशी मी विनंती करतो.

शेवटी मी एवढेच म्हणेन की, या ग्रंथामुळे 'मऱ्हाटी' बद्दल जिज्ञासा वाढली व मराठी-कानडीच्या मूळस्वरूपाचा शोध नीट सुरू झाला, तरी ग्रंथाचे चीज झाल्याचे समाधान लेखकाला लाभेल. भाषिक प्रांतरचनेतील वैमनस्ये ही केवळ अशा प्रबंधाचा उतारा देऊन नाहीशी होणार नाहीतच. परंतु या वैमनस्यांच्या आहारी व स्वार्थप्रेरित राजकीय अपप्रचाराच्या कह्यात सामान्य लोकांनी जाऊ नये यासाठी अशा ज्ञानाचा उपयोग खास होईल. मानव जातीवर अधिराज्य करण्याची पात्रता नॉर्डिक (आर्य) वंशाला आहे असा हिटलरच्या दरबारी पंडितांनी प्रचार केला. भारतीयांनी सर्व ग्रीकांची उसनवारी केली असा दावा काही इंग्रज पंडितांनी केला. विद्वतेला राबवून हीन प्रचार झाल्याची अशी अनेक उदाहरणे देता येतील. अशा भ्रष्ट पांडित्याचा समाचार घेण्यासाठी सत्यान्वेषी व लोकहितदक्ष पांडित्यानेच पुढे आले पाहिजे. संशोधनाच्या मागे अशी लोकहिताची एषणा व दक्षता असणे हेच मुळात गैर आहे असे मानणारे टीकाकार म्हणतील की, श्री. जोशी यांनी हवी तर आणखी प्रमेये मांडावी पण मराठी कानडी भाषिकांच्या सलोख्याची तळमळ मनात ठेवू नये. दुर्दैव हे की विद्वतेच्या 'चवरीला केरसुणीची' उपयुक्तता आणण्याचा खटाटोप श्री. जोशी यांनी केला आहे, असे श्री. टिकेकर यांच्यासारख्या मार्मिक समीक्षकाने म्हटले आहे. परंतु मला वाटते की श्री. जोशी यांच्याप्रमाणे सर्वच पंडितांनी संशोधनामध्ये ज्ञानसाधनेबरोबरच लोकशिक्षणाची आस्था मनात बाळगली, तर ज्ञानाला ते बाधक न ठरता पोषकच ठरेल. आज आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी भाषिक प्रदेश आपापल्या देशनामांच इतिहासचा नव्हे तर आपापले भविष्यच शोधीत आहेत व या प्रयत्नात भारताच्या नव्या उज्जल भविष्याचेही स्वप्न मूर्त करू पाहात आहेत. अशा वेळी श्री. जोशी यांच्या दीर्घ व्यासंगाची अशी फळे मराठी व कानडी लोकांना लाभत जावीत अशी आशा प्रकट करून ह्या परिचयाचा मी समारोप करतो.

# सूची

अद्वैत तत्त्वज्ञान २१८
अनुभव ४०, १२६-७, १३४,
—आध्यात्मिक २३४, २३६-८, २४२
व गुरु २३५, २३९
अफगाणिस्तान ७५
अमेरिकन संयुक्तराष्ट्र ८३, ८५
अरबस्तान ७३
अल्पसंख्याक ७७-८, १०१-४
आइन्स्टाइन् १-२, २५, २७
आकडेवारी ४०, ९०-६, १०१
आक्रमकता ४२-३, ४६-७, १७१-२
आगरकर १३७, २००, २०४
आत्मज्ञान ६, २३, २६, १८४-५, २३४
आध्यात्मिकता २६-७, ३९-४१, १२८, २३५-४०
आमटे, बाबा १५२
आर्थिक नियोजन ४८, १०६, १०८, १७४
आर्य संस्कृती २०७, २१२-४, २१६, २२५-६
इब्राहिमखान ७६
इराण ११०-२
इस्लामी आक्रमण २०८
उजबेगस्तान ४३, ७०, ७५, ८६-८
एनवरपाशा ७६
एंगल्स ३१-२, १५८, १७२, २२३-७
एऱ्हेनबुर्ग ४६
औद्योगीकरण ८६-८, २०२
कम्युनिस्ट जाहीरनामा ३०-३८
करंदीकर, ज. स. १६३
करमरकर, र. दा. २३०
कर्म १६४, १६६
कला १८०-१
कामगारवर्ग ९-१०, ३५-६, ५५
कास्ययुगीन संस्कृती २१४
काँग्रेसपक्ष ५१, ५३, ५५, ६१, १४४
कॉमनवेल्थ ५१-२, ८५
किसानसभा १४४
कुंटे, एम्. एम्. २२२-४, २३१-२
किपलिंग, रुडयार्ड ११६
किरकप १४१
कुर्दिस्तान ११०-१
केरळ ५८-६१
केरेन्स्की राजवट ७६
केशवसुत १७, १७९
कोसंबी (प्रा.) २३१
ख्रिस्त १७-८, १८२
गाडगीळ पां. वा. १४६
गांधी (महात्मा) १८, २३, २९, १३७-८, १४७-८, १८३, १८६
गॉर्की १२१-४,

गुण व कर्म १६२-४, २०१, २२१
गुलामगिरी १७-८, २२१, २३१
गीता ३०, १६२, १८२
गोत्रव्यवस्था २२२
गोंडा, जी. २१६
गोथा प्रोग्राम १७०
ग्रीक संस्कृती १९, २१६
चर्चिल ९८, १०६-७, ११०
चँग कै-शेक ४९, ५४, १५९
चॅटर्जी, सुनीतिकुमार १२९, २११,
२१५-७, २४७
चाइल्ड, गॉर्डन २२५-६, २३१
चिचेरिन १०३
चीन ११, २९, ५४-५
जडवाद २, ४, १९, २४, २७-८, २२९
जपानी आक्रमण ११५-६
जयकर ८१
जयप्रकाश नारायण १४६
जागतिक शांतता १०६, १०८-९,
११३, ११७
जातिभेद व जातिव्यवस्था १४९
१६२-४, १८१, २०१, २२४
जावडेकर, शंकरराव ३१-२, ३४-५,
३७, १४४
जॉर्जिया ६९
जिप्सी ६४, ६८
जोगळेकर, स. आ. २५२
जोशी, लक्ष्मणशास्त्री २०८-१०, २१३,
२१७
जोशी, ना. म. १४०
जोशी, वा. म. १४६
जोशी, शं. बा. २४५-५७
झायोनिस्ट चळवळ पाहा यहुदी
झारशाही १४, ४३, ५३, ६३-४, ६९,
७१, ७५-७, १२९
झेकोस्लोव्हाकिया ८४, १०१-२,
१०४-५, १३१-३,
टागोर रवींद्रनाथ ६४, ७१, १२३
टॉलस्टॉय १२१, १२३, १३७, १३९,
१८२
टिकेकर २५७
टिटो ८५
टिळक (लोकमान्य) १३७, २००,
२०७, २२६,
ट्रॉटस्की १००
डांगे, श्री. अ. १४०-१, १४३, २२१-
३२
डायकोव्ह २३०-१
डार्विन २५, २७, १८५-५६
तटस्थता ११४-५
ताजिकीस्तान ४३, ७०, ७४-७
तुर्कस्तान ११०-१,
थॉम्पसन् २२५-६,
दडपशाही ४९, ५१, ५४-५, ७६,
१०७, १३१
दंभ १०८, ११४-५, १३४
दर्शने १, १७-२१
दहशतवादी संघटना व धोरण ७, १२,
५३-४, ५६, १३९, १४१,
१४५, १५६-९
दांडेकर, रा. ना. २१६

दैवत कल्पना १९५, २११, २१९,
२४९-५०, २५५,
ज्ञानसाधना १, ५, २६, २०२-३,
२३८
ज्ञानेश्वर १७, २४५, २५२
द्रविड संस्कृती २४७
धर्ममीमांसा १७४, १९७-८, २४३-४
२५०, धर्मस्वातंत्र्य ७०, ७२-३,
७६-७, १०२
नंबुद्रीपाद ६०-१,
नाझी राजवट ४६, ७१, ११८-९
नास्तिकता २३४, २३७, २४२-३
निवडणुका १५०, १५५
नीग्रो ६७, ७१, ८३, ८५
नेहरु जवाहरलाल ५१, ५५, ७१,
१०६, १३८, १४४, १४७
नैतिकता १८१, २४१
नोबेल पारितोषिक ११७
न्यूटन २५, २४१
परंपरा १६७, १९९-२००, २०७
परात्मभाव २-५, ११-३, २४-६, २८
परिवर्तन २, ७, १२, १५-६, १९,
२२, १४९, १५२, १७९-८६,-व
प्रगती १८२-३, १८५,
पॅनइस्लामिझम ६४, ७४, ७६, १४३
पॅरिस कम्यून ३६
पामदत्त २३१
पारसन्स १३८
पिळवणूक ९, १२-३, १७०-२,
पुराणे १८८-९
पुरुषमेध १०९-१, १९८, २२९
पेंडसे, लालजी १४०, २३१
पोग्राम ७१
पोलंड ६८-९, १००-१, १०३
पोस्टगेट १४१
प्रवृत्तिमार्ग १९६-७, २४३-४
प्राचीन समाजव्यवस्था १६३
फॅसिझम ४२, ११७, १२३, १४७,
१५१, १७०
फुले (महात्मा) १४९, २००
फ्रँको (जनरल) ९८, १०६, ११४
फ्रेंच राज्यक्रांती ७, ४२, १६४, २०२
फ्रॉईड १-२, २५, २७, १८६
बरन्निकोव्ह १२७, १२९, १३१,
१३४-५
बर्नालि, जे. डी. १७५
बळीराजा १८७, १८९, १९७-८
बार्नेस, लिओनार्ड ८८
बुद्ध १८, १८२
बुवाबाजी २३३-४, २३९, २४४
बेकारी ४८, ५१, ५९
बेडेकर दि. के. २७-९
बोघाझकोई २१२
बोखारा ७५-६, ८७
बोल्शेव्हिक क्रांती ५४, ७६, ८६,
१००
बोस, सुभाष १४७
ब्राह्मी लिपी २१५
ब्रिटन २२, ३४, ५१, ७५, ९८, १०६,
११०-१
भय ६, १९४-५
भांडवलशाही १०, १३, ३३, ३७, ९८
१०६, ११०-१
'भारत छोडो' २३, १४८

भारतीयत्व २०६-७,
भारतीय राज्यघटना ८४, संस्थाने ११०, स्वातंत्र्यलढा ३४-५, १३८–९, १४७-८
भाषिक प्रांत ५१-२
भूदान २६, १५२
भोगप्रवृत्ती २९-४०, १९३, १९६
मक्तेदार पाहा भांडवलशाही
मध्ययुगीन राज्यव्यवस्था ४२, ७५-७,
मंत्र २२९, २४०
महायुद्धे ११, १४, ९८, ११३, ११८-२०, १२८, १३०, १३४-५
मॅक्डोनाल्ड ३६, १४१
मॅक्लिऑड ४४
मॅसिडोनिया ८५
**मार्क्स** १, १७१-६
आशावाद ६-७
द्रष्टेपण ९, ११, ९८, १७१
परात्मता २६-७
परिवर्तन ७
प्रतिभा ३१, १७३
भारतीय स्वातंत्र्य ९७, १७१
मानवी प्रवृत्ती १३, २५
लौकिक आयुष्य १७५
समकालीन परिस्थिती ५
**मार्क्सवाद**
अनुयायी १-२, ८
अन्वयार्थ ५-६
जडवाद २४, २६-७, २२९
दहशतवादी मार्ग ५३-४, ५६
धर्ममीमांसा १७४
पोथीवादी २०
राजसत्ता ५०, ५३,
लोकशाही ५२, ५४
वर्गसमन्वय ३४-५
विज्ञाननिष्ठा १५
विपर्यास १, ३२-३, ३६, १६१
विषमता १६१
व्यवहारातील प्रचीती २, २०, ३२
सर्जनशीलता २५
सामर्थ्य २७, ३८
समाजपरिवर्तन, क्रांती ६-७ १०-११
सामाजिकता २५, ६२
हिंसा ८, १३, २३, २८-९
हुकूमशाही २८
माव-त्से–तुंग २, ५४
मिल जे. एस्. १४२, २२२-३
मुकर्जी राधाकमल ६४
मुकर्जी राधाकुमुद ८१
मुसोलिनी ३६, ११४, ११७-८, १६५
मेयो (मिस्) ४०, ४३
मानवता/अमानुषता/मानवी श्रेय ५, ७, १६-७, ११३-६, १२२-३, १२८, १८२-३
मुक्तेश्वर २४९
मूर्तिपूजा २५
मृत्यू १८९, १९४-५
मोहेन–जो, दारो पाहा सिंधुसंस्कृती
यज्ञसंस्था १८९-९०, २१८-९, २२२-३ २२९-३०
यम १८९
यहुदी १५, ७१-४, ८२-३

यादवी ६०, ११४, १५३
युक्रेन ४३, ६८-९, ८६, १०३
युगोस्लाव्हिया ८४-५
युवकांचा असंतोष १५४-५
रसेल ११८-९, १४१
राजगोपालाचारी ६४
राजसत्ता ३६-७, ४९-५०, ५२, ९५
राज्यांचे अधिकार ६०-१, ८१, १००-१
रानडे (न्यायमूर्ती) १४२, १४९, २०० २४७
रामायण-महाभारत ४२, १८८, १९१
राष्ट्रसंघ ६९, १०१-४, ११०, ११६-७
राष्ट्रीयत्व ३३, ७७–८१, १९२
राहणीमान ४८, ५२, ५८
रॉबसन, पॉल ७१
रॉय, मानवेंद्र १४०, १४३, १४७
रिकार्डो १७३
रुमानिया ६८-९
रूसो १८, १८२
रोमँटिसिझम् ६
रोमाँ रोलाँ १२३
ऱ्हॉत्स्नी, बेडरिख २१२, २१४
ऱ्होडेशिया ८८
लॅतव्हिया १३०
लॉ, बी. सी. २५५
लेनिन ५४, १००, १४१, १४३
लोकशाही राज्य ५२, ६१-३, १५८
वंशबीजशास्त्र ४४, १६३
वंशभेद १५, ७२
वर्गकलह (विग्रह) ५, ३१-३, ३६-७, १५३-समन्वय ३४-५, १०८, –सापेक्षता ३७
वर्णद्वेष ७१-२, ८५, ९७, ९९, १०३
वॅलेस, हेन्री ३८
वारकरी पंथ २५०
वाव्हिलाव्ह ४५
विज्ञाननिष्ठा १५, ४१, १३८, २०३, २४१
विधी व वास्तव २२६-३०
विनोबा २२-३, २६-९, १८३



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
67738 10

दा. क्र. १७२९३

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| अनुक्रमणिका | | | |
| मागील पृष्ठ | १३ | ४ मे १८६९ | ४ मे १९६९ |
| प्रस्तावना पृष्ठ ३ | १६ | धर्मचचची | धर्मचर्चेची |
| २७ | २२ | dialeetics | dialectics |
| २९ | १ | अशाचा | अंशाचा |
| ४४ | २४ | म्हणतो | म्हणतो* |
| ६४ | २७ | ससिष्णुतेने | सहिष्णुतेने |
| ७९ | २९ | वैशिष्यांकडे | वैशिष्टचांकडे |
| १०८ | ३१ | वैर करा. | वैर करा– |
| ११५ | ५ | ध्वर्थी | द्वयर्थी |
| १३० | २८ | छायाचित्रात दाखविल्याप्रमाणे | (हे शब्द गाळावे) |
| १७३ | २५ | प्रतिमेची | प्रतिभेची |
| १८१ | १७ | आहोत; आणि... | आहोत. |
| १९८ | २४ | Consellers | Counsellors |
| १९९ | ३० | मला... ले की | मला वाटले की |
| २१५ | १४ | सहस्त्रकात | शतकात |
| २२१ | ३ | समहजीवनापासून | समूहजीवनापासून |
| २२२ | ३१ | onLdon | London |
| २४१ | ४ | सामन्यांचा | सामान्यांचा |
| २४४ | ३१ | राहीन | राहील |
| २४९ | २६ | १ ही भूमिका... | (ही तीन ओळींची तळटीप 'पूजिलेला दिसतो ही' या मजकुराखाली वाचावी.) |

REFBK-0017293
REFBK-0017293

किंमत रु. १०

साहित्याचे रसिक समीक्षक म्हणून प्रा. दि. के. बेडेकर मराठी वाचकांना माहित आहेत. त्यांच्या समीक्षेत जो वेगळेपणा आहे तो त्यांच्या तत्त्वचिंतनामुळे आणि सामाजिक सहृदयतेमुळे आलेला आहे. प्रस्तुत संग्रहात त्यांची ही भूमिका चांगली स्पष्ट होते. भारतीय परंपरा, महाराष्ट्राची घडण, विषमता, समाजवाद, सोव्हिएत राष्ट्रवाद, जागतिक शांतता असे अनेक प्रश्न येथे त्यांनी विचारात घेतले आहेत. व्यासंगी, चिकित्सक व निस्पृह पद्धतीने त्यांनी मार्क्सच्या भूमिकेचा परामर्श घेतला आहे; व तर्कतीर्थ जोशी, कॉ. डांगे प्रभृतींच्या भूमिकांचे खंडन केले आहे. काही लेखांतून ते प्रचलित वादांच्या व मतांच्या बाहेर जाऊन ‘ बळी-राजाचे व्यथित मानस ’ या सारखे लेख सादर करतात. त्यांचे ‘समाजचिंतन ’ अनेकविध आहे, तरी एका निराग्रही सहृदयतेने व तत्त्वजिज्ञासेने ते सारे चिंतन एकत्र बांधलेले आहे, असा साक्षेपी वाचकांना प्रत्यय येईल.